
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भूप्रवास
सं. क्र. ९६२

# जीवनलीला

काका कालेलकर

पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

७४४६२
११।३।६९
४६३



# जीवनलीला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

REFBK-0017702

REFBK-0017702

भारतांतील नद-नद्या, प्रपात, तलाव-सरोवर, समुद्र
आदींची सनातन

# जीवनलीला

काका कालेलकर

अनुवादक
नरेश मंत्री

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

REFBK-0010188

पॉप्युलर बुक डेपो, लॅमिंग्टन रोड, मुंबई नं. ७

© श्री राधालक्ष्मी ट्रस्ट

आवृत्ति पहिली
सन : १९५८

प्रकाशक :
ग. रा. भटकळ,
पॉप्युलर बुक डेपो,
लॅमिंग्टन रोड,
मुंबई नं. ७

मुद्रक :
ज. दि. देसाई
राष्ट्रवैभव प्रेस,
विठ्ठलभाई पटेल रोड,
गिरगांव, मुंबई ४

मावंदें मूळ मराठी आहेत. ]


५
कवि व्यंकटाध्वरीनें मह्
लोकांना तरुणपणीं ११
किंवा ...रता-संस्कृति १८
नदी-मुखनैव समुद्रम् आविशेत् २१
अुपस्थान २३

| | | |
|---|---|---|
| १ | सखी मार्कंडी | १ |
| २ | कृष्णेचीं संस्मरणें | ३ |
| ३ | मुळामुठेचा संगम | ८ |
| *४ | सागर-सरितेचा संगम | १० |
| ५ | गंगामाअी | १३ |
| ६ | यमुनाराणी | १७ |
| ७ | मूळ त्रिवेणी | २१ |
| ८ | जीवनतीर्थ हरद्वार | २२ |
| ९ | दक्षिणगंगा गोदावरी | २६ |
| १० | वेदांची धात्री तुंगभद्रा | ३४ |
| ११ | नेल्लूरची पिनाकिनी | ३७ |
| १२ | जोगचा धबधबा | ३९ |
| १३ | जोगचें पुनर्दर्शन | ५७ |
| १४ | जोगचा कोरडा धबधबा | ६५ |
| १५ | गुर्जरमाता साबरमती | ७१ |
| १६ | अुभयान्वयी नर्मदा | ७६ |
| १७ | संध्यारस | ८३ |
| १८ | लावण्यफला लूनी | ८७ |
| १९ | अंबा-अंबिका | ८९ |
| २० | रेणुकेचा शाप | ९० |
| २१ | अुंचळळीचा धबधबा | ९२ |
| *२२ | प्रथम समुद्रदर्शन | ९८ |
| *२३ | गोकर्णाची यात्रा | १०१ |
| २४ | भरताच्या डोळयांनीं | ११२ |
| २५ | छप्पन्न वर्षांची भूक | ११५ |
| २६ | वेळगंगा आणि सीतानहाणी | १२४ |
| २७ | शेतकरी नदी घटप्रभा | १२८ |
| २८ | काश्मीरची दूधगंगा | १२९ |
| २९ | स्वर्धुनी वितस्ता | १३० |
| ३० | सेवाव्रता रावी | १३४ |
| ३१ | स्तन्यदायिनी चिनाब | १३८ |
| ३२ | जम्मूची तवी | १३९ |
| ३३ | सिंधूचा विषाद | १४० |
| ३४ | मंचरची जीवनविभूति | १४५ |
| ३५ | लाटांचा तांडवयोग | १५१ |
| ३६ | सिंधूनंतर गंगा | १५६ |
| ३७ | नदीवर कालवा | १६३ |
| ३८ | नेपाळची वाघमती | १६५ |
| ३९ | बिहारची गंडकी | १६८ |
| ४० | गयेची फल्गु | १६९ |
| ४१ | गरजणारा शोणभद्र | १७० |

*४२ तेरदाळचें मृगजळ १७२
४३ चर्मण्वती चंबल १७४
४४ नदीचें सरोवर १७६
४५ निशीथ–यात्रा १८०
४६ धुवांधार १९२
४७ शिवनाथ आणि अीब १९७
४८ दुर्दैवी शिवनाथ २००
४९ अबरी अीब २०३
*५० अृषिकुल्येचें क्षमापन २०४
५१ तेंदुला आणि सुखा २०७
५२ सूर्येचा स्रोत २११
५३ दोन मद्रासी बहिणी २१६
५४ नागीण नदी तीस्ता २१९
५५ सहस्रधारा २२३
५६ गुच्छुपाणी २२९
५७ परशुराम कुंड २३५
*५८ वर्षागान २३९
५९ रण कीं सरोवर २४४
६० चांदीपुर २४६
६१ सार्वभौम भरती–ओहटी २५१
६२ कराचीच्या वाटेवर २५३
६३ दक्षिणेच्या टोंकास २५५
६४ समुद्राच्या पाठीवर २६७
६५ सरोविहार २७४
६६ सुवर्ण देशाची माता अैरावती २७६
६७ समुद्राच्या सहवासांत २८१
६८ रेखोल्लंघन २८७
६९ नीलोत्री २८९
७० अर्णवाचें आमंत्रण २९८
अनुबन्ध ३०६
सूची ३१३


# शुद्धिपत्रक

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २६ (प्रस्ता०) | ९ | | ‘ क्षिप्रा ’ नंतर कंसांत ( शिप्रा ) वाचावें |
| १८ | १८ | ‘ टेहरी ’ | ‘ टेहरी, श्रीनगर, हरद्वार ’ |
| ९३ | १३ | शिरसीला | नीलकुंदला |
| ९८ | ४ | युरोधि | युयोधि |
| १५७ | १५ | सुषमाच्या | सुर्माच्या |
| १६२ | २० | गेल्या | गया |
| १७६ | २४ | ‘ देखनारा ’ | ‘ देखनारा ध्रूजे ’ |
| २०६ | ७ | कलिंग | कलिंगांतील गजपति |
| २७६ | २४ | ‘ ब्रह्मदेशांत ’ | ब्रह्मदेशांत रंगूनहून |
| ३०३ | ९ | अुत्तरेकडे | अुत्तर-ध्रुवाकडे |

# मावंदें

कवि व्यंकटाध्वरीनें महाराष्ट्रीय लोकांचें वर्णन करतांना म्हटलें आहे कीं या लोकांना तरुणपणींच तीर्थयात्रेला निघण्याची हौस असते. हा आपला गुण– किंवा खोड म्हणा वाटल्यास—टिकून असल्याचा पुरावा आज आपल्याजवळ नाहीं. तरीहि काशीपासून रामेश्वरापर्यंत यात्रा करणाऱ्या महाराष्ट्रीयांची संख्या अितर लोकांहून कमी भरणार नाहीं. हिमालयाच्या यात्रेला जाणारे महाराष्ट्रीयहि थोडेथोडके नसतात. कृष्णा आणि गोदावरी यांच्या कुटुंबांतील नद्यांनीं सबंध हाराष्ट्र व्यापला आहे. महाराष्ट्राच्या वांट्याला समुद्रकिनाराहि बराचसा आलेला आहे. शिवाजीच्या गलबतांतून महाराष्ट्रीयांनीं समुद्रयात्रा पुष्कळच केली असणार. चांचेगिरी केली नसेल असें सांगतां येत नाहीं. तेव्हां महाराष्ट्रीयांना नद्या, नद, सरोवरें, धबधबे, समुद्रकिनारा आणि त्यांतील भरती–ओहोटीचे प्रकार यांनें आकर्षण असणारच.

माझीं कित्येक नदीवर्णनें गुजराथींतून मराठींत आणण्याचें काम कु. प्रेमाबाअी कंटक यांनीं मोठ्या आस्थेनें केलें आणि 'लोकमाता' या नांवानें तें प्रसिद्धहि झालें. त्या गोष्टीला बारा वर्षें लोटलीं असतील. आतां ती आवृत्ति देखील सहजासहजीं कोठें मिळत नाहीं. चि. सतीशनें 'लोकमाते' वर 'शैलीबोधिनी' टीका लिहून त्या पुस्तकाची अुपयोगिता वाढविली. त्याच नद्यांमध्यें अितर कित्येक नद्या वाढवून आणि प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें जीवनलीलाविषयक अितर पुष्कळ लेखांची पुस्ती जोडून गुजराथी 'जीवनलीला' तयार केली. या पुस्तकाचें भाषांतर भारतांतील सर्व भाषांतून करण्याची कामगिरी साहित्य अॅकॅडमीनें स्वीकारली. गुजराथी 'जीवनलीले'चें श्री. रवीन्द्र केळेकरकडून हिन्दी करवून तेंहि पुस्तक नवजीवन प्रकाशन मंदिरानें छापलें.

मूळ गुजराथी पुस्तकाच्या आधारें श्री. नरेश मंत्रींनीं 'जीवनलीले' ला मराठी रूप दिलें. गुजराथी आवृत्ती नंतर हिन्दी पुस्तकांत जीं प्रकरणें वाढविलीं होतीं तींहि मंत्रींनीं मराठींत आणलीं आहेत, व दोन्ही पुस्तकांवरील टीकेंतील टिप्पणींत जो कांहींसा पाल्हाळ होता तो कमी करून तीहि मदत या

पुस्तकाला मिळवून दिली आहे. आणि बऱ्याच मेहनतीनें सविस्तर सूची तयार करून वाचकांची मोठी सोय करून दिली आहे.

मराठी ' जीवनलीला ' साहित्य ॲकॅडमीनें छापली असती. पण मुंबअीच्या पॉप्युलर बुकडेपोचे श्री. सदानंद भटकळ यांनीं मोठ्या आस्थेनें प्रकाशनाचें काम आपल्याकडे घेतलें. अशा रीतीनें अेका महाराष्ट्रीयाचें गुजराथी-हिन्दी लिखाण मराठी अनुवादाच्या रूपानें वाचकांना मिळत आहे ! गुजराथी आणि हिन्दी प्रमाणें मराठी मजकूर देखील मी साद्यंत पाहून गेलों आहें आणि मला हें सर्व भाषांतर संतोषकारक वाटलें आहे. या सत्तर प्रकरणांतील केवळ सहा प्रकरणें मीं स्वतः मराठींत लिहिलेलीं आहेत. तीं अनुक्रमणिकेंत तारकांकित केलीं आहेत. त्यावरून वाचकांची खात्री होअील कीं माझ्या मूळ लिखाणांत आणि श्री. नरेश मंत्रींच्या भाषांतरांत शैलीभेद मुळींच नाहीं. म्हणून हें सर्व लिखाण माझेंच मराठी लिखाण आहे असें मानावयास हरकत नसावी.

आजकाल महाराष्ट्रांत प्रवासवर्णनें पुष्कळ लिहिलीं जातात. कित्येक चांगलींच छटादार असतात. तेव्हां महाराष्ट्रीय वाचकवर्गांत भूवर्णनाची गोडी वाढली आहे याविषयीं शंका नाहीं. भारतीय संस्कृतीचें प्रतिबिंब या ' जीवन लीलें ' त पडलेलें वाचकांना दिसून येअील असा विश्वास वाटतो.

काशी-रामेश्वराची यात्रा करून घरीं परत आल्यानंतर आपले पूर्वज गंगापूजन, देवास नैवेद्य समर्पण व ब्राह्मण-भोजन वगैरे मावंद्याचा समारंभ करीत आणि आलेल्या पाहुणेमंडळीला आचमन म्हणून थोडें थोडें गंगाजलहि देत.

पूर्वजांच्या भक्तीनें, पण नव्या दृष्टीनें गंगेसारख्या अनेक नद्यांची आणि जीवनप्रवाहांची यात्रा केल्यानंतर आणि हिन्दी, गुजराथी वगैरे भाषांची समाराधना केल्यानंतर मराठीच्या घरीं येअून हें मावंदें करण्याची संधि मिळत आहे, याचा विशेष आनंद वाटतो. सर्व महाराष्ट्रीय बंधु-भगिनींना या मावंद्यासाठीं आमंत्रण आहे.

नवी दिल्ली<br>मातृदिन, ता. १३-९-१९५८

—काका कालेलकर

गोदावरी नांव धारण करून जन्मास येणाऱ्या
आणि स्वतःच्या जीवनधारेला राधा
नांवानें कृष्णभक्तींत अर्पण करणाऱ्या
माझ्या मातेच्या पवित्र स्मृतीस,
आजच्या पवित्र मातृदिनीं
ही जीवनलीला

**अर्पण**

करून कृतार्थ होतों.

नवी दिल्ली
मातृदिन
१३-९-५८

दत्तात्रेय

# लोकमातांची जीवनलीला

मीं कुठें तरी लिहिलेंच आहे कीं माझीं भारत-प्रवासाचीं वर्णनें हीं केवळ साहित्य-विलास नसून भारत-भक्तीचा व पूजेचा तो अेक प्रकार आहे. भगवंताचें गुणगान करणें हा जसा नवविधा भक्तीमधील अेक प्रकार आहे त्याचप्रमाणें भारताची भूमि, त्याचे पहाड व पर्वतश्रेणी, नद्या व सरोवरें, गांवें व शहरें, त्यांत रहाणारे लोक व त्यांचा पुरुषार्थ, त्यांच्या आश्रयानें रहाणारे 'ग्राम्य' पशुपक्षी व त्यांच्याशीं असहकार करून स्वातंत्र्याचा अुपभोग घेणारे 'आरण्य' अथवा वन्य पशुपक्षी-या सर्वांचें वर्णन करून त्यांचा परिचय साधणें हा भारत-भक्तीचा अेक अत्यंत आनंददायक प्रकार आहे. ही भक्ति अेकान्तांतहि होअू शकते आणि लोकान्तांतहि करतां येते. जेव्हां जेव्हां अेखादी नवयुवकांची भटकी टोळी मला भेटायला येते व म्हणते कीं तुमचीं प्रवासवर्णनाचीं पुस्तकें वाचून आम्ही भारताच्या यात्रेला निघालों आहोंत, तेव्हां मला अतिशय आनंद होतो. आणि जणूं काय ते माझ्यावर अुपकार करण्यासाठींच निघाले असावेत अशा कृतज्ञ-भावानें मी त्यांच्याकडे पाहूं लागतों.

माझ्या या प्रवासवर्णनांतून ज्यांत भारतांतील नद्यांना भक्तिकुसुमांची अंजलि अर्पण केलेली आहे अशीं सर्व वर्णनें अेकत्रित करून 'लोकमाता' या नांवानें त्यांना कधींचे लोकांसमोर ठेवण्यांत आलें आहे. महाभारतकारांनीं आपल्या नद्यांना 'विश्वस्य मातरः' म्हटलें आहे. या स्तन्यदायिनी मातांचें वर्णन करतांना आपले पूर्वज कधींच कंटाळले नाहींत. आणि माझा अनुभव आहे कीं याच नद्यांचीं नव्या धर्तीचीं स्तोत्रें जर लोकांपुढें ठेवलीं तर आजचे लोक देखील प्रेमपूर्वक त्यांचें स्वागत करतात.

स्वराज्य सरकारनें अलीकडेच स्थापन केलेल्या साहित्य ॲकॅडमीनें (भारत-भारती परिषदेनें) सूचना केली कीं 'लोकमाता' मध्यें दुसऱ्या कांहीं प्रवास-वर्णनांचा अन्तर्भाव करून अेक पुस्तक तयार करून द्या. आम्हांला तें भारतांतील प्रमुख भाषांत अनुवादित करून प्रसिद्ध करावयाचें आहे.

या अनुग्रहाचा स्वीकार करतेवेळीं मीं विचार केला कीं वाटेल त्या प्रवास-वर्णनांचा समावेश करण्यापेक्षां नदी, प्रपात व सरोवर यांच्याशीं जुळतील अशीं

सागराचीं, सागर-संगमाचीं आणि सागर-किनाऱ्यावरील जलदेवतेच्या विविध क्रीडांचींच वर्णनें जर दिलीं तर पंचमहाभूतांपैकीं अेका अत्यंत आह्लादक तत्त्वाच्या लीलेचें वर्णन अेकत्र येअील आणि या नव्या पुस्तकांत अेक प्रकारची अेकरूपता आल्यासारखें होअील. हा विचार मित्रांना आणि साहित्य अॅकॅडमीच्या गुजराथी सल्लागारांना व संचालकांना पसंत पडला, म्हणून 'लोकमाता' आतां या 'जीवनलीले'च्या स्वरूपांत वाचकांच्या सेवेला सिद्ध झाली आहे.

गुजराथी आवृत्तीसाठीं ज्या टीपा अध्यापक श्री. नगीनदास परेख यांनीं तयार केल्या होत्या, त्यांचाच अुपयोग या आवृत्तीसाठीं थोड्याफार फेरफारानें केला आहे. आपल्या देशांत जेथें संदर्भ-ग्रंथांची अुणीव आहे आणि चांगलीं पुस्तकालयें सुद्धां फारशीं नाहींत, तेथें केवळ विद्यार्थ्यांसाठींच नव्हे, तर सर्वसाधारण संस्कार-रसिक वाचकासाठीं सुद्धां टीपा लाभदायक असतात.

जोंवर माझी यात्रा चालू आहे आणि भक्तियुक्त स्मृति काम देत आहे, तोंवर माझ्या पुस्तकांच्या आकारांत वाढ होतच रहाणार. गुजराथी 'जीवन-लीला' प्रसिद्ध झाल्यानंतर जीवनलीलेशीं संलग्न असे आणखी दहा अेक हिन्दी लेख हातीं आले; त्यांना हिन्दी आवृत्तींत स्थान देअून माझ्या 'जीवन' भक्तीला मीं अद्यतन (up-to-date) बनवलें आहे. आतां या बाबतींत स्वतः अधिक लिहिण्याचा अुत्साह नाहीं; परंतु भारतांतील नद-नद्या, प्रपात तलावसरोवरें, व समुद्र-किनारे, वार्षिक जल-प्रलय आणि वाळवंटांतील मृगजळें अित्यादींचीं विविध वर्णनें नव्या जमान्याच्या नव्या प्रतिभेच्या अुदयोन्मुख लेखकांच्या लेखणींतून अुतरलेलीं वाचण्याची अिच्छा किंवा लालसा आहे.

खरें पाहूं जातां पंचमहाभूतांच्या संयोगानेंच जीवनाचा संभव होतो. असें असूनहि आपल्या लोकांनीं केवळ पाण्यालाच जें जीवन हें नांव दिलें त्यांत बरेंच रहस्य भरलेलें आहे. आपल्या पृथ्वीच्या आसपास वातावरण कितीहि पसरलेलें असलें आणि या 'वात-आवरणा' वांचून आपण अेक क्षणहि जीवंत राहूं शकणार नाहीं अशी स्थिति असली, तरी पृथ्वीला महत्त्व आहे तिला घेरून राहिलेल्या अुदावरणाचेंच. पाण्यांत जो तजेला आहे, जें जीवन-तत्त्व आहे, तें नाहीं अग्नीच्या ज्वाळांत कीं नाहीं वाऱ्याच्या वावटळींत. पाणी जेथें

वहातें तेथें शीतलता पसरवीत जातें. रणालादेखील अुपवन बनवतें. आणि सर्व प्राण्यांना अनेक प्रकारचे जीवन-प्रयोग करण्याची सोय करून देतें. पाण्याचा स्वभाव चंचल आहे, तरल आहे, अूर्मिल आहे, आणि त्याहूनहि विशेष म्हणजे वत्सल आहे.

'लोकमाता' पुस्तकांत फक्त नद्यांचेंच वर्णन असल्यामुळें त्याच्या मुख-पृष्ठावर महाभारतांतला 'विश्वस्य मातरः' हा श्लोक शोभून दिसत होता. आतां या पुस्तकानें व्यापक 'जीवन–लीले'चें रूप धारण केलें असल्यामुळें हा श्लोक वापरण्यांत अव्याप्तीचा दोष अुत्पन्न होतो. तरीदेखील परंपरा टिकव-ण्याच्या दृष्टीनें हा श्लोक या पुस्तकांत सुद्धां भक्तिभावानें राहूं दिला आहे.

निसर्ग-निरीक्षणाचा आनंद लुटीत असतांना पहाड, शेतें, ढग आणि त्यांचे अुत्सवरूप सूर्योदय-सूर्यास्ताचे रंग-चमत्कार मीं न्याहाळले आहेत. प्रत्येकाची खुबी वेगळी, प्रत्येकाची चमत्कृति आगळी; असें असूनहि पाण्याच्या प्रवाहांतून किंवा विस्तारांतून जी जीवन-लीला प्रकट होते तिच्या परिणामाच्या तोलाचा दुसरा अेकहि प्राकृतिक अनुभव नाहीं. पहाड कितीहि अुत्तुंग असला, गगनभेदी असला, तरी जोंवर त्यांचें विशाल वक्ष भेदून अेखादा मोठा किंवा लहान झरा खालीं अुडी घेत नाहीं, तोंवर त्या पहाडाची भव्यता कोरी, ओकी ओकी व अळणीच वाटते.

संस्कृतमध्यें 'डळयोः सावर्ण्यम्' या सूत्राच्या आधारें पाण्याला जड देखील म्हणत असतील. परंतु खरोखरच जळाला जड म्हणणाऱ्याची बुद्धिच जड असली पाहिजे. जर कुठल्या वस्तूंत खरोखर जाड्याचा अभाव असेल तर तें पाणीच होय.

ज्या प्रमाणें अेखादा पहाड पाहिल्यावर त्याच्या शिखरावर चढण्याची अिच्छा होतेच आणि शक्य असेल तर पाय शिखर गांठल्यावांचून रहात नाहींत; तसेंच पाण्याच्या बाबतींत देखील आहे. पाणी पाहिलें कीं प्रथम त्याच्या जवळ जाण्याची अिच्छा होते. जर तें पेय असेल तर तहान नसतांना सुद्धां त्याची चव घेण्याची अिच्छा झाल्यावांचून रहात नाहीं. स्नानानें बाह्य शरीर व पानानें शरीराचा अंतर्भाग पावन केल्यावांचून माणसाला संतोषच

होत नाहीं. दुसरी सोय नसली तर मनुष्य पाण्याचें आचमन करतो किंवा कांहीं नाहीं तरी पाण्याचे दोन थेंब पापण्यांना लावून समाधान मानतो.

हिमालयांतील थंड प्रदेशांत जेथें कपडे काढणेंदेखील मुश्कील असतें तेथें आपले धर्मनिष्ठ लोक पंचस्नानी करतात. पाण्यांत दोन बोटें भिजवून त्या बोटांनीं डोक्याला स्पर्श केला कीं अेक स्नान आटपलें. डोळयांना स्पर्श केला कीं दुसरीं दोन स्नानें पुरीं झालीं. नंतर त्याच पाण्याच्या थेंबांचा स्पर्श दोन कर्णमूळांना केला कीं झाली पंचस्नानी! पाण्याच्या स्पर्शावांचून माणसाला आपण पवित्र झालों असें वाटतच नाहीं.

मनुष्य मेल्यानंतर त्याचें शरीर ज्या पृथ्वींतून आलें तिच्याच अुदरांत तें पुरून टाकण्याचा रिवाज सर्वत्र आहे. परंतु आपण यांत सुधारणा केली. शरीराला जमिनींत सडूं देण्याअैवजीं त्याचा अग्नि-संस्कार करणें आपण अधिक श्रेयस्कर मानतों. अग्नीला आपण पावक म्हणतों. पावक म्हणजे पवित्र करणारा. वस्तु कितीहि गलिच्छ असो, सडलेली असो, किंवा अपवित्र असो, अग्निसंस्कार झाला म्हणजे ती पावन झाली. म्हणूनच आपण गोवऱ्या, लाकडें, चंदन, धूप आणि कापूर यांसारखे ज्वालाग्राही पदार्थ अेकत्र करून शरीराला अग्निसंस्कार देतों.

येथवर सगळें ठीक, परंतु जीवननिष्ठ संस्कृतीला येवढ्यानें संतोष झाला नाहीं. अग्निसंस्काराच्या अंतीं ज्या अस्थि आणि भस्म शेष रहातात, त्या अवशेषांचें पवित्र मानल्या जाणाऱ्या जलाशयांत जेव्हां आपण विसर्जन करतों तेव्हांच आपल्याला परम संतोष होतो.

महात्माजींच्या अस्थि आणि चिताभस्म साऱ्या देशांतील अनेक पवित्र जलाशयांत पोंचवण्यांत आल्या. हिमालयाच्या पलीकडे कैलासच्या मार्गावर पसरलेल्या मानस-सरोवरांत देखील कांहीं अवशेष सोडण्यांत आले. प्रयाग-सारख्या यज्ञ-स्थानीं विसर्जित केल्यानंतर कांहीं अवशेष आपले लोक समुद्रकिनारीं सुद्धां घेअून गेले. आणि ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं ज्या आफ्रिका खंडांत गांधीजींनीं सत्याग्रहाचा शोध लावला आणि आपल्या जीवनकार्याला प्रारंभ केला त्या आफ्रिकेला नेअून नील नदीच्या अुगमाकडील

प्रवाहांत सुद्धां या अस्थि विसर्जित केल्या आणि अशा रीतीनें पाण्याच्या सार्वभौम पावित्र्याचा आपण स्वीकार केला.

या पाण्याच्या दर्शनाचा आनंद ज्यांत थलथल तुडुंब भरला आहे अशींच वर्णनें या संग्रहांत अेकत्रित केलीं आहेत.

असें करतांना अेक लहानसें वर्णन 'स्मरण-यात्रे' तून डोकें वर काढून विचारूं लागलें, "मला नाहीं का घेणार?" त्याची अुपेक्षा केल्याबद्दल माफी मागून मी त्याला म्हणालों, "अवश्य, अवश्य, तुला सुद्धां जीवन-लीलेंत स्थान असेलच." मानसिक सृष्टि, कल्पना सृष्टि आणि मायावी सृष्टि ही सुद्धां शेवटीं पार्थिव सृष्टि प्रमाणें सृष्टि तर खरीच. म्हणून माणसांच्या डोळ्यांना व मृगांच्या डोळ्यांना जें पाण्यासारखें भासतें आणि ज्याचा प्रवाह या दोघांना आकर्षित करतो, तें जरी प्राणवायु व अुदजनवायु मधून अुत्पन्न झालेलें नसलें तरी त्याला जीवन-लीलेंत स्थान असलेंच पाहिजे, असा विचार करून लहानपणीं प्रवास करतांना पाहिलेल्या 'तेरदाळच्या मृगजळा' चा सुद्धां येथें अन्तर्भाव केला आहे.

जर सहाराच्या वाळवंटाच्या आसपास दुपारच्या वेळीं जाणें झालें असतें तर त्या विराट रणेश्वराचें व तेथल्या मृगजळाचें वर्णन यांत अवश्य आणलें असतें. परंतु पश्चिम आफ्रिकेंतील दक्षिणेकडून अुत्तरेला जातांना वेळ आणि जीव दोन्ही वाचविण्याच्या दृष्टीनें सहाराचें सबंध रण मीं ओलांडलें होतें रात्रीच्या अंधारांत; आणि तें देखील विमानाच्या मदतीनें. पश्चिम आफ्रिकेची मध्य-युगीन नगरी कानो सोडून मध्यरात्रीनंतर ट्रिपोली पोहोंचेपर्यंत विमानाच्या खिडकींतून सारा वेळ टक लावून सहारा पाहिलें; परंतु त्या रात्रींच्या अंधारांत अंधाराहून भिन्न असें कांहींच दृष्टीस पडलें नाहीं. केवढें दुर्दैव! सहाराचें वाळवंट ओलांडूनहि तेथलें मृगजळ पहातां आलें नाहीं! जेव्हां विमानांतून अुतरलों तेव्हां अितकेंच म्हणूं शकलों—

लिम्पतीव तमोऽङ्गानि वर्षतीवांजनम् नभः।

संस्कृत कवींच्या नदी–वर्णनांवर व स्तोत्रांवर मी अगदीं लुब्ध आहें. या स्तोत्रांत भक्तिभावच विशेष प्रामुख्यानें आढळून येतो. त्यांचें शब्दलालित्य असाधारण असतें. वाटतें कीं भाषाप्रवाह नदीच्या वहात्या प्रवाहाशीं स्पर्धा

करीत आहे. कांहीं कांहीं जागीं अेखाद्या शब्दांत किंवा समासांत नेमकें मार्मिक वर्णन सुद्धां येअून जातें. परंतु अेकंदरींत हीं स्तोत्रें वर्णनें नसून माहात्म्येंच असतात.

आज आपली भूक आहे यथार्थ वर्णनांची व शब्दचित्रांची. त्याबरोबर सहजासहजीं माहात्म्य व हवें तितकें काव्य आलें तर तें अिष्टच आहे. परंतु वर्णनें वाचतांना नदी किंवा सरोवर प्रत्यक्ष पाहिल्याचा संतोष कमीअधिक प्रमाणांत मिळायला हवा. नाहींतर जैन पुराणांत जसें नगरांचें वर्णन येतें तसला प्रकार व्हावयाचा. हीं वर्णनें वाटेल तेथून अुचलून वाटेल त्या शहराला लागू केलीं तरी कांहीं बिघडत नाहीं. पुष्कळदां लेखक वर्णनाच्या दोनचार ओळी लिहून नंतर प्रामाणिकपणें सांगतात कीं अमुक गोष्टींत अमुक नगरीचें वर्णन आलें आहे, तेंच तेथून अुचलून येथें ठेअून द्यावें. असल्या वर्णनांना नाहीं म्हणता येणार यथार्थ चित्रण, कीं नाहीं म्हणता येणार यथार्थ माहात्म्य.

अेका जुन्या हिन्दी कवीनें अेका पहाडी किल्ल्याचें वर्णन केलें आहे. त्यांत अश्वशाळेबरोबरच गजशाळेचेंहि वर्णन आहे. कवीला शंका आली नाहीं कीं पहाडावर हत्ती जातील तरी कसे? दुसऱ्या अेका ठिकाणीं बगीच्याच्या वर्णनांत थंड प्रदेशांतील, तसेंच अुष्ण प्रदेशांतील, समुद्रकिनाऱ्यावर आणि पहाडावर अुगवणारीं सगळीं फळझाडें व फुलझाडें अेकत्र आणलीं होतीं. आणि तेथें त्या सर्व फुलांना अेकाच वेळीं फुलतांना आणि फळांना अेकाच वेळीं पिकतांना महिना किंवा ऋतु यांची अडचण नडली नव्हती!

असले साहित्यप्रकार आतां सुदैवानें बंद झाले आहेत हें खरें; तरी सुद्धां आजचे लेखक जीं वर्णनें लिहितात तीं निकट परिचयाच्या अभावामुळें सामान्य असतात: ‘आकाशांत तारे चमकत होते,’ ‘बागेंत तऱ्हेतऱ्हेचीं फुलें फुललीं होतीं,’ ‘जंगलांत वृक्षवेलींची दाट वस्ती होती,’ अशा प्रकारचीं सामान्य वर्णनें करून ते संतोष मानतात. लेखक आकाशाला व तेथल्या ताऱ्यांना ओळखत नसेल, त्यांचीं नांवें त्याला ठाअूक नसतील, कोणतीं फुलें कोणत्या ऋतूंत अुमलतात याच्या तपशिलांत तो शिरलेला नसेल, कोणत्या जंगलांत कोणतीं झाडें अुगवतात आणि कोणतीं अुगवत नाहीं याची माहिती त्याच्यापाशीं नसेल, तर मग तो तरी काय करणार?

शब्द-वैभवाचें प्रदर्शन करून, अनुभव-दारिद्र्य लपवण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी तें अुघडें पडल्यावांचून रहात नाहीं.

आपल्या देशांत प्रवासाचीं साधनें आतां बरींच वाढलीं आहेत आणि प्रत्यहीं वाढतच आहेत. फोटोग्राफीच्या कलेनें अितकी प्रगति केली आहे कीं, आतां ती ललितकलेच्या कोटीला पोंचण्याच्या प्रयत्नांत आहे. देशीविदेशी भाषांतील प्रवासवर्णनें वाचून आपली कल्पना अुद्दीपित होअूं शकते. तर मग आतां आपण भारतीय भाषांचें, प्रवासवर्णनां पुरतें तरी दारिद्र्य दूर कां करूं नये ?

आपल्या प्रिय देशाला आपण अनेक प्रकारें अलंकृत करूं आणि अुमलत्या पिढीला भारत–भक्तीची दीक्षा देअूं.

देश म्हणजे केवळ जमीन, पाणी आणि त्यावरचें आकाशच नव्हे; देशांत वास करणाऱ्या माणसांचाहि त्यांत अन्तर्भाव होतो; हें जसें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे, त्याच प्रमाणें आपल्या देशभक्तींत केवळ मानव–प्रेमाचाच नव्हे, तर पशुपक्ष्यांसारख्या आपल्या गणगोतांविषयींच्या प्रेमाचाहि समावेश झाला पाहिजे.

आपल्या देशभक्तींत नद्या, डोंगर, पर्वतमाला व त्यांचीं अुत्तुंग शिखरें आणि या सर्वांवर चमकणारे तारे या सर्वांचा परिचय करून घेण्यांत व भारत–भक्तींत आपण आपल्या पूर्वजांशीं स्पर्धा केली पाहिजे. आपल्या पूर्वजांच्या प्रतापानें गंगेसारख्या नद्या, हिमालयासारखे पर्वत, जागजागीं विखुरलेलीं आपलीं धर्मक्षेत्रें, पिंपळ किंवा वड यांसारखे महावृक्ष, तुळशी-सारखीं झुडुपें, गायीसारखीं जनावरें, गरुड किंवा मोरासारखे पक्षी, गोपीचंदन किंवा गेरूसारखे मातीचे प्रकार–हे सर्वच ज्या देशांत भक्ति व आदराचे विषय बनले आहेत त्या देशांत संस्काराची व भावनांची समृद्धि वाढवण्याच्या आपल्या जमान्याच्या आपल्या कर्तव्याला आपण चुकता कामा नये.

दादाभाअी नवरोजी पुण्यतिथि

१–६–५६

काका कालेलकर

# सरिता-संस्कृति

जी जमीन केवळ पावसाच्या पाण्यानेंच भिजते आणि जेथें मेघराजाच्या कृपेनेंच शेती होते तिला 'देव-मातृक' म्हणतात. अुलट जी जमीन अशा प्रकारें पावसावर विसंबून न रहातां नदीच्या किंवा कालव्याच्या पाण्यानें शिंपली जाते आणि खात्रीचें पीक देते तिला 'नदी-मातृक' म्हणतात. भारतवर्षांत ज्या लोकांनीं जमिनीचे असे दोन भाग पाडले त्यांनीं नदीला केवढें महत्त्व दिलें आहे हें सहज ध्यानांत येण्याजोगें आहे. पंजाबचें नांवच त्यांनीं सप्तसिंधु पाडलें. गंगा–यमुनेच्या मधें येणाऱ्या प्रदेशाला अन्तर्वेदी नांव ठेवलें. साऱ्या भारत वर्षाचे 'हिन्दुस्थान' आणि 'दख्खन' असे दोन भाग पाडणाऱ्या विंध्य किंवा सातपुडा पर्वताला पुढें करण्याअैवजीं आपले लोक संकल्प बोलतेवेळीं 'गोदावर्याः दक्षिणे तीरे' अथवा 'रेवायाः अुत्तरे तीरे' असे नदीपरत्वें विभाग पाडतात. कित्येक विद्वान् ब्राह्मण कुळांनीं आपलें नांवच अेका नदीवरून घेतलें आहे–सारस्वत. गंगातटीं वास करणाऱ्या पुरोहित व पंडे लोकांना स्वतःला गंगापुत्र म्हणवून घेण्यांत मोठा अभिमान वाटतो. राजाला राज्यपद देतेवेळीं चार समुद्र व सात नद्यांचें पाणी आणून त्या पाण्यानें राजाला अभिषेक केल्यानंतरच प्रजा मानते कीं आतां राजा राज्य करण्याचा अधिकारी बनला. अीश्वराची रोजची पूजा करतेवेळीं सुद्धां हिंदुस्थानांतील सर्व नद्यांना आपल्या आपल्या लहानश्या कलशांत येअून बसण्याची प्रार्थना भारतवासी करावयाचाच—

**गंगे ! च यमुने ! चैव गोदावरि ! सरस्वति !**
**नर्मदे ! सिंधु ! कावेरि ! जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु ॥**

भारतवासी तीर्थयात्रेला जातो तो देखील अधिकांश नदीच्या भेटीसाठींच जातो. तीर्थ म्हणजे नदीच्या अुताराची जागा. नदीला पाहिलें कीं मग त्याला या गोष्टीचें देखील भान रहात नाहीं कीं ज्या नदींत स्नान करून आपण पवित्र होतों तिला पुन्हा अभिषेक तो कसला करावयाचा ? गंगेचेंच पाणी घेअून गंगेला अभिषेक केल्यावांचून त्याच्या भक्तीचें समाधान होत नाहीं. सीता जेव्हां प्रभु रामचंद्राबरोबर वनवासाला निघाली तेव्हां प्रत्येक नदी

ओलांडतांना ती नवस करी कीं सुखरूप परतलों तर तुला अभिषेक करूं. मनुष्य मरतो तेव्हां त्याला वैतरणी नदी ओलांडावी लागते. थोडक्यांत म्हणजे जीवनांत आणि मरणांत आर्यांचें जीवन नदीशीं सांधलें गेलें आहे.

त्यांची मुख्य नदी गंगा होय. ती केवळ पृथ्वीवरच नव्हे, तर स्वर्गांतहि वहाते आणि पातळांतहि वहाते, त्यामुळें ते गंगेला त्रिपथगा म्हणतात. पापक्षालन करून जीवनांत आमूलाग्र बदल घडून आणावयाचा असेल तेव्हां सुद्धां मनुष्य नदीवर जाऊन, कमरेअेवढ्या पाण्यांत अुभा राहून संकल्प करतो, तेव्हांच त्याला वाटूं लागतें कीं आतां आपला संकल्प सिद्धीला गेल्यावांचून रहाणार नाहीं. वेदकालीन ॠषींपासून ते व्यास, वाल्मीकि, शुक, कालिदास, भवभूति, क्षेमेन्द्र, जगन्नाथ पावेतों कुठलाहि कवि घ्या, नदीला पहातांच त्याची प्रतिभा ओसंडून वाहूं लागते. आपल्या कोणत्याहि भाषेंतील कविता घ्या, त्यांत नदीवरील स्तोत्रें सांपडायचींच. आणि हिन्दुस्तानांतील भोळ्या जनतेचीं लोकगीतें पाहिलीं, तर तेथें देखील नदीचीं वर्णनें कांहीं कमी नाहींत.

गाय, बैल व घोडे यांसारख्या अुपयोगी जनावरांच्या जाति ठरवतांना-देखील आपल्या लोकांना नदीचीच आठवण होते. चांगले चांगले घोडे सिंधूच्या किनाऱ्यावर जोपासले जात, म्हणून त्या घोड्यांचें नांव पडलें सैंधव. आपल्या महाराष्ट्रांतील प्रख्यात तट्टू भीमा नदीच्या तटीं जोपासले जात, म्हणून त्यांना भीमथडी तट्टू म्हणत. महाराष्ट्रांतील अुत्तमांतील अुत्तम दूध देणाऱ्या गोजिरवाण्या गाअींना अिंग्रज लोक आजदेखील ‘ कृष्णा व्हॅली ब्रीड ’ म्हणतात.

ग्राम्य पशूंच्या जातींचीं नांवें ज्याप्रमाणें नदीवरून पडलीं आहेत, त्याप्रमाणें पुष्कळशा नद्यांची नांवें पशुपक्ष्यांवरून पडलीं आहेत. गो-दा, गो-मती, साभ्र-मती, हाथ-मती, वाघ-मती, सरस्वती, चर्मण्वती, अित्यादि.

महादेवाच्या पूजेसाठीं जे गोल गुळगुळीत दगड ( बाण ) वापरले जातात ते नर्मदेचेच असले पाहिजेत. नर्मदेचें माहात्म्यच अेवढें थोर कीं तेथले जितके कंकर (खडे) तितके शंकर. अुलट वैष्णवांचे शाळिग्राम गंडकी नदींतून येतात.

तमसा नदी विश्वामित्राची बहीण मानली जाते, तर कालिंदी यमुना प्रत्यक्ष कालभगवान यमराजाची बहीण आहे.

अेक अेक नदी म्हणजे संस्कृतीचा अेक अेक प्रवाह. प्रत्येकीची खुबी वेगळी; परंतु अनेकतेमधून अेकता निर्माण करणें हें भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य असल्यामुळें सगळया नद्यांना आपण सागर-पत्नी बनवलें आहे. समुद्राच्या अनेक नांवांपैकीं सरित्पति हें त्याचें नांव महत्त्वाचें आहे. सर्व नद्या आपापलें पवित्र जल सागराला अर्पण करतात, म्हणूनच तर सागराचें पाणी अितकें पवित्र मानलें जातें. 'सागरे सर्वतीर्थानि।'

जेथें दोन नद्यांचा संगम होतो त्या स्थानाला प्रयाग म्हणून आपण त्याची पूजा करतों. हेतु हा कीं संस्कृतींचा जेव्हां संगम होतो तेव्हां तोसुद्धां शुभ-संगम आहे असें आपण मानावें. स्त्रीपुरुषांमधें होणारा विवाह भिन्नगोत्रीच असला पाहिजे, असा आग्रह बाळगून देखील आपण हेंच सुचवलें आहे कीं अेकाच संस्कृतींत खितपत रहाणें किंवा गुंतून पडणें श्रेयस्कर नाहीं. भिन्न भिन्न संस्कृतींचा सुमेळ घडवून आणतां आलाच पाहिजे. लंकेची नवरी घोघा (सौराष्ट्र) च्या नवऱ्याशीं लग्न करते तेव्हांच त्या दोघांत जीवनाच्या सर्व प्रश्नांकडे अुदारतेनें पहाण्याची दृष्टि येते. भारतीय संस्कृति खरोखर आहेच मुळीं संगमसंस्कृति. आपल्या राजपुत्रांनीं दूर दूरवरून कन्या आणल्या होत्या. केकय देशाची कैकेयी, गांधारची गांधारी, कामरूपची चित्रांगदा, थेट दक्षिणेची मीनाक्षी मीनळदेवी, अगदीं परदेशांतून आलेली अुर्वशी आणि महाश्वेता, अशीं कितीतरी अुदाहरणें देता येतील. आज देखील राजे लोक शक्यतों दूरदूरच्या कन्यांशीं विवाह करतात. नद्यांकडून आपण ही संगम-संस्कृति शिकलों आहोंत. आपापल्या नदीशीं अेकनिष्ठ राहिलें तरच शेवटीं समुद्राची भेट व्हावयाची. तेथें कसलाहि भेदभाव राहूं शकत नाहीं. सगळेंच अेकाकार, सर्वाकार आणि निराकार बनून जातें. 'सा काष्ठा सा परा गतिः।'

# नदी-मुखेनैव समुद्रम् आविशेत्

सकाळीं किंवा सायंकाळीं नदीच्या कांठीं निवांतपणें बसलें कीं मनांत अनेक प्रकारचे विचार येअूं लागतात. वाळूचा विशाल पांढरा पट रोज जसाच्या तसाच दिसतो. परंतु तेथला प्रत्येक कण वाऱ्यानें व पाण्यानें स्थानभ्रष्ट होत असतो. अेवढी मोठी ही रेती येते तरी कोठून आणि जाते तरी कुठें ? वाळूच्या पटावरून चाललें कीं स्पष्ट किंवा अस्पष्ट पावलें वाळूवर अुमटतात. घटका दोन घटका वारा सुटला कीं त्यांचें, 'नांव निशाण' कांहींच शिल्लक रहात नाहीं. दोन कांठांच्या मर्यादेंत नदी वहाते, कधींहि तिला खंड पडत नाहीं. पाणी येतें आणि जातें, येतें आणि जातें. लहानपणीं मनांत येअी कीं, मध्यरात्रीं हें पाणी झोंपीं जात असेल आणि सकाळीं सर्वांच्या आधीं अुठून फिरून वाहूं लागत असेल. ज्याप्रमाणें सूर्य, चंद्र व नवलक्ष तारे विश्रांति घेण्यासाठीं पश्चिमेकडे अुतरतात, त्याप्रमाणें हें पाणी देखील रात्रीं झोंपीं जात असेल. विसावा हा प्रत्येकाला हवा. परंतु नंतर समजलें कीं 'नाहीं, नदीच्या पाण्याला विसाव्याची गरज नाहीं. तें आपलें वहातच असतें.'

नदी पहातांच मनांत विचार येतो कीं ही येते कोठून आणि जाते कुठवर ? असला हा विचार किंवा हा प्रश्न सनातन आहे. नदीला आदि आणि अंत तर असलेच पाहिजेत. नदीला जितक्यांदा पहावें तितक्यांदा हा प्रश्न मनांत अुठतोच; आणि जसजसा हा प्रश्न जुना बनत जातो तसतसा तो अधिक गंभीर, काव्यमय व अुत्कट-गूढ बनत जातो. शेवटीं मन मानत नाहीं, पाय थांबूं शकत नाहींत. मन अेकाग्र होअून प्रेरणा देतें आणि पाय चालूं लागतात. आदि आणि अंत शोधावे ही सनातन जिज्ञासा नदीकडूनच आपल्याला लाभली असेल आणि म्हणूनच आपण जीवन-प्रवाहाला देखील नदीचीच अुपमा देत आलों आहोंत. अुपनिषत्कार आणि देशी कवि, मॅथ्यु आर्नोल्ड-सारखे युरोपियन कवि आणि रोमें रोलॅंसारखे कादंबरीकार जीवनाला नदीचीच अुपमा देतात. नदी या जगांतली प्रथम प्रवासी होय, म्हणूनच जुन्या यात्रेकरू लोकांनीं नदीचा अुगम, नदीचें मुख आणि नद्यांचा संगम अत्यंत पवित्र स्थानें मानलीं आहेत.

जीवनाचें प्रतीक अशी ही नदी येतें कोठून आणि जाते कुठें ? शून्यांतून येते आणि अनंतांत सामावून जाते. शून्य म्हणजे अत्यल्प, सूक्ष्म पण प्रबळ; आणि अनंत म्हणजे विशाल आणि शांत. शून्य आणि अनंत दोन्ही सारखेच गूढ आहेत, दोन्ही अमर आहेत. दोन्ही अेकच आहेत. शून्यांतून अनंत—ही सनातन लीला आहे. कौसल्या किंवा देवकीच्या प्रेमांत सामावून जाण्यासाठीं जसें परब्रह्मानें बालरूप धारण केलें, त्याप्रमाणें कारुण्यानें प्रेरित होअून अनंत आपण होअून शून्यरूप धारण करून आपल्या-पुढें अुभें ठाकतें. जसजशी आपली आकलन-शक्ति वाढत जाते तसतसा या शून्याचा विकास होतो. आणि स्वतःचाच विकासवेग सहन न झाल्यानें मर्यादा ओलांडून किंवा तोडून तें अनंत बनतें—बिंदूचा सिंधु बनतो.

मानवी जीवनाचें सुद्धां असेंच आहे. व्यक्तीमधून कुटुंब, कुटुंबांतून जात, जातींतून राष्ट्र, राष्ट्रांतून मानवता आणि मानवतेंतून भूमा विश्व, असा हृदयांतील भावनांचा विकास होत जातो. स्व-भाषेद्वारा प्रथम आपण आपल्या स्वजनांचें हृदय ओळखूं लागतों आणि शेवटीं अशेष विश्वाचें आकलन करूं शकतो. गांवांतून प्रांत, प्रांतांतून देश आणि देशांतून विश्व असा आपल्या 'स्व' चा विकास करून आपण 'सर्व' मधें सामावून जातों.

नदीचा आणि जीवनाचा क्रम सारखाच आहे. नदी स्वधर्माशीं अेकनिष्ठ रहाते आणि आपली कूल-मर्यादा सांभाळते म्हणूनच प्रगति करते, आणि शेवटीं नामरूपाचा त्याग करून समुद्रांत अस्त पावते. अस्त पावून लोप होअूनहि ती नष्ट होत नाहीं; वहातच असते. असा आहे नदीचा क्रम. जीवनाचा आणि जीवन-मुक्तीचा देखील हाच क्रम आहे.

जीवनदायी शिक्षणक्रमाविषयीं आपल्याला यावरून काय बोध घेता येअील ?

१९२२

# अुपस्थान*

भारतवर्षांतील ज्या ज्या नद्यांचें वेळोवेळीं दर्शन घडलें होतें त्यांतील कांहींचें येथें स्मरण केलें आहे. येथें भूगोलांत देण्यांत येणारी माहिती गोळा करण्याचा अुद्देश नाहीं, नदीचा आपल्या व्यापारधंद्यावर होणारा परिणाम नमूद करण्याचाहि येथें प्रयत्न नाहीं. हें केवळ आपल्या देशांतील लोकमातांचें भक्तिपूर्वक केलेलें नव्या पद्धतीचें अुपस्थान आहे.

आपल्या पूर्वजांची नदीभक्ति लोकविश्रुत आहे. आजहि ती क्षीण झालेली नाहीं. यात्रेकरूंच्या लहान मोठ्या नद्या तीर्थस्थानांकडे वाहून ही प्राचीन भक्ति अजूनहि जशीच्या तशीच अस्तित्वांत असल्याचा पुरावा देत असतात.

भक्त-हृदयें भक्तीचे हे अुद्गार श्रवण करून संतुष्ट होवोत. युवकवर्गांत लोकमातांचें दर्शन घेण्याची आणि विविध प्रकारें त्यांचें स्तन्यपान करून संस्कृति–पुष्ट होण्याची तळमळ जागो.

* * *

हिंदुस्तानांतील सर्वच सुंदर स्थळांचें वर्णन करणें मनुष्याच्या आवाक्या-बाहेरची गोष्ट आहे. स्वतः भगवान व्यास जेव्हां भारतांतील नद्यांचीं नांवें सांगायला बसले तेव्हां त्यांना सुद्धां म्हणावें लागलें कीं जितक्या आठवतात तितक्यांचेंच नामसंकीर्तन येथें केलें आहे. बाकीच्या असंख्य नद्या राहूनच गेल्या आहेत.

माझा संकल्प स्वतः पाहिलेल्या नद्यांपैकीं शक्य तेवढ्या नद्यांचें स्मरण करून पावन होण्याचा होता. आज ही भक्ति–कुसुमांजलि पहातों तेव्हां मन विषण्ण होतें कीं कृतज्ञता व्यक्त व्हावी अितक्या नद्यांचेंहि अुपस्थान माझ्या हातून झालेलें नाहीं. वर्णिलेल्या थोड्या आणि न वर्णिलेल्यांची संख्या अधिक अशी स्थिति आहे. ज्या प्रान्तांत मी जवळ जवळ पाव शतक राहिलों त्या गुजरातच्या नद्यांचें तरी मीं कुठें वर्णन केलें आहे ? नर्मदा आणि साबरमती विषयीं अगदीं अलीकडेच मी थोडेसें लिहूं शकलों. तापी अथवा तपतीविषयीं कांहीं लिहिलें नाहीं याची टोंचणी मनांत आहेच. ही

*मूळ ' लोकमाता ' या पुस्तकाची प्रस्तावना, थोड्या फेरफारासहित.

नदी मध्यप्रान्तांत बैतुलजवळ अुगम पावते. बऱ्हाणपुर, भुसावळकडून पुढें जाते. तिच्या मदतीनें अेकदां सुरतेहून हजीरापर्यन्त जाअून आलों आहें. तापीला भगवान सूर्यनारायणाच्या प्रेमाविषयीं विचारतां येअील आणि अिंग्रजांनीं व्यापाराच्या मिषानें सुरतेला कोठी कशी स्थापन केली होती आणि बाजीरावानें महाराष्ट्राचें स्वातंत्र्य याच ठिकाणीं अिंग्रजांच्या केव्हां स्वाधीन केलें याविषयीं देखील तिला विचारतां येअील.

गोधऱ्याला जातांना जी चिमुकली मही नदी पाहिली होती तीच पुढें खंभातपासून कावी बंदरापर्यंत चिखलाचा विस्तार कसा पसरवूं शकते हें पहाण्याचें सद्भाग्यदेखील मला लाभलें आहे. पूर्वेकडे महानदी आणि पश्चिमेकडे मही नदी या दोघींचें कार्य विशेष प्रकारचें आहे. सूर्या, दमण-गंगा, कोलक, अंबिका, विश्वामित्री, कीम वगैरे अनेक गुजराथी नद्यांचा गोड पाहुणाचार मीं कधीं ना कधीं चाखला आहे; त्यांना अंजलि अर्पण केली नाहीं तर मी कृतघ्न समजला जाअीन. आणि ज्या 'आजी' नदीच्या किनाऱ्यावर महात्माजींनीं लहानपणीं धिंगामस्ती केली होती, ती तर विशेष अंजलीला पात्र आहे. वढवाणच्या भोगावोविषयीं मीं कुठें तरी लिहिलें असेल. पण त्यांत भोगावोपेक्षांहि राणकदेवीच्या स्मरणाचा भागच अधिक असेल.

हें सर्व मी केव्हां लिहीन ठाअूक नाहीं. परंतु लिहावयाचें आहे याविषयीं शंका नाहीं.

गुजराथ बाहेर नजर फिरवून दुसऱ्या नद्यांचें स्मरण करतों तेव्हां पहिल्या प्रथम आठवते सर्वांत मोठी ब्रह्मपुत्रा. ही तर हिमालयाच्या पलीकडे मानस सरोवरांत अुगम पावते आणि हिमालयाच्या अुत्तरेकडे वहाणाऱ्या पाण्याचा थेंब न् थेंब गोळा करून हिमालयाची सबंध भिंत पार करून डोंगरांच्या व जंगलांच्या अज्ञात प्रदेशांतून वहात येअून हें सारें पाणी आसामकडे आणून सोडून देते; आणि नंतर सदिया, डिब्रुगढ, तेजपुर, गौहाटी, धुब्री वगैरे स्थानांना पावन करीत करीत बंगालमध्यें अुतरते; पुढें गंगेला भेटावयाचें आहे अेवढ्याचसाठीं कांहीं अंतरापर्यंत यमुना नाम धारण करून नंतर पुढें ती पद्मा बनते. अितिहासाच्या 'अुषा-काला' पासून ते जपान्यांच्या अलीकडच्या हल्ल्यां-पर्यंतचा संपूर्ण अितिहास ब्रह्मपुत्रेला विदित आहे. परंतु या ताज्या अितिहासाची

862 22/3/09

अधिक सविस्तर माहिती तर मणिपुरची अिम्फाल नदीच पुरवू शकेल. पण या नदीला विचारायला गेलों तर ती सांगेल कीं मला विचारण्यापेक्षां हें सर्व तुमच्या अैरावतीची मैत्रीण छिंदवीन नदीलाच विचारा. ती तुम्हांला सगळें सांगेल. आणि मणिपुरकडून पळून आलेल्या लोकांचा अमुक अितिहास तर सुर्माघाटीच्या बराक नदीलाच विचारावा लागेल.

मीं नद्या तश्या पुष्कळ पुष्कळ पाहिल्या आहेत. परंतु जिच्या गूढ-गामितेवर व बेफिकीर बेपर्वाअीवर मी अधिकांत अधिक आशक झालों ती कालिम्पाँगची तीस्ता नदी होय. काय त्या नदीचा तो अुन्माद! आणि काय तें तिचें आत्मगौरवाचें भान!

अुत्कलमधें मी अनेकदा फिरलों आहें. तेथली महानदी, काटजुडी आणि काकपेया या तर आहेतच, परंतु बरी-कटकहून परततांना खरस्रोतेच्या कांठावर पाहिलेला सूर्योदय, त्याचप्रमाणें अन्य प्रसंगीं अृषिकुल्या नदीविषयीं अैकलेला अितिहास आणि तिच्या किनाऱ्याचें सौंदर्य यांचा विसर पडणें कसें शक्य आहे? जौगढचा प्रसिद्ध शिलालेख पहायला गेलों असतांना अृषिकुल्येचें दर्शन घडलें आणि मी विसरत नसेन तर धवलीचा हत्तीवाला शिलालेख पहायला जात असतां रस्त्यांत अेका नदीच्या दोन नद्या होतांना मीं पाहिल्या आहेत. दोन नद्यांचा संगम पहाणें निराळें. दोन नद्या अेकत्र येअून आपला जलसंचय वाढवतात आणि संभूय-समुत्थानाच्या सिद्धांतानुसार मोठा व्यापार करतात. हा तर शक्ति वाढवण्याचा अेक प्रयास झाला. पण अेकच नदी दूरून येअून जेव्हां पहाते कीं दोन्ही बाजूंना पाण्याची सारखीच आवश्यकता आहे तेव्हां तिनें कुणाचा पक्षपात करावा? आपलें जें पाणी असेल तें वाटून देअून दोन प्रवाहांत जेव्हां ती वाहूं लागते तेव्हां ती नदी दोन मुलांच्या आअीसारखी दिसते आणि तिला विशेष भक्तिपूर्वक प्रणाम केल्यावांचून रहावत नाहीं.

काळी नदी पांढरी झाल्याचें कुणी अैकलें आहे? लहानपणीं कारवारला मीं अेक काळी नदी पाहिली होती. ती तर समुद्राला मिळेपर्यंत काळीच्या काळीच राहिली. पण गोव्याकडे दुसरी अेक काळी नदी आहे. समुद्राला भेटण्याच्या आतुरतेमुळें पहाडाच्या माथ्यावरून ती अशी कांहीं अुडी घेते कीं तिचा दुधासारखा पांढरा शुभ्र धबधबा बनतो. त्याचें नांव पडलें आहे दूधसागर. अेखाद्या

मुलीनें आंघोळीनंतर आपले केस वाळवण्यासाठीं मोकळे सोडले असावेत तसें हें दृश्य आहे. शरावतीच्या जोगच्या धबधब्याचें वर्णन मीं तीनदां केलें आहे. तर मग दूधसागराच्या गंभीर-ललित काव्याचें मनन मला दहादां केलें पाहिजे.

हिमालयाला जातांना पाहिलेल्या रामगंगेचें आणि हिमालयाच्या पल्याडहून येणाऱ्या सरयू-घोग्राचें वर्णन तर राहिलें आहेच. पण लंका ( सिलोन ) मधें पाहिलेली सीतावाका आणि दुसऱ्या दोनतीन गंगांविषयीं देखील मीं अजून कुठें लिहिलें आहे ? मध्य–प्रान्तांत पाहिलेल्या धसानविषयीं मीं लिहिलें आणि वेत्रवती सोडून दिली, हें कसें चालेल ? अुज्जयनीला जातांना पाहिलेल्या क्षिप्रा नदीला स्मरणांजलि अर्पण केली नाहीं तर कालिदास मला शापच देअील. मोरादाबादमधें पाहिलेल्या गोमतीचें स्मरण करतांच द्वारकेची गोमती आठवते आणि त्याच न्यायानें सिंधच्या सिंधूबरोबर मध्यभारतांतली लहानशी सिंधु देखील आठवणारच.

काठेवाडमधें चोरवाड जवळील समुद्रापर्यंत न पोंचता मधेंच अडकून पडणारी मेगळ नदी मीं पाहिली नाहीं. पण अशीच अेक समुद्राशीं न पटणारी नदी अड्यार मद्रासजवळ मीं पाहिली आहे. अड्यार नदी समुद्रापाशीं हृदय-समृद्धीचा सुपीक गाळ घेअून येते आणि समुद्र चिडून जाअून तिच्यासमोर रेतीचा अेक बांध अुभा करतो. खंडितेचें हें दृश्य अितकें कांहीं करुण आहे कीं त्याचा परिणाम किती तरी वर्षें मनावर कायम राहिला आहे.

त्यापेक्षां केरळचे ‘ बॅकवॉटर ’ चांगले. तेथें समुद्राशीं समांतर, किनाऱ्या किनाऱ्यानें अेक लांबलचक नदी पसरली आहे, जणूं काय ‘ तुमच्या खाऱ्या पाण्याचीं तुफानें भारतभूमीपर्यंत पोंचूंच देणार नाहीं. ’ असें ती समुद्राला बजावीत असते.

याचाच अेक लहानसा नमुना आपल्याला जुहूला पहायला मिळतो. जुहूच्या माडांच्या प्रदेशाच्या पश्चिमेला समुद्र आहे. आणि पूर्वेलाहि कधीं कधीं खारें पाणी पसरलेलें असतें. हीच स्थिति जर कायमची बनली आणि हें पाणी जर अुत्तर दक्षिण पन्नास किंवा शंभर मैल पसरलें तर मुंबअीच्या लोकांना ‘ बॅकवॉटर्स ’ ची थोडीशी कल्पना येअूं शकेल; पण केरळच्या त्या भागाचें सृष्टिसौंदर्य प्रत्यक्ष पाहिल्यावांचून कळावयाचें नाहीं.

सिंधच्या कमल-सुंदर अथवा कमल-समृद्ध मंचर सरोवराविषयीं थोडें कांहींतरी दिलें असलें तरी अुत्कल प्रान्तांत पाहिलेल्या चिल्का सरोवराविषयीं लिहिण्याचें अजून अुरलें आहे. लॉर्ड कर्झननें अेकदां म्हटलें होतें कीं, ' हिन्दुस्तानांत श्रेष्ठ सौंदर्यधाम कुठलें असेल तर तें चिल्का सरोवर होय. ' स्वीडन व नॉर्वेकडील समुद्रशाखांचीं चित्रें जेव्हां जेव्हां पहातों तेव्हां तेव्हां मला अेकदां पाहिलेल्या चिल्का सरोवराचें स्मरण झाल्यावांचून रहात नाहीं. अुत्कलच्या अेका कवीनें या सरोवरावर अेक अुत्तम दीर्घ काव्य लिहिलें आहे.

नद्या आणि सरोवरें यांच्याविषयीं लिहिल्यानंतर जीवन–तर्पण पुरें करण्यासाठीं हिन्दुस्तान, ब्रह्मदेश आणि सिलोन यांच्या किनाऱ्यावर केलेलीं समुद्रदर्शनें सुद्धां मला लिहून काढलीं पाहिजेत. कराची, कच्छ व काठेवाडपासून ते मुंबअी, दाभोळ, कारवार किंवा गोकर्णापर्यंतचा समुद्रकिनारा; त्यानंतर कालिकतपासून ते रामेश्वर व कन्याकुमारीपर्यंतचा दक्षिणेकडील किनारा; तेथून वर जातां पॉंडेचारी, मद्रास, मच्छलीपट्टन, विझगापट्टन आदि सूर्योदयाचा पूर्वकिनारा आणि शेवटीं गोपालपुर, चांदीपुर, कोणार्क आणि जगन्नाथपुरीपासून तों थेट हिराबंदरापर्यंतचा दक्षिणाभिमुख समुद्रकिनारा या सर्वांचें जेव्हां जेव्हां स्मरण करतों तेव्हां तेव्हां कांहीं नाहींतरी पन्नास–पाअुणशे दृश्यें अेकावेळीं डोळयांसमोर भरती–ओहटी चालवितात. सिलोन आणि रंगूनचीं दृश्यें पुन्हा वेगळींच. हृदयांत हा सगळा आनंद अितका कांहीं भरलेला आहे कीं त्याला अेकाचवेळीं वाणीद्वारा वाट करून दिली तर समुद्रांतून निघून अनेक दिशांना वहाणारी अेक नवी अलौकिक सरस्वती निर्माण होअील. कांहीं नाहीं तरी हृदय हलकें करण्यासाठीं तरी त्या सर्व संस्मरणांना गति दिल्यावांचून गत्यंतर नाहीं.

हिन्दुस्तानांतील पर्वत व जंगलें, वाळवंटें व मैदानें, शहरें व गांवें सर्व वाट पहात बसलीं आहेत. गांवांचा पुरस्कार करण्याच्या दृष्टीनें मी शहरांची कितीहि निंदा करीत असलों आणि शहरांतील काम पुरें होण्याआधींच तेथून पळ काढण्याचें मन होत असलें तरी सुद्धां शहरांचें व्यक्तित्व मी ओळखूं शकतों. त्यांच्या बद्दल सुद्धां प्रेम भक्तीचा भाव मी हृदयांत साठवूं लागलों आहे. काय हीं शहरें माझ्या स्वदेश-वासियांच्या पुरुषार्थाचें प्रतीक नाहींत ?

शहरांत संस्कारितेच्या पिढ्या म्हणजेच पेढ्या आपल्या लोकांनीं स्थापन केलेल्या नाहींत? प्रत्येक शहरानें आपलें वातावरण, आपलें ब्रीद आणि आपला पुरुषार्थ अखंडपणें चालवलेला नाहीं? शहरें जर गांवांचीं भक्षक किंवा शोषक न बनता पोषक बनलीं तर त्यांना देखील प्रत्येक समाज–हितचिंतकाचे आशीर्वाद मिळाल्यावांचून रहाणार नाहींत.

माझ्या बाबतींत तर हिंदुस्तानांत पाहिलेलीं अनेकानेक स्मशानें सुद्‌धां माझ्या भक्तीचे विषय आहेत. मग तें हरिश्चंद्रानें सांभाळलेलें काशीचें स्मशान असो, दिल्लीच्या आसपासचीं अनेक राजधान्याचीं स्मशानें असोत किंवा महायुद्‌धानंतर अलीकडेच आसाममधें पाहिलेलीं विमानांचीं दोन तीन मजेदार स्मशानें असोत; स्मशान म्हणजे स्मशान. त्याला पाहून माणसांच्या तसेंच राजवंशाच्या, साम्राज्याच्या तसेंच संस्कृतीच्या जन्ममरणाविषयीं गहनांत गहन विचार मनांत घोळल्यावांचून रहावयाचे नाहींत.

ज्यांत मला शेवटीं पोंचावयाचें आहे तें अेक स्मशान सोडून बाकी सर्व स्मशानांचें वर्णन करण्याची अिच्छा आहे. तसें होअूं शकलें नाहीं तर युद्‌धांत 'कामीं आलेल्या' अज्ञातवीरांना आणि श्राद्‌धाच्या वेळीं अज्ञात नातेवाअिकांना अेक सामान्य पिंड किंवा अंजलि अर्पण करण्यांत येते त्याप्रमाणें हरिश्चंद्र, विक्रम, भर्तृहरि, आणि महादेवाचे अुपासक असे असंख्य योगीजन यांनीं ज्या स्मशानाला आपलें निवासस्थान बनवलें त्या प्रातिनिधिक 'सर्वसामान्य स्मशाना'ला अेक अंजलि अर्पण करण्याची अिच्छा तर आहेच.

हें सगळें मी करूं शकेन का? मला त्याची चिंता नाहीं. अीश्वरच अवतार धारण करतो असें नाहीं. ज्याच्या ज्याच्या मनांत संकल्प अुत्पन्न होतात त्याला त्याला अवतार घ्यावाच लागतो. तोच तो जीवात्मा अनेक अवतार धारण करतो असें मानण्याचेंहि कारण नाहीं. अवतार धारण करावा लागतो, अदम्य संकल्पाला. अदम्य संकल्पच खराखुरा विधाता आहे. संकल्प जन्मला कीं त्यांतून सृष्टि अुत्पन्न व्हायचीच. मग ती साहित्याची शब्द-सृष्टि असो, ब्रह्मदेवाची पार्थिव सृष्टि असो किंवा केवळ कल्पनेची चित्र-सृष्टि असो. या सृष्टिद्‌वारा जीवनदेवता आपल्या अनंतविध अुल्लासाचा आनंद अनुभवीतच असते.

---

# : १ : सखी मार्कंडी

(library stamp, illegible)

प्रत्येक नदी माताच असते कां ? छे. मार्कंडी तर माझ्या बाळपणची मैत्रीण आहे. ती अितकी चिमुकली आहे कीं तिला वडील बहीण मानायलाहि मी तयार नाहीं.

बेळगुंदीच्या आमच्या शेतांत अुंबराच्या झाडातळीं दुपारच्या छायेंत जरा विसावलों कीं मार्कंडीवरील वाऱ्याची झुळुक हमखास बोलवायचीच. कितीदां तरी मार्कंडीच्या कांठीं बसून वाऱ्याच्या लहरींनीं डोलणारीं गवताचीं पातीं मी तासन् तास पाहात राहिलों आहें. मार्कंडीच्या कांठीं असाधारण, अद्‌भुत असें कांहींच नाहीं. नाहींत कांहीं खास फुलें कीं नाहींत तऱ्हेतऱ्हेची रंगी-बेरंगी फुलपाखरें. दृष्टि आकर्षून घेतील असे धोंडेहि नाहींत. आपल्या कलरवानें चित्ताला अस्वस्थ करून सोडणाऱ्या लहानमोठ्या झऱ्यांची तर गोष्टच सोडा. तेथें आहे केवळ प्रेमळ शांति.

गुराखी म्हणतात कीं मार्कंडी वैजनाथच्या डोंगरांतून येते. मला तिचें मूळ शोधून काढण्याची कधींच अिच्छा झाली नाहीं. आमच्या तालुक्याचा नकाशा हातीं आला तरी त्यांत मार्कंडीची रेषा शोधायच्या भरीस मी पडत नाहीं, कारण तसें करूं जातां ती सखी न राहातां नदी बनायची ! मला आपलें तिच्या पाण्यांत पाय सोडून बसणेंच आवडतें. पाय ठेवला रे ठेवला कीं लगेंच खळखळ खळखळ असा आवाज सुरू झालाच. लहानपणीं आम्ही कितीतरी वेळ बोलत बसत असूं. अेकमेकांचा सहवासच आम्हांला आनंदित करायला पुरेसा असे. मार्कंडी काय बोलते आहे तें समजून घेण्याच्या भरीस मी पडत नसे आणि मी काय बोलतों त्याचा अर्थ करायला मार्कंडी थांबत नसे. अेकमेकांना अुद्देशून आम्ही बोलत आहोंत अेवढेंच आम्हांला पुरेसें असे. पुष्कळ वर्षांनीं भेटले कीं भाअूबहीण अेकमेकांना हजारो प्रश्न विचारतात. परंतु अशा प्रश्नांमागें जिज्ञासा नसते. ती तर प्रेम व्यक्त करण्याची अेक रीत असते. प्रश्न काय विचारला आणि अुत्तर काय मिळालें अिकडे लक्ष पुरवण्याअितकी मनाची स्वस्थता प्रेममीलनाच्या वेळीं राहील तर ना !

मार्कंडीच्या कांठाकांठानें मी गात फिरत असे आणि मार्कंडी अैकत राही. सोळाव्या वर्षी आपल्याला न्यायला आलेल्या यमराजाला शिवभक्तीच्या जोरावर मागें हटवणाऱ्या मार्कण्डेय ॠषीचें आख्यान गातांना मला अितका कांहीं आनंद होत असे!

मृकुंड ॠषींना मूलबाळ नव्हतें. त्यांनीं तपश्चर्या करून महादेवाला प्रसन्न करून घेतलें. महादेवांनीं वरदानांत विकल्प ठेवला.

**साधू सुंदर शाहणा सुत तया सोळाच वर्षें मिती**
**जो कां मूढ कुरूप तो शतवरी वर्षें असे स्वस्थिती**
**या दोहींत जसा मनांत रुचला तो म्यां तुतें दीधला.**

आतां या दोहोंतून कोणता वर पसंत करावा? ॠषींनीं आपल्या धर्मपत्नीला विचारलें. सद्गुणी बालक फक्त सोळाच वर्षें जगला, तरी तोच कुलोद्धारक होईल, असा विचार करून दोघांनीं त्याचीच याचना केली. मार्कण्डेय जसजसा वयानें विकसित होअूं लागला, तसतसे मातापित्यांचे चेहरे कोमेजूं लागले. शेवटीं सोळा वर्षें पुरीं झालीं.

तरुण मार्कण्डेय पुजेला बसला आहे. यमराज आपल्या रेड्यावर आरूढ होअून आले आहेत. पण शिवलिंगाला मिठी मारून बसलेल्या या तरुण साधूच्या अंगाला हात लावण्याची कुणाला छाती होणार! हो ना करता शेवटीं पाश फेकलाच. अिकडे शिवलिंगांतून त्रिशूळधारी शिव अेकदम प्रकट झाले, आणि असल्या धाष्टर्याबद्दल यमराजाला ऐकून घ्यावें लागलें. मृत्युंजय महादेवाचें दर्शन घडल्यावर मग मृत्यूचें भय कोठून राहाणार? त्याची आयुष्यधारा अजून येथें वाहते आहे!

मी कॉलेजांत शिकत होतों तेव्हां परीक्षा संपल्यावर आमची भाअूबीज होत असे. कापणीचे दिवस असले कीं दोन दोन दिवस शेतावरच घालवण्याची पाळी येअी. त्यावेळीं मार्कंडी मला रताळी देअी आणि अमृततुल्य पाणीहि पाजी. रात्रीं थंडींत ती कुडकुडते कीं काय तें पाहायला मी जाअी तेव्हां आपल्या आरशांत ती मला मृगनक्षत्र दाखवीत असे.

आजहि जेव्हां जेव्हां आमच्या गांवीं जातों तेव्हां तेव्हां मार्कंडीला भेटल्यावांचून राहात नाहीं. पण आतां ती माझ्याशीं पूर्वीप्रमाणें लडिवाळपणा

करीत नाहीं. किंचित् स्मित करून मौन धारण करते. तिच्या सुकुमार चेहऱ्यावर पूर्वीचें खेळकर लावण्य आतां आढळून येत नाहीं. परंतु तिचा स्नेहभाव मात्र अधिक सखोल, गभीर झाला आहे.

ऑगस्ट १९२८.

# : २ : कृष्णेचीं संस्मरणें

— १ —

अेकादशीचा दिवस होता. गाडींत बसून आम्ही माहुलीला निघालों. सातार्‍याहून माहुली चांगलीच दूर आहे. रस्त्यांत अुजव्या बाजूस श्री शाहू महाराजांच्या अिमानदार कुत्र्याची समाधि लागते. रस्त्यावरून आमच्याप्रमाणेंच पुष्कळांनीं गाड्या माहुलीकडे भरधाव सोडल्या होत्या. शेवटीं आम्ही नदीकांठीं पोहोंचलों. तेथें या कांठापासून त्या कांठापर्यंत लोखंडाचा दोरखंड अुंचावर ताणून बांधला होता. माझ्या बालदृष्टीला भव्य भासणारी अेक नौका त्या दोरखंडाला सांखळीनें बांधलेली होती.

तीरावरील गोटे कसे गुळगुळीत, काळे आणि थंडगार! अेक हातांत घेतला न घेतला तोंच दुसऱ्यावर नजर पडे. तो अधिक चांगला वाटे. अितक्यांत तिसऱ्या भिजलेल्या गोट्यावर अुदी रंगाच्या रेघा दिसत म्हणून तो घेण्याची अिच्छा होअी. त्या दिवशीं मला कृष्णेचें पहिलें दर्शन घडलें. कृष्णामाईनें मला पहिल्या भेटींतच ओळखलें. कृष्णेला मीं ओळखावें अितका मोठा मी त्यावेळीं झालोंच नव्हतों. मूल आअीला ओळखूं लागतें त्यापूर्वीच आअीनें त्याला आपलेंसें केलेलें असतें. नागव्यानें आम्ही मुलें पाण्यांत मनसोक्त डुंबलों, अुड्या मारल्या, पाणी अुडवलें, नौकेवर चढून पाण्यांत अुड्या मारल्या, कडकडून भूक लागेस्तोवर कृष्णेंत यथेच्छ जलविहार केला.

ज्याप्रमाणें नदीचें हें माझें पहिलेंवहिलेंच दर्शन होतें, त्याचप्रमाणें आंघोळ केल्यावर खाऱ्या शेंगदाण्याची न्याहारी केली तो स्वाद त्या प्रकारचा पहिलाच

होता. यात्रेच्या वेळीं मोरपिसांचा टोप घालणारे ‘ वासुदेव ’ भीक मागण्यास आले होते. टाळांच्या साथीवर गाअिलेले त्यांचें मधुर भजनहि त्याच दिवशीं पहिल्या प्रथम अैकलें. कृष्णामाअीच्या मंदिरांत थोडा वेळ आराम करून आम्ही घरीं परतलों.

सह्याद्रीच्या अरण्यांत महाबळेश्वराजवळ अुगम पावून साताऱ्यापर्यंत धावत येण्यास कृष्णेला फारसा वेळ लागत नाहीं. पण तितक्यांतच वेण्या कृष्णेला भेटण्यास येते. माहुलीला जें माहात्म्य लाभलें आहे तें या संगमामुळेंच. दोन मुली अेकमेकींच्या खांद्यावर हात ठेवून खेळायला निघाल्या आहेत असें हें दृश्य, कांहीं नाहीं तरी पस्तीस वर्षें, हृदयांत कोरलेलें आहे.

कृष्णेचें कुटुंब भलें मोठें आहे. कितीतरी लहानमोठ्या नद्या तिला येअून मिळतात. गोदावरीप्रमाणेंच कृष्णेलाहि ‘ महाराष्ट्र माता ’ म्हणता येईल. ज्या काळीं आजची मराठी भाषा प्रचलित नव्हती, त्या काळचा सारा महाराष्ट्र कृष्णेनेंच व्यापून टाकला आहे.

— २ —

‘ नरसोबाच्या वाडी ’ला जात असतांना गाडी नावेवर चढवून आम्ही कृष्णा पार केली होती तें कृष्णेचें दुसरें दर्शन. अेका बाजूला अुंच दरड आणि दुसऱ्या बाजूला दूरवर पसरलेला गाळाचा विस्तार व त्यांत होणारीं वांगीं, चिबडें, काकड्या, कलिंगडें, टरबुजें यांचे अमृतमळे. कृष्णाकांठचीं तीं वांगीं ज्यानें अेकदां चाखलीं, त्याला स्वर्गांतसुद्धा त्यांची वासना होअील. सतत अेक दोन महिने सारखीं वांगींच खात राहिलों तरीहि तृप्ति होणार नाहीं, मग वीट येणें तर दूरच राहिलें.

— ३ —

सांगलीजवळ कृष्णाकांठींच ‘ संस्थानी महाराष्ट्रा ’चें राजवैभव मीं पहिल्या-प्रथम पाहिलें. ते सुंदर व्यवस्थित बांधलेले विशाल घाट, घाटदार व चकचकीत घागरी भरभरून पाणी घरीं घेअून जाणाऱ्या मराठमोळया स्त्रिया, पाण्यांत धडामदिशी उड्या मारून कांठावरच्या लोकांना भिजवून टाकण्याची हौस बाळगणारे आखाडेबाज, क्षुद्र घटिकांच्या तालबद्ध आवाजानें आपलें आगमन सुचविणारे पहाडासारखे हत्ती, आणि ‘ कर्र्र्र् ’ असा अेकश्रुति आवाज करून रसपानाचें आमंत्रण देणारीं अुसाचीं गुऱ्हाळें, कृष्णाबाईचें हें तिसरें दर्शन !

मला चांगलेसें पोहतां येत नव्हतें. तरीसुद्धां अेक मोठी घागर अुलटी टाकून तिच्या आधारें तरंगत वहात जाण्यासाठीं म्हणून मी अेकदां नदींत अुतरलों. पण अेका ठिकाणीं चिखलांत असा कांहीं सांपडलों कीं अेक पाय वर काढूं जातां दुसरा अधिकच खोल रुते. आणि तो चिखल तरी कसला ? जणूं काळेंभोर लोणीच ! मला वाटलें कीं आतां आपला जंगमपणा जाअून शीर्षासन करणाऱ्या झाडाप्रमाणें आपण येथें स्थावर होणार ! त्या दिवशीं माझी जी पांचावर धारण बसली होती तिचा अजून विसर पडला नाहीं.

— ४ —

चिंचली स्टेशनावर आम्हांला नेहमीं कृष्णानदीचें पाणी प्यावयास मिळे. आमच्या परिचयाचे अेक गृहस्थ तेथें स्टेशनमास्तर होते. आम्हांला मोठ्या मायेनें ते अेखादा लोटा पाणी मागवून देत. तहान असो वा नसो, आमचे वडील मोठ्या भक्तीनें आम्हां सर्वांना पाणी पिण्यास सांगत. कृष्णा आहे महाराष्ट्राची आराध्य देवता. तिचा अेक थेंब जरी पोटांत गेला तरी आपण पावन होअूं. कृष्णेचा अेक तरी बिन्दू ज्याच्या पोटांत गेला आहे तो आपलें महाराष्ट्रीय-पण कधींहि विसरणार नाहीं. श्रीसमर्थ व शिवाजी महाराज, शाहू व बाजीराव, घोरपडे व पटवर्धन, नाना फडणवीस व रामशास्त्री—थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे महाराष्ट्राचें साधुत्व व वीरत्व, महाराष्ट्राची न्यायनिष्ठा व मुत्सद्दीपणा, धर्म व सदाचार, देशसेवा व विद्यासेवा, स्वतंत्रता व अुदारता सारें कांहीं कृष्णेच्या वत्सल कुटुंबांत वाढलें आहे. देहू आणि आळंदीचें पाणी कृष्णेलाच येअून मिळतें; पंढरपुरची चंद्रभागा सुद्धां भीमा नांव धारण करून कृष्णेंतच विलीन होतें. ‘ गंगास्नान आणि तुंगापान ’ या म्हणींत जिचा गौरव स्वीकारला गेला आहे, ती तुंगभद्रा कर्नाटकाच्या प्राचीन वैभवाच्या स्मरणासहित कृष्णेंतच मिसळून जाते. खरें सांगायचें म्हणजे महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगण ( आंध्र ) या तीन देशांचें ऐक्य साधण्यासाठींच कृष्णा वाहत आहे. हे तीनहि प्रांत कृष्णेचें दूध प्याले आहेत. कृष्णेला प्रांतीयता ठाअूक नाहीं.

— ५ —

कॉलेजचे दिवस. मोठ्या आशेनें पुण्याहून वडील बंधूंना भेटण्यासाठीं घरीं गेलों. पण मी पोहोंचण्यापूर्वींच ते अिहलोक सोडून गेले होते. त्यांच्या

अस्थि कृष्णानदीच्या पवित्र जलांत विसर्जित करण्याचें माझ्या नशिबीं आलें. बेळगांवहून मी कुडचीला गेलों. सायंकाळची वेळ होती. आगगाडीच्या पुलाखालीं कृष्णेची पूजा केली. वडील बंधूंच्या अस्थि कृष्णासमर्पण केल्या. स्नान केलें आणि आसनमांडी घालून जीवन-मरणाचा विचार करीत बसलों.

कृष्णेच्या पाण्यांत कितीतरी महाराष्ट्र–वीरांचें व महाराष्ट्र–शत्रूंचें रक्त मिसळलें असेल! पावसाळी अुन्मादांत कितीतरी शेतकऱ्यांना आणि त्यांच्या गुराढोरांना कृष्णेनें जलसमाधि दिली असेल! पण कृष्णेला त्याचें काय होय? मदमत्त हत्तींनीं तिच्या पाण्यांत विहार केला काय किंवा वीतराग साधूंनीं तिच्या काठीं तपस्या केली काय—तिला दोन्ही सारखेंच. माझ्या बंधूंच्या अस्थि आणि खडे होअून पडलेल्या पहाडांच्या अस्थि यांत कृष्णेला भेद कोठून वाटणार? माहुलीस असतांना मला आपल्या खांद्यावर अुभा करून पाण्यांत अुड्या मारण्यास अुत्तेजन देणाऱ्या वडील बंधूंच्या अस्थि माझ्या हस्तें त्याच कृष्णेच्या पाण्यांत विसर्जन करणें माझ्या वांट्याला आलें! किती अतर्क्य ही जीवनलीला!

— ६ —

या कृष्णेच्या अुदरांत माझा दुसरा अेक भाअू देखील निजलेला आहे. ब्रह्मचारी अनंतबुवा मरढेकर हे आमचे परस्पर हार्दिक प्रेम पाहतां मला सख्या धाकट्या भावासारखे होते, आणि देशसेवेच्या व्रताच्या बाबतींत ते माझे आदरणीय वडील बंधु शोभते. स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि गोसेवा असें त्रिविध कार्य करतां करतां त्यांनीं आपला देह ठेवला. माझ्याबरोबर त्यांनीं गंगोत्रीची व अमरनाथची यात्रा केली होती. पण कृष्णाकांठीं येअूनच ते अमर झाले. भक्तीच्या अुमाळ्यांत ते देहभान विसरून जात आणि अनेकदां ठेचाळत हें हिमालयाच्या प्रवासांत माझ्या पुष्कळदां नजेरस आलें होतें. मी अनेकदां त्यांना याबद्दल रागें भरत असे, पण ते जुमानीत नसत. ते आपले श्रीसमर्थांच्या प्रासादिक वाणीच्या सात्त्विक मस्तींतच मश्गूल असायचे. कृष्णेला सुद्धां त्यांना रागें भरावेंसें वाटलें असावें. देवळाला प्रदक्षिणा घालीत असतांनाच ते वरून खालीं अेका डोहांत पडले आणि स्वर्गवासी झाले. जेव्हां वाअीच्या खडकाळ पटावरून वाहाणाऱ्या गंगेचें मी स्मरण करतों, प्रत्येक पावसाळ्यांत कृष्णेंत शिरःस्नान करणाऱ्या देवळांच्या शिखरांचें जेव्हां दर्शन घडतें, तेव्हां

कृष्णेच्या कुशींत माझाहि अेक भाअू कायमची निद्रा घेत आहे या गोष्टीचें मला स्मरण झाल्यावांचून राहात नाहीं. आणि त्याचबरोबर अनंतबुवांच्या तपोनिष्ठ पण प्रेमसुकुमार मूर्तीचें दर्शन झाल्यावांचून राहात नाहीं.

— ७ —

सन १९२१ चें साल! भारतवर्षानें अेका वर्षांत स्वराज्यसिद्धि करण्यासाठीं कंबर कसली आहे. हिंदु-मुसलमान अेक झाले आहेत. तेहतीस कोटि देवांसारखे भारतवासी कोटिकोटीच्या संख्येंतच विचार करूं लागले आहेत. स्वराज्य-महर्षि लोकमान्य टिळक यांचें स्मरण सदैव राखण्यासाठीं टिळक-स्वराज्य-निधि म्हणून अेक कोटि रुपये गोळा करावयाचे आहेत. राष्ट्रीय सभेच्या निशाणाखालीं काम करणाऱ्या सभासदांची संख्याहि अेक कोटि करावयाची आहे. आणि पट-वर्धन श्रीकृष्णाच्या सुदर्शनाप्रमाणें असणारे चरखेसुद्धां तितक्याच संख्येनें या धर्मभूमींत चालू करावयाचे आहेत. यासाठीं भारतमातेचे सुपुत्र बेझवाडा येथें गोळा झाले आहेत. श्री. अब्बाससाहेब, श्री. पुणतांबेकर, गिदवाणीजी आणि मी अेकत्रच बेझवाड्याला पोहोंचलों आहोंत. अशा मंगल प्रसंगीं कृष्णांबिकेचें विराट दर्शन करण्याचें सद्भाग्य मला लाभलें. वाअीला ज्या कृष्णानदीच्या कांठीं बसून संध्यावंदन केलें आणि न्यायनिष्ठ रामशास्त्र्यांच्या व राज्यकार्यधुरंधर नानांच्या गोष्टी अैकल्या, तीच चिमुरडी कृष्णा येथें अेवढी मोठी झालेली पाहून प्रथम तर डोळयांवर विश्वासच बसेना. कोठें ती माहुलीची लहानशी सांखळी आणि कोठें हे येथलें युरोप-अमेरिकेला जोडणाऱ्या केबलांसारखे जाडजूड दोरखंड! हजारो, लाखो लोक येथें स्नानाला येत. स्थूलकाय आंध्र बांधवांत आज भारतवर्षांतील सारेच बांधव मिसळून गेले आहेत. 'राष्ट्रीय' हिन्दीचा वाक्प्रवाह जेथें तेथें अैकूं येत आहे. कृष्णानदीला जशा वेण्या, वारणा, भीमा, तुंगभद्रा येअून मिळतात, त्याचप्रमाणें खेड्यापाड्यांतून टोळयाटोळयांनीं येअून मिळणारा जनतेचा प्रवाह बेझवाड्यांत अुतूं जाअूं लागला आहे. अशा प्रसंगीं रोज कृष्णेंत स्नान करण्याचा लाभो मिळत आहे. ज्या कृष्णेनें जन्मकाळचें दूध दिलें त्याच कृष्णेनें स्वराज्यकांक्षी भारतराष्ट्राचें गौरवशाली दर्शन घडविलें. जय कृष्णे! तुझा विजय असो, भारतवर्ष अेक होवो, स्वतंत्र होवो!!

जुलै १९२९

# : ३ : मुळामुठेचा संगम

तशा नद्या तर आपण ब्ऱ्याच पाहिलेल्या असतात. पण दोन नद्यांचा संगम कांहीं सहजासहजीं पाहावयास मिळत नसतो. संगमाचें काव्यच वेगळें!

दोन नद्या भेटल्या कीं त्यांतली एक स्वतःचें नांव सोडून दुसरीशीं एकरूप होते. सगळया देशांतून हा नियम पाळण्यांत आलेला दिसून येतो. परंतु कलंकावांचून जसा चंद्र शोभणार नाहीं, त्याचप्रमाणें अपवादावांचून नियमाचेंहि चालणार नाहीं. आणि कित्येक वेळा नियमापेक्षां अपवादच अधिक लक्ष वेधून घेतो. अुत्तर अमेरिकेंतील मिसिसिपी-मिसोरी आपलें सप्ताक्षरी लांबलचक नांव द्वंद्व-समासानें धारण करून जगांतील सर्वांत लांब नदी म्हणून प्रसिद्धि पावली आहे. सीताहरणाच्या प्रसंगापासून ते विजयनगरच्या स्वातंत्र्यहरणापर्यंतचा अितिहास मनांत घोळवणारी तुंगभद्रा देखील तुंगा आणि भद्रा यांच्या मीलनावरून आपलें नांव आणि महत्ता संपादन करूं शकली आहे. पुण्याला स्वतःच्या कडेवर खेळवणारी मुळामुठाहि मुळा आणि मुठेच्या संगमापासून बनली आहे.

सिंहगडाच्या पश्चिमेकडील दरींतून मुठा येते. खडकवासल्यापर्यंतच्या अुघड्या बोडक्या टेकड्या तिचें रक्षण करतात. खडकवासल्याच्या धरणानें तन्वंगी मुठेचें सुदीर्घ सरोवर बनविलें आहे. या सरोवराच्या कांठीं झाडेंहि नाहींत आणि मंदिरेंहि नाहींत. दिवसा ढग आणि रात्रीं तारे आपली चिंतातुर प्रतिबिंबें या सरोवरांत न्याहाळतात. येथेंच मुठेजवळून कालव्यांच्या रूपानें दोन जबरदस्त कर वसूल करण्यांत येतात, ज्यांच्यायोगें पुणें आणि खडकी येथील लोक पोट भरून पाणी पीत असतात. मुठेच्या कांठावरील अुसाचें पीक वाढत्या प्रमाणावर आहे. वसंतऋतूंत जिकडे पहावें तिकडे अुसाचे चरक बांग देऊन लोकांना रसपानाची आठवण करून देतांना आढळतात. नांव 'लकडीपूल' पण दगडांनीं बांधलेल्या पुलाखालून ही नदी पुढें वाहाते आणि 'दगडीपूल' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या, पण पूल नसून भक्कम बांध असलेल्या दगडी अंतरायाला ओलांडून पुढें जाते. त्यानंतर तिचा मुळाताअीशीं संगम होतो. लकडीपुलापासून ओंकारेश्वरपर्यंत वाटेल तितकीं प्रेतें जळत असलीं तरी संगमप्रसंगीं त्याचा विषाद मुठेच्या चेहऱ्यावर आढळत नाहीं.

अितका शांत संगम अितरत्र क्वचितच दिसून येईल. याच संगमावर कॅप्टन मॅलेट पेशवाईच्या मरणघडीचीं पळें मोजत छावणी टाकून पडला होता. आज मात्र संस्कृत भाषेच्या संशोधनाचें कार्य युरोपियन पंडितांच्या हातून पुन्हा हिसकाअून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या आर्य पंडित भांडारकरांचा संगमाश्रमच येथें शोभतो. संस्कृत विद्येच्या पुनरुद्धारासाठीं स्थापन झालेल्या पाठशाळेचें रूपांतर करून नव्या जुन्याचा संगम घडवून आणणारी डेक्कन कॉलेजची स्थापनाहि या संगमाजवळच शोभून दिसते. गोऱ्यांनीं येथें नौकाविहारासाठीं नदीला बांध घालून पाणी अडवलें आहे आणि मच्छरांच्या विशाल कुळालाहि येथें आश्रय दिला आहे. जवळच्या अेका टेकडीवर गुजरातच्या एका लक्ष्मी-पुत्राची अुत्तुंगशिरस्क पण नम्रनामधेय ‘ पर्णकुटी ’ विराजत आहे. माणसाचें स्वातंत्र्य हरण करणारें येरवड्याचें कारागृह आणि प्राणहरण–पटु लष्करी दारूखानासुद्धां संगमापासून फार दूर नाहींत. कोण जाणे आणखी किती विचित्र वस्तूंचा संगम मुळामुठेच्या कांठीं होत असेल आणि होणार असेल ! बांधाजवळ असलेल्या बंड गार्डनमध्यें लक्षाधीश आणि भिक्षाधीश लोकांचा जो संगम होतो तो पण याचेंच एक अुदाहरण म्हणतां येअील.

शेवटल्या बांधावरून सुटकेचा निश्वास टाकून सुटून जाणारी मुळामुठा येथून पुढें कोठें जाते याची मला कल्पना नाहीं.

महाराष्ट्रांतील नद्यांपैकीं तीन नद्यांविषयीं मला विशेष आत्मीयता वाटते. मार्कण्डी माझी बाळपणची मैत्रीण, माझ्या खेडवळ जीवनाची साक्षी आणि माझ्या बहिणीची—आक्काची प्रतिनिधि. कृष्णेच्या कांठीं तर माझा जन्म झालेला. महाबळेश्वर ते थेट बेझवाडा आणि मच्छलीपटम पर्यन्तचा तिचा विस्तार अनेक प्रकारें माझ्या जीवनाशीं विणला गेलेला. आणि तिसरी ही मुळामुठा. लहानपणीं आम्ही सर्वच भाअू शिक्षणासाठीं जाअून राहिलों होतों. तेव्हांपासून मुळामुठेचा संगम पुण्याला माझ्या बालकल्पनांचा साक्षी आहे. कॉलेजच्या दिवसांत आमच्या डोक्यांत चालणारे क्रांतिकारी विचारहि मुळामुठेला ठाअूक आहेत. पण या सगळ्या आठवणींना मागे टाकून महात्मा गांधींबरोबर घालवलेले तिच्या कांठचे दिवस विशेष आठवतात. लेडी ठाकरसींची पर्णकुटी, दिनशा मेहेतांचें निसर्गोपचार–भवन आणि सिंहगडचा निवास, सर्वांचेंच अेकदम स्मरण होतें.

सन १९२६–२७.

आणि शेवटीं शेवटीं अिंग्रज सरकारनें गांधीजींना जेथें बंदिस्त करून ठेवलें होतें तो आगाखान महलहि मुळामुठेच्या कांठावरच आहे. तेथेंच गांधीजींच्या दोन जीवनसाथींनीं स्वराज्यासाठीं स्वतःची अंतिम आहुति दिली. कस्तूरबा आणि महादेव देसाअी या दोघांनीं जिच्या तीरावर देह ठेवला ती मुळामुठा भारतवासियांना आणि विशेषतः आश्रमवासियांना तीर्थ-स्थानाप्रमाणें आहे.

आणि जेव्हां आजच्या मुळामुठेचा विचार करतों, तेव्हां सिंहगडाच्या पायथ्याशीं, खडकवासला सरोवराच्या कांठीं ज्या राष्ट्र–संरक्षण–विद्यालयाची स्थापना झाली आहे, त्याचें स्मरण झाल्यावांचून राहात नाहीं. या संस्थेचें नांव युद्ध महाविद्यालय न ठेवतां राष्ट्रीय रक्षण विद्यालय ठेवलें गेलें आहे, ही गोष्टसुद्धां लक्ष वेधल्यावांचून राहात नाहीं. ज्या सरोवराच्या कांठीं या विद्यालयाची स्थापना झाली आहे, त्याचें नांवहि महाराष्ट्राच्या इतिहासाला साजेसें असलें पाहिजे. अशा सरोवराला कोण्या अिंग्रजाचें नांव न देतां नरवीर तानाजी मालुसरेचें नांव ठेवलें पाहिजे. स्वतःचे प्राण अर्पण करून तानाजीनें कोंडाणा किल्ला सर केल्याचें वर्तमान जेव्हां समजलें तेव्हां छत्रपति शिवाजी महाराजांच्या तोंडून शब्द निघाले–'गड आला पण सिंह गेला!' आणि त्या गडाचें नांव सिंहगड पडलें.

या सरोवराला आपण तानाजी सरोवर असें नांव द्यावें किंवा सिंह सरोवर.

# : ४ : सागरसरितेचा संगम

लहानपणीं राजा भोज आणि कालिदास यांच्या गोष्टी वाचावयास मिळत. भोज राजा विचारतो, 'ही नदी अशी रडत कां आहे?' नदीचें पाणी दगडांतून वाहातांना खळखळाट करीत असेल. राजाच्या मनांत आलें, कीं चला कवीच्या पुढें एक कल्पना फेंकूं या. म्हणून त्यानें वरील प्रश्न विचारला. लोककथेंतील कालिदास लोकमानसाला रुचेल असेंच अुत्तर देणार. तो म्हणाला, 'रडण्याचें कारण काय विचारतां महाराज? ही मुलगी माहेराहून सासरीं चालली आहे.

मग रडणार नाहीं तर काय करेल बिचारी ?' त्यावेळीं मनांत विचार आला, 'सासरीं जायला नाहीं आवडत तर जावें कशाला ?' कुणीतरी अुत्तर दिलें, 'मुलींचा जन्म सासरीं जाण्यासाठींच असतो.'

नदी जेव्हां आपल्या पतीला, सागराला जाअून मिळते तेव्हां तिचा सगळा नूर पार बदलून जातो. त्या प्रवाहाला नदी म्हणून ओळखणेंहि कठीण होअून बसतें. साताऱ्याजवळ माहुलीपाशीं कृष्णा आणि वेण्याचा संगम पाहिला होता. पुण्याला मुळा आणि मुठेचा. पण नदी-सागराचा संगम पहिलावहिला पाहिला तो कारवारला—अुत्तरेकडील सुरूच्या बनाच्या टोंकाला. आम्ही दोघे भाअू समुद्रकिनाऱ्यावरील वाळूंत खेळत खेळत, फिरत फिरत पुढें जात होतों. रोजच्यापेक्षां खूप दूर गेलों आणि अकस्मात् अेक सुंदर नदी समुद्राला येअून मिळतांना पाहिली. दोन नद्यांच्या संगमापेक्षांहि नदीसमुद्राचा संगम अधिक काव्यमय असतो. दोन नद्यांच्या संगमाचा आनंद गूढ-शांत असतो; याच्या अुलट सागर-सरिता जेव्हां अेकमेकांना भेटतात तेव्हां दोघांतहि मात्र अुन्मादच दिसून येतो. आणि त्या अुन्मादाचा कैफ आपल्यालाहि अचूक चढल्यावांचून राहात नाहीं. नदीचें पाणी शांत आग्रहानें समुद्राकडे सरकत असतें; अिकडे आपली मर्यादा कधींच न सोडण्याविषयीं नांवाजलेल्या समुद्राचें पाणी चंद्राच्या चिथावणीनें घटकेंत नदीला वाट करून देते तर घटकेंत टक्कर देतें. नदी आणि समुद्र यांचा अेकमेकाविरुद्ध असा सत्याग्रह चालूं असतांना अनेक प्रकारचीं दृश्यें पहावयास मिळतात. समुद्राच्या लाटा नदीच्या पाण्याला तिरप्या कापीत येअूं लागल्या म्हणजे पाण्याचा अेक फवारा या टोकापासून त्या टोकापर्यंत दौडत जातो. कांहीं ठिकाणीं पाणी गोल गोल फिरून भोंवरे निर्माण करतें. समुद्राचा जोर वाढला कीं नदीचें पाणी मागें हटत जातें. अशावेळीं दोन्ही बाजूंच्या कांठांवर त्याचा मारा जोराचा असतो. नदीच्या गतीची ही विपरीत दशा पाहून त्याचा लाभ घेण्यासाठीं टपलेल्या मतलबी होड्या अुत्साहानें आंत घुसतात. त्यांना ठाअूक असतें कीं या भाग्याच्या भरतीबरोबर जितकें आंत जातां येईल तितकें खरें आणि नंतर जेव्हां समुद्राची ओहोटी सुरूं होते आणि सागराच्या लाटा आपला विरोध सोडून बाहू पसरून नदीच्या पाण्याचें स्वागत करतात, तेव्हां या स्वार्थसाधु होड्यांना आपली त्रिकोणी पगडी फिरवावयास अुशीर लागत नाहीं. वारा

कोणत्याहि का दिशेला वाहीना, जोंपर्यंत तो समोरून अुलटा वाहत नाहीं, तोंपर्यन्त त्यांतून कोणताना कोणता फायदा अुकाळण्याची हातोटी या वैश्यवृत्ति होड्यांत असतेच. त्यांच्या पगडीची अर्थात् शिडाची बांधणी आणि रचनाच अशाप्रकारची केलेली असते.

आम्ही पोचलों तेव्हां होड्या अशाच रीतीनें नदींत प्रवेश करीत होत्या. पण त्या सागरी फुलपांखरांना निरखत बसण्यांत आम्हांला गोडी नव्हती. आम्ही आपले संगमाबरोबर सूर्यास्त कसा काय शोभून दिसतो तें पाहाण्यांत गर्क झालों होतों. सोनेरी रंग तसा तर सर्वत्रच शोभतो; पण हिरव्या रंगाबरोबर त्याची बादशाही शोभा कांहीं औरच असते. अुंचअुंच झाडांच्या शेंड्यावर जेव्हां संध्येचे सुवर्ण किरण आरोहण करतात, तेव्हां ही मानवसृष्टि नसून पऱ्यांच्या दुनियेंत आपण वावरत आहोंत असा भास होअूं लागतो. समुद्र तर अगदीं तुडुंब भरलेल्या सुवर्ण रसाच्या सरोवरासारखा शोभूं लागला. आम्ही ही शोभा पाहून तृप्त झालों किंवा खरें सांगायचें म्हणजे जसजशी ही शोभा पाहात गेलों तसतसें हृदय अधिकाधिक अस्वस्थ होत गेलें. सौंदर्यपानानें आम्ही जणूं गुदमरून जात होतों.

सूर्यास्तानंतर रंग ओसरूं लागले, सौम्य झाले. आम्हीहि भानावर आलों आणि परतण्याचा विचार केला. पण आतां मागें जाण्याची सोय नव्हती. म्हणून आम्ही नदीच्या कांठाकांठानें वरच्या बाजूस निघालों. तेथेंहि नदीचें पाणी दोन्ही अंगास फुगत चाललें होतें—रेड्याच्या पाठीवरील पखाल पाणी भरतांना फुगते तसें. आम्ही जसजसे वर चाललों तसतसें पाणी अधिकाधिक शांत दिसूं लागलें. अंधारहि वाढत चालला होता. या कांठावरून त्या कांठावर येरझाऱ्या करणारी अेक होडी चुपचाप कोपऱ्यांत पडून होती. आणि खेड्यांतील मजूर लंगोटीच्या दोरींत मागल्या बाजूस अेक चक्र ओवून त्याला कोयता लटकावून चालले होते. या लोकांचा पोशाख म्हणजे अेक लंगोटी आणि अेक जाकीट. नदी पार करावयाची असेल तेव्हां जाकीट डोक्यावर घेतलें कीं काम भागलें. निसर्गाचीं बाळकें! जमीन काय आणि पाणी काय दोन्हीं त्यांना सारखींच.

घरीं जाण्याची घाअी फक्त आम्हांलाच होती असें नाहीं. या खेडवळ लोकांनाहि घाअी असावीसें वाटत होतें आणि नदीच्या

कांठावरून तुरुतुरु धावणाऱ्या खेकड्यांनाहि आमच्या अितकीच घाओी होती. रात्र पडली आणि आम्ही लगबगीनें घरीं आलों. पण कधींतरी या नदीच्या कांठाकांठानें आंत चांगलें दूरपर्यन्त जाऊन आलें पाहिजे असा विचार मनांत स्फुरल्यावांचून राहिला नाहीं. हातांत अेखादा कांदा किंवा कोबी येतांच त्याचे पापुद्रे अुकलून पाहण्याची जशी अिच्छा होते, त्याचप्रमाणें नदी पाहिली कीं तिच्या अुगमाकडे जाण्याची अिच्छा मनुष्याला झाल्यावांचून राहात नाहीं. अुगमाचा शोध हा अेक सनातन शोध आहे. गंगोत्री, जम्नोत्री आणि महाबळेश्वर किंवा त्र्यंबक यांचा शोध लागला तो अशाच तऱ्हेनें.

लहानपणींची ती अिच्छा थोड्याच वर्षांपूर्वी पुरी झाली. श्री. शंकरराव गुलवाडी आम्हांला अेक केन्द्र पाहाण्यासाठीं म्हणून वरच्या दिशेनें दूरवर घेअून गेले. या प्रतीप-यात्रेच्या प्रसंगीच कवि बोरकरांची कविता अैकल्याचें आनंद-दायक स्मरण कायम आहे.

१९३४

# : ५ : गंगामाओी

— १ —

गंगेनें दुसरें तिसरें कांहीं केलें नसतें आणि अेकट्या देवव्रत भीष्माला जन्म दिला असता, तरीसुद्धां आर्यजातीची माता म्हणून आज ती प्रख्यात झाली असती. पितामह भीष्मांची प्रतिज्ञा, भीष्मांची निःस्पृहता, भीष्मांचें ब्रह्मचर्य आणि भीष्माचें तत्त्वज्ञान हें आर्यलोकांचें नित्य आदरणीय ध्येय होअून बसलें आहे. भारतीय संस्कृतीचा आधारस्तंभच अशा या महापुरुषाची माता म्हणून आपण गंगेला ओळखतों.

— २ —

नदीला अेखादी अुपमा समर्पक असेल तर ती मातेचीच. नदीच्या कांठीं राहिल्यावर दुष्काळाचें भय तर अुरतच नाहीं. मेघराजानें दगा दिला तर नदीमाता आपलें पीक पिकवून देते. नदीचा कांठ म्हणजे शुद्ध व शीतल हवा.

नदीच्या कांठाकांठानें फिरावयास निघालें असतां प्रकृतीच्या मातृ-वात्सल्याच्या अखंड प्रवाहाचें दर्शन होतें. नदी मोठी असली व तिचा प्रवाह धीरगंभीर असला म्हणजे तर अशा नदीमुळें कांठावर राहाणाऱ्या लोकांची चांगली भरभराट झालेली असते. खरोखरच नदी ही जन-समाजाची माता आहे. नदीकांठच्या शहरांतील गल्लीबोळांतून फिरत असतांना अकस्मात् अेखाद्या कोपऱ्यांतून जेव्हां नदीचें दर्शन होतें तेव्हां आपल्याला किती आनंद होतो! कुठें हें शहरांतील गलिच्छ वातावरण आणि कुठें तें नदीचें प्रसन्न दर्शन! लगेच फरक जाणवतो. नदी अीश्वर नसों, पण अीश्वराचें स्मरण करून देणारी देवता आहे यांत शंका नाहीं. जर गुरूला वंदन करणें योग्य असेल, तर नदीलाहि वंदन करणं योग्यच ठरेल.

ही झाली सामान्य नदीची गोष्ट. पण गंगामाअी तर आर्यजातीची माता. आर्यांचीं मोठमोठीं साम्राज्यें या नदीच्या तीरावरच स्थापलीं गेलीं. कुरुपांचाल देशांचा अंग-वंगादि देशांशीं असलेला संबंध गंगेनेंच घडवून आणला आहे. आजदेखील हिंदुस्थानची लोकवस्ती गंगेच्या किनाऱ्यावरच सर्वांत अधिक प्रमाणांत आहे.

जेव्हां आपण गंगेचें दर्शन घेतों तेव्हां भरघोस पिकांनीं फुललेलीं शेतेंच आपल्या ध्यानांत येतात किंवा मालानें लादलेलीं जहाजेंच आपलें लक्ष वेधून घेतात असें नाहीं; तर वाल्मीकीचीं कवनें, बुद्ध महावीरांचे विहार; अशोक, समुद्रगुप्त किंवा हर्षासारख्या सम्राटांचा पराक्रम आणि तुलसीदास किंवा कबीर यांसारख्या संतजनांचीं भजनें—या सर्वांचेच स्मरण होतें. गंगेचें दर्शन म्हणजे शैल्य-पावनत्वाचें हार्दिक आणि प्रत्यक्ष दर्शन होय.

परंतु गंगेचें दर्शन कांहीं अेकाच प्रकारचें, एकविध नाहीं. गंगोत्रीजवळच्या हिमाच्छादित प्रदेशांतील तिचें लडिवाळ कन्या-स्वरूप, अुत्तरकाशीकडील चीड-देवदार वृक्षांच्या काव्यमय प्रदेशांतील तिचें मुग्धा-स्वरूप, देवप्रयागच्या पहाडी आणि अरुंद प्रदेशांत चमकदार अलकनंदेबरोबर चाललेली तिची क्रीडा, लक्ष्मणझूल्याच्या कराल दाढांतून सुटका झाल्यानंतर हरद्वाराजवळ तिचा अनेक धारांनीं चाललेला स्वच्छंद विहार, कानपूरला घासून जाणारा तिचा अितिहास-प्रसिद्ध प्रवाह, प्रयागच्या विशाल पटावर तिचा कालिंदीसमवेत त्रिवेणीसंगम-प्रत्येकाच्या शोभेचें म्हणून अेक वेगळेंपण आहे, वैशिष्टय आहे.

अेक दृश्य पाहून दुसऱ्याची कल्पना येणें शक्य नाहीं. प्रत्येकाचें सौंदर्य वेगळें, प्रत्येकाचा भाव वेगळा, प्रत्येकाचें वातावरण वेगळें, प्रत्येकाचें माहात्म्य वेगळें.

— ३ —

प्रयागच्या पुढें गंगा वेगळेंच स्वरूप धारण करते. गंगोत्रीपासून प्रयाग पर्यन्तचा गंगेचा प्रवाह वर्धमान असला तरी त्याला अेकजिनसी म्हणतां येअील. पण प्रयाग जवळ तिला यमुना येअून मिळते. पहिल्यापासूनच यमुना दुहेरी हाडाची. खेळते, नाचते, पण अल्लड वाटत नाहीं. गंगा शकुंतलेसारखी तपस्वी कन्यका वाटते, तर काळी यमुना द्रौपदीप्रमाणें मानिनी राजकन्या दिसते. शर्मिष्ठा आणि देवयानी यांची गोष्ट आपण अैकतों तेव्हांसुद्धा प्रयागजवळील गंगा आणि यमुना यांचे मोठ्या कष्टानें मिसळणारे शुक्ल-कृष्ण प्रवाह आठवतात. हिंदुस्थानांत असंख्य नद्या आहेत आणि म्हणूनच संगमांनाहि तोटा नाहीं. आपल्या पूर्वजांनीं या सर्व संगमांत गंगायमुनांचा हा संयोग सर्वांत अधिक श्रेष्ठ मानला, पसंत केला आहे आणि म्हणूनच त्याला प्रयागराज हें गौरवपूर्ण नांव देण्यांत आलें आहे. मुसलमानांच्या आगमनानंतर जसें हिंदुस्थानच्या अितिहासाचें रूप पालटलें, त्याचप्रमाणें दिल्ली–आग्रा व मथुरा–वृन्दावन यांच्या सहवासांतून येणाऱ्या यमुनेच्या प्रवाहामुळें गंगेचें स्वरूपहि पार बदलून गेलें आहे.

प्रयागानंतर गंगा कुलवधूप्रमाणें गंभीर व सौभाग्यवती दिसूं लागते. यापुढें तिला मोठमोठ्या नद्या मिळत जातात. यमुनेचें पाणी मथुरा वृन्दावनांतील कृष्णाच्या आठवणी अर्पण करते, तर अयोध्येहून येणारी शरयू आदर्श राजा रामचंद्राच्या प्रतापी पण करुण जीवनाच्या स्मृति घेअून येते. दक्षिणेकडून येणारी चंबल रंतिदेवाच्या यज्ञयागाच्या गोष्टी सांगते, तर महान् कोलाहल करीत येणारा शोणभद्र गज–ग्राहाच्या दारुण संग्रामाची व राजेन्द्रमोक्षाची आठवण करून देतो. याप्रमाणें पुष्ट होत गेलेली गंगा पाटलीपुत्राजवळ मगध साम्राज्या-प्रमाणें विस्तीर्ण बनते. तरीदेखील गंडकी आपली अमूल्य खंडणी घेअून येण्यास मागेंपुढें पाहात नाहींच. जनक आणि अशोक, बुद्ध आणि महावीर यांच्या प्राचीन भूमींतून पुढें निघतांना गंगा जणूं ‘ आतां कोठें जावें ’ अशा विचारांत पडलेली दिसते. अेवढा प्रचंड जलसंचय आपल्या अदम्य अमोघ वेगानें

पूर्वेकडे मुसंडी मारीत असतां त्याला दक्षिणेकडे वळवणें काय सोपी गोष्ट आहे ? तरीपण तो तसा वळला आहे. दोन सम्राट किंवा जगद्गुरु जसे अेकदम् अेकमेकांना भेटत नाहींत, तसाच कांहींसा प्रकार गंगा व ब्रह्मपुत्रा यांच्या बाबतींत झालेला दिसतो. ब्रह्मपुत्रा हिमालयाच्या पलीकडील सर्व पाणी घेअून आसामांतून पश्चिमेकडे येते आणि गंगा या बाजूनें पूर्वेकडे धांव घेते. त्यांची समोरासमोर भेट कशी व्हावी ? कोणकोणापुढें प्रथम नमणार किंवा कोण कुणाला वाट करून देणार ? शेवटीं अुभयतांनीं ठरवलें कीं प्रत्येकीनें दाक्षिण्य धारण करून सरित्पतीच्या दर्शनास जावें आणि भक्तिनम्र होअून जातां जातां जमेल त्या ठिकाणीं रस्त्यांत अेकमेकींची भेट घ्यावी.

याप्रमाणें गोआलंदोजवळ जेव्हां गंगा आणि ब्रह्मपुत्रा यांचे विशाल प्रवाह अेक होतात तेव्हां समुद्र याहून वेगळा असूं शकेल काय अशी शंका येअूं लागते. विजय संपादन केल्यानंतर शिस्तींत तयार झालेली सेनासुद्धां ज्याप्रमाणें विस्कळीत होते आणि विजयी वीर मनांत येअील तसे वागूं लागतात, तसेंच यापुढें या महान् नद्यांचेंहि झालें आहे. अनेक मुखांनीं त्या सागराला जाअून मिळतात. प्रत्येक प्रवाहाचें नांव निराळें. आणि कांहीं प्रवाहांना तर अेकापेक्षां अधिक नांवें आहेत. गंगा व ब्रह्मपुत्रा अेक होअून ‘ पद्मा ’ हें नांव धारण करतात आणि पुढें गेल्यावर तीच नदी ‘ मेघना ’ या नांवानें ओळखली जाते.

ही अनेकमुखी गंगा शेवटीं जाते कुठें ? सुंदरवनांत वेतांची बेटें अुगवायला कीं सगरपुत्रांच्या वासना तृप्त करून त्यांचा अुद्धार करायला ? आज जाअून बघाल तर जुन्या काऱ्यापैकीं कांहीं सुद्धां येथें शिल्लक राहिलेलें आढळणार नाहीं. जिकडे पहावें तिकडे तागाचीं सणाची पोतीं बनवणाऱ्या गिरण्या आणि असेच दुसरे ओंगळ कारखाने ! जेथून पूर्वीं भारतीय कलाकौशल्याच्या असंख्य वस्तु भारतीय जहाजांतून लंका किंवा जावा द्वीपापर्यंत जात, त्याच रस्त्यानें आज विलायती व जपानी आगबोटी परदेशी कारखान्यांत तयार झालेला तकलादी माल हिन्दुस्थानांतील बाजारांत विकण्याकरितां घेअून येतांना दिसतात. गंगामाअी पूर्वीप्रमाणेंच सर्व प्रकारची समृद्धि अर्पण करीत आहे; पण आपले दुबळे हात ती पेलूं शकत नाहीं.

गंगामाऔी, अजून कोठवर हें असलें दृश्य पाहाण्याचें तुझ्या नशिबीं आहे?

फेब्रुवारी १९२६

# : ६ : यमुनाराणी

हिमालय म्हणजे भव्यतेचें भांडार! जिकडे तिकडे भव्यता विखरून देअून भव्यतेची भव्यता कमी करणें हाच जणूं हिमालयाचा व्यवसाय आहे. तरीसुद्धां अशा हिमालयांत अेक स्थान असें आहे कीं ज्याची अूर्जस्विता हिमालयांत राहाणाऱ्यांच्याहि डोळ्यांत भरते. तें म्हणजे यमराजाच्या बहिणीचें अुगमस्थान यमनोत्री.

अुंचावरून बर्फ वितळून मोठा धबधबा खालीं पडत आहे. आसपास गगनचुंबी नव्हे, तर गगनभेदी महावृक्ष आडवे पडून कुजत आहेत. अुत्तुंग पहाड यमदूतांप्रमाणें रक्षण करण्यास दोहों बाजूनें अुभे आहेत; घटकेंत पाणी थिजून त्याचें बर्फ बनत आहे; तर घटकेंत बर्फ वितळून त्याचें बर्फाअितकेंच थंडगार पाणी होत आहे. अशा ठिकाणीं जमिनींतून अद्‌भुत प्रकारें अुकळतें पाणी वर अुफाळून येतें बाष्प यंत्रांतून क्रुद्ध झालेली वाफ बाहेर पडावी तसा आवाज जमिनींतून निघतो. आणि झऱ्यांतून पुरुषभर अुंच अुडणारे तुषार अशा थंडींतहि माणसाला भाजून काढतात. अशा लोकविलक्षण स्थानीं असित अृषीनें यमुनेचें मूळ शोधून काढलें. या ठिकाणीं यमुनेच्या प्रवाहांत स्नान करणें अशक्यप्रायच आहे. थंडगार पाण्यांत स्नान करावें, तर कायमचे थंडगार पडण्याची पाळी यायची. आणि गरम पाण्यांत आंघोळ करावी तेथेंच बटाट्याप्रमाणें अुकडून निघण्याची भीति. अेवढ्यासाठींच तेथें मिश्र पाण्याचीं कुंडें तयार केलीं आहेत. अेका झऱ्यावर अेक गुंफा आहे. तींत लाकडाच्या फळ्या टाकून झोपतां येते. मात्र रात्रभर मधून मधून कूस बदलत राहिले पाहिजे. कारण वरची थंडी आणि खालची अुष्णता दोन्ही असह्य आहेत.

दोघी बहिणींत गंगेपेक्षां यमुना मोठी आहे, प्रौढ आहे, गंभीर आहे; कृष्णभगिनी द्रौपदीप्रमाणेंच कृष्णवर्णा व मानिनी आहे; गंगा जणूं काय गरीब बिचारी मुग्ध शकुंतलाच, पण देवाधिदेव महादेवांनीं तिचा स्वीकार केला म्हणून यमुनेनें आपलें मोठेंपण विसरून जाऊन गंगेलाच वडीलकीचा मान अर्पण केला आहे. या दोघी बहिणी अेकमेकींना भेटण्यासाठीं अगदीं आतुर झाल्यासारख्या दिसतात. हिमालयांत अेका ठिकाणीं तर त्या अेकमेकींच्या फारच जवळ येतात. पण मत्सरी दंडालपर्वत अेखाद्या विघ्नसंतोष्यासारखा मधेंच आडवा येअून पडल्यामुळें तेथें त्यांचें मीलन होत नाहीं. अेक कवि-हृदय ऋषि येथें यमुनेच्या कांठीं राहून रोज गंगेंत स्नानाला जाअी. पण पुन्हा जेवत असे यमुनेच्या घरीं येअून. तो म्हातारा झाला (ऋषीसुद्धां शेवटीं म्हातारे होतात) तेव्हां त्याच्या थकलेल्या पायांची दया येअून गंगेनें आपला प्रतिनिधि म्हणून अेक लहानसा पांढुरका झरा यमुनेच्या कांठीं ऋषीच्या आश्रमापाशीं पाठवून दिला. आजहि तो लहानसा प्रवाह त्या ऋषीचें स्मरण करीत वाहात आहे.

डेहराडून जवळहि आपल्याला आशा वाटते कीं आतां तरी या दोन नद्या अेकमेकींस मिळतील. पण छे, आपल्या शैत्य-पावनत्वानें संपूर्ण अंतर्वेदीचा प्रदेश पुनीत करून सोडण्याचें कर्तव्य पार पाडल्यावांचून अेकमेकींना भेटून रिकामपणच्या शिळोप्याच्या गोष्टी बोलण्याचें त्यांना सुचावें तरी कसें ? गंगा तर अुत्तर काशी, टेहरी, हरद्वार, कनोज, ब्रह्मावर्त, कानपूर वगैरे पुराण व अितिहासप्रसिद्ध स्थळांना स्तन्यदान करीत धावत असते; अिकडे यमुना कुरुक्षेत्र आणि पानीपतचा हिंसक भूप्रदेश न्याहाळीत भारताच्या राजधानीपाशीं येअून पोहोंचते. यमुनेच्या पाण्यांत साम्राज्याची शक्ति असली पाहिजे. पांडवांपासून तों थेट मोगल साम्राज्यापर्यन्तचा आणि बंडाच्या काळापासून तों अगदीं स्वामी श्रद्धानंदजींच्या खुनापर्यन्तचा सारा अितिहास तिच्या स्मरण-संग्रहालयांत सांठवलेला आहे. दिल्लीपासून आग्र्यापर्यन्त बाबराचे वंशज आपल्याशीं वार्तालाप करूं अिच्छित आहेत असा भास होतो. दोन्ही नगरांचे किल्ले साम्राज्याच्या रक्षणासाठीं नव्हे, तर यमुनेची शोभा पाहाण्यासाठींच बांधले असावेत असें वाटतें. मोगल साम्राज्याचे नगारे आतां शांत झाले, पण मथुरा-वृन्दावनांतली मुरली मात्र अजून वाजत आहे.

मथुरावृन्दावनाची शोभा कांहीं आगळीच आहे. हा प्रदेश जितका

रमणीय तितकाच समृद्धहि आहे. हरियाणीच्या गायी आपल्या रसमधुर, सकस दुधाविषयीं साऱ्या हिन्दुस्थानांत विख्यात आहेत. यशोदामाता किंवा गोपराज नंद यांनीं स्वतः हें स्थान पसंत केलें होतें, ही गोष्ट जणूं काय अिथली भूमि विसरूंच शकत नाहीं. मथुरा-वृन्दावन म्हणजे बाळकृष्णाची क्रीडाभूमि, वीर कृष्णाची विक्रमभूमि. अेक द्वारकावास सोडला तर श्रीकृष्णाच्या जीवनाशीं जास्तीत जास्त सहकार कालिंदीनेंच केला आहे. ज्या यमुनेनें कालियामर्दन पाहिलें त्याच यमुनेनें कंसाचा शिरच्छेद बघितला. ज्या यमुनेनें हस्तिनापुराच्या दरबारांत श्रीकृष्णाची शिष्टाअी अैकली, त्याच यमुनेनें युद्धकुशल श्रीकृष्णाची योगमूर्ति कुरुक्षेत्रावर संचार करीत असतांना डोळे भरून बघितली. ज्या यमुनेनें वृन्दावनांतील प्रणयबांसरींत आपला कलरव मिसळला, त्याच यमुनेनें कुरुक्षेत्रावर रोमहर्षण गीतावाणीचा पडसाद अुमटवला. यमराजाच्या भगिनीचें बंधुत्व श्रीकृष्णालाच शोभतें.

भारतवर्षांतील क्षत्रियकुळांचा संहार जिनें अनेक वेळां अुघड्या डोळयांनीं बघितला, त्या यमुनेला पारिजातकाच्या फुलाप्रमाणें सुकुमार अशा ताजबीबीचा मृत्यु कितीसा मर्मभेदक वाटणार ? पण तरीसुद्धां प्रेमसम्राट शहाजहानच्या थिजलेल्या अश्रूंना प्रतिबिंबित करण्याचें काम तिनें आपल्या अंगावर घेतलें आहे.

भारतकाळीं विख्यात झालेल्या चर्मण्वती नदीचा करभार घेअून यमुना पुढें निघते तोंच चिमुकली सिंधु नदी मध्ययुगीन अितिहासाचें ओझरतें दर्शन घडवीत पुढें येअून अुभी राहाते.

आतां यमुना अधीर झाली आहे. कितीतरी दिवस झाले, गंगाताअीचें दर्शन नाहीं. सांगावयाच्या गोष्टी पोटांत मावत नाहींत. विचारायचे प्रश्न मनांत किती गोळा झाले आहेत त्याला कांहीं सुमारच नाहीं. कानपूर आणि काल्पी कांहीं फारशी दूर नाहींत. येथें गंगेची खुशाली कळली या आनंदाच्या भरांत तोंडांत साखर टाकून यमुना जी धावत सुटली ती थेट प्रयागराजला अेकदम गंगेच्या गळयाला जाअून बिलगली. काय तो दोघींचा अुन्माद ! भेट झाली तरी आपण भेटलों हें त्यांना जणूं खरेंच वाटेना ! भारतवर्षांतील अेकूण अेक साधुसंत हा प्रेमसंगम पाहाण्यासाठीं गोळा झाले आहेत. पण या बहिणींना त्याचें भानच नाहीं. अंगणांत अक्षयवट अुभा आहे त्याची त्यांना पर्वा नाहीं. वृद्ध अकबर छावणी टाकून बसला आहे त्याला पुसतो कोण ?

दोघी बहिणींत गंगेपेक्षां यमुना मोठी आहे, प्रौढ आहे, गंभीर आहे; कृष्णभगिनी द्रौपदीप्रमाणेंच कृष्णवर्णा व मानिनी आहे; गंगा जणूं काय गरीब विचारी मुग्ध शकुंतलाच, पण देवाधिदेव महादेवांनीं तिचा स्वीकार केला म्हणून यमुनेनें आपलें मोठेंपण विसरून जाअून गंगेलाच वडीलकीचा मान अर्पण केला आहे. या दोघी बहिणी अेकमेकींना भेटण्यासाठीं अगदीं आतुर झाल्यासारख्या दिसतात. हिमालयांत अेका ठिकाणीं तर त्या अेकमेकींच्या फारच जवळ येतात. पण मत्सरी दंडालपर्वत अेखाद्या विघ्नसंतोष्यासारखा मधेंच आडवा येअून पडल्यामुळें तेथें त्यांचें मीलन होत नाहीं. अेक कवि-हृदय अृषि येथें यमुनेच्या कांठीं राहून रोज गंगेंत स्नानाला जाअी. पण पुन्हा जेवत असे यमुनेच्या घरीं येअून. तो म्हातारा झाला (अृषीसुद्धां शेवटीं म्हातारे होतात) तेव्हां त्याच्या थकलेल्या पायांची दया येअून गंगेनें आपला प्रतिनिधि म्हणून अेक लहानसा पांढुरका झरा यमुनेच्या कांठीं अृषीच्या आश्रमापाशीं पाठवून दिला. आजहि तो लहानसा प्रवाह त्या अृषींचें स्मरण करीत वाहात आहे.

डेहराडून जवळहि आपल्याला आशा वाटते कीं आतां तरी या दोन नद्या अेकमेकींस मिळतील. पण छे, आपल्या शैत्य-पावनत्वानें संपूर्ण अंतर्वेदीचा प्रदेश पुनीत करून सोडण्याचें कर्तव्य पार पाडल्यावांचून अेकमेकींना भेटून रिकामपणच्या शिळोप्याच्या गोष्टी बोलण्याचें त्यांना सुचावें तरी कसें ? गंगा तर अुत्तर काशी, टेहरी, हरद्वार, कनोज, ब्रह्मावर्त, कानपूर वगैरे पुराण व अितिहासप्रसिद्ध स्थळांना स्तन्यदान करीत धावत असते; अिकडे यमुना कुरुक्षेत्र आणि पानीपतचा हिंसक भूप्रदेश न्याहाळीत भारताच्या राजधानीपाशीं येअून पोहोंचते. यमुनेच्या पाण्यांत साम्राज्याची शक्ति असली पाहिजे. पांडवांपासून तों थेट मोगल साम्राज्यापर्यन्तचा आणि बंडाच्या काळापासून तों अगदीं स्वामी श्रद्धानंदजींच्या खुनापर्यन्तचा सारा अितिहास तिच्या स्मरण-संग्रहालयांत सांठवलेला आहे. दिल्लीपासून आग्र्यापर्यन्त बाबराचे वंशज आपल्याशीं वार्तालाप करूं अिच्छित आहेत असा भास होतो. दोन्ही नगरांचे किल्ले साम्राज्याच्या रक्षणासाठीं नव्हे, तर यमुनेची शोभा पाहाण्यासाठींच बांधले असावेत असें वाटतें. मोगल साम्राज्याचे नगारे आतां शांत झाले, पण मथुरा-वृन्दावनांतली मुरली मात्र अजून वाजत आहे.

मथुरावृन्दावनाची शोभा कांहीं आगळीच आहे. हा प्रदेश जितका

रमणीय तितकाच समृद्धहि आहे. हरियाणीच्या गायी आपल्या रसमधुर, सकस दुधाविषयीं साऱ्या हिन्दुस्थानांत विख्यात आहेत. यशोदामाता किंवा गोपराज नंद यांनीं स्वतः हें स्थान पसंत केलें होतें, ही गोष्ट जणूं काय अिथली भूमि विसरूंच शकत नाहीं. मथुरा-वृन्दावन म्हणजे बाळकृष्णाची क्रीडाभूमि, वीर कृष्णाची विक्रमभूमि. अेक द्वारकावास सोडला तर श्रीकृष्णाच्या जीवनाशीं जास्तीत जास्त सहकार कालिंदीनेंच केला आहे. ज्या यमुनेनें कालियामर्दन पाहिलें त्याच यमुनेनें कंसाचा शिरच्छेद बघितला. ज्या यमुनेनें हस्तिनापुराच्या दरबारांत श्रीकृष्णाची शिष्टाअी अैकली, त्याच यमुनेनें युद्धकुशल श्रीकृष्णाची योगमूर्ति कुरुक्षेत्रावर संचार करीत असतांना डोळे भरून बघितली. ज्या यमुनेनें वृन्दावनांतील प्रणयबांसरींत आपला कलरव मिसळला, त्याच यमुनेनें कुरुक्षेत्रावर रोमहर्षण गीतावाणीचा पडसाद अुमटवला. यमराजाच्या भगिनीचें बंधुत्व श्रीकृष्णालाच शोभते.

भारतवर्षांतील क्षत्रियकुळांचा संहार जिनें अनेक वेळां अुघड्या डोळयांनीं बघितला, त्या यमुनेला पारिजातकाच्या फुलाप्रमाणें सुकुमार अशा ताजबीबीचा मृत्यु कितीसा मर्मभेदक वाटणार ? पण तरीसुद्धां प्रेमसम्राट शहाजहानच्या थिजलेल्या अश्रूंना प्रतिबिंबित करण्याचें काम तिनें आपल्या अंगावर घेतलें आहे.

भारतकाळीं विख्यात झालेल्या चर्मण्वती नदीचा करभार घेअून यमुना पुढें निघते तोंच चिमुकली सिंधु नदी मध्ययुगीन अितिहासाचें ओझरतें दर्शन घडवीत पुढें येअून अुभी राहाते.

आतां यमुना अधीर झाली आहे. कितीतरी दिवस झाले, गंगाताअीचें दर्शन नाहीं. सांगावयाच्या गोष्टी पोटांत मावत नाहींत. विचारायचे प्रश्न मनांत किती गोळा झाले आहेत त्याला कांहीं सुमारच नाहीं. कानपूर आणि काल्पी कांहीं फारशी दूर नाहींत. येथें गंगेची खुशाली कळली या आनंदाच्या भरांत तोंडांत साखर टाकून यमुना जी धावत सुटली ती थेट प्रयागराजला अेकदम गंगेच्या गळयाला जाअून बिलगली. काय तो दोघींचा अुन्माद ! भेट झाली तरी आपण भेटलों हें त्यांना जणूं खरेंच वाटेना ! भारतवर्षांतील अेकूण अेक साधुसंत हा प्रेमसंगम पाहाण्यासाठीं गोळा झाले आहेत. पण या बहिणींना त्याचें भानच नाहीं. अंगणांत अक्षयवट अुभा आहे त्याची त्यांना पर्वा नाहीं. वृद्ध अकबर छावणी टाकून बसला आहे त्याला पुसतो कोण ?

आणि अशोकचा शिलास्तंभ तेथें आणून उभा केला तरी या बहिणी थोड्याच त्याच्याकडे ढुंकून पहाणार आहेत ?

प्रेमाचा प्रवाह अखंड वाहातच आहे आणि त्याला साथ देत कविसम्राट कालिदासाची सरस्वती अखंड स्रवत आहे—

**क्वचित् प्रभा-लेपिभिर् अिन्द्रनीलैर्**
**मुक्तामयी यष्टिम् अिवानुविद्धा।**
**अन्यत्र माला सितपंकजानाम् अिन्दीवरैर् अुत्खचितान्तरेव॥**
**क्वचित् खगानां प्रियमानसानां कादंबसंसर्गवतीव पंक्तिः।**
**अन्यत्र कालागरुदत्तपत्रा भक्तिर् भुवश् चन्दनकल्पितेव॥**
**क्वचित् प्रभा चांद्रमसी तमोभिश् छायाविलीनैः शबलीकृतेव।**
**अन्यत्र शुभ्रा शरद्अभ्रलेखा-रन्ध्रेष्विवालक्ष्यनभःप्रदेशा॥**
**क्वचित् च कृष्णोरगभूषणेव भस्मांगरागा तनुर् अीश्वरस्य।**
**पश्यानवद्यांगि! विभाति गंगा भिन्नप्रवाहा यमुनातरंगैः॥**

[ हे निर्दोषतनु सीते! या गंगेच्या प्रवाहांत यमुनेचे तरंग घुसून त्याला खंडित करीत आहेत, तें दृश्य कसें दिसत आहे पाहा. कोठें कोठें असा भास होतो कीं मोत्याच्या माळेंत ओंवलेले अिन्द्रनीलमणी मोत्यांच्या प्रभेला झांकळून टाकीत आहेत. कोठें असें भासतें कीं श्वेतकमलांच्या हारांत नील-कमलांची गुंफण केली आहे. कोठें मानस-सरोवराकडे जाणाऱ्या शुभ्र हंसांबरोबर काळे कादंब पक्षी अुडत आहे तसें वाटतें, तर कोठें शुभ्र चंदनानें सारवलेल्या भूमीवर कृष्णागरूचीं चित्रें काढलीं आहेत असें दिसतें. कोठें असें वाटतें कीं चंद्राच्या प्रभेबरोबर छायेंत पहुडलेल्या अंधकाराची क्रीडा चालू आहे. तर कोठें जणूं शरद्अृतूंतील शुभ्र मेघांच्या फटींतून आकाश थोडे थोडें दिसत आहे आणि कोठें असें दिसतें कीं जणूं काय महादेवाच्या भस्मचर्चित देहावर कृष्ण सर्पांचीं आभूषणें चढवलीं गेलीं आहेत. ]

किती सुंदर देखावा! वर पुष्पक विमानांत मेघश्याम रामचंद्र आणि धवल-शीला जानकी चौदा वर्षांच्या दीर्घ विरहानंतर अयोध्येस पोहोंचण्यास आतुर झालीं आहेत आणि खालीं अिन्द्रीवरश्यामा कालिन्दी व सुधाजला जाह्नवी अेकमेकींचा परिरंभ न मोडतां, आलिंगन ढिलें न होअूं देतां नामरूपाचा त्याग करून सागरांत विलीन होण्यासाठीं धावत आहेत.

हें दृश्य पाहून स्वर्गांतून पुष्पवृष्टि झाली असेल आणि भूतलावर कवींच्या प्रतिभासृष्टींची कारंजीं थुअी थुअी नाचूं लागलीं असतील.

सप्टेंबर १९२९

# : ७ : मूळ त्रिवेणी

ब्रह्मा विष्णु महेश हे तिघे मिळून जसा दत्तात्रेय होतो, तसेंच अलकनंदा, मंदाकिनी आणि भागीरथी मिळून गंगामैया बनते. या तिघी गंगेच्या मैत्रिणी नव्हत, तर गंगेचीं अंगें आहेत. केवळ भागीरथीच गंगोत्रीहून येत असली म्हणून काय झालें ? मंदाकिनीचा केदारनाथ आणि अलकनंदेचा बदरीनारायण यांचीहि गंगेच्या अुगमांतच गणना झाली पाहिजे.

ब्रह्मकपालाच्या बाजूनें जी अलकनंदा वाहाते तेथें अेकदां श्राद्ध केल्यानें झाडून साऱ्या पूर्वजांना अेकदमच कायमची मुक्ति मिळते, त्या अलकनंदेचें अुगमस्थान काय गंगोत्रीपेक्षां कमी पवित्र मानावें ? ब्रह्मकपालावर अेकदां श्राद्ध केलें कीं मग माणसानें फिरून कधींहि श्राद्ध करतां कामा नये. जर यदाकदाचित् मोहानें तो करील तर अुलट पितर अधोगतीला जातील. केवढें जागृत स्थान !

बदरीनारायणाच्या गरम कुंडांतील पाणी घेअून अलकनंदा येते, तर मंदाकिनी गौरीकुंडांतील अुष्ण पाण्यानें कांहीं वेळ कवोष्ण बनते. केदारनाथाचें मंदिर आपल्या बांधणीमुळें अितर मंदिरांहून कांहीं वेगळेंच अुठून दिसतें. आंतलें शिवलिंग देखील स्वयंभू, आकृतिहीन आहे. तें अितकें अुंच आहे कीं मनुष्य त्यावर पडून त्याला हृदयस्पर्श करूं शकतो. ही मंदिरें जितकीं वैशिष्ट्यपूर्ण आहेत तितकीच मंदाकिनी देखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. येथले दगड वेगळे, येथला प्रवाह वेगळा आणि येथला आंघोळीचा आनंदहि कांहीं न्याराच.

पण कांहीं झालें तरी गंगोत्री ती गंगोत्रीच. या तीनहि प्रवाहांत भागीरथीचा प्रवाह अधिक वन्य आणि मुग्ध दिसतो. गंगेंत हे तीनच प्रवाह आहेत असें नाहीं; नीलगंगा आहे, ब्रह्मगंगा आहे, कितीतरी गंगा आहेत. हिमालयांतून

निघणारे सगळेच प्रवाह गंगा नाहींत का? ज्यांचें ज्यांचें पाणी हरिद्वाराजवळ हरिचरणाला स्पर्श करते ते सगळे प्रवाह गंगाच होत. वाल्मीकीनें सुद्धां जेव्हां गंगेला आकाशांतून हिमालयाच्या शिखररूपी महादेवाच्या जटा-संभारावर पडतांना व तेथून अनेक धारांनीं निघतांना पाहिलें, तेव्हां त्याच्या आर्ष दृष्टीनें सात वेगवेगळे प्रवाह मोजले होते.

**तस्यां विसृज्यमानायां सप्त स्रोतांसि जज्ञिरे।**
**ह्लादिनी, पावनी चैव, नलिनी च, तथैवच ॥**
**सुचक्षुश्चैव, सीता च, सिन्धुश्चैव, महानदी।**
**सप्तमी चान्वगात् तासां भगीरथ-रथं तदा ॥**

१९३४

# : ८ : जीवनतीर्थ हरद्वार

त्रिपथगा गंगेचे तीन अवतार आहेत. गंगोत्री अथवा गोमुखापासून ते हरद्वारपर्यन्तची गंगा हा तिचा पहिला अवतार. हरद्वारपासून प्रयाग-राजपर्यन्तची गंगा हा तिचा दुसरा अवतार. पहिल्या अवतारांत पहाडांच्या बंधनांतून—शिवाच्या जटेंतून—मुक्त होण्यासाठीं ती धडपडत असते. दुसऱ्या अवतारांत आपली मैत्रीण यमुना आपल्याला केव्हां अेकदां भेटते असें तिला झालेलें असतें. प्रयागराजनंतर गंगा यमुनेला भेटून आपल्या विशाल प्रवाहासह सरित्पति सागरांत विलीन होण्यासाठीं अगदीं आतुर होते तो तिचा तिसरा अवतार. गंगोत्री, हरद्वार, प्रयाग आणि गंगासागर हीं गंगापुत्र आर्यांचीं मोठ्यांत मोठीं तीर्थस्थानें होत. जसजसें वर जावें, तसतसें तीर्थाचें माहात्म्य अधिक असें मानलें जातें. अेका दृष्टीनें तें खरेंहि आहे. पण माझ्या दृष्टीनें भारतीयांसाठीं सर्वांत आकर्षक स्थान जर कोणतें असेल तर तें हरद्वारच होय. हरद्वारांतहि पांच तीर्थें प्रसिद्ध आहेत. प्रत्येकाच्या माहात्म्याचें पुराणकारांनीं श्रद्धापूर्वक रसभरीत वर्णन केलें आहे. पण हें सारें महत्त्व ठाअूक नसून देखील मनुष्य सांगूं शकेल कीं 'हरिकी पायरी' मधेंच

गंगेचें माहात्म्य म्हणायचें असेल तर माहात्म्य आणि काव्य म्हणायचें असेल तर काव्य सर्वांत अधिक दिसून येतें.

तसें पाहिलें तर प्रत्येक नदीच्या लांबींत कोठें ना कोठें काव्यमय भूमिभाग हा असतोच. गंगेच्या कांठावर हरद्वारापेक्षां अधिक सुंदर स्थान दुसरें असणारच नाहीं असा माझ्या सांगण्याचा आशय नाहीं. हरिकी पायरीच्या आसपास काशी बनारसच्या शोभेचा शंभरावा भाग देखील सांपडणार नाहीं. तरीसुद्धां येथें निसर्ग आणि मानव यांनीं अेकमेकांचे वैरी न बनतां, अेकमेकांच्या सहकार्यानें गंगेच्या शोभेंत भर टाकण्याचें काम केलें आहे. गंगेचा तो साधा, स्वच्छ प्रवाह, मंदिराजवळचा तो धावता घाट, घाटाच्या तळाचा लहानसा वाकडातिकडा डोह. या बाजूस हजारो लोक आरामांत बसूं शकतील असा पट-सदृश घाट. आणि पलीकडे लहानशा बेटाची अुणीव भरून काढील असा जमीनीचा तुकडा आणि दोन्ही बाजूस जोडणारा जुना पूल. हें सारेंच काव्यमय आहे. कांठावरील मंदिरें आणि धर्मशाळांचे साधेसुदे कळस यांपैकीं अेकहि गंगेवर जडलेलें आपलें ध्यान स्वतःकडे आकर्षून घेत नाहीं आणि तरीही ते सर्व गंगेच्या शोभेला साजतील असेच आहेत. बनारसच्या बाजारांत थपकल मारून बसणारे आळशी पोळ वेगळे आणि शांतपणें रवंथ करणारे येथले पोळ वेगळे. येथें गंगेंत कोठेंहि नांवालादेखील चिखल सांपडणार नाहीं. अनंतकाळापासून अेकमेकांवर आपटून घासून गरगरीत गोल बनलेले पांढरे दगड सर्वत्र पाहून घ्यावे.

हरिकी पायरीच्या बाजूच्या सर्वांत आकर्षक वस्तूकडे आपलें ध्यान जात नाहीं. आपण तिचा केवळ प्रभाव अनुभवतों ती वस्तु म्हणजे येथली हवा. हिमालयाच्या दूरदूरच्या हिमाच्छादित शिखरांवरून दक्षिणेकडे वाहात येणारा वारा सर्वप्रथम अिथल्या मनुष्यवस्तीलाच स्पर्श करतो. अितका पावन पवन अन्यत्र कसा मिळणार ? हरिकी पायरीजवळील पुलावर अुभें राहिलें कीं फुफ्फुसें आणि हृदय केवळ आह्लादानें भरून जातात. अुन्मादकारी नव्हे, पण प्राणदायी आणि तरीहि प्रशम-कारी.

जितक्या वेळा म्हणून मी येथें आलों तितक्यांदा तीच ती पूर्वींची शांति, तोच तो पूर्वींचा आह्लाद आणि तीच ती पूर्वींची स्फूर्ति मीं अनुभवली आहे. मुंबअीच्या चौपाटीबरोबर कांहीं लोक या घाटाची तुलना करतात. आत्यंतिक

विरोधाचें सादृश्य या दोघांत आहे खरें! येथें यात्रेकरू माशांना आहार देतात, तर तेथें कोळीलोक आहारासाठीं माशांना पकडतात.

हरिकी पायरी बघायला जायचें असेल तर संध्याकाळीं सूर्यास्तानंतरच जावें. चांदणें आहे किंवा नाहीं याचा विचार करण्याची आवश्यकता नाहीं. चांदणें असेल तेव्हां अेका प्रकारची शोभा पाहायला मिळेल, नसेल तेव्हां दुसऱ्या प्रकारची. या दोहोंत निवड करायला बसेल तो खरा कलाप्रेमीच नव्हे. संध्या-काशांत अेकामागून अेक तारे डोकाअूं लागले आहेत आणि खालून अेकामागून अेक पेट घेणारे दिवे त्यांना साद देत आहेत. या साऱ्या दृश्याची गूढ शांति मनावर कांहीं अद्भुत परिणाम करूं लागतें. तोंच टींग टांऽग, टींग टांऽग आवाज करीत मंदिरांतील घंटा आरतीसाठीं बोलावूं लागतात. या घंटानादाला जणूं अंतच नाहीं. टींग टांऽग, टींग टांऽग असा नाद चालूंच असतो आणि भक्तगण नानाप्रकारच्या आरत्या गातच असतो. पुरुष गातात, स्त्रिया गातात, ब्रह्मचारी गातात आणि संन्यासी देखील गातात; स्थानिक लोक गातात आणि भिन्नभिन्न प्रान्तांतून आलेले यात्रेकरूहि गातात. कुणी कुणाची पर्वा करीत नाहीं, कुणी कुणाचा संकोच बाळगीत नाहीं. प्रत्येकजण आपल्या भक्तिभावांत तल्लीन. सनातनी स्तोत्रें गातात, आर्यसमाजी अुपदेश करतात. शीख ग्रंथसाहेबांतील अेखाद्या 'महोल्ला'तून आसा-दि-वार ललकारत असतात. गोरक्षा प्रचारक तुम्हांला येथें समजावतात कीं जगांत पांढरा रंग आहे कारण गाअीचें दूध पांढरें आहे. गाअीच्या पोटांत तेहतीस कोटी देव आहेत. फक्त तेथें पोटापुरता चारा नाहीं कांहीं नास्तिक या जनसंमर्दाचा फायदा घेअून अीश्वर नसल्याचें सप्रमाण सिद्ध करून देतात आणि अुदार हिन्दूधर्म सद्भावपूर्वक हें सगळें चालूं देतो. गंगामाअीच्या वातावरणांत कुणाचाच तिरस्कार नाहीं, सर्वांचा स्वीकार सत्कार आहे भगवीं वस्त्रें चढवून स्वतः मुक्त असल्याचा आव आणणारे मुक्तिसेनेचे मिशनरी जर अुद्यां अुठून येथें हिन्दूधर्माच्या विरुद्ध प्रचार करूं लागले तर आपले यात्रेकरू त्यांचेंहि शांतपणें अैकून घेतील आणि म्हणतील अीश्वरानें जशी बुद्धि दिली तसा बिचारा बोलतोय; त्यांत त्याचा काय दोष?

हिंदु समाजांत अनेक दोष आहेत आणि त्या दोषांमुळें हिन्दु समाजानें सोसलेंहि बरच आहे. परंतु अुदारता, सहिष्णुता आणि सद्भाव हीं हिंदू समाजाचीं वैशिष्ट्यें दोषरूप खचितच नाहींत. अुदारतेमुळें हिंदु धर्माला पुष्कळ

४४४६२ ... ४६२ ... २१/३/०९

सहन करावें लागलें असें म्हणणारे लोक हिंदु धर्माच्या मुळावरच कुठाराघात करतात.

अजूनहि ती घंटा वाजत आहे आणि आरतीची वेळ अजून ओसरली नाहीं असें आळशी लोकांना सांगून मानव कुडीचें सार्थक करण्यासाठीं त्यांच्या विनवण्या करीत आहे.

आणि त्या बालिका जणूं काय आपल्या भाग्याची परीक्षा करीत असाव्यात त्याप्रमाणें, पळसाच्या पानांच्या मोठमोठ्या द्रोणांत फुलांमध्यें तुपाचे दिवे ठेअून त्यांना प्रवाहांत सोडून देत आहेत आणि ते द्रोणही लगेच होडीप्रमाणें डोलत डोलत, स्वतःमध्यें असलेल्या ज्योतीचें महत्त्व जणूं ओळखून असावेत तसे डोलत, जीवनाची यात्रा सुरूं करीत आहेत.

चालली! ती जीवनयात्रा निघाली! अेका मागोमाग अेक, अेका मागोमाग अेक, दिवे स्वतःचें भाग्य जीवन-प्रवाहांत सोडून देत आहेत. मनुष्य जीवनांत व्यक्तींचें जें होतें तेंच येथें दिव्यांचें देखील होतें. कुणी कुणी अभागी यात्रेच्या प्रारंभींच वाऱ्याला शरण जातात आणि चौफेर विषाद पसरवतात. कित्येक मोठी आशा दाखवून निराशा करतात. कांहीं सदाच्याच दुखणेकऱ्यांप्रमाणें टिमटिमत टिमटिमत दूरवर पोहोंचतात; कधीं कधीं दोन द्रोण जवळ जवळ येअून अेकमेकांना बिलगतात आणि मग हीं जोडहोडी दंपतीप्रमाणें दूरदूरचा प्रवास करते. त्यांना गोल गोल फिरतांना पाहून मनांत प्रकट होणारे भाव व्यक्त करणें कठीण आहे. कित्येकजण तर त्यांची जीवनज्योति मालवण्याच्या आधींच दृष्टिआड होतात. मृत्यु आणि अदृष्ट हे मनुष्यजीवनांतले अंतिम अध्याय आहेत. या दोघांपुढें कुणाचेंच कांहीं चालत नाहीं आणि म्हणूनच माणसाला अीश्वराचें स्मरण होतें. मरण नसतें तर कदाचित् स्मरणहि झालें नसतें.

हिंमत असेल तर असेच अेखाद्या दिवशीं पहांटे चार वाजतां अुठून या घाटावर येअून बसा. वेगळ्याच प्रकारचे भक्त तुम्हांला येथें आढळतील. तीन वाजल्यापासून सूर्योदय होअीपर्यंत विशिष्ट प्रकारचे लोकच येथें येणार. वाजिनीवती अुषा सूर्यनारायणाला जन्म देते आणि लगेच व्यवहारी दुनिया या घाटाचा कब्जा घेते. तसें होण्यापूर्वीच आपण येथून पाय काढलेला बरा. आकाशांतील तारेसुद्धां खुष होतील.

मार्च १९३६

विरोधाचें सादृश्य या दोघांत आहे खरें! येथें यात्रेकरू माशांना आहार देतात, तर तेथें कोळीलोक आहारासाठीं माशांना पकडतात.

हरिकी पायरी बघायला जायचें असेल तर संध्याकाळीं सूर्यास्तानंतरच जावें. चांदणें आहे किंवा नाहीं याचा विचार करण्याची आवश्यकता नाहीं. चांदणें असेल तेव्हां अेका प्रकारची शोभा पाहायला मिळेल, नसेल तेव्हां दुसऱ्या प्रकारची. या दोहोंत निवड करायला बसेल तो खरा कलाप्रेमीच नव्हे. संध्याकाशांत अेकामागून अेक तारे डोकावूं लागले आहेत आणि खालून अेकामागून अेक पेट घेणारे दिवे त्यांना साद देत आहेत. या साऱ्या दृश्याची गूढ शांति मनावर कांहीं अद्‌भुत परिणाम करूं लागतें. तोंच टींग टांऽग, टींग टांऽग आवाज करीत मंदिरांतील घंटा आरतीसाठीं बोलावूं लागतात. या घंटानादाला जणूं अंतच नाहीं. टींग टाऽग, टींग टांऽग असा नाद चालूंच असतो आणि भक्तगण नानाप्रकारच्या आरत्या गातच असतो. पुरुष गातात, स्त्रिया गातात, ब्रह्मचारी गातात आणि संन्यासी देखील गातात; स्थानिक लोक गातात आणि भिन्नभिन्न प्रान्तांतून आलेले यात्रेकरूहि गातात. कुणी कुणाची पर्वा करीत नाहीं, कुणी कुणाचा संकोच बाळगीत नाहीं. प्रत्येकजण आपल्या भक्तिभावांत तल्लीन. सनातनी स्तोत्रें गातात, आर्यसमाजी अुपदेश करतात. शीख ग्रंथसाहेबांतील अेखाद्या 'महोल्ला'तून आसा-दि-वार ललकारत असतात. गोरक्षा प्रचारक तुम्हांला येथें समजावतात कीं जगांत पांढरा रंग आहे कारण गाअीचें दूध पांढरें आहे. गाअीच्या पोटांत तेहतीस कोटी देव आहेत. फक्त तेथें पोटापुरता चारा नाहीं कांहीं नास्तिक या जनसंमर्दाचा फायदा घेअून अीश्वर नसल्याचें सप्रमाण सिद्ध करून देतात आणि अुदार हिन्दूधर्म सद्‌भावपूर्वक हें सगळें चालूं देतो. गंगामाअीच्या वातावरणांत कुणाचाच तिरस्कार नाहीं, सर्वांचा स्वीकार सत्कार आहे भगवीं वस्त्रें चढवून स्वतः मुक्त असल्याचा आव आणणारे मुक्तिसेनेचे मिशनरी जर अुद्यां अुठून येथें हिन्दूधर्माच्या विरुद्ध प्रचार करूं लागले तर आपले यात्रेकरू त्यांचेंहि शांतपणें अैकून घेतील आणि म्हणतील अीश्वरानें जशी बुद्धि दिली तसा बिचारा बोलतोय; त्यांत त्याचा काय दोष?

हिंदु समाजांत अनेक दोष आहेत आणि त्या दोषांमुळें हिन्दु समाजानें सोसलेंहि बरच आहे. परंतु अुदारता, सहिष्णुता आणि सद्‌भाव हीं हिंदू समाजाचीं वैशिष्ट्यें दोषरूप खचितच नाहींत. अुदारतेमुळें हिंदु धर्माला पुष्कळ

सहन करावें लागलें असें म्हणणारे लोक हिंदु धर्माच्या मुळावरच कुठाराघात करतात.

अजूनहि ती घंटा वाजत आहे आणि आरतीची वेळ अजून ओसरली नाहीं असें आळशी लोकांना सांगून मानव कुडीचें सार्थक करण्यासाठीं त्यांच्या विनवण्या करीत आहे.

आणि त्या बालिका जणूं काय आपल्या भाग्याची परीक्षा करीत असाव्यात त्याप्रमाणें, पळसाच्या पानांच्या मोठमोठ्या द्रोणांत फुलांमध्यें तुपाचे दिवे ठेवून त्यांना प्रवाहांत सोडून देत आहेत आणि ते द्रोणही लगेच होडीप्रमाणें डोलत डोलत, स्वतःमध्यें असलेल्या ज्योतीचें महत्त्व जणूं ओळखून असावेत तसे डोलत, जीवनाची यात्रा सुरूं करीत आहेत.

चालली! ती जीवनयात्रा निघाली! अेका मागोमाग अेक, अेका मागोमाग अेक, दिवे स्वतःचें भाग्य जीवन-प्रवाहांत सोडून देत आहेत. मनुष्य जीवनांत व्यक्तींचें जें होतें तेंच येथें दिव्यांचें देखील होतें. कुणी कुणी अभागी यात्रेच्या प्रारंभींच वाऱ्याला शरण जातात आणि चौफेर विषाद पसरवतात. कित्येक मोठी आशा दाखवून निराशा करतात. कांहीं सदाऱ्याच दुलणेकऱ्यांप्रमाणें टिमटिमत टिमटिमत दूरवर पोहोंचतात; कधीं कधीं दोन द्रोण जवळ जवळ येअून अेकमेकांना बिलगतात आणि मग ही जोडहोडी दंपतीप्रमाणें दूरदूरचा प्रवास करते. त्यांना गोल गोल फिरतांना पाहून मनांत प्रकट होणारे भाव व्यक्त करणें कठीण आहे. कित्येकजण तर त्यांची जीवनज्योति मालवण्याच्या आधींच दृष्टिआड होतात. मृत्यु आणि अदृष्ट हे मनुष्यजीवनांतले अंतिम अध्याय आहेत. या दोघांपुढें कुणाचेंच कांहीं चालत नाहीं आणि म्हणूनच माणसाला अीश्वराचें स्मरण होतें. मरण नसतें तर कदाचित् स्मरणहि झालें नसतें.

हिंमत असेल तर असेच अेखाद्या दिवशीं पहांटे चार वाजतां अुठून या घाटावर येअून बसा. वेगळयाच प्रकारचे भक्त तुम्हांला येथें आढळतील. तीन वाजल्यापासून सूर्योदय होअीपर्यंत विशिष्ट प्रकारचे लोकच येथें येणार. वाजिनीवती अुषा सूर्यनारायणाला जन्म देते आणि लगेच व्यवहारी दुनिया या घाटाचा कब्जा घेते. तसें होण्यापूर्वीच आपण येथून पाय काढलेला बरा. आकाशांतील तारेसुद्धां खुष होतील.

मार्च १९३६

# : ९ : दक्षिणगंगा गोदावरी

बालपणीं सकाळीं अुठून आम्ही भूपाळ्या गात असूं. त्यांतील चार ओळी अजून स्मरणांत कायम आहेत.

**अुठोनियां प्रातःकाळीं । वदनीं वदा चंद्रमौळी ।**
**श्रीबिंदुमाधवाजवळीं । स्नान करा गंगेचें । स्नान करा गोदेचें ॥**
**कृष्णा वेण्या तुंगभद्रा । शरयू कालिंदी नर्मदा ।**
**भीमा भामा गोदा । करा स्नान गंगेचें ॥**

गंगा आणि गोदा अेकच होत. दोघींच्याहि माहात्म्यांत थोडासुद्धां फरक नाहीं. फरक असला तर अितकाच कीं कलिकाळांतल्या वाढत्या पापामुळें गंगेच्या माहात्म्याला अमुक काळ गेल्यानंतर ओहोटी लागणें शक्य आहे, पण गोदावरीचें मात्र तसें कधींहि होणार नाहीं. श्रीरामचंद्रांचे अतिशय सुखाचे दिवस या गोदावरीच्या कांठींच गेले होते; आणि आयुष्यांतील दारुण आघात त्यांच्यावर झाला तोहि येथेंच.

गोदावरी म्हणजे दक्षिणेकडील गंगा.

कृष्णा आणि गोदावरी या दोन नद्यांनीं दोन विक्रमशाली महाप्रजांना पोसलें आहे. महाराष्ट्राचें स्वराज्य आणि आंध्रचें साम्राज्य यांचा अुदय या दोन नद्यांमुळेंच झाला असें म्हटल्यास त्यांत तिळमात्र अतिशयोक्ति होणार नाहीं. साम्राज्यें अुभारलीं गेलीं आणि कोसळलीं, महाप्रजा चढल्या आणि पडल्या, पण या अैतिहासिक भूमींत या दोन नद्या आपल्या अखंड वाहातच आहेत. भूतकालच्या गौरवशाली अितिहासाच्या या नद्या जितक्या साक्षी आहेत, तितक्याच भविष्यकालच्या महान आशांच्याहि प्रेरक आहेत. त्यांतही गोदावरीचें माहात्म्य कांहीं आगळेंच आहे. ती जितकी सलिल-समृद्ध आहे, तितकीच अितिहास-समृद्धहि आहे. गोपालकृष्णाच्या जीवनांत ज्याप्रमाणें जिकडे पाहावें तिकडे विविधताच भरलेली आढळते आणि अेकसारखा अुत्कर्षच दिसून येतो, त्याचप्रमाणें गोदावरीच्या

अतिदीर्घ प्रवाहाऱ्या कांठीं विविधता आणि विपुलता भरलेली आहे. ब्रह्मदेवाऱ्या अेका कल्पनेंतून जसा कल्पसृष्टीचा विस्तार होतो, वाल्मीकीऱ्या अेका कारुण्य भावनेंतून जसा रामायणी सृष्टीचा विस्तार झाला आहे, त्याच प्रमाणें त्र्यंबकच्या डोंगरांतील फटींतून झिरपणाऱ्या गोदावरींतूनच पुढें राजमहेंद्रीचा विशाल जलसंचय विस्तार पावला आहे. सिन्धु आणि ब्रह्मपुत्रा यांना जसें हिमालयाला आलिंगन द्यावेंसें वाटलें, नर्मदा आणि तापी यांना जशी विन्ध्य-सातपुड्यांना द्रववण्याची बुद्धि सुचली, त्याचप्रमाणें गोदावरी व कृष्णा यांनीं दक्षिणेच्या अुन्नत प्रदेशाला भिजवून त्याला धनधान्यानें समृद्ध करण्याचें मनावर घेतलें. सह्याद्रि पक्षपातानें पश्चिमेकडे झुकला हें जणूं काय न रुचल्यामुळें त्याला पूर्वेकडे खेंचण्याचा अविरत प्रयत्न या दोन नद्यांनीं चालवला आहे असेंच वाटतें. या दोन्ही नद्यांचा अुगम पश्चिम समुद्रापासून ५०-७५ मैलांपेक्षां अधिक दूर नाहीं. पण असें असूनहि या दोघी ८००-९०० मैलांचा प्रवास करून आपला जलभार किंवा करभार पूर्व-समुद्रालाच अर्पण करतात. आणि या करभाराचा विस्तार कांहीं लहानसान नाहीं. त्यांत सबंध महाराष्ट्र देश येतो, हैदराबाद आणि म्हैसूर राज्यांचा अंतर्भाव होतो आणि आंध्रदेश तर साराच्या साराच समाविष्ट होतो. मिश्र संस्कृतीची माता नाअील नदी गोदावरीच्या पासंगालाहि पुरणार नाहीं.

त्र्यंबकजवळ पर्वताच्या अेका मोठ्या कपारींतून गोदेचा अुगम होतो. गिरनारच्या अुंच भिंतीवरूनहि त्र्यंबकच्या भिंतीची नीटशी कल्पना येणार नाहीं. त्र्यंबक गांवापासून जी चढण सुरू होते ती गोदामाअीच्या मूर्तीच्या चरणापाशीं पोहोंचेपर्यन्त चालूंच असते. याहूनहि वर जाण्यासाठीं म्हणून डाव्या बाजूस अवघड पायऱ्या बांधल्या आहेत आणि या मार्गानें मनुष्य ब्रह्मगिरीपर्यन्तहि पोहोंचूं शकतो. पण ती अेक निराळी दुनिया आहे. गोदावरीच्या अुगमाकडून जें दृश्य नजरेस पडतें तेंच आपल्या वातावरणाला विशेष अनुकूल आहे. महाराष्ट्रांतील तपस्व्यांनीं आणि राजपुरुषांनीं सारख्याच प्रमाणांत या स्थानीं आपली भक्ति ओतली आहे. कृष्णाकांठीं वाअी व सातारा आणि गोदाकांठीं नाशिक व पैठण या महाराष्ट्राच्या खऱ्या राजधान्या होत.

पण सहनवीर रामचंद्र आणि दुःखमूर्ति सीतामाअी यांच्या वृत्तांतापासूनच तर गोदावरीच्या अितिहासाचा ओनामा होतो. राज्याचा त्याग करतांना

रामाला दुःख झालें नाहीं. पण गोदावरीतीरीं सीता व लक्ष्मण यांच्यासह अुपभोगलेल्या आनंदाचा शेवट होतांच रामाचें हृदय अेकदम शतधा विदीर्ण झालें. वाघ व लांडगे यांच्या अभावामुळें निर्भय झालेलीं हरणें आर्य रामभद्राचे दुःखोन्मत्त डोळे पाहून दूर पळून गेलीं असतील; सीतेच्या शोधासाठीं निघालेल्या लक्ष्मण भावोजींच्या हृदयद्रावक हांका अेकून मोठमोठे हत्ती देखील भयभीत झाले असतील; आणि पशु पक्ष्यांच्या दुःखाश्रूंनीं गोदावरीचें मधुर निर्मल जलहि कषाय बनलें असेल. हिमालयांत जशी पार्वती, तशी जनस्थानांत सीता अशेष विश्वाची अधिष्ठात्री होती. तिच्या वियोगाचें कल्पांतिक दुःख सार्वभौम बनलें तर त्यांत आश्चर्य तें कसलें ?

राम सीतेचा निदान पुन्हां संयोग तरी झाला, पण जनस्थानाचा वियोग जो घडला तो कायमचाच. आजहि नासिक पंचवटींत फिरून पाहा, पावसाळ्यांत जा किंवा अुन्हाळ्यांत, सारी पंचवटी जणूं जटायुप्रमाणें 'सीते! सीते!' अशी अुदास वाणी अुच्चारीत असल्याचा भास होतो. महाराष्ट्राच्या साधु-संतांनीं आपल्या मंगल वाणीचें जर येथें सिंचन केलें नसतें, तर जनस्थान हा अेक वैराण प्रदेश होअून गेला असता. अुन्हाळ्यांतील तप्तता झांकण्यासाठीं ज्याप्रमाणें तृणसृष्टि चहूंबाजूस पसरते, त्याचप्रमाणें जीवनांतील विषमतेचा विसर पाडण्यासाठीं साधुसंत सर्वत्र संचार करतात ही केवढी भाग्याची गोष्ट आहे! जेव्हां जेव्हां नाशिक त्र्यंबकच्या बाजूस जाण्याचा प्रसंग येतो, तेव्हां तेव्हां वनवासासाठीं या स्थानाची निवड करणाऱ्या रामलक्ष्मणांच्या डोळ्यांनीं हा सारा प्रदेश आपण न्याहाळावा अशी अिच्छा होते. पण दर खेपेस थरथरणाऱ्या तृणांकुरांतून सीतामाअीची कातर तनुयष्टीच नजरेसमोर तरळूं लागते.

रामभक्त समर्थ रामदास जेव्हां येथें राहात होते तेव्हां त्यांच्या हृदयांत कसल्या अूर्मि अुठत असतील बरें ? श्रीसमर्थांनीं गोदावरीच्या कांठीं शेणाचा हनुमान स्थापला आहे तो कोणत्या हेतूनें ? पंचवटींत हनुमान असता तर त्यानें सीतेचें अपहरण कधीं होअूंच दिलें नसतें हें सांगण्यासाठीं ? सीतामाअीनें कठोर वचनानें लक्ष्मणाला घायाळ करून स्वतःवर महासंकट ओढवून घेतलें. हनुमानाला असें कांहींच ती बोलूं शकली नसती पण जनस्थान आणि किष्किंधा यांच्यामधें पुष्कळ अंतर आहे आणि गोदावरी म्हणजे कांहीं तुंगभद्रा नव्हे.

— २ —

रामकथेचा करुणरस द्वापरयुगापासून आजपावेतों सारखा वाहात आला आहे. त्याला कोण आटवूं शकेल? म्हणून आपण अंत्यज जातीच्या समजल्या जाणाऱ्या रेड्याच्या तोंडून वेद वदवून घेण्याऱ्या श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या भेटीस पैठणला जाऊं या. गोदावरी जशी दक्षिणगंगा, तशी तिच्याकांठीं वसलेली प्रतिष्ठान नगरी दक्षिणेंतील काशी समजली जात असे. येथले दशग्रंथी ब्राह्मण जी व्यवस्था देत ती चारहि वर्णांना मान्य करावी लागे. मोठमोठ्या सम्राटांनीं दिलेल्या ताम्रपटांपेक्षांहि येथील ब्राह्मणांनीं दिलेलीं व्यवस्थापत्रें अधिक महत्त्वाचीं समजलीं जात. अशा ठिकाणीं शास्त्र-धर्मावर हृदयधर्माला विजयी करून दाखविण्याचें काम ज्ञानरायांनींच करावें. पैठणांत ज्ञानेश्वरांना जानवें मिळालें नाहीं. संन्यासी शंकराचार्यांचा जो छळ झाला त्याचें कायमचें स्मारक म्हणून ज्याप्रमाणें तेथील राजानें नांबुद्री ब्राह्मणांवर कित्येक चालीरीती लादल्या, त्याप्रमाणें संन्यासीपुत्र ज्ञानेश्वरांचा अेखादा शिष्य राजा असता तर त्यानें महाराष्ट्रीय ब्राह्मणांना शिक्षा ठोठावली असती कीं, ‘ज्ञानेश्वरांना जानवें नाकारणारे तुम्ही, यापुढें खबरदार जर कुणीं जानवें वापराल तर.’

हाताच्या बोटांचा ज्याप्रमाणें पंखा बनतो, त्याप्रमाणें मोठमोठ्या नद्यांना येअून मिळणाऱ्या आणि आत्मविलोपनाचा अवघड योग साधून दाख-विणाऱ्या लहान नद्यांचाहि पंखा बनतो. सह्याद्रि आणि अजिंठ्याचे डोंगर यांच्यामुळें बनणाऱ्या कोपऱ्यांत जितकें पाणी पडतें तितकें सारेंच्या सारें खेंचून नेण्याचें काम या नद्या करतात. धारणा व कादवा, प्रवरा व मुळा यांना सोडून दिलें तरी मध्यभारतांतून दूरदूरचें पाणी आणणाऱ्या वर्धा व वैनगंगा यांना कसें विसरतां येअील? दोन मिळून अेक बनलेल्या नदीला ज्यानें प्राणहिता हें नांव दिलें त्याच्या मनांत किती कृतज्ञता, किती काव्य, किती आनंद भरला असेल! आणि थेट ओशान्येकडील कोपऱ्यांतून पूर्व घाटांतले पाणी आणणारी अष्टवक्रा अिंद्रावती आणि तिची सखी श्रमणी तपस्विनी शबरी यांना प्रणाम केल्यावांचून कसें चालेल?

गोदावरीची संपूर्ण कला भद्राचलमूहून पाहातां येते. सुमारे अेक ते दोन मैल रुंदीचें जिचें पात्र ती गोदावरी जेव्हां अुंच अुंच डोंगरांमधून आपला मार्ग

काढीत केवळ शंभर वारांच्या खिंडींतून पसार होते तेंव्हां तिला कसें काय वाटत असेल ? आपली संपूर्ण शक्ति व युक्ति वापरून आणीबाणीच्या प्रसंगांतून आपल्या राष्ट्राला प्रगतिपथावर घेऊन जाणाऱ्या राष्ट्रपुरुषाप्रमाणें जगाला विस्मित करून सोडणारी गर्जना करीत ती येथून पुढें निघते. घोडापूर आणि हत्तीपूर अशा प्रचंड पुरांच्या गोष्टी आपण ऐकतों. पण एकाएकीं पन्नास फूट चढलेल्या पुराची कल्पना तरी आपल्याच्यानें करवेल काय ? पण जें कल्पनेला शक्य नाहीं तें गोदावरीच्या प्रवाहाला शक्य झालें आहे. अरुंद खिंडींतून वाट काढतांना पाण्याला आपला पृष्ठभाग देखील सपाट राखणें अशक्य होऊन बसतें. अर्घ्य देतांना अंजलीचें जसें पन्हाळें बनतें, तसें खिंडींतून निघणाऱ्या पाण्याच्या पृष्ठभागाचेंहि एक भयानक पन्हाळें बनतें. पण अद्‌भुत रसाचा उत्कर्ष तर अजून यापुढेंच आहे. या पन्हाळ्यांतून आपली होडी घेऊन जाणारे निधड्या छातीचे नाविकहि तेथें आहेत ! होडीच्या दोन्ही बाजूस पाण्याच्या उंच उंच भिंती होडीच्या वेगानेंच धावत असतांना पाहून माणसाच्या हृदयांत काय होत असेल ?

भद्राचलम्‌पासून राजमहेन्द्री अथवा धवलेश्वरापर्यन्त गोदावरी अखंड वाहात असते. त्यानंतर ‘त्यागाय संभृतार्थानाम्’ चा सनातन सिद्धान्त तिला आठवला असावा. येथून गोदावरीनें जीवन-वितरण सुरूं केलें आहे. एका बाजूस गौतमी गोदावरी, दुसऱ्या बाजूस वसिष्ठ गोदावरी. मधें कितीतरी बेटें व अंतर्वेदीसारखे प्रदेश आहेत आणि या प्रदेशांत गोदेच्या गोड पाण्यामुळें व सकस गाळामुळें पिकणाऱ्या सोन्यासारख्या शालिधान्यावर परिपुष्ट होऊन वेदघोष करणारे ब्राह्मण वास्तव्य करीत आले आहेत. अशा या समृद्ध प्रदेशाचें स्वातंत्र्य टिकविण्याची शक्ति जेंव्हां आपले लोक गमावून बसले तेंव्हां डच, इंग्रज व फ्रेंच लोक गोदावरीच्या तीरीं तळ देण्यास गोळा झाले. आज देखील* यानानमध्यें फ्रेंचांचा झेंडा फडकत आहे.

— ३ —

मद्रासहून राजमहेंद्रीला जातांना बेझवाड्याजवळ सूर्योदय झाला. पावसाळ्याचे दिवस, मग काय विचारावें ! जिकडे पाहावें तिकडे हिरवा रंग

* सुदैवानें आतां ही परिस्थिति उरली नाहीं.

विविध छटांनीं पसरलेला होता. आणि जणूं काय हा हिरवा रंग असा जमिनीवर पडून राहावा हें असह्य होऊन त्याचे मोठमोठे गुच्छ हातांत घेऊन वर फेकणारीं ताडाचीं झाडें सर्वत्र दिसत होतीं. पूर्वेकडे अेक कालवा रेल्वेच्या कांठाकांठानें वहात होता. परंतु कांठ कांहींसा अुंच असल्यामुळें त्याचें पाणी क्वचितच दिसे. केवळ फुलपांखरांप्रमाणें आपलीं शिडें पसरून हारीनें अुभ्या असलेल्या होड्यांवरूनच कालव्याचें अस्तित्व ध्यानांत येत होतें. मधून मधून पाण्याचे लहानमोठे तलाव लागत. विविधरंगी मेघांनीं नटलेले अनंत आकाश स्नानासाठीं आंत अुतरल्यामुळें तलावांचें पाणी होतें त्याहून अनंतपटींनीं अधिक खोल भासत होतें. कोठें कोठें चंचल कमलांमधून निस्तब्ध निश्चल बगळे अुभे असलेले पाहून प्रभात वायूचें अभिनंदन करावेंसें वाटे. अशा काव्य-प्रवाहांतून प्रवास करीत आम्ही कोव्वूर स्टेशनपर्यन्त आलों. येथूनच आतां गोदावरी मातेचें दर्शन होणार म्हणून अुत्सुकता जागली होती. पुलावरून गाडी जाअील तेव्हां उजव्या बाजूला पाहावें कीं डाव्या याची मनांत भवति न भवति चालली होती. अितक्यांत पूल आलाच, आणि भगवती गोदावरीचा सुविशाल विस्तार दृष्टीस पडला.

गंगा, सिंधु, शोणभद्र, अैरावती यांचे विशाल जलप्रवाह मीं डोळेभरून पाहिले आहेत. बेझवाड्याला झालेल्या कृष्णामाअीच्या दर्शनाबद्दल नेहमींच माझी छाती गर्वानें फुलून येते. पण राजमहेन्द्रीजवळील गोदावरीची शोभा कांहीं वेगळीच होती. या ठिकाणीं जें भव्य काव्य मला प्रतीत झालें, तितकें अितरत्र क्वचितच वाहतांना मीं पाहिलें असेल. पश्चिमेकडे नजर फेंकली तों दूरवर टेकड्यांचा अेक सुंदर कळप बसलेला होता. आकाश ढगांनीं झांकळलेलें असल्यामुळें कोठेंहि अून पडलें नव्हतें. गोदावरीचें धूलिधूसर पाणी गडद मेघांमुळें अधिकच गडद दिसत होतें. मग भवभूतीचें स्मरण झाल्यावांचून कसें राहील? वरच्या आणि खालच्या या काळसरपणामुळें साऱ्या दृश्यावर वैदिक प्रभातकालची सौम्य सुंदरता पसरली होती आणि टेकडीवर अुतरलेले कित्येक पांढरे पांढरे ढग तर अगदीं थेट अृषींप्रमाणेंच दिसत होते. या साऱ्या दृश्याचें वर्णन करणें शक्य तरी आहे का?

अितकें हें अपरंपार पाणी कोठून येत असेल? संकटांतून विजयी होअून बाहेर पडलेलें राष्ट्र जसें वैभवाच्या नवनवीन छटा दाखवीत चहूंकडे

समृद्धीचा फैलाव करीत जातें, त्याचप्रमाणें गोदावरीचा प्रवाह पर्वतांतून निघून आपल्या पूर्ण गौरवानिशीं येत असलेला दिसत होता. लहान-मोठ्या नावा म्हणजे तर नदीचीं लेकरेंच. आअीचा स्वभाव ओळखून घेतल्यावर मग तिच्या मांडीवर तीं कशीहि नाचलीं तरी त्यांना कोण अडवणार? पण मुलांची अुपमा या नावांपेक्षांहि प्रवाहांत जिकडे तिकडे अुत्पन्न होणाऱ्या भोंवऱ्यांनाच दिली पाहिजे. घटकेंत दिसतील, मोठे आकांड-तांडव करण्याचा आव आणतील, आणि दुसऱ्याच क्षणीं हसूं लागतील व फुटून विरून जातील. वाटेल तिकडून येतील आणि वाटेल तिकडे जातील किंवा लोप पावतील.

अेवढ्या मोठ्या विशाल पात्रांत बेटें नसतीं तर ती अेक अुणीवच म्हणावी लागली असती. गोदावरीचीं बेटें प्रसिद्ध आहेत. त्यांतलीं कित्येक तर जुन्या धर्माप्रमाणें स्थिररूप होअून बसलीं आहेत. परंतु बरीचशीं बेटें कवीच्या प्रतिभेप्रमाणें दर खेपेस नवें नवें स्थान पसंत करतात आणि नवें नवें रूप धारण करीत असतात. त्यांच्यावर अनासक्त बगळयांशिवाय दुसरें कोण अुभें राहाणार? आणि बगळे चालूं लागले कीं आपल्या पावलांचे ठसे खोल अुमटवल्या-शिवाय कसे राहाणार? आपल्या धवल चरित्राचें अनुसरण करणाऱ्याला दिशा दाखवून देणार नाहीं तर तो बगळा कसला!

नदीचा कांठ म्हणजे मानवी कृतज्ञतेचा अखंड अुत्सव. पांढरे शुभ्र प्रासाद आणि अुंच अुंच शिखरें ही तर अेक अखंड अुपासना आहेच. पण अेवढ्यानेंच काव्य पुरें होतें असें नाहीं. म्हणूनच कीं काय भक्तगण दररोज नदीच्या लहरीं-वरून मंदिरांतील घंटानादाच्या लहरी या कांठापासून त्या कांठापर्यन्त पाठवीत असतात.

संस्कृतीचे अुपासक भारतवासी याच ठिकाणीं गंगाजलाचे कलश अर्धे गोदेंत रिचवतात आणि फिरून गोदेच्या पाण्यानें पूर्ण भरून घेअून जातात. किती भव्य विधि हा! किती पवित्र भावयुक्त काव्य! तो भक्तिरव तर हृदया हृदयांत वसत आहे. तो घंटानाद व तो भक्तिरव पूर्वस्मृतीनेंच मला अैकवला. प्रत्यक्षांत तर केवळ अेंजिनचा आवाजच अैकूं येत होता. आधुनिक संस्कृतीच्या या प्रतिनिधीविषयींचा आपला तिटकारा जर आपण सोडून दिला तर

आगगाडीच्या चाकांचा ताल कांहीं कमी आकर्षक नसतो आणि पुलावर तर त्याचा विजयनाद सांसर्गिक झाल्यावांचून रहात नाहीं.

पुलावर गाडी बराच वेळ चालल्यावर माझ्या ध्यानांत आलें कीं पूर्व बाजू तर राहूनच गेली. आम्ही ताबडतोब त्या बाजूस वळलों. तेथें तर अगदीं नवीनच शोभा! पश्चिमेकडे गोदावरी जितकी रुंद होती त्यापेक्षांहि पूर्वेस ती अधिक रुंद दिसली. तिला अनेक मार्गांनीं सागराला भेटायचें होतें. सरित्पतीच्या भेटीला सरिता जाते तेव्हां तिच्या मनाचा गोंधळ अुडणारच. पण गोदावरी किती झालें तरी धीरोदात्त माता! तिचा गोंधळ–संभ्रम देखील अुदात्त रूप घेअूनच व्यक्त व्हावयाचा. या बाजूचीं बेटें अगदीं वेगळयाच प्रकारचीं. त्यांत वनश्रीची शोभा पूर्णपणें बहरली होती. ब्राह्मणांच्या किंवा शेतकऱ्यांच्या झोपड्या या बाजूस आढळत नव्हत्या. वेगानें येअून आदळणाऱ्या पाण्याच्या धक्क्यांना तोंड देणाऱ्या त्या बेटांवर जर कुणी अुंच प्रासाद बांधले असते तर ते कदाचित् दुरून दिसले असते. निसर्गानें केवळ अुंच अुंच वृक्षांच्या विजयपताका अुभारून ठेवल्या होत्या आणि डाव्या बाजूस राजमहेंद्री व धवले-श्वराची सुखी आबादी आनंद करीत होती. अशा विरल देखाव्यानें डोळे तृप्त होण्यापूर्वींच अुजव्या बाजूस नदीच्या कांठावर अुन्मत्तपणें वहाणारा काश गवताच्या सफेद तुऱ्यांचा स्थावर प्रवाह दूरदूरवर जातांना दिसला. नदीच्या पाण्यांत अुन्माद होता, पण त्याच्या लाटा बनल्या नव्हत्या. या गवती तुऱ्यांच्या प्रवाहानें वाऱ्याशीं संगनमत केलेलें असल्यामुळें तो हव्या तेवढ्या लाटा अुसळवूं शकत होता. नजर पोंचेल तेथवर पाहिलें–आणि नजरेची पोंच येथें कमी काय म्हणून असेल?–पण तुऱ्यांचा प्रवाह आपला चाललाच होता. गोदावरीच्या प्रवाहासारख्या प्रवाहाबरोबर स्पर्धा करायला देखील त्याला संकोच वाटत नव्हता. आणि संकोच वाटावा तरी कसा? गोदावरीमातेच्या विशाल पुलिनावर त्यानें तिचें थोडें का स्तन्यपान केलें होतें?

माते गोदावरी! राम–लक्ष्मण–सीता यांच्यापासून तों वृद्ध जटायूपर्यन्त सर्वांना तूं आपलें स्तन्यपान करविलें आहेस. तुझ्याकांठीं शूरवीरहि जन्मले आणि तत्त्वचिंतकहि जन्मले. संतहि जन्मले आणि मुत्सद्दीहि जन्मले. देशभक्त जन्मले तसेच अीशभक्त जन्मले. चारहि वर्णांची तूं माता आहेस. माझ्या

पूर्वजांची तूं अधिष्ठात्री देवता आहेस. नवनवीन आशा घेऊन मी तुझ्या दर्शनाला आलों आहें. दर्शनानें कृतार्थ झालों खरा. पण आशा अजून तृप्त झाल्या नाहींत. ज्याप्रमाणें तुझ्या तीरावर श्रीरामचंद्रांनीं दुष्ट रावणाचा नाश करण्याचा संकल्प केला तसा संकल्प कधींपासून मी मनांत बाळगून आहें. तुझी कृपा असेल तर हृदयांतून आणि देशांतून रावणाचें राज्य नाहींसें होअील, रामराज्याची स्थापना झालेली पाहीन आणि फिरून तुझ्या दर्शनाला येअीन. कांहीं नाहीं तरी निदान काश-तुऱ्यांच्या प्रवाहाप्रमाणें मला अुन्मत्त कर—असा अुन्मत्त कर कीं ज्यायोगें मीं निःसंकोचपणें, अेकाग्रचित्तानें मातेच्या सेवेंत निमग्न रहावें आणि बाकीचें सारें कांहीं विसरून जावें. तुझ्या पाण्यांत अमोघ शक्ति आहे. तुझ्या पाण्याच्या अेका थेंबाचेंहि सेवन व्यर्थ जाणार नाहीं.

ऑक्टोबर १९१३

# : १० : वेदांची धात्री तुंगभद्रा

जलनिमग्न पृथ्वीला आपल्या सुळयांनीं पाण्यांतून बाहेर काढल्यानंतर वराह भगवानांनीं ज्या पहाडावर आपला थकवा दूर करण्यासाठीं आराम केला, त्या पर्वताचें नांव 'वराह पर्वत 'च असूं शकणार. भगवान आराम करीत असतांना त्यांच्या दोन्हीं दांतांतून पाणी ठिबकूं लागलें आणि त्याच्या धारा बनल्या. डाव्या दांतापासून अुत्पन्न झालेली धारा बनली तुंगा नदी आणि अुजव्या दांतापासून निघाली भद्रा नदी. आज या अुगमस्थानाला 'गंगामूल' म्हणतात आणि वराह पर्वताला म्हणतात बाबाबुदान. बाबाबुदान कदाचित् वराह पर्वत नसून त्याचा शेजारी असावा. तुंगेच्या कांठावर शंकराचार्यांचा शृंगेरी मठ आहे. मला तुंगेचें प्रथम दर्शन घडलें होतें तें तीर्थहळ्ळीमधें. (कन्नड भाषेंत हळ्ळी म्हणजे खेडेंगांव.) तीर्थहळ्ळींत मी अेक तासभर देखील थांबलों नसेन. परंतु अितक्या थोड्या अवधींतसुद्धां तेथल्या नदीच्या पात्राची शोभा पाहून मला फार आनंद झाला होता. तीर्थहळ्ळीचें माहात्म्य मला ठाअूक नसलें, तरी कन्नड भाषेंतील अेका लहानश्या लघुकथेंत तीर्थहळ्ळीचें वर्णन मीं वाचलें होतें. तितकेंच तीर्थहळ्ळी स्मरणांत कायम रहाण्यासाठीं पुरेसें आहे. मागें केव्हां तरी तुंगेच्या

किनाऱ्यावरील शिमोगा शहराच्या आसपास महात्मा गांधींबरोबर फिरावयास गेलों होतों. यामुळें देखील ही नदी स्मृतिपटावर अंकित झालेली आहे.

भद्रेच्या किनाऱ्यावर बेंकिपुर शहर आहे. येथल्या भाषेंत बेंकि शब्दाचा अर्थ होतो अग्नि. भद्रेचें पाणी 'बेंकि'पुरची आग विझवण्यासाठीं पुरेसें नव्हेंत का ?

तुंगा आणि भद्रा यांचा संगम होतो कूडलीपाशीं. कूडली जवळील संगमामुळें बनलेली तुंगभद्रा पुढें कूर्नूलपाशीं, मला मातेसमान असलेल्या कृष्णामाअीला जाअून मिळते. या दरम्यान कुमुद्वती, वरदा, हरिद्रा आणि वेदावती वगैरे नद्या तुंगभद्रेला येअून मिळतात. (वेदावती सुद्धां तुंगभद्रेसारखीच द्वंद्व नदी आहे. वेद व अवती मिळून वेदावती बनते.) या प्रदेशांत तुल्यबल द्वंद्व संस्कृतीचाच बोलबाला असावा. कारण तुंगभद्रेच्या किनाऱ्यावरच हरिहरसारख्या पुण्यनगरीची स्थापना झालेली आहे. शैव आणि वैष्णव यांचें भांडण मिटवण्यासाठीं कुणी अुभय-भक्तानें हरि आणि हर दोघांची मिळून अेक मूर्ति बनवली. तिच्या मंदिराच्या आसपास जें शहर वसलें त्याचें नांव देखील हरिहरच पडलें.

तुंगभद्रेचें पात्र खडकाळ आहे. जिथें पहावें तिथें वाटोळे गुळगुळीत मोठमोठे दगड नदीच्या पात्रांत स्नान करीत असलेले आढळून येतात. अशा प्रकारचे दगड कधींकधीं या प्रदेशांत टेकड्यांच्या माथ्यावर देखील अेकावर अेक विराजमान झालेले आढळून येतात. अशा दगडांमधेंच अेका प्रचंड विस्तारावर विजयनगरच्या साम्राज्याची राजधानी वसली होती.

विजयनगरचे भग्न अवशेष पहाण्यासाठीं म्हणून होस्पेटहून विरूपाक्षला गेलों असतांना या भीमकाय पाषाणांचें दर्शन घेतलें होतें. विजयनगरच्या अप्रतिम कलाकृतींतून निर्माण झालेल्या मंदिरांचे भग्नावशेष पहात असतांना माझें हृदय सम्राट कृष्णरायाचें श्राद्ध करीत होतें. रात्रीं विरूपाक्षाच्या मंदिरांत झोपलों असतांना, सतत तीनशे वर्षें ज्याची कीर्ति अबाधित राहिली त्या साम्राज्याचें वैभवच सारखें माझ्या स्वप्नांत येत होतें. दुसऱ्या दिवशीं ब्राह्ममुहूर्तावर अुठून आम्ही जवळच्याच मातंग पर्वताच्या शिखरावर जाअून पोंचलों. तेथून आम्हांला अरुणोदयाचा व नंतर तितकाच काव्यमय, सूर्यो-

दयाचा देखावा पहावयाचा होता. मातंग पर्वताच्या शिखरावरून तुंगभद्रेचें दर्शन घेअून आम्ही हळूंहळूं, परंतु अुड्या मारीत खालीं अुतरलों.

जेव्हां सीतामाअीला अुचलून रावण गगनमार्गानें जात होता तेव्हां सीतेच्या वल्कलाचा पदर येथल्या पाषाणांवर घासला गेला होता. आजदेखील त्याच्या रेखा येथल्या दगडांवर आढळून येतात!

नदीच्या प्रवाहांत या ज्या हत्तीअेवढ्या शिळा आहेत त्या मागाहून येअून पडल्या, कीं विशाळ-काय शिळांमधूनच नदीनें आपला मार्ग शोधून काढला, हें कोण सांगूं शकेल? दक्षिणेंत वैदिक संस्कृतीच्या विजयाचें द्योतक विजयनगरचें साम्राज्य या नदीच्या कांठींच आकारास आलें आणि या नदीच्या कांठींच कच्च्या घड्याप्रमाणें त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या. विजयनगरच्या साम्राज्याची कीर्ति त्रिखंडांत दुमदुमत होती. चीनचा सम्राट, बगदादचा बादशहा आणि विजयनगरचे महाराजाधिराज या तिघांचें वैभव सर्वांत मोठें मानलें जाअी. त्या वेळीं काय तुंगभद्रा अशीच दिसत असेल? आणि अशी नाहीं तर कशी असेल? नदी थोडीच मानवी कृति आहे कीं तिच्या वैभवांत अुत्कर्ष आणि अपकर्ष असावेत?

ज्या प्रमाणें मुळा आणि मुठा मिळून मुळामुठा बनली आहे, त्याच प्रमाणें तुंगा आणि भद्रा यांच्या संगमानें तुंगभद्रा बनली आहे. गीतेंतील 'द्वंद्वः सामासिकस्य च' या न्यायानें या दोन नद्यांत अुच्चनीच भाव जरा देखील नाहीं. दोन्ही नांवें समान पातळीवर अेकत्र मिळून वहात आहेत. या नदीच्या पाण्याची माधुरी आणि फलद्रुपता यांची प्राचीन काळापासून वाखाणणी होत आली आहे. गंगेचें स्नान आणि तुंगेचें पान माणसाला मोक्ष मार्गाला नेतें हें सगळ्या नदी भक्तांनीं मान्य केलें आहे. मोटारीचा प्रवास नसता तर तुंगभद्रेला अनेक स्थळीं अनेक रीतीनें पाहून घेतलें असतें. तुंगभद्रा ही अेका महान् संस्कृतीची प्रतिनिधि आहे. आजहि वेदपाठी लोकांत तुंगभद्रेच्या कांठीं वसणाऱ्या ब्राह्मणांचे वेदोच्चार आदर्श आणि प्रमाणभूत मानले जातात. वेदांचे अस्सल अध्ययन जरी सिन्धु आणि गंगा यांच्या तीरीं झालें असलें, तरी त्यांचें यथार्थ रक्षण तर सायणाचार्यांच्या काळापासून तुंगभद्रेच्या कांठींच झालें आहे.

अलीकडेच चार वर्षांपूर्वी कुर्नूलजवळ आपलें समस्त जीवन कृष्णेला अर्पण करीत असतांना मीं तुंगभद्रेला पाहिलें आणि तिच्याजवळून स्वार्पणाची दीक्षा घेतली.

आतां अैकतों कीं या तुंगभद्रेवर बांध बांधून त्यामुळें अेकत्रित झालेल्या पाण्याच्या जोरावर सारा प्रदेश समृद्ध केला जाअील आणि त्याच पाण्यांतून वीज अुत्पन्न करून त्या शक्तीच्या द्वारा अुद्योगधंद्यांचा विकास साधला जाअील. मातेच्या सेवाशक्तीला कधी मर्यादा असते का ?

## : ११ : नेल्लूरची पिनाकिनी

नेल्लूर म्हणजे भाताचें गांव. दक्षिण हिंदुस्थानच्या अितिहासांत नेल्लूरनें आपलें नांव अजरामर करून ठेवलें आहे. बेझवाड्याहून मद्रासला जातांना वाटेंत नेल्लूर लागतें.

गोखल्यांच्या भारत सेवक समाजाचे स्व. हणमंतराव यांनीं नेल्लूरपासून थोड्या दूर पल्लीपाडु नांवाच्या गांवांत अेक आश्रम स्थापन केला आहे, तो पहावयास गेलों असतां सुभग सलिला पिनाकिनीचें दर्शन झालें होतें. श्रीमती कनकम्मांच्या पवित्र हातांनीं कांतलेल्या सुताची धोतरजोडी स्वीकारून आम्ही आश्रम पहावयास निघालों. थोड्या अंतरापर्यंत तर जिकडे बघावें तिकडे आपल्या बागाच बागा. जिकडे जिकडे कालव्यांतून पाणी धांवत आहे आणि सगळीकडे हिरवेंगार हास्य पसरलें आहे.

मग आली वाळू. पुढें, मागें, अुजवीकडे व डावीकडे वाळूच वाळू. वारा आपल्या लहरीप्रमाणें ठिकठिकाणीं वाळूच्या टेकड्या बांधी; आणि लहर फिरली कीं तितक्याच सहजतेनें त्या अुधळून टाकी. अशा वाळूंत सुखानें निर्वाह करणारे अुत्तुंगकाय ताडवृक्ष आनंदानें डोलत होते. अुन्हाच्या तापानें कासावीस होअून ते स्वतःच स्वतावर चवऱ्या ढाळीत होते कीं आमच्यासारख्या पथिकांची दया येअून आम्हांला वारा घालीत होते तें सांगणें कठीण.

दुपारचें ऊन कर्मठ ब्राह्मणाप्रमाणें कठोर तप करीत होतें. पाय पोळत होते, डोकें तापत होतें आणि शरीराच्या मधल्या भागाला समवेदी बनविण्यासाठीं तहान आपलें काम करीत होती.

अशा रीतीनें त्रिविध तापानें तप्त होत्साते आम्ही आश्रमांत पोहोंचलों. तेथें मी अेका मोठ्या टेकाडावर जाअून चढलों आणि अेकदम पिनाकिनीच्या तरल प्रवाहावर नजर खिळली. किती शीतल तें तिचें दर्शन! गव्हा-सारख्या पांढऱ्या रेतीवरून स्फटिकासारखें पाणी वहात आहे आणि वरून भास्कराच्या प्रतापी किरणांचा वर्षाव होत आहे, अशा या शोभेचें वर्णन कोठवर करावें? जणूं काय चांदीच्या रसाची कोठी भट्टीचा ताप असह्य झाल्यामुळें फुटली आहे, आणि आंतला रस वाट फुटेल तिकडे वाहूं लागला आहे. वाऱ्याची दिशा बदलली आणि पिनाकिनीवरून येणारा गार वारा साऱ्या शरीराला आनंद देअूं लागला. जवळच्या आंबराअींतील अेका झाडावर चढून दोन फांद्यांच्या मधें आरामखुर्चीसारखी जागा शोधून मी स्थानापन्न झालों. दूरवर ताड डोलत होते. वयोवृद्ध आम्रवृक्ष छाया ढाळीत होते आणि पिनाकिनी शीतल वायूची फुंकर घालीत होती. नंदनवनांत तरी यापेक्षां अधिक सुख लाभत असेल का?

नदीकांठाचें तें काव्य पिअून डोळे भारावले आणि मिटूं लागले. स्वर्गीय आम्रासनावरून तपोभ्रष्ट होण्याची भीति नसती तर जागृतीच्या या काव्याची बरोबरी करील असें स्वप्न-काव्य तेथेंच बसून मी जरूर अनुभवलें असतें.

पिनाकिनीचें पात्र मोठें आहे. पावसाळयांत ती रुद्रावतार धारण करते असें स्थानिक लोकांकडून कळलें. त्या लीलांच्या वर्णनाच्या शैलीवरून वाटलें कीं येथल्या लोकांची पिनाकिनीविषयींची भक्ति कांहीं औरच आहे.

वस्तुतः पिनाकिनी दोन आहेत. जिला मी पहात होतों ती होती अुत्तर पिनाकिनी अथवा पेन्नेर. ही थेट नंदीदुर्गाहून येते. तेथून येत असतांना ती जयमंगली, चित्रावती व पापघ्नी या नद्यांचें पाणी सोबत घेअून येते. मनुष्यानें या नद्यांच्या पाण्याचा पुष्कळ अुपयोग करून घेतला आहे. आणि आतां तर तुंगभद्रेचें सुद्धां कांहीं पाणी पेन्नारला मिळेल, व तें सर्व धान्य अुगवण्याच्या कामीं येअील.

# : १२ : जोगचा धबधबा

अगदीं लहानपणापासून, कारवारला प्रथम होतों त्या वेळेपासून, गिरसप्प्याविषयीं अैकलें होतें. त्यावेळीं अैकलें होतें कीं कावेरी नदी पहाडावरून खालीं पडते आणि त्याचा अितका मोठा आवाज होतो कीं दोन मैलांवर रचून ठेवलेली घागरींची अुतरंड देखील त्या हवेच्या धक्क्यानें कोसळून पडेल. मग त्या धबधब्याचा आवाज कुठवर पोंचत असेल कल्पना करा! मागाहून जेव्हां भूगोल शिकलों त्यावेळीं मनांत शंका आली कीं, कावेरी तर थेट कुर्गमधें अुगम पाअून पूर्वसमुद्राला जाअून मिळते. ती पश्चिम घाटाच्या पहाडावरून खालीं पडणें शक्यच नाहीं. तर मग गिरसप्प्याच्या रूपानें पडते ती नदी दुसरीच असली पाहिजे. तिला शक्य तितक्या त्वरेनें होन्नावरजवळच पश्चिम समुद्राची भेट घ्यायची होती. म्हणूनच तर सव्वाशे दीडशे पुरुष अुंचीवरून तिनें धाडकन् अुडी टाकली आहे. त्या नदीचें नांव काय?

नायगऱ्याच्या धबधब्याचीं कितींतरी वर्णनें माझ्या वाचनांत आलीं होतीं. प्रकृतिमातेनें अमेरिकेला बहाल केलेला तो अेक अद्‌भुत अलंकार आहे, साऱ्या दुनियेभरचे लोक त्याची यात्रा करण्यासाठीं जातात, मोठ्या मजबूत पिंपांत बसून त्या धबधब्यांतून पार होण्याचे कित्येक लोकांनीं प्रयत्न केले आहेत, वगैरे वर्णनें जसजशीं अधिक वाचावीं तसतसें कुतूहल वाढतच जाअी. निरनिराळया बाजूंनीं घेतलेलीं चित्रें आणि अक्षिपट (Bioscopes) नायगऱ्याला डोळयांसमोर मूर्तिमंत करूं लागले. जसजसें नायगऱ्याचें अप्रत्यक्ष दर्शन याप्रमाणें वाढूं लागलें तसतशी लहानपणीं अैकलेल्या त्या गिरसप्प्याच्या धबधब्याची मानसपूजाहि वाढूं लागली. पुढें जेव्हां कळलें कीं नायगरा तर फक्त १६४ फूट अुंचीवरून खालीं पडतो आणि गिरसप्प्याची अुंची आहे ९६० फूट, तेव्हां तर माझ्या अभिमानाला पारावार अुरला नाहीं. सर्वांत मुख्य आणि जगांतील सर्वांत अुंच पर्वत हिंदुस्थानांत आहे; सिंधु, गंगा आणि ब्रह्मपुत्रा यांच्यासारख्या नद्यांचा कोठल्याहि देशाला अभिमान वाटावा. सर्वांत लांब नदी आपल्याच येथें आहे हें सिद्ध करण्यासाठीं

अमेरिकेला दोन नद्यांच्या लांबीची बेरीज करावी लागली आहे. मिसोरी आणि मिसिसिपी यांची वेगवेगळी गणना केली तर त्यांची लांबी कितीशी होअील ? ज्याप्रमाणें हिंदुस्थानचा अितिहास पृथ्वीतलावरील जुन्यांतला जुना अितिहास होय त्याचप्रमाणें हिंदुस्थानची भूरचना देखील साऱ्या जगांत अद्‌भुत आहे.

मग हिंदुस्थान काय अेका धबधब्याच्या बाबतींतच हार खाअील ? साऱ्या जगानें मान्य केलें आहे कीं अशोकासारखा दुसरा सम्राट अितिहास कालांत झाला नाहीं. भूगोलांतहि लोकांनीं कबूल केलें पाहिजे कीं भव्यतेंत गिरसप्प्याच्या (त्याचें खरें नांव जोग आहे.) पंक्तींला बसूं शकेल असा अेकहि धबधबा नाहीं.

कारकळ राजकीय परिषदेसाठीं दक्षिण कर्णाटकांत गेलों होतों त्यावेळीं आशा वाटली होती कीं अगुंबा घाट चढून शिमोग्याहून गिरसप्पा पहाण्यास जाअीन. पण त्यावेळीं तसें होअूं शकलें नाहीं.

**मनसा चिन्तितं कार्यं दैवेनान्यत्र नीयते !**

निराशेच्या भरांत मीं मानून घेतलें कीं ती चिरसंचित आशा शेवटीं कायमची वंचित झाली आणि आतां गिरसप्प्याचें दर्शन करायचें झालें तर तें ध्यानाच्याद्वाराच करणें भाग आहे.

पण अेवढें मात्र जाणून घेतलें होतें कीं जोग म्हैसूर संस्थानाच्या सरहद्दीवर आहे. तेथें जाण्याचे दोन रस्ते आहेत. वरचा रस्ता शिमोगा, सागरवरून आणि दुसरा मुखाकडचा. त्यासाठीं होन्नावर बंदरावरून होडींत बसून जंगलें पार करून गिरसप्पा गांवापर्यन्त जावयाचें आणि तेथून घाट चढावयाचा. दोन्ही रस्त्यांनीं जाअून आलेल्या लोकांचें सांगणें आहे कीं अेकाबाजूची शोभा दुसरीकडे मिळायची नाहीं. अेकीपेक्षां दुसरी अुतरती आहे असें तर मुळींच म्हणतां येणार नाहीं. अेका रस्त्यानें जाअून आलों आणि दुसऱ्या बाजूचा मात्र साक्षात् अनुभव घेतला नाहीं तोंपर्यन्त मला कबूल करणें भाग आहे कीं जोगाचें मीं अर्धेंच दर्शन घेतलें आहे.

गुजरात महापुराच्या संकटांत सांपडला होता त्याच सुमारास गांधीजी आपले आजारपणाचे दिवस बंगलोरमधें घालवीत होते. मी त्यांना भेटायला गेलों होतों. तेथून फिरत फिरत गांधीजी सागरपर्यन्त पोहोंचले. बरोबर

श्री. गंगाधरराव आणि राजगोपालाचारी होते. सागरला गेल्यानंतर गिरसप्पा बघायला न जाणें मला तर अगदीं अशक्य होतें. मोटारीनें अेकाच तासाचा रस्ता. शिमोग्याला तुंगेच्या तीरावर फिरावयास गेलों असतां मीं गांधीजींना आग्रह केला होता कीं, 'आपण गिरसप्पा पहाण्यास कां चलत नाहीं? लॉर्ड कर्झन केवळ गिरसप्पा पाहण्यासाठीं म्हणून खास या बाजूस आले होते. या बाजूला येणें पुनः सहजासहजीं थोडेंच होणार आहे?' गांधीजी म्हणाले- 'मला तेवढासुद्धा स्वच्छंद करतां येणार नाहीं. तुम्ही अवश्य जा. तुम्ही बघून याल तर विद्यार्थ्यांना भूगोलाचा अेखादा धडा तरी शिकवाल.' मी पुन्हा युक्तिवाद केला 'पण या जगांतील हें अेक अद्भुत दृश्य आहे. नायगऱ्यापेक्षां जोग सहापट अुंच आहे. ९६० फुटावरून पाणी खालीं पडतें. आपण अेकदा तरी तो पाहिलाच पाहिजे.'

'पावसाचें पाणी आकाशांतून पडतें, तें किती अुंचीवरून पडतें?' मी हरलों. मनांत म्हटलें, '**स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम्!**'

मला ठाअूक होतें कीं गांधीजींना संगीताप्रमाणें सृष्टिसौंदर्याचीहि अतिशय आवड आहे. फिरायला गेलों असतां सूर्यास्ताच्या शोभेकडे किंवा ढगांमधून डोकावणाऱ्या अेखाद्या अेकाकी चांदणीच्या शोभेकडे त्यांनीं कधींच माझें लक्ष वेधलें नव्हतें असें नाहीं. पण जनतेच्या सेवेसाठीं म्हणून निघालेले गांधीजींसारखे सेवक महात्मे स्वच्छंद कसा करतील?

**कुलशिखरिणः क्षुद्रा नैते नवा जलराशयः।**

ही अेक गोष्ट अशी निकालांत निघाल्यावर मीं दुसरी गोष्ट पुढें केली. 'आपण येत नाहीं म्हटल्यावर महादेवभाअी देखील येत नाहींत. आपण त्यांना सांगाल तरच ते येतील.'

'महादेवाची अिच्छा असेल तर त्यानें खुशाल तुमच्याबरोबर जावें; माझी ना नाहीं. पण तो येणार नाहीं. मीच त्याचा गिरसप्पा आहे.'

बाकीचे आम्ही पडलों लौकिक आदर्शाला भजणारे. चर्मचक्षूंनीं पहाडावरून पडणारा धबधबा पाहिल्याशिवाय आमचें समाधान होण्यासारखें नव्हतें. म्हणून जेवणापूर्वींच आम्ही सागरहून निघालों आणि मोटारीच्या

मदतीनें अरण्याचा मार्ग कापीत सुटलों. डोंगर पोखरून रेल्वेवाले जेव्हां बोगदा तयार करतात तेव्हां आपल्याला फार आश्चर्य वाटतें. पण मुंबअीच्या वस्तीहूनहि अधिक भरगच्च अशा सह्याद्रीच्या जंगलामधून रस्ता तयार करणें हें त्यापेक्षांहि अधिक अवघड काम आहे. येथें तुमचा डायनामाअिट ( सुरुंग ) अुपयोगाचा नाहीं. बुंधा कापल्यानंतर सुद्धां अेक अेक झाड फांद्यांच्या जाळ्यांतून मोकळें करण्याचें काम हिंदु-मुसलमानांचीं भांडणें मिटवण्याअितकेंच कठीण आहे. खंडाळ्याच्या घाटांतील खोल बोगद्यांत मध्यभागीं पोंचल्यावर जी अेक भयानक रमणीयता मनुष्याच्या अनुभवास येते तशीच नेमकी या जंगलांतहि अनुभवतां येते. अशा जंगलांत शोभतील असे प्राणी म्हणजे हत्ती, वाघ आणि अजगर. त्यांत माणूस अितका कांहीं क्षुद्र प्राणी भासतो, कीं हा येथें कसा काय आला असेंच वाटावें.

असो. जंगल पार करून आम्ही शरावतीच्या किनारीं आलों. या बाजूस तिला भारंगी असेंहि म्हणतात. भारंगी म्हणजे बारगंगे. गंगानदीपेक्षां या नदींचे माहात्म्य बारापट आहे असें येथले लोक मानत असतील तर आपण त्यांच्याशीं हुज्जत घालीत बसणार नाहीं. प्रत्येक मुलाला आपली आअीच सर्वश्रेष्ठ वाटणार !

पाअूस झिमझिम पडत होता. येथें गगनभेदी महावृक्षहि होते आणि लहानमोठीं झाडें झुडपें देखील होतीं; अमर गवतहि होतें आणि जमिनीवर तसेंच झाडांच्या जून सालींवर अुगवणारें शेवाळदेखील होतें. पैलतीरावर लहानमोठीं झाडें नदीचें पाणी कितीसें गार आहे किंवा खोल आहे तें अजमावण्यासाठीं आपले पानाळ हात पाण्यांत बुडवींत होतीं आणि धुक्याचे कित्येक ढग वसू सोडलेल्या आळशी पोळाप्रमाणें अिकडे तिकडे रेंगाळत होते.

नदी पाहिली रे पाहिली कीं मनांत प्रश्नचिह्न अुगवतें कीं ही नदी आली कोठून आणि जाते कोठें? माझ्या मनांत तर नेहमीं नदी आली कोठून हा सवालच प्रथम अुठतो. पुष्कळांचें देखील असेंच होत असेल. याचें कारण काय ? नदी कोठें जाते हें शोधून काढणें सोपें आहे. नदीच्या हवालीं स्वतःला केलें कीं ती आपल्याला अनायासें आपल्या सोबत घेअून जाते. अितकी हिंमत होत नसेल तर अेखादें झाडाचें खोड पोखरून त्या नावेंत बसलें कीं पुरें.

पण नदी कोठून आली हें शोधून काढण्यासाठीं अुलट दिशेनें जावें लागतें. तें काम अृषीच करूं शकतात. भारंगीचें अथवा शरावतीचें पाणी पहाडांतून येत आहे कीं ढगांतून अशी शंका अुत्पन्न होण्यासारखें त्या दिवशींचें दृश्य होतें.

होडींत बसून आम्ही पैलतीरीं गेलों. कांठावरच्या जमिनींतून कितीतरी बालनिर्झर अुड्या मारीत मारीत नदींत पडत होते. त्यावरून आम्ही सहजच अनुमान काढूं शकलों कीं आधल्या दिवशीं चांगलाच पाअूस पडून नदीचें पाणी खूप वाढलें होतें. आज तें जवळ जवळ पांच फूट अुतरलें होतें. होडी आम्हांला खालीं अुतरवून अुरलेल्या लोकांना आणण्यासाठीं परत गेली. शांत पाण्यावर वल्ह्यांचा डब् डब् आवाज करीत होडीची ये जा चालते, ती पहातांना किती मौज वाटते! आणि आपल्या प्रियजनांना स्वतःच्या पोटांत स्थान देअून होडी जेव्हां खोल पाण्याच्या पृष्ठभागावरून त्यांना वाहून आणीत असते, तेव्हां चिंतेचें कांहीं कारण नसतांहि मनाला भीति वाटल्यावांचून रहात नाहीं. राजगोपालाचार्य आपल्या मुलाला व मुलीला घेअून होडींत बसत होते, तेव्हां मी म्हणालों कीं अेका कुटुंबांतील सर्वच लोक अेकाचवेळीं अेका होडींत बसणें योग्य नाहीं असें आपल्या पूर्वजांनीं सांगितलें आहे. अेकतर पित्यानें आमच्याबरोबर यावें नाहींतर मुलानें, दोघांनीं अेकदम येअूं नये. सोबतचे लोक या चालीची चर्चा करूं लागले. कुणाला यांत प्रतिष्ठेचा दर्प आला तर कुणाला दुसरेंच कांहीं सुचलें. सर्वनाशाचा संभव टाळण्यासाठीं हा नियम आहे अितकी साधी गोष्टहि कुणाच्या ध्यानांत आली नाहीं. तो अर्थ स्पष्ट करून वातावरण विषण्ण करण्याची माझी अिच्छा नव्हती. म्हणून पूर्वजांची निंदा अैकत अैकत मी पैलतीराला पोहोंचलों. होडी 'मंझधार' (प्रवाहांच्या मध्यावर) पोंचली तेव्हां मंत्र अुच्चारून आचमन करण्याचें मी विसरलों नाहीं. नदीच्या दर्शनाबरोबर स्नान, पान आणि दान हे विधि झालेच पाहिजेत. तरच नदीचा संपूर्ण साक्षात्कार करून घेतला असें म्हणतां येअील.

दुसरी तुकडी येअून पोंचली आणि अुजवीकडील रस्त्यानें आम्ही निघालों. नदीचा तो डावा कांठ होता. रस्त्यावरील झाडें मशीदीच्या खांबांप्रमाणें सरळ अुंच जात असलेलीं पाहून आम्हांला आनंद वाटला. आमची टोळी अितकी मोठी होती कीं त्या निर्जन अरण्यांत बघतां बघतां आमचा गप्पा-विनोद आणि आमचें सातमजली हसणें यांनीं वातावरण गजबजून गेलें. पण,

तें देखील किती वेळ? आम्ही थोडें दूर गेलों आणि नदीनें आपला गंभीर ध्वनि सुरू केला. त्या आवाजाला कशाची अुपमा द्यावी? अितका गंभीर आवाज दुसरा अैकला असेल तर ना? मेघगर्जना गंभीर असते खरी आणि ती सारें आकाश व्यापून टाकते हेंहि खरें, पण ती सतत टिकत नाहीं. येथें तुम्ही अैकून अैकून थकलांत तरी आवाज कांहीं थांबायचा नाहीं. येथें काय ढग कोसळत आहेत; तोफा अुडत आहेत; पहाडावरील मोठमोठ्या शिळांच्या लाह्या फुटत आहेत कीं नदी आपलें ध्यान मौन सोडून महारुद्राचा स्तवराज गात आहे?

'आतां कसला देखावा दिसेल?', 'आतां कसलें दृश्य नजरेसमोर येअील?' अशा कुतूहलानें डोळे फाडून चहुंकडे पहात पहात आम्ही मुसाफरखान्यापर्यन्त पोहोंचलों. जेथून धबधब्याचें दर्शन सर्वांत अुत्तम प्रकारें करतां येतें त्याच ठिकाणीं म्हैसूर सरकारकडून ही अतिथिशाळा बांधण्यांत आली आहे. जेथून निरीक्षण करावयाचें त्या चबुतऱ्यावर आम्ही जाअून पोहोंचलों.

पण काय? सर्वव्यापी धुक्याशिवाय कांहींच दिसेना; आणि धबधबा तर आपल्या गंभीर आवाजानें सारी दरी दणाणून टाकीत होता. भर दुपारीं सुद्धां सूर्याचें दर्शन होत नव्हतें. जिकडे पहावें तिकडे धुकें, धुकें आणि धुकें. धुक्याचे लोटावर लोट जणुं काय कुरुक्षेत्रावरली महायुद्धाची दंगल माजवीत आहेत आणि जोग त्याला आपल्या तालाचा 'जोग' (योग=साथ) देत आहे. अितक्या आशेनें येअून अशा प्रकारची फजिती पूर्वीं कधींहि आमच्या वाट्याला आली नव्हती. मिनिटांमागून मिनिटें धावत होती आणि आमच्या निराशेबरोबर धुकेंहि वाढतच होतें. शेवटीं मौन सोडून आम्ही आपापसांत गोष्टी करूं लागलों. गोष्टीसाठीं कांहीं खास विषय होता असें नाहीं, पण निराशेची पोकळी भरून काढण्यासाठीं कांहींतरी हवें होतें अितकेंच.

अिंद्रदेव कोपला आहे कीं वरुणदेव रुसला आहे याचा मी विचार करीत होतों अितक्यांत वायुदेव मदतीस धावून आला आणि अेका क्षणासाठीं—फक्त अेकाच क्षणासाठीं—धुक्याचा तो जाड पडदा दूर झाला आणि जन्मभर ज्याची तळमळ लागून राहिली होती तें अद्‌भुत दृश्य अेकदाचें आणि तेंही अेकाअेकीं नजरेस पडलें! महादेवाच्या मस्तकावर गंगा अवतरावी तसा अेक मोठा

धबधबा, खालच्या कड्यांतून बाहेर पडलेल्या हत्तीसारख्या खडकावर पडून, पाण्याचा चक्काचूर करीत दशदिशांना त्याचे सर अुधळीत होता.

छे. त्या दृश्याचें वर्णनच करतां येणार नाहीं. आश्चर्यमुग्ध होअून मी अुद्गारलों :

**नमः पुरस्तात्, अथ पृष्ठतस् ते नमोऽस्तु ते सर्वत अेव सर्व !**
**अनन्त-वीर्यामित-विक्रमस् त्वम् सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥**

लगेच समोरचा हत्तीअेवढा दगड डोक्यावरील धबधब्याच्या जटा अुडवीत म्हणाला :

**सुदुर्दर्शम् अिदं रूपं दृष्टवान् असि यन् मम ।**
**देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शन-काङ्क्षिणः ॥**

धुक्याचा पडदा पुनः पहिल्याप्रमाणेंच पसरला आणि मग आम्हीं पाहिलें तें स्वप्न होतें कीं माया होती कीं मतिभ्रम होता अशी आमची स्थिति होअून गेली ! अेवढी विस्तीर्ण दरी, तें रुंद पात्र, ती भयानक खोली आणि त्याच्या-मधें पाण्याचा नव्हे तर पिठाचा—छे, मैद्याचा—तो अद्‌भुत धबधबा : सारें दृश्य कल्पनातीत होतें. आपण साध्या डोळ्यांनीं पहात आहोंत तें सारें खरोखरीचें आहे अशी प्रतीति दृढ होण्यापूर्वींच धुक्याचा क्षीरसागर पुनः पसरला आणि समोरच्या काठ्यासमवेत आम्हीहि त्यांत बुडून गेलों.

आतां कुणी कुणाशीं बोलत नव्हतें. जे पाहिलें त्याच्याच विचारांत सारे गढून गेले. कांहींच नव्हतें त्यांतून अेवढी अुंच व खोल सृष्टि कोठून अस्तित्वांत आली आणि पहातां पहातां पुनः कोठें अदृश्य झाली याच आश्चर्यानें आम्हांला वेढून टाकलें.

मनांत आलें कीं अेक क्षण तर अेक क्षण, पण जें पहाण्यास आलों तें पाहिलें, विलक्षण रीतीनें पाहिलें. त्या क्षणजीवी दर्शनाचें स्मरण व ध्यान करण्यांत वाटेल तेव्हां घटकामागून घटका घालवितां येतील.

अितक्यांत तो शुभ्र जटाधारी खडक पुन्हा निनादला—**व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस् त्वं तदेव मे रूपम् अिदं प्रपश्य ॥**

धुक्याचें पडळ पुन्हां दूर झालें आणि आतां या टोकापासून त्या टोकापर्यन्त सगळेंच स्पष्ट दिसूं लागलें. समोरून थेट डाव्या टोकाला राजा धबधबा

अर्धचंद्राकार शिळेवरून खालीं अुडी घेत होता. त्याचें पाणी पावसाळयाच्या चिखलामुळें कॉफीच्या रंगाचें बनलें होतें. जास्तींत जास्त पाणी या राजालाच मिळतें. छाती फुलवीत फुलवीत जेव्हां तो तीरासारखा सरळ खालीं पडतो तेव्हां निसर्गाची शक्ति किती अपरिमित आहे याची कल्पना येतें. राजा धबधब्याचा विस्तारहि कांहीं लहानसहान नाहीं; आणि त्याच्या दोन्ही अंगांस मोठमोठ्या मोत्यांचे कितीतरी सर लटकत धांवत असतात. खरोखरच हा धबधबा राजा या नांवाला पात्र आहे.

सर्वप्रथम ज्याचें दर्शन मला झालें होतें तो त्याच्या बाजूचा धबधबा खरें पहातां तिसरा होता. त्याचें नांव वीरभद्र. मधला अेक धबधबा रुद्र या बाजूनें स्पष्ट दिसतच नाहीं. तो पायरी पायरीवर गर्जना करीत शेवटीं राजांत मिसळून जातो.

थेट अुजव्या बाजूस अेक लहानसा धबधबा आहे. त्याची कंबर कांहींशी बारीक आहे. म्हणून त्याचें नांव मीं पार्वती ठेवलें. डोळे भरभरून पाहिल्या-नंतर आमच्या गोष्टी पुन्हा सुरू झाल्या. आपण जें पाहिलें तें दुसऱ्याला दाखवण्याची ज्याला हौस नाहीं तो मनुष्य, मनुष्यच नव्हे. मनुष्य संचारशील आहे, संवादशील आहे. आपण जें अनुभवलें, तेंच दुसरेदेखील अनुभवतात–अनुभवूं शकतात–याची खात्री करून घेतल्यावांचून त्याला परम संतोष होत नाहीं. राजाजींनीं लक्ष वेधलें, 'अिकडे खालीं तर पहा! या थंड वाफेचे लोळच्या लोळ कसे वर अुसळून येत आहेत!' देवदास म्हणाला, 'ते पक्षी पहा! कसे निर्भयपणें अुडत आहेत!' मणिबेननीं अशीच कांहींतरी पुस्ती जोडली. आणि लक्ष्मीनें आपल्या अण्णाला तामिळ भाषेंत बरेंच कांहीं तरी समजाअून आपला आनंद व्यक्त केला. आमच्या बरोबर अेक गृहस्थ होते ते वाटेंत विनाकारण चिडले होते. आम्ही जेव्हां या स्वर्गीय दृश्याच्या आनंदानें अगदीं वेडाअून गेलों होतों तेव्हां त्या गृहस्थांना आपल्या मानून घेतलेल्या अपमानाचेंच स्तंथ करीत बसायचें होतें. चंद्रशंकरनें त्यांच्या या अवस्थेकडे माझें लक्ष वेधलें. मी मनांत म्हणालों:—

**पत्रं नैव यदा करीर-विटपे दोषो वसंतस्य किम्?**
**नोलूकोऽप्यवलोकते यदि दिवा सूर्यस्य किं दूषणम्?**

निराशा, गैरसमज, अप्रतिष्ठा किंवा वियोग हीं या जगांतलीं खरीं दुःखें नाहींत. अहंकार हेंच खरें मोठ्यांतलें मोठें दुःख आहे. अहंकाराच्या विकृती-पुढें मोठ्या धन्वंतऱ्यालाहि हात टेकावे लागतील.

त्या गृहस्थाच्या अनेक प्रकारच्या मानसिक अढी व विकृति मला ठाऊक होत्या. म्हणून गिरसप्प्याच्या धबधब्यासमोरसुद्धां त्याच्याशीं चार क्षण बोलल्याशिवाय माझ्यानें राहवलें नाहीं. मीं त्याला गिरसप्प्याची थोडी माहिती दिली आणि त्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला.

राजा धबधब्याच्या मागल्या पोकळींत असंख्य पक्षी रहातात, आणि दूरदूरच्या शेतांतून टिपून आणलेल्या 'अुच्छिष्ट' आणि अुत्कृष्ट दाण्यांचा संग्रह करतात. तो संग्रह अितका मोठा असतो कीं सरकारकडून त्याचा लिलाव करण्यांत येतो, असें अेकदां कुणाकडून तरी अैकलें होतें. मधमाशाचें मध लुटणारा मनुष्यप्राणी पक्ष्यांचाहि धान्यसंग्रह लुटतो यांत आश्चर्य तें काय ? जो संग्रह करतो तो लुटला जावा अशी सृष्टीचीच व्यवस्था दिसते. **परिग्रहो भयायैव ।**

पुन्हां पडळ पसरलें आणि मला अंतर्मुख होअून विचारांत बुडी मारण्याची संधि मिळाली. अशा भव्य देखाव्याचें रहस्य काय असावें ? भूगोलवेत्ते आणि भूस्तरशास्त्री चट्‌कन सांगतील कीं येथील पहाड निस् जातीच्या दगडांच्या थराचा बनला आहे. दरींतून अेक कपार तुटून आसपासची माती धुअून गेली असावी. अेकदां धबधबा सुरूं झाला कीं खालच्या जमिनीला तो अधिकाधिक खोल खोदीत जाणार आणि जेथून धबधबा सुरूं होतो त्या कोपऱ्याला सारखा घाशीत जाणार. वरचें कपाळ जर कठीण दगडाचें असेल तर अुंची हजारों वर्षें टिकेल. धबधब्यापासून समुद्र फार दूर नसल्यामुळें नदीचा पुढला भाग साफ झाला आहे आणि धबधब्याची अुंची टिकून राहिली आहे. हें झालें धबधब्याचें जड रहस्य. अेखाद्या आधुनिक यांत्रिकाला विचाराल तर तर तो म्हणेल अेकट्या गिरसप्प्याच्या धबधब्यांत अितकें प्रचंड सामर्थ्य आहे कीं म्हैसूर आणि दोन्ही कानडा जिल्ह्यांना हवी तेवढी शक्ति तो पुरी पाडूं शकेल. मग तुम्ही त्यांतून वीज अुत्पन्न करा, प्रत्येक शहराला आणि गांवाला प्रकाशित करा, कारखाने चालवा आणि

तुमच्या मुलखांतील वाटेल तितक्या माणसांची मजुरी छिनवून घेऊन त्यांना बेकार बनवा.

निसर्गापासून जो कांहीं लाभ होअील तो भूमातेच्या साऱ्याच लेकरांनीं आपआपसांत सलोख्यानें वांटून घ्यावा आणि जीवनयात्रेचा भार हलका करावा अशी बुद्धि माणसाला सुचेल तेव्हांची गोष्ट वेगळी. पण आज तर माणसाच्या हातीं कोणत्याहि प्रकारची शक्ति आली रे आली, कीं लगेच तो दुसऱ्या माणसावर कुरघोडी करण्याचाच प्रयत्न करतो. मग ती कुरघोडी दुसऱ्या माणसाला मारून मिळो, गुलाम बनवून मिळो त्याला किंवा अर्धपोटी राबवून मिळो.

म्हैसूर राज्य सुधारलेलें आहे. मोठमोठ्या अिंजिनियरांनीं दिवाणपद शोभवून येथली समृद्धि वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. साऱ्या जगाला लागणारें चंदनाचें तेल अेकटें म्हैसूर राज्यच पुरवीत आहे असें म्हटल्यास विशेष अतिशयोक्ति होणार नाहीं. हिंदुस्थानांतील सर्वांत मोठ्या सोन्याच्या खाणी म्हैसूरमधेंच आहेत. भद्रावती येथील लोखंडाच्या कारखान्याची कीर्ति वाढतच चालली आहे आणि कृष्णसागर तलाव हा मानवी पराक्रमाचा अेक सुंदर नमुना आहे. अशा म्हैसूर राज्याला गिरसप्प्याच्या धबधब्याला वेठीस धरण्याचें सुचलें नसेल हें शक्यच नाहीं. पण अजून तें अमलांत आलें नाहीं अितकेंच. अेवढ्या शक्तीचा अुपयोग कसा करायचा तें सुचलें नाहीं, कीं सरहद्दीचें भांडण आडवें येतें कीं तिसरेंच कांहीं कारण आहे तें मी आतां विसरून गेलों आहें. अेवढें मात्र खरें कीं गिरसप्प्याची शोभा अजून पूर्वीच्या अितकीच प्राकृतिक, अुदात्त आणि अक्षुण्ण राहिली आहे.

भगिनी निवेदिता यांनीं केलेल्या प्रख्यात तुलनेचें येथें स्मरण होतें. कोणत्याहि स्थानाच्या रमणीयतेनें हिंदवासियाला आकर्षित केलें कीं त्यानें लागलीच त्याला धार्मिक स्वरूप दिलेंच म्हणून समजावें. कोणतेंहि अद्‌भुत, रमणीय किंवा भव्य दृश्य पाहताक्षणींच हिंदी हृदयाला वाटतें कीं हा तर गाअीनें वासराला बोलवावें त्याप्रमाणें परमात्मा जीवात्म्याला बोलावीत आहे. नायगऱ्याचा धबधबा जर हिंदुस्थानांत गंगामाअीच्या प्रवाहानें झाला असता तर येथल्या जनतेनें त्याच्या भोवतीं कशा प्रकारचें वातावरण निर्माण केलें असतें ? आमोद-प्रमोद व वनभोजनें करणाऱ्या टोळ्या किंवा आगगाडीचे प्रवासी

यांच्या अैवजीं धबधब्याची पूजा करण्यासाठीं वार्षिक अथवा मासिक यात्रेकरूंचे थवेच्या थवे येथें गोळा झाले असते. भोगविलासाचीं सगळीं साधनें पुरविणाऱ्या हॉटेलांच्या अैवजीं धबधब्याच्या कांठीं, किंवा त्याच्या मधोमधसुद्धां, अुचंबळून येणाऱ्या हृदयांतील भक्तिभाव ओतण्यासाठीं मंदिरें अुभारलीं गेलीं असतीं. सृष्टीचें वैभव पाहून भपकेदार अैषआराम किंवा मौजमजा यांच्या अैवजीं लोकांनीं येथें तपश्चर्या केली असती. आणि अितक्या प्रचंड शक्तीला माणसाच्या फायद्यासाठीं किंवा सुखसोयीसाठीं बंदिस्त करून ठेवण्याचें डोक्यांत येण्या-अैवजीं निसर्गाशीं अेकरूप होअून जाण्याच्या मस्तींत भैरव-झेंप घेअून पाण्याच्या प्रवाहांत आपला जीवनप्रवाह मिसळून देण्याचेंच त्यांना सुचलें असतें. स्वभाव-भिन्नतेंत आतां कांहीं बाकी राहिलें ?

पण निसर्गाची भव्यता पाहून त्यांत आपला देह सोडून देणें यांत काय खरोखर आध्यात्मिकता आहे ? छे. देहाचीं सारीं बंधनें गळून पडावींत, 'वाटेल ते होवो येनकेन प्रकारेण जगेनच' अशी पामर जीवनाशा मनुष्यानें टाकून द्यावी यांत आध्यात्मिक प्रगति आहे हें निःसंशय. पण ही वृत्ति स्थायी असली पाहिजे. क्षणिक अुन्मादाला कांहींच अर्थ नाहीं. फना होण्याची अिच्छा प्रत्येक मनुष्यांत कधींकधीं अुत्पन्न होतेच. अिष्काची ती अेक विकृति आहे. तिच्यांत अमुक आध्यात्मिक तत्त्वांचे आभास पाहून तिच्यावर फिदा होणें मनुष्यजीवनाच्या महत्तेला शोभत नाहीं. भगवान बुद्धानें आपल्या अचूक नजरेनें तिला विभवतृष्णा हें नांव देऊन तिचा धिक्कार केला आहे. विभव म्हणजे नाश. भगवान मनूंनीं सुद्धां हीच गोष्ट स्पष्ट शब्दांत सांगितली आहे :

**नाभिनन्देत मरणम्; नाभिनन्देत जीवितम् ॥**

गिरसप्प्याच्या धबधब्यासारख्या रोमहर्षण दृश्याच्या सहवासांत यंत्रें, अश्वशक्ति (हॉर्सपॉवर), विद्युत्प्रकाश आणि कारखाने यांचा विचार करणें म्हणजे आत्म्याला विसरून बाह्य वैभवाचें ध्यान करण्यासारखें आहे यांत शंका नाहीं. पण आसपासचा प्रदेश दुष्काळानें पीडित असेल, लोक अनेक रोगांना बळी पडत असतील आणि प्रजेचें हें दुःख दूर करण्यासाठीं या धबधब्याच्या पाण्याचा अन्य रीतीनें उपयोग करणें हाच अेक अुपाय असेल तर अशावेळीं आपला काय आग्रह राहील ? सृष्टिसौंदर्यानें वेडावून जाणाऱ्या आपल्या सौंदर्य-रसिक चित्ताच्या आह्लादाचें साधन—हा जो धबधबा—त्याला

तसेंच ठेवावें कीं आपद्ग्रस्त अशा आपल्या बांधवांना दुःखमुक्त करण्यासाठीं त्याचा बळी द्यावा ? पुरेसें धान्य मिळत नाहीं अशा वेळीं आणि जागीं धान्याची शेती सोडून आपण गुलाबाची शेती केली तर आपला हृदयविकास होईल का ? गुलाबांत काव्य आहे, धान्यांत कारुण्य आहे. दोहोंतून कोणतें पसंत करावें ? अिंग्लंडच्या अेका प्राचीन राजानें अनेक खेडीं अुजाड अुध्वस्त करून मृगयेसाठीं त्यांचें अेक महान् अुपवन तयार केलें. राजा मर्दानी खेळांचा भोक्ता होता याविषयीं शंका नाहीं. पण प्रश्न आहे तो त्याला प्रजा-सेवक मानतां येअील कीं नाहीं याचा. कलेविरुद्ध सेवेचा प्रश्न येअून अुभा राहिला, काव्य व कारुण्य यांतील कोणत्या वृत्तीचा परिपोष करावा हें नक्की करायची पाळी आली तर कोणत्या निकषावर घासून निर्णय द्यावा ? रोम जळत आहे व नीरो फिडल् वाजवीत बसला आहे आणि मिथिला जळत आहे नी जनक राजा आंध्यात्मिक चर्चा करीत बसला आहे यांत बरेंच अंतर आहे. प्रजेच्या सेवेसाठीं जितकें म्हणून करणें शक्य आहे तितकें सर्व केल्यावर व्यर्थ चिंता करीत हृदय जाळण्यापेक्षां हृदयांतील अंतर्यामीचें स्मरण दृढ करण्याचा प्रयत्न करणें आर्यवृत्तीचें द्योतक आहे. मूठभर लोकांच्या विलासा-साठीं किंवा अैश्वर्यासाठीं निसर्गाच्या शक्तीचा अुपयोग करणें आणि प्राकृतिक सौंदर्याचा नाश करणें निवळ अधर्म होय. पण प्राणिमात्राच्या आर्तिनाशनाच्या साधनेमधून होणारा हृदयविकास सोडून प्रकृतीच्या विभूति दर्शनांतून तो शोध-ण्याची अिच्छा बाळगणें कितपत अिष्ट आहे हें विचार करण्याजोगें आहे.

ते रुसलेले गृहस्थ आपल्या काल्पनिक अपमानाच्या जळफळाटांत समोरच्या दृश्याला विसरून गेले होते, आणि मी माझ्या तात्त्विक कल्पनाविहारांत शून्य दृष्टीनें समोर पाहात होतों. दोघेहि अभागी होतों, कारण कल्पना किंवा जळफळाट चालवण्यासाठीं मागाहून वाटेल तितका वेळ मिळता. धुक्याचें पडळ पुन्हा दाटून आलें. आतां धबधबा पुन्हा थोडाच दिसणार ? राजाजींनीं सांगितलें, 'अुन्हाळयांत जेव्हां धबधबा पडतो तेव्हां पाण्याच्या तुषारांवर नानातऱ्हेचीं अिंन्द्रधनुष्यें दिसतात. त्यावेळचीं शोभा सर्वस्वी वेगळीच असते.' आणि चांदण्या रात्रीं देखील धनुष्यें दिसत नाहींत असें नाहीं. म्हैसूरच्या सर्वसंग्रहांत (गॅझेटियरमधें) लिहिलें आहे कीं गवताचें मोठमोठे भारे पेटवून धबधब्यांत सोडून दिल्यानें अंधाऱ्या रात्रीं साऱ्या दरीनें पेट घेतला आहे

६८४६२ म. प्रवास ६१२ ५६२ २२।३।६२

असा भास होतो. कित्येक लोकांनीं रात्रीं दारूकामाचे अनेक बाण सोडूनहि येथें अद्भुत आनंद मिळवला आहे. अुत्पाती मनुष्यप्राणी जें कांहीं करील तेवढें थोडेंच ! मला मात्र असले कांहींच रुचत नाहीं. अशा ठिकाणीं निसर्ग जो खुराक चारतो त्याची स्वाभाविक रुचि अनुभवण्यांतच खरी रसिकता आहे. मानवी मसाला मिसळल्यानें स्वाद आणि पचनशक्ति दोन्ही बिघडतात.

आतां आम्ही बंगल्यांत येअून पोहोंचलों. बरोबर आणलेलें खाणें अुदरस्थ केलें. येथलें पाणी तर पिण्याची सोय नाहीं, लगेच हिवताप लागतो. बहुतेकांनीं गरम गरम कॉफी पिअूनच तहान भागवली. मीं मात्र त्या दिवशीं चातकाप्रमाणें पावसाचे थोडे थेंब मिळवूनच संतोष मानला.

अ. क्र. १०९

धबधब्याचें पुन्हा अेकदां दर्शन घेअून आम्ही परत फिरलों. आतां पुरतें कळून आलें कीं धबधबे तीन नसून चार आहेत. डाव्या बाजूचा पहिला मोठा धबधबा तो राजा. त्याच्या बाजूच्या दरींतून आक्रोश करीत त्याला येअून मिळणारा ‘ रोअरर ’ ( Roarer ) तो माझा रुद्र. माथ्यावरची कारंज्याची पांढरी जटा फुलवून दाखवणारा तो ‘ रॉकेट ’. त्याला आतां वीरभद्र म्हटल्याचांचून गत्यंतर नव्हतें. आणि शेवटीं येणाऱ्या बाजूच्या धबधब्याचें तन्वंगी पार्वती हेंच नांव मीं कायम केलें. अिंग्रजांनीं रुद्राला Roarer नांव दिलें आहे, वीरभद्राला Rocket, आणि पार्वतीचें नांव ठेवलें आहे Lady.

आतां आम्ही परत निघालों. पायांना जळवा डसण्याची भीति होती. येथल्या लोकांनीं आम्हां सर्वांना सावध तर केलेंच होतें कीं सांभाळून चाला. जळवा डसल्या तर कळणार सुद्धां नाहीं आणि रक्त शोषलें जाअील. मीं म्हटलें, त्याची चिंता नका करूं. अिंग्रजांना चांगले ओळखूं लागलों आहोंत ते काय जळवांना थोडेच बधणार आहोंत ? तरीहि जवळजवळ प्रत्येकाच्या पायाला अेक अेक जळू डसलीच. माझ्या शरीरांतील रक्ताचें फारसें आकर्षण नसल्यामुळें म्हणा, किंवा माझें रक्त कडू असल्यामुळें म्हणा अथवा काकदृष्टीनें मी बघून बघून चालत होतों म्हणून म्हणा, मी मात्र बचावलों होतों. आम्ही थोडे पुढें गेलों, पण मणिबेनच्यानें राहवलें नाहीं. ‘ जरा थांबा, पुनः अेकदां जमल्यास या बाजूनें धबधब्याचें दर्शन घेअून येतें. ’ ‘ पण धुकें विरलेंच नाहीं तर ? ’ ‘ नाहीं विरलें तर कांहीं नाहीं, परत येअूं. अेकदां पाहूं तर द्या. ’

परत फिरतांना रस्त्याला अेक फाटा फुटला होता, त्या वाटेनें जाअून किये-

कांनीं पार्वतीचें जवळून दर्शन घेतलें आणि तेथें जमीन निसरडी असल्यामुळें 'वंदे मातरम्' म्हणून त्यांनीं पार्वतीला साष्टांग नमस्कार सुद्धां घातला!

जातेवेळीं ज्या रस्त्यावर अज्ञात आणि अननुभूत अवस्थेचें काव्य अनुभवलें होतें त्याच रस्त्यानें परततांना संस्मरणांचें स्मृति-काव्य आम्ही अनुभवूं लागलों. अर्थात् तीं न तींच दृश्यें अुलट्या दिशेनें पहाण्यांत कांहीं कमी नाविन्य नव्हतें. ज्या झाडांबद्दल जातांना आम्ही बोललों होतों तींच झाडें परततांना देखील लक्ष वेधून घेणारच. अर्थात् या परिचित मित्रांना 'कसें काय?' म्हणून कुशल विचारल्यावांचून पुढें कसें जाववेल?

आणि झाडाझाडामधें प्रेमाचा पूल बांधणाऱ्या वेली? त्यांच्या नम्रतेला नमन केल्यावांचून पुढें जाअील तो अरसिकच म्हटला पाहिजे. आम्ही हळूं हळूं नदीतीरापर्यंन्त येअून पोहोंचलों. आतां त्या न त्याच शांत प्रवाहावरून परत जावयाचें होतें. धुक्याचे ढग आतां विखुरले होते. नदीचे शांत पाणी हळूं हळूं धबधब्याकडे जात असलेलें पाहून माझ्या मनांत बलिदानासाठीं चाललेल्या मेंढरांच्या कळपाचें चित्र अुभें राहिलें. मीं त्या पाण्याला म्हणालों, 'केवढा मोठा अधःपात पुढें वाढून ठेवला आहे ह्याची थोडी देखील कल्पना तुम्हांला नाहीं. म्हणूनच अितक्या स्वस्थ चित्तानें तुम्ही पुढें चाललां आहांत.

'अथवा नाहीं, मीच चुकत आहें. तुम्ही जीवनधर्मी आहांत. तुम्हांला विनाशाचें भय कसलें?

**प्रायः कन्दुक-पातेन पतत्यार्यः पतन्नपि।**

जितक्या अुंचावरून पडाल तितकेंच अुंच वर अुसळाल. तुमची कींव करणारा मी कोण?, शरावतीच्या पवित्र पाण्याला स्पर्श करण्यासाठीं मी हात लांबवला, तों पाणी खळखळ हसून म्हणालें, 'न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात! गच्छति'. होडी या कांठावर येअून पोहोंचली आणि आमच्या मनांत विचार आला कीं मोटर या अंगानें जरा खालीं घेतली तर त्याच धबधब्याची फिरून अुजवी यात्रा देखील होईल. आम्ही जाअून आलों होतों त्या बाजूला म्हैसूर-बाजू म्हणतात आणि ज्या अुजव्या बाजूनें जाण्यास निघालों ती मुंबअी-बाजू म्हणून ओळखलीं जाते. कारण जोग या दोन राज्यांच्या सरहद्दीवर आहे.

येथें तर आम्ही अगदीं जवळ येऊन ठेपलों. मोठमोठ्या खडकांमधून वाट काढीत मी धावूं लागलों. दोन वर्षांचा दुखणेकरी म्हणून माझी ख्याति चांगलीच पसरलेली होती. त्यामुळें मला धावतांना बघून राजाजींना आश्चर्य वाटलें. 'हे तर महाराष्ट्राचे मावळे आहेत. शिवाय हिमालयाचे यात्रेकरू देखील आहेतच. माशानां पाणी तसा मराठ्यांना डोंगर.' पण मला कुठें असलीं बोलणीं अैकायला थांबायचें होतें ? मी आपला धांवत धांवत राजा धबधब्याच्या शेजारीं जी प्रसिद्ध दरड आहे तेथें जाअून पोहोंचलों. येथें अुभ्या अुभ्या खालीं पहाण्याची सोयच नाहीं. घेरी येअून मनुष्य खालींच पडायचा. चारहि धबधब्याच्या आवाजानें कान अितके कांहीं भरून गेले होते कीं दुसरें कांहीं अैकण्याअितकी जागाच त्यांत अुरली नव्हती. धबधब्याचें पाणी ज्याप्रमाणें वरून खालीं दरींत पडून पुन्हा वर अुसळत होतें त्याचप्रमाणें कानांतून देखील आवाज पुन्हां अुसळत असले पाहिजेत. प्रथम माझें लक्ष वेधलें राजाच्या गंडस्थळावरून रुळणाऱ्या मोत्यांच्या सरांनीं आणि जलप्रलयांतून लोकांना वाचवण्यासाठीं जसे पट्टीचे पोहणारे वीर बहादर अुड्या घेतात त्याप्रमाणें या बाजूच्या धबधब्यांतून युक्तीनें पार होणाऱ्या पक्ष्यांनीं. या पक्ष्यांना या धबधब्याच्या भीषण भव्यतेची कल्पनाच येत नाहीं कीं अीश्वरानें त्यांच्या हृदयांत अितकी हिंमत प्रेरली आहे ? मला वाटतें कीं आगंतुक पक्षी कांहीं अितकी हिंमत करणार नाहींत. हे जोगनिवासी येथेंच जन्मलेले, धबधब्याच्या पडळाच्या सुरक्षिततेंत वाढलेले. सिंहाचे छावे सिंहिणीला भीत नसतात. समुद्रांतील मासे लाटांत स्वच्छंद क्रीडा करतात, त्याचप्रमाणें हे जोगपुत्र जोगशीं खेळत असावेत.

राजा धबधबा म्हैसूर बाजूनें दुरून पाहिला होता तेव्हां तो कांहीं वेगळाच दिसत होता. येथें तर जणूं काय हत्तीच्या गंडस्थळावरच पहुडलों आहोंत अितक्या जवळ आम्ही होतों. वरचें पाणी धबधब्याकडे असें कांहीं खेचलें जात होतें कीं जणूं काय अेखादा महान जनसमाज कळत न कळत, अिच्छा असो नसो, महान क्रांतीकडे धावत आहे ! मोठा जनसमाज जेव्हां सामाजिक आणि राजकीय सुधारणांच्या वेगांत वाहत जातो, तेव्हां पुढें काय वाढून ठेवलें आहे याची त्याला कल्पना नसते. आणि कल्पना असली तरी 'आपल्या-बाबतींत तें खरें ठरणार नाहीं; आपण कसेतरी निभावून जाअूं' अशी आंधळी

आशा तो बाळगतो. मध्यंतरी सुधारणेचा कैफ वाढतच जातो. शेवटीं जहाल लोक संयम सुचवतात, तर मवाळ लोक आंधळे होअून बेजबाबदार लोकांशीं हातमिळवणी करतात आणि मग अिच्छा असली तरी मागें फिरूं शकत नाहींत! अथवा ते स्वतः मागें फिरले तरी काय? धनुष्यांतून सुटलेला बाण कधींकाळीं मागे खेचता आला आहे? जी अटळ नाहीं ती क्रांति कसली?

धबधब्याचें पाणी खालीं किती खोलवर जातें तें पहाणें किंवा जाणून घेणें अशक्य होतें. कारण अुसळत्या पाण्याचीं मोठमोठीं अभ्रें धबधब्याच्या पायाला विळखा घालून डोलत होतीं. काय तो पाण्याचा आवेशयुक्त अुत्सव! जणूं काय महादेव संहारकारी तांडवनृत्यच करीत आहे आणि समोरचा रुद्र त्याला ताल देत आहे. पण रोमांचकारक शोभेचा परम अुत्कर्ष तर समोरचा वीरभद्रच दाखवतो. तुम्हांला वाटणारच नाहीं, कीं येथें पाणी पडतें आहे, येथें पाणी अुडतें आहे. मोठमोठ्या तोफांतून गोळ्याच्या वेगानें कोरड्या पिठाचे फवारे अुडत असावेत तसाच तो देखावा होता. त्या देखाव्याचें वर्णन शब्दांनीं करतांच येणार नाहीं, कारण शब्द हे 'शांति आणि व्यवस्था' यांच्यामधें वाढलेले असतात.

आम्ही पडल्या पडल्या येथून तें दृश्य डोळे भरून पाहिलें अथवा खरें सांगावयाचें म्हणजे वाटेल तितके पडून राहिलों तरी तृप्ति होणें अशक्य आहे अशी खात्री होअीपर्यन्त पाहिलें. आम्ही अुठून परत फिरलों; पण मागें फिरणें सोपें नव्हतें. कुणीतरी अेकजण अुठायचाच नाहीं. त्याला खेचून आणण्यासाठीं दुसरा जाअी तो स्वतःच त्या नयनोत्सवाला खिळून राही. पहिला पस्तावून अुठला तरी बोलवायला परत गेलेला कांहीं अुठायचा नाहीं. आणि दोघेहि कसाबसा संयम करून मागें परतताहेत, तों त्या दोघांवर चिडून त्यांची कानअुघाडणी करण्यासाठीं आलेला तिसरा क्षणभर डोळे तृप्त करण्यासाठीं तेथें अुभा राही आणि त्या दोघांच्या संयमाला थोडें ढिलें करी. त्या दोघांना वाटे, अितका चिडलेला हा समाजनियंता गृहस्थ जितकी सूट घेत आहे तितकी आपणहि घेतली तर त्यांत कांहीं बिघडत नाहीं. आपण कुठें त्याच्याहून अधिक संयमी असल्याचा दावा करीत आहोंत? मला वाटलें कीं थोडेसें त्या पुढच्या खडकावर गेले तर राजाच्या पाण्यांत पाय बुडवतां येअील. पण नदीचें पाणी थोडें थोडें वाढत होतें. त्यांत तो खडक लहानसें बेटच बनला होता म्हणून राजाजींनीं मला जाअूं दिलें नाहीं. मलाहि वाटलें कीं त्यांचें न अैकलें तर दुहेरी

अुद्धटपणा होअील. राजाजींच्या सूचनेचें अुल्लंघन कसें करावें ? आणि ‘ राजा ’च्या डोक्यावर पाय कसा ठेवावा ?

आम्ही परत फिरलों. भक्ति, विस्मय, मानवी जीवनाची क्षणभंगुरता, दृश्याची भव्यता, या क्षणींची धन्यता, अशा कितीतरी वृत्तींचे ढग हृदयांत दाटून आले होते आणि तेथून त्या वीरभद्राप्रमाणें मस्तकांत आपले बाण सोडीत होते. विचारांचें हें दारूकाम अद्‌भुत असतें. हृदयांतून बाण सुटतो तो तडक मस्तकापर्यन्त जाअून तेथें फुटतो. अशा वेळीं स्वस्थ शरीर कसें अस्वस्थ होअून जातें, याचा ज्यानें अनुभव घेतला आहे त्यालाच त्याचा चमत्कार कळून येअील.

अशा या ठिकाणीं मंदिर कसें नाहीं ? आपल्या लोकांचीं मंदिरें म्हणजे जन्मभूमींतील काव्यमय स्थानें. पर्वताचें अमुक शिखर उत्तुंग आहे ? मग तेथें अेखादा अृषि ध्यान धारणेसाठीं जाअून बसलाच आणि भक्तांनीं तेथें अेक मंदिर बांधलेंच म्हणून समजावें. मग तें पुण्याजवळील पर्वती असो, चंपानगरी जवळील पावागढ असो, जुनागढ जवळील गिरनार असो कीं हिमालयाच्या ‘ अुसपार ’ चे कैलास शिखर असो. दक्षिणेकडे धावणारी नदी अमुक ठिकाणीं अुत्तरवाहिनी झाली आहे ? चला वसवा तेथें अेक तीर्थ ! कोट्यवधि लोकांनीं यावें आणि पावन होअून जावें. दोन मोठमोठ्या नद्या अेकमेकींना मिळताहेत ? मग त्या प्रयागावर आपल्या संतांनीं तिसरी आपली सरस्वती वाहती केलीच आहे. सगळया यात्रा पूर्ण होअून मनुष्य समुद्रापर्यन्त येअून पोहोंचला ? तेथें भक्तांनीं जगन्नाथ किंवा सेतुबंध महादेव आणून बसवलाच आहे. जेथें जमिनीचा शेवट दिसला तेथें अेकतर कन्याकुमारी असेल अथवा देवेन्द्र असेल. दूरवर पसरलेल्या, लांबलचक वाळवंटांत अेखादें सरोवर दिसलें तर तें नारायणाचेंच सरोवर आहे; त्याची पूजा झालीच पाहिजे. आणि काश्मीरची क्षीरभवानी ?

आपल्या संतकवींनीं तीर्थस्थानें कोठें कोठें वसवलीं आहेत याचा शोध करूं लागलों तर हिंदुस्थानचा सारा भूगोल पालथा घालावा लागेल. मुसलमान संतांनीं आणि रोमन कॅथलिक पाद्र्यांनीं देखील आपल्या देशांत अशाच प्रकारें अद्‌भुत काव्यमय स्थानें निवडलीं आहेत आणि तेथें पूजा-प्रार्थनेची सोय करून ठेवली आहे. मग या धबधब्यापाशींच मंदिर कां नाहीं ? काय जीवनराशीचा अेवढा मोठा अधःपात पाहून मुनिजन खिन्न झाले असतील ?

भैरवघाटीप्रमाणें येथेंहि देह विसर्जन करण्याचा कैफ चढण्याचा संभव आहे असें वाटून लोकसंग्रहकार मुनींनीं लोकयात्रेसाठीं हें स्थान नापसंत केलें असेल? अथवा डोकें भणाणून टाकणारी अखंड व भीषण गर्जना ध्यानाला अनुकूल नाहीं असें समजून अुपासक येथून विमुख झाले असतील? किंवा हा धबधबा स्वतःच अभय ब्रह्माची मूर्ति आहे, त्याच्या शेजारीं ध्यान खेंचून घेअू शकेल अशी कोणती मूर्ति अुभी करावी, म्हणून गोंधळांत पडून ते येथून निवृत्त झाले असतील? कोणी सांगावें? आपल्या पूर्वजांनीं येथें देअूळ बांधलें नाहीं याचें मला यत्किंचितहि दुःख नाहीं. पण हें स्थान पाहून स्फुरलेल्या भावांचें अेखादें तांडवस्तोत्र तर त्यांनीं अवश्य लिहावयास पाहिजे होते. पार्थिव मूर्ति जेथें कामीं येत नाहीं तेथें वाङ्मयी मूर्ति अवश्य स्फूर्तिदायक होअू शकती.

ही सगळी शोभा आम्ही धबधब्याच्या माथ्यावरून पाहात होतों. होन्नावर-कडून येणारे लोक अुत्तर कानडा जिल्ह्याच्या घोर अरण्यांतून येत असतील तेव्हां त्यांना या धबधब्याचें आपाद-मस्तक दर्शन होत असेल. कोणतें अधिक सुंदर हें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय कोण सांगू शकेल? आणि प्रत्यक्ष पाहूनहि काय? निसर्गाच्या वेगवेगळया विभूतींची कधीं तुलना होअूं शकली आहे? हिमालयाची भव्यता, सागराची विशाल गंभीरता, वाळवंटाची भीषणता आणि आकाशाची नम्र अनंतता यांच्यामधें तुलना किंवा निवड कोण करूं शकेल? म्हणून अेकदां होन्नावरच्या मार्गानें जोगच्या दर्शनास आलेंच पाहिजे.

आरमारचा अनुभव घेअून कुशल बनलेले कित्येक लष्करी अधिकारी धबधब्याचें मोजमाप घेण्यास आले होते आणि पाळण्यांतून लटकत धब-धब्याच्या मागील अंगास गेले होते, त्यांना कसा काय अनुभव आला असेल? जोगनिवासी पक्ष्यांनीं त्यांचें कसें स्वागत केलें असेल? धबधब्याच्या पडद्यांतून आंत पसरणारा बाहेरचा प्रकाश त्यांना कसा दिसला असेल? आणि धबधब्या-मागें गवत पेटवून जर मोठा उजेड केला तर साऱ्या दरींत कशी गंधर्वनगरी निर्माण होईल याची कुणाला कल्पना आहे का? जेव्हां येथें विजेचा कारखाना सुरूं होईल तेव्हां कित्येक कल्पनावीर नक्कीच या धबधब्याच्या मागें विजेच्या दिव्यांच्या माळा पेटवून लावतील आणि जगानें कधीं पाहिलें नाहीं असें अिंद्रजाल पसरवतील. त्यावेळीं सगळया दरीला अेका महान् रंगभूमीचें स्वरूप येअील आणि चारहि खंडातील भूदेव ती पहाण्यासाठीं येथें अवतरतील.

पण त्यावेळीं कुणाला अीश्वराचें स्मरण होअील का ? माणसानें आपली बुद्धिशक्ति अीश्वराला ओळखण्यासाठीं वापरायचें सोडून अीश्वराला विसरून जाण्याच्या युक्त्या आणि पद्धति शोधण्यांतच ती खर्ची घातलेली दिसते.

कदाचित् असेंहि असेल कीं सर्व बाजूनें परास्त झाल्यानंतर बुद्धि अीश्वराला चांगल्या रीतीनें समजूं शकत असेल.

प्रत्येक गोष्टीला शेवट असतोच; अर्थात् आमच्या या जोग-यात्रेचाहि शेवट झाला. अत्यंत पवित्र आणि मधुर स्मृति घेअून आम्ही परत फिरलों. पण पुन्हां अेकदा येथें येअून जाण्याची वासना अुरलीच. म्हणून ‘ पुनरागमनाय च ’ अशा शास्त्रोक्त शब्दांनींच आम्हांला भारत-वैभवाच्या या असाधारण विभूतीचा निरोप घ्यावा लागला.

# : १३ : जोगचें पुनर्दर्शन

हिमालय, व सह्याद्रि यांसारखे अुत्तुंग पर्वत; गंगा, सिंधु, नर्मदा, ब्रह्मपुत्र यांसारख्या सुदीर्घ नदनद्या; चिलका, वुलर, मंचर सारखीं प्रसन्न सरोवरें ज्या देशांत विराजत आहेत त्या देशांत अेखादा महान्, भीषण व रोमांचकारी जलप्रपात जर नसला तर प्रकृतिमातेला कृतार्थता कशी वाटावी ? दक्षिणेकडे कारवार जिल्हा आणि म्हैसूर राज्य यांच्या सरहद्दीवर असा अेक धबधबा आहे कीं जो जगामधें अद्वितीय किंवा सर्वश्रेष्ठ पदाचा अेकमेव अधिकारी नसला तरी सर्वश्रेष्ठ धबधब्यांपैकीं अेक आहे हें निःसंशय. अिंग्रज त्याला ‘ गेरसप्पा फॉल्स ’ या नांवानें ओळखतात त्याचें देशी नांव आहे ‘ जोग ’.

लॉर्ड कर्झन जेव्हां हिंदुस्थानांत आला तेव्हां हा धबधबा पहाण्यासाठीं तो अितका अुत्सुक झाला होता कीं या देशांत आल्यानंतर पहिली संधी साधून तो जोगचा धबधबा बघण्यास गेला आणि त्याच्या अद्भुत दर्शनानें त्यानें आपल्या डोळ्यांचें पारणें फेडलें. त्यानंतर आपल्या देशांत या धबधब्याची प्रतिष्ठा वाढली. ज्या जागेवरून लॉर्ड कर्झननें धबधबा पाहून स्वतःला कृतार्थ

केलें त्या जागेवर म्हैसूर सरकारनें अेक बाक तयार करविलें आहे. त्याला 'कर्झन सीट' असें म्हणतात.

धबधब्याच्या जवळच म्हैसूर सरकारनें अेक अतिथिशाळा बांधली आहे. तेथल्या भेट-वहींत निसर्ग प्रेमी देशी परदेशी प्रवाश्यांनीं वेळोवेळीं आपापले आनंदोद्गार लिहून ठेवलेले आहेत. या अुद्गारांचाच अेक संग्रह छापून प्रसिद्ध केला तर तो निसर्ग-काव्याचा अेक असाधारण गुच्छ होअील. तें सारें काव्य अुच्च कोटीचें असलें तरीहि जोगच्या प्रत्यक्ष दर्शनानें तर त्याची अपूर्णताच सिद्ध होतें आणि तोंडांतून अेकदम अुद्गार बाहेर पडतात.

**अेतावान् अस्य महिमा; अतो ज्यायांश्च पूरुषः ।**

शरावती अेक लहानशी नदी. असें असूनहि तिला तीन तीन नांवें कशीं काय पडलीं असावींत ? प्रथम ती भारंगी अथवा बारगंगा नांवानें ओळखली जाते; मधल्या भागांत तिला शरावती म्हणतात; आणि जेथें ती प्रौढ बनून समुद्राला जाअून मिळते तेथें तिला म्हणतात बालनदी ! शरावतीच्या प्रवाहानें त्या रोमांचकारी प्रपाताचें रूप धारण केलें नसतें तरीदेखील आपल्या अंगच्या नैसर्गिक सौंदर्यानें तो माणसाचें मन हरण केल्यावांचून राहिला नसता. पण मग हिन्दुस्तानांतील अनेक रूपवती नद्यांपर्की अेक नदी म्हणूनच तिची गणना झाली असती. या प्रपातामुळें लहानशी शरावती नदी भारतवर्षांतील अेक अद्वितीय सरिता होअून बसली आहे.

जोगच्या या अलौकिक दृश्याचें दर्शन घेण्यासाठीं राजाजी आणि अितर कांहीं मित्रांसह मी प्रथम गेलों होतों त्यावेळच्या त्या अद्भुत दृश्याच्या दर्शनानें अेक कुतूहल तृप्त होतें न होतें, तोंच मानवी स्वभावाला अनुसरून दुसरा नवीन संकल्प मनांत अुठला कीं अितक्या अुंचावरून अुडी घेतल्यावर ही नदी पुढें जाते कोठें, तेथें दिसते कशी, आणि सरित्पतीशीं तिचा संगम होतो कसा हें सर्व अेकदां प्रत्यक्ष पाहिलें पाहिजे. आणि साधल्यास बालक बनून शरावतीच्या वक्षःस्थलावर नौकाविहार केला पाहिजे. अंतरात्म्याच्या या जिज्ञासेला सत्यसंकल्प परमेश्वरानें आशीर्वाद देअून अुचलून धरलें आणि अेक तप लोटण्याच्या आधींच जोगचें दुसऱ्यांदा दर्शन घेण्याचें सुदैव मला प्राप्त झालें. पहिल्या खेपेस आम्ही वरच्या बाजूनें धबधब्याकडे गेलों होतों; यावेळीं

नदीच्या मुखाकडून प्रवेश करून होडींत बसून आम्ही प्रतीप-प्रवास केला आणि जेथें होडी पुढें जाअीना, तेथून तैलवाहना (मोटरी)च्या साहाय्यानें घाट चढून धबधब्याच्या माथ्यावर जाअून पोंचलों.

शरावतीच्या अर्धचंद्राकार दरींत चार धबधबे आहेत. अुजव्या बाजूस 'राजा' नांवाचा धबधबा आहे. तो वरून अेकदम सरळ ९६० फूट खालीं अुडी घेतो. त्याचें राजा नांव अगदीं यथार्थ आहे. त्याचा जलनिधि, त्याचा अुन्माद आणि त्याची हिंमत अेखाद्या जगदेक सम्राटाला शोभतील असेच आहेत. त्याच्या डाव्या बाजूचा महारुद्राप्रमाणें गर्जना करणारा 'रुद्र (Roarer) प्रपात' राजाच्या चरणावर येअून पडतो. रुद्राची घोर गर्जना आसपासच्या टेकड्या आणि दरी यांना कित्येक मैलांपर्यन्त निनादित करून टाकते. त्याच्या ध्वनीला नाहीं म्हणतां येत मेघगंभीर कीं नाहीं म्हणत. येत सागरगंभीर. कारण मेघगर्जना आकाश-विद्रावी असली तरी क्षणजीवी असते. आणि सागराच्या सनातन गर्जनेला भरती ओहोटीचे हेलकावे खावे लागतात. रुद्राचा ध्वनि अविरत, अखंड आणि धारावाहिक आहे. अशा ध्वनीचा अुन्माद कांहीं विलक्षणच असतो.

राजाला आणि आणि रुद्राला पृथ्वीवर कोठेंहि सम्राटाची पदवी मिळूं शकेल. पण जोगचें खरें वैभव तर आकाशांत नानाविध रूपांनीं अुडणाऱ्या वीरभद्रा (Rocket) च्या शुभ्र जलजटांमुळें आहे. वीरभद्राचा प्रपात हत्तीच्या गंडस्थळासारख्या अेका विशाल शिलाखंडावर येअून पडतांक्षणींच त्यांतून दारूकामाच्या बाणांसारखे फवारे अुंचच अुंच अुडतच रहातात. हें काय शंकराचें तांडव नृत्य? कीं महाकवि व्यासाच्या प्रतिभेचा नवनवोन्मेषशाली कल्पनाविलास? कीं सूर्यबिंबाच्या पृष्ठभागांतून अुसळणाऱ्या सर्वसंहारकारी पण कल्पनारम्य ज्वाळा? किंवा भूमातेच्या वात्सल्यप्रेरित स्तन्यधारांचे फवारे? अशा अनेक कल्पना मनांत अुठतात. खरोखरच पहाणाऱ्याच्या डोळ्यांना वीरभद्र पागल करून सोडतो.

वीरभद्राच्या बाजूला कर्पूरगौरा, तन्वंगी आणि अनूदरी पर्वतकन्या पार्वती (Lady) स्वतःच्या लावण्यानें आपल्याला आनंदित करते.

चार प्रपातांचें रक्षण करण्याकरितांच कीं काय त्यांच्या दोन्ही बाजूस दोन

प्रचंड पर्वत अुभे आहेत. अुभ्या अुभ्या हे अंगरक्षक आणखी काय करणार? प्रपातांची अखंड गर्जना प्रतिक्षणीं प्रतिध्वनित करणें, त्यांचीं अिन्द्रधनुष्यें धारण करणें आणि विविध प्रकारच्या वनस्पतींनीं देह शृंगारून सदा पुलकित होअून रहाणें हीच त्यांची अविरत प्रवृत्ति होअून बसली आहे.

या खेपेस आम्ही गेलों ते अुन्हाळयाचे दिवस होते. भारंगीचें पाणी चांगलेंच ओसरलेलें होतें. वीरभद्राच्या जटा कोठेंहि दिसत नव्हत्या. रुद्राच्या लांबलांब अुड्याहि आतां आखूड झाल्या होत्या. पार्वतीनें आतां विरहिणीचा वेष धारण केला होता. कांहीं नाहीं तरी 'राजा'चें वैभव तरी पहाण्यासारखें असेलच अशी आम्ही आशा बाळगली होती, पण विश्वजित् यज्ञाच्या अंतीं जसा अेखादा धन्य सम्राट अकिंचन बनतो आणि अशा अवस्थेंतहि आपलें वैभव व्यक्त करतो—अगदीं तशीच स्थिति 'राजा'ची झाली होती.

यावेळीं आम्ही शरावतीच्या अुजव्या म्हणजे अुत्तरेकडील अंगानें येअून पोंचलों होतों. अतिथिगृहांत न थांबतां आम्ही धावत धावत सरळ 'राजा' प्रपाताच्या शेजारीं जाअून अुभे ठाकलों.

तेथें अेका बाजूनें कडक अून आणि दुसऱ्या बाजूनें खालून अुडणाऱ्या तुषारांचें थंडगार धुकें या दोहोंमधें सांपडून आमची जी अवस्था झाली तिचें वर्णन करणें कठीण आहे. राजाच्या मुकुटाप्रमाणें शोभणाऱ्या अून अून दगडांवर ओणवे होअून आम्ही खाली दरींत डोकावलें. वरून राजाची जी धारा खालीं पडत होती ती खोलवर जमिनीपर्यंत पोंचतच नव्हती. अेखाद्या मदोन्मत्त हत्तीच्या सोंडेसारखा अेक प्रचंड स्रोत वरून खालीं पडतांना आम्हांला दिसत होता. खालीं पडतां पडतां शतधा विदीर्ण होअून त्याच्या सहस्रधारा बनत आणि पुढें त्या धारांचे मोठमोठे जलबिंदु बनून मोत्यांच्या माळांप्रमाणें त्या शोभूं लागत. या मोत्यांचेंहि थोडें पुढें गेल्यावर चूर्ण बनून त्यांचे मोठमोठे कण दिसूं लागले. आतां खालीं पुढें जाण्याचें सोडून त्यांनीं थोडा स्वच्छंद-विहार सुरू केला. हे मोठे कणदेखील छिन्नभिन्न झाले आणि सीकरपुंजाचें रूप धारण करून ढगांप्रमाणें विहार करूं लागले. पण अेवढ्यानें प्रकृतिमातेचें समाधान झालें नाहीं. या ढगांमधून पुढें निहारिकेचें धुकें बनलें आणि वाऱ्याच्या लहरींसह अुडत तें साऱ्या वातावरणाला शीतल बनवूं

लागलें. आश्चर्याची गोष्ट ही कीं अेवढ्या मोठ्या जलधारेचें अेक टिपुस देखील थेट जमिनीपर्यंत पोंचत नव्हतें! खालची जमीन पहावी तर गरम आणि वरची हवा मात्र थंड! अशी ही स्थिति पाहून मला राजेलोकांच्या योजना-शून्य दानाचें स्मरण झालें. प्रजानन दुष्काळानें पीडित होत असलेले पाहून आपले राजे जेव्हां सढळ हातानें पैसे देअूं लागतात तेव्हां त्यांच्या जयजयकारानें सारें वातावरण दुमदुमून निघतें, पण गरीब बिचाऱ्या जनतेच्या मुखापर्यंन्त अन्नाचा अेक कण पोंचत असेल तर शपथ!

अिथल्या अिन्द्रधनुष्यांची शोभा अशी होती कीं अलकेश्वराच्या मनांतहि अीर्ष्या अुत्पन्न व्हावी. मात्र हीं अिन्द्रधनुष्यें स्थायी नव्हतीं. वाऱ्याची लहर जशी दिशा बदले तसे हे सीकर-पुंज देखील आपलें स्थान बदलत. त्यामुळें पार्वतीच्या अिशाऱ्याप्रमाणें शंकरानें नाचावें त्याप्रमाणें हीं अिंद्रधनुष्यें अिकडून तिकडे नाचतांना दिसत होतीं. क्षणांत तीं क्षीण होत तर दुसऱ्याच क्षणीं मयासुराच्या महालाची शोभा धारण करीत. कर्माबरोबर जसें त्याचें फळहि येतेंच, त्याप्रमाणें प्रत्येक धनुष्याबरोबर त्याचें प्रति-धनुष्य देखील आपला वर्णक्रम बरोबर अुलटा करून हजर होअी. आम्ही जागा बदलली म्हणून त्या सुरधनुष्यांनीं देखील आपलें स्थान बदललें. सुरधनु आणि सुरधुनी यांची ही आह्लादजनक क्रीडा आम्ही बराच वेळपर्यंन्त विस्मय-मुग्ध होअून पहातच राहिलों. जितकें अधिक पहावें तितकी दर्शनाची तहान वाढतच जाअी. तास दोनतासच येथें थांबणें शक्य आहे हें आम्हांला ठाअूक होतें. प्रतिक्षणीं आपलें समयरूपी पुण्य क्षीण होत आहे, आणि थोड्याच वेळांत आपल्याला व्यवहाराच्या मर्त्य लोकांत परत जावयाचें आहे याचें आम्हांला पुरतें भान होतें. स्वर्ग-लोभी देव ज्या विषादासहित स्वर्ग-सुखाचा अुपभोग घेत असतात, पराक्रमी पुरुष आपल्या यौवनाच्या अुत्तरार्धांत आपल्या संकल्पाच्या पूर्तीसाठीं जसे अधीर होअून जातात, त्याच विषादानें आणि तितकेच अधीर होअून आम्ही सर्व त्या गंधर्वनगरीचें डोळे, कान, नाक आणि संपूर्ण त्वचेनें सेवन करूं लागलों आणि त्याचबरोबर आपल्या कल्पनेच्या द्वारा त्याच आनंदाला शत-गुणित करून त्याचा आस्वाद घेअूं लागलों.

आदल्या दिवशीं आम्ही तीन होड्या करून निघालों होतों. मधल्या होडींत स्त्रिया व मुलें होतीं आणि बाजूनें चालणाऱ्या दोन होड्यांत आम्ही

थोडेसें विषयान्तर करणें आवश्यक आहे. युरोपांत जेव्हां महायुद्ध भडकलें आणि लाखों युवक तोफा-बंदुकांना बळी पडूं लागले तेव्हां युरोपचे साहित्य-शिरोमणि रोमें रोलांच्या भूतदयेला पाझर फुटला आणि दुसऱ्या लोकांप्रमाणें त्यांनीं स्वतः देखील घायाळ लोकांच्या सेवेसाठीं थोडीबहुत व्यवस्था केली. पण अुभय पक्षांच्या शत्रूंनीं जेव्हां परस्परांच्या कलापूर्ण अिमारतींवर बॉंबचा वर्षाव सुरूं केला, तेव्हां मात्र रोमें रोलांचा कलात्मा पुण्य-प्रकोपानें खवळून अुठला आणि बुलंद आवाजानें त्यांनीं साऱ्या युरोपाला बजावलें कीं, 'अरे करंट्यांनो, तुम्हांला अेकमेकाला मारून टाकायचें असेल तर खुशाल मारा, जगांतून कायमचें नष्ट व्हायचें असेल तर नष्ट व्हा; पण या कलाकृति म्हणजे आत्म्याच्या अभिव्यक्तीच्या अमर कृति आहेत. यांच्या द्वाराच समस्त मानव जातीचा आत्मा स्वतःला प्रकट करीत असतो; निदान यांचा तरी नाश करूं नका!'

रोमें रोलांची ही आर्षवाणी युरोपच्या आत्म्यानें अैकली आणि युद्धमान पक्षांनीं कलाकृतींचा संहार थांबवला. आतां प्रश्न असा आहे कीं खरोखरीच कलाकृति मानवी आत्म्याच्या अभिव्यक्तीच्या द्योतक किंवा प्रेरक आहेत का? कीं त्या केवळ अुच्च अभिरुचीच्या आवरणामागें दडलेल्या विलासितेचीच साधन-सामग्री आहेत?

कलेचा ज्याला खराखुरा साक्षात्कार झाला आहे तो लागलीच अुत्तर देअील कीं कला आणि विलासिता यांच्यांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. आणि खऱ्या कलाकृतीच्या द्वारा जो निरतिशय आनंद होतो तो निजलेल्या आत्म्याला खरोखर जागृत केल्यावांचून रहात नाहीं. करोडों व्हॉल्टची विद्युत्-शक्ति अुत्पन्न करून लाखों लोकांच्या आजीविकेची व्यवस्था करणें कांहीं साधीसुधी गोष्ट नव्हे, पण असंख्य माणसांना कलेच्या द्वारा जो आनंद आणि जी संस्कारिता प्राप्त होते ती तर त्यांच्या आत्म्यालाच समृद्ध करीत असते.

आणि जोग कांहीं मानवी कलाकृति नव्हे. अुलट कलाकारांना भव्यता आणि रम्यता यांचें अेकाच वेळीं शिक्षण आणि दीक्षा देणारी प्रकृति मातेची ती अेक अलौकिक विभूति आहे. तिला बिघडवणें म्हणजे पाखंडी विद्रोह करण्यासारखें आहे आणि तसें कांहीं करण्यापूर्वीं आपल्याला हजार वेळां विचार करावा लागेल. जोगचा प्रपात कांहीं चालू जमान्याचीच संपत्ति नाहीं. आपल्या अनेक अृषि-पूर्वजांनीं त्याच्या शेजारीं बसून परमेश्वराचें

ध्यान केलें असेल आणि आपल्या वंशजांचे वंशज देखील त्याचें दर्शन करून आपल्या जीवनांतील अज्ञात वृत्तींचा व शक्तींचा साक्षात्कार करतील.

अुपयुक्ततावादाचा आश्रय घेअून '**अल्पस्य हेतोः बहु हातुम् अिच्छन्**' असे विचारमूढ आपण बनूं नये. हा धबधबा सुरक्षित ठेअून त्यांतून जो कांहीं लाभ करून घेण्याजोगा असेल तो अवश्य करून घ्यावा. ही गोष्ट मानवी बुद्धीच्या आवाक्याबाहेरची असण्याचें कारण नाहीं. पण या तांडवयोगाच्या दर्शनापासून मानवजातीला वंचित करण्याचा धर्मतः कुणालाहि अधिकार नाहीं. मंदिरांत आपण मूर्तींची स्थापना करतों; त्याचप्रमाणें निसर्गानेंसुद्धां येथें विराट स्वरूपाच्या भव्य प्रतिमा आपल्यापुढें स्थापन केल्या आहेत. येथें केवळ दर्शन, ध्यान आणि अुपासना करण्यासाठींच यावें आणि हृदयांत तसेंच सामर्थ्य असेल तर तदाकार होअून जावें. अितकाच आपला अधिकार आहे.

मे १९३८

# : १४ : जोगचा कोरडा धबधबा

कोणत्या कवीनें म्हटलें आहे आठवत नाहीं; पण त्याचा तो विचार माझ्या शब्दांत मांडतों.

पर्वतप्राय लाटा अुसळवणारा समुद्र भयानक खरा; पण जर त्याचें सारें पाणी सुकून गेलें आणि पात्र रिकामें झालें, तर हजारो मैल पसरलेले त्याचे ते खोल खड्डे किती भयानक बनतील याची कल्पना देखील करणें कठीण आहे. अेखाद्या दुर्जनापाशीं संपत्तीचें भांडार असलें तर तो त्या संपत्तीचा दुरुपयोग करून प्रजेला छळील हें खरें, पण जर त्याच्या जवळील ती संपत्ति नष्ट झाली आणि तो अगदीं भुकेकंगाल बनला तर कोणती राक्षसी दुष्टता करण्याचें तो बाकी ठेवील? सुदैव आपलें कीं समुद्र पाण्यानें तुडुंब भरलेला असतो आणि दुर्जना-जवळ आपल्या दुष्टतेची आग शमवण्यापुरती संपत्ति असते.

गिरसप्प्याच्या जोगच्या धबधब्यांपैकीं राजा आणि रुद्र धबधबे सुकलेले पाहून कवीची वरील अुक्ति आठवण्याचें वास्तविक कांहीं कारण नव्हतें. पण तरीहि ती आठवली खरी.

’२७ सालीं जेव्हां पहिल्याप्रथम जोगचा धबधबा पाहिला तेव्हां तो आपलें वैभव षोडष कलांनीं धोधावत होता. पाण्याचा मुख्य प्रपात आपल्या प्रचंड जथ्यासह ८४० फूट खालीं अुडी घेत होता आणि खालच्या दरींत धबधब्याच्या प्रवाहानेंच बनवलेल्या १५० फूट खोल तलावाच्या गादीवर अंग झोंकून देत होता. या मुख्य प्रवाहाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं त्याच्या दोन बाजूस मोत्याच्या सराप्रमाणें पाण्याच्या अनेक धारा दोन्ही अंगांनीं, नाना तऱ्हांनीं कोसळत होत्या. त्याच्या दक्षिणेस तिरप्या पायऱ्यांवरून अुड्या घेत घेत रुद्र आपलें पाणी, अर्ध्या-अधिक पातानंतर, राजाच्या पाण्यांत फेंकून देत होता. राजाची गर्जना जवळ जवळ खालीं पोंचल्यानंतरच अुत्पन्न होते. रुद्र धबधबा रावणाप्रमाणें जन्म घेताक्षणींच आरोळया ठोकूं लागतो.

हे दोन्ही धबधबे अद्‌भुत तर खरेच. पण त्यावेळीं मला अलौकिक वाटलेलें वीरभद्राच्या अुडणाऱ्या जटांचें तें दृश्य मला पुन्हां कधींच पहायला मिळालें नाहीं आणि कुठल्याहि फोटोंत देखील त्या वीरभद्री जटांचें चित्र आलेलें नाहीं.

शेवटचा प्रपात पार्वतीचा. तिला पाहिल्याबरोबर मनांत स्त्रीदाक्षिण्यच अुत्पन्न व्हावें.

त्यानंतर दहा वर्षांनीं जेव्हां जोगचें पुन्हां अेकदां दर्शन घेतलें, तेव्हां राजा धबधबा क्षीण बनला होता; वीरभद्राच्या जटांचें मुंडन झालें होतें; रुद्राच्या आरोळया कमी झाल्या नव्हत्या, पण त्याच्या त्या मोठ्या तालाचा जोगच्या क्षीण धबधब्याशीं मेळ बसत नव्हता. आणि पार्वती तर अगदींच कृशांगी तपस्विनी बनली होती.

पण या साऱ्या संकोचाचा विसर पडावा अशी खुबी धबधब्याच्या थंड वाफेंतून अुत्पन्न होणाऱ्या अिन्द्रधनुष्यांच्या भ्रूविलासांत भरलेली होती. आम्ही ती शोभा जितक्या बाजूंनीं म्हणून पाहूं जावें, तितक्या बाजूंना आपलें तोंड फिरवून अिंद्रधनुष्यें नवें नवें सौंदर्य प्रकट करीत होतीं.

पुन्हा बरोबर दहा वर्षांनंतर जोगचा तोच धबधबा पहाण्यासाठीं जेव्हां यावेळीं आम्ही गेलों तेव्हां चारांपैकीं तीन धबधबे सुकून अगदीं कोरडे ठणठणीत झालेले होते. रुद्राच्या अभावीं सगळीकडे स्मशान-शांति पसरली होती. राजा सुकून गेल्यामुळें त्याच्यामागल्या अेका खालोखाल

अेक अशा दोन मोठ्या दऱ्या, औरंगजेबानें बाहेर काढलेल्या संभाजीच्या डोळ्यांप्रमाणें भयानक दिसत होत्या. पार्वती जणूं काय दक्षाच्या यज्ञांत जळून भस्म झाली होती आणि वीरभद्र दक्षाचा नाश केल्यानंतर अमळ शांत होअून आपल्या स्वामीच्या सासऱ्याच्या मृत्यूवर नीरव आंसू ढाळीत असावा तसा दिसत होता. अितकी विषण्णता महाभारताच्या युद्धानंतर कुरुक्षेत्रावर देखील पसरली नसेल.

पहिल्या वेळीं आम्ही गेलों होतों ते शिमोगा–सागरच्या रस्त्यानें, गुजरातवरील महापुराच्या संकटाच्या दिवसांत. दुसऱ्या वेळीं गेलों तेव्हां हेतुपुरस्सर समुद्राकडून अुलट्या क्रमानें शरावतीच्या आंत वरच्या दिशेनें प्रवास करून. पूर्वजांनीं सांगितलें आहे : नदीमुखेनैव समुद्रम् आविशेत्। त्यांच्या या शिकवणुकीच्या अगदीं अुलट शरावती–सागर–संगमापाशीं नावेंत बसून प्रतीप–क्रमानें आम्ही जोगच्या प्रपाताच्या पायऱ्यांपर्यंत पोंचलों होतों आणि तेथून डोंगरी पायवाटेनें चढून धबधब्याच्या माथ्यावर पोंचलों होतों. या वेळची तिसरी यात्रा आम्ही तिसऱ्याच रस्त्यानें केली. शिरसीहून सिद्धापुरला जाअून तेथून आम्ही या धबधब्याच्या मुंबअी–बाजूस पोंचलों. तेथें राजाच्या मस्तकावर विराजणाऱ्या अेका मोठ्या शिलेवर आडवे निजून खालचें रोमहर्षक दृश्य आम्हीं पाहिलें. कोनाड्यासारख्या विक्राळ दरीच्या माथ्यावर पोंचून आंत डोकावतांना साऱ्या शरीराला कंप सुटतो. ही शिला आपल्याच भारानें कोसळली तर! अशी शंका मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

या शिलेच्या शेजारीं तितकीच मोठी आणि तितक्याच भयानक जागीं अुभी असलेली दुसरी अेक शिला आहे. तिच्यावर प्राचीन काळीं कोण्या अेका राजानें लग्न–मंडप अुभारला असेल. आज मात्र त्या मंडपाचे चार खांब बसविण्यासाठीं म्हणून केलेल्या चार छिद्रांचे मोठे चौरस त्या शिलेवर आढळतात. भयानक धबधब्याच्या कड्याच्या कांठावर मंडप अुभारून लग्न करणाऱ्या राजाच्या काव्यमय वृत्तीचें कौतुक करावें तितकें थोडेंच! अशा शौकीन राजाशीं लग्न करणाऱ्या राजकन्येच्या मनांत या मंडपांत बसल्या बसल्या कसकसले भाव अुमटले असतील! कुणीसें म्हटलें, 'भीषण रसाची गोडी असलेल्या त्या राजाचें नांवच या धबधब्याला ठेवण्यांत आलें आहे.' मीं मनांशीं विचार केला कीं तर मग त्याच्याशीं विवाहबद्ध झालेल्या राजकन्येचें

नांव आपल्याला माहीत नाहीं याचा लाभ घेअून, तिलाच आपण पार्वती कां म्हणूं नये ? पर्वताच्या कड्याच्या किनाऱ्यावर तिचा विवाह झाला अितकें कारण पुरेसें नाहीं ?

पर्वतांत कोनाड्यासारख्या दऱ्या मीं बघितल्या नाहींत असें नाहीं. मशिदींत सुद्धां भिंतींत खळगा करून त्याच्या भोंवतीं मेहराब्र करतात. परंतु राजाच्या खालचा कोनाडा तर काळपुरुषाच्या तोंडापेक्षांहि मोठा आणि शिवाय बोळकें झालेला! त्याच्या आंत जेथें जागा सांपडेल तेथें पक्षी आपलीं घरटीं बांधतात आणि टिपून आणलेले परिपक्व धान्याचे दाणे सांठवतात.

मुंबअी-बाजूनें म्हणजेच अुत्तरेकडील बाजूनें डोळेभर पाहून घेतल्यानंतर मोटरींत बसून आम्ही पूर्वेकडे गेलों. तेथें दोन होड्या मिळून बनविलेल्या अेका तराफ्यावर (अशा तराफ्याला येथें जंगल म्हणतात. अशा जंगलावर) आमची मोटर चढवून आम्ही शरावती नदी पार करून दक्षिण किनाऱ्यावर आलों. तेथून म्हैसूर सरकारच्या अतिथिशाळेजवळून त्या साऱ्या दरींचें दृश्य पुन्हां अेकदां पाहिलें. वीस वर्षांपूर्वी याच ठिकाणावरून राजा, वीरभद्र आणि पार्वती यांचें देवदुर्लभ दृश्य पाहिलें होतें. यावेळच्या कोरड्या दृश्यांत काव्य नव्हतें असें नाहीं. अेका खालोखाल अेक असे दोन मोठे कोनाडे ४८० फुटांचें पतन मोजून काढीत आहेत असें दृश्य विधात्याच्या विविध सृष्टींत सहजासहजीं थोडेंच बघायला मिळणार होतें ?

माझ्या मनांत दाटलेला विषाद दरींतल्या झाडांवर मला आढळला नाहीं. दोन्ही कोनाड्यांत गोलगोल घिरट्या घालणारे पक्षी देखील विषण्ण वाटत नव्हते. आकाशांत तरंगत राहून धबधब्याच्या दरींत डोकावणारे ढग देखील गंभीर दिसत नव्हते. तर मग पोकळपणाचें तें दृश्य पाहून मीच कां अितका अस्वस्थ होत आहें ? वीस वर्षांपूर्वी पाहिलेली पाण्याची समृद्धि आठवून ? कीं दहा वर्षांपूर्वी बघितलेला अिंद्रधनुष्यांचा चमत्कार आठवून ? पण ती जलसमृद्धि आणि तो वर्णसंकर कायमचे थोडेच नाहींसे झाले आहेत ? हजारों वर्षे दर अुन्हाळयांत असें कोरडेंपण पहावयास मिळत असेल आणि दर पावसाळयांत भारंगी साऱ्या दरीला जलबंबाळ करून टाकीत असेल. अशी ही घटमाळ चालतच रहाणार. तत्र का परिदेवना ?

जोगच्या धबधब्याच्या या तिसऱ्या दर्शनानंतर अिथल्या अितिहासाचा नवा अध्याय आम्ही अुघडला.

वीस वर्षांपूर्वी मीं अैकलें होतें कीं या धबधब्याच्या पाण्यापासून वीज अुत्पन्न करण्याचा म्हैसूर सरकारचा विचार आहे. मुंबअी सरकार आणि म्हैसूर सरकार यांच्यामधें या बाबतींत पत्रव्यवहार चालू आहे. या दोन सरकारांचें अेकमत झालें नाहीं, म्हणूनच विजेची ही योजना अजून अमलांत आली नाहीं.

त्यावेळीं मीं मनांत प्रार्थना केली होती कीं देव करो आणि ते दोघे कधींच अेकमत न होवोत. वीज अुत्पन्न करून कारखाने चालतील आणि देशाची समृद्धि वाढविण्याच्या नांवाखालीं देशांतील गरिबांची पिळवणूक होअील अशी भीति माझ्या मनांत होती. पण त्याहूनहि अधिक भीति होती ती ही कीं यंत्रें आल्यामुळें धबधबा खुंटून जाअील आणि निसर्गाचें हें भव्य दर्शन कायमचें नष्ट होअील. पण सुदैवानें माझी ती भीति खरी ठरली नाहीं.

अिंजिनियर लोकांनीं धबधब्याच्या बऱ्याच वर अेक बांध बांधून पाण्याचा समुदाय अडविला आहे. अजून हें काम पुरें झालें नाहीं. बांध बांधून अडविलेल्या पाण्याचे चार कालवे अेका बाजूला घेअून जाअून म्हैसूर-बाजूनें धबधब्यापासून चांगलें दूर, टेकडीवरून खालीं सोडून दिले आहेत—धबधब्याच्या रूपांत नव्हे, तर तिरकस अुतरलेल्या अगडबंब चार नळांच्या द्वारां. नळांच्या द्वारा पाणी जेथें पोंचतें, तेथें त्या पाण्याच्या वेगानें चालणारीं यंत्रें बसवून त्यांतून वीज अुत्पन्न केली जाते. आतां अितकी कांहीं वीज अुत्पन्न होअील कीं म्हैसूर राज्याची भूक भागवून, थोडीशी वीज हैद्राबाद राज्याला देखील देतां येअील. आणि मुंबअी सरकारच्या होन्नावरच्या सरहद्दीवरून शरावती नदी जाते अेवढ्यासाठीं म्हणून अमुक हजार किलोवॉट वीज मुंबअी सरकारला देखील देण्यांत येअील. न्यायाच्या दृष्टीनें पाहूं जातां या विजेवरील पहिला हक्क होन्नावर तालुक्याचा आणि कारवार जिल्ह्याचा. पण हे जिल्हे औद्योगिक दृष्टीनें अजून विकास पावलेले नसल्यामुळें ही वीज धारवाड जिल्ह्याला देण्याचें नक्की झालें आहे. त्यामुळें कारवार जिल्ह्याचे लोक नाराज झाले आहेत. कारवार जिल्ह्याची खनिज संपत्ति आणि अुद्भिज्ज संपत्ति धारवाड जिल्ह्यापेक्षां कितीतरी पटींनीं अधिक आहे. त्याला समुद्र किनारा असल्यामुळें व्यापारहि चांगला भरभराटण्याची शक्यता आहे. कारवार

जिल्ह्यांत काळी, गंगावळी, अघनाशिनी आणि शरावती या चार नद्या नौका-नयनासाठीं अनुकूल असल्यामुळें या जिल्ह्याचें अुद्योगीकरण करणें फार सोपें आहे. पण आज त्या जिल्ह्यांत मोठे अुद्योग नाहींत असें सांगून त्याला वीज देण्याचें नाकारण्यांत येत आहे आणि त्याच्यापाशीं वीज नाहीं म्हणून तेथें अुद्योगांचा विकास होणें शक्य नाहीं असेंहि त्याला अैकविण्यांत येत आहे. तामिळ भाषेंतील अेका म्हणीप्रमाणें ‘लग्न होत नाहीं म्हणून मुलीचें वेड जात नाहीं आणि वेड दूर होत नाहीं म्हणून मुलीचें लग्न होत नाहीं.’ तशांतली ही गत झाली आहे.

मी आशा बाळगतों कीं स्वराज्य-सरकारकडून या अन्यायाचें निराकरण होअील आणि कारवार जिल्ह्याला शरावतीची वीज मिळूं लागेल. या शिवाय कारवारजवळ अुंचळ्ळी, मागोडसारखे दुसरे देखील लहानमोठे तीनचार चांगले धबधबे आहेत. शरावतीची वीज मिळाली कीं तिच्या मदतीनें अितर धबधब्यांनाहि वेसण घालतां येअील आणि मग कारवार जिल्ह्यांत पावसाप्रमाणें वीजहि भरपूर होअील. जेथें चार नद्या पर्वतप्राय अुंचीवरून धाड्दिशीं खालीं पडतात तेथें आज ना अुद्यां मनुष्य व्यापारी वीज अुत्पन्न केल्याशिवाय रहाणार नाहीं.

मला संतोष वाटला तो अेवढ्याचसाठीं कीं शरावतीच्या पाण्यांतून वीज अुत्पन्न करूनसुद्धां जोगचें नैसर्गिक स्वरूप रतिमात्र देखील खंडित होणार नाहीं. बांधामुळें वाटेल तितकें पाणी अडवून ठेवण्यांत आलें तरी देखील नेहमींच्या प्रवाहांतलें पाणी कमी होत नाहीं. पावसाळ्यांतलें पाणी भरून घेतल्यानंतर नेहमींचा प्रवाह नेहमीं प्रमाणेंच वाहणार. त्यांत प्रवाहाची दिशा, गति किंवा पाण्याचा जथा—कशांतहि कमतरता येणार नाहीं. अुलट लाभ होअील तो असा कीं अुन्हाळ्याच्या दिवसांत हजारो वर्षें सुकून जाणाऱ्या धबधब्याला अेखाद्या दिवशीं मनांत आणलें तर बांधाच्या खजिन्यांतून पाणी सोडून वाटेल तितक्या प्रचंड आणि तुफानी स्वरूपांत समूर्त करतां येअील, आणि मग त्याला पाहून आकाशांतल्या अुन्हाळ्यांतल्या अुष्मपा देवांनाहि आश्चर्यानें तोंडांत बोटें घालावीं लागतील!

धन्य आहे मानवी विज्ञानाची!

अेप्रिल १९४७

# : १५ : गुर्जरमाता साबरमती

अंग्रज सरकारशीं असहकार पुकारून महात्माजी स्वराज्याची तयारी करीत आहेत. अहमदाबादमध्यें गुजरात विद्यापीठाची स्थापना झाली आहे. स्वातंत्र्यवादी नवयुवक महाविद्यालयांत दाखल झाले आहेत. आपल्या आकांक्षा आणि कल्पनाविलास व्यक्त करण्यासाठीं त्यांना अेक मासिक हवें आहे. माझ्यापाशीं येअून ते विचारताहेत, 'मासिकाचें नांव काय ठेवावें ?' त्या जमान्यांत काकालाच आत्याबाअीचें काम करावें लागे !

मी म्हणालों, "मासिकें पुष्कळ निघतात. तुम्ही दोन दोन महिन्यांनीं अृतुअृतूला, नवीन रूपानें प्रकट होणारें नियतकालिक सुरू करा आणि त्याचें नांव ठेवा 'साबरमती.'" द्वैमासिकाची कल्पना तर आवडली; पण 'साबरमती' नांव कुणाला पसंत पडलें नाहीं. 'साबरमती' तर आपली ती नेहमींची नदी. रोज तिच्यांत जाअून आंघोळ करतों. तिच्यांत असें मोठें काय नावीन्य आहे कीं तें नांव आम्ही आपल्या नवचैतन्यशाली साहित्यप्रवाहाला द्यावें ? मीं म्हटलें, "साबरमतीचा प्रवाह सनातन आहे—आणि म्हणूनच नित्यनूतन आहे." अुदाहरण देण्याच्या दृष्टीनें मीं युक्तिवाद केला कीं, "सिंध हैदराबादच्या आपल्या मित्रांनीं, आपल्या कॉलेज मॅगेझिनचें नांव 'फुलेली' असें ठेवलें आहे. 'फुलेली' सिंधूचा अेक कालवा आहे. आपली ही अनाविला ( पंकरहित ) साबरमती गांधीयुगाची प्रतीक बनूं शकते. माझें सांगणें अैका आणि साबरमती नांव स्वीकारा."

तरुणांनीं माझी बूज ठेवण्यासाठीं म्हणून साबरमती नांव स्वीकारलें. पण वस्तुतः याहून अधिक जोरदार नांव त्यांना हवें होतें.

मीं नरहरिभाअींना सांगितलें, 'साबरमती गुजराथची विशेष अर्थानें लोकमाता आहे. आबूच्या परिसरांत ज्या अनेक नद्या अुगम पावतात, त्यांत ती ज्येष्ठ आणि श्रेष्ठ आहे. तिचें अेक गद्यस्तोत्र लिहून द्या.' त्यांनीं अुत्साहपूर्वक अेक लहानसा, सुंदर लेख लिहून दिला. विद्यार्थ्यांच्या भावना जागृत झाल्या. त्यांच्या मनांत या लोकमातेविषयींचा भक्तिभाव दृढ झाला आहेसें

पाहून मीं संधि साधली आणि विद्यार्थ्यांना म्हटलें, 'मीं सुचवलेलें नांव तुम्हीं अनिच्छेनें स्वीकारावें हें मला आवडणार नाहीं. म्हणत असाल तर दुसरें नांव सुचवतों.' सर्वांनीं अेकमुखानें अुत्तर दिलें, 'नाहीं, नाहीं, दुसऱ्या नांवाची गरज नाहीं. साबरमतीच सगळयांत अुत्तम आहे.'

मीं म्हटलें, 'त्याविषयीं तर मुळीं शंकाच नाहीं.'

* * *

माझ्या नदीपूजक हृदयानें भारतांतील अनेक नद्यांना वेळोवेळीं अंजल्या वाहिल्या आहेत. सिंधुपासून ते ब्रह्मपुत्रा आणि अिरावतीपर्यन्त, आणि दक्षिणेस पिनाकिनी आणि कावेरीपर्यन्त अनक नद्यांना मीं स्मरणांजलि अर्पण केली. पण त्यांतून गुजराथच्याच प्रमुख नद्या राहून गेल्या आहेत असें पाहून माझ्या अनेक वाचकांनीं मला त्याचें कारण विचारलें आणि गुजराथच्या लोकमातांविषयीं लिहिण्याचें आग्रहपूर्वक सुचवलें.

मीं म्हटलें, 'नद्यांच्या अुपस्थानाची प्रेरणा मीं दिली आहे. आतां गुजराथच्या नद्यांबद्दल गुजरार्थीत कुणी गुर्जरी पुत्रानें लिहावें यांतच औचित्य आहे.'

या गोष्टीची देखील चांगलीच प्रतीक्षा करण्यांत आली आणि मग वारंवार मला सूचना करण्यांत आली. पण शेवटीं माझी श्रद्धा खरी ठरली आणि गुजराथ विद्यापीठाचे विद्यार्थी, वनस्पति-अुपासक श्री. शिवशंकर यांनीं गुजराथच्या लोकमातांविषयीं लिहिण्यास प्रारंभ केला. हें काम कधींतरी अवश्य पुरें होअील. साबरमतीच्या प्रवाह कुटुंबाबद्दल त्यांनीं पुरेसें लिहिलें आहे याबद्दल मला संतोष वाटतो आणि म्हणून मला विस्तारपूर्वक लिहिण्याची आवश्यकता अुरली नाहीं. पण ज्या नदीच्या कांठीं महात्माजी आणि सहसोबती यांच्या सहवासांत २५–३० वर्षें घालवलीं, त्या नदीला श्रद्धांजलि अर्पण करण्याचें कर्तव्य तसेंच राहून जात होतें. तें प्रसन्नतापूर्वक पुरें करण्यासाठीं थोडें लिहीत आहें.

प्रत्येक नांवाला संस्कृत रूप देण्याचा संस्कृत कवींचा प्रयत्न असतो. साबरमतीचें संस्कृत करण्याचा खटपटींत त्यांनीं साभ्रमति शब्द निष्पन्न केला आणि त्यांतहि दोन प्रकारें त्याचा पदच्छेद केला. सा भ्रमति—ती भटकते,

वांकडींतिकडीं वळणें घेते असा अर्थ कित्येक करतात. तर दुसरे कित्येक म्हणतात कीं या नदीच्या प्रवाहावरील आकाशांत अभ्र म्हणजे ढग आढळून येतात म्हणून ती अभ्रमती अथवा साभ्रमती होय. मला वाटतें हा सारा खटाटोप व्यर्थ आहे.

ज्या नदीच्या कांठीं गाअींचे कळप फिरतात, चरतात, पुष्ट होतात ती जशी अेकतर गो-दा ( गोदावरी ) अथवा गो-मती, ज्या नदीच्या कांठीं आणि प्रवाहांत सुद्धां पुष्कळ दगड आहेत ती जशी दृषद्-वती, त्याचप्रमाणें अनेक सरोवरांना जोडणारी किंवा सारस पक्ष्यांनीं शोभणारी ती सरस्-वती. याच न्यायानें वाघ-मती, हाथ-मती, अैरावती अित्यादि अनेक नांवें आपल्या पूर्वजांनीं येथल्या नद्यांना दिलीं आहेत. त्यांतली हाथमती तर साबरमतीला मिळणारीच आहे. हरणें आणि सांबर जिच्या कांठीं वसतात, झुंजतात आणि मुक्तपणें विहार करतात ती साबरमती. तिचा संबंध 'श्वभ्र' शीं जोडून देण्याची कांहीं जरूर नाहीं.

गुजराथच्या नद्यांपैकीं तीनचार मोठ्या नद्या आंतरप्रान्तीय आहेत. नर्मदा, तापी, मही—या तिघी दूर-दुरून अुगम पावून पूर्वेकडून येअून गुजराथमध्यें प्रवेश करतात आणि समुद्रांत विलीन होतात. साबरमती त्यांहून वेगळी आहे. अरवलीच्या पर्वतांत अुगम पावून, अनेक नद्यांची सोबत मिळवून दक्षिणेकडे वहात ती शेवटीं समुद्राला जाअून मिळते. साबरमतीअितक्या कुटुंबवत्सल नद्या आपल्या देशांत देखील फारशा नाहींत. साबरमतीला विशेष रूपानें गुर्जरी माता म्हणतां येअील. तिच्या कांठीं गुजराथचे आदिवासी सनातन काळापासून रहात आले आहेत; तिच्या तीरावर ब्राह्मणांनीं तप केलें आहे; रजपुतांनीं कित्येकदां धर्मासाठीं तर पुष्कळदां आपल्या मूर्खतापूर्ण हेक्यासाठीं वीर पुरुषार्थ करून दाखविला आहे; वैश्यांनीं तिच्या कांठीं गांवें आणि शहरें वसवून भरभराट पसरवली आहे; आणि आतां शूद्रांनीं देखील आधुनिक युगाला अनुसरून साबरमतीच्या कांठांवर गिरण्या चालवल्या आहेत.

खरें पाहिलें तर या नद्यांशीं घनिष्ठ संपर्क असतो तो पशुपक्ष्यांप्रमाणें आदिवासी लोकांचाच होय. म्हणून साबरमतीच्या कुटुंबविस्ताराचें काव्य गोळा करावयाचें असेल तर पुराणांच्या अैवजीं आदिवासी लोकांच्या लोककथा आणि लोकगीतें यांच्याकडे आपलें लक्ष गेलें पाहिजे. पण आजच्या संशोधक

तरुणांना या कामाबद्दल अुत्साह वाटूं लागून आदिवासी गिरिजनांशीं मिसळण्या-साठीं ते वेळ काढीपर्यन्त आदिवासींच्या नदी–कथा लुप्त होतील कीं काय अशी भीति वाटते.

केवळ नदी–भक्तीनें प्रेरित होअून आदिवासी लोकांनीं भरवलेला वौठ्याचा मेळा जोंपर्यन्त भरत आहे तोंपर्यन्त याबाबतींत अगदींच निराश होण्याचें कारण नाहीं. सात नद्यांचें पाणी क्रमाक्रमानें अेकमेकांत मिसळून ज्या ठिकाणीं अेकत्र होतें, तेथल्या काव्याचा आस्वाद घेण्यासाठीं अथवा स्नान करण्यासाठीं जेथें आदिवासी आणि अन्यजन देखील गोळा होतात, त्या ठिकाणीं साबरमती विषयींच्या आदिकथा आपल्याला मिळाल्याच पाहिजेत.

साबरमतीचीं जुनीं नांवें शोधूं जातां कश्यपगंगा किंवा असेंच अेखादें नांव हटकून सांपडायचें. नदीला कोणत्या ना कोणत्या प्रकारें गंगेचा अवतार बनवल्याशिवाय आर्यांचें समाधान व्हायचें नाहीं. पण मला मात्र साबरमतीचें जुनें नांव चंदना सर्वांत अधिक आकर्षित करतें. कारण अैकिवांतल्या माहिती प्रमाणें अमुक अमुक ठिकाणीं पिवळ्या मातीमधून वहात असतांना ती गोरोचनाचा रंग धारण करते. पण ज्या ठिकाणीं मीं साबरमतीच्या किनाऱ्यावर तीसतीस वर्षें घालवलीं तिथलें साबरमतीचें जळ सज्जनांच्या आणि महात्म्यांच्या मनाप्रमाणें पूर्णतया निर्मळ आहे.

जेथें नदीचें पाणी अुथळ असल्यामुळें समोरच्या कांठापर्यन्त सहज तरून जातां येतें अशा स्थानाला संस्कृतमधें तीर्थ म्हणतात. प्रवासी अनेक ठिकाणीं प्रयत्न करून पाहिल्यानंतर नक्की करतात कीं अमुक अमुक ठिकाणींच पाण्याला अुतार आहे. अर्थात् मग थोडें अधिक चालून ते अुतारापाशींच येणार, गोळा होणार, तेथेंच बसून अमळ विसावा घेणार, गप्पागोष्टी करणार, नदीचें पाणी अेकाअेकीं वाढलें असेल तर तें ओसरत नाहीं तोंपर्यन्त अमुक तास किंवा अमुक दिवस अुताराजवळ तळ देखील देणार. अशा प्रकारें जेथें लोक अनायासें गोळा होतात तेथें परम कारुणिक संत धर्मसेवा आणि लोक-सेवेसाठीं येअून वसणार आणि म्हणूनच तीर्थ शब्दाला नवा अर्थ प्राप्त झाला आहे. मुळांत तीर्थ शब्दाचा अर्थ ‘अुतार’ अितकाच होता. यापेक्षां अधिक कांहीं नाहीं. पण जेथें साधुसंत भवनदी तरून जाण्याची शिकवणूक देतात आणि

तसें करण्याची कला देखील शिकवतात, त्या स्थानाला तीर्थाची विशेष पवित्रता आपोआप मिळत जाते.

अहमदाबादजवळ साबरमतींत रेल्वे पुलापासून ते थेट सरदार पुलापर्यन्त आणि त्याहूनहि दक्षिणेस कित्येक तीर्थें आहेत. त्यांत चंद्रभागा नदी जेथें साबरमतीला मिळते तेथें दधीचीनें तप केलें असल्यामुळें तें स्थान अधिक पवित्र मानण्यांत येतें आणि आसपासच्या लोकांनीं अिहलोक सोडून परलोकाला जाणाऱ्या अुतारूंना अग्निदाहाद्वारा निरोप देण्यासाठीं सुद्धां तीच जागा पसंत केली असल्यामुळें ती स्मशानभूमि अुताराची जागा देखील बनली आहे. स्मशानाचे अधिपति दूधेश्वर महादेव तेथें विराजमान होअून त्या महायात्रेची देखरेख ठेवीत आहेत.

* * *

मला तो दिवस चांगला आठवतो. पूज्य गांधीजी आपले स्नेही रंगूनवाले डॉ. प्राणजीवन महेता आणि रणोलीचे माझे स्नेही नाथाभाअी पटेल यांना सोबत घेऊन आश्रमभूमि पसंत करण्यासाठीं निघाले होते. मीहि बरोबर होतों. त्या दिवसापासून त्या भूमीशीं माझा संबंध जोडला गेला. त्या जागेवर पहिली कुदळ मारली ती मींच; पहिली राहुटी देखील मींच अुभारली आणि त्यानंतर अनेक तंबू देखील अुभे केले, झोंपड्या बांधल्या. नंतर अनेक घरें बांधलीं गेलीं. खादीची प्रवृत्ति, शेती आणि गोशाळेची प्रवृत्ति, राष्ट्रीयशाळा, राष्ट्रीय अुत्सव, रास-नृत्य, लोकसंगीत आणि राष्ट्रीय संगीत, 'नवजीवन' आणि 'यंगअिंडिया,' वाङ्मय निर्मिति, सत्याग्रह, गिरणीमालकांशीं मजुरांचा संघर्ष आणि शेवटीं ब्रिटिश साम्राज्याचीं पाळेंमुळें खणून काढण्यासाठीं सुरूं झालेली दांडीकूच—हें सर्व या आश्रमांतूनच अुद्भवलें आणि विकास पावलें. रॉलेट ॲक्ट विरोधी आंदोलन, त्यांतून अुत्पन्न झालेल्या पंजाबांतील दंगली, जलियानवाला बाग, खेडा सत्याग्रह, बारडोलीचा लढा, गुजराथ विद्यापीठाची स्थापना, कॉंग्रेसचीं अधिवेशनें, देशांतील अेकूणअेक राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक हालचालीचें केन्द्र साबरमतीचें तें तीर होतें. साबरमतीच्या रेतींत सभा भरत, तेव्हां लोकांचा महासागर अुसळे. केवळ गुजराथच्याच नव्हे तर साऱ्या हिन्दुस्थानच्या जीवनांत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणलें त्या साबरमतीच्या

वातावरणानें आणि तेंच वातावरण आज साऱ्या दुनियेच्या राजकारणाला नवें वळण लावीत आहे आणि नव्या युगाला पायाभूत होत आहे.

या साबरमतीच्या पाण्यांत आम्ही काय काय मौज करायची बाकी ठेवली आहे ! आश्रमांतल्या कितीतरी मुला-मुलींना आणि शिक्षकांना देखील मीं तेथें पोहोण्याची कला शिकवली, तिच्या वाळूंत गीता आणि अुपनिषद् यांचें चिंतनमनन केलें आणि गीतापारायणाचे अनेक सप्ताह चालू केले. या भूमिपुरतें जवळ जवळ अेकूणअेक झाड आमच्या हातूनच लावलें गेलें आहे.

तो रचनाकालच होता तसा अद्भुत. हृदयांत कुणी नवा शक्तिशाली आत्मा येअून बसला होता. तो सर्वांकडून नानातऱ्हेचीं कामें करवून घेअू शकला. केवळ आहाराचे प्रयोग सुद्धां आम्ही तेथें थोडेथोडके केले नाहींत. कौटुंबिक जीवनाचे अनेक प्रकार अजमावून पाहिले. शिक्षणाचें तंत्र अनेकदां बदललें आणि त्यांतहि अनेकदां क्रांति घडवून आणली. आणि जीवनाच्या प्रत्येक पैलूसाठीं नव्या नव्या स्मृति तयार करीत गेलों. त्या साऱ्या पुरुषार्थांची साक्षी साबरमती नदी आहे.

जोंपर्यंत भारताचा अितिहास जगाला बोध-दायक होअील आणि भारताच्या अितिहासांत महात्माजींचें स्थान अढळ असेल तोंपर्यन्त साबरमतीचें नांव जगाच्या जिभेवर नाचत राहील.

मे १९५५

# : १६ : अुभयान्वयी नर्मदा

आपला देश महादेवाची मूर्ति आहे. हिंदुस्थानचा नकाशा जर अुलटा धरला तर त्याचा आकार शिवलिंगासारखा दिसतो. अुत्तरेकडील हिमालय ही या शिवलिंगाची बैठक आणि दक्षिणेकडील कन्याकुमारीचा भाग हें त्याचें शिखर.

गुजराथचा नकाशा जरा फिरवला आणि पूर्वेकडील भाग खालीं घेतला व सौराष्ट्राचें टोक—ओखामंडळ वरच्या बाजूस आणलें तर तो देखील शिवलिंगा-

सारखाच दिसेल. आपल्याकडे जितकीं म्हणून पर्वताचीं शिखरें आहेत तितकीं सर्व शिवलिंगेंच आहेत. कैलासच्या शिखराचा आकारसुद्धां शिवलिंगासारखाच आहे.

आणि या पर्वतांच्या जंगलांतून जेव्हां अेखादी नदी निघते तेव्हां कवि म्हणायचे कीं, ‘ शिवजीच्या जटेमधून गंगा निघाली.’ कित्येक लोक पहाडांतून पुढें पुढें सरत येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाला अप्-सरा म्हणतात. कित्येक तर पर्वताच्या अशा सर्व कन्यकांना पार्वती म्हणतात.

अशाच अेका अप्सरेसारख्या नदीविषयीं आज लिहावयाचें आहे. महादेवाच्या डोंगराजवळ माअिकाल पर्वताच्या पायथ्याशीं अमरकंटक म्हणून अेक तलाव आहे. त्यांतून नर्मदा नदी अुगम पावते. जी नदी अुत्तम गवताची पैदास करून गाईंची संख्या वाढवते तिला गो-दा म्हणतात. यश देणारी ती यशो-दा आणि जी नदी आपल्या प्रवाहाच्या आणि कांठावरील नैसर्गिक शोभेच्या द्वारा ‘ नर्म ’ म्हणजे आनंद देते ती नर्म-दा होय. या नदीच्या कांठाकांठानें भटकत असतां ज्याला अतिशय आनंद झाला अशा अेखाद्या अृषीनें या नदीला हें नांव बहाल केलें.

ज्याप्रमाणें हिमालय पर्वतानें तिबेट व चीन यांच्यापासून हिंदुस्थानाला वेगळें केलें आहे त्याच प्रमाणें आपल्या या नर्मदा नदीनें अुत्तर भारत अथवा हिंदुस्थान आणि दक्षिण भारत अथवा दक्खन यांच्यामधें आठशे मैलांची अेक चमकती नाचती धावती जितीजागती रेषा काढली आहे. आणि ही नैसर्गिक रेषा कुणी पुसून टाकूं नये म्हणूनच कीं काय अीश्वरानें या नदीच्या अुत्तरेस विन्ध्य व दक्षिणेस सातपुडा यांच्यासारखे लांबच लांब पर्वत अुभे केले आहेत. अशा अुमद्या भावांच्या संरक्षणाखालीं नर्मदा धावत आणि अुड्या मारीत अनेक प्रांतांमधून प्रसरण पावत भृगुकच्छ अथवा भरुचजवळ समुद्राला जाअून मिळते.

अमरकंटक जवळील नर्मदेचा अुगम समुद्र सपाटीपासून पांच हजार फूट अुंचीवर आहे. आतां आठशे मैलांच्या आंत पांच हजार फूट खालीं अुतरणें कांहीं सोपें तर नाहींच. म्हणून आपली नर्मदा ठिकठिकाणीं लहान मोठ्या अुड्या घेते. त्यावरून आपल्या कविपूर्वजांनीं नर्मदेला दुसरें नांव दिलें आहे ‘ रेवा ’ (‘ रेव ’ म्हणजे अुडी मारणें. )

जी नदी पावलोपावलीं वरून खालीं अुड्या टाकीत असते ती नौकानयनासाठीं अर्थात् नौकांत बसून दूर दूरचा प्रवास करण्यासाठीं तितकीशी अुपयोगी नसते. समुद्रांतून येणारें जहाज नर्मदा नदींत फार तर तीसपस्तीस मैल आंत शिरूं शकतें; पावसाळ्याच्या अखेरीस फार तर पन्नास मैल.

ज्या नदीच्या अुत्तरेस आणि दक्षिणेस दोन पर्वत खडे आहेत, त्या नदीचें पाणी कालवे खोदून दूरवर कसें नेतां येणार? म्हणून नर्मदा नदी जशी नौकानयनासाठीं फारशी अुपयोगी नाहीं तशीच शेतांच्या शिंपणीसाठीं देखील विशेष अुपयोगी नाहीं. असें असलें तरी या नदीची अन्य प्रकारें सेवा कमी नाहीं. तिच्या पाण्यांत विचरणारे मगर आणि मासे, तिच्या किनाऱ्यावर संचरणारे शेतकरी आणि चरणारीं गुरेंढोरें व अितर तऱ्हेतऱ्हेचीं जनावरें आणि आकाशांत कलरव करणारे पक्षी या सर्वांची ती माता आहे.

भारतवासियांनीं आपला सगळा भक्तिभाव जरी गंगेच्या चरणीं ओतला असला, तरी आपल्या लोकांनीं नर्मदेच्या तीरीं पावलोपावलीं जितकीं देवालयें बांधलीं आहेत तितकीं दुसऱ्या कोणत्याहि नदीच्या तीरीं बांधलीं नसतील.

गंगा, यमुना, गोदावरी, कावेरी, गोमती, सरस्वती वगैरे नद्यांच्या स्नानपानाचें आणि त्यांच्या कांठावर केलेल्या दानाचें माहात्म्य पुराणकारांनीं कितीहि वर्णिलें असो, पण त्यांची प्रदक्षिणा करण्याचा विचार अेकाहि भक्ताच्या मनाला शिवलेला नाहीं. अुलट नर्मदेच्या भक्तांनीं, कवींना सुचावेत असे नियम करून साऱ्या नर्मदेची परिक्रमा अथवा 'परिकम्मा' करण्याचा परिपाठ घालून दिला आहे.

नर्मदा नदीच्या अुगमापासून दक्षिण किनाऱ्यावरून चालत चालत सागरसंगमापर्यन्त जायचें. तेथें होडींत बसून अुत्तर किनाऱ्यावर पोहोंचायचें आणि त्या किनाऱ्यावरून पुन्हा पायीं चालत चालत अमरकंटक पर्यन्त जायचें म्हणजे अेक परिक्रमा पुरी झाली. यांत नियम असा आहे कीं परिकम्मा करीत असतांना नदीचा प्रवाह कुठेंहि ओलांडायचा नाहीं आणि तरी प्रवाहापासून फार दूरहि जायचें नाहीं. रोज नदीचें दर्शन झालेंच पाहिजे. पाणी प्यायचें तें नर्मदेचेंच. बरोबर पैसाअडका घेअून, अैषारामांत प्रवास करायचा नाहीं. नर्मदेच्या तीरीं जंगलांत रहाणाऱ्या आदिवासींच्या मनांत यात्रेकरूंच्या धनदौलतीबद्दल विशेष आकर्षण असतें. गरजेपेक्षां अधिक कपडे, भांडीकुंडीं

किंवा पैसाअडका असला तर त्या ओझ्यांतून ते तुम्हांला मुक्त केल्यावांचून रहाणार नाहींत.

आपल्या लोकांना अशा अकिंचन व अुपाशी बांधवांवर पोलिसांकरवीं अुपाययोजना करण्याचा विचार कधींकाळीं शिवला नाहीं. आणि आदिवासी बांधव देखील मानून चालतात कीं यात्रेकरूंवर हा आपला हक्कच आहे. जंगलांत नागवलेले यात्रेकरू जंगलांतून बाहेर आले कीं दानी लोक त्यांना नवे कपडे आणि शिधासामुग्री देतात.

भाविक लोक सगळया नियमांचें पालन करून विशेषतः ब्रह्मचर्याचें आग्रहपूर्वक आचरण करून नर्मदेची परिक्रमा, हळूहळू करीत, तीन वर्षांनीं पुरी करतात. पावसाळयाचे दोन तीन महिने अेके ठिकाणीं रहाण्याचा आणि साधुसंतांच्या सत्संगानें जीवनाचें रहस्य समजून घेण्याचा त्यांचा आग्रह असतो.

अशा परिक्रमेचे दोन प्रकार असतात. त्यांतील अवघड प्रकारच्या परिक्रमेंत समुद्राजवळ देखील नर्मदा ओलांडायची नसते. अुगमापासून मुखापर्यन्त गेल्यानंतर त्याच रस्त्यानें परत अुगमाकडे येअून अुत्तर किनाऱ्यानें समुद्रापर्यन्त पोहोंचायचें आणि पुन्हा त्याच अुत्तर किनाऱ्यानें अुगमापर्यन्त परत यायचें. ही परिक्रमा अशा रीतीनें दुहेरी होते. तिचें नांव आहे जलेरी.

मौजमजा किंवा अैषाराम सोडून तपस्यापूर्वक अेकाच नदीचें ध्यान करायचें, तिच्या तीरावरील देवालयांचें दर्शन घ्यायचें, आसपास रहाणाऱ्या संत-महात्म्यांच्या वचनाचें श्रवण करायचें, आणि निसर्गाची शोभा व भव्यता यांचें सेवन करीत आयुष्याचीं तीन वर्षें व्यतीत करायचीं ही कांहीं साधीसुधी प्रवृत्ति नव्हे. त्यांत कणखरपणा आहे, तपस्या आहे, बहादुरी आहे. अंतर्मुख होअून करावयाचें आत्मचिंतन, गरिबांशीं अेकरूप होण्याची भावना आहे. निसर्गमय होअून जाण्याची दीक्षा आहे आणि निसर्गाच्या द्वारा निसर्गांत विराजत असलेल्या भगवंताचें दर्शन घेण्याची साधना आहे.

आणि या नदीकिनाऱ्यावरील समृद्धि सामान्य कोटींतली नाहीं. युगानुयुगें अुच्च कोटीचे संतमहंत, वेदान्ती संन्यासी, आणि भगवंताच्या लीला बघून सद्गदित होणारे भक्त, आपआपला अितिहास या नदीच्या कांठीं पेरीत

आले आहेत. आपल्या कुळाचा बाणा टिकवणाऱ्या, आणि प्रजेच्या रक्षणासाठीं प्राण प्रणास लावणाऱ्या क्षत्रिय वीरांनीं आपले पराक्रम याच ठिकाणीं अजमावले आहेत. अनेक राजांनीं आपल्या राजधानीच्या रक्षणार्थ नर्मदेच्या कांठीं लहान मोठे किल्ले बांधले आहेत आणि अीश्वराच्या अुपासकांनीं धार्मिक कलेच्या समृद्धीचें जणूं संग्रहालय तयार करण्यासाठीं कीं काय मुक्कामामुक्कामावर मंदिरें अुभारलीं आहेत. आणि प्रत्येक मंदिर आपल्या कलेद्वारा तुमचें चित्त हरण करून शेवटीं आपलें कळसाचें बोट अुंचावून अनंत आकाशांत प्रकट होणाऱ्या मेघश्यामाचें ध्यान करण्याची प्रेरणा देत असतें.

ज्याप्रमाणें बांगेचा पुकार खुदापरस्तांना निमाजची आठवण करून देतो, त्याचप्रमाणें दूरवरून दृष्टीस पडणारीं शिखररूपी चमकतीं बोटें स्तोत्रें गाण्याची प्रेरणा देतात.

आणि नर्मदेच्या कांठीं शिवाचें किंवा विष्णूचें, रामचंद्राचें किंवा कृष्णचंद्राचें, जगत्पतीचें किंवा जगदंबेचें स्तोत्र म्हणायचें असेल तर आधीं नर्मदाष्टकानें प्रारंभ करायचा असतो—**सबिंदुसिंधु सुस्खलत् तरंगभंगरंजितम्।** अशा थाटांत पंचचामरांचीं लघुगुरु अक्षरें जेव्हां नर्मदेच्या प्रवाहाचें अनुकरण करूं लागतात तेव्हां भक्त मस्तींत येअून म्हणतात कीं, 'माते! तुझ्या पवित्र जलाचें दर्शन झालें रे झालें कीं या संसाराच्या सगळ्या बाधा दूर झाल्याच म्हणून समजावें—**गतं तदैव मे भयं त्वदम्बु वीक्षितं यदा।** आणि शेवटीं भक्तिलीन होअून ते नमस्कार करतात—**त्वदीय पादपंकजं नमामि देवि नर्मदे।**

आपण विसरतां कामा नये कीं नर्मदा ही जशी आपली आणि आपल्या प्राचीन संस्कृतीची माता आहे तशीच ती आपले बंधु बांधव जे आदिवासी लोक यांचीहि माता आहे. नर्मदेच्या दोन्ही तटांवर या लोकांनीं हजारो वर्षें राज्य केलें होतें, कित्येक किल्लेहि बांधले होते आणि आपली अेक विशाल आरण्यक संस्कृति विकसित केली होती.

मला नेहमीं वाटत आलें आहे कीं हिंदुस्थानचा अितिहास प्रांतवार किंवा राज्यवार लिहिण्याअैवजीं जर नदीवार लिहिला गेला असता, तर त्यांत लोकजीवन निसर्गाशीं विणले गेले असतें आणि प्रत्येक प्रदेशाची पुरुषार्थपूर्ण

भरभराट नदीच्या अुगमा पासून–मुखापासून पसरलेली आढळून येती. जसे आपण सिंधूच्या कांठावरील घोड्यांना सैंधव म्हणतों, भीमेच्या तटाचें पोषण मिळवून पुष्ट होणाऱ्या भीमथडीच्या तट्टांची वाखाणणी करतों, कृष्णेच्या खोऱ्यांतील गाअी–बैलांचें विशेष कौतुक करतों, त्याचप्रमाणें प्राचीन काळीं प्रत्येक नदीच्या कांठावर विकास पावलेली संस्कृति वेगवेगळ्या नांवानें ओळखली जात असे.

त्यांतून नर्मदा नदी ही भारतीय संस्कृतीच्या दोन मुख्य विभागांची सीमा-रेषा गणली जाअी. रेवेच्या अुत्तरेस पंचगौडांची विचारप्रधान संस्कृति आणि रेवेच्या दक्षिणेस द्रविडांची आचारप्रधान संस्कृति मुख्य मानली जाअी. विक्रम संवताची कालगणना आणि शालि–वाहन शकाची कालगणना या दोन्ही नर्मदेच्या तीरीं अेकू येतात आणि बदलतात.

अुत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्यामध्यें अेक रेषा काढण्याचें काम नर्मदा करते असें मीं म्हटलें खरें. पण तिच्याशीं स्पर्धा करणारी अेक दुसरी नदी देखील आहे. नर्मदेनें मध्य हिंदुस्थानापासून पश्चिम किनाऱ्यापर्यंत सरळ रेषा काढली, हें जणूं काय बरोबर झालें नाहीं असें मानून गोदावरीनें पश्चिमे-कडील सह्याद्रि पर्वतापासून प्रारंभ करून पूर्वसमुद्रापर्यंत अेक तिरकस रेषा काढली आहे. म्हणून अुत्तरेकडील ब्राह्मण संकल्प बोलतांना म्हणतात— "रेवायाः अुत्तरे तीरे." तर पैठणच्या राज्याचे अभिमानी आम्ही दक्षिणी लोक "गोदावर्याः दक्षिणे तीरे" असें म्हणतों. ज्या नदीच्या तीरावर शालि-वाहन अथवा शातवाहन राजांनीं मातीचीं माणसें बनवून त्या फौजेद्वारा यवनांचा पराभव केला, त्या गोदावरीला संकल्पांत स्थान न मिळून कसें चालेल ?

* * *

नर्मदा नदीची परिकम्मा कांहीं मीं केलेली नाहीं. अमरकंटकला जाअून अुगमाचें दर्शन घेण्याचा संकल्प फार जुना आहे. गेल्या वर्षी विंध्यप्रदेशाची राजधानी रीवापर्यन्त गेलों सुद्धां होतों. पण अमरकंटकला जाणें जमलें नाहीं. तसें नर्मदेचें दर्शन मीं ठिकठिकाणीं घेतलें आहे. त्यांतील विशेष काव्य जर कुठें अनुभवलें असेल तर तें जबलपुर जवळील भेडाघाटमधें.

भेडाघाटांत होडींत बसून संगमरवरी पिवळ्यानिळ्या पाषाणांमधून जेव्हां आपण जलविहार करतों तेव्हां जसे काय योगविद्येंत प्रवेश करून मानवी

मनाची गूढ रहस्यें आपण अुकलीत आहोंत असेंच वाटतें. आणि त्यांतहि जेव्हां बंदरकूदपाशीं येअून ठेपतों आणि पूर्वींचे सरदार घोड्याला टांच मारून अेका अुडींत पलिकडे पोंचत असल्याच्या गोष्टी अैकतों तेव्हां तर जणूं काय मध्यकालीन अितिहास पुन्हां अेकदां जिवंत होतो.

या गूढ स्थानाचें हें माहात्म्य ओळखूनच योगविद्येच्या कुणी अुपासकानें जवळच्या टेकडीवर चौसष्ट योगिनींचें मंदिर बांधलें असेल आणि त्या योगिनींच्या चक्रामधोमध नंदीवर विराजणाऱ्या शिवपार्वतींची स्थापना केली असेल. त्या मूर्ति पाहून भारतीय मूर्तिकलेपुढें मस्तक नम्र होतें आणि अशा मूर्ति ज्यांनीं खंडित केल्या त्यांच्या धर्मांधतेबद्दल मनांत खेद अुत्पन्न होतो. पण खंडित मूर्ति पहाण्याचा तर आपल्याला कधींचा सराव पडून गेला आहे !!!

* * *

धुंवाधार प्रकृतीचें अेक स्वतंत्र काव्य आहे. पाण्याला जर जीवन म्हटलें तर अधःपातामुळें खंड खंड झाल्यानंतर देखील जें सहज पूर्वरूप धारण करतें, आणि जसें कांहींच झालें नाहीं अशा आविर्भावानें शांतपणें पुढें वाहूं लागतें तें खरोखर जीवनतम होय. पावसाळ्यांत जेव्हां सारा प्रदेश जलमय होअून जातो तेव्हां नाहीं मिळत ‘ धार ’ कीं नाहीं निघत त्यांतून वाफेसारखा ‘ धुंवा ’. पावसाळा संपल्यानंतरच धुंवाधारची मस्ती पाहून घ्यावी. धबधब्याकडे टक लावून ध्यान करणें मला पसंत नाहीं. कारण धबधबा ही कैफी वस्तु आहे. धबधब्याच्या पाण्याचें जेव्हां पुढें धोबीघाटावरील साबणाच्या पाण्यांत परिवर्तन होअूं लागतें आणि आसपास थंड वाफेचे लोटच्या लोट खेळ खेळूं लागतात तेव्हां जसजसें पहावें तसतशा चित्तवृत्ति अस्वस्थ होअूं लागतात. तें दृश्य डोळे भरून पाहून घेअून परत फिरतांना असेंच वाटतें कीं जीवनाच्या अेखाद्या आणीबाणीच्या प्रसंगांतून आपण बाहेर पडलों आहोंत आणि अितक्या अनुभवानंतर आपण पूर्वींचे तेच अुरलों नाहीं.

* * *

अिटारसी–होशंगाबाद कडील नर्मदा अगदीं वेगळीच आहे. तिकडील दगड जमिनींत तिरकस तिरकस रुतलेले आढळतात. कोणत्या धरणीकंपामुळें दगडांचे थर असे विषम झाले हें कुणी सांगू शकत नाहीं. नर्मदेच्या तटीं अीश्वराची आकृति धारण करून बसलेले पाषाण सुद्धां कांहीं सांगूं शकत नाहींत.

आणि तीच नर्मदा पगडीच्या पन्ह्याप्रमाणें निरुंद पण लांबलचक पसरलेल्या भरुचच्या किनाऱ्याला धुऊन काढते आणि अंकलेश्वरच्या खलाश्यांना अंगाखांद्यावर खेळवते, त्यावेळीं अगदीं वेगळीच दिसूं लागते.

* * *

कबीरवडापाशीं आपल्या कुशींत अेका बेटाचें संगोपन करण्याचें स्वर्गीय सुख जिला अेकदां लाभलें, तिनें सागर-संगमाच्या वेळीं सुद्धां अशाच अेका बेटबालकाचें संगोपन आणि जोपासना करावी यांत नवल तें कसलें ?

कबीरवड हें हिंदुस्थानांतील अनेक आश्चर्यांपैकीं अेक आश्चर्य आहे. लक्षावधि लोक ज्याच्या छायेंत निवांत बसूं शकतील आणि मोठमोठ्या फौजा ज्याच्या छायेंत तळ ठोकूं शकतील, असा अेक वड नर्मदाप्रवाहाच्या मधोमध अेका बेटांत पुराणपुरुषाप्रमाणें अनंतकाळाची प्रतीक्षा करीत आहे. महापुर आला कीं त्यांत बेटाचा अेक भाग वाहून जातो. त्याबरोबरच वडाच्या अनेक फांद्या आणि पारंब्याहि वाहून जातात. कबीरवडाचे असे कितीदां तुकडे झाले याची नोंद अितिहासांत नाहीं. नदीचा प्रवाह वहात आहे आणि वडाला नवीनवी पालवी फुटतच आहे! सनातनकाल हा जसा वृद्ध आहे तसाच शिशुहि आहे. तो त्रिकालज्ञानी आहे तसाच विस्मरणशीलहि आहे.

त्या काल-भगवानाचें आणि कालातीत परमात्म्याचें अखंड ध्यान करणारे ॠषिमुनि आणि संतमहात्मे जिच्या कांठीं युगानुयुगें वास करीत आले आहेत, ती आर्य-अनार्य या सर्वांची माता नर्मदा तिन्ही त्रिकाळ मानवमात्राचें कल्याण करो. जय नर्मदे हर!

ऑगस्ट १९५५

# : १७ : संध्यारस

गौरीशंकर* तलावाचें दर्शन अेकाअेकीं होतें. आपण बागेंत गेलों, झाडांची शोभा पाहिली, चिनी मातीच्या कांचेच्या तुकड्यांनीं बनविलेले निर्जीव हत्ती,

---

* सौराष्ट्रांत भावनगरमधील बोर तलाव.

घोडे, सिंह यांचा रुबाब पाहिला आणि झाडांमधें विहार करणाऱ्या सजीव पक्ष्यांचा कलरव अैकला, तलावाच्या कांठीं आलों, पायऱ्या चढूं लागलों, थंड वाऱ्याचा गारवा जाणवूं लागला, तरीसुद्धां तलाव कसा असेल याची कल्पना येत नाहीं. शेवटल्या (म्हणजे अगदीं वरच्या) पायरीवर पाय ठेवला कीं अवचित जणूं काय आकाश भेदून अप्सरा प्रगट व्हावी तसें सरोवराचें पाणी सुहास्य वदनानें आपल्याकडे पाहूं लागतें. सरोवराच्या दर्शनाला तुम्ही अेकटे गेला असला, तरी तुमचें तें अेकटेंपण तेथें टिकायचें नाहीं. आकाशांतील ढग आणि सर्वांपेक्षां विशेष लगबगीनें धावत आलेली संध्यातारका तुमच्या बरोबर सरोवराची शोभा न्याहाळत असलेली तुम्हांला आढळून येअील.

सरोवरें नेहमीं सखल भागांत असतात. डोंगर अुतरून खालीं यावें तेव्हां सरोवराच्या पाण्यांत पाय बुडवणें शक्य व्हावें. पण हें तर जसें काय गंधर्व-कासार; जणुं काय ढग विरघळून डोंगरमाथ्यावर सरोवर बनले आहेत!

ज्याचें पैलतीर दृष्टीस पडतें असें सरोवर कुणाला आवडेल? अितकें हें पाणी येतें तरी कोठून अशा अतृप्त जिज्ञासेची ज्याला जोड नाहीं अश सौंदर्यांत दैवी गूढभाव कोठून सांपडणार? आगगाडीचे रूळ देखील अगदीं नाकासमोर सरळ असलेले, आपल्याला आवडणार नाहींत. जरा चढण असावी, अुतरण असावी, डाव्या किंवा अुजव्या बाजूस कललेले–वळलेले असावेत तरच ते शोभून दिसतात. सरोवर कांहीं धबधबा नव्हे कीं वरून खालीं पडण्याचा खेळ त्यानें करून दाखवावा. गौरीशंकर चहूंबाजूंनीं टेकड्यांनीं वेढलेलें आहे. पण या टेकड्या जिवावर अुदार झालेल्या वीरांप्रमाणें भाअूगर्दी करून अुभ्या राहिलेल्या नाहींत. त्यामुळें पाण्याला अिकडे तिकडे सर्व बाजूस पसरण्याचा अवकाश मिळाला आहे.

सरोवराच्या बांधावर अुभे राहून पश्चिमेकडे नजर वळवली तर अेखाद्या अद्‌भुत कादंबरींत नअूच्या नअू रसांची गुंफण झालेली असावी त्याप्रमाणें तऱ्हतऱ्हेचे रंग पाण्यांत मिसळलेले आढळून येतात. पायातळीं आत्महत्येचा गहिरा हिरवा रंग जणूं काय क्षणोंक्षणीं आपल्याला आंत बोलावीत असावा तसा दिसतो. त्यांतहि सगळीकडे सारखेपणा नाहीं. कांहीं ठिकाणीं मेंदीच्या पानांचा गाढ रंग, तर कांहीं ठिकाणीं निंबोडीच्या पानांचा गहिरा रंग, खूप निरखून पहावें तेव्हां वाटूं लागतें कीं हा पाण्याचा रंग नसून पाण्यांत लपलेलें

स्वतंत्र विष आहे. किंचित् पुढें नजर वळवली कीं निराशेतून आशेचा अुदय होत असावा तसा बदामी रंग दिसूं लागतो. रंग बदामी खरा, पण त्यांत धातूची चमक आहे. पुढें जाअून तोच रंग थोड्याश्या रूपान्तरानें नारिंगी रंग बनून संध्येचें अुपस्थान करतांना आढळून येतो. ढगांची जांभळी छाया जर मधें आड आली नसती तर अिथला नारिंगी आणि तिथला सोनेरी यांची कशी काय मैफिल जमली असती कोण जाणे !

सोनेरी रंगाकडे आपलें लक्ष जाण्यापूर्वीच मंद मंद वाहाणारा वारा जल-पृष्ठावर नाजुक लाटांची कुसर करीत आपल्याला सांगतो, 'अैका हें समयोचित स्तोत्र!' समोरच्या टेकड्यांनीं डोकें वर काढलें नसतें तर ही रसवती पृथ्वी संपते कोठें आणि निःशब्द आकाश कोठें सुरू होतें हें सांगणें अेखाद्या पंडिताला सुद्धां अवघड वाटलें असतें.

डाव्या बाजूस काटछाट केलेल्या मेंदीचें कुंपण आहे. सुबक कुंपणें कोणाला आवडणार नाहींत ? पण शृंगारसाधिका मेंदीचा शिरच्छेद मला तरी अगदीं असह्य होतो. अुजव्या बाजूस सूर्याच्या थंड झालेल्या, पण न थिजलेल्या तेजा-सारखें सरोवर आणि डाव्या बाजूस खालीं गर्द विरळ झाडी अशा या परस्पर भिन्न रसांमधें जनकाप्रमाणें योगयुक्त चित्तानें आम्ही पुढें निघालों. तेथें येअून ठेपला निराधार सेतु. संस्कृत कवींनीं त्याला बघितलें असतें तर त्याला शिक्य-सेतुच नांव दिलें असतें. अशा सेतूंचा शोध सर्वप्रथम हिमालयांतल्या वनेचरांनींच लावला असला पाहिजे. हा निराधार पूल आपल्याला हळुवार पाव-लांनीं घेअून जातो पाण्याच्या मधोमध अुभें राहून तप करणाऱ्या अृषीसारख्या अेका बेटाच्या जटासंभारांत. पुलाच्या मध्यावर पोहोंचलें कीं आतिथ्यशील पाणी सावध करतें, 'सांभाळून चाला, सांभाळून चाला.' आणि योग्य संधि मिळतांच पादप्रक्षालन करायलाहि तें चुकत नाहीं.

आणि तें तेथलें बेट ? तें तर नीरव शांतीची मूर्ति. चंद्र पाण्यांत अितका खदखदून हसत असूनहि त्याचा पडसाद कोठेंहि अैकूं येत नाहीं. ध्यानी मुनीच्या शांतीचा भंग होअील कीं काय अशी भीति निसर्गाला वाटत असावी. या बेटांत नाहीं रहात सर्प कीं नाहीं रहात सरडे. पक्षी असलेच तरी ते यावेळीं आपल्या घरट्यांत निवांत झोंपलेले आहेत. आतिथेय मंडपाखालीं आम्ही विराजमान झालों. आतां मात्र अज्ञात,

गूढ अशा अंधःकाराची छाया पाण्यावर पसरूं लागली. अष्टमीचें चांदणें आपलें सरळ आरपार पाण्यांत अुतरून तळ गांठीत होतें. फक्त अेकमेकांना नेहमीं पाण्यांत पहाणाऱ्या सुर-असुरांचे गुरु दीर्घ विग्रहाला कंटाळून कांहीं तडजोड करण्यासाठीं अेकत्र आले असावेत तसे पश्चिमेला चमकत होते. प्रकाश आणि अंधार यांना अेकत्र आणण्याचा प्रयत्न संध्येनें अनेकदां केला आहे. त्यांत जर तिला कधीं काळीं यश मिळालें तरच सुर-असुरांमधें कायमची तडजोड घडून यायची. पहा, दोघांचेहि गुरू आपापली दिशा बदलून आपल्या स्वभावोचित गतीनें निघून जात आहेत, आणि संध्याकाळचा लालसर काळिमाहि पक्षपात केल्याशिवाय दोघांना सारखेच घेरून टाकीत आहे. नेहमींच विग्रह चालविणाऱ्यांचा शेवटीं अस्तच व्हायचा.

आतां पाण्यानें आपला रंग बदलला. आतांपर्यन्त पाण्याच्या पृष्ठभागावर अकारणच पसरलेले, चांदीचे रस्ते तयार केले असावेत तसे दिसणारे चकचकीत पट्टे आतां अदृश्य झाले. खेळ फार झाला, आतां गंभीरपणें विचार करायला हवा, असें कांहींसें वाटून पाण्याची मुखमुद्रा अंतर्मुख बनली आहे. टेकड्या प्रेतलोकांतील वासनादेह वावरत असावेत तशा दिसूं लागल्या. विस्तीर्ण शांति देखील किती अस्वस्थ करूं शकते याचा भरपूर प्रत्ययच येथें येतो. सगळया टेकड्या जणूं आपला आवाज अैकण्यासाठींच जिवाचे कान करून अुभ्या आहेत. आपली हांक कानीं पडायचा अवकाश कीं, 'हो! हो! हा पहा आलोंच, आलोंच.' असें म्हणत धांवत येअून ठेपतील याविषयीं त्रिलकुल शंका अुरत नाहीं. पण त्यांना बोलावण्याचा धीरच कसा व्हावा? मध्यरात्रीं कुणी पहात नसतांना या टेकड्या वस्त्रें अुतरवून सरोवरांत आंघोळीसाठीं अुतरत असतील का? आज तरी त्या तशा अुतरणार नाहींत, कारण दुर्विनीत चंद्रमा मध्यरात्रीपर्यन्त टक लावून सरोवरांत पहात असणार. आणि मध्यरात्र होण्याच्या आधींच शिशिराच्या थंडीचें साम्राज्य सुरूं होणार. मग अुषःकाल होण्यापूर्वी माघस्नान अुरकून घेण्याची त्यांना अिच्छा झाल्यास नकळे. अशा कांहीं पुण्यसंचयावांचून टेकड्यांना तरी अितकी स्थिरता कशी लाभणार?

कुणीतरी पुलावरून चाललें आहे. पाण्यांत खळबळाट अैकूं येत आहे. त्यांतून अुत्पन्न होणाऱ्या तरंगांचीं वलयें दूर दूर धांवत आहेत. लोक आप-आपल्या गांवांत राहूनहि, बातम्या जशा त्यांच्या द्वारा दूरदूरचा प्रवास करतात,

त्याप्रमाणें पुलाजवळील क्षोभ अशा रीतीनें किनाऱ्यापर्यंन्त पोहोंचणार. शरीरांत जसें अेका ठिकाणीं लागलें तर त्याची बातमी साऱ्या शरीराला चटकन् लागते तसेंच पाण्याचें देखील आहे. पाण्याच्या शांतींत भंग झाला तर त्यामुळें त्याच्या हृदयांत प्रतिबिंबित झालेलें सारें ब्रह्मांड डोलूं लागतें.

आतां तारकांचा रास सुरू झाला. पाण्यांत त्याचें अनुकरण होत असलेलें दिसून येतें, पण भूलोकाचा ताल पुन्हा वेगळाच असतो.

फेब्रुवारी १९२७

# : १८ : लावण्यफला लूनी

खारची ( मारवाड जंक्शन ) हून सिंध हैद्राबादला जातांना लूनी नदीचें अनेकदां दर्शन केलें आहे. अुंटांचें माहेरघर असलेल्या जोधपूरला जाण्याचा रस्ता लूनी जंक्शनवरूनच आहे; त्यामुळें देखील या नदीचें नांव स्मृतिपटावर अंकित झालेलें आहे. येथल्या स्टेशनावर हरणाचीं चांगलीं चांगलीं कातडीं स्वस्त दरांत मिळत असत. अशीं कितीतरी मुलायम मृगाजिनें येथून विकत घेअून मीं आपल्या कित्येक गुरुजनांना आणि आप्तेष्टांना ध्यानासन म्हणून भेट दिली होतीं. कातड्यांच्या अशा अुपयोगामुळें हरणांना त्या लोकांच्या ध्यानाचें कांहीं पुण्य मिळालें किंवा नाहीं तें कळायला मार्ग नाहीं.

लूनीचें नांव अैकतांच हृदयावर विषादाची छाया पसरते. तसें पाहिलें तर सर्वच नद्या आपलें मधुर जल घेअून खारट समुद्राला मिळत असतात. आणि अशा रीतीनें आपल्या पाण्याला सडण्यापासून वांचवतात. परंतु सागराशीं संगम होअीतोंवर नदीचें पाणी गोड रहाणेंच अिष्ट असतें. बिचाऱ्या लूनीचा सागराशीं संगमहि होत नाहीं आणि शेवटपर्यंत तिचें पाणीहि गोड अुरत नाहीं, अशी अुभयविभ्रष्ट स्थिति तिच्या वांट्याला आलेली आहे.

जर ही नदी सांभर सरोवरांतून निघाली असती तर तिचें खारटपण क्षम्य मानतां आलें असतें. परंतु हिचा अुगम आहे अजमेरजवळ, अरवली,

आरावली किंवा आडावली पर्वतांतून. तेथें सुद्धां तिला सागरमती म्हणतात! गोविन्दगडला पोंचतांच तेथें पुष्कर सरोवराचें पवित्र जल घेऊन सरस्वती नदी तिला येऊन मिळते.

लूनीचें खरें नांव होतें लवणवारि. त्याचा अपभ्रंश झाला लोणवारी, आणि आज लोक तिला म्हणतात लूनी. अजमेरपासून ते आबूपर्यंत पसरलेल्या अरवलीच्या पर्वतश्रेणीवरील पश्चिमेकडचें सगळें पाणी, लहान मोठ्या प्रवाहांच्या रूपानें, लूनीला येऊन मिळतें. या पाण्याच्या मदतीनेंच जोधपूर राज्याचा अर्धा हिस्सा आपली कडधान्याची शेती करीत असतो. शिंगाड्यांची निपज देखील येथें थोडी थोडकी नाहीं. जेथें जेथें लूनीच्या पुराचें पाणी पोंचते, तेथें तेथें तिला शेतकऱ्यांकडून आशीर्वादच मिळतात.

जेव्हां लूनी बालोतराला पोंचते तेव्हां तिचें दैव–सुदैव नव्हे, तर दुर्दैव, तिच्यावर कुरघोडी करतें. जेथें जमीनच खारी आहे, तेथें बिचारी नदी काय करणार?

जोधपूरच्या राजा जसवंतसिंहाला सद्बुद्धि सुचली. त्यानें, लूनी नदीचें पाणी खारट होण्याच्या आधींच, बिलाडापाशीं अेक मोठें धरण बांधलें आणि बावीस वर्गमैल विस्ताराचें अेक मोठें विशाल, मनुष्यकृत सरोवर बनवलें. तेरा हजार चौरसमैल पाणी या सरोवरांत अेकत्रित होतें. या सरोवराची खोली जास्तींत जास्त चाळीस फूट आहे. राजानें हें सरोवर बनवलें, त्यामुळें या सरोवराचें नांव ‘जसवंतसिंह सरोवर’ ठेवलें गेलें हें ठीकच झालें. जर शेतकऱ्यांना विचारलें असतें तर त्यांनीं या सरोवराला ‘लूनीप्रसाद’ नांव दिलें असतें.

आपल्या दोनशे मैलांच्या यात्रेच्या शेवटीं ही नदी आपल्या नशिबाच्या नांवानें खडे फोडीत फोडीत, कच्छच्या वाळवंटांत लुप्त होते. तिची तिन्ही तोंडें मिठानें अितकीं कांहीं भरलेलीं असतात कीं समुद्राला सुद्धां तिच्या पाण्याचें आचमन करण्याची अिच्छा होअूं नये.

लूनी, सरस्वती, बनास आणि अशाच कांहीं नद्या श्रद्धेनें आपलें पाणी कच्छच्या रणाला अर्पण करीत असतात. आतां पाहूंया त्यांच्या या श्रद्धेचें फळ त्यांना केव्हां मिळतें आणि वाळवंटाचें परिवर्तन अुपजाअू जमिनींत केव्हां होतें तें. आज लूनी नदी जवळजवळ पाकिस्तानच्या सरहद्दीपर्यंत मजल

मारते आणि कच्छच्या वाळवंटाला दिवसेन् दिवस अधिकाधिक खारें बनवीत असते ! अशा लवण-प्रधान, लवण-समृद्ध नदीला जर आपण 'लावण्यवती' म्हटलें तर वैयाकरणी लोकांना तें अवश्य मान्य होओील.

काव्यरसिक काय म्हणतील कोण जाणे !

१९५७

# : १९ : अंबा-अंबिका

भीष्म-पितामहांनीं अंबा-अंबिका या दोन राजकन्यांना जिंकून राजा विचित्रवीर्यापाशीं आणलें. त्या मुलींनीं कसलाहि आडपडदा न बाळगतां सांगितलें, 'आमचें मन दुसऱ्यावर बसलें आहे.' आतां विचित्रवीर्यानें त्यांच्याशीं विवाह तरी कसा करावा ? आणि ज्याच्यावर त्यांचें मन बसलें होतें तो राजा तरी अशा जित कन्यकांना आपल्या पदरांत कसें घेणार ? बिचाऱ्या राजकन्या कोणत्याहि पतीची प्राप्ति झाल्यावांचूनच झुरून झुरून मेल्या.

आबूच्या पहाडावरून अुन्हाळ्याच्या दिवसांत सरस्वती आणि बनास या दोन नद्यांचें मीं दर्शन घेतलें होतें. या बिचाऱ्या नद्या समुद्रापर्यन्त पोहोंचू शकत नाहींत; मधें कच्छच्या वाळवंटांतच त्या झुरून झुरून लुप्त होतात. अंबा-अंबिकांप्रमाणें कौमार्य, सौभाग्य आणि वैधव्य यांपैकीं अेकहि स्थिति त्यांच्या वांट्याला आलेली नाहीं. गुजराथ आणि राजपुताना यांच्या अितिहासांत या नद्यांना कितीहि महत्त्व असलें तरी राजा कर्णाच्या दोन आसवांशिवाय आपण त्यांना अधिक काय देअूं शकणार ?

१९२६-२७

# : २० : रेणुकेचा शाप

रेणुका म्हणजे रेती. तिच्या शापानें कोणती नदी सुकून जाणार नाहीं? गयेची नदीसुद्धां अशीच अंतःस्रोता झाली आहे नाहीं का? मग वढवाण जवळील भोगावो देखील अशीच झाल्यावांचून कशी राहील? काठियावाडांत भोगावो अनेक आहेत. प्रत्येकीला कुणा ना कुणा राणकदेवीचा शाप भोंवला असेल का? शेत्रुंजी, भादर, मच्छु, आजी, रंगमती, मेगळ—चारहि दिशांना वहाणाऱ्या या नद्यांपैकीं बाराहि महिने वहात रहाणाऱ्या नद्या किती? खंडस्थ भारतवर्षापासून सौराष्ट्र काठेवाड अनेक प्रकारें वेगळें पडतें. त्याचा आकार तो केवढा! चोटीला किंवा बरडा, शेत्रुंजा किंवा गिरनार हे पाणी देऊन देऊन किती देणार? आणि त्यांच्या मुलीसुद्धां वाहून वाहून कितीसें पाणी वाहून आणणार? निलगिरि आणि सह्याद्रि, सातपुडा आणि विंध्याद्रि, हिंदुकुश आणि हिमालय, नागा, खासी आणि ब्रह्मी योमा यांसारख्या समर्थ पर्वत-राजांनाच मुख्यतः मेघांचा करभार प्राप्त होतो. त्यांच्या मुली गौरवानें अलस—लुलित होऊन चालतात, त्यांच्यापुढें बिचाऱ्या काठेवाडच्या नद्यांचा काय पाड? पाऊस पडला कीं वाहूं लागल्या. पाऊस थांबला कीं हवालदिल होऊन त्यांचा संसार आटोपलाच.

प्रत्येक नदीनें अेखादद्दुसऱ्या शहराला आश्रय दिला आहे. भोगावोमुळें वढवाणला शोभा आली आहे. राणकदेवीचा शाप नसता तर या नदीचें मुख किती अुज्ज्वल दिसलें असतें! अंत्यजांचा तळतळाट घेऊन हल्लीचे लोक तिची पुढें आणखी काय दुर्दशा करणार आहेत कोण जाणे! शेत्रुंजीचीं वळणें पहायचीं असतील तर तिच्या पाठीराख्या डोंगराच्या माथ्यावरून तीं पाहून घ्यावींत. सोन्यासारखें गवत अुगवलें आहे, दूरदूरवर गालिच्यासारखीं शेतें पसरलीं आहेत आणि यांच्यामधून शेत्रुंजी आपली वाट काढीत मंद गतीनें चालली आहे. शेत्रुंजीची ती चाल संस्कारी आणि चित्ताकर्षक आहे.

आणि मेगळ हें नांव कशावरून पडलें असावें? देव डोहांत मगरानें अेखाद्या हत्तीला घट्ट पकडून ठेवलें असेल म्हणून? कीं समुद्राच्या आणि

तिच्यामधें येणाऱ्या अुंच वालुकापटावर ती डोकें आपटून घेत असते म्हणून ? प्रत्येक नदीला समुद्राला मिळण्याचा हक्क हा आहेच. परंतु बिचाऱ्या मेगळेला वर्षाचे आठ महिने खंडितेप्रमाणें आपल्या पतीचें दुरूनच दर्शन घ्यावें लागतें. पावसाळयांत जेव्हां समुद्रालाहि राहवत नाहीं तेव्हांच या दोघांचा संगम होतो. चोरवाडच्या लोकांना अगदीं या संगमावरच स्मशान करण्याचें कसें काय सुचलें ! अथवा त्यांत देखील औचित्य नाहींच असें कसें म्हणावें ? स्मशान सुद्धां अिहलोक व परलोक यांचा संगमच नाहीं का ?

पण जिच्याविषयीं काठेवाडनें अभिमान मानावा अशी भादर ही अेकच नदी आहे. भादरचें मूळ नांव कोणतें ? भाद्रपदी कीं भद्रावती ? बहादुर तर नसावेंच. या नदीची प्रतिष्ठा फार आहे. जेतपूर, नवागढ व नवीबंदर यासारखीं स्थानें तिच्या कांठावर वसलीं आहेत. नवीबंदर जेव्हां वसवलें गेलें, तेव्हां त्याला 'नवी' नांव देणाऱ्या पुरुषांच्या हृदयांत केवढ्या आकांक्षा आणि अुत्साह भरलेला असेल ! पोरबंदरपेक्षांहि तें श्रेष्ठ होअील, मोठमोठीं जहाजें दूरदेशींचा माल आणून देशाच्या अंतर्भागापर्यंत पोहोंचवतील ! दैव अनुकूल असतें तर भादरला टेम्सची प्रतिष्ठा नसती लाभली ? पण नदीची प्रतिष्ठा तिच्या सुपुत्रांच्या पुरुषार्थावरच अवलंबून असते. आज भादरला हिंदुस्थानांतील पश्चिम वाहिनी नद्यांचें अग्रेसरत्व प्राप्त झालें आहे तेंच पुष्कळ आहे.

रंगमती, आजी आणि मच्छु कितीहि परोपकारी असल्या आणि नवानगर, राजकोट आणि मोरबी यांच्या वैभवाला अखंड न्याहाळीत असल्या तरीहि समुद्र सोडून त्यांना लहानशा आखातालाच वरणें भाग पडतें.

काठेवाडच्या या सगळया नद्यांनीं देशी राज्यांतील खटपटी व लटपटी फार पूर्वींपासून पाहिल्या असतील. पण काठेवाडच्या भिन्न भिन्न विभागांतील विशिष्ट चालीरीतींचें दर्शन जर त्या आपल्याला घडवतील, तर ती कथा फार रोचक होअील यांत शंका नाहीं.

सौराष्ट्रांतील नद्यांकडून त्यांचे आपआपले अनुभव वदवून घेतले पाहिजेत. त्यांचें पाणी पिणाऱ्या अेखाद्या सुपुत्राचें तें काम आहे.

१९२६–२७

# : २१ : अुंचळ्ळीचा धबधबा

अगदीं सुकून गेलेल्या जोगच्या धबधब्याच्या या वेळच्या दर्शनाची विषण्णता धुअून काढण्यासाठीं दुसरें अेखादें कांहींसें भव्य आणि प्रसन्न दृश्य पहाणें आवश्यक होतेंच. कारवार जिल्ह्याच्या सर्वसंग्रहाचीं ( गॅझेटियरचीं ) पानें चाळतां चाळतां शोध लागला कीं जोगपेक्षां किंचित् अुतरता अुंचळ्ळी नांवाचा अेक मजेदार धबधबा शिरसीहून फार दूर नाहीं. लशिंग्टन नांवाच्या अेका कलेक्टरनें सन १८४५ त या धबधब्याचा शोध लावला होता ! जणूं काय त्याआधीं अेखाद्या माणसानें तो धबधबा पाहिलाच नसेल ! अिंग्रज माणसाच्या नजरेस तो पडला म्हणूनच त्याला दुनियेंत स्थान मिळालें !

ही अुंचळ्ळी आहे कोठें ? तेथें कोठून जायचें ? कसें जायचें ? आमच्या कार्यक्रमांत हा धबधबा बसतो किंवा नाहीं ? याची चौकशी मीं सुरू केली. श्री. शंकरराव गुलवाडींनीं ताडलें, कीं आतां अुंचळ्ळीचा कार्यक्रम ठरविल्याशिवाय शांति किंवा स्वास्थ्य लाभणार नाहींत. आणि माझ्यापेक्षां त्यांचा अुत्साह कमी थोडाच होता ! त्यांनीं सांगितलें कीं वीज अुत्पन्न करण्याच्या दृष्टीनें कारवार जिल्ह्याच्या धबधब्यांची पहाणी–सरवे–झाली तेव्हां अिंजिनियर लोकांनीं अुंचळ्ळीच्या धबधब्याला पहिलें स्थान दिलें होतें; गिरसप्पाच्या म्हणजेच जोगच्या धबधब्याला दुसरा क्रमांक दिला; मागोडला तिसरा, आणि सूपाजवळ आहे तो चौथा.

समुद्राबरोबर कारवार जिल्ह्याची मैत्री जुळवून देणाऱ्या चार मुख्य नद्या आहेत—काळी नदी, गंगावळी, अघनाशिनी आणि शरावती. यापैकीं शरावती अथवा बालनदी होन्नावरपाशीं समुद्राला मिळते. दहा वर्षांपूर्वीं जेव्हां दुसऱ्यांदा जोगचा धबधबा पाहिला होता तेव्हां याच शरावती नदीमधून नावेंत बसून होन्नावर पाहून वरच्या दिशेनें आम्ही आंत गेलों होतों. शरावतीचें तीर म्हणजे वनश्रीची मेजवानी !

यावेळीं जेव्हां हुबळीहून अंकोला आणि कारवारकडे आम्ही गेलों होतों त्यावेळीं आरबेल घाटांतून नागमोडी वाट काढीत जाणारी गंगावळी आम्ही

बघितली होती. आणि अंकोल्याहून गोकर्णाला जातांना तिच्या पृष्ठभागावर नौकाविहार देखील केला होता. काळी नदीचें दर्शन तर मीं लहानपणींच कारवारमधें घेतलें होतें. पन्नास वर्षांपूर्वींच्या त्या आठवणी दहा वर्षांपूर्वी ताज्याहि केल्या होत्या आणि यावेळीं कारवारला गेल्याबरोबर काळी नदीचें दोनदां दर्शन घेतलें होतें. पण अेवढ्यानें समाधान झालें नाहीं म्हणून कारवार-पासून हळग्या पर्यन्तचा दहा मैलांचा प्रवास जाअून येअून होडींतूनच केला.

चौथी नदी अघनाशिनी. तिचें नांवच किती पावन! ती नदी गोकर्णाच्या दक्षिणेस तदडी बंदरापाशीं आडवी तिडवी अस्ताव्यस्त खूप पसरते, पण समुद्रापर्यन्त पोहोंचण्यासाठीं मात्र तिला अेक लहानच मार्ग सांपडतो. समुद्राला भेटण्यासाठीं त्वरा करून ही अघनाशिनी सह्याद्रि पर्वतावरून जेथें खालीं अुडी घेते, तोच अुंचळीचा धबधबा होय.

आम्ही सिद्धापुरहून शिरसीचा रस्ता पकडला. पण शिरसीपर्यन्त जाण्याच्या अैवजीं, पश्चिमेकडे फुटणाऱ्या अेका रस्त्यानें आम्ही शिरसीला पोहोंचलों. तेथें गोपाळ माडगांवकरांचे काका रहात होते. तेथले अेक चांगले प्रतिष्ठित जमीनदार. त्यांच्या आगत–स्वागताचा स्वीकार करून आम्ही अुंचळीच्या शोधांत निघालों. नीलकुंदहून होसतोट (नवें अुद्यान) ला जायचें होतें. लश्करी जीपची सोय झालेली असल्यामुळें जंगलांतील रस्ता पार कसा होअील याची चिंता जवळजवळ दूर झाली होती. या होसतोटहून होन्नेकोंब (सोन्याचें शिंग) कडे जाणाऱ्या रस्त्यानें आम्हांला जावयाचें होतें. पण या रस्त्यानें मोटर तर दूरच, पण बैलगाडी किंवा पालखी सुद्धां जाअूं शकत नाहीं. त्याला तर वाघाची पांदी म्हटलें पाहिजे. माणसाला सुद्धां वाघासारखें बनूनच अशा वाटेनें जाणें भाग पडतें. आम्ही आमच्या जीपला अेका झाडाच्या छायेंत विसावा घेत ठेवले आणि 'अथाऽतो प्रपातजिज्ञासा' असा संकल्प सोडून जंगलांतून वाट काढायला सुरुवात केली. होसतोटहून अेक स्थानिक तरुण हातांत कोयता घेअून वाट दाखविण्यासाठीं म्हणून आमच्यापुढें निघाला. त्याला बिचाऱ्याला सावकाश चालण्याची संवय नाहीं आणि सृष्टि-सौंदर्य न्याहाळण्याचें वेड नाहीं. तो आपला पुढें पुढें निघून गेला. आम्हांला त्याचा फारच थोडा अुपयोग झाला. आम्ही थोडेसें पुढें गेलों, चढलों आणि

अुतरलों—अुतरलों आणि चढलों—तेथून जंगल घनदाट होअूं लागलें. थोड्या वेळानंतर तें घनघोर बनलें.

So steep the path, the foot was fain,
Assistance from the hand to gain.

आमची मुख्य अडचण होती पायतळींची वाट. तिथें अितकीं कांहीं सुकलेलीं पानें गोळा झालेलीं होतीं कीं पाय घसरला नाहीं तरच नवल! त्या पानांतून सळसळत अेखादा सर्प बाहेर निघाला नाहीं ही अीश्वराची कृपाच होय. नाहींतर आमची अुंचळ्ळी तेथेंच आटपली असती. जेथें अवघड अुतार असेल तेथें काठीनें पानें बाजूस सारून अेखादा मजबूत दगड किंवा झाडाचें चिवट मूळ मिळतें कीं काय तें पहावें लागे.

दुपारची बारा वाजण्याची वेळ होती. पण तरूंच्या 'स्निग्धच्छायां' मधून अुन्हाला आंत शिरकाव मिळेल तर ना? आम्ही चालून चालून गरम झालेले नसतों तर थंडीच लागली असती. थोडें पुढें जायचें आणि अेकमेकांना विचारायचें, 'आपण किती चालून आलों? अजून किती बाकी आहे?' सगळेच अज्ञान. पण सिद्धापुरहून अेक आयुर्वेदिक डॉक्टर कॅमेरा घेअून आमच्या बरोबर आले होते. ते गृहस्थ अेका वर्षापूर्वी दुसऱ्या कोणत्या तरी रस्त्यानें अुंचळ्ळीला गेले होते. तेवढ्या जुन्या अनुभवाच्या भांडवलावर ते आम्हांला बाकी किती रस्ता अुरला त्याचा अंदाज सांगत होते! मधून मधून आमची नांवापुरती वाट देखील बंद होअी. पुढें कसें जायचें याचा अंदाजच करावा लागे. पण खरें संकट वाट बंद झाल्यामुळें अुभें रहात नसे; पण जर अेका वाटेला दोन वाटा फुटत असल्या, आणि खरी वाट कोणती हें सांगणारें कुणी सोबत नसलें, अन् आंधळा अंदाज बांधणाऱ्या आपल्या सोबत्याच्या अभिप्रायाशीं आपला तितकाच आंधळा अंदाज जुळत नसला, तर मग मन दुग्ध्यांत पडतें. आणि शेवटीं 'यद् भावि तद् भवतु'—जें व्हायचें असेल तें होवो—असें म्हणून नशिबावर हवाला टाकून अेखादी वाट धरावी लागते.

कुणीसें म्हणालें कीं दुरून धबधब्याचा आवाज अैकूं येत आहे. माझे कान फार तिखट नाहींत. अेकानें केव्हांच राजिनामा दिला आहे आणि दुसरा कान

कामापुरतेंच अैकूं शकतो. पण कल्पनाशक्तीविषयीं असें कांहीं म्हणतां येणार नाहीं. कल्पना आणि कान या दोघांच्या जोरावर मीं अैकण्याचा प्रयत्न केला, पण ज्याला धबधब्याचा आवाज म्हणता येअील असें कांहींहि कानीं पडलें नाहीं. कुठें मधमाशा भणभणत असत्या तरीदेखील मीं म्हटलें असतें कीं, 'होय, होय, धबधबा अैकूं येत आहे खरा.' अडचणीच्या प्रवासांत सोबत करणाऱ्या लोकांशीं चट्कन सहमत होण्याच्या यात्राधर्मावर माझा संपूर्ण विश्वास आहे ! पण येथें माझा नाअिलाज झाला.

अेकीकडे मी जंगलाच्या भीषण सुंदरतेचा आस्वाद घेत होतों आणि दुसरीकडे चि. सरोजचे किती हाल होत असतील या चिंतेनें तिच्याकडे पहात होतों. जेव्हां सरोज म्हणाली कीं, 'अशा जंगलांतील प्रवासाच्या शेवटीं अेखादा धबधबा जरी पहायला सांपडला नाहीं तरीदेखील येथें येणें सार्थकीं लागलें असें मानावें लागेल. किती मजेदार आहे हें जंगल ! हे मोठे मोठे वृक्ष आणि त्यांना बांधणाऱ्या वेली—सारेंच मजेदार आहे.' तेव्हां माझा जीव भांड्यांत पडला.

पुढें गेल्यावर जेव्हां वाट फारच बिकट झाली आणि अेका हातांत काठी आणि दुसऱ्या हातानें कुणाच्या तरी खांद्याचा आधार घेअून अुतरणें देखील अशक्यप्राय झालें, तेव्हां सुद्धां सरोज म्हणे, 'माझा अुत्साह कमी झालेला नाहीं, पण दुसऱ्यांना मी अडचणींत टाकीत आहें हा विचारच मला फार अस्वस्थ करीत आहे. अितका अुतार पुन्हा चढायचा आहे हेंहि विसरतां कामा नये.'

मीं म्हटलें, 'अेकदां अुंचळीचें दर्शन घेतल्यानंतर परत फिरण्याची व्यवस्था कशीतरी होअीलच. आपण पुरेसा विसावा घेत घेत जाअूं. येथवर अितक्या दूर आलोंच आहोंत आणि धबधब्याचा आवाज सुद्धां अैकूं येअूं लागला आहे. तेव्हां पुढें जाण्यावांचून गत्यंतर नाहीं.'

आमच्या वाटाड्यानें खालीं जाअून 'कूक्' केलें. डॉक्टर म्हणाले, 'त्यानें पाणी पाहिलें असावें.' आमच्या अुत्साहांत भर पडली. आम्ही पुन्हा अुतरलों, आणखीन अुतरलों. पुढें गेलों, नंतर अुजव्या बाजूस वळलों आणि शेवटीं—ज्याच्यासाठीं डोळे व्याकुळ झाले होते त्या धबधब्याचें डोकें दृष्टीस पडलें !

अेका अरुंद दरीच्या या बाजूस आम्ही होतों आणि समोरच्या बाजूनें, आम्ही सकाळपासूनच्या जीपच्या प्रवासांत तीनदां ओलांडलेलें, अघनाशिनींचें पाणी मोठ्या दगडांच्या अेका तिरप्या थरावरून खालीं पोहोंचण्याच्या तयारींत होतें. गाणें जसें तंबोऱ्याच्या साथीवरच अैकायचें असतें, त्याचप्रमाणें धबधब्याचें दर्शन करायचें असतें तें धबूधबूच्या नगाऱ्याच्या साथीवरच.

अुंचळ्ळीचा धबधबा जोगच्या राजा धबधब्याप्रमाणें अेका झेंपीत खालीं पोंचत नाहीं. पहाटेच्या साखरझोंपेच्या प्रत्येक तुकड्याची जशी अर्धजागृतावस्थेंत आपण चव घेत असतों, त्याचप्रमाणें अघनाशिनीचें पाणी प्रत्येक पायरीवर अुड्या घेत घेत पांढऱ्या रंगाचा विविध छटांनीं भरलेला पडदा तयार करतें. अितक्या पांढऱ्या शुभ्र पाण्यांत जगांतलें काळ्यांतले काळे 'अघ'–पाप सुद्धां सहज धुवून निघेल.

सूप तिरपें तिरपें हलवीत धान्य पाखडतात तेव्हां धान्याचे दाणे जसे नाचत नाचत अुजव्या बाजूच्या कोपऱ्यांत धांवत सुटतात आणि त्याबरोबरच पुढें देखील जातात त्याचप्रमाणें येथलें पाणी पर्वताच्या खडकांमधून अुतरतांना तिरपेंहि धांवतें आणि फेसांचीं वलयें मिरवीत खालीं अुडीहि घेतें. अेका ठिकाणीं पाणी येअून अवतरलें कीं लगेच तें तेथें अंगरख्याच्या घेराव्याप्रमाणें किंवा धोतराच्या कासोट्याप्रमाणें फुगूं लागतें आणि अनुकूल दिशा मिळवून पुन्हां झेंप घेतें.

आतां तर तें पाणी असे किती नखरे करणार आहे आणि शेवटीं कोठवर पोहोंचणार आहे तें जाणून घेतल्यावांचून गत्यंतरच नव्हतें. आमच्यापैकीं कांहीं पुढें निघाले. पुन्हां अुतरा, आणखी अुतरा; झाडांच्या लवचिक फांद्या पकडून अुतरा. असें करतां करतां संपूर्ण धबधब्याचा अखंड साक्षात्कार घडविणाऱ्या अेका मोठ्या शिळेच्या माथ्यावर आम्ही जाअून पोहोंचलों. या कड्याच्या माथ्यावर अुभे राहून समोरील कड्यावरून अवतरणाऱ्या पाण्याचा पदक्रम न्याहाळणें हें जीवनांतील अेक अहोभाग्य होतें. आम्ही टक लावून पाण्याकडे पहात होतों, पण पाणी कांहीं आम्हांला पहात बसायला रिकामें नव्हतें. तें होतें आपल्या मस्तींत चूर. कापराच्या रंगांत जो पांढऱ्या रंगाचा अुत्कर्ष असतो तोच या जीवनावतारांत होता.

भगवान सूर्यनारायण वरून आम्हांला आपले आशीर्वाद देत होते. कानशिलांवरून घामाच्या धारा कितीहि निथळूं लागल्या तरी समोरच्या धबधब्यापुढें त्या कुणाचें लक्ष थोडेंच वेधून घेअूं शकणार ? सूर्यनारायणाचे आशीर्वाद झेलण्याची शक्ति जशी अुंचळीच्या धबधब्यांत होती तशी माझ्यांत नव्हती. पाणी चकाकून शुभ्र रेशमाची किंवा सॅटीनची शोभा दाखवूं लागलें. A moving tapestry of white satin and Silver filigree.

कटकमध्यें चांदींतून बारीक बारीक तारा खेचून त्यांचे अतिशय नाजुक व अत्यंत मोहक दागिने तयार करतात. तारांचीं पिंपळपानें, कमळें, करंडे— असे नानाप्रकार मी ओरिसामधें डोळे भरून पाहिले आहेत, आणि म्हटलें आहे, 'या दागिन्यांनीं कटकचें नांव सार्थ ठरलें आहे खरें.'

निसर्गाच्या हातून घडणारे आणि क्षणोक्षणीं नवें नवें आकार करणारे रुप्याचे सुंदर व जिवंत दागिने पुन्हां अेकदां पाहून कटकचें स्मरण झालें. सोन्याच्या झांकणानें सत्याचें रूप झांकलें जात असेल, पण रुप्याच्या या जिवंत तार-कामांतून निसर्गाचें सत्य अद्भुत प्रकारें प्रकट होत होतें. 'आतां या सत्याचें काय करूं ? त्याचें कसें प्राशन करूं ? त्याला कोठें सांठवून ठेवूं ? कसें अुचलून घेअून जाअूं ? अशा गोड संभ्रमांत मी सांपडलों होतों. अितक्यांत जुन्या संवयीमुळें, अहेतुकपणें, कंठांतून अीशावास्याचा मंत्र जोरानें घुमूं लागला. होय, खरोखर हें सारें जगत् त्याच्या 'अीशा' नें झांकलेंच पाहिजे—समोरचा तिरकस थर असलेला खडक जसा पाण्याच्या पडद्यानें झांकला जात आहे, आणि तो पडदा जसा चैतन्याच्या चकाकीनें झांकला जात आहे. जें जें नजरेस पडतें—मग ती चर्मचक्षूची नजर असो किंवा कल्पनेची दृष्टि असो — तें सारेंच आत्मतत्त्वानें झांकून टाकलें पाहिजे. तरच अलिप्त भावानें अखंड जीवनाचा शेवटपर्यन्त आस्वाद घेता येअील. 'तुला देहवंताला याहून दुसरा मार्ग नाहीं.'

नजर खालीं वळली तों तेथें अेक शीतल कुंड हिरव्या निळसरपणांत धबधब्याचें पाणी झेलीत होतें आणि परिग्रह बरा नव्हे अशी जाणीव झाल्यामुळें थोड्याच वेळांत अेका सुंदर प्रवाहांत तो सारा जथा प्रवाहित करीत होतें. अघनाशिनी आपल्या वांकड्यातिकड्या प्रवाहाच्या द्वारा आसपासची सारी

भूमि पावन करण्याचें आणि मनुष्यजातीचें वांकडेंतिकडें (जुहुराण) पाप (अेनस) धुवून काढण्याचें आपलें व्रत अविरत चालवीत होती. मीं तिलाच शेवटीं प्रार्थना केली.

युरोधि अस्मत् जुहुराणम् अेनः
भूयिष्ठां ते नम अुक्ति विधेम।

हे अघनाशिनी! आमचें वाकडें तिकडें कुटिल पाप झुंजून काढून टाक. आम्ही तुझ्यासाठीं अनेकानेक नमस्काराचीं वचनें रचूं!

जून १९४७

# : २२ : प्रथम समुद्रदर्शन

वडिलांची कारवारला बदली झाली आणि आम्ही सातारा सोडलें. आम्ही प्रथम शाहपुरला गेलों तेथें कांहीं दिवस राहून आम्ही वेस्टर्न अिंडिया पेनिन्शुलर रेल्वेमधें बसून मुरगांवला गेलों. वाटेंत गुंजीच्या स्टेशनवर कारंजीं अुडत होतीं तीं पहाण्याची आम्हांला मोठी मौज वाटली. लोंढ्याला गाडी बदलून डब्ल्यू. आय्. पी. रेल्वेच्या डब्यांत आम्ही बसलों.

कॅसल रॉकपासून तीनअी घाटापर्यंत घाटाची शोभा डोळे भरभरून पाहिली. बघण्याचा आनंद अधिक होता कीं अेकमेकाला बोलून दाखवण्याचा, हें सांगणें कठीण. पण आम्ही अुजव्या खिडकीकडून डाव्या खिडकीकडे आणि डावीकडून अुजवीकडे, असे नाचून डब्यांतील लोकांना अगदीं नकोसें केलें.

पुढें आला दूधसागर. तो तर आमचेहून मोठमोठ्या अुड्या मारी आम्ही यापूर्वीं धबधबा पाहिला नव्हता. अितकें दूध वाहात चाललेलें पाहून खूपच मौज वाटली आणि आमची आगगाडीहि मोठी रसिक! अगदीं धबधब्या-समोरच्या पुलावर ती अुभी राहिली आणि धबधब्याचे थंडगार तुषार खिडकीवाटे आमच्या डब्यांत येअून आम्हांला गुदगुदल्या करूं लागले. त्या दिवशीं आम्ही बाकीचा दिवस धबधब्याच्याच गोष्टी केल्या.

आम्ही मुरगांवला पोहोंचलों. हल्लीं मुरगांवाला लोक मार्मागोवा म्हणतात. आम्ही स्टेशनवर अुतरलों. पुष्कळसे आगगाडीचे रूळ ओलांडून अेका खाणावळींत गेलों. तेथें जेवलों आणि मी जवळपास पडलेल्या शिंपा घेअून खेळूं लागलों. अितक्यांत केशू धांवत धांवत आला. त्याचे ते विस्फारलेले डोळे आणि जीव घेअून धांवत असावा अशी त्याची ती गति पाहून मला वाटलें अेखादा बैल त्याच्या मागें लागला असावा.

तो ओरडून म्हणाला, 'दत्तू, दत्तू, लवकर ये! लवकर ये!! पहा तिथें कित्ती कित्ती पाणी आहे. अरे चल. टाक त्या शिंपा तिकडेच. समुद्र आहे समुद्र! चल तुला दाखवितों.' लहानपणीं अेकाच्या अुत्साहाचें वारें दुसऱ्याला लागायला कारण समजावें लागत नाहीं. मलाहि केशूसारखेंच अवसान चढलें आणि आम्ही दोघे धांवूं लागलों. गोंदूनें दुरून आम्हांला धांवतांना पाहिलें. त्यानेंहि धूम ठोकली! आणि आम्ही तीन वेडेपीर अेकसारखे धांवूं लागलों.

आणि समोर काय दृष्टीस पडलें? जन्मांत कधीं न पाहिलें अितकें पाणी समोर दूरवर नाचत आहे. मी अेकदम अुद्‌गारलों, "अब्बब्बब्बब्बऽ! कितीतरी हें पाणी!" मीं दोन्हीं हात शक्य तितके पसरले—छातीला ताण पडेल अितके पसरले. केशू आणि गोंदू यांनींहि हात पसरले. वडिलांनीं आम्हांला तशा स्थितींत पाहिलें असतें तर त्यांनीं तसबिरीचें यंत्र आणून आमची तसबीर काढली असती. "कितीतरी हें पाणी! अितकें पाणी आलें कोठून? अुन्हामधें कसें चकाकत आहे!" डोळाभर पाहिलें तरी तृप्ति होअीना. आतां या पाण्याचें करावें तरी काय? अगदी आकाश टेकलें आहे तिथपर्यंत पाणीच पाणी. आणि गप्पहि बसत नाहीं. आम्ही नाचूं लागलों आणि मोठमोठ्यानें ओरडूं लागलों. 'समुद्‌ द्र! समुद्‌ द्र!! समुद्‌ द्र!!!' आणि प्रत्येक वेळीं आम्ही समुद्रांतील 'मुद्‌' शक्य तितकें फुगवून म्हणत असूं. समुद्राची विशालता, लाटांचा खेळ आणि असलें दृश्य प्रथमच पाहिल्याचा आमचा आनंदातिरेक व्यक्त करण्याला आमचेजवळ दुसरें साधनच नव्हतें. लाट अुठून, फुगून फुटावी त्याप्रमाणें आम्ही समुद्र समुद्र म्हणत तालात नाचूं लागलों. पण आम्ही स्वतः लाटा नसल्यामुळें शेवटीं थकलों आणि आसपास पाहूं लागलों तेव्हां अेका बाजूला खोलीखोली अेवढ्या मोठ्या विटा रचलेल्या आम्ही पाहिल्या. कांहीं तिरप्या ठेवलेल्या होत्या आणि कांहीं सपाट. त्यावेळीं

मला अुपमा सुचली, दुकानांतील साबणाच्या वड्यांची आणि आगकाड्यांच्या पेट्यांची. या विटा पसरून मुरगांवचा धक्का तयार केला होता. महादेवाच्या पोळानें धिंगाणा घालावा त्याप्रमाणें या लाटा येअून येअून धक्क्याशीं टक्कर देत होत्या.

आम्ही परतलों आणि सर्वांना समुद्र कसा दिसतो त्याविषयीं सांगूं लागलों. समुद्रापुढें बिचारा दूधसागर मागेंच पडला.

सूर्य समुद्रांत मावळला. सर्वत्र अंधार पसरला. आम्ही जेवून खावून धक्क्याला लागलेल्या आगबोटींत जाअून बसलों. लोखंडी तारांचें जें कटवंजन (कठडा) असतें त्याला लागून असलेल्या बाकावर गोंदू आणि मी दोघे जाअून बसलों आणि अुंटासारखी मान असलेल्या यान्त्या मोठालीं पोतीं दोरखंडांत बांधून कशीं अुचलतात आणि ठेवून देतात हें पाहूं लागलों. आमच्या समोरील यारीनें अेका मोठ्या ढिगांतून पोतीं काढून काढून आमच्या आगबोटीचें पोट भरलें. यंत्रें घरघर करीत आणि जहाजांतील खलाशी 'आंबेस, आंबेस, आऱ्या, आऱ्या' चा मंत्र बोलत. आबेस आबेस म्हणतांच सांखळी घट्ट होअी. आणि आऱ्या आऱ्या म्हटलें कीं ती सैल होअी.

आम्ही गंमत पहात होतों अितक्यांत आमच्या मागें जणूं काय अगदीं कानाला लागून 'भों ओं ऽ ऽ ऽ' असा आवाज झाला. आम्ही दोघांनीं घाबरून बाकावरून टुण्‌दिशीं अुडी मारली आणि वेड्यासारखे चारी बाजूंस पाहूं लागलों. कानठाळ्या अगदीं बसून गेल्या होत्या. अेवढा मोठा आवाज अितक्या जवळचा सहन तरी कसा करावा? कुठें आगगाडीचें दुरून अैकूं येणारें 'अूं ऽ ऽ ऽ' आणि कुठें हें म्हशीप्रमाणें 'भों ओं ऽ ऽ ऽ'! शेवटीं आवाज थांबला. लाकडी पूल मागें खेचला गेला. येण्याजाण्याच्या रस्त्यावरील तारेचें कटवंजन पुनः बसविण्यांत आलें आणि 'घस घस' करीत आमच्या आगबोटीनें किनारा सोडला. बघतां बघतां अंतर वाढलें. कुणी हातरुमाल दाखवून तर कोणी नुसते हात हालवून अेकमेकांना निरोप दिला. अशावेळीं कांहीं लोकांचें कांहींतरी विसरलेलें असतेंच. मग ते ओरडून अेकमेकांला सांगतात आणि समोरचा मनुष्य न समजलें तरी आश्वासनासाठीं 'हो हो' म्हणत असतो.

ही सर्व मजा पाहिल्यानंतर आम्ही मागें वळलों. आगबोटींत सर्वत्र विजेचे

१०९८

दिवे होते. आगगाडींतील दिवे निराळे. जेथें खोबरेल आणि रॉकेल सिसळलेले दिवे लटकत्या हंडींत ठेवलेले असावयाचे, येथें भिंतींतून लहान लहान कांचेच्या गोळ्यांत विजेच्या तारा लाल तापून मंद प्रकाश देत असत.

आजचा दिवस म्हणजे निरनिराळ्या प्रकारच्या नवीन नवीन अुत्कट अनुभवांची मसालेदार खिचडी. डोळे, कान आणि मन अनुभव घेअून घेअून थकून गेले होते. त्यामुळें झोंप केव्हां आणि कशी आली हें मुळींच कळलें नाहीं फक्त आगबोटीचा पाळणा गोडपणें हालत होता अेवढीच गोष्ट झोपेंतून स्वप्नांत शिरली होती.

जून १९४९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ०८६६२
वर्ग ८६८ २१।३।७

# : २३ : गोकर्णाची यात्रा

लंकापति रावण सारा हिंदुस्तान ओलांडून अुत्तरेकडे हिमालयाच्या शिखरावर बसून तपश्चर्या करूं लागला. त्याच्या मातेनें त्याला पाठविलें होतें. महान् सम्राट् शिवपूजक रावणाच्या मातेनें काय सामान्य पाषाणलिंगाची पूजा करावी ? तिनें आपल्या मुलाला सांगितलें, “वत्सा, कैलासाला जा आणि देवाधिदेव महादेवाकडून त्याचें आत्मलिंग मागून आण. आत्मलिंगावांचून माझी पूजाच होअूं शकणार नाहीं.”

मातृभक्त रावण निघाला. हिमालयाच्या पलीकडे मानससरोवर आहे त्यांतून रोज अेक सहस्र कमळें तोडून त्यानें कैलासनाथाची पूजा आरंभली. तपश्चर्या अेक हजार वर्षें चालली.

अेकदां काय झालें कुणास ठाअूक, हजारांत नअू कमळें कमी पडलीं. पूजेंतून मधेंच अुठतां येत नाहीं आणि कमळांच्या सहस्र संख्येंतून अेकदेखील कमळ कमी पडतां कामा नये ! आतां काय करावें ? आशुतोष महादेव शीघ्रकोपीहि आहे; सेवेंत जरा कमतरता पडली तर सर्वनाशच करावयाचा. रावणाची बुद्धि, किंवा हिंमत कच्ची नव्हती. त्यानें अेकक शिरकमल कलम करून महादेवाला वहायला सुरवात केली. अशा भक्तीला अप्राप्य काय

असणार ? नअू शिरकमळें अर्पण होतांच भोलानाथ प्रसन्न झाले आणि म्हणाले, "वर माग, वर माग! वरं ब्रूहि! जितकें मागशील तितकें थोडें!" कृतार्थ झालेल्या रावणानें म्हटलें, "माझी माता पूजेला बसली आहे तिला तुझें आत्मलिंग हवें आहे." तोंडांतून अेवढें वचन निघण्याचा अवकाश, शंभूनें स्वतःचें हृदय चिरून त्यांतून आत्मलिंग काढून दिलें.

त्रिभुवनांत हाहाःकार अुडाला. देवाधिदेव महादेवानें आत्मलिंग काढून दिलें! आणि तें पण कुणाला? सुरासुरांचा काळ बनलेल्या रावणाला! आतां त्रैलोक्याचें कसें होअील? ब्रह्मदेवानें विष्णूकडे धांव घेतली. लक्ष्मी सरस्वतीकडे जाअून विचारूं लागली. अिन्द्र मूर्छित झाला. यमधर्म थरथरा कांपू लागला. शेवटीं सर्वांनीं विघ्नविनाशक गणपतीची आराधना केली आणि त्याला गळ घालून ते त्याला म्हणाले, "बाबा, कसेंहि कर, पण हें शिवलिंग लंकेला पोहोंचणार नाहीं असें कर!"

महादेवानें रावणाला सांगून ठेवलें होतें, "हें लिंग घेअून जा. पण लक्ष्यांत ठेव कीं जिथें जमिनीवर ठेवशील तिथेंच तें स्थिर होअील." महादेवाचे लिंग तें! पाऱ्याहूनहि जड. रावण लिंग हातीं घेअून पश्चिम समुद्राच्या किनाऱ्याकिनाऱ्यानें लगबगीनें लंकेकडे जात होता. संध्याकाळ होण्याची तयारी होती. अितक्यांत रावणाला लघुशंका लागली. शिवलिंग हातांत धरून लघुशंका कशी करावी? आणि जमिनीवर तर तें ठेवतां येत नाहीं. अशा पेचांत रावण पडला असतां देवांच्या संकेताप्रमाणें गणपति अेका गुराख्याचें रूप धारण करून गाअी चारीत आहे असा तेथें प्रगट झाला. रावणानें त्याला हांक मारून म्हटलें, 'अरे पोरा, हें लिंग जरा हातांत धरून ठेव. जमिनीवर ठेवूं नको हो!" गणपति म्हणाला, "लागतें तर फार जड बुवा! पण मी प्रयत्न करीन. जर झेपलें नाहीं तर तुला मी तीन वेळां हांक मारीन. तेवढ्यांत जर तूं आला नाहींस तर आमच्या कानीं सात खडे।"

प्रश्न फक्त लघुशंकेचाच होता. ती आटपायला लागून लागून किती वेळ लागणार? असा विचार करून रावण बसला. पण काय झालें होतें कुणास ठाअूक, आज त्याच्या पोटांत सात समुद्रच भरले असले पाहिजेत. गणपतीनें अेक हांक मारली पण बोलायचें कसें? जानवें कानावर आहे तोंपर्यंत बोलण्याची सोय नाहीं. गणपतीनें दुसरी हांक मारली तरीहि लघुशंका

संपेना. तो अगदीं कावराबावरा झाला. कराराप्रमाणें सिद्धिविनायकानें तिसरी हांक मारली आणि ताबडतोब भार असह्य झाला असावा त्याप्रमाणें 'अरेरेरे' म्हणत त्यानें शिवलिंग जमिनीवर ठेवून दिलें. शिवलिंगच तें! जमिनीवर ठेवलें मात्र, हां हां म्हणता म्हणतां अगदीं पाताळापर्यंत जाअून पोहोंचलें देखील. रावण रागानें आंधळा झाला. त्यानें गणपतीच्या कपाळावर जोरानें बुक्का मारला. गणपतीचें कपाळ रक्तबंबाळ झालें. अेवढा पराक्रम करून रावण लिंग अुपटून काढण्यासाठीं धांवला पण तें आतां कसचें साधणार? रावण लिंग अुपटण्याचा जसजसा प्रयत्न करूं लागला, तसतशी सारी पृथ्वी हादरू लागली, पण लिंग कांहीं बाहेर येअीना. शेवटीं रावणानें तें लिंग जोरानें पिळवटलें. त्याचे चार तुकडे रावणाच्या हातीं आले. ते त्यानें चार बाजूला फेंकून दिले.

रावण रागानें आणि निराशेनें लंकेला परत गेला. जगांत नुसत्या तपश्चर्येनें काम भागत नसतें. धूर्त लोकांचा कावा ओळखण्याचीहि बुद्धि असावी लागते.

मुरडलेल्या लिंगाचा जो मुख्य भाग राहून गेला त्यालाच गोकर्ण महाबळेश्वर म्हणतात. कारण पिंडीचें वरचें टोक गाअीच्या कानासारखें चपटें आहे. या पृथ्वीतलावर याचेहून अधिक पवित्र असें तीर्थस्थान नाहीं.

* * *

गोकर्ण महाबळेश्वर हें स्थान कारवार आणि अंकोला या दोन बंदरांच्यामध्यें तदडी बंदराच्या अुत्तरेला सहाअेक मैलांवर समुद्रकांठीं आहे. दक्षिणेकडे गोकर्ण महाबळेश्वराचें महत्त्व काशीविश्वेश्वराहून अधिक मानलें जातें. लिंग जमिनीच्या आंतच आहे. लिंगाच्या साळुंकींत मध्येंच अेक भोंक ठेवलेलें आहे. त्यांत अंगठा घातला असतां आंतील लिंगाचा स्पर्श होतो. दर्शन होण्याची आशाच नको! पुजारी म्हणतात कीं लिंगाची शिळा अितकी कांहीं मअू आहे कीं ती भक्तांच्या स्पर्शानें झिजून जाते. म्हणून जुन्या लोकांनीं तिच्याभोवतीं वरपर्यंत जलाधारी बसवून केवळ अंगुष्ठ स्पर्शाची सोय ठेवली आहे. पुष्कळ वर्षांनीं शुभशकुन झाला म्हणजे वरची साळुंकी काढतात, आसपासची बांधणी अुखडून काढून मूळ लिंग हात दोन हात अुघडें राहील, अितकें खुलें करतात. या अुघड्या लिंगाचें दर्शन करण्यासाठीं यात्रा लोटते. अमुक महिने पुरे झाले म्हणजे नंतर मोती वांटून तयार केलेल्या चुन्यानें आसपासची

चुनेगच्ची पूर्वीप्रमाणें करून टाकतात. या सर्व प्रकाराला 'अष्टबंध' म्हणतात असें मला स्मरतें.

* * *

आम्ही कारवारला असतांना अेकदां कपिला-षष्ठीप्रमाणें दुर्लभ अशा या अष्टबंधाचा योग आला. वडील, आअी आणि मी तिघेहि यात्रेला निघालों. गोकर्ण आगबोटीचें बंदर नाहीं. बोटी तदडीलाच जाअून थांबतात. तदडी बंदरावरून गोकर्णाला मला नेण्यासाठीं अेक गडी करण्यांत आला. मी त्याच्या काळ्या कुळकुळीत खांद्यावर बसून गोकर्णाला गेलों. तेथें आम्ही कोटितीर्थांत आंघोळ केली. गोकर्ण महाबळेश्वराचें दर्शन केलें. स्मशानाचें रक्षण करणारा हरिश्चंद्र पाहिला. त्याच्या खांद्यावर अेक चाबूक कोरलेला होता. जवळच अेक तीर्थ होतें. त्यांत म्हणे हाडें टाकलीं असतां हळू हळू विरघळून जातात. परत येअून आम्ही अहिल्याबाअीच्या अन्नछत्रांत जाअून त्या साध्वीच्या मूर्तीचें दर्शन केलें. कपाळावर खोक पडलेला आणि दोनच हात असलेला गणपति पाहिला. ब्रह्मदेवाची अेक मूर्ति पाहिली आणि विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे रावणाच्या त्या प्रख्यात लघुशंकेचें कुंड पाहिलें. आज देखील तें भरलेलें असतें आणि डोकें भणाणून जावें अितकी त्याची दुर्गंधी आहे. अितरहि पुष्कळ पाहिलें असेल पण आतां तें कोठून आठवणार ?

हो, बरें आठवलें ! या प्रदेशांतली अेक विशेष गोष्ट सांगण्याची राहूनच जात होती. घर गरिबाचें असो कीं श्रीमंताचें, जमीन काळी कुळकुळीत लिंपलेली असावयाची. जणूं काय काळ्या संगमरवरी दगडाचीच बनवली आहे. अितकी कांहीं गुळगुळीत आणि चकचकीत कीं मी जमिनींत पाहूनच गंध लावीत असे. अुन्हाळ्याच्या दिवसांत जमिनीवर कांहींहि अंथरल्यावांचून सुखानें निजावें. वेळोवेळीं शेणांत काजळ मिसळून ही जमीन सारवली जाते. पण हें सारवणें हातानें होत नसतें. सुपारीच्या झावळ्याच्या मुळाशीं पुठ्या-प्रमाणें अेक भाग असतो; त्याचा अेक तुकडा घेअून त्याच्या अुभ्या कांठानें घासून घासून जमिनीला ओप काढलेली असते. कोंकणी भाषेंत त्या पुठ्याला पोवली असें म्हणतात.

गोकर्णाहून परत येतांना तदडीपर्यंत पायीं न जातां गोकर्णाहून अेका वाफरांत बसून तदडीच्या समुद्रांत अुभी असलेली आगबोट गांठावी, असें आम्ही

ठरविलें होतें. वाफर किंवा वाफोर म्हणजे वाफेच्या यंत्रानें चालणारी अेक मोठीशी होडी. अिंग्रजींत हिला स्टीम लॉंच म्हणतात. मोसमचें तुफान सुरू होण्याचे ते दिवस होते. आगबोटी लवकरच बंद होणार होत्या. यामुळें परत जाणाऱ्या यात्रेकरूंची गर्दी बेसुमार होती. तदडी बंदरावरून बसणाऱ्या लोकांना जागा मिळेल कीं नाहीं याची शंका होती. म्हणून आम्ही गोकर्णालाच स्टीम लॉंचमधें बसून आगबोट लवकर गांठण्याचा मनसुबा केला होता.

गोकर्णाच्या बंदराला धक्का बांधलेला नाहीं. कांठापासून पाणी कमरेअितकें येअीतोंपर्यंत चालत जावें लागे. (लोकांच्या कमरेपर्यंत म्हणजे माझ्या छातीपर्यंत.) तेथें अेका होडींत चढून वाफरापर्यंत जावयाचें. तरुण लोक होडीपर्यंत चालत जात आणि बायकामुलांना गड्याच्या खांद्यावर बसवून किंवा दोन गड्यांच्या हाताची पालखी करून होडीपर्यंत नेत असत.

प्रारंभींच अेक अपशकून झाला. अेक गरीब म्हातारी शरीरानें विशेष स्थूल होती. पण दोन गडी करण्याअितके तिचेजवळ पैसे नव्हते. तिनें अेका लोभी गड्याला थोडीशी अधिक मजुरी देण्याची लालूच दाखवून आपल्याला पाठकुळीवरून घेअून जाण्यास कबूल करविलें. गडी कांहीं विशेष सशक्त नव्हता. तो समुद्रकांठीं बसला, ती विधवा म्हातारी त्याच्या पाठकुळीवर बसली. कुळी अुठावयास गेला तोंच त्याचा तोल जाअून तो पुढे कलंडला. अर्थात् म्हातारीहि कोलांटी खाअून पडली. अितक्यांत अेका टवाळ लाटेनें धांवत येअून दोघांना सचैल स्नान घातलें आणि पावन केलें!

आमची बोट जवळजवळ शेवटची असल्यामुळें गोकर्णहून बसणारे यात्रेकरू देखील पुष्कळ होते. त्या सगळ्यांना वाफरांत जागा कोठून मिळणार? म्हणून कंपनीनें शंभर अेक माणसें बसूं शकतील अेवढा अेक मोठा पडाव वाफराच्या मागें बांधला होता. वाफर भरल्यानंतर अुरलेले लोक या पडावांत बसले. या पडावाच्या मागें कस्टम खात्याची अेक होडी बांधली होती. तिच्यामधें त्या खात्यांतील अेक अंमलदार आणि अितर शिपाअी नोकर बसलेले होते. मीं पाहिलें कीं खासगी होड्या चालवायचीं वल्हीं अेखाद्या झाऱ्यासारखीं टोकाला वाटोळीं असतात आणि कस्टमच्या सरकारी होड्यांचीं वल्हीं क्रिकेटच्या बॅटीसारखीं लांबट आणि चपटीं असतात.

आमची ‘ वरात ’ वेळेवर निघाली. अेक दोन मैल आम्ही कापले असतील अितक्यांत आभाळ भरून आलें. वारा सोसाट्यानें वाहूं लागला आणि लाटा तर लांडग्यांना मेजवानी मिळावी त्याप्रमाणें नाचूं लागल्या. होड्या डोलूं लागल्या आणि वाफरावरील ताण वाढूं लागला.

अरे! हें काय? थेंब! पावसाचे थेंब!! मोठे मोठे! बोराअेवढे थेंब! आतां कसें होअील? लाटा जोरजोरानें अुसळूं लागल्या. वाफर बेफाम झालेल्या घोड्याप्रमाणें थैमान घालूं लागलें! मागच्या होडीचें दोरखंड कर्रर्रर्र कर्रर्रर्र आवाज करूं लागलें. अितक्यांत वाफर आणि होडी यांचेमधें अेक अेवढी मोठी लाट आली कीं आम्हांला होडी दिसेनाशी झाली.

मी वाफरामधें वाफेच्या बंबा (बॉयलर) जवळील लाकडी फळयांच्या ओट्यावर बसलों होतों. आमच्या तांडेलाला वाफर शक्य तितक्या लवकर आगबोटीपर्यंत पोहोंचवण्याची घाअी होती. त्यानें आपला वाफर बेफामपणें भर वेगानें सोडला होता. मी ज्या फळीवर बसलों होतों ती तापून गरम झाली. मला चटके बसूं लागले. काय करावें हें सुचेना. सरकायला जावें तर ‘ समुद्रस्तृप्यतु ’ व्हावयाचें आणि बसून रहाणें तर जवळ जवळ अशक्य झालें होतें. या संकटांतून अेका भयंकर रीतीनें माझी सुटका झाली. अेक प्रचंड लाट वाफरावर तुटून पडली आणि तिनें मला नख-शिखान्त स्नान घातलें. आतां लाकडी ओटा कसचा गरम लागतो?

लाट पाहून वडील घाबरले. आअीला कुलदेव आठवला. ‘ मंगेशा, महा-रुद्रा, मायबापा, तूंच आतां आम्हांला तार! ’ पाअूस मुसळधार पडूं लागला. वाफरांत बसणारे आम्ही कांहीं तरी सुरक्षित होतों पण आमच्या मागील होडींत बसलेल्यांचें काय? प्रथम प्रथम आमचेपेक्षां त्यांची स्थिति बरी होती. वाफर यंत्रानें पाणी कापीत जात असल्यानें थोडें थोडें पाणी आमच्या बाजूनें अुडत असे. होडीला आलेल्या लाटेवर स्वार होतां येत असे. त्यामुळें होडी कितीहि पुढेमागें डोलली तरी पाणी आंत येत नसे. पण आतां जेव्हां वारा आणि पाअूस यांच्यांत शर्यत लागली आणि दोघांचें अट्टहास्य सुरूं झालें, तेव्हां अेक लाट आली कीं जवळ जवळ अर्धी होडी भरून जाअी लाटा समोरून येत तोंपर्यंत कांहींसें ठीक होतें. होडी लाटेवर चढून अल्गद पलीकडे जाअी. क्षणांत लाटेच्या शिखरावर, तर क्षणांत दोन लाटांमधील गर्तेत. केव्हां

केव्हां होडी अेका लाटेच्या शिखरावरून पलिकडे अुतरूं लागते न लागते अितक्यांत दुसऱ्या अेका नव्या लाटेनें फुगून येअून होडीला वरच्यावर अुचलून धरावें ! असें कांहींतरी अकल्पित झालें म्हणजे होडींत अुभे असलेले लोक धडाधड अेक दुसऱ्याच्या अंगावर पडत.

पण आतां लाटा बाजूनें आपटूं लागल्या. होडींत असलेल्या बायका–मुलांना रडण्याचा अेकच अुपाय माहीत होता. जेवढे म्हणून जवानमर्द होते ते सगळे डोल, घागर, डबा, जें कांहीं हातीं येअील तें घेअून होडींतील पाणी भरभरून अुपसून काढीत होते. आगीचा (फायर ब्रिगेडचा) पंप याहून कितीशा वेगानें काम करीत असेल ? होडी कुठें जवळ जवळ रिकामी व्हावी अितक्यांत अेकादी क्रूर लाट विकट हास्य करून धाडदिशीं होडीच्या बरगडींत आपटून होडींत शिरत असे. त्या वेळच्या आरोळ्यांनीं आणि किंकाळ्यांनीं कानठळ्या बसून जात. काळीज जणूं फाटून जाअी. अेखाद्या यात्रेकरूनें अवधूत दत्तात्रेयाचा धांवा करावा; अेखाद्यानें पंढरपूरच्या विठोबाला आळवावें, कुणी अंबाभवानीला नवस करावा तर कुणी विघ्नहर्त्या गणेशाची स्तुति करावी, असें अेकसारखें चालूं होतें. प्रथम प्रथम वाफराचा तांडेल (कप्तान) आणि त्यांतील खलाशी आम्हां सर्वांना धीर देण्यासाठीं म्हणत, "अहो, तुम्ही कशाला घाबरतां ? जबाबदारी आमची आहे ना ! आम्ही असलीं कितीतरी तुफानें पाहिलीं आहेत ! याला कोण भीक घालतो ?" पण बघतां बघतां मामला अितका कांहीं गंभीर झाला कीं कप्तानाचें तोंड देखील अुतरलें. तो आतां म्हणूं लागला, "बाबांनों रडून काय होतें ? मनुष्याला केव्हांतरी मरावयाचें आहेच. मग तें अंथरुणावर येवो किंवा घोड्यावर, शिकारींत येवो किंवा समुद्रांत. तुम्ही पहातांच आहां कीं आमच्यानें होअील तें आम्ही करीत आहोंत. पण अिन्सानच्या हातांत काय आहे ? मालिक करेल तें खरें." मी तर टक लावून त्याच्या चेहऱ्याकडे पाहात होतों. सफरीच्या सुरुवातीला जो मनुष्य गाजरासारखा लालबुंद होता, तो आतां अळवाच्या पानासारखा हिरवा निळा होअून गेला होता.

त्या वेळीं माझें तर पोरवय होतें; पण गंभीर प्रसंग ओढवला असतां लहान मुलांनाहि मोठ्यांसारखें समजूं लागतें. क्षणोक्षणीं मी बसल्या जागेवरून सरकून जाअी. ओट्याची कड दोन्ही हातांनीं गच्च धरून मी कसेंबसें आपलें

बस्तान सांभाळीत होतों. आमचें सगळें सामान अेका बाजूला पडलें होतें, पण त्याचेकडे ढुंकून सुद्धां बघतो कोण? तरी पण पूजेचे देव आणि पूजेचा नारळ अेका वेताच्या सांबळींत ठेवलें होते. ती सांबळी मात्र मी माझ्या मांडीवर घेअून बसावयास विसरलों नाहीं.

माझ्या मनांत त्या वेळीं कसल कसले विचार येत होते! तो काळ माझ्या मुग्ध भक्तीचा होता. रोज सकाळीं अुठून दोन दोन तास माझें भजन चालत असे. माझी मुंजच झाली नव्हती. तेव्हां संध्यापूजा हातून कशी घडावयाची? तरीपण वडील पूजेला बसले म्हणजे देव्हाऱ्यांतून देव काढणें, अभिषेकासाठीं त्यांना ताम्हनांत ठेवणें, अभिषेक आटोपल्यानंतर त्यांना पुसून पुन्हां वर ठेवणें, वगैरे प्रकारची तांत्रिक मदत वडिलांना करण्यांत मला खूप धन्यता वाटे. आजचें तें काळमुखी तुफान पाहून मनांत विचार आला कीं, आज जर पाण्यांत बुडून मरणेंच नशिबांत असेल तर देवांची सांबळी छातीशीं घट्ट धरूनच मी जलसमाधि घेअीन. दुसऱ्याच क्षणीं विचार आला कीं, जर आअीच्या देखत वाफरांतून पाण्यांत अुलटून पडलों, तर आअीची काय स्थिति होईल? हा विचारच अितका कांहीं असह्य झाला कीं श्वास गुदमरून गेला. छातींत दगड बसल्याप्रमाणें दुखूं लागलें. मीं अीश्वराची प्रार्थना केली कीं, "देवा! आम्हांला जर बुडवायचेंच असेल तर आअीला आणि मला अेकमेकांना मिठी मारली आहे अशा स्थितींतच बुडव."

प्रत्येक बालकाला वाटतें कीं आपले वडील म्हणजे धैर्याचे मेरु! आकाश कोसळून पडेल पण माझ्या वडिलांची हिंमत खचणार नाहीं अशी प्रत्येक बालकाला खात्री असते. त्यामुळें अशा प्रसंगीं, जेव्हां वडील पण घाबरून गेले आहेत, दिङ्मूढ झाले आहेत, गोंधळले आहेत, असें मुलाच्या दृष्टीस पडतें, तेव्हां त्या मुलाला कसेंसेंच होअून जातें. त्या दिवशीं मला त्या तुफानाची अितकी भीति वाटली नव्हती, मुसळधार पावसालाहि मी तसा घाबरलों नव्हतों. तुला खातों, तुला खातों, म्हणून तोंड पसरून तांडवनृत्य करणाऱ्या भुतांसारख्या प्रचंड लाटा पाहून देखील माझी गाळण अुडाली नव्हती. पण जेव्हां वडिलांना घाबरलेले आणि गोंधळलेले मीं पाहिले आणि त्यांचा कंठ गद्‌गदित झालेला पाहिला, तेव्हां मात्र माझा धीर खचला.

जो तो तांडेलाला विचारी, "आपण कुठवर आलों? अजून किती बाकी

आहे ?" चारी बाजूस जेथें नजर फेंकावी तेथें फक्त पाऊस, झंझावात आणि लाटांचें तांडव! अितका पाऊस पडला तरी आकाश कांहीं केल्या अुघडेना. मीं तांडेलाला विनवलें, "वाफर जरा किनाऱ्याच्या जवळून चालवा ना! जर आपला वाफर बुडालाच तर निदान कांहीं लोक तरी पोहत पोहत कांठाला जातील." तांडेल अुत्साहशून्य आणि विषादयुक्त हास्य करून म्हणाला, "कैसा बेवकूफ लडका! किनाऱ्याहून जितके दूर आहोंत तितकेच आपण आज सुरक्षित आहोंत. असल्या वादळांत कांठाच्या जरा जवळ गेलों कीं खडकावर आपटून चक्काचूर व्हावयाचा. आज तर आम्हीं मुद्दामच किनाऱ्याहून विशेष दूर राहिलों आहोंत. अेकदां बोट गांठली म्हणजे मिळवली. आज दुसरा अुपाय नाहीं."

मीं कधींकाळीं मोठ्या माणसांना अेकमेकांस मिठी मारून रडतांना पाहिलें नव्हतें. तें दृश्य आज आमच्या मागच्या मोठ्या होडींत मीं पाहिलें. तेथें स्त्रीपुरुष अेकमेकांना मिठ्या मारून आकांत करीत होते. दोन तीन मुलांची अेक आअी सगळ्या मुलांना अेकदम मिठींत घेण्याचा प्रयत्न करीत होती. बस्स्; फक्त पांच पंचवीस जवानमर्द तनतोड मेहनत करून समुद्राशीं असमान युद्ध लढत होते. वादळ अितकें कांहीं वाढलें आणि वाफर व होडी अशीं कांहीं डोलूं लागलीं कीं लोक गर्भगळित होअून रडण्याचेंहि विसरले. अेकच कृष्णछाया सर्वत्र पसरली. भान जाग्यावर होतें फक्त त्या होडींतील बहादुरांचें आणि काळे निळे विजार सदरे घातलेल्या आमच्या वाफरांतील खलाश्यांचें. आमचा तांडेल केव्हां केव्हां हुकूम सोडतांना गोंधळलेला दिसे; पण खलाशी मात्र बरोबर अेकाग्र होअून न चुकतां, न गोंधळतां आपापलें काम करीत होते. कर्मयोग याहून कांहीं निराळी चीज असेल ?

शेवटीं अेकदांचें तदडी बंदर आलें. आम्हांला आगबोट दिसली त्यापूर्वींच आगबोटीची आमच्या वाफरावर नजर पडली. आगबोटीनें भोंगा वाजविला, "भोंऽऽऽऽ!" जणूं काय सर्वांची करुण वाणी अैकून अीश्वरानेंच "मा भैः"ची आकाशवाणी केली! आमच्या वाफरानें आपल्या किनऱ्या आवाजानें भोंग्याला अुत्तर दिलें. सर्वांच्या हृदयांत आशेचा अंकुर अुगवला. सर्वत्र जयजयकार झाला!

अितक्यांत जणूं काय शेवटचा प्रयत्न करून पहावा म्हणून आणि आम्हां

सर्वांच्या भाग्यासमोर स्वतःची हार कबूल करण्यापूर्वी अेक शेवटचा हल्ला चढवून पहावा म्हणून अेका मोठ्या लाटेनें आमच्या वाफरावर आक्रमण केलें. माझे वडील जेथें बसले होते तेथेंच अुताणें पडले. मीं किंकाळी फोडली. आतांपर्यंत मी रडलों नव्हतों, त्या सर्वांची जणूं भरपाअीच त्या हृदयविदारक किंकाळीनें केली. वडील ताबडतोब अुठून बसले. त्यांनीं मला छातीशीं धरून म्हटलें, "दत्तू, भिअूं नकोस. मला कांहीं सुद्धां झालें नाहीं."

आम्ही आगबोटीच्या जवळ जाअून पोहोंचलों; पण आगबोटीला जाअून चिकटण्याची हिंमत कशी करावयाची ? कस्टमची होडी त्या लोकांनीं केव्हांच सुटी केली होती. कारण वाफराचें आणि होडीचे हेलकावे तिला सहन होत नव्हते. आमच्या तांड्यांतून वेगळें पडण्यांतच तिची सलामती होती. आमच्या वाफरानें दुरून दुरून आगबोटीची अेक प्रदक्षिणा केली; पण जवळ येण्याची कांहीं सोय दिसेना. लाटांच्या जोरानें जर वाफर आगबोटीवर आपटलें तर अगदीं शेवटच्या घडीला सर्वांचा चेंदामेंदा व्हावयाचा. शेवटीं वरून सोल फेंकला गेला आणि वाफराचें आगबोटीशीं लग्न लागलें. आमचे खलाशी वाफराच्या छतावर अुभे राहून लांबलचक वेळूंच्या मदतीनें वाफराला आगबोटीच्या भिंतीवर आपटण्यापासून बचावीत होते. लाटेनें वाफर अुचलून आगबोटीकडे फेंकावा आणि खलाश्यांनीं आपल्या वेळूंच्या टोकाची ढाल बनवून तो सारा मारा आपल्या हातापायांवर जिरवून टाकावा. तरीपण शेवटीं आगबोटीच्या शिडीवर वाफराचें छत आपटलें आणि 'कडाड्ड्' असा आवाज होअून छताची अेक भली मोठी फळी मोडून समुद्रांत पडली.

मीच अगदीं जवळ असल्यामुळें स्टीमरमधें चढण्याची पहिली संधी मला मिळाली चढण्याची कसली ? चेंडूप्रमाणें फेंकलें जाण्याची. तांडेल स्वतः दुसऱ्या अेका खलाश्याला घेअून वाफराच्या कांठीं अुभा होता. ते दोघे मुसाफिराचा अेक अेक बावळा पकडून आगबोटीच्या शिडीच्या अगदीं खालच्या पायऱ्यांवर अुभे असलेल्या खलाश्यांच्या हातीं त्याला फेंकून देत. यांत ते अेवढी काळजी घेत कीं जेव्हां वाफर लाटांच्या गर्तेत खालीं अुतरे, तेव्हां मुसाफिरांना पकडून धरून ते वाट पहात. दुसऱ्या क्षणीं वाफर लाटेच्या शिखरावर चढला आणि आगबोटीची शिडी जवळ आली कीं झट त्या मनुष्याला शिडीवर फेंकून देत आणि तिकडचे खलाशी त्याला अर्धवट झेलून

घेत. जर का वाफराच्या खलाश्यांनीं आणि आगबोटीच्या खलाश्यांनीं अेक अेक हात पकडून ठेवला असता तर दुसऱ्या क्षणीं वाफर लाटांच्या गर्तेत अुतरतांच मुसाफिराचे जरासंधाप्रमाणें दोन तुकडेच व्हावयाचें.

मी शिडीच्या दोनचार पायऱ्या चढलों आणि आअी येते किंवा नाहीं तें मागें वळून पाहूं लागलों. अनोळखी मुसलमान धटिंगांनीं माझ्या आअीचे दंड पकडलेले पाहून मला कसेंसेंच झालें. पण तो प्राण वांचविण्याचा वेळ होता. तेथें नाजूक भावना काय कामाच्या? थोड्याच वेळांत वडीलहि येअून पोहोंचले. देवांची सांबळी तर मी माझ्या खांद्यावर लटकावलीच होती. वर जाअून चांगली जागा शोधून आम्हांला तेथें बसवून वडील परत सामान आणण्यासाठीं गेले. मी श्रद्धाळू मुलगा खरा. पण त्या वेळीं मला वडिलांचा मनस्वी राग आला. जळो तें सगळें सामान! जीव जोखमींत घालून परत कां बरें हे जातात? पण त्यांनीं तर तीन फेऱ्या केल्या. शेवटची फेरी करून आले तेव्हां ते म्हणाले, "गोकर्ण–महाबळेश्वराच्या प्रसादाचा नारळ पाण्यांत पडला!" आअी आणि मी अेकदमच अुद्गारलों : आअी म्हणाली, "अरेरे!" आणि मी म्हणालों, "अेवढेंच ना?"

वाफरांतील अुतारू चढल्यानंतर होडींतील अुतारूंची पाळी आली. ते सर्व चढले. त्यानंतर वाफर आणि होडी निशाचर भूतासारखीं किंचाळत तदडीच्या किनाऱ्याकडे गेलीं; आणि किनाऱ्यावर तपश्चर्या करीत बसलेल्या यात्रेकरूंना हप्त्याहप्त्यांनीं आणूं लागलीं. आतां तुफान थोडेंसें शांत झालें होतें. परंतु काळोखी रात्र आणि अुफाळणाऱ्या लाटा यांत सांपडलेल्या लोकांचे जे हाल झाले त्यांचें वर्णन कोण करूं शकेल?

आगबोट यात्रेकरूंनीं चिकार भरून गेली. जो कोणी बोले तो आपलें सामान समुद्रांत बुडून गेल्याच्याच गोष्टी करी. अन्तीं यात्रेकरू सर्व आले. परमेश्वराची कृपा कीं कोणाच्या जीवाची हानि झाली नाहीं. आगबोट निघाली; आणि लोक आपापल्या जुन्या सफरींतील असल्याच संकटांचीं संस्मरणें अेकमेकांना सांगून सांगून आजचा दुःखभार हलका करूं लागले. रात्रीं बराच वेळपर्यंत कुणाला झोंप आली नाहीं. मी केव्हां झोंपीं गेलों, कारवार बंदर केव्हां आलें, आणि आम्ही घरीं कधीं पोंचलों, यांतील कांहींच आज

आठवत नाहीं. पण त्या दिवसाचा तो तुफानाचा प्रसंग मात्र जणूं काय कालच घडला असावा अितका स्मरणपटावर ताजा, स्पष्ट आहे. खरोखरच,

दुःखं सत्यं, सुखं मिथ्या
दुःखं जन्तोः परं धनम् ।

ऑक्टोबर १९२५

# : २४ : भरताच्या डोळ्यांनीं

किनाऱ्यावर अुभें राहून समुद्राची शोभा न्याहाळत असतांना हृदयाला आनंदाची भरती येते. थोड्याश्या अुंचीवरून जर ही शोभा न्याहाळायला मिळाली तर मग काय विचारतां ? जहाजाच्या डेकवरून किंवा देवगडसारख्या बेटाच्या माथ्यावरून समुद्राचें किनाऱ्यावरील आक्रमण पहाण्यांत पुन्हां अेक वेगळाच आनंद भरला आहे. आपण समुद्राचे राजा आहोंत आणि लाटांची ही सेना आपल्या वतीनेंच समोरचा भूमिभाग पादाक्रांत करीत आहे असें वाटून आपल्यांत अेक प्रकारचा अभिमान स्फुरूं लागतो. नीट निरखून पाहिलें तर आपल्याला दिसून येतें कीं हिरवेंचार किंवा काळेंभोर पाणी खुशींत येअून पांढऱ्याशुभ्र वाळूच्या वेळेवर आक्रमण करतें आणि मग अैन घडीस, 'अरे, हा तर केवळ विनोद होता' असें म्हणून हसूं लागतें. अशा वेळीं त्याच्या या फसवेगिरीवर आपणहि मुक्तदंत हसूं लागतों.

समुद्रकांठीं रहाणाऱ्या लोकांना अशी दृश्यें वाटेल तेव्हां पहावयास मिळतात. पण समुद्र आणि वाळूचा पट जेथें अखंड जलक्रीडा करीत आहेत अशा बाजूस, काटकोनांत कांहींसें अुंचावर अुभें राहून, तो वाळूचा जलविहार आणि लाटांचा सिकताविहार न्याहाळण्याचें अहोभाग्य जर कधीं काळीं लाभलें तर मनुष्य 'अद्य मे सफला यात्रा; धन्योऽहं अप्प्रसादतः' असें कां गावूं लागणार नाहीं ?

गोकर्णाची पहिली यात्रा मीं सन १८९५ त केली होती आणि त्याचें पुन्हां अेकदां दर्शन श्री. गंगाधरराव देशपाड्यांबरोबर दहा वर्षांपूर्वीं घेतलें होतें.

आतां त्याच गोकर्णाच्या पवित्र किनाऱ्यावर संगववेळीं* समुद्राचें दर्शन करण्याचें अहोभाग्य मला लाभलें त्यामुळें तर मी पुरता वेडावून गेलों होतों. गोकर्णाचा समुद्रकिनारा चांगला अैसपैस आणि भव्य आहे. अुजवीकडे म्हणजे अुत्तरेकडील बाजूस कारवारकडील डोंगर आणि बेटें धूसर क्षितिजांत पुसट पुसट भासमान होत आहेत आणि डाव्या म्हणजे दक्षिणेकडील बाजूस रामतीर्थाचा डोंगर आणि त्यावरचें भरताचें छोटेसें मंदिर दिसत आहेत. अन् समोर अनंत अगाध सागर 'तूं अमर होअून ये' असें अहोरात्र आवाहन करीत आहे. असें हृदयाला अुन्मत्त करून सोडणारें दृश्य अेकदां पाहिल्यानंतर त्याचा कधींकाळीं विसर पडूं शकेल काय? रामतीर्थाच्या खडकावर जाअून तिथल्या झऱ्यातळीं आंघोळ करण्याचा संकल्प नसता तर या सागराच्या दृश्यांत तरंगत रहाणेंच मीं पसंत केलें असतें. आम्ही नारळींच्या बागा आणि खडबडीत खडक ओलांडून रामतीर्थापर्यंत पोंचलों. तेथें धारेखालीं स्नान करण्याचा जीवनानंद आपादमस्तक मिळवला, रामेश्वराचें दर्शन घेतलें. असंख्य लोकांना अुत्साहित करून शांडिल्यमहाराज नांवाच्या अेका साधूनें येथलें बांधकाम विनामूल्य करवून घेतलें होतें. समुद्रांत घुसलेल्या अुंच डोंगरावर हें मंदिर आहे. त्यामुळें वाळूचा पट आणि लाटांचा पट अेकमेकांना बिलगून खेळ खेळत आहेत अशा या दृश्याचें, कित्येक मैल दूर पसरलेलें सौंदर्य आम्ही त्या मंदिरांतून पाहूं शकलों. नारळाच्या दोन तीन झाडांनीं त्याच ठिकाणीं अुभें राहून त्या सागर–सिकता–मीलनाच्या दृश्याचा आनंद लुटण्याचें ठरविलें होतें. आपल्या झावळया हलवून तीं आम्हांला म्हणालीं, 'या, या! अगदीं हीच जागा नेमकी आहे. येथूनच सिकता–सागर यांच्या मीलनाची रेखा समोर सरळ दिसून येत आहे.'

येथून मला आढळून आलें कीं पाण्याच्या लाटांना समुद्राच्या खोल पाण्याचें पाठबळ होतें. वाळूच्या पटाला कोण पाठबळ देणार? आसपास कुणी

---

* गायींची धार काढण्याचें आणि गोशाळा साफ करण्याचें काम अुरकल्यानंतर त्यांना चरायला वनांत पाठविण्यासाठीं जेव्हां गोळा करण्यांत येतें त्या वेळेस (सकाळचे नअू वाजण्याचा सुमार) संगववेळा म्हणतात. वेदकाळांतील हा शब्द आहे.

टेकड्या नव्हत्या म्हणून नारळी, सुरू सारख्या झाडांनीं ही जबाबदारी आपल्या शिरावर घेतली होती. हीं अुंच झाडें आणि तेथलें तें खोल पाणी यांच्या हिरव्या रंगांत फरक होता खरा, पण त्यांच्या कार्यांत मात्र कसलाहि फरक दिसत नव्हता. झाडें आपल्या पायातळींच्या वाळूला आशीर्वाद देत आहेत. आणि समुद्राचें खोल पाणी लाटांना पुढें झेंपावण्यासाठीं अुत्तेजन देत आहे— असें हें दृश्य कितीहि पाहिलें तरी तृप्ति कशी होअील?

अेखाद्या दृश्यानें तृप्ति वाटली नाहीं म्हणून अेके ठिकाणीं अुभें राहून त्याच दृश्याचा आस्वाद घेत रहाणें माणसाला थोडेंच रुचणार? मला आढळून आलें कीं रामतीर्थाच्या झऱ्याची आणि रामेश्वराच्या मंदिराची रखवाली करण्यासाठींच कीं काय श्री रामचंद्राचा कारभारी भरत टेकडीच्या माथ्यावर अुभा आहे. त्याचें दर्शन घेतलेंच पाहिजे आणि शक्य झाल्यास त्याच्या नजरेनें योग्य अुंचीवरून समुद्र पाहून घेतला पाहिजे. अुंच चढल्यावांचून विशाल दृष्टि कोठून येणार? पायऱ्यांनीं आमंत्रण दिलें, आणि मीं शिडांत वारा भरावा त्याप्रमाणें नाचत आणि अुड्या मारत किंवा अुडत भरताचें मंदिर गांठलें. तेथें छोटासा गोरा भरत सुंदर पीतांबराचा काचा मारून समुद्रदर्शन करीत होता.

खरें पहातां भरताच्या मंदिराच्या आसपास मंदिर नकोच होतें. अून, वारा आणि पाअूस यांची तपश्चर्या करण्याची त्याला मोकळीक द्यायला हवी होती. समुद्रावरून येणाऱ्या गार वाऱ्यांत सूर्याच्या अुन्हाचा ताप त्यानें सहज सोसला असता आणि किती झालें तरी भरत हा सूर्यवंशाचाच राजपुत्र होता याचा लोकांना कसा काय विसर पडला? वायुपुत्र हनुमानाचें आणि सूर्यवंशी राघवांचें स्मरण करीत आम्ही कितीतरी वेळ तेथें अुभे राहिलों. हृदयांत भक्तिभावाला भरतें येत होतें आणि समोर समुद्राच्या पाण्याला भरती येत होती.

त्या दिवशींच्या त्या भव्य-पावन दर्शनाबद्दल रामतीर्थाचा आणि भरत महाराजांचा मी सदा अृणी राहीन.

मे, १९४७.

# : २५ : छप्पन वर्षांची भूक

सर्वांत प्रथम मी कारवारला गेलों, तें १८९३–९४ साल असावें. मार्मगोवा बंदरावर पहिल्या प्रथमच चकाकणारा समुद्र पाहून मी आश्चर्यमुग्ध होअून गेलों होतों. रात्रीं नअू वाजतां आम्ही स्टीमरमध्ये बसलों. आगबोट किनारा सोडून समुद्रांत चालूं लागली तेव्हां माझें डोकें देखील आपले नेहमीचे किनारे सोडून कल्पनेवर तरंगू लागलें. आम्ही कारवारला पोहोंचलों तेव्हां सकाळ झाली होती. आगबोटींतून होडींत अुतरणें सोपें काम नव्हतें. प्रत्येक होडी-बरोबर अुलंड्या ( Outriggers ) बांधलेल्या होत्या. अशी गैरसोय जाणून बुजून कां करून ठेवली आहे असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं. मागाहून त्या अुलंड्यांचा अुपयोग ध्यानांत आला.

प्रवासाचा थकवा अुतरतांच आम्ही समुद्रकिनाऱ्यावर फिरायला गेलों. किनाऱ्यावरून समुद्रांत तीन डोंगर दृष्टीस पडत होते. अेक देवगडचा, दुसरा मधलिंग-गडचा आणि तिसरा कूर्मगडचा. देवगडावर दिवादांडी होती हें त्याचें वैशिष्ट्य. त्या दिवादांडीच्या शेजारीं अेक बारीकशी ध्वजादांडी अंधुक दिसत होती. समुद्रकिनाऱ्यावर खेळून थकलों, कीं दिवादांडीवर दिवा लागलेला सर्वांत आधीं कोण पहातो याची स्पर्धा सुरू होअी. याच विशाल पाण्याच्या विस्तारावरून जेव्हां आम्ही कारवारला आलों त्यावेळीं रात्रीं आगबोटींतून देवगड कसें दिसलें नाहीं असा विचारहि कधीं कधीं मनांत येअी.

अेखादी आगबोट येणार असली कीं देवगडच्या ध्वजादांडीवर लाल बावटा चढे. तो पाहून कारवार बंदराजवळील ध्वजादांडीवरहि बावटा चढे. येथला मनुष्य दुर्बिण घेअून देवगडाकडे पहात राही. तेथें बावटा दिसला कीं येथें सुद्धां चढवी. कधीं कधीं मीं साध्या डोळयांनीं दूर देवगडवर चढलेला बावटा पाहून गोंदूला चकित करून सोडीत असे.

मीं अेकदां वडिलांना विचारलें, ‘ देवगडावर दिवा कोण पेटवतो, बावटा कोण चढवतो ? ’ ते म्हणाले, ‘ तेथें अेक खास मनुष्य ठेवलेला आहे. संध्याकाळ झाली कीं तो दिवा पेटवतो. दुरून आगबोट येतांना दिसली कीं

तो बावटा चढवतो. रात्रीं देवगडचा दिवा दिसला कीं जहाजें ताडतात कीं कारवार बंदर आलें. दिव्याखालीं खडक आहेत हें ठाऊक असल्यामुळें जहाजें दिव्याच्या आसपास फिरकत नाहींत.'

'दिवादांडीची देखरेख करणारा मनुष्य तेथें खाण्यापिण्याची काय व्यवस्था करीत असेल ? त्याला गोडें पाणी कोठून मिळत असेल ?' मीं प्रश्न केला.

'होडींत बसून तो खाण्यापिण्याच्या वस्तु कारवारहून घेअून जातो. पावसाचें पाणी सांठवून ठेवण्यासाठीं अेखादी टाकी किंवा विहीरसुद्धां देवगडावर असणें शक्य आहे.'

'आपल्याला नाहीं का तेथें जातां येणार ? चला ना, आपण अेकदां तेथें जाअून येअूं. मला नेहमींच तेथें रहायला मिळालें तर किती मौज होअील ! संध्याकाळ पडली कीं दिवा लावायचा; आणि आगबोटीचा भोंगा वाजला कीं बावटा चढवायचा अितकेंच काम ना ? बाकीचा सगळा वेळ आपला स्वताचा ! वाटेल तसा घालवावा. कुणी भेटायला येणारें नाहीं जाणारें नाहीं ! चला ना, आपण अेकदां तेथें जाअून येअूं.'

वडिलांनीं आमच्या घराच्या मालकांना, रामजी शेठ तेलींना विचारलें. त्यांनीं आपल्या फतेमारीच्या तांडेलाशीं मसलत केली. आणि दुसऱ्याच दिवशीं देवगडला जाण्याचें नक्की झालें. आम्ही सर्व गाडींत बसून बंदराच्या धक्क्यावर गेलों. मोठ्या फतेमारींत बसण्याची खूप मौज वाटली. शिडें अुभारलीं गेलीं आणि आम्ही डुलत डुलत पुढें चाललों. फत्तेमारी डुलत होती मजेदार, पण झपाट्यानें पुढें जाण्याचें नांव घेअीना. बराच वेळ झाला. वडिलांनीं रामजी शेठना कारण विचारलें. रामजी शेठनीं तांडेलाला विचारलें. त्यानें सांगितलें, 'वारा अनुकूल नाहीं. तिरपा आहे. शिडें खुबीनें अुभारलीं आहेत म्हणून मचवा पुढें जात आहे खरा, पण अितका हळूं कीं देवगडला पोहोंचेपर्यंत संध्याकाळ होअील.' माझी स्वतःची याला मुळींच हरकत नव्हती. डोलण्याचा आनंद सारा दिवस अनुभवायला मिळेल आणि संध्याकाळ झाली कीं दिवादांडीचा दिवा जवळून पहायला मिळेल. पण अितकी मजेची गोष्ट वडिलांच्या ध्यानांत आली नाहीं ! ते म्हणाले. 'हें नाहीं चालणार.' ताण्डेल म्हणाला, 'वाराच जेथें प्रतिकूल, तेथें आमचें काय चालणार ? पुढें गेल्यावर याच वाऱ्यानें जोर पकडला तर

अितकेंदेखील अंतर कापणें अशक्य होअील.' रामजी शेठनीं वडिलांना विचारलें, 'तर मग काय करायचें ?' वडिलांनीं अुत्तर दिलें, 'दुसरा अुपायच काय आहे ? परतूं या झालं.'

हुकूम सुटला, 'परत चला.' शिडांची रचना बदलली. ही रचना कशी काय करतात तें पहाण्यांत मी गढून गेलों होतों अितक्यांत फतेमारी परत धक्क्यापर्यंत येअून देखील पोचली! जातांना तासभर तरी लागला असेल. परततांना पांच मिनिटें देखील लागलीं नाहींत. टांग्याचे घोडेच केवळ घरीं परततांना घाअी करतात असें नाहीं.

आम्ही जसे गेलों तसेच हात हलवीत परत आलों. फजित झाल्याप्रमाणें हिरमुसलें तोंड देअून मी घरीं आलों. आम्ही देवगडला जायला निघालों होतों याचा अुल्लेख देखील मीं शाळेंतल्या सोबत्यांजवळ केला नाहीं.

त्यानंतर जवळ जवळ पांचेक वर्षें मी कारवारला राहिलों असेन. पण पुन्हा कधींहि आम्ही देवगडला जाण्याचा प्रयत्नच केला नाहीं. सूर्यास्त होअी, देवगडावरील दिवा दिसे आणि त्या पऱ्यांच्या देशांत काय असेल ? हा प्रश्न मनांत आणून मी काढून टाकीत असे. चाळीस वर्षांनंतर, म्हणजेच आजपासून दहावर्षांपूर्वीं पुन्हा अेकदां कारवारला गेलों होतों. त्यावेळीं सुद्धां देवगडला जातां आलें नाहीं.

यावेळीं पुन्हां अेकदां कारवारला गेलों तो निश्चय करून कीं शक्य झालें तर देवगड पाहिल्यावांचून रहावयाचें नाहीं. तिथल्या माझ्या मित्रांना मीं सांगूनच ठेवलें होतें कीं अेक दिवस देवगडसाठीं अवश्य राखून ठेवावा.

देवगडला कांहीं विशेष पहाण्यासारखें आहे असें नाहीं. परंतु पन्नास वर्षांचा माझा बालपणींचा संकल्प देवगडशीं निगडित होता. त्याला मोकळें करणें आवश्यक होतें.

देवगड कारवारच्या किनाऱ्यापासून जवळजवळ तीन मैल समुद्रामध्यें असलेलें अेक बेट आहे. कारवार बंदराची ती मोठ्यांतली मोठी शोभा म्हणतां येअील. समुद्रसपाटीपासून डोंगराची अुंची २१० फूट आहे. आणि त्यावर ७२ फूट अुंच दिवादांडी आहे.

दारूबंदीमुळें कस्टमच्या लोकांना समुद्रावर चौकी करावी लागते. या

तो बावटा चढवतो. रात्रीं देवगडचा दिवा दिसला कीं जहाजें ताडतात कीं कारवार बंदर आलें. दिव्याखालीं खडक आहेत हें ठाऊक असल्यामुळें जहाजें दिव्याच्या आसपास फिरकत नाहींत.'

'दिवादांडीची देखरेख करणारा मनुष्य तेथें खाण्यापिण्याची काय व्यवस्था करीत असेल? त्याला गोडें पाणी कोठून मिळत असेल?' मीं प्रश्न केला.

'होडींत बसून तो खाण्यापिण्याच्या वस्तु कारवारहून घेऊन जातो. पावसाचें पाणी सांठवून ठेवण्यासाठीं अेखादी टाकी किंवा विहीरसुद्धां देवगडावर असणें शक्य आहे.'

'आपल्याला नाहीं का तेथें जातां येणार? चला ना, आपण अेकदां तेथें जाऊन येऊं. मला नेहमींच तेथें रहायला मिळालें तर किती मौज होअील! संध्याकाळ पडली कीं दिवा लावायचा; आणि आगबोटीचा भोंगा वाजला कीं बावटा चढवायचा अितकेंच काम ना? बाकीचा सगळा वेळ आपला स्वताचा! वाटेल तसा घालवावा. कुणी भेटायला येणारें नाहीं जाणारें नाहीं! चला ना, आपण अेकदां तेथें जाऊन येऊं.'

वडिलांनीं आमच्या घराच्या मालकांना, रामजी शेठ तेलींना विचारलें. त्यांनीं आपल्या फतेमारीच्या तांडेलाशीं मसलत केली. आणि दुसऱ्याच दिवशीं देवगडला जाण्याचें नक्की झालें. आम्ही सर्व गाडींत बसून बंदराच्या धक्क्यावर गेलों. मोठ्या फतेमारींत बसण्याची खूप मौज वाटली. शिडें अुभारलीं गेलीं आणि आम्ही डुलत डुलत पुढें चाललों. फत्तेमारी डुलत होती मजेदार, पण झपाट्यानें पुढें जाण्याचें नांव घेअीना. बराच वेळ झाला. वडिलांनीं रामजी शेठना कारण विचारलें. रामजी शेठनीं तांडेलाला विचारलें. त्यानें सांगितलें, 'वारा अनुकूल नाहीं. तिरपा आहे. शिडें खुबीनें अुभारलीं आहेत म्हणून मचवा पुढें जात आहे खरा, पण अितका हळूं कीं देवगडला पोहोंचेपर्यंत संध्याकाळ होअील.' माझी स्वतःची याला मुळींच हरकत नव्हती. डोलण्याचा आनंद सारा दिवस अनुभवायला मिळेल आणि संध्याकाळ झाली कीं दिवादांडीचा दिवा जवळून पहायला मिळेल. पण अितकी मजेची गोष्ट वडिलांच्या ध्यानांत आली नाहीं! ते म्हणाले, 'हें नाहीं चालणार.' ताण्डेल म्हणाला, 'वाराच जेथें प्रतिकूल, तेथें आमचें काय चालणार? पुढें गेल्यावर याच वाऱ्यानें जोर पकडला तर

अितकेंदेखील अंतर कापणें अशक्य होअील.' रामजी शेठनीं वडिलांना विचारलें, 'तर मग काय करायचें?' वडिलांनीं अुत्तर दिलें, 'दुसरा अुपायच काय आहे? परतूं या झालं.'

हुकूम सुटला, 'परत चला.' शिडांची रचना बदलली. ही रचना कशी काय करतात तें पहाण्यांत मी गढून गेलों होतों अितक्यांत फतेमारी परत धक्क्यापर्यंत येअून देखील पोचली! जातांना तासभर तरी लागला असेल. परततांना पांच मिनिटें देखील लागलीं नाहींत. टांग्याचे घोडेच केवळ घरीं परततांना घाअी करतात असें नाहीं.

आम्ही जसे गेलों तसेच हात हलवीत परत आलों. फजित झाल्याप्रमाणें हिरमुसलें तोंड देअून मी घरीं आलों. आम्ही देवगडला जायला निघालों होतों याचा अुल्लेख देखील मीं शाळेंतल्या सोबत्यांजवळ केला नाहीं.

त्यानंतर जवळ जवळ पांचेक वर्षें मी कारवारला राहिलों असेन. पण पुन्हा कधींहि आम्ही देवगडला जाण्याचा प्रयत्नच केला नाहीं. सूर्यास्त होअी, देवगडावरील दिवा दिसे आणि त्या पऱ्यांच्या देशांत काय असेल? हा प्रश्न मनांत आणून मी काढून टाकीत असे. चाळीस वर्षांनंतर, म्हणजेच आजपासून दहावर्षांपूर्वीं पुन्हा अेकदां कारवारला गेलों होतों. त्यावेळीं सुद्धां देवगडला जातां आलें नाहीं.

यावेळीं पुन्हां अेकदां कारवारला गेलों तो निश्चय करून कीं शक्य झालें तर देवगड पाहिल्यावांचून रहावयाचें नाहीं. तिथल्या माझ्या मित्रांना मीं सांगूनच ठेवलें होतें कीं अेक दिवस देवगडसाठीं अवश्य राखून ठेवावा.

देवगडला कांहीं विशेष पहाण्यासारखें आहे असें नाहीं. परंतु पन्नास वर्षांचा माझा बालपणींचा संकल्प देवगडशीं निगडित होता. त्याला मोकळें करणें आवश्यक होतें.

देवगड कारवारच्या किनाऱ्यापासून जवळजवळ तीन मैल समुद्रामध्यें असलेलें अेक बेट आहे. कारवार बंदराची ती मोठ्यांतली मोठी शोभा म्हणतां येअील. समुद्रसपाटीपासून डोंगराची अुंची २१० फूट आहे. आणि त्यावर ७२ फूट अुंच दिवादांडी आहे.

दारूबंदीमुळें कस्टमच्या लोकांना समुद्रावर चौकी करावी लागते. या

कामासाठीं त्यांच्यापाशीं अेक वाफर असतें. या 'बाष्पनौके'तून आम्हांला घेअून जाण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. आमचा हा लहरी कार्यक्रम कर्तव्यरूप अशा दुसऱ्या कार्यक्रमांच्या आड येअूं नये म्हणून आम्ही लवकर अुठून बंदरावर जाअून पोंचलों. सकाळची प्रार्थना किंवा नास्ता घरीं करून येण्याअितके अरसिक आम्ही नव्हतोंच. खलाशी थोडेसे अुशिरा येअून पोंचल्यामुळें, घोड्याप्रमाणें धावणाऱ्या आमच्या वाफराच्या तालावर चालणारी आमची प्रार्थना अैकण्यासाठीं, कारवारच्या डोंगरामागून सविता नारायण सुद्धां अुपस्थित होअूं शकले. नारायणाला जन्म देऊन कृतार्थ झालेली प्राची अशी कांहीं खुलली होती! समुद्राचें पाणीदेखील या प्रसन्नतेमुळें चकाकणाऱ्या लहरींत आलें होतें. मीं जमिनीकडे नजर फेकली. अुजव्या बाजूला कारवारचें बंदर लहानमोठ्या मचव्यांना जागवीत होतें आणि खेळवीत होतें. त्यानंतरच्या खिंडींत नारळीचीं झाडें वाऱ्याची प्रतीक्षा करीत अुभीं होतीं. आजकाल कधींहि डागली न जाणारी शनिवारची तोफ बावट्याच्या चौथऱ्यावरून तोंड वासून फुकटची भीति दाखवीत होती. त्यानंतरचीं सुरूचीं झाडें कारवारची रुंदी मोजत थेट काळी नदीपर्यंत पसरलीं होतीं. भारतीय युद्धांतील राजांनीं विश्वरूपाच्या जबड्यांत धाव घ्यावी त्याप्रमाणें तीनचार जहाजें काळी नदीच्या मुखांत घुसत होतीं आणि सदाशिवगडचा डोंगर किंचित् भ्रूसंकोच करून या साऱ्या प्रदेशावर पहारा करीत होता.

आमची प्रार्थना संपली तेव्हां वाफरानें समुद्राच्या पाठीवर अुमटवलेला आमचा मार्ग आणि त्यावरून झपाट्यानें अदृश्य होण्याऱ्या नक्षीकामानें माझें लक्ष वेधलें. त्या नक्षीकामांत मुक्तवेणीची प्रत्येक खुबी व्यक्त होत होती.

आम्हांला देवगड दाखविल्याशिवाय रहाणारच नाहीं, असा निश्चय करून, प्रत्येक गोष्टीकडे काळजीपूर्वक लक्ष पुरवणाऱ्या श्री. पद्मनाभ कामतांनीं दक्षिणेकडील डोंगराच्या पायथ्याशीं पसरलेल्या चंद्रभागी किनाऱ्याकडे माझें लक्ष वेधलें. अेकेकाळीं युरोपियन स्त्रिया तेथें स्नान करीत असाव्यात. त्यामुळें त्याचें नांव Ladies' Beach ( युवती-तट ) पडलें आहे.

गोव्याच्या संस्कृतींत मुरलेले कवि बोरकर आमच्यासोबत होते आणि श्री. कामतांनीं आपल्याकडून भर टाकण्याच्या दृष्टीनें चित्रकार रमानंदाला

बरोबर घेतलें होतें. रमानंदानें आपल्या पित्याच्या, त्याचप्रमाणें बड्या पाहुण्यांच्या सान्निध्यांत साजेल अशी नम्रता धारण करून चांगलेंच आत्मविलोपन केलें होतें. पण भर समुद्रांत आल्यावर डोंगर, ढग, सूर्य, पक्षी, जहाजाचीं शिडें आणि समुद्राच्या लाटा या सर्वांच्या प्रभावाखालीं येतांच त्याच्या कलाकार आत्म्याला आमच्या अस्तित्वाचा विसर पडला आणि तो कित्येक दिवस अुपाशी असलेल्या अेखाद्या आधाश्याप्रमाणें आसपासच्या काव्याचा अेकाग्र दृष्टीनें आस्वाद घेअूं लागला. आम्ही बोट दाखवून त्याच्याकडे अेकमेकाचें लक्ष वेधलें, पण त्यामुळें कांहीं त्याचें ध्यान भंग पावलें नाहीं. फक्त छोट्या कुंदेची नजर चंचलपणें सर्वत्र भिरभिरत होती.

आमचे कवि तर आमची प्रार्थना केव्हां संपते याची शास्त्रोक्त भक्तीनें वाट पहात होते. त्यांनीं लगेच सागराच्या लाटांचें खलाशीगीत ललकारलें. गीताची ढब जरी खलाशी पद्धतीची होती, तरी आंतले भाव खलाशी हृदयाचे नव्हते. त्या गीतांतून भोळा खलाशी बोलत नव्हता, तर मस्तींत आलेलें कविहृदय भावनांचे सर अेकामागून अेक अुधळीत होतें. अितकें मात्र खरें कीं त्या दिवशीं आमच्या टोळींत स्वस्थ (Sober) असें कुणीहि नव्हतें. हिंदू स्कूलचे आचार्य श्री. कुळकर्णी सुद्धां रंगांत आले. चि सरोजनें आपली जागा सोडून बॉयलरच्या पुढल्या बाजूस अुभें रहाणें पसंत केलें होतें. आपल्या स्वभावाविरुद्ध तिनें स्वीकारलेलें अग्रगामित्व पाहून मला मौज वाटली. मीं तिला मंचर सरोवरांत काव्यपानानें मस्त झालेल्या नारायण मलकानींचें स्मरण करून दिलें. तेवढ्या अिशाऱ्यानें आम्ही दोघे साऱ्या वस्तुस्थितीचें मोजमाप करूं शकलों !

समुद्राच्या पाण्यांतून तरून जाण्याच्या वेगवेगळया प्रकारांत वेगवेगळा रस असतो. लाटांच्या थपडा खात खात बाहुबलानें पोहत आंत दूरवर जाण्यांत अेक प्रकारचा आनंद आहे. छातीखालीं लाट अुचंबळत असतांना तिच्यावर स्वार होण्याचा आनंद ज्यानें चाखला आहे त्याला त्याचा कधींकाळीं विसर पडणार नाहीं. नदीचें पाणी तुम्हांला बुडवायला टपलेलें असतें; तसें समुद्राच्या पाण्याचें नसतें. समुद्राच्या पाण्यानें बळी घेतला तर तो नाअिलाज म्हणून. अेरवीं त्याची दानत नेहमीं पोहणाऱ्यांना तारण्याचीच असते.

अरुंद व लांब होडींत बसून अेकाच वल्ह्यानें प्रत्येक लाटेवरून चढअुतार करणें हा पुन्हा आनंदाचा दुसरा प्रकार. दोन लाटांच्या मधल्या खिंडींत होडी आडवी सांपडली तर संकट खरें. या अेका बाबतींत काळजी घेतली तर समुद्राच्या आनंदाशीं अेकरूप होण्याचें यापेक्षां अुत्तम साधन मिळणें कठीण.

त्यानंतर मोठ्या होडींत जोडीजोडीनें बसून दोन्ही बाजूंचीं वल्हीं तालांत मारण्याचा सांघिक आनंद पुन्हां तिसऱ्या प्रकारचा. या प्रौढ आनंदाचा आस्वाद मौन राखून घेतांच येत नाहीं. तालाचा कैफ अितका मादक असतो कीं त्यांतून गायन अचूक स्फुरतेंच.

वाफरांत बसण्याचा आनंद या तिन्हींपेक्षां थोडा कमी दर्जाचा म्हणावा लागेल. तें अेवढ्याचसाठीं कीं त्यांत माणसांचें बाहुबळ मुळींच वापरलें जात नाहीं. नियंत्रण-चक्र हातांत पकडणाऱ्याच्या मनगटांना जो व्यायाम होअील तेवढाच. अेवढ्याच पुरुषार्थाला वाफरांत वाव मिळतो. पण वाफरानें पाणी कापीत जाण्याचा आनंद मात्र साऱ्या शरीराला मिळतो. वाफर जेव्हां वेगांत सरळ धावूं लागतें तेव्हां त्याची ती गति आपल्या नसानसांत जाअून पोंचते. मोटर चालविण्याच्या आनंदापेक्षां वाफर चालविण्याचा आनंद कितीतरी पटींनीं अधिक आहे.

त्या आनंदाची गोडी चाखत चाखत आणि समुद्राचें पाणी येथें किती खोल असेल याचा विचार करीत आम्ही देवगडच्या दिशेनें जात होतों. माझ्या मनांत विचार आला, “जें पाणी अगदीं तळाशीं आहे, तें वरच्या पाण्याच्या भारानें चिरडून जात नसेल का? वरच्या पाण्यापेक्षां खालचें पाणी अधिक दाट आणि जाड असलेंच पाहिजे. अमुक मासे तर या जाड पाण्याला भेदून खालीं अुतरूंच शकत नसतील. पाऱ्याच्या सरोवरांत जर आपण पडलों तर लाकडाच्या तुकड्याप्रमाणें त्यावर तरंगतच राहूं. अमुक प्रकारच्या माशांचें खालच्या जाड पाण्यांत असेंच होत असेल.”

जसजसें देवगडचें बेट जवळ येत गेलें, तसतशीं त्याच्या आजूबाजूचीं लहान लहान बेटें व खडक स्पष्ट दिसूं लागले. आकाश आणि समुद्र जेथें मिळतात तेथली क्षितिजाची रेषा आज चांगलीच रेखीव होती. येथें पृथ्वी संपते व

येथून स्वर्ग सुरू होतो, असें कुणीतरी सुआी घेअून नेमकें दाखवून देत असावें तसें वाटत होतें.

दोन फतेमाऱ्या आपल्या शिडांत वारा भरून घेअून प्रवासाला निघाल्या होत्या. त्या शिडांच्या पोटांत वाऱ्याबरोबर अुगवत्या सूर्याचीं किरणें देखील शिरलीं होतीं! त्या भारानें शिडें फाटून जातील कीं काय असें वाटत होतें. शिडें अशीं कांहीं चमकत होतीं कीं तीं रेशमाची आहेत कीं हस्तीदंताचीं असा संभ्रम अुत्पन्न होत होता. शिडांत जेव्हां वारा शिरतो तेव्हां, त्यांत अुमटणारी केळीच्या पानाची नक्षी मोठी शोभिवंत दिसते.

आतां आम्ही देवगडच्या अगदीं समीप येअून ठेपलों. सारी टेकडी लहान मोठ्या झाडाझुडपांनीं झांकलेली आहे. वरची दिवादांडी आपली अिभ्रत सांभाळून आकाशाकडे बोट दाखवीत होती. आतां वाफर आणखी पुढें जाणें शक्य नव्हतें. बाकीचें थोडेसें, अुथळ अंतर कापण्यासाठीं आमच्या वाफरानें अेक लहानसा किंकर सोबत बांधून आणला होता. त्या लहानश्या होडींत आम्ही अुतरलों आणि बेटाच्या किनाऱ्यावर जाअून पोंचलों. अुतरल्याबरोबर लाल लाल पिकलेल्या बोरांनीं आमचें स्वागत केलें. वर चढतां चढतां मोठमोठ्या वृक्षांच्या फांद्या आणि वडाच्या पारंब्या पहात पहात आम्ही दिवादांडीच्या पायथ्याशीं जाअून पोंचलों. दिवादांडीचा दीपकार अेक भला मुसलमान होता. त्यानें आमचें स्वागत केलें. बेटावर दिवादांडीमुळें थोडे लोक रहात होते. त्यांच्यामुळें थोड्या बकऱ्या व कोंबड्या देखील तेथें रहात होत्या. (आणि वेळोवेळीं मरत होत्या.) समुद्र किनाऱ्यावरून अुडत येअून येथल्या झाडावर विसावा घेणारे व निसर्गकाव्याचे फवारे सोडणारे पक्षी तर अृषिमुनींअितकेच पवित्र मानले पाहिजेत.

वाफरमध्यें बसून आम्ही सकाळीं आत्म्याची अुपासना केली होती. येथें अेका खडकावर बसून सर्वांनीं पोटाची अुपासना केली. आसपासची शोभा पोटभर पाहून घेअून दिवादांडीच्या पोटांत शिरून आम्ही वर गेलों.

दिव्यांतून 'विश्वतो' निघणाऱ्या किरणांना खुबीनें वळवून त्यांचा पाण्याच्या पृष्ठभागाशीं समांतर असा घबघबा वाहता सोडण्यासाठीं अनेक प्रकारच्या बिलोरी काचेच्या बनवलेल्या दोन ढाली आम्हीं सर्वांत प्रथम पाहिल्या.

पॅराबोला आणि हायपर-बोलाच्या गणिताचा त्यांत पुरेपूर अुपयोग केलेला असतो. शंकुछेदाॅ*चें गणित ज्याला ठाअूक आहे तोच याचें रहस्य समजूं शकेल. त्यानंतर त्या दिव्याचा बुरखा अेकीकडे सारून दूरवरची सामुद्रीय शोभा आम्हीं न्याहाळली आणि त्यानें तृप्त न होतां दिव्याच्या आसपास बांधलेल्या गॅलरींत जाअून मुक्तपणें दाही दिशांना आम्ही पाहूं लागलों.

जें दृश्य पहाण्याची हौस छप्पन वर्षें बाळगली होती तें दृश्य आज पाहिलें! डोळ्याचें पारणें फिटलें! सगळें बेट जणूं काय अेक मोठें जहाज आहे व दिवादांडी त्याची डोलकाठी ( mast ) आहे, आणि आम्ही त्यावर चढून चौकी करणारे खलाशी आहोंत. जहाजाच्या डोलकाठीप्रमाणें ही दिवादांडी डोलत नव्हती हें खरें. पण नुकताच वाफरचा प्रवास करून आलेलें आमचें डोकें ती कमतरता दूर करीत होतें.

अितक्या अुंचावरून चौफेर नजर फेंकण्यांत अेक आगळांच आनंद असतो. कुतुबमिनार वरून हिंदुस्थानच्या अनेक राजधान्यांचें स्मशान पाहून मनांत जी विषण्णता अुत्पन्न होते तशी येथें होत नाहीं. येथून दिसणाऱ्या समुद्रांत प्राचीन काळापासून आजपावेतों अनेक जहाजें बुडालीं असतील, पण त्याची विषण्णता येथल्या वातावरणांत मुळींच आढळत नाहीं. समुद्रांत भूत आणि भविष्य यांना स्थानच नसतें. अेक तर वर्तमानकाळ; किंवा सनातन अनंतकाळ या दोघांचेंच साम्राज्य तेथें नांदत असतें. जेव्हां वादळ होतें तेव्हां वाटतें कीं हेंच समुद्राचें सत्य व शाश्वत रूप आहे. आणि जेव्हां आजच्या प्रमाणें सर्वत्र शांति पसरलेली असते तेव्हां वाटतें कीं वादळ तर अेक माया आहे. समुद्राचें मुखमंडल तर खरोखर भगवान बुद्धांची शांति व त्यांचा अुपशम व्यक्त करण्यासाठींच निर्मिलें आहे.

अितक्या मोठ्या, विशाल समुद्राला आशीर्वाद देण्याची शक्ति पितामह आकाशावांचून दुसऱ्या कुणापाशीं असणार? आकाश शांत चित्तानें सर्वत्र पसरून समुद्रावर रक्षणाचें झांकण बसवीत होतें आणि या झांकणावर कसलीच नक्षी नसावी हें सहन न करूं शकणारे पक्षी त्यावर तऱ्हतऱ्हेच्या रेघोट्या ओढण्याचा अस्थायी प्रयत्न करीत होते. अेखाद्या अुग्र माणसाला हसवण्या-

* Conic Sections.

साठीं ज्याप्रमाणें मुलें त्याच्यापुढें भीत भीत थोडे चाळे करून पहातात, त्याप्रमाणें समुद्राचा निळा रंग आकाशाच्या नीलिम्याला हसवण्यासाठीं अनेक प्रयोग करून पहात होता.

भगवंताचें असलें विराट दर्शन होतांच भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायाचें स्मरण व्हावयास हवें होतें, परंतु अितक्या प्राचीन कालांत शिरण्यापूर्वी अुत्तेजित झालेल्या चित्तानें विसाव्यासाठीं अेक जवळचा प्रसंग पसंत केला. वीसेक वर्षांपूर्वी लंकेच्या थेट दक्षिणेला, देवेन्द्राच्याहि पुढें जेव्हां माताराला गेलों होतों तेव्हां तेथल्या दिवादांडीवर चढून दुपारच्या अुन्हांत असेंच पण याहूनहि कितीतरी पटींनीं विशाल दृश्य पाहिलें होतें. तेथें तर नजरेची त्रिज्या करून माणसाला जेवढें मोठें वर्तुळ काढणें शक्य आहे तेवढें काढून, त्याचा दक्षिणार्ध दिला होता हिंदी महासागराला आणि अुत्तरार्ध नारळींच्या पानांच्या लाटा अुसळविणाऱ्या आणि दुपारच्या अुन्हांत चकाकणाऱ्या वनसागराला अर्पण केला होता. येथें देवगडवरून, पूर्वेकडे सूर्यनारायणाचें पादपीठ म्हणून शोभणारा पर्वत दिसत होता. त्याच्या पायथ्याशीं पसरलेला कारवारचा समुद्र शांतपणें चकाकत होता. त्याच्यावरचें होड्यांचें नक्षीकाम अगदीं पुसट पुसट होतें आणि पश्चिमेकडे तर अरबस्तानचें स्मरण करविणारा अेक मात्र अखंड महासागरच होता. तें सारें दृश्य हृदय गुदमरून टाकणारें होतें.

मुखावाटे अितकेच शब्द निघूं शकले **नमोऽस्तु ते सर्वत अेव सर्व** !

* * *

आमच्या लाजाळू चित्रकारानें अितक्या वेळांत अेका कोपऱ्यांत बसून जवळच्या खडकाचें व आसपासच्या समुद्राचें चित्र चितारलें. घरीं आल्यावर त्यानें तें मला भेट दिलें. छप्पन वर्षांची भूक शमविण्याच्या शुभ प्रसंगाचें स्मारक म्हणून तें सुंदर भावपूर्ण मीं चित्र प्रसन्नतापूर्वक स्वीकारलें.

दिवादांडीचें काव्य शेवटीं पूर्णतेला पोहोंचलें.

मे '४७

# : २६ : वेळगंगा आणि सीतानहाणी

वेरूळचें हिरवें कुंड पाहून परत फिरतांना रस्त्यांत वेळगंगेचा झरा दृष्टीस पडला होता. नालादेखील म्हणतां येणार नाहीं अितका लहानसा झरा. पण त्याला वेळगंगा हें प्रतिष्ठित नांव प्राप्त झालें आहे. नदीचें नांव कळल्यानंतर तिचा अुगम कोठें आहे हें शोधल्यावांचून कसें रहावेल ? पण आम्ही आपले लेण्यांच्या कोरीव कामांतच मस्त होअून भटकत होतों, त्यामुळें वेळगंगेची आठवणसुद्धां झाली नाहीं 'अपौरुषेय' कलाकृतीचा नमुना अशी कैलासची गुंफा सोडून जैन तीर्थंकरांच्या अिन्द्रसभेकडे जात असतां श्री अच्युत देशपांडे म्हणाले कीं वेळगंगेचा अुगम येथेंच आहे. नांव अैकलें मात्र आणि वेळगंगा येअून बिलगली !

अिन्द्रसभा पाहून परत फिरतांना आम्ही २९ व्या गुंफेंत येअून पोंचलों. अनेक गुंफा फिरून फिरून थकवा चांगलाच वाटूं लागला होता. साऱ्या शरीरांतील हाडन् हाड दुखूं लागलें होतें आणि याच वेळीं मुंबअीजवळील घारापुरीच्या अेलिफंटाची आठवण करून देणाऱ्या २९ व्या गुंफेनें भव्यतेचा कळस केला. फिरून फिरून पाय अधिक थकले होते कीं पाहून पाहून डोळे अधिक थकले होते तें सांगणें कठीण होतें. आतां न्याहारीबरोबर विश्रांति घेअूनच पुढें जायचें असें आम्ही ठरवीत होतों अितक्यांत सीतानहाणीचें स्मरण झालें.

अयोध्येपासून जनस्थानापर्यन्तचा प्रवास सीतादेवीनें पायीं केला होता. तेथून रावणानें तिला अुचलून लंकेला नेलें. दुःखावेगांत सीतेनें दक्षिणेकडील तो प्रदेश पाहिलादेखील नसेल. पण रामानें रावणाचा निःपात करून, त्याच्याच पुष्पक विमानांत बसून जेव्हां लंकेपासून अयोध्येपर्यंतचा प्रवास आकाशांतून केला तेव्हां सीतामाअीनें खालीं पाहून किती आनंद अनुभवला असेल ? रामायणांत वाल्मीकीनें जिकडे तिकडे सीतेच्या प्रकृति सौंदर्याविषयींच्या पक्षपाताचें वर्णन केलें आहे. भवभूतीनें देखील सृष्टिसौंदर्य पाहून सीतेला किती आनंद होत असे, त्याचें वर्णन दिलें आहे. हिंदुस्थानांतील ललित आणि भव्य, सुंदर आणि पवित्र स्थानांचें वर्णन करण्याचें काम जर सीतेनें

आपल्या शिरावर घेतलें असतें, तर मला वाटतें कीं त्यानंतर संस्कृतमध्यें कोणत्याहि कवीनें सृष्टिवर्णनांत अेकाहि ओळीची भर टाकण्याचा धीर केला नसता.

सीतामाता पर्वत पाहून आनंदून जाअी, नद्यांना आनंदाश्रूंचा अभिषेक घाली, हत्तींच्या छाव्यांना आंजारीगोंजारी, सारस युगुलांना आशीर्वाद देअी, सुगंधी फुलांच्या सौरभाचा नशा करी आणि प्रत्येक स्थळीं त्या साऱ्या आनंदाला राममय बनवून आपण सीता आहोंत हें देखील विसरून जाअी. लंकेत रामविरहानें झुरणाऱ्या सीतेला तशा त्या मनस्थितींत देखील तेथल्या अेका नदीशीं अेकरूप झाल्याशिवाय राहवलें नाहीं. आजसुद्धां सिलोनची सीतावाका पावसाळ्यांत दोन्ही कांठांनीं ओसंडूं लागते आणि जितकीं शेतें बुडवते तितक्या सर्वांना सुवर्णमय करून सोडते. सीतेचा जन्मच भूमींतून झाला होता. भारतभूमीच्या भक्तीच्या रूपांत आजसुद्धां ती आपल्याला दर्शन देत असते.

सीतेला वाटलें असेल कीं गोदावरीच्या प्रदेशांत चालून चालून आपण थकलों. लक्ष्मणाला वनफळें आणायला पाठवून द्यावें. राम तर धनुष्य घेअून पहारा करणारच. तर मग या चंद्राकार कड्याच्या पायथ्याशीं वेळगंगेचें आतिथ्य स्वीकारून थोडा जलविहार कां करूं नये ?

* * *

अनुकूल स्थानावरून वेळगंगेच्या सुंदर प्रपाताचें फक्त दर्शन घेण्याचाच प्रथम आमचा विचार होता. म्हणून क्रमांक २९ च्या गुंफेंत, गुंफेच्या डाव्या आणि आमच्या अुजव्या बाजूस अेक झरोका दिसत होता तिकडे आम्ही वळलों. जर खालीं अुतरण्यासारखें असलें तर तो आनंद लुटायला चुकायचें नाहीं अशी चोरटी अिच्छा मनांत होती खरी !

झरोक्यांतून पाहिलें तों अेक झिरझिरीत प्रपात वाऱ्याशीं खेळ करीत खालीं अुतरत आहे. आणि आपलीं बोटें हलवून आम्हांला गुपचुप बोलावीत आहे. खालीं अुतरावें कीं काय, अितका वेळ खर्च करावा कीं नाहीं, बरोबरच्या लोकांना हा स्वच्छंद कितपत आवडेल ? अशा विचारांत मी पडलों. मला विचारांत पडलेलें

पाहून दरींत अिकडे तिकडे धावपळ करणारे पक्षी तिरस्कारानें हसून म्हणाले, "पहा तरी, कसा अरसिक माणूस आहे! धबधबा अितक्या प्रेमानें बोलावीत आहे आणि हा आपला तिकडे विचारांत पडला आहे! या माणसांत काव्य लिहिणारे वाटेल तितके आहेत, पण काव्य जगणारे क्वचितच सांपडायचे. आणि हा समोरचा माणूस तर स्वतःला प्रकृतीचें बालक म्हणवून घेतो. हावऱ्या डोळ्यांनीं धबधब्याकडे पहात आहे, खालचें स्फटिकासारखें पाणी पाहून त्याचें हृदयहि पाझरत आहे. आणि तरीहि त्याचा निश्चय बळावत नाहीं, त्याचे पाय आपो-आप चालूं लागत नाहींत. 'तूं शिला होअून पडून रहाशील,' असा त्याला कुणी शाप दिलेला नाहीं. तरीहि हा आपला दगडालाच चिकटून बसला आहे."

पक्ष्यांची ही निर्भर्त्सना अैकून मी चांगलाच शरमलों आणि मला कळून आलें त्यापूर्वींच माझे पाय पायऱ्या अुतरूं लागले. आतां अुजव्या बाजूनें खालचा डोह ओलांडून, समोरच्या कांठानें धबधब्यापाशीं यावें, कीं डाव्या बाजूनें कड्याच्या कडेनें चालून २८ नंबरच्या गुंफेपर्यंत पोंचून तेथें धबधब्याचे तुषार अंगावर घ्यावे असा विचार मनांत सुरूं झाला. अुजवा रस्ता लांबचा आणि सुरक्षित होता, तर डावा रस्ता काव्यमय होता. आंघोळीच्या तयारीनेंच अुतरलों होतों तेव्हां अेखादेवेळीं भिजायला भिजायला होअील असा कांहीं प्रश्नच नव्हता.

२८ नंबरच्या लहानश्या गुंफेमध्यें अेक दोन मूर्ति आहेत खऱ्या, पण त्या गुंफेमधें विशेष काव्य भरलेलें नाहीं. काव्य तर सगळें बाहेरच पसरलेलें आहे. या गुंफेंत बसून जर कुणी बाहेर पाहील तर पाण्याच्या रुंद पडद्यांतून त्याला समोरील सृष्टीचा विस्तार जीवनमय दिसेल. धबधबा पडतोय खरा, पण तो अितका दाट नाहीं कीं आरपारचें कांहीं दिसूं नये. ही गुंफा पाण्याच्या पडद्यांत पडदानशीन असली तरी बिलकुल भिजत नाहीं, कारण खेळकर वारासुद्धां पाण्याचे तुषार गुंफेच्या आंत घेअून जाअूं शकत नाहीं. गुंफेच्या जर बाहेर आलांत, तर मात्र तक्रार चालायची नाहीं कीं वाऱ्यानें आम्हांला कां भिजवलें!

आम्ही त्या गुंफेंतून खालीं अुतरलों. पहाडी चतुष्पाद बनूनच अुतरावें लागलें हें सांगायला नकोच. जेथें तो धबधबा दगडावर आपटत होता तेथें मीं बैठक मारली. शंभर फूट अुंचीवरून पडणारें पाणी केवळ गुदगुदल्या करून

संतोष थोडेंच मानणार! त्यानें प्रथम डोक्यावर टपल्या मारायला सुरुवात केली, नंतर खांद्यावर चापट बसली, आणि मग पाठीवर रप् रप् रप् रप् रपाटे बसूं लागले आणि प्रवासाचा सारा शीण अुतरूं लागला. सामान्यपणें आपण मालीश करून मग स्नान करतों. पण येथें तर मालीश हेंच स्नान आणि स्नान हेंच मालीश अशी स्थिति होती. सीतेनें आपले केस येथें मोकळे सोडून अगदीं निर्मळ स्वच्छ चरबरीत केले असतील.

पण अरे, हें काय! मी अेक भटक्या प्रवासी आहे कीं या दुनियेचा बादशहा आहे? माझ्या मांडीखालीं हें रत्नखचित आसन कोठून आलें? पाण्याचे तुषार चारहि बाजूस पसरले आहेत, जसे मोत्यांचे सर! आणि आसनाखालीं दोन शोभिवंत अिन्द्रधनुष्यें मला सम्राटाची प्रतिष्ठा प्राप्त करून देत आहेत. अलकापुरीच्या कुबेरापेक्षां आतां कोणत्या बाबतींत माझें वैभव कमी आहे? अिंद्रधनुष्याच्या दुहेरी किनारीच्या, चांदीच्या सुताच्या आसनावर मी विराजमान झालेलों आहें आणि मोत्यांच्या सरांचें अुत्तरीय लेअून येथें आनंद लुटीत आहे. शिरावर सूर्यनारायणाचें चकचकीत छत्र आहे आणि आसपास अुडणारे हे द्विजगण जगन्नाथाचीं स्तोत्रें गात आहेत!

शरीर स्वच्छ करण्यासाठीं म्हणून नव्हे, तर व्यायामाचा आनंद मिळवण्यासाठीं दगडावर चढून, धबधब्याच्या खालीं मीं सारें शरीर चोळलें, स्नानपानाचा आनंद मिळवला आणि रामरक्षास्तोत्राचें स्मरण केलें. सीतामाअीनें जें स्थान पसंत केलें, त्या स्थानीं रामरक्षास्तोत्राचेंच गायन स्फुरणें स्वाभाविक होतें. आणि माथ्यापासून पायापर्यन्त सगळे अवयव चोळून साफ करीत असतांना 'शिरो मे राघवः पातु, भालं दशरथात्मजः' अित्यादि श्लोकांचें पठण करणें हा न्यास किती औचित्यपूर्ण होता!

* * *

स्वर्गांत पोहोंचलेले लोक सुद्धां शेवटीं मृत्युलोकीं परत येतात; तर मग त्या प्रपातस्नानाची मस्ती चढली असतांनासुद्धां त्यांतून व्युत्थान करून परत गद्यमय जीवनांत प्रवेश करण्याची आवश्यकता आम्हांला जाणवावी यांत नवल तें कसलें? म्हणून शेवटीं अितक्या सगळ्या आनंदावर स्वेच्छेनें पाणी सोडण्याच्या आपल्या संयमशक्तीची कदर करीत करीत मी परत आलों.

आणि नवे कपडे चढवून न्याहारीसाठीं तयार झालों. न्याहारी कसली– कलानिरीक्षणासाठीं केलेली दुपारपर्यंतची तपस्या आणि प्रपातस्नानाची शांति यांच्या नंतरचें तें अमृतभोजनच होतें, आणि वेळगंगेचा कृपाप्रसाद.

गुंफेंत स्थिर होअून अुभे राहिलेले द्वारपाळ जर आपल्या डोळ्यांनीं पाहूं शकते, तर खचितच त्यांना आमचा हेवा वाटला असता.

सप्टेंबर १९४०

# : २७ : शेतकरी नदी घटप्रभा

घटप्रभा आणि मलप्रभा या आमच्याकडील कर्नाटकांतल्या प्रमुख नद्या; स्वभावानें शेतकरी. जेथें जातील तेथें शेती करतील, जमिनीला खत देतील, पाणी देतील, कष्टाळू जनतेला समृद्धि देतील. त्यांतच आणखी गोकाकजवळ अेक मोठा बांध घालून मनुष्यानें या नदीच्या शक्तींत भर टाकली आहे. जेथें नदीचें पाणी पोंचूं शकत नव्हतें, तेथें तें आतां या बांधामुळें पोंचलें आहे. घटप्रभेच्या नांवाबरोबर गोकाकच्या लांबच लांब धरणाची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. मोठमोठ्या नद्या जिकडून तिकडून गाळ खेचून घेअून जातात. अुलट अशा लहान नद्या मिळेल तिथून थोडा थोडा चांगला कसदार गाळ आपल्या पाण्याबरोबर शेतकऱ्यांना फुकट बहाल करून आपल्या मुलांचें पालन करतात. खरोखर घटप्रभा हाडाची शेतकरी आहे.

बेळगांवहून अितका जवळ असूनहि गोकाककडील तिचा धबधबा अजून पहावयाचा बाकीच आहे.

१९२६–२७.

# : २८ : काश्मीरची दूधगंगा

श्रीनगरांत पाण्याला वाण कोठून असणार ?

सतीसर नांवाचें पौराणिक सरोवर तोडूनच तर काश्मीरचा प्रदेश बनला आहे. या अुपत्यकेची लांबीरुंदी मोजावी म्हणून कीं काय झेलम नदी नागमोडी वळणें घेत वहाते आहे. त्याशिवाय जेथें पहावें तेथें कमळें, शिंगाडे आणि तऱ्हेतऱ्हेच्या भाज्या अुगवणारीं 'दलें' (सरोवरें) पसरलेलीं आहेत. महापूर येत नाहीं तें वर्ष भाग्याचें म्हटलें पाहिजे. अशा प्रदेशांत गाड्याच्या चाकोरी अितक्या अरुंद अशा प्रवाहाला पुसतो कोण ? तरी देखील अशा अेका प्रवाहाला काश्मीरमधें नदीची प्रतिष्ठा लाभली आहे खरी.

त्यांत पाणी फारसें नसलें तरी तो प्रवाह अखंड वाहत असतो. कधीं कमी होत नाहीं कीं कधीं वाढत नाहीं. पाण्याचा रंग पांढुरका आहे, त्यावरूनच दूधगंगा या नांवानें तो ओळखला जाअू लागला असेल. ज्या नारायणाश्रमांत आम्ही रहात होतों, तेथून जवळच दूधगंगा वाहत होती. अेक लांब लाकूड टाकून तिच्यावर त्याचा पूल बनविला होता. आंघोळीसाठीं दूधगंगा फार सोयीची आहे. तिच्यांत अुभ्या अुभ्या आंघोळ करता येते, आणि पोहायचें असेल तर थोडें पोहतादेखील येतें. बुवा आजारी होते तेव्हां भांडीं विसळण्यासाठीं, कपडे धुण्यासाठीं आणि अितर वापरासाठीं दूधगंगेची मला फार मदत होअी. त्या अनोळखी प्रदेशांत जेव्हां आम्ही दोघेहि आजारीं होतों तेव्हां दूधगंगेची मदत नसती तर आमची काय गत झाली असती कोण जाणे !

या कृतज्ञतेच्या भावनेमुळें दूधगंगेचें माहात्म्य शोधून काढण्याची अिच्छा झाली. तेथील सार्वजनिक पुस्तकालयांत जाअून पुष्कळ पुस्तकें धुंडाळलीं. अितकी लहानशी दूधगंगा किती दूरवरून येते आणि किती दूरदूर जाते तें पाहून मला आश्चर्य वाटलें. कोणत्या ऋषीनें दूधगंगेला जन्म दिला, कोणी कोणी तिच्या कांठीं तपश्चर्या केली वगैरे सर्व हकीकत मीं संशोधनपूर्वक गोळा केली. अितिहासांतील अनंत घटनांप्रमाणें ही माहितीसुद्धां पुढें विस्मृतीच्या प्रवाहांत वाहून गेली आणि आतां मूळ कृतज्ञताच तेवढी मागें राहिली आहे.

रोज सकाळीं मठांतील साधु नदीवर स्नानासाठीं गोळा होत आणि रात्रीं सगळे झोंपीं गेल्यानंतर दूधगंगेच्या कांठावर बसून मी आकाशांतील ध्रुवाचें ध्यान करीत असें अितकेंच आतां आठवतें. माझें तें ध्यानहि फार दिवस चाललें नाहीं, कारण कास्मिरांतील ध्रुव अितक्या अुंचीवर असतो कीं त्याच्याकडे पाहतांना मान दुखूं लागते. तेथें सप्तर्षींतील वसिष्ठ, अरुंधती समवेत अगदीं डोक्यावर विराजतांना दिसे. तें पाहून अितकें नवल वाटे !

काश्मीर–तल–वाहिनी सतीकन्या दूधगंगेला नमन असो !

१९२६–२७

# : २९ : स्वर्धुनी वितस्ता

‘ पृथ्वीवर जर कोठें स्वर्ग असेल तर तो येथेंच आहे, येथेंच आहे, येथेंच आहे.’

असे अुद्गार सम्राट जहांगिरानें झेलम नदीचा अुगम पाहून काढले होते. त्याचे हे अुद्गार तेथील अष्टकोनी तलावाच्या अेका बाजूस कोरून ठेवलेले आहेत. खरोखर भूस्वर्ग या पदवीस शोभेल असेंच हें स्थळ आहे. वेदकाळांत झेलम नदीचें नांव होतें वितस्ता.

अंगांगांत आणि रोमारोमांत प्राणाचा संचार करणारा मधुर शीतल वारा, आपल्या यौवनाचा अुन्माद षोडश कलांनीं व्यक्त करणारी वनश्री, आपल्या सौंदर्यानें हा खरोखरीच पहाड आहे कीं रंगभूमीचा पडदा आहे असा आभास अुत्पन्न करणारा पहाड, आणि चैतन्यानें ओथंबलेली शांति–अशा रम्य स्थानीं झेलम नदीचा अुगम आहे. या अुगमाच्या स्थानीं जहांगीर बादशहानें एक सुंदर अष्टकोनी तलाव बांधला आहे.

आणि आंतलें तें पाणी ! पाणी कसलें नीलमण्याचा अमृतरसच तो. पहातांच क्षणीं असें वाटतें कीं निळींत रंगविलेले कपडे कुणीतरी अिथें धुवून काढले असावेत. पण अितके स्वच्छ मधुर पाणी अन्यत्र कोठून मिळणार ?

या तलावाच्या अेका बाजूनें जो सुंदर सरळ कालवा वहात असतो तीच आपली वितस्ता, झेलम. या स्वर्गातील आनंद लुटण्यासाठीं जणूं काय स्वर्गींचे गंधर्व माशांचें रूप धारण करून या तलावांत आणि कालव्यांत आंघोळीसाठीं अुतरले असावेत अशी त्यांची शोभा दिसते. या भागांत मासे पकडण्याची सक्त मनाअी नसती तर या शोभेची काय अवस्था झाली असती ! मीं अेक मोठें तपेलें कालव्यांत बुडविलें तों त्या तपेल्यांत पांच सात 'नेहरु' (कालव्यांतील) मासे आले. अितके ते अिथें भोळे आहेत. मीं त्यांना पुन्हां कालव्यांत सोडून दिलें.

या स्थानाला वेरीनाग म्हणतात. पुढें गेल्यावर खनबल नांवाचें अेक ठिकाण येतें. तेथून झेलम नदी होड्या चालविण्याअितकी मोठी होते. खनबलजवळच अनंतनाग नांवाचा अेक सुंदर तलाव आहे. येथून सर्वत्र सपाट भूमिभाग आहे. काश्मीरचें सगळें खोरें असेंच चहुंबाजूला सपाट आहे.

झेलमला सरळ चालणें कसें तें जुळतच नाहीं. वळणें घेतघेत मंद गतीनें ती पुढें जाते. तिच्याकांठीं अेक मोठी वैभवशाली संस्कृति विस्तार पावून अस्तंगत झाली. वितस्ता मात्र अजून जशींच्या तशींच वहात आहे. खनबलहून पुढें गेल्यावर बीजब्यारा नांवाचें अेक स्थान लागतें. तेथें अेक खास चिनारचें झाड आम्हीं पाहिलें. नअूं जणांनीं हात पसरून झाडाला कवेंत घेअून त्याच्या खोडाचें माप काढलें. बरोबर चौपन फुटाचा त्याचा घेर भरला.

बीजब्याराच्या मंदिराविषयीं अेक गमतीची दंतकथा आम्हीं येथें अैकली. अिंग्रज लेखकांनीं सुद्धां तिचा अुल्लेख केलेला आहे. धर्मांध मुसलमान जेव्हां हें मंदिर फोडण्यासाठीं आले तेव्हां तिथल्या पुजाऱ्यांनीं त्यांना कसलाच विरोध केला नाहीं, किंवा धन देअून त्याचा बचाव करण्याचीही गोष्ट काढली नाहीं अुलट त्यांनीं सांगितलें; "या, या; हें मंदिर फोडून टाका. आमच्या शास्त्रांत लिहिलेंच आहे कीं यवन येतील आणि मूर्तींचा नाश करून हें मंदिर अुध्वस्त करतील. आमच्या शास्त्रांत लिहिलेलें अन्यथा होणार नाहीं." बुत्‌शिकन गाजीला वाटलें "जर आपण हें मंदिर फोडलें तर या काफिरांची शास्त्रें खरीं असल्याचा पुरावा मिळेल. त्यापेक्षां जाअूंद्या अेक देअूळ सोडून देअूं." ही गोष्ट कितपत खरी आहे हें आपणांस माहीत नाहीं. पण गुजराथेंतील वाण्याच्या गोष्टींप्रमाणें

ही गोष्टहि चातुर्याची आहे यांत शंका नाहीं. हें सुद्धां तितकेंच खरें कीं बीजब्याराचें मंदिर मुसलमानी आक्रमणांत किंवा राजवटींतसुद्धां भंगलें नाहीं.

येथून थोडें दूर अनंतपूर नांवाचें अेक प्राचीन शहर जमिनीखालीं दबलें जाअून आतां त्याची अेक टेकडी बनली आहे. शेतामध्यें खोदीत असतां जुनें सुंदर बांधकाम, कितीतरी प्राचीन रांजण आणि कोळसा झालेलें तांदूळ येथें सांपडलेले मीं आपल्या डोळयांनीं पाहिले आहेत.

नदी अिकडे तिकडे भटकत अितकी सावकाश चालते कीं पाण्याचा प्रवाह असा कोठें जाणवतच नाहीं. नदीच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेस जावयाचें असेल तेव्हां वल्हीं न मारतां होडीच्या नाकाला खूप लांब दोरी बांधून अेक किंवा दोन माणसें कांठावरून ही दोरी ओढीत चालतात. होडी पाण्यांतच चालावी, कांठाला लागूं नये म्हणून होडींतलाच अेक कोळी हातांतल्या वल्ह्याचें सुकाणूं करून तें हातांत तिरकें धरून बसतो.

काश्मीरी शालींच्या कोपऱ्यांत जी कोयरीच्या किंवा काजूच्या आकाराची नक्षी असते, तें येथल्या कारागिरीचें वैशिष्ट्य होय. झेलम् नदीचीं वळणें पाहून कारागिरांना ही नक्षी सुचली असें म्हणतात. अेकदां आम्हीं नदींत अेका बंदरापासून होडीनें चौदा मैलांचा प्रवास केला तितक्या वेळांत मूळ बंदरावर जरा अुशिरा आलेला अेक प्रवासी मधल्या मार्गानें चालून येथें आम्हांला येअून भेटला. त्याला फक्त अडीच मैलच चालावें लागलें—अितकीं वळणें घेत ही नदी वहात असते! अशा प्रकारच्या वळणांमुळें प्रवाहाचा वेग कमी होतो. आणि नदीचें पात्र झिजत नाहीं. पण जेव्हां पूर येतो, तेव्हां मात्र "सर्वत: संप्लुतोदके" अशी स्थिति निर्माण होते. अिथल्या प्राचीन "भगीरथ" (अिंजीनिअर) राजांनीं हें संकट टाळून नदीला आटोक्यांत ठेवण्यासाठीं अशीं अनेक वळणें, आणि अनेक कालवे खोदून ठेवले आहेत.

हा अुपाय अितका रामबाण आहे कीं आज देखील त्याचेंच अनुकरण करावें लागतें. अेका मोठ्या होडींतून किंवा आगबोटींतून रानडुकराच्या सुळयासारखा अेक मोठा राक्षसी फाळ नदीचा तळ खोदीत जातो. आणि आंतला चिखल विजेच्या पंपानें बाहेर फेकीत असतो. हा सर्व व्यापार 'वराहमूलम्' (आजचें बारामुल्ला) क्षेत्रीं पहावयास मिळतो.

'बारामुल्ला' हें काश्मीरच्या खोऱ्याचें पलीकडील टोंक होय. येथून पुढें झेलम फारच वेगानें धावूं लागतें.

या साऱ्या प्रदेशाच्या मधोमध काश्मीरची राजधानी वसलेली आहे. श्रीनगर हें शहर नदीच्या दोन्ही तीरांवर पसरलेलें आहे. नदीवर अमुक अमुक अंतरावर सात कदल (पूल) बांधलेले आहेत. त्याशिवाय दोन्हीं बाजूस शहराच्या अंतर्भागापर्यंत नदींतून कालवे खोदलेले असल्यामुळें अनायासें शांत प्रवाही रस्ते या शहराला लाभलेले आहेत. नदीचा प्रवाह तो राजमार्ग आणि बाकीचे कालवे ते या राजमार्गाला येऊन मिळणारे आडमार्ग. रस्त्यावर ज्याप्रमाणें गाड्या धांवतात त्याप्रमाणें येथें लांब आणि अरुंद 'शिकारा' होड्या तीरासारख्या धांवत असतात. नदींत या होड्यांची कितीहि गजबज झाली तरी त्यांचा जरासुद्धां आवाज होत नाहीं.

दुपारीं जेव्हां महाराजांच्या देवळांतील पूजा संपते आणि आदल्या दिवशींची निर्माल्य झालेलीं फुलें नदीच्या पात्रांत फेकून दिली जातात, तेव्हां जवळ जवळ अर्ध्या मैलापर्यंत लांब ओळीनें सावकाश वहात असलेल्या या फुलांचें मनोहर दृश्य नजरेस पडतें.

आणि या नदीच्या तीरावर प्रवृत्ति तरी किती चालू असते. कांहीं ठिकाणीं सतरंज्या विणल्या जात आहेत, तर कांहीं ठिकाणीं अप्रतिम गालीचे. अेका ठिकाणीं अक्रोडाच्या लाकडावर सुंदर कोरीव काम चाललें आहे, तर दुसऱ्या जागीं रेशमाच्या कारखान्यांत कुरूप किड्यांचे कोश पाण्यांत शुकळवून त्यांतून सुंदर मुलायम रेशीम तयार केलें जात आहे. चीन, तिबेटचे, तसेंच समरकंद व बुखारा येथील व्यापारी महिनेच्या महिने येथें तळ देऊन पडलेले असतात. आणि हुषार पंजाबी लोक त्यांच्याबरोबर व्यापार करण्यांत गढलेले असतात जिकडे पहावें तिकडे हातापेक्षां लांब बाह्या असलेले डगले घालून लोक फिरत असलेले दिसून येतात.

पुढें गेल्यावर हीच झेलम हिंदुस्थानांतील सर्वांत मोठें सरोवर जें 'वूलर' त्याच्यांत जाऊन पडते आणि त्यांत अदृश्य होऊन गुप्त रूपानें दूरची मजल मारून दुसऱ्या टोकानें बाहेर पडते आणि बारामुल्लाकडे वळते. तेथें या नदींतून अेक कृत्रिम कालवा काढून त्यांतून जी वीज अुत्पन्न करण्यांत आली आहे

तिचाच पुरवठा साऱ्या काश्मीर राज्याला होत असतो. अबटाबादेजवळ ही नदी दिशा बदलतें आणि पुढें वेगानें धावूं लागतें. झेलमचें सगळें खोरें आपल्या सौंदर्याविषयीं प्रख्यात आहे.

अकबर बादशहानें या नदीच्या सौंदर्याचा कैफ चढून वरून खालीं अुडी टाकली होती अशी अेक लोकवार्ता येथें प्रचलित आहे. ही अेक कवि-कल्पना असूं शकेल. पण या खोऱ्याच्या दर्शनानें असा कैफ चढणें संभवनीय आहे यांत शंका नाहीं. अशा दंतकथा अेखाद्या बादशहाचा मोठेपणा दाखविण्यापेक्षां या नदीचें सौंदर्य किती मोहक आहे हें दाखविण्यासाठीं म्हणूनच रचलेल्या असतात.

जेव्हां हिंदुस्थानचा खरा अितिहास लिहिला जाअील तेव्हां त्यांत मोठमोठ्या नद्यांपरत्वें देशाचें वेगवेगळे विभाग पाडण्यांत येतील. या अितिहासांत झेलमच्या स्वर्गीय संस्कृतीचा विभाग लहानसहान असणार नाहीं. खरोखर झेलमला स्वर्धुनी हें नांव शोभून दिसतें.

—१९२६-२७.

# : ३० : सेवाव्रता रावी

सिन्धु नदीला करभार देणाऱ्या पांच नद्यांत वितस्ता-झेलम आणि शुतुद्री या दोघीच महत्त्वाच्या होत. बाकीच्या आपल्या वांट्याला आलेलें काम विनम्रतेनें करून मोकळ्या होतात. अेखाद्या श्रेष्ठ पुरुषाला भेटायला शिष्टमंडळ जावें तशा या नद्या हळूं हळूं गोळा होअून शेवटीं सिन्धूला जाअून मिळतात. बीआस सतलजला मिळते. चीनाब झेलमला मिळते आणि रावी या दोघींना येअून मिळते. पुढें मुलतानजवळ या तिन्ही नद्यांचें पाणी घेअून येणारी झेलम हिन्दुस्थानच्या पल्याडहून येणाऱ्या सतलजला जाअून मिळते आणि शेवटीं या सगळ्यांचा मिळून बनणारा पंचनद सिन्धूंत अेकरूप होअून कृतार्थ होतो. सिन्धूशीं वाटाघाट करणाऱ्या शिष्टमंडळाचें पुढारीपण अर्थातच

सतलजकडेच असणार; कारण ती सुद्धां सिन्धूप्रमाणें परलोकाहून ( हिमालयाच्या पल्याडहून ) च अवतरलेली आहे.

या पांच नद्यांत अिरावती म्हणजेच रावी मध्यस्थानीं आहे. वेदांत अिरा म्हणजे पाणी, आह्लादक पेय. नदी म्हटली कीं तिच्यांत पाणी हें असणारच. पण या नदीचे विशेष गुण पाहून ऋषींनीं हिला अिरावती म्हटलें असावें. ब्रह्मदेशांतील अैरावती (अिरावान्=समुद्र) समुद्राअितकी विशाल असल्याचें पाहून तिला तें नांव ठेवलें असेल का? रावी कांहीं अितकी रुंद नाहीं.

स्वामी रामतीर्थांच्या जीवनचरित्रांत रावीचा अुल्लेख अनेकदां येतो. रावीला पाहून स्वामी रामतीर्थांचे डोळे प्रेमानें ओथंबून येत. वैराग्य आणि संन्यासाविषयींच्या अपरिपक्व विचारांना या नदीच्या किनाऱ्यावर त्यांनीं परिपक्व केलें. पण रावी आपली शीखगुरु अर्जुनदेव आणि शीख राजा रणजितसिंह यांच्यासाठींच अश्रु ढाळतांना दिसून येते.

अेकदां लाहोरला गेलों असतांना अिरावतीचें पुण्यदर्शन घडलें होतें. काय ती त्या वेळची नदीची शांति! सगळें लाहोर शहर तिच्या विशाल पटावर लोटलें होतें. लोकांची धामधूम आणि धनवान लोकांचे चैनविलास यांच्या तुलनेनें रावीची शांति विशेष रूपानें जाणवत होती. साऱ्या लाहोर शहराला मांडीवर घेअून खेळवीत असावी तशी रावी येथें दिसते.

आपलें पावन व पोषण जल देअूनच रावी थांबत नाहीं. आपल्या लेकरांची ती याहूनहि विशेष सेवा करते. हिमालयांतील गहन अरण्यांत चीड, देवदार, बांझ, सफेता वगैरे आर्यवृक्षांचीं दाट वस्तीचीं नगरें वसलेलीं आहेत कित्येक ठिकाणीं तर भर दुपारीं देखील सूर्याचीं किरणें जमिनीपर्यंत पोंचूं शकत नाहींत. आणि वयोवृद्ध वृक्षांचा अेखादा पितामह जर अुन्मळून पडला तर त्याला देखील जमिनीपर्यंत पोंचणें अशक्य होअून बसतें. आसपासचे वृक्ष आपल्या बलिष्ठ बाहूनीं त्याला वरचेवर झेलून अधांतरीं ठेवतात, जसे काय शरपंजरीं पडलेले भीष्माचार्य!! वर्षानुवर्षें असें वरच्यावर अधांतरीं थंडी, अून आणि पाअूस यांचा मारा सहन करून अनेक वर्षांच्या शेवटीं या भीष्माचार्यांचें विशाल शरीर छिन्नभिन्न आणि चूर्णित होअून नामशेष व्हायचें.

अशा जंगलांतून अिमारती लाकडें कापून आणणें कांहीं सोपें काम नाहीं. म्हणून लोकांनीं रावीचा आश्रय घेतला. रावीच्या कांठीं जेथें मोठमोठीं जंगलें आहेत तेथें लाकूड–तोडे जातात, आणि लाकडाच्या मोठमोठ्या फळया कापून रावीच्या प्रवाहांत सोडून देतात. बस, मग निघाल्या या फळया हसत खिदळत. कांहीं कांहीं ठिकाणीं आळशीं मुलें शाळेला जात असावींत तश्या, हळूं हळूं रेंगाळत आणि मधेंच थांबत देखील या फळया पुढें चालायच्या. कांहीं ठिकाणीं गोरज समयीं गाअी घराकडे चौखूर अुधळतात तश्या या फळया नाचत नाचत, वरखालीं होत, अेकमेकांवर आदळत पळत सुटतात.

सजीव जनावरांना देखील हांकण्यासाठीं गुराख्यांची आवश्यकता भासते. मग या निर्जीव फळया अशा देखरेखीवांचून मुक्कामापर्यन्त कशा पोंचणार? कुठें नदीचें जरासें वळण पाहिलें कीं मग सगळ्या फळ्या थांबल्या. अेक थांबली म्हणून दुसरी थांबली. तिचा आधार घेअून तिसरी थांबली. 'पुढें जायला वाटच नाहीं' म्हणून चौथी थांबली. 'कशासाठीं या सगळया अुभ्या राहिल्या आहेत, पाहूंया तर खरें!' असें म्हणून पांचवी थांबली. रात्रीचा मुक्काम करण्याची ही जागा असेल असें प्रामाणिकपणें मानून सातवी, आठवी आणि दहावी थांबली. मग मागाहून येणाऱ्या सगळ्या मानूं लागल्या कीं आपला मुक्कामच येथें आहे, आतां पुढें यात्रा करण्याचें कारण अुरलें नाहीं. जिथें सगळया थांबल्या—'सा काष्ठा सा परा गतिः।'

सकाळ झाली कीं फळयांचे गुराखी येतात आणि या सगळयांना पुढें हांकलतात. 'चला बाअी, चला, चला.' करीत हा सगळा कळप पुढें निघतो. नदीचा प्रवाह ठीक असेल तोंपर्यन्त हा प्रवास सुरळीत चालतो. पण जेथें प्रवाह अत्यंत वेगवान, अुथळ, किंवा खडकाळ असेल तेथें मोठीच अडचण अुत्पन्न होते. अेखाद्या लांब्या फळीला दोन मोठ्या खडकांचा आसरा मिळाला तर थपकल मारून ती तेथल्या तेथेंच बसणार आणि म्हणणार, 'मी तर येथून हलणार नाहींच, पण दुसऱ्यांना देखील जाअूं देणार नाहीं.' अशा ठिकाणीं फळयांना जाण्यासाठीं पांचसात सुअेझचे कालवे असायचे. ते बुजले कीं सगळा काफला अडकून पडायचा. गुराखी येथवर पोहून येणाची हिंमतहि करणें शक्य नाहीं, कारण त्याला या फळयांहूनहि आपलें डोकें अधिक प्यारें असतें.

कांठावर अुभें राहून लांब लांब बांबूंनीं ढोसूनटोचून कांहीं फळयांना काढणें शक्य आहे. पण प्रवाहाच्या मध्यभागीं अडकून पडलेल्यांचें काय करणार ?

माणसानें या संकटावरहि अुपाय शोधून काढलेला आहे. हिमालयांत म्हशीसारखीं मोठीं जनावरें रहात असतात. त्यांचें सगळेंच्या सगळे चामडें सलग अुतरवून त्याला शिवून त्याची पिशवी बनवतात. गळयाकडून आंत हवा भरून तीहि बाजू बंद करतात. म्हणजे तें जनावर अप्सरेप्रमाणें मांस किंवा हाडें नसलेलें, नुसती हवा भरलेलें बनतें आणि पाण्यावरून तरंगत पुढें जाण्याच्या योग्यतेचें होतें. त्याचे चार पाय देखील हाडें काढून जसेच्यातसेच ठेवलेले असतात. नंतर या तरंगत्या फुग्यांना किंवा पखालीला पाण्यांत ठेअून हे गुराखी तिच्या पोटावर आपली छाती ठेवतात आणि पाय हलवीत अिच्छित स्थळीं जाअून पोहोंचतात. फुग्यांमुळें पाण्यांत पोहोणें सोपें जातें. फुग्याचे पाय पकडून ठेवल्यामुळें तो छातीखालून निसटून जात नाहीं आणि प्रवाहाच्या वेगानें कुठें खडकावर आदळण्याची पाळी आली तर चामड्याच्या या तराफ्याला लागतें, माणसाला धक्का पोंचत नाहीं.

अितक्या सगळया जंगी तयारीनंतर फळयांचा कामचुकारपणा कोठवर टिकणार ? अेकेकीला पुढें मुसंडी मारल्यावांचून गत्यंतरच अुरत नाहीं. पर्वतांतील दऱ्या पार करून अेकदाच्या बाहेर पडल्या कीं मग या फळयांनीं मनाला येअील तसें वेगवेगळें वाहत जाअूं नये. म्हणून फळयांचे गुराखी त्या सगळयांना दाव्यांत बांधून त्यांच्यावर स्वार होअून त्यांना अिच्छित स्थळीं घेअून जातात.

लाहोरमधें रावीच्या प्रवाहावर या फळयांचे कितीतरी कळप तरतांना आढळून येतात. त्यांचे वैरी त्यांना पाण्यांतून ओढून काढून त्यांचे तुकडे तुकडे करतात आणि मग माणसांच्या घरांसाठीं किंवा अितर घरसामान बनवण्यासाठीं दधीचि ऋषींप्रमाणें त्यांना आपला देह अर्पण करावा लागतो. आपल्या पार्वतीय सहोदरांना माणसांच्या सेवेसाठीं अशा रीतीनें आणून सोडतांना रावीला काय होत असेल ? रावी अितकेंच म्हणत असेल कीं, 'बाबांनो, परोपकाराय अिदं शरीरम् ।'

जून १९३७

# : ३१ : स्तन्यदायिनी चिनाब

काश्मीरहून परत निघतांना पाय अुचलतच नाहींत. जातांना जो अुत्साह होता तो परततांना कोठून असणार ? याच कारणासाठीं, जातांना जो मार्ग धरला होता तो सोडून, पीरपुंजालचा पहाड ओलांडून, जम्मूच्या रस्त्यानें आम्ही येत होतों. श्रीनगर ते जम्मू गाडीरस्ता नाहीं. हिंमत असेल तर पायीं चाला, नाहींतर काश्मीरी तट्टावर स्वार व्हा. रस्त्यांत निसर्गाचें सौंदर्य आणि जहांगिराची विलासप्रियता पावलोपावलीं अनुभवास येते. जिकडे पहावें तिकडें जलाशय बांधलेले, पहाडांत पायरस्ते तयार केलेले. आज सिमल्याला जी प्रतिष्ठा आहे तीच, किंवा कांकणभर अधिक जहांगिराच्या वेळीं श्रीनगरला होती. अशा बादशाही पहाडी रस्त्यानें परत येत असतांना आम्हांला भगवती चंद्रभागेचें दर्शन झालें होतें. लोक आज तिला चिनाब या नांवानें ओळखतात.

मी चुकत नसेन, तर मला वाटतें कीं रामबनच्या आसपास कुठेंतरी आम्ही होतों. सारा दिवस व सारी रात्र चालावयाचें होतें. चांदणें सुरेख पडलें होतें. थकून भागून आम्ही, अेखाद्या प्यालेल्या माणसाप्रमाणें, अडखळत अडखळत रस्त्यावरून चालत होतों. तळपायांना फोड आले होते. गुडघ्यांना कळा लागल्या होत्या आणि निराश झालेल्या निजेचें रूपांतर अर्धवट गुंगींत झालें होतें. ही निद्रा जशी सुखावह असते, तशी ही तंद्रा नसते.

अशा स्थितींत चालतां चालतां रस्त्याच्या अुजव्या बाजूनें खोल दरींतून गंभीर ध्वनि कानीं आला. समोरच्या टेकडीवरून धनुष्याकार झेंप घेअून आलेला वारा सुगंध शीतल वाटूं लागला. गुंगी अुडाली, अंगांत हुशारी आली. आणि दृष्टि त्या कलरवाचें मूळ शोधायला धावली. काय तें मनोहर दृश्य ! वरून दुधासारख्या चांदण्याचा वर्षाव होत आहे. खालून चंद्रभागेचें पाणी खडकांवर आपटत दुधासारखा पांढरा फेस वर अुसळत आहे आणि त्याचा आस्वाद घेअून तृप्त झालेला वारा तेथली शीतलता आम्हांला बहाल करीत आहे !

मीं बरोबरच्या अेका माणसाला विचारलें, 'ही अेखादी नदी आहे कीं पहाडी प्रवाह आहे?' त्यांनें सांगितलें, 'दोन्ही. ही तर चिनाबमैया आहे.' मीं नमस्कार केला. खालीं अुतरणें तर शक्यच नव्हतें. तेव्हां दुरूनच दर्शन घेअून पावन झालों, नमस्कार करून कृतार्थ झालों आणि पुढें निघालों.

हीच का ती वेदकालीन भगवती चंद्रभागा! कितीतरी ऋषींनीं आपली ध्यान धारणा व आपल्या गायी येथें पुष्ट केल्या असतील आणि आज देखील अुद्यमी लोक या नदीमातेचें थोडें थोडकें दोहन करीत नाहींत. माझ्या जीवनाच्या स्मृतीला प्रारंभ होतो त्याच सुमारास पहाडासारखे पंजाबी लोक या नदीच्या कांठीं कालवे खोदीत होते. आज २५ लाख अेकर जमीन या मातेच्या दुधापासून रस-कस मिळवीत आहे आणि पंजाबी वीरांना पोशीत आहे. वेदकालीन चिनाबचें सत्त्व आर्यांच्या अुत्कर्षाला कारणीभूत होत असे. रणजितसिंहाच्या जमान्यांत तेंच पाणी गुरुकी फतेह पुकारीत असे. तिचा आजचा रंग हा कांहीं कायमचा रंग नव्हे. चिनाबचें पाणी अगदीं निःसत्त्व झालेलें नाहीं. पंचनदाची प्रतिष्ठा पुन्हां जागृत होअील आणि सप्तसिंधूचा प्रदेश भारतवर्षाला भाग्याचे दिवस दाखवील.

[ चिनाबचा प्रवाह पंजाबची भाग्यरेषा होण्याच्या अैवजीं आज पंजाबच्या फाळणीची रेषा होअू पहात आहे हा केवढा मोठा दैव-दुर्विपाक! —१९४७ ]

१९२६–२७

# : ३२ : जम्मूची तवी

अेखाद्या नदीविषयीं सांगण्याजोगें कांहींच नसलें म्हणून काय झालें? तिच्यांत आंघोळ केल्याचा आनंद काय कमी होणार होता? नदीचा महिमा स्वयंसिद्ध आहे. तिच्या नांवाशीं थोडाफार अितिहास संलग्न असेल तर तें त्या अितिहासाचें भाग्य! नदीला त्याचें काय? अितिहासाला विग्रहांत अधिक गोडी वाटते, तर नदीचें काम असतें संधि घडवून आणण्याचें.

शेतकऱ्यांना आणि वाटसरूंना, पशूंना आणि पक्ष्यांना आपल्या जलानें संतुष्ट करीत जेव्हां नदी वहात असते तेव्हां ती 'आत्मरति, आत्मक्रीड आणि आत्मन्येवच संतुष्ट' अशी दिसते. नदीला विचारा कीं, 'तुझा अितिहास काय आहे?' ती अुत्तर देअील, 'मी पर्वताची मुलगी आहें. असंख्य मानव व तिर्यक् प्राण्यांची मी माता आहें. मी सागराची सेवा करतें आणि आकाशांतील मेघ हेंच माझें स्वर्गस्थान आहे. माझ्या दृष्टीनें मला अितका अितिहास महत्त्वाचा वाटतो. बाकी तुम्हां वेड्यां लोकांचा अितिहास तुम्हांला ठाअूक. वैर आणि वेड यांचा अितिहास काय लिहून ठेवायचा असतो? त्या विसरून जाण्याच्या गोष्टी असतात, विसरून जाण्याच्या. हेवेदावे कायम ठेवण्यासाठीं अितिहास कायतो लिहितां? त्याला गाडून टाका किंवा धुअून काढा. सेवेचा अितिहासच काय तो खरा अितिहास होय.'

काश्मीरचा प्रवास पुरा करून आम्ही जम्मूला आलों आणि रघुनाथजीच्या मंदिरांत वसति केली. जवळच तवी नदी वहात होती. जम्मूकडील तवीचा कांठ चांगलाच अुंच आहे. पुष्कळशा नद्या असतात त्यांतलीच तवी देखील अेक आहे. तिच्यांत असाधारण असें कांहींच नाहीं. अेका महाराष्ट्रीय अिंजिनियर गृहस्थांना भेटायला गेलों होतों. त्यांनीं सांगितलें कीं, 'तवीवर विजेचीं यंत्रें बसवलीं आहेत. या विजेच्या द्वारा पुष्कळ काम होण्यासारखें आहे.'

पण तवीला त्याचें काय? ती आपली वहातच असते.

१९२६–२७.

# : ३३ : सिंधूचा विषाद

हिमालयाच्या पलीकडे, पृथ्वीच्या त्या मानदंडाच्या जवळजवळ अगदीं मधोमध, कैलासनाथाच्या नजरेखालीं, चिरहिमाच्छादित अेक असा पुण्यवान प्रदेश आहे कीं ज्याच्या मोजक्या परिसरांतून हिंदुस्थानांतील चार लोकमाता अुगम पावतात. अलीकडच्या आणि पलीकडच्या असा हिशोब केला नाहीं तर अुत्तर

हिंदुस्थानांतील जवळजवळ सगळयाच नद्या येथून निघतात असें म्हटलें तरी चालेल.

हिमालय हिंदुस्थानाचाच आहे, दुसऱ्या कोणत्याहि देशाचा नाहीं, असें सिद्ध करण्यासाठींच कीं काय हिमालयाच्या अुत्तरेस ढळणाऱ्या पाण्याचा अेकअेक थेंब गोळा करून, हिमालयाच्या दोन्ही टोकांस वळसा घालून तें पाणी हिंदी महासागरापर्यन्त पोहोंचवण्याचें काम सिंधु आणि ब्रह्मपुत्रा हे दोन्ही नद अखंड करीत असतात. श्री कैलासनाथानें भारतवर्षाला आपल्या कवेंत घेण्यासाठीं दोन कारुण्यबाहु पसरले असावेत तसे हे दोन नद दिसतात! हिमालयाचें आडवें पडणें सहन न होअून कीं काय सतलज आणि घोग्रा हिमालयाच्या कुशींतून सरळ मार्ग काढून मानससरोवरांच्या बाजूचें पाणी भारतवर्षांतील दोन मोठ्या प्रांतांना आणून पोंचवत असतात. अुलट गंगा, यमुना व त्यांच्या असंख्य मैत्रिणी आपल्या वडिलांचा मान राखून तेंच काम या बाजूस करतात. पंजाबच्या पांच नद्या आणि संयुक्त प्रांतांतील पांच नद्या मिळून दाही जणी भारतवर्षाची समृद्धि दसपट वाढवितात. या दाही नद्या भारतीय आहेत. फक्त सिंधु आणि ब्रह्मपुत्र यांना अतिभारतीय म्हणावें लागेल.

भारतवासियांना गंगामैया मिळाली आणि सिंधूचा त्यांना जणूं काय विसर पडला. सिंधूच्या कांठीं आर्यांचें अेकहि धर्मप्रसिद्ध तीर्थ नाहीं. ज्याप्रमाणें वैदिक देवाधिदेव अिन्द्राला आपण विसरून गेलों त्याचप्रमाणें वैदिक सप्तसिंधूपैकीं मुख्य नदीला देखील आपण पार विसरून गेलों आहोंत. दक्षिणेकडे आणि पूर्वेकडे महान् साम्राज्यें प्रस्थापित करून प्राचीन आर्य वायव्य दिशेबद्दल कांहींसे अुदासीन बनले आणि त्यामुळें त्यांनीं आपल्यावर अेक संकटपरंपरा ओढवून घेतली. अुत्तरेकडे हिमालयाचें रक्षण आहेच. पश्चिमेकडे अगदीं आंतल्या बाजूस राजपुतान्याचें वाळवंट आणि रजपुत व डोगरा जातीचें शौर्य यांच्यामुळें पुरेसें रक्षण मिळत असे. त्याच्या बाहेर वेगवती सिन्धूचें संरक्षण होतें. त्याच्यापुढें जाअून करतार (खिरथर) पासून ते हिंदुकुशपर्यन्तच्या प्रचंड पर्वतमालेचें संरक्षण होतें. पहाडी परोपनिसदी (अफगाण) लोकांची स्वातंत्र्यप्रियता सुद्धां विदेशियांना या बाजूस फटकूं देत नसे. पण जेथें देशवासीच अुदासीन बनले तेथें नैसर्गिक तटभिंती व नद्या कुठवर संरक्षण करणार?

परोपनिसदी लोकांत यवन येअून मिसळले आणि बाल्हीकजवळ हिंदुस्थानची जी शास्त्रीय लष्करी सरहद्द होती ती सरकत सरकत अटकेपर्यंत येअून अटकली. आणि या अटकेनें सुद्धां परदेशियांना आंत घुसण्यास अटकाव करण्याअैवजीं भारतवासियांनाच बाहेर जाण्यास अटकाव केला. राणी सेमीरामीसला हिंदुस्थानांत येण्यास अटकाव झाला नाहीं. पर्शियन सम्राटांना पंजाब व सिंधु देशांपासून सुवर्ण करभार घेण्यास कुणी अटकाव केला नाहीं. युअेची व हूण लोकांना हिंदुस्थानांत येण्यास अटकाव झाला नाहीं. सिकंदरालाहि पांच नद्या ओलांडतांना कुठें अटकाव झाला नाहीं. महमद किंवा बाबराला देखील अटक नडली नाहीं. काबुल नदीचें पाणीच ज्या नदीनें स्वीकारलें ती पश्चिमेकडून येणाऱ्या लोकांना अडवणार नाहीं अितकें तरी आपल्या लोकांना समजायला हवें होतें !

पश्चिम तिबेटांत कैलासच्या पायथ्यापासून सिन्धूचा अुगम आहे. तेथून सरळ रेषेंत ती वायव्येकडे धांव घेते, कारण शेवटीं तिला जावयाचें असतें नैअृत्येकडे ! काश्मिरांत घुसून लेहच्या लष्करी छावणीची भेट घेअून, काराकोरम पर्वताच्या रखवालीखाली ती सरळ पुढें निघते. स्कार्डुजवळ तिला भान होतें कीं आपल्याला हिंदुस्थानांत जावयाचें आहे. गिरगिटचा किल्ला दुरून पाहून ती दक्षिणेकडे वळते. चित्रालकडे तिला स्वतःला जावयाचें नाहीं, म्हणून त्या प्रदेशांतलें पाणी कसें काय आहे तें तपासण्यासाठीं ती स्वातला आपल्यापाशीं बोलावते. स्वात अेकटी कसची येते ? तिची निष्ठा आहे काबुल नदीवर. सफेद कोहचें पाणी घेअून येणाऱ्या काबुल नदीशीं मिसळून ती अटकेजवळ सिंधूला येअून मिळते. आणि आतां सिंधु पूर्णपणें भारतीय बनते. स्वात आणि काबुल त्यांच्या तोंडून अैकण्याजोगा कितीतरी अितिहास आहे. खैबरघाटांतून कोण कोण आलें आणि गेलें, बॅक्ट्रियाचे ग्रीक लोक कोणत्या मार्गानें आले आणि तेथपासून तों कर्नल यंगहजबंडनें चित्रालवर कोठून चढाअी केली तेथपर्यंतचा सगळा वृत्तांत या दोन नद्या सांगूं शकतील. अमीर अमानुल्लानें अुन्हाळ्यांतल्या वेडाच्या लहरींत परवांपरवां जी चढाअी केली तिच्याविषयीं विचारलेंत तर तें सुद्धां या नद्या सांगूं शकतील. आणि कोहाटची क्रूरतादेखील सिंधूला अज्ञात नाहीं. वजिरीस्तान आणि बन्नुमधें घडलेले, क्षात्रधर्माला काळिमा फासणारे प्रसंग कुरमच्या तोंडून अैकून सिंधूच्या जिवाचा थरकांप अुडतो. क्रुमु अथवा

कुरम सिंधूला येअून मिळाली कीं सिंधूचा प्रवाह त्रिघडतो. पर्वताच्या अभावीं तो मर्यादेंत राहूं शकत नाहीं. लहान मोठ्या बेटांना जन्म देत देत सिंधु डेरा अिस्माअिलखानपासून डेरा गाझीखानपर्यंत जाते.

यापुढें सिंधु पांचहि नद्यांच्या पाण्याची वाट पहात अरुंद होअून धावते. जम्मूकडून येणारी चिनाब, काश्मिरी झेलमला मिळते. लाहोरच्या वैभवाचा अुपभोग घेअून तृप्त झालेली रावी या दोघींना येअून मिळते. व्यासच्या पाण्यानें पुष्ट झालेली सतलज या तिघींच्या पाण्यांत मिसळून जाते आणि मग अुन्मत्त झालेला हा पंचनदाचा प्रवाह मिट्ठनकोटपाशीं सिंधूवर झेंप घेतो. अितका मोठा हल्ला झेलून घेअून, तो पचवून, आपलेंच नांव कायम टिकवणाऱ्या सिंधूची शक्ति तितकीच मोठी असली पाहिजे.

सिंधु आपलें नांव टिकवूनच थांबत नाहीं, तर यापुढें आपल्या जीवनाची अुदार कृपा अनेक प्रकारें पसरवीत आसपासच्या प्रदेशाला देखील आपलें नांव बहाल करते. 'त्यागाय संभृतार्थानाम्' अशा आर्य राजांचेंच ती अनुकरण करते. मोठमोठाल्या सात खोऱ्यांचें पाणी ती गोळा करते खरी, पण तें सगळें अनेक मुखांनीं महासागराला देण्यासाठींच आणि रस्त्यांत गरजू माणसाला त्यांतून वाटेल तितकें पाणी, वाटेल तेथें घेअून जावयाचें असेल तर त्याला सिंधूची ना नाहीं.

अितकें असलें तरी गंगामाअीची 'अुदार'ता सिंधूपाशीं नाहीं. त्यामुळें अटक आणि सक्करपासून ते हैद्राबाद कोटरीपर्यंत अनेक पूल तिच्यावर बांधले गेले आहेत. सक्करचा पूल लष्करी दृष्टीनें फार महत्त्वाचा आहे. सिंधूमधें असलेल्या अेका मोठ्या बेटाचा अुपयोग करून हा पूल बांधला आहे. पण जेथें रोहरीपाशीं पाणी खोल आहे तेथें हा पूल जपानी पंख्याप्रमाणें वाटेल तेव्हा मिटून घेता येतो. लष्कराला सिंधू ओलांडणें अशक्य करून टाकायचें असेल तर जणूं काय मंत्र बोलून चुटकी सरशीं सारा पूलच्या पूल अदृश्य होअूं शकेल. मग शिकारपुर–सक्कर वेगळें आणि रोहरी वेगळें. शिकारपुर–सक्करला कांहीं अिंग्रजांनींच महत्त्व दिलें आहे असें नाहीं. येथले हिंदू व्यापारी प्राचीनकाळापासून बोलनघाटच्या रस्त्यानें कंदहारवरून मध्य आशियांत व्यापार करण्यासाठीं जात आले आहेत. हिरात असो कीं मर्व,

बुखारा असो कीं समरकंद, कुठेंहि पहा शिकारपुरचे व्यापारी सांपडायचेच. शिकारपुरची हुंडी मॉस्को आणि पिटर्सबर्ग (लेनिनग्राड) पर्यंत अनिर्बंध स्वीकारली जात असते. सक्करची आठवण काढावी आणि मोठ्या जहाजाप्रमाणें पाण्यांत तरंगणाऱ्या साधुबेला नांवाच्या बेटाचा विसर पडावा हें कधीं शक्य आहे का ? साधूची काव्यमय अभिरुचि नेहमीं सुंदरांतलें सुंदर स्थळ पसंत करीत असते. साधुबेलाच्या सौंदर्याचा सम्राटांना देखील हेवा वाटावा.

सिंधूला आराम करण्याची अिच्छा झाली, कीं शिंगाडे खावेसे वाटले कोण जाणे, ती येथून मंचर सरोवराकडे धाव घेते. पण वेळींच भानावर येअून म्हणा किंवा खीरथरपर्वताच्या सांगण्यावरून म्हणा, ती माघारी फिरते आणि शेवणपासून आग्नेय दिशा धरून हैदराबादपर्यंत जाते. हा प्रदेश कितीतरी युद्धांचा साक्षी आहे. जयद्रथाच्या काळांत येथली स्थिति कशी असेल कोण जाणे, पण दाहिर आणि जच्च यांच्या कारकिर्दींत हा प्रांत चांगलाच मागसलेला असला पाहिजे. चंद्रगुप्तापूर्वी अिराणी साम्राज्याला सोनें देअून देअून निःसत्त्व झाल्यामुळें म्हणा, अथवा तेथल्या ब्राह्मण राजांच्या अनाचारामुळें म्हणा, प्रजा अगदींच पिळून निघाली होती. अिराणचा बादशहा येवो किंवा सिकंदर येवो, बगदादचा महमद बिन कासिम येवो किंवा सर चार्ल्स नेपियर येवो, सिंधुकांठींचे लोक प्रत्येक खेपेस पराभूत झालेले आहेत.

सिंकदर जेव्हां जहाजांत बसून सिंधुमार्गें निघून गेला तेव्हां आपल्या रक्षणासाठीं त्यानें दोन्हीं कांठानें आपली सेना चालवली होती. आज अिंग्रजांनीं खास सिंधूच्या रक्षणासाठीं म्हणून नव्हे, तर पंजाबचा गहू विलायतेला घेअून जाण्यासाठीं दोन्ही कांठांनीं आगगाडी धावविली आहे. सिंधूचा प्रवाह अतिशय वेगवान असल्यामुळें गंगेप्रमाणें त्यांत जहाजें चालूं शकत नाहींत, म्हणूनच कराची बंदरापुढें केटी बंदराला मुळींच महत्त्व अुरलें नाहीं.

सिंधूच्या मुखाजवळील प्रदेश सिंधूच्याच पुरुषार्थानें बनलेला आहे. दूरदूर वरून गाळ आणि रेती आणून ती ओतीत गेली आहे, परिणामस्वरूप अरबी समुद्राला नेहमीं अत्यंत सूक्ष्मपणें अथवा बहादुरीनें मागें हटावें लागलें आहे.

सिंधूचा प्रवाह सिंधू नांवाला साजेसाच विस्तीर्ण आणि तरस्वी आहे. अुन्हाळयांत वितळून गेलेल्या बर्फाच्या पाण्यामुळें जेव्हां तिला पूर येतो, तेव्हां

त्या पुराला घोडा किंवा हत्तीची अुपमा शोभणें तर दूरच, पण सुचणें देखील शक्य नाहीं, तो तर जलप्रलयच म्हटला पाहिजे. सागराच्या लाटा अुसळाव्यात तशा सिंधूच्या लाटा अुसळतात. मगरमच्छांचे गुरु शोभतील असे पट्टीचे पोहणारे सुद्धां अशावेळीं पाण्यांत अुडी टाकण्याची हिंमत करणार नाहींत.

ती अेक प्रेमवेडी सती सुहिणीच, कीं जिनें कच्च्या घड्याच्या आधारावर अशा प्रवाहांत अुडी घेण्याची छाती करावी. प्रेमाचा प्रवाह, प्रेमाचा वेग आणि परिणामविषयींची प्रेमाची बेपर्वाअी ही केव्हांहि महासिंधूपेक्षां देखील महानच असणार.

सप्टेंबर १९२९

# : ३४ : मंचरची जीवनविभूति

ज्यानें पाण्याला जीवन हें नांव दिलें तो कवि होता कीं समाजशास्त्री? मला वाटतें तो दोन्ही असला पाहिजे. पाण्याशिवाय वनस्पतिहि जगूं शकणार नाहींत, आणि पशुपक्षीहि जगूं शकणार नाहींत. मग या दोहोंचा आश्रित असा जो मनुष्यप्राणी त्याचा पाण्याशिवाय निभावच कसा लागणार? अीश्वरानें पृथ्वीच्या पृष्ठभागावर तीन भाग पाणी आणि अेक भाग भूमि अुत्पन्न करून हेंच सिद्ध केलें आहे कीं—पाणी हेंच जीवन होय. बेशुद्ध झालेला मनुष्य डोळ्यांना पाण्याच्या अेका थंडगार थेंबाचा स्पर्श होतांच शुद्धीवर येतो, मग अनंत थेंबाथेंबांनीं कांठोकांठ भरलेलें सरोवर पाहून त्याला जीवनाचा ठेवा सांपडल्यागत आनंद झाला तर त्यांत आश्चर्य तें कसलें?

अनंत सागर आणि त्याच्या अनंत लाटा पहाण्यांत अेक प्रकारचा अुन्माद तर आहेच. परंतु ज्याच्या पैलतीराचें अंधुक अंधुक ओझरतें दर्शन होतें आणि त्यामुळें ज्याच्या विशाल विस्ताराचें मोजमाप मिळाल्याचा आनंद डोळ्यांना होअूं शकतो, अशा शांत सरोवराचें दर्शन मित्रदर्शनाअितकेंच आह्लादक असतें. सागराचें आमंत्रण अज्ञातांत झेंप घेण्याचें आवाहन करतें, तर सरोवर

आपल्या आरशासारख्या शांतिद्वारा माणसाला आत्मपरिचय करवून घेण्याला प्रोत्साहन देतें. सरोवरांत माणसाला जीवनाच्या प्रसन्नतेचें दर्शन घडतें, तर सागरांत जीवनाच्या प्रक्षुब्ध विराटतेचा त्याला साक्षात्कार होतो. सागराचें तांडव पाहून जो माणूस म्हणतो :

**‘ दिशो न जाने न लभे च शर्म ’**

तोच मनुष्य विशाल सरोवराच्या कांठीं पोहोंचतांच सुटकेचा निश्वास टाकून गाऊं लागायचा :

**‘ अिदानीम् अस्मि संवृत्तः सचेताः, प्रकृतिं गतः । ’**

सागर आणि सरोवर अशा प्रकारें जीवनाच्या दोन प्रधान आणि भिन्न विभूति आहेत

मला ठाअूक होतें-कधींचें ठाअूक होतें-कीं जीवन-विभूतीचें असें अेक सुभग दर्शन सिंधमधें कायमचें पसरलेलें आहे. परंतु त्याचें दर्शन घेण्याच्या सद्भाग्याचा सुदिन अजून अुगवला नव्हता. जेव्हां माझे लोकसेवक रसिक मित्र, संस्कारमग्न श्री नारायणदास मलकानी यांनीं या खेपेस मला सिंधमधें दौरा करण्याचें आमंत्रण दिलें, तेव्हां मीं तें अेका अटीवर कबूल केलें—‘ या वेळीं जर जीवन आणि मरण दोघांचाहि साक्षात्कार घडवून आणायला तयार असाल तरच मी येअीन ! ’ अशा कोड्याच्या भाषेनें मित्राला अधिक काळ बुचकळयांत ठेवणें मला बरें वाटलें नाहीं. मीं त्यांना लिहिलें कीं जेथें अेकावर अेक तीन युगें जमिनीखालीं गाडलीं गेलीं आहेत आणि जेथें मृत्यूनें आपलें सर्वांत मोठें संग्रहालय अुघडलें आहे, तें ‘ मोहन-जो-दडो ’ मला पुन्हां अेकदां पहावयाचें आहे. त्याचप्रमाणें बीहमधून, कमलकंदांतून अुगवणारीं असंख्य कमळ, त्या कमळांमधून नाचणारे लहानमोठे मासे, त्या माशांवर गुजराण करणारे नटवे पक्षी, आणि कमलकंदापासून ते पक्षांपर्यंत सर्वांना, कमलाहि पक्षपात न दाखवतां , आपल्या अुदरांत स्थान देणारीं सर्वभक्षी माणसें जेथें निश्चिंतपणें वाढत असतात, त्या जीवनराशि मंचर सरोवराचें देखील मला दर्शन

---

* खरें नांव ‘ मूवन जो दडो ’, त्याचा अर्थ होतो मेलेल्याचा अुंचवटा किंवा टेकाड.

घ्यावयाचें आहे. नारायणची तर 'भावतुं हतुं, अने वैदे कह्युं' (आदिंची साखर आवडे आणि तेचि जरी ओखदा जोडे) अशी स्थिति झाली असेल. त्यांनीं सिंधच्या सुफी तत्त्वज्ञानाला अनुसरून प्रथम लारकानाच्या रस्त्यानें 'मरणाच्या ढिगाचें' दर्शन घडवलें, आणि त्यानंतरच जीवनाच्या या विस्ताराकडे ते आम्हांला घेअून गेले.

सिंधूच्या पश्चिम किनाऱ्यावर, पंजाबचा गहू कराचीपर्यंत पोंचवणारी जी आगगाडी धांवते, तिच्या कांठीं दादू आणि कोटरी यांच्यामध्यें बूबक स्टेशन आलेलें आहे. विचारल्या सवरल्या वांचून माणसानें कसें अनुमान करावें कीं अबूबकर नांवाची दोन्ही टोकें कमी करून बूबक या नांवाची निर्मिति झाली आहे ? स्टेशनच्या पश्चिमेस चार मैल धुळीचा रस्ता पार करून, आम्ही बूबकला पोहोंचलों. तेथले लोक वाजंत्री, सनअी आणि थोडीफार दक्षणा घेअून आम्हांला सामोरे आले. सारें गांव फिरून, गल्ल्यांचें निरीक्षण करून आम्ही आमचे यजमान श्री गोधूमलजी यांच्याकडे जाअून पोंचलों. त्यांच्या पाहुणचाराचें स्वागत करून आम्ही खाअून पिअून घेतलें; दहापंधरा मिनिटें स्वप्नसृष्टीवर राज्य केलें; तेथल्या गालिच्यांचें आणि शिंपल्याच्या कामाचें कौतुक केलें आणि मंचरच्या दर्शनाला निघालों.

पुन्हां दोन मैलांचा धुळीचा रस्ता आम्हांला पार करावा लागला. त्यानंतर कुठें आला, शेतांमधून आडव्यातिडव्या गप्पा करीत जाणारा आणि धनगर-वाड्यांची भेट घेणारा, अेक कालवा. जेथून तो सुरू होत होता, तेथेंच होड्यांचा अेक घोळका चिखलांत लोळत पडला होता. त्यांतलीच अेक धष्टपुष्ट होडी निवडून आम्ही तींत स्वार झालों. (स्वार अथवा अस्वार म्हणजे 'अश्वारोही'; पण आम्ही तर नौकारोही झालों होतों.) आणि अशा रीतीनें आणखी दोन मैलांची आम्ही प्रगति केली. दोन्ही बाजूस पाण्याशीं लडिवाळ-पणा करणाऱ्या रहाटांना फिरविण्याचें पुण्य पदरीं पाडून घेणारे अुंट आम्ही पाहिले अुघड्यावरच आपलें जीवन, आपला मनोविनोद, आणि आपला अुद्योग चालवणारे शेतकरीसुद्धां आम्हीं तेथें पाहिले. आणि जमीन व पाणी यांच्यामधें येजा करणारे वणजारी पक्षी (Migratory Birds) देखील पाहिले.

आमच्या टोळींतील वीसहि जण आनंदाचे अुपासक होते. कित्येकांनीं 'चल चल रे नवजवान–रुकना तेरा काम नहीं, चलना तेरी शान' हें कूचगीत गायला सुरवात केली. यांत हसूं येण्याजोगें अितकेंच होतें कीं नौकारोही आम्ही आपल्या पायांनीं कूच करीत नव्हतों, तर लांब्या लांब्या बांबूंनीं चिखलाला ढोसून ढोसून पुढें जात होतों. आमचे पाय तर कांहीं हालचाल न करतां अजगरांची अुपासना करीत होते. पण जेव्हां सगळेच प्रसन्नचित्त असतात तेव्हां गप्पागोष्टींत आणि गायनांत औचित्याच्या व्याकरणाला फाटा देण्यांत आलेला असतो.

जेव्हां चि. रैहानाबहनना 'बेनवा फकीर' च्या मुरलीचे सूर छेडण्यास सांगण्यांत आले तेव्हांच खराखुरा रंग जमला आणि त्याच वेळीं आमच्या कालव्यानें आपलें तोंड रुंदावून आमच्या होडीला सरोवरांत ढकलून दिलें. मग काय विचारतां! जेथें पहावें तेथें जीवनाचा विस्तार! पंधरावीस मैल लांब आणि दहा मैल रुंद जीवनाचा काव्यमय विस्तार!! पाण्याचा विशाल झगमगाट आणि अधून मधून डोकावणारी हिरव्या गवताच्या बेटांची निवांतता! निसर्गाला अितकें काव्य सुचलें तरी कसें असेल? मी गोधूमलजींना म्हणालों, 'येथें तर माझें हृदय विरघळूं लागलें आहे.' ते तितक्याच रसिकतेनें मला म्हणाले, 'जर नव्हेंबरमधें तुम्ही येथें आला असतां तर येथल्या असंख्य कमळांमधें स्वतःला हरवूनच बसला असतां. जर तुम्हांला तो अुल्लास पहायचा असेल तर तुमच्या विष्णुशर्मांना वाटेल त्या वर्षी लिहून कळवा. ते मला लिहितील आणि मी तुमची सर्व व्यवस्था करून ठेवीन. आमचा प्रदेश अितका अेका बाजूला पडला आहे कीं तुमच्यासारखा अेखादा क्वचितच येथें येतो. माझ्या आठवणीप्रमाणें, या आधीं अेकच महाराष्ट्रीय प्रोफेसर येथें आले होते आणि तुमच्याप्रमाणेंच अगदीं खुश खुश झाले होते. हा, दर वर्षी कित्येक गोरे लष्करी अधिकारी येथें मासे मारण्यासाठीं किंवा शिकारीसाठीं येत असतात खरे; पण त्यांचा आम्हांला काय अुपयोग?'

दुरून अेक होडी दिसली. गांवांतलें अेखादें कुटुंब स्थलांतर करीत असेल. त्यांच्या नारिंगी ओढण्यांचे आणि निळ्या सलवारीचे प्रतिबिंब पाण्यांत किती खुलून दिसत होतें–जणूं काय ग्रामीण काव्यच खुशींत येअून जलविहार करीत

आहे! दूरवर अेक काळी पाणकोंबडी पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगत तरंगत अुदर-पूजन करीत होती. आमच्यापैकीं कांहीं जणांना होडीच्या कठड्यावर बसून पाण्यांत पाय भिजवण्याची लहर आली. त्यांनीं रिपोर्ट दिला कीं कांहीं कांहीं ठिकाणीं पाणी अगदीं थंडगार आहे, तर कांहीं ठिकाणीं कांहींसें कोमट आहे. याचें कारण लोक माझ्याशिवाय कुणाला विचारणार? अशा लहरी टोळयांत मीच नेहमीं सर्वज्ञ असतों. मीं लगेच कारण शोधून काढलें आणि सर्वांना शास्त्रीय अुपपत्तीचें समाधान दिलें.

'त्या समोर टेकड्या दिसताहेत, त्यांचें नांव काय?' मीं आसपासच्या लोकांना विचारलें. माझ्या प्रश्नाचें त्यांना आश्चर्य वाटलें. स्वदेशी टेकड्यांचीं सुद्धां नांवें असूं शकतात हें जणूं त्यांच्या गांवींच नव्हतें; अुलट प्रत्येक रूपाशीं नांव जोडलें गेल्यावांचून माझा दार्शनिक आत्मा संतुष्ट व्हायचा नाहीं. टोळींत बूबकचा अेक छोटासा, नाजुक व लाजाळू मुलगा अेका कोपऱ्यांत बसला होता. 'अीस्सरदास' म्हणून हांक मारून मीं त्याला बोलावलें. शाळेंत शिकावा लागणारा भूगोल त्याच्या कामीं पडला. त्यानें लगेच सांगितलें, 'समोरच्या टेकड्यांना खिरथर म्हणतात.' मला हसूं कोसळलें आणि माझ्या मुखांतून अुद्गार बाहेर पडले, 'धन्य आहे करतार!' आमच्या लहानपणीं हाला आणि सुलेमान पर्वतांचीं नांवें आम्ही घोकत असूं. पुढें हाला पर्वतानें करतार हें नांव धारण केलें होतें. आणि याचें कारण अितकेंच कीं अिंग्रजांनीं खिरथरचें स्पेलींग केलें होतें Kirthar. परदेशी लिपीमुळें आपल्याकडे अनेक अनर्थ झाले आहेत, त्यांतलाच तो अेक होता. खिरथरच्या टेकड्या या कांठाहून दहाबारा मैल दूर आहेत. तेथें सिंध पुरा होअून बलुचिस्तान सुरू होतो.

आतां सूर्य थकून खिरथरचा आश्रय घेण्याच्या विचारांत होता. आम्हीहि विचार केला कीं आतां परत फिरून घरीं पोंचले पाहिजे आणि सात वाजण्यापूर्वी जठराग्नीला आहुति दिली पाहिजे. होडीची दिशा बदलली आणि आम्ही पूर्वेकडील शोभा पाहूं लागलों. 'अितक्या अुशिरां ती ऽऽऽ समोर दिसते आहे ती होडी पश्चिमेकडे कुठें चालली आहे?' मीं गोधूमलभाअींना विचारलें. त्यांनीं

सांगितलें, 'पैलतीरीं, खिरथरच्या बाजूला अेक गांव आहे, तेथें महाशिवरात्रीचा अेक मेळा भरत असतो. या दिवशीं हिंदू महाशिवरात्रीसाठीं गोळा होतात आणि मुसलमान त्याच ठिकाणीं आणि त्याच दिवशीं त्यांच्या कुठल्यातरी पिराच्या नांवानें गोळा होतात. फार मोठा मेळा भरत असतो. त्या मेळयासाठींच हे लोक जात असले पाहिजेत.' आम्ही गेलों होतो तो २१ फेब्रुवारीचा दिवस होता आणि महाशिवरात्र तर अगदीं जवळ म्हणजे २४ तारखेला होती. आमचा कार्यक्रम बदलणें तर शक्यच नव्हतें. 'जर आज २४ तारीख असती तर मी लवकर निघून समोरच्या कांठावर गेल्याशिवाय राहिलों नसतों. मी महाशिवरात्रीचा अुपास करतों त्या दिवशीं हिंदू आणि मुसलमान दोघेहि अेकहृदय होअून अेकाच अीश्वराची भक्ति करण्यासाठीं हजारोंच्या संख्येनें गोळा होतात, हें दृश्य पाहून माझ्या हृदयाला पावन करण्याची संधि मीं कधींच घालवली नसती. शिवरात्रीच्या दिवशीं ज्या वृत्तीनें हिंदू आणि मुसलमान प्रेमानें अेकत्र गोळा होतात तीच वृत्ति जर हिंदुस्थानांत सर्वत्र पसरेल तर तो दिवस भारतासाठीं सुदिन आणि शिवदिन म्हणावा लागेल.'

अितकें बोलून मी शांत झालों. आतां गप्पागोष्टींवरून मन अुडालें. कुणाशींच बोलावेसें वाटेना. मी दूर दूर पाहूं लागलों. पृथ्वीवर किंवा आकाशांत नव्हे, तर काळाच्या अुदरांत. कोलंबसानें श्रद्धापूर्वक अमेरिकेचा रस्ता शोधावा, त्याप्रमाणें शिवरात्रीचा शिवदिन केव्हां अुगवेल तें मी श्रद्धेच्या नजरेनें शोधूं लागलों.

'तीं समोर हिरवीं हिरवीं शेतें दिसतात ना, त्यांच्या मागें तंबाखू आणि भांग यांची शेती आहे.' बूचकच्या अेका साथीदारानें माझ्या ध्यानाचा भंग केला. आम्ही सरोवरांतून काल्व्यामधें प्रवेश केला होता. काल्व्याच्या कांठीं, खांबांच्या कमानीवर पाय बांधून ठेवलेले बगळे माशांचें ध्यान करीत होते. दुरून अेक [illegible]ीचा धूर निघूं लागला होता. डोळे बूचकच्या अुंच अुंच चौरस त्यांच्या नारिंगी ओढण्या[illegible]लागले. त्या घरांचे कित्येक मंधे* बगळ्यांप्रमाणें मान

*[illegible] होतें—जणूं काय ग्रा[illegible]च्या बाजूस ठेवलेलें चौकोनी हवादान.

अुंचावून वायुसेवनाच्या पविऱ्यांत अुभे होते. आम्ही तंबाखूचीं आणि भांगेचीं शेतें मागें टाकलीं, भांगेविषयींच्या सरकारी नीतीचा अितिहास अैकला, घरीं जाअून वेळेवर जेवायलाहि बसलों. पण माझें मन आपलें मंचरच्या 'ढंढ' (बांध) वर महाशिवरात्र साजरी करीत होतें.

मार्च १९४१

# : ३५ : लाटांचा तांडवयोग

[कराचीजवळ कीआमारीहून थोडें दूर मनोरा नांवाचें अेक बेट आहे. तेथें अेक मजेदार देअूळ आहे. बेटावर बहुतांशीं पोर्टट्रस्टचे लोक आणि थोडेंसें लष्कर रहातें. मनोरा बेट कराचीचें लेणें आणि समुद्राचें खेळणें आहे. त्या बेटाच्या दक्षिणेकडील अंगास अेक मोठी दरड आहे; तिच्यावर समुद्राच्या लाटा आदळत असतात. आणि तेथून पुढें चांगलें दूरपर्यन्त अेक मोठी भिंत बांधून लाटांना अडविलें आहे. म्हणून तेथें लाटांचा अखंड सत्याग्रह पहावयास मिळतो. हें दृश्य पहाण्यासाठीं मी अनेकदां तेथें गेलों होतों.

हिंदी साहित्य संमेलनासाठीं या वर्षीं कराचीला गेलों असतां फिरून तें दृश्य बघून आलों. लाटांचा परिणाम त्या दगडांवर जरी घडला नाहीं, तरी हृदयावर तो घडल्यावांचून कसा राहील ? हृदय आणि समुद्र दोन्ही स्वभावतःच अूर्मिल असतात.]

कोणतेंहि नैसर्गिक दृश्य पहिल्या प्रथम पाहून मनावर जो परिणाम होतो, तो दुसऱ्यांदा पहातांना होत नाहीं. पहिल्या वेळीं सगळें नवें नवें असतें. अज्ञात जगाचा परिचय करून घ्यावयाचा असतो. पावलोपावलीं आश्चर्य आणि चमत्कृति प्रत्ययाला येत असतात. दुसऱ्या वेळीं त्याच ठिकाणीं जातांना तेथें कशा कशाची अपेक्षा ठेवावी याची माणसाला कल्पना असते. त्यामुळें तितक्या प्रमाणांत चमत्कृतीला कमी वाव असतो. परिचित वस्तूबद्दल प्रेम अुत्पन्न होअू शकेल, पण आश्चर्य आणि चमत्कृति अपरिचित वस्तूंच्याच वांट्याला येत असतात.

अशाच कांहींश्या प्रेमपूर्ण, पण औत्सुक्य-रहित वृत्तीनें मी कराचीजवळील मनोऱ्याच्या लाटा पहाण्यासाठीं या वेळीं गेलों होतों. जुन्या, पण तरुण मित्रांशीं या रम्य ठिकाणीं विस्रब्ध वार्तालाप होअू शकेल ही आशा तर होतीच. लाटा तर तेथें आहेतच. त्यांना पाहून आनंद होणारच आहे; त्याहून विशेष कांहीं नाहीं अशी मनाची समजूत करून घेअून मी तेथें गेलों.

गेल्या खेपेस अुसळणाऱ्या लाटांचें धवल हास्य पकडून ठेवण्यासाठीं तऱ्हे-तऱ्हेचे फोटो घेतले होते. पण त्यांतील अेकहि चांगला आला नव्हता. म्हणून त्या लाटांविषयीं मनांत थोडीशी चीड होतीच. तरीसुद्धां वार्तालापासाठीं अनुकूल वातावरण तेथें सांपडणारच आहे असा विश्वास होता.

पण तेथें जाअून पहातों तों काय ? गेल्या खेपेस जें दृश्य पाहिलें होतें आणि त्याचीं जीं काव्यमय चित्रें मीं मनांत सांठवून ठेवलीं होतीं, त्यांना फिक्कें पाडून पुसून टाकणारें लाटांचें अेक अखंड तांडवच अेकाअेकीं नजरेस पडलें. आतां कसल्या गप्पागोष्टी नि कसला विस्रब्ध वार्तालाप ! मला तर तेथें अुन्मत्त करणारी जणूं काय नशाच सांपडली. त्या ठिकाणीं मी अेकटा असतों तर त्या लाटांमधें शरीर झोंकून देअून त्यांच्याशीं अेकरूप होअून जाण्याची आंतरिक अूर्मि मी दाबून टाकूं शकलों असतों कीं नाहीं तें आतां खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं.

अेकजण गाअूं लागला कीं, दुसऱ्याला गाण्याची स्फूर्ति होतेच. अेका कोल्ह्यानें रात्रीच्या शांततेविरुद्ध बंड पुकारलें कीं सगळेच क्रांतिकारी कोल्हे आपल्या फुफ्फुसांच्या कसरतीची भर त्यांत टाकणारच; अितकेंच काय, अहो ! तरफेच्या सतारीच्या तारा आपले प्राण ओतून छेडून बघा; लगेच खालच्या तारा आपण होअून आनंदझंकार करूं लागतात. तर मग माझ्यासारख्या निसर्गवेड्या मनुष्याला निसर्गाच्या भव्यतेच्या दर्शनानें निसर्गाशीं असलेल्या आपल्या वेगळेपणाचा विसर पडला, तर मानवी शहाणपणाच्या दृष्टीनें त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं असूं शकेल, पण ती कांहीं जगावेगळी गोष्ट नव्हे.

ज्याप्रमाणें हत्तीची सारी शोभा त्याच्या गंडस्थळांत अेकवटलेली असते, किल्ल्याची शोभा त्याच्या गजेन्द्रभव्य बुरुजांत असते, जहाजाची शोभा त्याच्या

वरच्या तूतकांत, डेकमधें परिपूर्णता पावत असते, त्याच प्रमाणें मनोऱ्याच्या या अंगास ज्या किल्ल्यासारख्या भिंती आहेत त्यांच्यामुळेंच या बेटाला येथें विशेष शोभा आली आहे आणि समुद्राच्या लाटासुद्धां याच ठिकाणीं वप्रक्रीडा चालवून आपला कंडु शमवीत असतात. हा कंडु-विनोद सतत चालू राहिला तरीसुद्धां त्याचा कंटाळा येत नाहीं, अितकें हें दृश्य चिरमनोहारी आहे. पण या स्थळीं माणसानें अेक लांबलचक भिंत बांधून समुद्राच्या लाटांना चांगलेंच चिडवलें आहे आणि अितकीं वर्षें झालीं तरी या लाटा आपला अशा प्रकारचा हा पाणअुतारा अजून विसरूं शकल्या नाहींत. जेव्हां जेव्हां या पाणअुताऱ्याचें, अपमानाचें स्मरण त्यांना होतें तेव्हां तेव्हां फार मोठी सेना घेअून त्या भिंतीवर चालून येतात आणि खडकांना आव्हान देण्यासाठीं अेकमेकींचा पाठपुरावा करीत असतात. काय तो त्यांचा अुन्माद! काय ती त्यांची दृढ प्रतिज्ञा! काय तें जिवावर अुदार होअून तुटून पडणें! आज तर त्यांच्या अमर्षाला पूर्ण भरती आली होती. मग काय विचारतां! जणूं काय वीरभद्र आपल्या सगळया शिवगणांना गोळा करून लाटांच्या रूपानें प्रलयकाळाचें नाटक करूं पहात आहे!

अेक अेक लाट म्हणजे अेक अुसळणारी टेकडीच. अेकीची अुत्तुंग शोभा पाहून दुसऱ्या लाटेनें तिचें कौतुकच करायला हवें. पण तसें करण्याअैवजीं दोघीजणी अेक होअून नवीच अुंची गांठतात आणि आसपासच्या लाटांना देखील आपल्या अितकीच अुंची गांठण्याला अुत्तेजन देत रहातात. आणि हें नृत्य अेक क्षणहि न थांबतां अखंड चालूंच असतें. नीट टक लावून या तांडवाकडे पहात राहिलें तर त्यांत अेक प्रचंड ताल आढळून येतो. जणूं काय शिवतांडव-स्तोत्राचें प्रमाणिकावृत्त आपली शक्ति अजमावण्यास सुरुवात करतें आणि हृदय भरून येअून ओघ वाढल्यामुळें पहातां पहातां प्रमाणिकेचें रूपांतर पंचचामरांत होतें. आणि मग आपला तोरा विसरून जाअून त्या तालाबरोबर पुष्पदंत देखील तांडवनृत्य करूं लागतो.

ज्या बाजूनें लाटांचा मारा सर्वांत अधिक आहे आणि जेथें आपटणाऱ्या लाटांचा चक्काचूर होअून त्यांचा आकाशांत अिंद्रधनुष्य धारण करणारा पंखा तयार होत असतो तेथेंच कित्येक पायऱ्या अखंड स्नान करणाऱ्या ऋषींप्रमाणें

ध्यान करीत बसल्या आहेत. लाटांचें पाणी त्यांच्या शिरावर पडून हसत हसत आणि गौमूत्रिक--बंध करीत पायऱ्या अुतरत जातें. दिल्ली–आग्र्यांत काश्मीर-मध्यें किंवा म्हैसूरच्या वृंदावनांत माणसानें विलासाचीं जीं साधनें शोधून काढलीं आहेत आणि पाण्याचा प्रवाह श्रावण–भाद्रपदी धबधब्यांप्रमाणें वाहत सोडला आहे त्याचें येथें स्मरण झाल्यावांचून रहात नाहीं.

पण कित्येक लाटा आपल्या, त्या लांबलचक भिंतीवर आदळून तिच्या माथ्यावर पाण्याचे लांब सर फेंकण्यांतच मश्गूल झाल्या आहेत. लाट आपटावी, तिनें भिंतीवर स्वार व्हावें आणि भिंतीच्या रुंदीचा अनादर करून पलीकडे अुडी टाकावी, अन् मग या होळीच्या पिचकाऱ्या दुरून आपल्याकडे धांवत याव्यात हें दृश्य सर्व प्रकारें अुन्मादक असतें. आणि असा महोत्सव साजरा करण्यासाठीं आलेल्या आपलें स्वागत करण्याची जबाबदारी जणूं काय स्वतःच्या शिरावर येअून पडली असावी त्याप्रमाणें या सरांतून आणि त्या पाण्याच्या पंख्यातून पसरणारें पाण्याचें तुषारजाल सारी हवा थंड करून टाकतें. हें खारट दंव डोळयांच्या पापण्यावर, नाकाच्या शेंड्यावर आणि आश्चर्यानें विलग झालेल्या ओठांवर जेव्हां जमूं लागतें तेव्हां आपल्याला वाटूं लागतें कीं आपण सुद्धां शहरवासी किंवा ग्रामवासी नसून वरुणाच्या सामुद्रिक राज्याची प्रजा आहोंत.

आणि महासागरावरून धांवत येणारा शुद्ध वारा सांगतो—'या दृश्याचा पाहुणचार स्वीकारण्यापुरती शक्ति तुमच्या पामर हृदयांत कोठून असणार! या, मी तुम्हांला दूरदूरवरून आणलेल्या ओझोनची ( प्राणवायूची ) दीक्षा देतो, शिदोरी देतों. हा ओझोन जेव्हां तुमच्या हृदयांत भरेल तेव्हां तुमचीं फुफ्फुसें प्राणपूर्ण होतील, पवित्र होतील, आणि मगच येथलें वातावरण आणि अुदावरण तुम्हांला मानवूं शकेल.' आणि खरोखरच प्रत्येकाच्या चेहऱ्यावर प्राणवायूच्या श्वासोच्छ्वासानें अुषेची लाली आली होती. आम्ही आठ जण आठहि बाजूंस पुनः पुनः पाहूनहि तृप्त होत नव्हतों.

याच ठिकाणीं आमच्या आधीं अेक सिंधी मनुष्य अेका मोठ्या खडकावर बसून गुपचुप त्या साऱ्या देखाव्याच्या काव्यांत नखशिखान्त नहात होता. बोलत नव्हता, चालत नव्हता, हसत नव्हता, गात नव्हता. तल्लीन होअून

कांहींसा डोलत मात्र होता. आम्ही गोष्टी करीत होतों, हृदयींच्या अुद्गारांना वाचा फोडीत होतों पण त्याचें त्या गृहस्थाला काय होय ! त्याला माणसांच्या मौजेचा आस्वाद घ्यावयाचा नव्हता, तर लाटांची मस्ती आपलीशी करायची होती, पिअून टाकायची होती अेका पायावर दुसरा पाय घेअून मांडी मोडून त्यावर हाताचें कोपर टेकवून कलत्या मानेनें स्वारी समुद्राचें ध्यान करीत होती. त्याच्या विंचरलेल्या केसांच्या भांगांत सीकरबिन्दूंची मुक्तामाला चमकत होती. जणूं काय वरुणदेवानें आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवला होता !

आम्ही पुन्हां पुन्हां जागा बदलून अनेक दृष्टिकोनांतून तें दृश्य पाहिलें, त्यामुळें लाटांच्या मनांत आमच्याविषयीं सद्भाव अुत्पन्न झाला. त्या म्हणूं लागल्या, " या, या, अितक्या दुरून काय न्याहाळत आहांत ? तुम्ही कुणी परके थोडेच आहांत ? जवळ या, मौज करा, लाटांचा आनंद लुटा, हंसा, नाचा. हा क्षण आणि अनन्त काळ यांच्यांत कसलाच फरक नाहीं. चला या " लाटांची रीतभात वेगळी असते. आमंत्रण देतांना हात पकडण्याअैवजीं त्या पाय भिजवतात. आम्ही विनयपूर्वक त्या स्वागताचा स्वीकार करून म्हटलें, 'खरोखरच येण्याची अिच्छा होत आहे; पण आज नाहीं. अजूनहि आमचें कार्य पुरें झालेलें नाहीं. पुष्कळ बाकी आहे. कितीतरी संकल्प अजून पुरे करायचे आहेत. ज्या भारतमातेच्या चरणांचें प्रक्षालन तुम्ही अखंड करीत असतां, ती भारतमाता अजून स्वतंत्र झालेली नाहीं. माणसामाणसामधला विग्रह अजून शमलेला नाहीं. गरीब आणि दबून गेलेल्या जनतेशीं जोंवर परिपूर्ण अेकता साधली नाहीं तोंवर तुमच्याशीं अेकरूप होअून जाण्याचा आनंद लुटण्याचा अधिकार आम्हांला कोठून प्राप्त होणार ? तुम्ही मुक्त आहांत, अखंड कर्मयोगी आहांत. सतत कार्यरत असूनहि कर्तव्य असें तुम्हांला कसलेंच अुरलेलें नाहीं. आम्ही तर कर्तव्याचा ढीग नजरेसमोर दिसत असूनहि आळसांत लोळत पडलों आहोंत. आम्हांला तुमच्या पंक्तींत येअून नाचायचा अधिकार नाहीं. तुम्ही आम्हांला प्रेरणा द्या, तुमची मस्ती आमच्या हृदयांत भरा, तुमचा वेदान्त आमच्या चित्तांत पेरा. मग आम्हांला आमचें कार्य पूर्ण करायला, भारताला स्वतंत्र करायला वेळ लागणार नाहीं. आणि तो अेक संकल्प पुरा झाला कीं कसलाहि विषाद न बाळगतां आम्ही तुमच्याकडे धावत येअूं. तुमच्याशीं अद्वैत साधूं. आणि तसे करायला हीं हाडें, चामडी क

आंस यांनीं कांकूं केली तर अडचण करणारे कपडे जसे फाडून फेंकून दिले जातात त्याप्रमाणें या शरीराचा चक्काचूर करून टाकूं अन् मग त्या लगाद्याला नवे नवे आकार धारण करतांना पाहून हसूं लागूं."

"ठीक आहे, तुम्हांला जमेल तेव्हां या. तुम्ही या किंवा येअूं नका, आमचें हें तांडवनृत्य चालूंच रहाणार. जीवनाचा रास पुरा करून गोपी यांत येअून मिसळल्या आहेत. संसाराच्या फेऱ्यांतून मुक्त झालेले सगळे साधुसंत, फकीर आणि अवलिये यांत मिसळले आहेत. विज्ञानवीर आणि सत्याचे अुपासक यांत मिसळून शांत झाले आहेत. आणि त्यामुळेंच आमचा हा संघ अखंड अशांति माजवून देखील शांतीचें सागर-संगीत अैकवूं शकतो."

"अैकूं येत आहे का तें संगीत?"

जून १९४७

# : ३६ : सिंधूनंतर गंगा

फेब्रुवारीच्या १५ आणि १६ तारखेस अगदीं पश्चिमेस रोहरी व सक्कर यांच्यामधील सिंधूच्या विशाल पात्रांत जलविहार केल्यानंतर, आणि २८ तारखेस त्याच सिंधूचें कोटरीजवळ अखेरचें दर्शन घेतल्यानंतर, बारापंधरा दिवसांच्या आंतच पूर्वेकडे पाटलिपुत्राजवळील गंगेचा पावन प्रवाह पहायला मिळाला हें केवढें मोठें सौभाग्य! आर्यांची वैदिक माता सिंधु आणि त्याच भारतियांची सनातन माता गंगा यांचें असें लागोपाठ दर्शन व्हावें, या सद्भाग्याचें कोणता नदीपुत्र हर्षभरित स्वागत करणार नाहीं? गंगेला ज्याप्रमाणें तिच्या पाण्याचा अुपयोग करून घेणारा भगीरथ भेटला, तसा सिंधूलाहि भेटला असता, तर राजस्थान आणि सिंध यांचा अितिहास वेगळ्याच प्रकारें लिहावा लागला असता. सिंधू जर सांगल्यावांचून देखील अनेक दिशांनीं वहाते आणि आपलें पात्र बदलायला अनमान करीत नाहीं, तर मग भगीरथ आणि जह्नुसारखे अुपासक अिंजीनियर तिला लाभले असते, तर त्यांनीं

सिंधु आणि सौवीर देशांसाठीं काय करायचें बाकी ठेवलें असतें ? स्वच्छंद-विहारिणी अशी ती सिंधु आज रोहरी व सक्कर यांच्यामधें आपलें पाणी अेकत्र करून, कालव्यांच्या सात प्रवाहांत आपलें स्तन्य सिंधुदेशाला पाजूं लागलीच आहे कीं !

सिंधु नदी पंजाबमधील सात प्रवाहांचें पाणी अेकत्र करून काश्मीर आणि मिटनकोटपर्यंत युक्तवेणी असते, तीच सिंधु सक्कर रोहरी नंतर पहिल्या प्रथम मुक्तवेणी बनते आणि कोटरीनंतर कोटी बंदरपर्यंत तर कोण जाणें किती मुखांनीं सिंधु नदी समुद्राला मिळते ! *

गंगा नदी गोआलंदोपर्यंत युक्तवेणी आहे. गोआलोंदाला गंगा आणि ब्रह्म-पुत्रा अेकत्र झाल्यानंतर त्यांच्या अमर्याद प्रवाहांचें असें कांहीं अराजक माजतें कीं, मुक्त आणि युक्त वेणीचा भेदहि करणें शक्य होत नाहीं. कलकत्त्यानंतर सुंदरवनाचा पंखा पहायला सांपडतो खरा. पण गंगेचा विस्तार तितकाच आहे असें सांगता येत नाहीं.

आम्ही गांधी सेवा संघाच्या अखेरच्या बैठकीसाठीं मालीकांदाला गेलों होतों. त्यावेळीं परत येतांना आसाम प्रांतांतून शिलाँगच्या रस्त्यानें सुषमाच्या खोऱ्यांमधून आलों होतों. जातां येतां भगवती गंगेचीं विविध प्रकारचीं दर्शनें घडलीं होतीं पण सम्राट अशोकाच्या पाटलिपुत्रा ( सध्याचें पाटणा ) कडील गंगेची शोभा कांहीं औरच आहे. पाटण्याजवळ भिन्नभिन्न वेळीं, नाहीं म्हटलें तरी तीनचार वेळां मीं गंगा ओलांडली असेल. तरी देखील येथलें गंगेच्या दर्शनाचें नाविन्य कमी होतच नाहीं. मला वाटतें कीं मुजफ्फर-

---

* अनेक प्रवाह अेका नदीला येऊन मिळतात तेव्हां त्या साऱ्या प्रदेशाला अिंग्रजींत region of tributories म्हणतात. आणि अेका नदींतून अनेक प्रवाह निघून जेव्हां चारहि बाजूस पसरतात तेव्हां त्या प्रदेशाला region of distributories म्हणतात. आपल्याकडे तोच भाव व्यक्त करण्यासाठीं 'युक्तवेणी' आणि 'मुक्तवेणी' हे शब्द वापरले आहेत.

जेव्हां नदी समुद्राला भेटण्यासाठीं दोन किंवा अनेक मुखांत विभक्त होते तेव्हां मधल्या त्रिकोणी भागाला त्याच आकाराच्या ग्रीक अक्षरावरून delta डेल्टा म्हणतात. आपण अशा प्रदेशाला 'नदीचा पंखा' म्हटलें पाहिजे.

पुरहून नेपाळची यात्रा पुरी करून मी कलकत्त्याला गेलों होतों त्यावेळीं मी सर्वप्रथम पाटण्याला आलों होतों. फाल्गुन महिन्यांतले दिवस होते. जेथें जावें तेथें आंब्याच्या मोहरानें हवा घमघमत होती. आणि तेथें अगदीं अपरिचित, नवखा असा मी लहानमोठ्या रस्त्यांवरून झिंगलेल्या माणसा-प्रमाणें अंतःकरणांत वसंतोत्सव साजरा करीत हिंडत होतों. त्यावेळीं पहिली-वहिली जी छाप मनावर पडली ती अजून कायम आहे. आणि तरी देखील जेव्हां जेव्हां म्हणून मी पाटण्याला गेलों तेव्हां तेव्हां कांहीं ना कांहीं नावीन्य मला तेथें आढळलेंच आहे.

श्री राजेन्द्रबाबू जेथें रहातात आणि जेथें बिहार विद्यापीठ चालतें, तो सदाकत आश्रम थेट गंगेच्या किनाऱ्यावरच आहे. आश्रमाच्या पुढील रस्ता ओलांडला आणि तीन फुटाचा बांध चढून गेलों कीं गंगेचा विस्तीर्ण जलसंचय पश्चिमेकडून येऊन पूर्वेकड वहातांना दृष्टीस पडलाच म्हणून समजा- पैलतीर कोठें आहे म्हणून नजर फेंकावी तर जमिनीच्या अेका विरळ रेषेशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं. चकित होऊन तुम्ही सोबतच्या माणसापुढें म्हणाल कीं, ‘गंगेचें पात्र किती विशाल आहे!’ तर तो लगेच हसून म्हणेल, ‘हें जें समोर दिसतें आहे तें तर अेक बेटच आहे, त्याच्या पलीकडे आणखी गंगा आहेच. पैलतीर येथून दिसत नाहीं.’

समोर जी बारीकशी रेषा दिसत आहे तें अेक बेट आहे हें कळून देखील कांहीं केल्या विश्वास बसत नाहीं कीं या रेषेच्या पलीकडे दुसरा अेक पाण्याचा विस्तार असूं शकेल. शंका अेकदां मनांत आली कीं तिचें रूपांतर कुतूहलांत व्हावयाचेंच. कुतूहल परिपक्व होऊन त्यांतून संकल्प जागा व्हायचा. आणि संकल्पासारखी अस्वस्थ करून सोडणारी दुसरी कोणती गोष्ट आहे?

सदाकत आश्रमांत होतों तोंपर्यन्त गंगेच्या किनाऱ्यावर फिरायला जाणें हें आमचें नित्याचें काम होऊन बसलें होतें. कारण गंगेची संस्कृतिपुनीत मोहिनी जरी नसती तरीसुद्धां कांठावर अुभ्या राहिलेल्या पुराणपुरुषासारख्या वृक्षांची रांग आम्हांला खेंचून घेऊन गेल्यावांचून राहिली नसती. सह्याद्रि आणि हिमालय पर्वतावरील अुत्तुंग वृक्ष ज्यानें पाहिले आहेत, त्याला भुरळ पाडण्याची शक्ति सामान्य वृक्षांत कोठून असणार? पण गंगेच्या कांठीं, पाटण्याच्या

आसपास, कित्येक योजनें गेलें –तरी सगळीकडे अुंच अुंच वृक्ष आपल्या पुष्ट शाखा चारहि बाजूस वर आ खालीं दूर दूरपर्यंत पसरवतांना आढळतात. पाटणा अेके काळीं अशोकाच्या र ज्याची राजधानी होतें खरें, पण आज तेंच पाटणा वृक्षांचें अेक विशाल ज्य पोशीत असतें.

फार दूर नाहीं कीं फार जव नाहीं अशा अंतरावरून या मोठ्या वृक्षांच्या अंगप्रत्यंगांची शोभा नि ज्ञीत अुभें राहिलें कीं त्यांचा स्वभाव, त्यांची चित्तवृत्ति आणि त्यांचा घरंदाजपणा ध्यानांत आल्यावांचून रहात नाहीं. सगळेच वृक्ष तपस्वी नसतात. कित्येक मौनी ध्यानी असावेसे दिसतात, तर कित्येक अगदीं खेळकर असतात. कित्येक वियोगी विरही जन, तर कित्येक अत्युत्कट प्रेमीजन असतात. पण कोणत्याहि स्थितींत ते आपल्या आर्यत्वापासून ढळत नाहीं. कित्येक वृक्षांच्या शाखा अितक्या अुंच पसरलेल्या असतात कीं कोसळून पडणारें आकाश सावरण्याचें काम यांच्या शिरावर आलें आहे कीं काय असें वाटतें.

चार म्हातारे निवांतपणें गंभीर गोष्टी करीत बसले आहेत आणि बालीश बोबडे बोल बोलत मुलें त्यांच्या अंगाखांद्यावर नाचानाच करीत आहेत, असें दृश्य तुम्ही पाहिलें आहे का? म्हातारे मुलांना रागे भरत नाहींत. हळुवारपणें कुरवाळतात. पण तरीदेखील त्यांच्या गंभीर गोष्टींमध्यें मुळींच खळ पडत नाहीं. गंगेच्या कांठीं सनातन विचार-मसलत करणाऱ्या या झाडांमधून जेव्हां लहानमोठे पक्षी आपला मधुर किलबिलाट सुरूं करतात, तेव्हां अगदीं तेंच वृद्ध-अर्भक-दृश्य नव्या तऱ्हेनें रंगभूमीवर आल्यासारखें वाटतें.

फाल्गुन पौर्णिमेच्या आसपासचे दिवस. संध्याकाळीं फिरायला बाहेर पडलें, कीं चांदोमामा झाडाआडून दर्शन द्यायचेच. येथें आम्हांला अेका नव्या आनंदाचा शोध लागला. हिरा ज्याप्रमाणे वेगवेगळ्या आकाराच्या अंगठ्यांत बसवल्यानंतर नवीन नवीन शोभा प्रगट करतो, त्याचप्रमाणें चंद्रसुद्धां वेगळ्या वेगळ्या झाडांमधून पाहूं जातां नवी नवी छब धारण करतो. अेकदां शिंगासारख्या दोन फांद्यांमधें अुभा करून त्याला पाहिलें. दुसऱ्या खेपेस गोल-कीपर (goal keeper) लक्ष्यपालासारख्या अेका अुंच झाडाला त्याच चंद्राला चेंडू (फूटबॉल) प्रमाणें वर अुडवतांना

पाहिलें. दीघाघाट चंद्रापाशीं अेका ठिकाणीं तर दोन झाडांमध्यें चंद्र असा कांहीं बसवला गेला होता कीं, ‘ तुझा नाहीं, हा चंद्र माझा आहे ’ असें म्हणून तीं झाडें आपापसांत भांडत असावींत, असाच भास होत होता. आणि शेवटीं त्या दोघांचें भांडण मिटवण्यासाठीं गंभीर चेहरा करून चंद्रानें सांगितलें, ‘ तुम्हां दोघांपैकीं अेकाचाहि मी नाहीं, जा. ’ असें म्हणून न थांबतां चंद्र अुंचच अुंच चढूं लागला. चंद्राच्या या तटस्थतेची वाहवा करीत आम्ही थोडें पुढे गेलों. तिकडे पहावें तर आपलें न्यायाधीशपण विसरून जाअून तो अेका झाडाला बिलगलाच! आणि शेवटीं कवेंत सांपडल्यामुळें हसूं लागला.

अशा चांदण्याच्या दिवसांत, ‘ थोडा वेळ समोरच्या निर्जन बेटांत घालवला तर कसें ’ असा संकल्प मनांत अुठला. होळी आणि धुळवडीचे दिवस जाअूं द्यावे लागले. कारण लोक होळी पिअून मत्त झालेले होते आणि कांठावरच्या चिखलाचें आणि झाडांवरच्या रंगाचे दोन दिवस अनुकरण करण्याचें त्यांनीं ठरवलें होतें. त्यांतून ते मोकळे झाल्यानंतर अेका होडीची व्यवस्था करून आम्ही निघालों.

निघतांना, चंद्र नुकता अुगवूं लागला असावा अितका अुशीर केल्यावांचून मौज कशी येणार? पण चंद्राला आज घाअीच नव्हती. अुगवला तरी झळकला नाहीं. कसल्याहि गाजावाज्या वांचून अेखादा धर्म स्थापन व्हावा त्याप्रमाणें चंद्र अुगवला. अितका मंद कीं स्वातीला सुद्धां त्याची दया येत होती. जिथें चंद्रच अितका मंद, तेथें स्वामीभक्त चित्रा अदृश्यच रहावी यांत नवल तें काय? शनि आणि गुरु मंत्र बोलत बोलत पश्चिमेस मावळत होते. तारकांकित झोंपडीचा स्वामी अगस्ति दक्षिणेवर आरोहण करीत होता. आमची होडी निघाली. पाण्यांत चंद्राचा अेक लांब प्रकाशस्तंभ दिसूं लागला. आधीं स्थिर, मग तरल. जसजसे आम्ही पुढें जाअूं लागलों तसतसा पाण्याचा पृष्ठभाग अधिकाधिक चंचल होअूं लागला. आणि नवेंनवें नक्षीकाम दाखवूं लागला.

माझ्या मनांत विचार आला–‘ पाण्याचा जथा आणि वेग जसा बदलत जातो त्याप्रमाणें हें नक्षीकाम बदलतें. मग या नक्षीकामाचें अध्ययन

करून, प्रत्येक नक्षीला वेगवेगळें नांव देऊन, अशी एक व्यवस्था कां बसवूं नये कीं नदीचा विशिष्ट वेग दर्शवण्यासाठीं त्या त्या नक्षीचें नांवच सांगतां यावें ? जर खालच्या वरच्या स्वरांना आपण सा, रे, ग, म, प, ध, नी अशीं नांवें देऊं शकतो; अत्यंत अुग्र तप्ततेला (white heat) सूर्यकांति अुष्णता म्हणून ओळखतों; तर मग नदीच्या वेगाला गौमूत्रिकावेग, वलयवेग, आवर्तवेग, विवर्तवेग, अित्यादि नांवें कां देऊं नयेत ?"

या कल्पनेच्या भरांत मी देखील विचारांच्या भोंवऱ्यांत सांपडलों, आणि चित्रा केव्हां दिसूं लागली तें कळलेंच नाहीं. आम्ही प्रवाहाच्या मध्यभागीं पोंचलों आणि मला प्रार्थना सुचली. अशा ठिकाणीं डोळे मिटून काय अंधारी प्रार्थना करायची ? आमचा प्रार्थना-स्वामी आमच्यासमोर विविधरूपांनीं प्रत्यक्ष विराजत असतांना, डोळे मिटून घेऊन आम्ही गुहाप्रवेश काय म्हणून करावा ? 'रसो वै सः' म्हणून ज्याला आपण ओळखतों, त्याला रसाळभूमि, पवित्र जळ, आह्लादकारी पवन आणि पितृवात्सल्यानें आपल्याला डोळे भरून पहाणारा आकाशाचा विस्तार, अशा विविध रूपांत पहात असतांना आणि 'विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः रसवर्जं; रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते।' हा प्रार्थनेचा श्लोक गात असतांना, जीवनाचें सारें तत्त्वज्ञान पुन्हां नव्यानें पारखलें जात असतें. सखोल विचार दीर्घ असतोच असें नाहीं. 'रसाचें निवर्तन केव्हां होतें आणि परिवर्तन कशा प्रकारें होतें' याची संपूर्ण मीमांसा तीनचार क्षणांच्या अवधींत मनांत ठसली आणि पाहतां पाहतां प्रार्थनेला टवटवी आली. 'रघुपति राघव राजाराम' ची धून सुरू झाली आणि चळवळें मन जीवनरसाची गंभीर मीमांसा सोडून लगेच विचारूं लागलें—श्रीरामचंद्रांनीं गूहकाच्या मदतीनें गंगा कोठें ओलांडली असेल ? गूहकाची होडी आमच्या होडी अितकी रुंद असेल कीं अेखाद्या झाडांतून कोरून काढलेल्या लहानश्या डोणी अेवढी असेल ?

पहातां पहातां आम्ही त्या बेटावर जाऊन पोंचलों. आणि सलिल-विहार सोडून आम्ही सिकता-विहाराला प्रारंभ केला. चकाकणारी रेती, चकाकणाऱ्या पाण्याहून कांहीं कमी आनंददायक नव्हती. बेटाच्या कांठावर थोडेसें मऊ गवत अुगवलेलें होतें. क्षणभर विचार करून आम्ही मनाची खात्री करून

घेतली कीं येथें सर्प, विंचू, कांटा यापैकीं कांहींच असणें शक्य नाहीं. येथें नुसती अक्षुण्ण रेतीच पसरलेली आहे. जर कसली निशाणी असेल तर ती अस्थिरमति वाऱ्याच्या लहरींचीच. गंगेच्या लाटांमुळें जें नक्षीकाम वाळूवर अुमटतें तें पुसून टाकण्याचा खेळ लहरी वारा कसें करीत असतो त्याचें प्रात्यक्षिक येथें पहावयास मिळत होतें. शाळेंत जाणारी मुलें थकून झोंपीं गेलीं असावींत आणि त्यांच्या वह्यापाठ्या पुस्तकांबरोबर अस्ताव्यस्त पसरलेल्या असाव्यात, तशीच कांहींशी रेतीवरची नक्षी दिसत होती. कुठें कुठें लहरी वाऱ्याचें लिखाण आढळून येअी, तर कुठें कुठें लहरींची स्वरलिपि वाळूंत अंकित झालेली असे. त्यांत आपलीं मानवी पावलें अुमटवायचें अगदीं जिवावर आलें, पण रेतीचे कुरकुरीत पोपडे जेव्हां पाअूल पडून मोडत तेव्हां पापड खाल्ल्यासारखा आनंद होअी. पावलांचा हा आनंद साऱ्या शरीरानें ओळखला आणि त्याला वाटूं लागलें कीं मुसळाप्रमाणें ताठ अुभ्या अुभ्या चालण्यांत खरोखर पुरेशी मौज नाहीं. All rights reserved चा दावा करणारें अेखादें गाढव येथें नव्हतें, म्हणून आम्ही निःशंकपणें रेतींत लोळण्याचा मनसुबा केला. पण दुर्दैवानें या बाबतींत सर्वांचें अेकमत होअूं शकलें नाहीं. कुणाची प्रतिष्ठा आड आली, तर कुणाचें कैंकर्य त्यांना नडले. आमचे खलाशी तर आम्हांला तेथेंच सोडून बेटाच्या दुसऱ्या टोकाला कुणालासे भेटायला गेले. दारूच्या पिठ्यांतील नोकर प्यालेल्या माणसांकडे ज्या नजरेनें पहातात त्याच नजरेनें त्यांनीं आम्हां सौंदर्यपिपासूंना पाहिलें असेल.

गेल्या कॉंग्रेसनंतर आम्ही चंपारणच्या बाजूस गेलों होतों, तेव्हां याच ठिकाणीं आम्ही गंगा ओलांडली होती आणि त्यावेळीं आश्रमाच्या दोन विद्यार्थ्यांनीं अेक गोड भजन म्हटलें होतें. 'मंगल करहु दयाऽऽ करी देवी.' तें सगळें या स्थानीं येतांक्षणींच आठवलें आणि मी भीमसेनाचें अनुकरण करून मुक्तकंठानें गाअूं लागलों. सोबतच्या सर्वांनीं अुदारतेनें तें सहन केलें म्हणून मी अगदीं रंगांत आलों आणि मथुराबाबूंना विचारूं लागलों, 'छपऱ्यापासून मुंगेरपर्यंतचा प्रवास मला होडीनें करावयाचा आहे. किती वेळ लागेल?' असा प्रवास नशिबांत आहे कीं नाहीं कोण जाणें! पण मी आपला तो प्रवास कल्पनेंत पुरा करूनहि टाकला.

आकाशांत ब्रह्महृदय मावळण्याच्या बेतांत होता. महाश्वान आपली मृगया करीत होता. अगस्तीची झोंपडी आतां स्वस्थानीं आली होती. आणि कृत्तिका तटस्थपणें स्मित करीत होत्या. पुनर्वसूच्या होडीनें आपलें टोंक जरा अुंच करून दक्षिणच्या यात्रेला प्रारंभ केला आणि आम्हांला स्मरण करून दिलें कीं आम्ही या बेटाचे रहिवासी नाहींत; येथून परत जावयाचें आहे आणि पऱ्यांची सृष्टि सोडून मानवी सृष्टींत प्रवेश करावयाचा आहे. आम्ही लगेच बेटाचा किनारा गांठला आणि पुनर्वसूंप्रमाणें आमची होडी दक्षिणेकडे हांकारली.

'पुन्हां येथें केव्हां येणें होअील' असा विषाद मनांत उत्पन्न झाला नाहीं. गंगोत्रीपासून ते हीराबंदरापर्यंत गंगेचें अनेकदां दर्शन घेअून पावन झालों आहें आणि मातेची कृपा असेल तर अजूनहि अनेकदां दर्शन घडेल. पण आतां हा पूर्णानंद अचल-प्रतिष्ठ झाला आहे. त्यांत कसलाच चढअुतार संभवत नाहीं. म्हणूनच परत फिरतांना मुखांतून शांतिपाठ बाहेर पडला.

**ॐ पूर्णम् अदः, पूर्णम् अिदं; पूर्णात् पूर्णम् अुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णम् आदाय पूर्णम् अेवावशिष्यते ॥"**

अेप्रिल, १९४१

# : ३७ : नदीवर कालवा

**श्रा**वण पौर्णिमा म्हणजे श्रावणीचा दिवस, आणि ब्राह्मण्य विसरून म्हणावयाचें तर रक्षाबंधनाचा दिवस. त्यादिवशीं आम्ही रुडकीला पोहोंचलों. खेळकर स्वभावाच्या वेणीप्रसादानें पहातां पहातां माझ्याशीं ओळख करून घेतली आणि सांगूं लागला, 'अजी काकाजी, आज तो आपके हाथसे ही जनेअू लेंगे; यहाँके ब्राह्मण वेदमंत्री बराबर बोलतेही नहीं. आप महाराष्ट्र हो. आपही हमें जनेअू दीजियेगा.' वेणीप्रसादाचे मामा परमभागवत होते. त्यांच्याशीं जानव्याबद्दल गोष्टी सुरू झाल्या. अुत्तर हिंदुस्थानांतील ब्राह्मणांना वाटतें कीं केवळ ब्राह्मणवर्गानेंच नव्हे तर तिन्ही द्विज वर्णांनीं नियमित जानवें

वापरावें आणि संध्यादि नित्यकर्म करावें; पण येथल्या लोकांत अनास्थाच फार. या अुलट दक्षिणेंत ब्राह्मणेतर जानवें मागायला आले कीं महाराष्ट्रांतले ब्राह्मण 'कलौ आद्यन्तयोः स्थितिः' या वचनाचा आधार घेऊन, मधले दोन वर्ण अस्तित्वांच नाहींत असा अशोभनीय दुराग्रह घेअून बसतात. (सुदैवानें आज ही परिस्थिति राहिलेली नाहीं.) ज्यांना जानवें मिळतें ते वापरायला अुत्सुक नाहींत; आणि जे मारामारी करून देखील आपला जानवें वापरण्याचा हक्क मिळवण्याची धडपड करीत असतात. त्यांना आपलें द्विजत्व सिद्ध करण्याच्या बाबतींत अडथळे उत्पन्न केले जातात. ही चर्चा अैकून वेणीला वाटलें कीं आपल्याला कांहीं आज जानवें मिळणार नाहीं. त्यानें युक्तिवाद केला, 'कलियुगांत काय अशक्य आहे? जर नदीवर नदी आरूढ होअूं शकते तर महाराष्ट्री ब्राह्मणहि आम्हांला जानवें देअूं शकतो.' गोष्ट मान्य झाली. पण विषय बदलला आणि कलियुगांतील भगीरथांच्या पराक्रमाचा नमूना जो गंगेचा कालवा, त्याच्याविषयीं गोष्टी सुरू झाल्या.

दुपारीं आम्ही मनुष्याचा तो प्रताप पहायला निघालों. गंगेचा कालवा शहराजवळून वाहतो. मुलें त्यांत माशांप्रमाणें छापापाणीचा खेळ खेळत होतीं. कालव्याच्या कांठाकांठानें आम्ही त्या प्रसिद्ध पुलापर्यंत गेलों. खरोखरच तो देखावा भव्य होता. गरीब ब्राह्मणीप्रमाणें दिसणारी सोलाना नदी पुलाखालून वहात होती आणि वर गंगेचा कालवा आपल्या रुंद पात्राचा थोडासुद्धां संकोच न करतां पुलावरून धांवत होता. पुलावरील पाण्याचा भार अितका अधिक वाटत होता कीं आतां त्याच्या बाजूच्या भिंती कोसळून पडतील आणि दोन्ही बाजूंनीं हत्तीवरील झुलीसारखे मोठमोठे धबधबे सुरू होतील असें वाटे. पुलाच्या भिंतीवर अुभें राहून कालव्याच्या प्रवाहाकडे टक लावून पहात राहिलें तर त्याचा मेंदूवर परिणाम होतो. दुःखी माणसाला ज्याप्रमाणें अुद्वेगाचे नवे नवे अुमाळे येतात, त्याप्रमाणें कालव्याच्या पाण्याला अुमाळे येत होते. पण सासरीं आलेली वधू ज्याप्रमाणें आपल्या साऱ्या भावना नव्या घरांत दाबून टाकते त्याप्रमाणें गंगा नदीची ही परतंत्र पुत्री ते सगळे अुमाळे दाबून टाकते. प्रथम दर्शनीं तिचा विस्तार पाहून ही अेखादी धनमत्त शेठाणी असावी असें वाटतें, पण जवळ जाअून न्याहाळतां श्रीमंतीच्या बुडाशीं असलेलें पारतंत्र्याचें दुःखच तिच्या चेहऱ्यावर आढळून येतें.

अुंचावरून निम्नगा सोलानाचा क्षीण, पण स्वतंत्र प्रवाह दोन्हीकडे आकर्षक वाटत होता. फक्त खटकत होतें तें अितकेंच कीं कालव्याच्या दोन्ही बाजूच्या भिंतींत परीवाह म्हणून ठेवलेल्या छिद्रांतून थोडें थोडें पाणी जणूं काय अुपकार करीत असावें त्याप्रमाणें सोलानेंत पडत होतें.

आम्ही पुलावरून खालीं अुतरलों आणि सोलानेच्या कांठीं जाअून बसलों. अुंचावरून ओतल्या जाणाऱ्या अुपकाराचा अव्हेर करण्याअितकी सोलाना मानिनी नव्हती. पण कांहीं कृपा अवतरेल कीं काय म्हणून आशाळभूत नजर लावून बसण्याअितकी ती हीनहि नव्हती. हीनता तिच्यांत नव्हतीच. आणि मानिनीपण तिला शोभलें नसतें. तिचा निर्व्याज स्वाभाविकपणा साधनेनें मिळविलेल्या अुदात्त चारित्र्याहूनहि अधिक खुलून दिसत होता.

भगीरथ-विद्येंत (अिरिगेशन अिंजिनियरिंगमधें) पाण्याचा प्रवाह घेअून जाण्याचे सहा प्रकार सांगितले आहेत. त्यांत अेका प्रवाहावरून दुसरा प्रवाह घेअून जाणें हा प्रकार अद्भुत आणि अवघड होय. आगगाडीचे आणि मोटरीचे मार्ग असे अेकमेकांवरून जातांना आपण पुष्कळ पहातों. परंतु माझ्या माहितीप्रमाणें हिंदुस्थानांत अशा जलप्रवाहाचें हें अेकच अुदाहरण आहे. संस्कृतीच्या प्रवाहाच्या दृष्टीनें विचार केला तर सारें भारतवर्ष अशा प्रकारच्या प्रवाहांनींच भरलेलें आहे. प्रत्येक जातीची संस्कृति वेगळी आणि कित्येकदां समोरासमोर भेटूनहि अेकमेकापासून अस्पृष्ट राहूं शकली आहे!

१९२६–'२७.

# : ३८ : नेपाळची वाघमती

जशी काश्मीरची दूधगंगा तशी नेपाळची वाघमती अथवा बाघमती. अितक्या लहान नदीकडे कुणाचें लक्षहि जाणार नाहीं. पण वाघमतीनें असें अेक अैतिहास प्रसिद्ध स्थळ आपलेंसें केलें आहे कीं, त्यामुळें तिचें नांव लाखों लोकांच्या तोंडीं झालें आहे. नेपाळची अुपत्यका म्हणजे अठरा

कोसांचा घेरावा असलेलें आणि चहूंबाजूंनीं पहाडांनीं संरक्षित असें अेक रमणीय लंबवर्तुळ मैदान. दक्षिणेस फरपिंग–नारायण त्याचें रक्षण करीत असतो, तर अुत्तरेस गौरीशंकराच्या छायेखालीं असलेला चंगूनारायण त्याची रखवाली करीत असतो. पूर्वेस बिशंगू–नारायण आहे व पश्चिमेस अिचंगू.

हिमालयाच्या कुशींत वसलेल्या स्वतंत्र हिंदू राज्याच्या या घरट्यांत तीन अंडीं घालावींत तशा तीन राजधान्या आहेत. सर्वांत जुनी राजधानी पट्टन, त्यानंतरची भादगांव आणि सध्यांची काठमांडू अथवा काष्ठमंडप. नेपाळांतील मंदिरांचा घाट हिंदुस्थानांतील अितर मंदिरांच्या घाटाहून भिन्न आहे. देवळावरून जेथें पागोळया गळतात तेथल्या पन्हाळीला नेपाळी लोक लहान लहान घंटा टांगतात आणि मधें लटकणाऱ्या लोलकांना पितळेच्या पातळ पत्र्याचीं पिंपळपानें बसवलेलीं असतात. वाऱ्याची झुळुक आली कीं कसें नाचावें तें पिंपळपानाला शिकवावें लागत नाहीं. अेकाच वेळीं अनेक घंट्या किणकिण किणकिण असा निनाद करूं लागतात. तो मंजुळ ध्वनि मंदिरांतील शांतीला बाधा आणीत नाहीं. अुलट तिला अधिक अुठावदार आणि मुखरित करतो. भादगावच्या कित्येक मूर्ति तर शिल्पकलेचे अद्‌भुत नमुने आहेत. शिल्पशास्त्राचे सगळे नियम पाळूनहि कलाकार आपल्या प्रतिभेला किती वाव देअूं शकतो याचे नमुने पहावयाचे असतील तर या मूर्ति पाहून घ्याव्यात. कला ही अतिमानुषीच असली पाहिजे असें येथले मूर्तिकार मानत असावेतसें वाटतें.

शेतांत दूरवर भव्याकृति स्तूप समाधिसुख अनुभवित बसलेले आढळून येतात.

आणि काठमांडू म्हणजे तर आजच्या नेपाळी राज्याचें वैभव. नेपाळमधें प्रवेश करण्याची परवानगी सहजासहजीं मिळत नाहीं. आणि म्हणूनच पडद्याआड काय आहे, अवगुंठनाच्या आंत कसलें सौंदर्य दडलेलें आहे तें जाणून घेण्याचें कुतूहल जसें आपोआप अुत्पन्न होतें, तसेंच नेपाळविषयीं देखील होतें. आठ दिवस रहावयाला मिळालें आहे, पहावयाचें असेल तें पाहून घ्या, अेकदां परत गेल्यावर पुनः येणें होणार नाहीं, अशा मनःस्थितींत जिकडे तिकडे काव्यच आढळून येतें.

पशुपतिनाथाचें मंदिर काठमांडूपासून दूर नाहीं. मंदिराच्या कळपांत जणूं काय अेखादा मोठा पोळच बसला आहे. जवळूनच वाघपती वहाते. ती रेताड मातीमधून येत असल्यामुळें पाणी नेहमीं गढूळ वाटतें. त्यांत पोहावेंसें वाटतें खरें, पण पाणी तितकें खोल असेल तर ना! गुह्येश्वरी आणि पशुपतिनाथ यांच्यामधून हा प्रवाह वाहतो, म्हणूनच त्याचा अेवढा महिमा.

पशुपतिनाथाहून सरळ पश्चिमेला शिंगुभगवानाचें दर्शन घेण्यासाठीं आम्ही गेलों. रस्त्यांत भेटली वाघमतीची बहीण विष्णुमती. या नदीवर जिकडे तिकडे पूल पसरलेले होते. पूल म्हणजे काय? नदीच्या पात्रावर पाण्यापासून अेक हात अुंचीवर पसरलेल्या लाकडाच्या वीत वीत रुंद फळ्या. समोरून अेखादा मनुष्य आपल्यापुढें आला तर या टीचभर पुलावरून दोघांनीं कसें जावयाचें? दोघांपैकीं अेकाला पाण्यांत अुतरावें लागतें. कित्येक ठिकाणीं पाणी अधिक खोल असतें, तेथें तर मनुष्य चांगला गुडघ्यापर्यंत भिजून जातो.

शिंगुभगवनाच्या पायथ्याशीं ध्यानमग्न बुद्धाची अेक मोठी मूर्ति अुन्हा-तान्हांत तप करीत बसलेली आहे. टेकडीवर अेक मंदिर आहे. त्यांत तीन मूर्ति आहेत. अेक बुद्ध भगवानाची, दुसरी धर्म भगवानाची आणि तिसरी संघ भगवानाची! प्रत्येकीसमोर तुपाचा दिवा जळत असतो. आणि कोपऱ्यांत 'ॐ मामे पापे हुम्' (ॐ मणिपद्मेऽहम्) हा पवित्र मंत्र ज्याच्यावर अनेकदां कोरलेला आहे असें अेक पितळेचें नळकांडें लाकडाच्या चौकटींत अुभें करून ठेवलेलें असतें. अेक मूठ फिरवली कीं नळकांडें गरगर फिरूं लागतें. रुद्राक्षाची, चंदनाची किंवा तुळशीची माला फिरवीत बसण्यापेक्षां ही सोय कितीतरी चांगली! प्रत्येक फेऱ्याबरोबर नळकांड्यावर जितक्यांदा मंत्र लिहिलेला असेल तितक्यांदा तो जपल्याचें पुण्य आपसुख पदरांत पडणार, याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं! नात्र कार्या विचारणा। तथागताला आपल्या संदेशाचें हें स्वरूप पहाण्यास सांपडलें नाहीं हें त्याचें दुर्भाग्य नाहीं तर काय? याच मंदिरासमोर पितळेचें बनविलेलें अिंद्राचें वज्र अेका चबुतऱ्यार ठेवलेलें आहे. भगिनी निवेदितांना या वज्राचा आकार फारच आवडला होता. भारतवर्षाच्या राष्ट्रध्वजावर हें वज्र चितारण्यांत यावें अशी सूचना त्यांनीं केली होती.

वाघमतीच्या कांठीं भात, गहू, मका व अुडीद यांचें भरघोस पीक निघतें. तूर तेथें पिकतच नाहीं. त्या लोकांनीं प्रयत्न करून पाहिला कीं नाहीं तें ठाअूक नाहीं. कापसाचें पीक काढण्याची खटपट अलीअलीकडे तेथें चालू झाली आहे. वाघमती ही नेपाळी लोकांची गंगा-माता आहे. गोरक्षनाथ हा त्यांचा पिता आहे.

१९२६–२७.

# : ३९ : बिहारची गंडकी

गंडकी नदी नेपाळांतून येते आणि तिच्यांत शालिग्राम सांपडतात अेवढेंच लहानपणीं अैकलें होतें. शालिग्राम हे अेकप्रकारचे छोट्या शंखांसारखेच प्राणी असतात, त्यांना तुळशीचीं पानें फार आवडतात, पाण्यांत तुळशीचीं पानें टाकलीं कीं तो प्राणी हळूंहळूं बाहेर येअून पानें खाअूं लागतो, त्याला पकडून आंतल्या जिवाला मारून काढून टाकतात आणि काळया दगडासारखा तो शंख साफ करून पूजेसाठीं विकतात; आजकाल लबाड लोक काळया शिलेचा अेक वाटोळा तुकडा घेअून त्यांत अेक लहानसा खळगा करून आणि त्याचा नकली शाळिग्राम बनवतात वगैरे अनेक गोष्टी मीं अैकल्या होत्या. त्यामुळें अशी नदी अेकदां पाहिली पाहिजे असें फार दिवसापासून मनांत होतें.

महादेवाचे बाण म्हणजे नर्मदेंतले गोटे आणि विष्णूचे शाळिग्राम म्हणजे बौद्ध स्तूपांचें प्रतीक म्हणून गंडकींतून आणलेले दगड होत असें स्वामी विवेकानंदांनीं कुठेंतरी लिहिलें असल्याचें स्मरतें. बाण आणि शाळिग्राम हे बौद्ध जगाच्या दोन सीमांचे सूचक आहेत असें त्यांनीं पॅरिसमधील मोठ्या प्रदर्शनाच्या वेळीं अेका भाषणांत किंवा लेखांत जाहीर केलें होतें.

गंगा नदी जेथून निघते, तेथूनच दोन्ही बाजूंकडून करभार घेत सुटते तिच्या मांडलिक नद्या बहुतांशीं अुत्तरेकडील व डाव्या बाजूकडून येणाऱ्या असतात. चंबळ आणि शोण सोडल्यास अेकहि महत्त्वाची नदी दक्षिणेकडून

अुत्तरेकडे जात नाहीं. गंगेच्या दक्षिणवाहिनी मांडलिक नद्यांपैकीं गंडकी बिहारचें पाणी गंगेसाठीं घेअून येते.

आम्ही बिहारमधें मुजफ्फरपूरला गेलों होतों तेव्हां अेके दिवशीं गंडकींत स्नानासाठीं गेलों. बिहारची भूमि म्हणजे अनासक्तीचे आद्य प्रवर्तक सम्राट जनक यांची कर्मभूमि, दयाधर्माचे महान् प्रचारक महावीर यांची तपोभूमि, अष्टांगिक मार्गाचे शोधक अथवा संशोधक भगवान बुद्ध यांची विहारभूमि. हे सगळे धर्मसम्राट या नदीच्या कांठीं अहर्निश विचरले असतील. त्यांच्या असंख्य सहाय्यकांनीं आणि अनुयायांनीं या नदींत स्नानपान केलें असेल. तीच ही गंडकी आपल्या शैत्यपावनत्वानें मला कृतार्थ करो, असा संकल्प सोडून मीं तेथें स्नान केलें. नदीच्या पाण्याला कसलीच अुतावीळ नव्हती, कसलीच गडबड नव्हती ती शांतपणें वहात होती. जणूं काय मारविजयानंतर बुद्ध भगवानांनीं चालविलेलें अखंड ध्यानच.

# : ४० : गयेची फल्गु

संस्कृतमधें 'फल्गु'चे दोन अर्थ होतात. फल्गु म्हणजे निःसार, क्षुद्र, तुच्छ; आणि फल्गु म्हणजे सुंदर. गयेजवळ असलेल्या नदीचें फल्गु ह नांव दोन्ही अर्थांनीं सार्थ आहे. पुराणें सांगतात कीं तिला सीतेचा शाप भोंवला. सीतेच्या शापाचें जें असेल तें असो. पण सिकतेचा शाप तिला भोंवला आहे हें आपण प्रत्यक्ष डोळयांनीं पाहूं शकतों. जेथें पहावें तेथें रेती. बिचाऱ्या क्षीण प्रवाहानें डोकें वर काढावें तरी कसें ? यात्रिकरू जिकडे तिकडे हेळ खोदून डबकीं तयार करतात. लाकडाच्या मोठ्या फावड्याला लांबलचक दोरी बांधून नांगरा-प्रमाणें तें डबक्यांत फिरवतात. म्हणजे गाळ निघून जाअून डबकें अधिकाधिक खोल बनतें आणि अधिक पाणी देतें.

असंख्यात श्रद्धाळु यात्रिकरू फल्गूच्या पात्रांत 'सनान' करून पितरांसाठीं भात शिजवतात आणि पिंड तयार करतात. तांदूळ, पाणी, मडकें व गोवऱ्या

यांचें प्रमाण पंड्यांनीं कायमचें ठरवून टाकलें आहे. नियमाप्रमाणें पैसे दिले कीं पंडा सर्व सामग्री घेऊन येतो. गोवऱ्या रचून पेटवून त्यावर भाताची हंडी चढवायची. अमुक विधि पूर्ण होतात तोंवर चरु शिजून तयार होतोच.

फल्गूच्या कांठीं देवळें आणि धर्मशाळा यांची शोभा पहाण्यासारखी आहे. त्यांतहि श्रीगदाधराच्या मंदिराचा कळस सहज ध्यान खेंचून घेईल असा आहे.

गयेहून बोधिगयेला जात असतांना फल्गूची खरी शोभा पाहून घ्यावी. रतीचा लांबरुंद पट, आसपास ताडाचीं अुंच अुंच झाडे, आणि मधून वळणें घेत वहाणारा फल्गूचा क्षीण प्रवाह. पण तिला क्षुद्र किंवा निःसार कोण म्हणेल ? येथें रामचंद्र आणि सीतामाअी येअून गेले, बुद्ध भगवानांनीं येथें संचार केला, आणि आतांपर्यंत कितीतरी सत्पुरुष श्राद्धाच्या निमित्तानें येथें आले होते. या महातीर्थाला निःसार म्हणणें शक्यच नाहीं. शेवटीं फल्गु म्हणजे सुंदर हा अर्थच खरा.

१९२६–२७.

## : ४१ : गरजणारा शोणभद्र

‘ अयं शोणः शुभ-जलोऽगाधः पुलिन-मण्डितः ।
‘ कतरेण पथा ब्रह्मन् संतरिष्यामहे वयम् ? ’ ॥
अेवम् अुक्तस् तु रामेण विश्वामित्रोऽब्रवीद् अिदम् ।
‘ अेष पन्था मयोद्दिष्टो येन यान्ति महर्षयः ’ ॥

आसेतुहिमाचल भारतवर्षाचा साकल्यानें विचार करणारी ही क्षत्रिय गुरु-शिष्यांची जोडी जेव्हां शोणभद्र ओलांडूं लागली तेव्हां त्यांच्या मनांत काय काय विचार आले असतील ? निसर्गाचा कवि वाल्मीकि यानें विश्वामित्र व राम या दोघांच्याहि निसर्गप्रेमाचें मुक्तकंठानें वर्णन केलें आहे. तिघेहि

जनगण-हितकारी पुरुष. त्यांच्या भावनेचा ओघहि शोणभद्राप्रमाणें वाहत असावा आणि आसपासच्या भूप्रदेशाला मुखरित करीत असावा.

अमरकंटकच्या आसपासची अुन्नत भूमि भारतवर्षाच्या जवळ जवळ मध्य-भागीं आहे. तेथून तीन दिशांना तिनें आपल्या करुणेच्या स्तन्यधारा सोडल्या आहेत. भौगोलिक रचनेंत ज्यांच्यामधें बरेंच साम्य आहे, परंतु अितर बाबतींत संपूर्ण वैषम्य आहे अशा दोन प्रांतांना तिनें दोन नद्या दिल्या आहेत. नर्मदा गुजराथच्या वाट्यांला आली आणि महानदी अुत्कलला लाभली.

अमरकंटकचा तिसरा प्रवाह म्हणजे पीवरकाय शोणभद्र. नर्मदा सुदीर्घा आहे, महानदी अष्टावक्रा आहे, तर शोणभद्र सुघोष आहे. जवळ जवळ पांचशे मैलांचा पराक्रम पुरा करून तो पाटण्याजवळ गंगेला येअून मिळतो. शोणावरूनच शोणपूर हें स्थान प्रसिद्ध झालें आहे. असें म्हणतात कीं गजेन्द्र-नक्रांची लढाअी झाली ती गंगा-शोणांच्या संगमाजवळील डोहांतच. जणूं काय याच प्रसंगाचें स्मरण ताजें करण्यासाठीं अद्यापि शोणपुरांत लाखों लोकांची यात्रा भरते आणि यात्रेंत शेकडों हत्ती विकले जातातत.

सिंधु आणि ब्रह्मपुत्र यांच्याप्रमाणें शोणभद्रालाहि पुल्लिंगी नांव देअून प्राचीन अृषींनीं त्याची योग्य कदर केली आहे. बनारसहून गयेला जातांना वाटेंत या महाकाय व महानाद नदाचें दर्शन झालें होतें. गाडी मोठ्या पुलावरून जाअूं लागली आणि शोणभद्राचें कांहीं केल्या न संपणारें पुलिनमंडित महापात्र नजरेसमोरून सरकूं लागलें. अरुंद दरींतून आपला विकास थांबल्याच्या जाणिवेंतून अुत्पन्न झालेल्या अधीरतेनें धावत असतां अेकदम विशाल क्षेत्रांत आल्यावर, ‘आतां कोठें जाअूं? कोठें नको?’ असें होअून गेल्याचें त्याच्या मुखावर स्पष्ट दिसून येत होतें. ‘नाल्पे सुखम् अस्ति; यो वै भूमा तत् सुखम्’ असें मानणारे अृषि शोणभद्राच्या कांठीं पाण्याला अुतार शोधत फिरत असतील तेव्हां त्यांच्या मनांत काय काय विचार आले असतील, ते अेक विश्वामित्राला ठाअूक अथवा मखत्रात्या प्रभु श्रीरामचंद्राला ठाअूक!

१९२६-’२७

# : ४२ : तेरदाळचें मृगजळ

माझें लग्न होऊन थोडेच दिवस झाले असतील, आम्ही शहापुरहून जमखिंडीला गेलों. वडील आमच्या पूर्वीच तेथें पोहोंचले होते. आमच्याबरोबर सामान पुष्कळच होतें, त्यामुळें कुडची स्टेशनवर मला लगेजचे दुप्पट पैसे भरावे लागले हें अजूनहि स्मरणांत आहे. रात्रींच आम्ही बैलगाडींत बसून निघालों. दोन्ही बैल पांढरेशुभ्र आणि धिप्पाड होते. रंगानें, शिंगांच्या आकारानें, मुखमुद्रेंत, चालण्याच्या ढबींत, सर्वप्रकारें दोन्ही बैल अगदीं सारखे होते. अशा जोडीला 'खिल्लारी जोडी' म्हणतात. या बैलांनीं आम्हांला अेका दिवसाच्या आंत पस्तीस मैल पोंचवून दिलें.

जमखिंडीला जातांना वाटेंत तेरदाळ म्हणून सांगली संस्थानचें अेक अितिहास-प्रसिद्ध गांव लागतें. तेरदाळजवळ आम्ही पोहोंचलों, तेव्हां मध्याह्नाचा समय होअून चुकला होता; अुजव्या बाजूला शेतें दूरवर पसरलीं होतीं. बऱ्याच दूर जवळ जवळ क्षितिजाजवळ अेक मोठी नदी वहात होती. पाण्यावर दुपारच्या अुन्हाचा मारा होत असल्यामुळें तें चमकत होतें आणि किती जोरानें वहातें आहे याचीहि कल्पना होत होती. अेवढ्या मोठ्या नदीच्या कांठीं झाडें तुरळक कां, याचें मला कोडेंच पडलें. मीं गाडीवाल्याला विचारलें, "या नदीचें नांव काय? केवढी मोठी नदी आहे ही! कृष्णा नदी तर नव्हे?" गाडीवान हसला. "अिथें नदी कोठची, साहेब? हें मृगजळ आहे; पाण्याच्या हा देखावा पाहून बिचारीं हरणें फसतात आणि तहान असह्य झाल्यामुळें अुन्हांत धांवत जाअून तडफडून मरतात. म्हणूनच याला मृगजळ म्हणतात."

मृगजळाविषयीं मीं वाचलें होतें. पाण्याप्रमाणें मृगजळांत देखील झाडांचें अुलटें प्रतिबिंब पडतें, रणांतून जाणाऱ्या अुंटांच्या पडछाया देखील मृगजळांत अुमटतात, वगैरे माहिती मीं वाचली होती. चित्रेंहि पाहिलीं होतीं. पण माझी समजूत होती कीं, मृगजळ मध्य आफ्रिकेंतच दिसतें. सहाराच्या वाळवंटांतील अेकवीस दिवसांच्या मुसाफरींतच असलें अद्‌भुत दृश्य पहावयास

मिळणार. हिंदुस्थानांत देखील मृगजळ दिसतें याची मला कल्पना असती तर मी अितक्या सहज आणि अितका बेमालूम फसलों नसतों.

आतां माझ्या ध्यानीं आलें कीं जसजसे आम्ही गाडींतून पुढें जात होतों, तसतसें हें अुन्हाचें पाणी देखील पुढें पुढें सरकत होतें. माझ्या हेंहि नजरेस आलें कीं, पाण्याच्या आसपास हिरवळ मुळींच नाहीं आणि पाण्याचा प्रवाह आसपासच्या जमिनीच्या मानानें खोलांत नसून सपाट जमिनीवरूनच पाणी वहात आहे. पुढें पुढें तर वरील हवेंत देखील अुन्हाच्या तापामुळें अेक प्रकारच्या लहरी अुत्पन्न झालेल्या दिसूं लागल्या. आतां मृगजळ ध्यानपूर्वक पहाण्याचा आणि त्याचें स्वरूप समजून घेण्याचा विशेष आनंद वाटूं लागला. बिचारे बैल डोळे अर्धे मिटून स्वतःच्या गतीच्या तालाच्या तन्द्रींत अेकसारखे चालले होते. अेखादा बैल चालतां चालतां मुतूं लागला कीं त्याच्या डोलण्याचा आलेख जमिनीवर पडत असे. पण थोड्याच वेळांत वाळून जात असे. या आलेखाची कल्पना करण्यांत कांहीं वेळ गेला पण पुन्हां पुन्हां हरिणांच्या पाठी भाजून काढणाऱ्या त्या अुन्हाकडेच लक्ष जाअी. अर्ध्या अर्ध्या तासानें खुजांतून पाणी घेऊन प्यालों तरी तहान भागत नसे.

असें करतां करतां शेवटीं तेरदाळ आलें. धर्मशाळा घोड्यांनीं बांधलेली होती. संस्थानी धर्मशाळेच्या अिमारती चांगल्याच असतात; पण अुन्हामुळें ही धर्मशाळा अगदीं भकास दिसत होती. गाडींतून सामान काढल्यानंतर मी तळयांत जाअून आंघोळ करून आलों. बरोबर पूजेचे देव होते. त्यांना वेताच्या सांबळींतून बाहेर काढून पाटावर ठेवलें आणि त्यांची पूजा केली. देवांमधें अेक शालिग्राम होता. तुळशीच्या पानावांचून तो कसा जेवणार ! ओल्या धोतरानिशीं आणि अुघड्या पायानें मी तुळशीपत्राच्या शोधार्थ निघालों. सुदैवानें अेका घराच्या अंगणांत पांढऱ्या कण्हेरीचीं फुलें आणि तुळशीच्या मंजिऱ्या मिळाल्या. दोनप्रहरची वेळ. पोटांत भुकेची आग. पाय भाजत होते आणि डोकें तापून गेलें होतें. अशा त्रिविध तापांत मी पूजा करावयास बसलों. आणि देवहि कांहीं थोडेथोडके नव्हते. अीश्वर अेक खरा; म्हणून कांहीं सगळयांच्या वतीनें अेकाच मूर्तीची पूजा करून भागण्याजोगें नव्हतें. सगळे देव ताम्हणांत काढून त्यांना अभिषेक केला, आणि त्यांना पुसून जागच्याजागीं बसवलें. स्वतः अुगाळलेलें चंदन त्यांना लावलें. धूप, दीप,

नैवेद्य, ' मध्ये पानीयं ' सर्व कांहीं यथासांग समंत्रक केलें. पूजा करतां करतां डोळ्यापुढें अंधेरी आली. कशी बशी पूजा आटोपली. आणि जेवून मी झोंपीं गेलों.

स्वप्नांमधें हरिणांची टोळी चेंडूप्रमाणें अुडत अुडत मृगजळाचें पाणी पिण्यासाठीं धांवत होती. मी त्या हरिणांना कसें रोकणार किंवा कसें समजावणार ?

१९२५

ता. क.—असेंच अेक मृगजळ दांडीकूचच्या वेळीं नवसारीहून दांडीच्या समुद्रकिनाऱ्याला जातांना वाटेंत पहावयास मिळालें होतें. हें मृगजळ आहे अशी खात्री असली तरी तेवढ्या ज्ञानामुळें डोळयांचा भ्रम यत्किंचितहि कमी होत नाहीं. वेदान्ती ज्ञान डोळयांना कसें पटावें ?

आजकाल कलकत्त्याला देखील डांबरी रस्त्यावर दोनप्रहरच्यावेळीं मृगजळ असें कांहीं चमकूं लागतें कीं रस्त्यावर पाअूस पडून नुकताच सडा झाला असावा असें वाटूं लागतें. आणि धांवणाऱ्या मोटारींचें प्रतिबिंबहि त्यांत पहावयास मिळतें.

ज्ञान होअूनहि मनुष्य मोहवश कसा राहूं शकतो या प्रश्नाचें अुत्तर देण्यासाठींच अीश्वरानें ही मृगजळाची व्यवस्था केली आहे.

# : ४३ : चर्मण्वती चंबल

ज्या ज्या नद्यांत स्नानपान केलें असेल त्यांचेंच अुपस्थान येथें करण्याचा संकल्प आहे. पण तरीसुद्धां यांत अेक अपवाद केल्याशिवाय राहवत नाहीं. मध्यदेशांतील चंबल नदीचें दर्शन घेतल्याचें स्मरत नाहीं, पण पौराणिक कालांतील चर्मण्वती या नांवाबरोबर तिला माझ्या स्मरणांत कायमचें स्थान मिळालें आहे. नद्यांचीं नांवें त्यांच्या कांठावरील पशु, पक्षी अथवा वनस्पति अित्यादींवरून पडल्याचीं अुदाहरणें आहेत. दृषद्वती, सारस्वती, गोमती, वेत्रवती, कुशावती, वाघमती, हाथमती, साबरमती, अिरावती, अित्यादि

नांवें त्या त्या नदीकांठच्या प्रजेचें सूचन करतात. नदीच्या नांवांतच तिची संस्कृति व्यक्त होते. मग चर्मण्वती हें नांव काय सुचवतें ? हें नांव अैकतांक्षणींच प्रत्येक गोसेवकाच्या अंगावर कांटा अुभा राहिल्याशिवाय राहणार नाहीं.

प्राचीन राजा रंतिदेव अमर कीर्ति मिळवून गेला. महाभारतासारखा विराट् ग्रंथ रंतिदेवाची कीर्ति गातांना थकतच नाहीं. या राजानें या नदीच्या तीरावर अनेक यज्ञ केले. त्यांत जे पशु मारले जात त्यांच्या रक्तानें नदी नेहमीं लाल लाल दिसे. या पशूंची कातडीं सुकवण्यासाठीं या नदीच्या कांठीं अितकीं कांहीं पसरून ठेवलेलीं असत, कीं या नदीचें नांवच चर्मण्वती पडलें. महाभारतांत अेका प्रसंगाचें मोठें रसभरित वर्णन आहे. रंतिदेवाच्या यज्ञाला अितके ब्राह्मण लोटत कीं, कधीं कधीं आचाऱ्यांना या भूदेवांस विनंती करणें भाग पडत असें कीं 'भगवन् ! आज मांस कमी शिजवलेलें आहे, आज फक्त पंचवीस हजार पशुच मारले आहेत. म्हणून भाज्या कोशिंबिरीच अधिक घेअून आजचा दिवस भागवा.'

त्या वेळेचा हिंदूधर्म आणि आजचा हिंदूधर्म यांत केवढें अंतर पडलें आहे ! ग्रीक लोकांच्या 'हॅकॅटॉम'ला मागें टाकतील असे मोठमोठे यज्ञ करून स्वर्गांतल्या देवांना, त्याचप्रमाणें भूदेवांना तृप्त करावें, हें त्यावेळेच्या धार्मिकांना आपलें ब्रीद वाटत असें. नंतरच्या धार्मिक लोकांनीं शंका काढली कीं—

**वृक्षान् छित्वा, पशून् हत्वा, कृत्वा रुधिर-कर्दमम्**
**स्वर्गः चेत् गम्यते मर्त्यैः नरकः केन गम्यते ?**

'झाडें तोडून, पशूंना मारून आणि रक्ताचा चिखल करून जर मनुष्यप्राण्याला स्वर्गाला जातां येत असेल, तर मग नरकाला जाण्याचा मार्ग कोणता ?' या चर्मण्वतीच्या कांठीं कितीतरी लढाया झाल्या असतील. माणसांनीं माणसांच्या रक्ताचे पाटहि वाहवले असतील. पण चंबलचें नांव घेतांच स्मरण होतें तें रंतिदेवाच्या जमान्याचेंच.

आपल्याला जर आज अितका अुद्वेग वाटतो, तर समस्त-प्राण्यांची-माता चर्मण्वतीला त्यावेळीं काय झालें असेल !

१९२६–२७

# : ४४ : नदीचें सरोवर

आपल्या देशांत सौंदर्यस्थळें अितकीं कांहीं विखुरलेलीं आहेत कीं त्यांचा कुणी हिशोबच ठेवीत नाहीं. जणूं काय निसर्गानें अशी अुधळपट्टी केल्याबद्दल मनुष्य त्याला अद्दल घडवीत आहे. ज्याप्रमाणें आश्रमांत दिवसाचे चोवीस तास बापूजींबरोबर रहाण्याची आणि गोष्टी करण्याची संधि ज्यांना मिळाली आहे, ते लोक बापूजींचें महत्त्व ओळखेनासे झाले आहेत; आणि बापूजींकडे ढुंकूनदेखील पहात नाहींत, त्याचप्रमाणें आपल्या देशांत निसर्गाच्या भव्यतेचें झालें आहे.

आम्ही माणिकपुरहून झांशीला जात होतों. रस्त्यांत हरपालपुर आणि रोहा यांच्या दरम्यान अकस्मात अेक सुंदर दृश्य दृष्टीस पडलें. हें सरोवर आहे कीं नदी ? हें सुद्धां कळणें कठीण. आसपासचीं झाडें कांठाच्या अितकीं कांहीं जवळ आलेलीं दिसत होतीं, कीं ही नदी असणें शक्यच नाहीं असें अनुमान निघे. पण सरोवराच्या चहूंबाजूस कमीअधिक अुंची असली पाहिजे. येथें समोरच्या बाजूस अेक अुंच पर्वत आसपासच्या जंगलाला आशीर्वाद देत अुभा होता आणि पाण्यांत पहाणाऱ्या लोकांना आपलें अुटलें दर्शन घडवीत होता. दाढी ठेअून डोक्याचें मुंडन करणाऱ्या मुसलमानांप्रमाणें या पहाडानें आपल्या पायथ्याशीं जंगल अुगवून आपलें शिखर तुळतुळीत केलें होतें.

पुलाच्या डाव्या बाजूस पाण्याच्या विस्ताराच्या मधोमध अेक लहानसें बेट होतें—दोन अेक फूट लांब आणि अेक हात रुंद. पाण्याच्या पृष्ठभागापासून कांहीं नाहीं तरी चांगलें सहा अिंच अुंच असेल. त्यामुळें या बेटाचा तोरा पाहून घेण्यासारखा होता. जणूं काय जवळच्या पहाडाला तें म्हणत असावें कीं तूं तर कांठावर अुभा राहून तमाशा पाहत बसला आहेस, मी बघ कसा जलविहार करीत आहें.—"आंत पडे तो सुख अनुभवितो. पहात बसला कांपे (पोळे) रे!" (मांही पड्या ते महासुख माणे, देखनारा (दाझे) जोने!)

तर मग ही नदी आहे कीं सरोवर? आतांच बेलाताल स्टेशन गेलें त्यावरून या प्रदेशांत ठिकठिकाणीं तलाव असावेत असें वाटलें. पण खात्री झाली नाहीं. डब्यांत बसलेल्या लोकांना विचारतां आलें असतें, पण अेक तर पॅसेंजर-ट्रेन असूनहि दिवाळीचे दिवस असल्यामुळें स्थानिक प्रवासी असे नव्हतेच, आणि असते तरी ते विशेष माहिती देअू शकते अशी आशा थोडीच बाळगतां येणार होती? वर्षानुवर्षें जीवनयात्रा बिकट झाल्यामुळें लोकांच्या जीवनांतून सगळें काव्य पार सुकून गेलें आहे. त्यामुळें प्रश्न विचारला तर विषादयुक्त बेदरकारीनें भरलेलें अुत्तरच मिळायचें. लोकांचा चांगुलपणा अजून टिकून राहिला आहे. पण काव्य, अुत्साह आणि कल्पनेच्या भराऱ्या आतां नामशेषच झाल्या आहेत.

पण असें सुंदर दृश्य पाहिल्यावर अुदास विचारांना कुठें थारा का द्यावयाचा असतो? प्रवासांत नेहमीं मी अेकदोन नकाशे सोबत बाळगीत असतों. आधुनिक युगाची धन्य आहे कीं अशीं साधनें सहज मिळूं शकतात. मीं Road Map of India (मोटरवाल्यांचा नकाशा) काढून पाहिला. त्यांत आढळून आलें कीं हरपालपुर आणि मअुरानीपुर यांच्यामधून अेक लांब नदी दक्षिणेकडून अुत्तरेकडे धांवत असते, बेतवेला जाअून मिळते आणि बेतवेच्या मदतीनें आपलें पाणी हिंमतपुरजवळ यमुनेच्या चरणीं अर्पण करते. 'पण या नदीचें नांव काय?' मीं नकाशाला विचारलें. पण तो आळशी म्हणाला, 'पहा असेल कुठेंतरी नोंदून ठेवलेलें.' आणि खरोखर नेमकें त्याचक्षणीं नांव सांपडलें—धसान! अितक्या चांगल्या शहाण्यासुरत्या शांत पाण्याचें नांव 'धसान' (धसमुसळें) कसें काय पडलें असेल? हा तर त्याचा अपमान म्हटला पाहिजे. मी असतों तर या नदीचें नांव प्रसन्ना ठेवलें असतें, मंदस्रोता ठेवलें असतें किंवा हिमालयाची क्षमा मागून तिला मंदाकिनी म्हटलें असतें.

पण ज्या लोककवीनें या नदीचें नांव धसान ठेवलें त्यानें तिचें कोणत्या अृतूंत दर्शन घेतलें होतें तें आपल्याला काय ठाअूक? पावसाळा अगदीं अैन भरांत आहे, आसपासचे पहाड ढगांना ओढून खालीं पाडून त्यांचा चेंदामेंदा करीत आहेत आणि धिंगामस्ती करणारें पाणी हत्तीच्या अुन्मत्त वेगानें

अुत्तरेकडे झेंपावत आहे. जवळच्या टेकड्या टिकून राहतील कीं ढळून पडतील तें कळेनासें झालें आहे. अशा वेळीं लोककवि अुद्गारला असेल, 'बघा तर या धसान नदीचा धिंगाणा, जणूं काय महाराज पुलकेशीची सेना अुत्तर दिशा जिंकण्यासाठीं निघाली आहे!'

पण आतां ही नदी अितकी शांत वाटत होती कीं जणूं काय गोकुळांत धिंगाणा घालून आल्यानंतर यशोदामातेपुढें मात्र गरीब गाय बनलेला गोपाळकृष्णच!

सकाळीं अुठून न्याहारीच्या वेळीं डोळयांना अितकी अकल्पित मेजवानी मिळाल्यावर ती सोडतो कोण?

पोटभर खाल्लयानंतर तरी निदान आप्तेष्टांचें स्मरण होणारच. आतां या धसानचें मंगलदर्शन अिष्ट मित्रांना कसें काय घडवायचें? नाहीं आपल्यापाशीं कॅमेरा कीं नाहीं ट्रेनमधून फोटो काढण्याची सोय. आणि फोटोची कुवत ती काय? फोटोमधें जर सगळा आनंद सांठवणें शक्य असतें तर भटकण्याचा त्रास कुणी घेतलाच नसता. मी जर कवि असतों तर हृदयाच्या अुद्गारांची अेक सरिताच वाहवली असती. पण तें देखील नशिबांत नाहीं. त्यामुळें दुधाची तहान ताकानें भागवावी या न्यायानें हें पत्र लिहीत आहे. भारताच्या भक्तींत रंगलेला कुणी समानधर्मा झांशींहून पन्नास मैल आंत असलेल्या या ठिकाणीं दर्शनसुख घेण्यासाठीं अवश्य येईल.

स्टेशन बरवासागर, १४–११–२९

धसानहून आम्ही पुढें गेलों आणि ओरछापाशीं बेतवा नदी दृष्टीस पडली. ही नदी देखील चांगली देखणी होती. तिच्या प्रवाहांत कितीतरी गोळ मेटोळ दगड आणि कितीतरी झाडें होतीं. तिच्या लावण्यांत अळणी म्हणतां येअील असे कांहींच नव्हतें. दूरवर ओरछाचीं मंदिरें आणि महाल दिसत होते, कोठेंहि नांवालासुद्धां चिखल नव्हता. अशी ही अनाविला नदी पाहून आम्ही झांशीला पोहोंचलों. तेथें कवि श्री मैथिलीशरणजी यांचे बंधु–सियारामशरण व चारुशीलाशरण आपल्या

परिवारांतील अन्य व्यक्तींसह जेवण घेऊन आले होते. माझ्या मनांत शंका होती कीं काव्यें वाचून वाचून काव्यें पाडणारे आपले कवि जसें निसर्गाचें प्रत्यक्ष दर्शन हृदय ओतून करीत नाहींत, त्याप्रमाणें या कविबंधूंनीं सुद्धां धसान आणि वेतवा यांच्याविषयीं कांहींच लिहिलें नसेल. म्हणून मीं त्यांना सरळ सरळ सांगून टाकलें कीं जर या दोन नद्यांबद्दल तुम्ही कांहीं लिहिलें नसेल तर तुम्ही निंदेला पात्र आहांत! सियारामशरणजींनीं आपल्या विनयानें मला परास्त केलें. ते म्हणाले, 'आमच्या भैय्याजींनीं (मैथिलीशरणजींनीं) तर या नद्यांविषयीं गातांना म्हटलें आहे कीं शोभेमधें तर बुंदेलखंडांतील या नद्या गंगा–यमुनांपेक्षांहि वरचढ आहेत. अर्थात् माझे मोठे बंधु आपल्या अुपालंभाला पात्र नाहींत. मीं स्वतः या नद्यांविषयीं लिहिलें नाहीं खरें. पण मी कुठें अजून म्हातारा झालों आहें. मला तर अजून पुष्कळ लिहायचें आहे.'

त्यांच्याकडून मला कळलें कीं धसानचें मूळ नांव दशार्ण होतें. आणि वेतवा म्हणजे वेत्रवती हें मला ठाअूकच होतें. दशार्ण = दशाअण = दशाण = धसान. अितकें ध्यानांत आल्यानंतर धसान नांवाविषयीं मीं केलेली स्वैर कल्पना मातीच्या ढिगाप्रमाणें कोसळून पडली. कोणत्याहि पुराव्यावांचून केवळ कल्पनेच्या जोरावर संशोधन करणारे माझ्यासारखे दुसरेहि कित्येक या देशांत असतील. त्यांची चूक दाखवून देणारे जाणकार कुणी नसल्यामुळें निव्वळ कल्पनासुद्धां अितिहास म्हणून रूढ होते आणि मग कांहीं काळानंतर रूढीचे अभिमानी अशा कल्पनेला देखील आवेशानें अुराशीं बाळगूं पहातात!

मीं अेकदां 'वती-मती' वाल्या नद्यांचीं नांवें गोळा केलीं होतीं. त्यामुळेंच वेत्रवती ध्यानांत राहिली होती. जिच्याकांठीं वेत अुगवतो ती वेत्रवती. दृषद्वती (खडकाळ), सरस्वती, गोमती, हाथमती, वाघमती, अैरावती, साबरमती, वेगमती, माहिष्मती (?), चर्मण्वती (चंबल), भोगवती (?), शरावती, अितक्या नद्या तर आतांच आठवत आहेत. आणखी शोध केला तर अजूनहि पांचदहा सांपडतील. महाभारतांत जिथें तीर्थयात्रा प्रकरण येतें तेथें कित्येक नांवें अेकत्र सांगितलेलीं आहेत. परशुराम, विश्वामित्र, बलराम, नारद, दत्तात्रेय, व्यास, वाल्मीकि, सूत, शौनक वगैरे प्राचीन भटक्या भूगोलवेत्त्यांना विचारलें, तर

ते पुष्कळ नांवें देतील, अथवा शोधून काढतील. आपल्या नद्यांच्या नांवांमागें असलेली माहिती, कल्पना, काव्य आणि भक्ति यांच्याविषयीं आतांपर्यंत कुणी संशोधनच केलेलें नाहीं. मग भारतीय जीवन पुन्हां समृद्ध कसें काय होणार ?

नोव्हेंबर १९३९

# : ४५ : निशीथ-यात्रा

जबलपूर जवळील भेडाघाटपाशीं वाहणाऱ्या नर्मदेच्या प्रवाहाचें रक्षण करणारे संगमरवरी पहाड आम्ही रात्रीचे पाहून येऊं अशी कल्पना मध्यरात्रीच्या स्वप्नांत देखील आली नसती. परंतु 'सबिन्दु-सिन्धु सुस्खलत् तरंग-भंग-रंजितम्', असें जिचें वर्णन अेकेकाळीं संध्यावंदनाबरोबर आम्ही गात असूं, त्या शर्मदा नर्मदेचें दर्शन घेण्यासाठीं भेडाघाट हें अेक सुंदर काव्यमय स्थान असलें पाहिजे असा अेक अस्पष्ट विचार मात्र मनाच्या कोठारांत कुठेंतरी सांठवलेला होता.

हिमालयाच्या यात्रेला जातांना रस्त्यांत मी जबलपूरला अुतरलों होतों. पण त्यावेळीं भेडाघाटच्या नर्मदेचें स्मरणसुद्धां झालें नव्हतें. गंगोत्री आणि तिच्या वाटेवर येणारें श्रीनगर यांच्या चिंतनांत गढून गेलेल्याला नर्मदेचें स्मरण व्हावें तरी कसें ? नर्मदाकांठींच्या गहनतेच्या महादेवाला सोडून, मी गंगोत्रीच्या यात्रेला निघालों होतों.

फैजपूर कॉंग्रेसच्या वेळीं फक्त अजिंठ्याला जाण्याचें आम्ही नक्की केलें होतें. पण रेल्वे कंपनीनें झोन तिकिटें काढून आमच्यांत आडवळणें घेअून देखील अधिक प्रवास करण्याची वृत्ति जागी केली. जबलपुरची यात्रा जर फुकट होत असेल, तर जायला हरकत काय ?—असा विचार करून आम्ही निघालों. आम्ही कसल्याहि खास कामानिमित्त जबलपूरला जात नव्हतों हें खरें; पण केवळ अेक दिवस मौज करावी अशी देखील आमची वृत्ति नव्हती.

देशांतील भिन्न भिन्न धार्मिक स्थानें, अैतिहासिक स्थळें, कलामंदिरें आणि निसर्गरमणीय दृश्यें पहाणें याला मीं निव्वळ नयन-तृप्ति कधींच मानलें नाहीं. मंदिरांत देवदर्शनाला जावें त्याचप्रमाणें भूमिमातेच्या विविध विभूतींचें दर्शन घेण्यासाठीं मी आलों आहें अशा भावनेनेंच मी आतांपर्यन्तच्या माझ्या सगळ्या यात्रा करीत आलों आहें. माझ्या देशाची खडान्‌खडा माहिती मला असली पाहिजे आणि त्या माहितीबरोबरच भक्तीचाहि विकास होत गेला पाहिजे अशी माझी अपेक्षा असते.

जसजसा मी प्रवास करतों आणि हृदय अभिमानानें आणि प्रेमानें भरून जावें अशीं दृश्यें पहातों, तसतशी अेक गोष्ट मला सारखी अस्वस्थ करीत रहाते—अितका सुंदर आणि भव्य हा माझा देश परतंत्र आहे आणि त्याला मी जबाबदार आहें. पारतंत्र्याचें हें लांछन कपाळावर घेअून मी या अद्‌भुत-रम्य देशाची भक्ति तरी कशी करूं अशी टोंचणी आंतून लागून रहाते. हा देश माझा आहे असें मी कोणत्या तोंडानें म्हणू ? मी देशाचा आहें यांत शंकाच नाहीं. कारण या देशानें मला जन्म दिला आहे. तोच माझें पालनपोषण अखंड करीत असतो. तोच मला रहावयाला स्थान, खावयाला अन्न आणि विश्रांतीसाठीं आसरा देत असतो. माझ्या मुलांबाळांना त्याच्याच आधारावर मी निश्चिंतपणें सोडूं शकतों; ज्या अुज्ज्वल अितिहासामुळें मी जगांत वर मान करून वावरत असतों तो आर्यांचा प्राचीन अितिहास-देखील याच देशानें मला दिला आहे. अशा रीतीनें माझें सर्वस्व मला देशाकडूनच लाभलें आहे. पण हा ‘ देश माझा आहे ’ असें म्हणण्यासारखें या देशासाठीं मीं काय केलें आहे ? माझ्या जन्माबरोबरच मी या देशाचा झालों खरा, पण देश माझा आहे असें म्हणण्यापूर्वीं मला जन्मभर राबलें पाहिजे.

अशा प्रकारचे विचार-विवर्त मनांत अुठून मी क्षणभर अस्वस्थ होतों, पण या अस्वस्थतेंतूनच धर्मनिष्ठा अुत्पन्न होअून बळकट बनते. या अस्वस्थतेमुळेंच स्वराज्यसंकल्प दृढ बनतो आणि देशासाठीं—देशांत असह्य कष्ट अुपसणाऱ्या गरिबांसाठीं—यत्‌किंचितहि कष्ट सहन करण्याची संधि मिळते तेव्हां अुलट आपणच अुपकृत झालों अशी भावना होते. आणि जसजसा प्रवास करीत जातों तसतसा अंगांत नव्या शक्तीचा संचार झाल्यासारखें वाटूं लागतें.

तरुणांना मी नेहमींच सांगत आलों आहें कीं, 'स्वदेशांत फिरून देशाचें आणि देशांतील लोकांचें दर्शन करण्याची अेकहि संधि दवडूं नका.'

वरील प्रकारच्या उत्कट भावना जेव्हां हृदयांत अुत्पन्न होतात, तेव्हां जवळ कुणी नसेल तर बरें असें वाटणें स्वाभाविक आहे. आपल्या नाजुक भावना लिहून काढून लोकांपुढें ठेवणें हें तितकेंसें कठीण काम नाहीं. पण त्या भावनांमुळें अस्वस्थ होअून आपली जी विह्वळ आणि वेड्यासारखी अवस्था होते ती कुणाच्या दृष्टीस पडणें आपल्याला सहन होत नाहीं. त्यामुळें जेव्हां जेव्हां मी भक्ति-यात्रेसाठीं निघतों तेव्हां तेव्हां आपण अेकटेंच जावें आणि अेकांतांतच निसर्गाचा अनुनय करावा अशी अिच्छा मनांत अुद्भवल्यावांचून रहात नाहीं.

पण माझी जात पडली कावळयाची; अेकअेकटें सेवन केलेलें मला कांहींच पचत नाहीं. त्यामुळें अनिच्छेनें कां होअीना मी सगळयांना सांगून टाकतों कीं, 'माझ्याच्यानें आतां रहावत नाहीं, मी हा निघालोंच.' आणि परिणामीं कुणी ना कुणीतरी सोबत येतेंच. लोकांना वाटतें कीं सोबत गेल्यानें आपल्या चर्मचक्षूंना याच्या प्रेमचक्षूंची जोड मिळेल आणि आपला देश आपण चार डोळयांनीं यथेच्छ पाहून घेअूं शकूं. हीच स्थिति मी माझ्या मित्राला अेका वाक्यांत सांगितली होती कीं. 'मी शोधतों अेकान्त पण साधतों लोकान्त.'

शेवटीं या सगळयाचा परिणाम असा होतों कीं मला समुदायाबरोबर प्रवास करावा लागतो. आणि त्यामुळें माझ्या अुसळल्या भावना मला दाबून टाकाव्या लागतात. अेका बाजूला मन अंतर्मुख होअून चिंतनांत बुडून गेलें असतांहि दुसऱ्या बाजूला बाहेरच्या मंडळींच्या वातावरणाला अनुकूल व्हावें लागतें !

प्रवासांत काय किंवा वाटेल तितकें महत्त्वाचें काम करतांना काय मंगला-चरणांत जर अेखादेंहि विघ्न आडवें आलें नाहीं तर मला अगदीं चुकल्या चुकल्यासारखें होतें. निर्विघ्न प्रवृत्ति माझ्या स्वप्नसृष्टींतहि मीं पाहिली नाहीं, तर मग जागृतींत तर ती संभवेलच कोठून? मोठ्या अुत्साहानें आम्ही भुसावळहून निघालों आणि अिटारसीमधेंच पहिली ठेंच लागली. आगाअू कळविलें असूनहि अिटारसीचे स्टेशनमास्तर आमच्यासाठीं कांहींच व्यवस्था

करूं शकले नव्हते. नवा डबा जोडावा तर तो खेंचण्याची शक्ति अिंजिनमधें नव्हती, कारण अिटारसीआधींच गाडीला अधिकांत अधिक डबे जोडण्यांत आले होते. आणि सगळया डब्यांत माणसें खचून भरली होतीं.

आतां येथूनच परतावें कीं काय? केवढी ही निराशा! अेकदां विचार आला कीं मन आवरावें आणि डोळे पुसण्यासाठीं येथून होशंगाबादपर्यंत मोटरनें जाअून नर्मदामातेचें दर्शन घ्यावें अन् फैजपूरला पोहोंचावें; पण अितका धीर सोडण्याचाहि धीर न झाल्यामुळें शेवटीं आम्ही आलेल्या गाडींतच कसेबसे घुसलों.

जबलपूरला जाअून तेथल्या अेकादोघा स्थानिक सद्‌गृहस्थांच्या मदतीनें आम्ही जवळच्या अेका धर्मशाळेंत जाअून पोहोंचलों आणि मोटर मिळ-विण्याच्या खटपटीस लागलों.

अेखादी मोठी टोळी बरोबर घेअन प्रवास करण्यासाठीं जी व्यवस्था-शक्ति लागते तीच युद्धांत मोठमोठ्या सैन्यांच्या हालचाली करण्यासाठीं आवश्यक असते. अेखादा आश्रम, अेखादी संस्था, अेखादें मंदिर किंवा लहान मोटीं संस्थानें यांचा कारभार चालवतांना ज्या गुणांचा आणि शक्तींचा विकास होतो, तेच अेखादें राज्य अथवा साम्राज्य चालवण्याच्या कामीं अुपयोगी पडतात. अेखादा हुशार, कसलेला शेतकरी संधि मिळतांच अुत्तम कारभारी होअू शकतो, आणि जबरदस्त कारखाने चालवणारा कल्पक व योजक कारखानदार अेखाद्या साम्राज्याचीं सूत्रें अनायासें सांभाळूं शकतो. प्रवासांत माणसाच्या नानाविध कौशल्याची कसोटी होते आणि त्यांत योग्यता पावलेले पुरुष—आणि स्त्रिया देखील—अशा प्रकारें आपोआप पुढें येतात.

हा विचार येथें कसा सुचला हें समजावून सांगण्यासाठीं आतां थांबत नाहीं. आपल्याला वेळेवर भेडाघाटला पोहोंचावयाचें आहे आणि पाअूस तर अगदीं 'हा आलों' म्हणून भरून आला आहे. तसें पाहिलें तर हे कांहीं पावसाळ्याचे दिवस नाहींत. पण हिन्दुस्थानच्या चारहि कोपऱ्यांतून लोक फैजपूरच्या महासभेंत चाललेले पाहून पावसाला वाटलें कीं चला, आपणहि वेगवेगळीं स्थानें पहात फैजपूरला जाअून यावें. पण हिंवाळ्याच्या दिवसांत पावसाच्या पायांत जोर

नसतो. त्यामुळें धावतां धावतां तो रस्त्यांतच कोसळून पडला आणि फैजपूर-पर्यंत पोहोंचूंच शकला नाहीं. त्याच्या हातीं स्वराज्याची ज्योत असती तर कदाचित लोकांनीं त्याला अुठून पुढें धावण्यासाठीं मदत केली असती.

असो. आमच्या दोन्ही मोटारी तैल-वेगानें निघाल्या आणि संध्याकाळच्या वेळीं आम्ही भेडाघाटला पोहोंचलों. संगमरवराचे खडक पहाण्यासाठीं अशा वेळीं या आधीं कुणी आलें नसेल! पण निसर्ग-वेड्या माणसाचा मुळीं वेळेशीं संबंधच काय?

* * *

येथें येअून आम्ही मोठ्या दुग्ध्यांत पडलों. जवळच अेका टेकडीवर महादेवाच्या मंदिराला वेढून चौऱ्यांशी योगिनी तप करीत बसल्या होत्या. तप करतां करतां अहिल्येप्रमाणें त्या शिलारूप झाल्या असतील. रामाच्या चरणाचा स्पर्श होण्याअैवजीं मुसलमानांच्या दंडुक्यांचा स्पर्श झाल्यामुळें त्यांतील बऱ्याचश्या योगिनींची चांगलीच दुर्दशा झालेली आहे. या टेकड्यांच्या पल्याड धुवांधार या नांवानें ओळखला जाणारा अेक प्रसिद्ध धबधबा आहे. तो पहावयाला जावें कीं संगमरवरी खडक पहाण्यासाठीं नौकाविहार करावा?

विहार करण्यासाठीं होड्या फक्त दोनच होत्या, त्यामुळें आम्ही सर्वांनीं अेका गोष्टीवर सहमत व्हावें यांत कांहीं लाभ नव्हता. म्हणून आम्ही दोन तुकड्या केल्या. हें स्थान संगमरवरी खडकांसाठींच प्रसिद्ध असल्यामुळें मोठ्या तुकडीनें त्या बाजूस जाणें पसंत केलें. थोडा अुजेड होता तोंवर ती बाजू पाहून घेण्यांत शहाणपण होतें यांत शंका नाहीं. आमच्या दुसऱ्या तुकडीनें योगिनींचें दर्शन घेअून धुंवाधारला जाण्याचें नक्की केलें आणि आम्ही पायऱ्या चढूं लागलों. सगळया योगिनींचें दर्शन आम्ही आमच्या हातांतील अेका विजेच्या लहानश्या मशालीच्या साहाय्यानें घेतलें. मूर्तींचें कोरीव काम सुंदर आणि कलापूर्ण वाटलें. मंदिरांतील महादेव आणि त्यांचा नंदीदेखील पहाण्यासारखा होता.

मनांत विचार आला कीं जेव्हां अेखाद्या लढाअींत आपण घायळ होतों तेव्हां ताबडतोब अिलाज करून बरे होतों. गांवांत अेखाद्या रोगराअीनें माणसें मेलीं तर लगेच त्यांना जाळून किंवा गाडून टाकतों. जमिनीवर दूध

सांडलें तर त्याचे अभद्र डाग जमिनीवर राहूं नयेत म्हणून आपण जमीन लिंपून टाकतों. मनुष्यस्वभाव हा असा असूनहि आपल्या खंडित मूर्ति तेवढ्या आपण अजून जशाच्या तशा कां राहूं दिल्या आहेत? धर्मांध मुसलमानांचें स्मारक म्हणून? कीं आपल्या भ्याडपणाचा आणि सामाजिक बेजबाबदारपणाचा कबुलीजबाब म्हणून? अप्रतिम कलामूर्ति तयार करण्याचें कसब आपल्या देशांतून कायमचें नष्ट झालें असेल तर अशा प्राचीन अवशेषांचे नमुने सांभाळून ठेवणें सर्वथा योग्य होय. पण मीं पाहिलें आहे कीं आबूच्या पहाडावरील देलवाडच्या मंदिरांत संगमरवरी पाषाणावरील कारीगरी करणाऱ्या कुटुंबांची कायमची नेमणूक करण्यांत आली आहे आणि मंदिराच्या कोणत्याहि भागांत कांहीं मोडतोड झाली तर लगेच मुळाबरहुकूम त्याची दुरुस्ती करण्यांत येते. आणि त्याचप्रमाणें लाहोरच्या म्युझियममधें सुद्धां मीं पाहिलें आहे कीं मूर्तींचा अेखादा कुशल सर्जन घायाळ झालेल्या मूर्तींचे हात पाय नाक ओठ वगैरे सिमेंटच्या मदतीनें बेमालूम रीतीनें सांधूं सुधारूं शकतात. परंतु आपलीं मंदिरें योग्य अथवा पुरुषार्थी लोकांच्या ताब्यांत आहेतच कुठें? 'धनी नसलेलीं ढोरें' अशी आपल्या समाजाची अवस्था आहे.

योगिनींचा आशीर्वाद घेअून आम्ही टेकडी अुतरूं लागलों. अजूनहि अंधुक अंधुक प्रकाश होता त्यामुळें आम्ही हसत खेळत पण लगबगीनें धुवांधारच्या शोधांत निघालों. पुढें जाणाऱ्यांचा लगाम खेंचण्याचें आणि मागें रेंगाळणाऱ्यांवर चाबूक ओढण्याचें काम अेकाच जिभेला करावयाचें होतें. माझा अनुभव आहे कीं नव्यानें लाभलेल्या स्वातंत्र्याचें वारें कानांत शिरलेल्या मेंढरांवासरांना जसजसें जवळ आणण्याचा प्रयत्न करावा तसतसें कळप सोडून दूर दूर भटकण्यांत त्यांना मोठी बहादुरी वाटूं लागते. आणि मग त्यांच्यावर रागावून त्यांना परत आणण्यांत जे कष्ट पडतात त्यामुळें मेंढपाळाला देखील आपलें महत्त्व वाढल्यासारखें वाटूं लागतें. परस्परांच्या खेचाताणींतून अुद्भवणाऱ्या त्रासाची मौज दोघांनाहि सोडवत नाहीं.

जिकडे पहावें तिकडे पांढरे पांढरे दगड. जबलपूरचाच तो प्रदेश! पण अेके ठिकाणीं आम्हांला शंखजिऱ्याचें अेक शेतच्या शेतच सांपडलें. शंखजिरें ही अेक अद्भुत वस्तु आहे. दगड तर खराच; पण अगदीं मअू. जणूं

काय पेन्सिलींतलें शिसें. लहानपणीं अेकदां मला संग्रहणीचा विकार झाला होता त्यावेळीं या शंखजिऱ्याची पूड वस्त्रगाळ करून माव्याच्या बरफींतून खावयाला घातली होती. तेव्हांपासून शंखजिऱ्यावर माझी श्रद्धा बसली होती. आंतड्यांत आवेमुळें जेथें जेथें घाव झाले असतील तेथें तेथें ही पूड भरून, जखम भरून येण्यास मदत करते. आणि जखम भरून आली कीं पूड आपोआप पोटांतून बाहेर पडते. दगडाची पूड, ती पचणार थोडीच आहे! पोटांत राहिली तर रोग व्हायचा. पण आपलें काम पुरें झाल्याबरोबर आभाराचीं वचनें वसूल करण्यासाठीं सुद्धां अधिक दिवस रहाण्याची चूक ती करीत नाहीं.

आतां तर चहूंकडे चांगलाच अंधार पसरला होता. सर्वत्र भयंकर अेकांत होता. आणि समुद्रांतून अेखादें जहाज चालावें त्याप्रमाणें त्या अेकांताला कापीत आमची तुकडी पुढें जात होती. हवा कांहींशी कुंद वाटत होती. पाअूस केव्हां येअील त्याचा नेम नव्हता. आकाशांत पाहिलें तों काळ्या काळ्या ढगांमधें अेका बाजूस अेक चांदणी चमकत होती. चमकत कसली? दुःखाकष्टानें बिचारी हळूंच डोकावून बघत होती. अेका मोठ्या विशाल वाड्यांत अेखादी अेकाकी वृद्धा झरोक्यांत बसून ओस पडलेल्या रस्त्यावर पहात असावी त्याप्रमाणें. आम्ही पुढें निघालों. येथून जमीन चांगलीच ओलसर होती. मधून मधून पाण्याचीं व चिखलाचीं डबकींसुद्धां लागत.

अंधार चांगलाच वाढला होता. खड्डयांखळग्यांतून मार्ग काढणें कठीण होअूं लागलें. पुढें जाण्याचा अुत्साह पार ओसरला. अशा अडचणीच्या जागीं अंधाऱ्या रात्रीं येथपर्यंत आलों त्यालाच प्रवासाचा आनंद मानून आम्ही परत फिरण्याचा विचार केला. अशा निर्जन आणि भयानक जागीं चोर भेटला तर!—अशी शंकाहि मनाला चाटून गेली.

कित्येक लोकांना अेकट्यानें प्रवास करतांना चोरांचिलटांची भीति वाटते; मोठा समुदाय असला तर ही भीति जणूं काय सगळ्यांमध्यें विभागली जाअून प्रत्येकाच्या वांट्याला फारच थोडी येते आणि अेकमेकांच्या आधारानें प्रत्येक जण आपली भीति मनांतल्या मनांत दाबून देखील टाकूं शकतो. कित्येक लोकांचें याहून अगदीं अुलट असतें. अेकटें असल्यावर त्यांना स्वतःबद्दल कसलीच पर्वा वाटत नाहीं. आपलें वाटेल तें होवो. मारामारीचा

प्रसंग आला तर मनमुराद लढतां लढतां अब्रू राखून सगळ्या शरीरभर मार खाण्यांत कसलेंच विशेष नुकसान नाहीं; आणि वृत्ति अहिंसक असेल तर राग येअूं न देतां किंवा भयानें पळून न जातां मार खात रहाण्यांतहि कांहीं वेगळीच मौज आहे; सत्याग्रही वृत्तीनें खाल्लेला मार देणाऱ्यालाच बाधत असतो, कारण अहिंसक व्यक्तीला मारणारा प्रत्येक क्षणीं आपल्याच मनासमोर फजीत होत असतो.

परंतु जेव्हां मोठी टोळी सोबत असते तेव्हां त्यांच्यापकीं प्रत्येकजण कसा काय वागेल याची आपल्याला खात्री नसते. मुलें किंवा बायका बरोबर असल्या तर वेगळ्याच रीतीनें विचार करावा लागतो. आपला जीव धोक्यांत घालण्यांत जी अेक खुमारी असते ती येथें अनुभवास येत नाहीं. सगळेच सत्याग्रही असले तर गोष्ट वेगळी, पण मोठें खिचडी टोळकें बरोबर घेअून संकटाच्या जागीं कधींहि जाअूं नये. श्रीकृष्णाच्या कुटुंब-परिवाराला घेअून जाणाऱ्या वीर अर्जुनाची देखील काय दशा झाली तें आपण पुराणांत वाचतोंच.

या अशा अंधारांत खडकांमधून मार्ग काढीत कोठवर जावयाचें आणि तेथें काय पहायला मिळणार, त्याची कल्पना नसल्यामुळें येथूनच परत जाणें चांगलें असा विचार मनांत आला. अितक्यांत अुजव्या बाजूस अेक लहानशी मोडकळीस आलेली झोंपडी दृष्टीस पडली. ही चोराची तर नसेल ? तर अशा निर्जन प्रदेशांत चोर चोरी तरी कसली करणार ? पण चोरी करून थकल्यानंतर शांत आणि निवांतपणें बसण्यासाठीं ही जागा चांगली आहे. चोराच्या शोधांत निघालेल्या लोकांना येथपर्यन्त येण्याची कल्पना सुद्धां शिवणार नाहीं.

अथवा या झोंपडींत निरंजनाचें ध्यान करणारा अेखादा अलक्ष अुपासक साधु रहात असेल ? आम्ही जवळ गेलों. आंत कुणीच नव्हतें ! तर मग ही झोंपडी साधूची असणें शक्य नाहीं. फकीर जसा सारा दिवस वाटेल तिकडे भटकला तरी रात्रीं मशिदींत परत आल्याशिवाय रहाणार नाहीं. तसेंच बावा असेल तर त्याची रात्र बाहेर कुठेंहि न जातां, आपली सहचरी आगीची धुनी हिच्या सहवासांतच जावयाची.

तर मग ही झोंपडी मासे मारणाऱ्या कोळी लोकांची असली पाहिजे. कुणाची कां असेना, आपल्याला त्याचें काय ? आपल्याला थोडीच आजची

रात्र येथें काढावयाची आहे ? थोडेसें पुढें गेल्यावर खात्री झाली कीं रस्ता वगैरे ठीक नसल्यामुळें आतां अंधारांत पुढें जाणें म्हणजे केवळ कष्टांनाच आमंत्रण देण्यासारखें आहे. म्हणून मीं हुकूम सोडला कीं, 'चला आपण आतां परत फिरूं या.' अितक्यांत जणूं काय आमची सत्त्वपरीक्षा पुरी झाली असावी त्याप्रमाणें मेघ थोडेसे पांगले आणि बरोबर डोक्यावर आलेल्या चंद्रानें 'पश्याश्चर्याणि भारत' म्हणून आसपासचा सगळा प्रदेश प्रकाशित केला. सूर्य सगळेंच प्रगट करून दाखवतो त्यामुळें त्याच्या प्रकाशांत कसलेंच काव्य नसतें. अंधाऱ्या रात्रीं आकाशांतल्या ताऱ्यांमधेंच विचरणाऱ्या दृष्टीला चंद्र पृथ्वीवर घाढून देतो आणि म्हणतो, 'थोडें डोळयांनीं पहा आणि बाकीचें सगळें कल्पनेनें भरून काढा.'

चंद्रानें मदत केली आणि दूरवरून धुवांधारचा अुद्घोषहि कानीं पडूं लागला. माझा हुकूम बाजूलाच राहिला आणि सगळीं पावलें जोरजोगानें पुढें पडूं लागलीं. थोडेंसेंच पुढें गेलों आणि जणूं काय दुधाचा स्रोत अुतरत असावा तसा धुवांधार नजरेस पडला. सर-सर धब-धब ! सुळमुळ धब-धब ! कर्रर्र धब–धब ! धब–धब; धब–धब ! अुन्मत्त पाणी वहातच चाललें होतें आणि त्या पाण्यांतून बाहेर पडणारी सीकरवृष्टि सर्वत्र पसरत होती. वृष्टि कसली ? तुषारांचें कारंजेंच तें ! किती आतिथ्यशील ! सूक्ष्म जीवन-कणांनीं आमच्या जीवन क्षणांचें सार्थक केलें. चंद्र हसत होता, पाणी खेळत होतें, तुषार अुडत होते, हवा झुलत होती नी आम्ही डोलत होतों. हें पहा, हें पहा, तिकडे बघा, काय मौज आहे, अशा अुद्‌गारांचा धबधबा पहातां पहातां सुरूं झाला. आमच्या बरोबर आलेल्या स्वयंसेवक वाटाड्यानें वेगवेगळया ऋतूंत धुवांधार कसा दिसतो त्याचें वर्णन करायला सुरवात केली. येथें लोक पोहायला कसे येतात, कुठून अुड्या मारणें शक्य आहे, अुन्हाळयांत धुवांधारची अुंची किती असते वगैरे बरीचशी माहिती त्यानें आम्हांला अैकवली आणि आपल्या माहितीबद्दल व रसिकतेबद्दल आमच्याकडून आपली पाठ थोपटून घेतली. आतां सगळे शांत झाले आणि टक लावून धुवांधारशीं अेकरूप होण्यांत गढून गेले. किती भव्य-पावन दर्शन तें ! अरणीच्या मंथनांतून प्रथम अुष्णता अुत्पन्न होते; त्यानंतर धूर निघूं लागतो. तो धूर वाढतां वाढतां त्यांतून ठिणग्या अुडूं लागतात आणि नंतर ज्वाळा निघूं लागतात.

त्याचप्रमाणें निसर्गयात्रेंतून प्रथम कुतूहल जागृत होतें, त्यांतून अद्‌भुतता जन्म घेते आणि ती बरीचशी गोळा झाली कीं अेकाअेकीं भक्तीचा अुमाळा बाहेर पडतो. ‘चला आपण येथें शिलेवर बसून प्रार्थना करूंया.’ प्रार्थनेसाठीं असलें पवित्र स्थान आणि असली शुभघडी नेहमीं मिळत नसते. सर्वजण पटापट जागा सांपडली तेथें बसले आणि ‘यं ब्रह्मा वरुणेन्द्र...’ चा ध्वनि धुवांधारच्या कानीं पडला.

वेगवेगळया वेळीं जसे वेगवेगळे राग आळवण्यांत येतात त्याप्रमाणें वेग-वेगळया स्थळीं मला वेगवेगळीं स्तोत्रें सुचतात. हिंदुस्थानाच्या दक्षिणेस कन्या-कुमारीला तीनदां गेलों होतों त्यावेळीं मला गीतेचा दहावा आणि अकरावा अध्याय सुचला होता. विभूतियोग आणि विश्वदर्शन-योग यांचें पठन करण्यासाठीं तेंच स्थान योग्य आहे. आणि जेव्हां सिलोनच्या मध्यभागीं—अनुराधापुराजवळ—महेन्द्र पर्वताच्या शिखरावर दिवस मावळण्याच्या सुमारास पोंचलों होतों, त्यावेळीं पाटलिपुत्राहून आकाशमार्गानें येअून, या शिखरावर अुतरणाऱ्या महेन्द्राचें स्मरण करून मी अीशावास्योपनिषदाचा पाठ केला होता. अनात्मवादी बुद्‌ध शिष्यांच्या आत्म्याला अीशोपनिषद अैकून काय वाटलें असेल देव जाणे ! आणि पुण्याहून शिवनेरीला गेलों होतों त्यावेळीं किल्लया-वरील मशिदीच्या अुंच भिंतीच्या पायऱ्या चढून, श्रीशिवाजीमहाराजांच्या बाल्यकाळींच्या क्रीडाभूमीचें दुरून दर्शन घेअूं लागलों आणि कसें कोण जाणे, मांडुक्योपनिषद योग्य वाटलें. तें अुपनिषद समर्थ रामदासांचें आवडतें होतें असें मानण्यास कसलाहि पुरावा नाहीं. पण ‘नान्तः प्रज्ञं न बहिःप्रज्ञं नोऽभयतः प्रज्ञं न प्रज्ञानघनम् न प्रज्ञं नाप्रज्ञम्।’ ही कंडिका बोलत असतांना जणूं काय शिवकालीन महाराष्ट्र आणि आत्मारामाची अभेदभक्ति करणारे साधुसंत यांच्याशीं मी अगदीं तादात्म्य पावत होतों. ‘जळो हें वेगळें व्यक्तित्व; अेकरूप सर्वरूप होअून जावें या समस्त दृश्याशीं’ असें त्यावेळीं झालें होतें. धुवांधारची मस्ती व त्याच्या तुषारांचें हास्य पाहून येथें स्थितप्रज्ञाचीं लक्षणें गाणें योग्य वाटलें.

अुत्कट भावनेचें सेवन फार वेळपर्यंत सारखें करीतच राहिलें पाहिजे असें नाहीं. अेखाद्या आलापांत अेका समस्त भावसृष्टीचा समावेश करणें शक्य

आहे. अेका जलबिंदूंत प्रचंड सूर्य प्रतिबिंबित होअूं शकतो. अेका दीक्षामंत्रानें युगायुगांचें अज्ञान दूर करतां येतें. तसेंच अेका घटकेंत धुवांधारचें वातावरण आम्ही आपलेंसें केलें. डोळयांची शक्ति किती विलक्षण आहे! धुवांधारचें पान तोंडानें करणें अशक्य होतें. आम्ही थोडेच कुंभसंभव अगस्ति होतों! पण आमच्या डोळयांतील दोन लहानश्या बाहुल्यांनीं त्या अखंड वाहणाऱ्या धबधब्याचें आकंठ पान केलें. मला वाटतें अशा दृक्‌पानाला 'आ-कंठ' न म्हणता 'आ-पक्ष्म' म्हटलें पाहिजे. आम्ही सर्वांनीं आपापल्या डोळयांत ही लूट अेका क्षणांत भरून घेतली; आणि परत फिरलों. आमची ही सगळी भुतावळ तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी करीत आणि गर्जना जागवीत मोटरीच्या अड्डयावर येअून पोंचली.

येथें भेडाघाटचे संगमरवरी पाषाण पाहून आलेली आमची तुकडी आम्हांला भेटली. अेकमेकांच्या अनुभवांची आम्ही देवाणघेवाण केली आणि त्या तुकडीला जाणत्या अनुभवी व्यक्तीच्या भूमिकेवरून सल्ला दिला कीं, 'अितक्या रात्रीं धुवांधारला जाण्यांत कांहींच अर्थ नाहीं, म्हणून तुम्ही तैलवाहनांत बसून सरळ जबलपूरला जावें. आम्ही मात्र तुम्ही गेलेल्या ठिकाणीं थोडा नौकाविहार करून लगेच परत येतों.' आमचा हा सल्ला त्या तुकडीला रुचला कीं नाहीं कोण जाणे. पण तो मानल्यावांचून गत्यंतर नव्हतें.

रस्त्याच्या कडेनें अुतरत अुतरत आणि अंधारांत अडखळत ठेचाळत आम्ही प्रवाहाच्या कांठापर्यन्त पोंचलों. आणि पुन्हा आमच्या दोन तुकड्या करून आम्ही दोन होड्यांत जाअून बसलों. आमची होडी पुढें निघाली. जिथें पहावें तिथें तुडुंब शांति भरलेली होती. आणि ती किती खोलवर पसरलेली आहे त्याचा ठाव घेण्यासाठीं कीं काय मधून मधून आमच्या होडीचीं वल्हीं तालबद्ध आवाज करीत होतीं. चंद्र आपली मिणमिणती मशाल शिरावर धरून, 'आसपासची शोभा दिवसा कशी दिसत असेल याची कल्पना करा.' असें जणूं कोडें घालीत होता. कित्येक ठिकाणीं केवळ अंधार होता. मधें मधें चांदण्याचे डाग पडलेले होते. आकाश निरभ्र नव्हतें त्यामुळें चांदणें ताकाप्रमाणें पातळ बनलें होतें. आणि आकाशांतील ढग अधून मधून मलमलीप्रमाणें तलम आहेत ही गोष्ट लक्ष वेधून घेत

होती. दोन्ही अंगाचे संगमरवरी पाषाण किती अुंच दिसत होते! अुंच आणि भीषण! जणूं अेखादी राक्षसांची जमात येथें येअून बसली असावी! आणि या खडकांमधून वळणें घेत घेत नर्मदेचा प्रवाह आपला चक्रव्यूह रचीत होता.

अुंच अुंच खडक अथवा पहाड जेथें अगदीं जवळ जवळ येतात, तेथें 'प्राचीन काळांत अेका सरदारानें आपला घोडा टांच मारून या शिखरावरून समोरच्या शिखरावर फेकला.' अशा प्रकारची दंतकथा अस्तित्वांत यावयाचीच. वांदरें तर खरोखर अशा अुड्या मारतातच. येथें सुद्धां अशा गोष्टी होडीवाल्या खलाशाकडून तुम्हांला अैकायला मिळतील.

येथल्या या खडकांत कित्येक गुंफा देखील आहेत. या गुंफांमधें अृषिमुनि ध्यानधारणेसाठीं रहात असलेच पाहिजेत, आणि मध्ययुगात राजकुलांतील आपद्ग्रस्त लोक आणि स्वातंत्र्याची साधना करणारे देशभक्तसुद्धां येथेंच आत्मरक्षणासाठीं लपून राहिले असतील, आणि मग चिचुंद्रीप्रमाणें सरकणाऱ्या होड्या अशा लोकांना गुप्तपणें आहार, समाचार आणि आश्वासन आणून पोहोंचवीत असतील. या गुंफांना जर वाचा असती तर अितिहासांत नोंदला न गेलेला असा कितीतरी वृत्तांत त्यांनीं आपल्याला सांगितला असता.

होडींत बसून खिंडीच्या मधोमध जातां जातां आम्ही अशा अेका ठिकाणीं येअून पोंचलों कीं ज्याला शांतीचें गर्भगृह म्हणतां येअील. येथें आम्ही वल्हीं मारणें बंद करवलें, श्वाससुद्धां अैकूं येअील या भयानें मंद केला. प्रार्थनेचे श्लोक आम्ही तेथें अुच्चारले किंवा नाहीं तें आठवत नाहीं. पण मीं मात्र मनांतल्या मनांत सोळा अृचांचें पुरुषसूक्त मोठ्या अुत्कटतेनें बोलून घेतलें. नंतर वाटलें अितक्या शांतीमधें आपोआप समाधीच लागायला हवी. किती वेळ निघून गेला कोण जाणे. पण तेवढ्यांत डब्र डब्र डब्र करीत दुसरी होडी येअून ठेपली. त्यांतल्या टोळीनें अेक मंजुळ गीत गाण्यास प्रारंभ केला. आसपासच्या दरडी त्याचा पडसाद अुमटवावा किंवा नाहीं या दुविधेंत अर्धेमुर्दे अुत्तर देत होत्या.

आतां येथून पुढें जाणें शक्य नाहीं, येथूनच परत वळणें भाग आहे असें होडीवाल्यानें सांगितलें. त्यामुळें आम्ही धावणाऱ्या मनाला मागें खेचून म्हणालों, 'चला तर मग! पुनरागमनायच!'

आतां जावयाचें तें वर्षाऋतूच्या शेवटीं, चांदण्याच दिवस पाहून, दिवसरात्र या मूर्तिमंत काव्यांत डुंबत रहाण्यासाठींच जावयाचें. खरोखर, तें रमणीय स्थान पाहून मनानें नक्की केलें कीं जर पुन्हा येथें येणें होणार नसेल तर येथून निघायचेंच नाहीं.

ऑक्टोबर १९३७

# : ४६ : धुवांधार

अजा, बिजा, तिजा ! धुवांधार अलीकडे तिसऱ्यांदा पाहून घेतला. धुवांधार नांव चांगलें आहे. नांवांतच सगळें दृश्य येऊन जातें. पण यावेळीं तो प्रपात पाहतां पाहतां वाटलें कीं याला धारधुवां कां म्हणूं नये ? आधीं धार पडते, मग त्यांतून कारंजीं अुडतात आणि लगेच तुषार बनून धुक्यासारखे लोळ हवेंत तरंगू लागतात, म्हणून धारधुवां हेंच नांव अगदीं नेमकें आहे. पण नेमकें असलें तरी तें नांव चालणार नाहीं !

जबलपूरहून तेथले गोल गरगरीत दगड आणि चमचमणारे तलाव पहात पहात आपण नर्मदेच्याकांठीं येअून पोहोंचतों. रस्त्यामधलें दृश्य सांगतें कीं ही काव्यभूमि आहे. जिथें पहावें तेथें लहानमोठीं झाडें खेळ खेळत अुभीं आहेत. जवळच अेक मोठी दरड कोसळून पडलेली आहे. पण तिच्या माथ्यावर अुगवलेलीं झाडें आपलीं अर्धीं मुळें तुटून गेलीं असतांनाहि जरासुद्धां दुःखी-कष्टी किंवा चिंतातुर दिसत नाहींत. अशा झाडांपासून जीवनदीक्षा घेअूनच पुढें गेलें पाहिजे.

दरड जरी कोसळली, तरी तुटलेला भाग कांहीं सहजासहजीं जमीनदोस्त होत नसतो. त्यानें अेक दोन मनोरे आणि अेक मोठें शिखर बनवून ठेवलें आहे, जें म्हणत असतें कीं विनाशामधून देखील जर नवी सृष्टि आम्ही पैदा केली नाहीं तर आम्ही कल्प-कवि कसले ? दरडीवरून खालचें दगडा-पाण्याचें दृश्य स्वाभाविकपणें दृढतेचे आणि तरलतेचे विचार अेकाच वेळीं

मनांत अुत्पन्न करीत होतें. पूल ओलांडून पुढें आलों आणि योगिनींच्या टेकडीच्या पायथ्याचें अनेकदां पाहिलेलें बाजारी दृश्य पाहिलें. हें दृश्य अितकें केविलवाणें आहे कीं त्याच्याबद्दल चीड देखील अुत्पन्न होत नाहीं. येथले गरीब कारागीर दगडांच्या लहानमोठ्या वस्तु बनवून विकण्यासाठीं बसतात. पांढऱ्या, काळ्या, लाल, आकाशी आणि रंगीबेरंगी संगमरवरी अंडाकृति बाणांच्या शेजारीं शंखजिऱ्याच्या डब्या, शिवालयें, हत्ती आणि अशींच लहानमोठीं खेळणीं स्वयंवर मांडून अुभीं असतात. ज्याच्या नजरेस तीं पडतात तो त्यांना अुचलून घेअून जातो. हीं सगळीं खेळणीं आज अेकाच आसनावर बसलेलीं आहेत. अुद्या अुठून कोठलें खेळणें कुठें जाअील कोण जाणे! कित्येक तर हिंदुस्थानाबाहेर देखील जातील आणि तेथें कित्येक वर्षें धुवांधारचें धारावाहिक संगीत पुनः पुनः आठवून मूकपणानें तें अैकवतील.

दोनदां येथून धुवांधारपर्यंत चालत जाण्याची तपश्चर्या केली होती. पहिल्या वेळचा प्रवास रात्रीचा केला होता. दुसऱ्या वेळचा सकाळीं आंघोळीच्या वेळीं. प्रत्येकाचें काव्य वेगळें. यावेळीं तिसरा प्रहर पसंत केला होता. या खेपेस अधिक तपस्या करावी लागली नाहीं. व्योहार राजेन्द्रसिंहजींनीं आपलें तैलवाहन (मोटर) आमच्या स्वाधीन केल्यामुळें जवळजवळ धुवांधारपर्यंत आम्ही विना-सायास पोहोंचलों शंखजिऱ्याच्या शेताजवळ अुतरून, तेथल्या माळरानांतील तीन दुकानें मागें टाकून, दगडांमधून वाट काढीत आम्ही धुवांधारला पोंचलों. दगड जसजसे अडथळे अुत्पन्न करीत तसतशी आमच्या चालण्याच्या अुत्साहांत भर पडे. असें करतां करतां आम्ही धुवांधारला जाअून पोंचलों.

प्रपात म्हणजे जीवनाचा अधःपात, पण येथें तसें कांहीं वाटत नाहीं. पहिल्या वेळीं गेलों होतों तो डिसेंबर महिन्यांत आणि अंधारांत. आकाशांतील ढग चंद्राविरुद्ध कट करून बसले होते त्यामुळें चांदणी रात्र असूनहि तेथें अमा-वास्येची भीषणता पसरलेली होती. अमावास्येच्या रात्रीं आकाशांतले तारे त्या भीषणतेला हंसण्यावारी नेत असतात. पण ढगांमुळें ती देखील आशा अुरली नाहीं. परिणामीं त्या रात्रीं धुवांधारलाच आपल्या भव्यतेनें आम्हांला प्रसन्न करावें लागलें होतें. रात्रीची प्रार्थना करून आम्ही तो आनंद आत्मसात् केला आणि परत आलों.

दुसऱ्या वेळीं गेलों होतों ते त्रिपुरी कॉंग्रेसनंतर, नअू दहा वाजण्याच्या सुमारास वाढत्या अुन्हाच्या स्वागताचा स्वीकार करीत. धुवांधारचें संपूर्ण दर्शन असें त्याच वेळीं करूं शकलों होतों. मार्च महिना होता त्यामुळें पाण्याला अुन्हाळी दुष्काळाची बाधा झालेली नव्हती. कड्याच्या कांहीं खडबडीत पायऱ्या अुतरून खालून आम्ही धुवांधार कसा पडतो तें पाहून घेतलें. पाण्याचा तो वेग आणि कारंज्यांची ती चंचलता आश्चर्यकारक रीतीनें मनाला स्थिर करते. पाण्याकडे सारखें पहातच राहिलें कीं मग अनुभवास येतें कीं नवनवोन्मेषशालिनी धारा वेगाची समाधि लावून अुभ्या आहेत. त्याचवेळा मला दिसून आलें कीं तेथले शेवाळलेले दगड वरून कसेहि दिसत असोतीं- आंतून मात्र प्रेमाचा रंग खुलवीत असावेत तसे लाल आहेत. पाण्याच्य, आवेगानें दगडाची अेक खपली अुडाली आणि जणूं काय जखम झाली असावी त्याप्रमाणें आंतला गुलाबी रंग स्पष्ट दिसूं लागला.

धुवांधार पहाण्याचा अुत्तमांत अुत्तम ऋतु म्हणजे दिवाळीचा. पाअूस नसल्यामुळें रस्त्यांत कुठेंहि चिखल नसतो. पावसाळ्यांत सारा प्रदेश जलमय होत असल्यामुळें धबधब्याला वेगळें स्थानच अुरत नाहीं. जेथें आज अन्तःकरण हलवून सोडणारा धबधबा आहे, त्याच ठिकाणीं पावसाळ्यांत डोकें चक्कर येअून भ्रमूं लागावें असे भोंवरे दिसत असले पाहिजेत. त्या भोवऱ्यांचें रुद्र स्वरूप पहाण्यासाठीं येथवर येणें जर शक्य होत असेल तर मी आल्या वांचून रहाणार नाहीं. भोंवरा म्हणजे क्रांतीचें प्रतीक. त्याचें आकर्षण कांहीं आगळेंच असतें. आणि कधीं कधीं प्राणघातक देखील!

दिवाळीच्या वेळीं जलराशि सर्वांत अधिक पुष्ट, धबधब्याची शोभा सर्वांत समृद्ध आणि गोड अुन्हाचें सेवन केल्यानंतर तुषारांच्या ढगांचे गुलगुलीत चिमटे सर्वांत अधिक आह्लादक असतात. माझ्या अपेक्षेप्रमाणेंच आजचें दृश्य होतें. तुषारांचे लोटच्या लोट दुरूनच दिसत होते. स्वयंपाक घरांतील धूर पाहून अतिथीला ज्याप्रमाणें आनंद होतो, त्याप्रमाणें या 'धुवां' चें लोट पाहूनच आतां येथें आपल्याला कसली मेजवानी मिळणार आहे त्याची मला कल्पना येअून चुकली. धारधुव्यां सारखा धबधबा पहावयाला जायचें असतें तेव्हां फळ्यांचा अेक कामचलाअू पूल देखील कलापूर्ण व आतिथ्यशील वाटूं

लागतो. आम्ही परिचित कांठावर जाअून बसलों आणि गेल्याबरोबर प्रेमळ वाऱ्यानें तुषारांची अेक झडप आमच्याकडे धाडून म्हटलें ‘स्वागतम्’, ‘सुस्वागतम्’. अेका क्षणांत आमचा अध्वखेद अुतरला. आम्ही ताजेतवाने झालों आणि टवटवीत डोळ्यांनीं धुवांधार पाहूं लागलों.

धुवांधार म्हणजे दगडांच्या विस्तारांत तयार झालेली अर्धचंद्राकार दरी. त्यावरून जेव्हां पाण्याचा जथ्था खालीं अुडी घेतो त्यावेळीं मध्यभागीं दिसणारा काचेसारखा हिरवा रंग विषाप्रमाणें भय अुत्पन्न करतो. त्याच्या डाव्या म्हणजे आपल्या अुजव्या बाजूचा खडक हत्तीच्या मस्तकाप्रमाणें पुढें आलेला आहे. त्याच्यावरून जेव्हां पाणी खालीं पडतें तेव्हां असंख्य हिऱ्यांचे हार पायऱ्या पायऱ्या वरून अुड्या घेत घेत शर्यत लावीत असावेत असा भास होतो. अुड्या घेत आहेत नी हसत आहेत आणि पाणी पिंजून पिंजून त्यांतून पांढरा रंग खुलवीत आहेत. मधला मुख्य धबधबा दरींत पडला रे पडला कीं लगेच अितक्या जोरानें वर अुसळतो कीं दारूकामांतील बाणांना सुद्धां त्याचा हेवा वाटावा. अेक फवारा वर अुडून जरा शिथिल होतो न होतो तोंच दुसरा फवारा नव्या जोमानें त्याच्या मागोमाग येअून धक्का देअून त्याला फोडून टाकतो आणि मग त्याचा चक्काचूर, पृथ्वीचें आकर्षण विसरून जाअून, धुराच्या रूपांत व्योम-विहार करूं लागतो. हे तुषार कांहींसे वर आले कीं वाऱ्याच्या झोतांची परंपरा त्यांना अुडवीत अुडवीत चहूंकडे पसरवते. या धुराच्या जाड पातळ लाटा जेव्हां हवेंत धावूं लागतात तेव्हां वायलच्या साडीवरील मजेदार नक्षी त्यांच्यावर दिसूं लागते.

आणि खालीं! खालच्या पाण्याच्या मस्तीचें वर्णन होअूंच शकणार नाहीं. जणूं काय पाणी अद्वैतानंदांत घसरून पडलें. जितकें पडलें तितकेंच वर अुडलें. हिरव्या रंगांतून पांढरा फेस अुत्पन्न केला आणि मनांत येअील तसा विहार केला. तो अपूर्व लाहो आठवून आठवून खालचें पाणी पुनः पुन्हां अुचंबळून येत होतें. धोबी घाटावरील पाण्याची अुपमा जर अरसिक नसती तर खालच्या पाण्याच्या अुचंबळण्याला मी तीच अुपमा दिली असती. पण धोब्याच्या साबणाचें पाणी गलिच्छ असतें. त्यांत वेग आणि मस्ती सुद्धां नसते, बेपर्वाअी आणि तांडव तर मुळींच नसतें. आणि हास्य मावळतांच चेहऱ्यावर

पुन्हा निर्मळ भाव धारण करण्याची कला देखील त्याला साध्य झालेली नसते. मग येथलें पाणी पाहून धोब्रीघाटाचें मुळीं स्मरणच कसें झालें ? त्यांत कसल्याच प्रकारचें औचित्य नव्हतें.

माणसाला समाधीची मस्ती अनुभवायची असेल तर त्यानें या स्थानीं यावें. कोणत्याहि कारणामुळें त्याच्या पदरीं निराशा येणार नाहीं.

या बाजूच्या (अुजव्या) कड्याच्या दोन पायऱ्या या वेळीं पुन्हा अुतरलों. येथें यावेळीं अुपनिषद् गावेंसें वाटलें. माथ्यावर सूर्य तळपत होता आणि मी तोंडानें गात होतों–'पूषन्नेकर्षे ! यम ! सूर्य ! प्राजापत्य ! व्यूह रश्मीन्; समूह तेजो।' जेव्हां पहिला पाठ संपत आला आणि मी 'ॐ क्रतो स्मर; कृतं स्मर।' म्हणालों तेव्हां अेकाअेकीं तीनचार वर्षांचें माझें संपूर्ण जीवन साकल्यानें या जीवनधारेसमोर खडें झालें आणि मी आपलें स्वतःचें जीवन या मस्त जीवनाच्या कसोटीवर कसून पाहात आहें आणि मनाजोगता कस अुतरत नाहीं म्हणून अस्वस्थ होत आहें असें त्या क्षणीं वाटलें. दुसऱ्याच क्षणीं त्या तीन वर्षांतील स्मृतींचे देखील तुषार होअून आकाशांत अुडून गेले आणि मी धबधब्याशीं अेकरूप झालों. खरोखर, हा धबधबा पूर्ण आहे. आणि मी देखील पूर्णांचाच अेक अंश असल्यामुळें तत्त्वतः पूर्णच आहें. आम्ही दोघेहि वि-सदृश नाहीं; अेकाच परम तत्त्वाच्या लहानमोठ्या विभूति आहोंत याचें भान अुत्पन्न होअून चित्त शांत झालें आणि मी वर आलों.

चि. सरोजिनी देखील त्या साऱ्या दृश्याचें अुत्कट नजरेनें आकंठ पान करीत होती. हा सगळा आनंद कसा समजावा, कसा पचवावा, आणि कसा व्यक्त करावा असा गोड गोंधळ तिच्या डोळ्यांत स्पष्ट दिसत होता.

येथून लगेच परतून चौसष्ठ योगिनींचें दर्शन घ्यायचें होतें, नर्मदेचे रक्षक पांढरे, पिवळे, निळे पहाड पहावयाचे होते. त्यामुळें माहेर सोडून सासरीं जात असलेली मुलगी ज्याप्रमाणें दोन्ही कडील सुखदुःखांचे संमिश्र भाव अनुभवीत जाते त्याप्रमाणें धुवांधारला हार्दिक प्रणाम करून आम्ही परत फिरलों.

हिंदुस्थानांत असे अनेक प्रपात अखंड वहात असतात आणि भव्यतेचे आणि अुन्मत्त अवस्थेचे पाठ शिकवीत असतात. हजारों वर्षें झालीं—आणि

लाखों झालीं नसतीलच असें खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं--धुवांधार जसाच्या तसाच कोसळून पडत आहे. प्रभु रामचंद्र येथें आले असतील. विश्वामित्र आणि वसिष्ठ येथें स्नान करून गेले असतील. चंद्रगुप्त आणि समुद्रगुप्ताच्या सैनिकांनीं येथें जलविहार केला असेल. श्रीशंकराचार्यांनीं येथें बसून आपलीं स्तोत्रें रचलीं असतील. कलचुरी आणि वाकाटक वंशाच्या वीरांनीं याच पाण्यांत आपल्या जखमा धुतल्या असतील. आणि अल्हणादेवीनें येथेंच बसून चौसष्ट योगिनींचें स्मारक करण्याचा संकल्प केला असेल. आणि भविष्यकाळांत धुवांधारच्या कांठावर काय काय घडणार आहे तें कोण सांगूं शकेल? धुवांधारला स्वतःलाच यांतलें कांहीं ठाअूक नाहीं. तो आपला पडतच आहे. आणि तुषारांच्या रूपांत पुनः पुन्हा अुडतच आहे.

# : ४५ : शिवनाथ आणि अीब

कलकत्त्याला येतां जातां अनेक नद्यांची भेट होते. या प्रदेशाचा अितिहास मला ठाअूक नाहीं, याची मला शरम वाटते. येथले लोक किती सरळ मनाचे आणि सज्जन वाटतात! त्यांनीं जर मनुष्य-संहाराची लीला हस्तगत केली असती तर त्यांचें नांव अितिहासांत अजरामर झालें असतें. कित्येक लोक मरून अमर होतात; कित्येक मारणारे म्हणून अमर होत असतात. मलिक कफूर, काला पहाड वगैरे लोक दुसऱ्या कोटींतले होत.

या नद्यांच्या कांठीं लढाया झाल्या असतील तर मला त्यांची माहिती नाहीं. त्यामुळें माझ्या दृष्टीनें या नद्यांचें पाणी अजून तरी विशेष पवित्र आहे. चर्मण्वतीनें यज्ञ-पशूंच्या रक्ताचा लाल रंग धारण केला, शोण आणि गंगा यांनीं सम्राटांचे महत्त्वाकांक्षी रक्तप्रवाह पचनीं पाडले; या नद्यांनीं सुद्धां असेंच केलें असल्यास नवल नाहीं. पण जोंवर तसें कांहीं घडल्याचें मला ठाअूक नाहीं, तोंवर संशयाचा फायदा मी त्यांना देतों.

पण या नद्यांच्या कांठीं अनेक साधूंनीं तप अवश्य केलें असेल आणि कृतज्ञतापूर्वक त्यांच्यावर स्तोत्रें रचून गायलीं असतील पण तेंहि मला ठाऊक नाहीं. आणि तरीहि मी म्हणत असतों कीं मी भारतीय आहें !

* * *

अेकदां मी दुगला गेलों होतों. त्यावेळीं शिवनाथ नदीची तोंडओळख झाली. गोंड, भिल्ल वगैरे पर्वतीय जातींची ती माता आहे. सान्या छत्तिसगडाची तर ती स्तन्यदायिनी आहे. तिची करुण कथा* मनाला अुदास करून सोडणारी आहे. पुण्यसलिला नदीची कहाणी का कधीं अशी असू शकते ? पण नदी बिचारी काय करणार ! विजयी आर्यांनीं जर तिची कथा रचली असती तर त्यांत अुल्लासाचें तत्त्व आढळलें असतें. ही पडली पराजित, दबलेल्या आणि दुःखीकष्टी आदिवासी जमातीची संस्मरणें घेअून वाहणारी नदी ! तिच्या कथा अशाच व्यथेनें भरलेल्या असायच्या.

कलकत्त्याच्या वाटेवर शिवनाथ पुन्हा पुन्हा भेटते आणि सांगते : राजांच्या आणि साधूंच्या अितिहासानें तूं संतोष मानून घेअूं नकोस. विजेत्यांच्या आणि सम्राटांच्या अितिहासांत तुला लोकहृदय सांपडणार नाहीं. ब्राह्मण आणि श्रमण, मुल्ला आणि मिशनरी, कुणीच ज्यांचें दुःख ओळखलें नाहीं अशा पहाडी लोकांच्या व्यथांचें अध्ययन करण्याची दीक्षा मी तुला देतें. आहे हिंमत घेण्याची !

हिंदुस्थानच्या मूक प्रजेला बोलकी अेकता देण्याच्या अुद्देशानें हिन्दुस्तानी भाषेचा प्रचार मी करीत आहें. त्याच कामासाठीं अलीकडे पुण्याला जाअून आलों, त्याच कामासाठीं रामगडला जाण्यास निघालों आहें. तिथें भरणाऱ्या कॉंग्रेसमधें सगळया प्रांतांतील लोक येतील. गांधीजींच्या आग्रहामुळें कॉंग्रेसची अधिवेशनें आतां खेड्यांत भरूं लागलीं आहेत. हें सारें अिष्ट आहे. पण रामगडमधेंसुद्धां हे पर्वतीय लोक येतील का ? बिहारचे ‘सान्थाल’ आणि ‘हो’ आले तर येतील, पण या शिवनाथचे पुत्र येतील किंवा नाहीं, कोण जाणे !

* * *

* पहा ‘दुर्दैवी शिवनाथ’.

आज सकाळपासून अनेक नद्या पाहिल्या. लांब लांब व रुंद दगड असलेली नदीसुद्धां पाहिली आणि चिखलानें भरलेली नदीसुद्धां पाहिली. जिच्या कांठावर अेकहि झाड नाहीं अशी नदीसुद्धां पाहिली आणि जिनें अेका बाजूला झाडांची अेक जाडजूड भिंत अुभारलेली आहे अशी नदीसुद्धां पाहिली. पांढरे पांढरे बगळे तिच्या पात्रांतील चिखलावर आपल्या पावलांचें नक्षीकाम करीत होते. पण त्या चरण-लिपीमधून मला कसल्याच अितिहासाचा बोध झाला नाहीं, कसल्याच दंतकथांचें आकलन झालें नाहीं. नदी आशेनें लिहीत जाते आणि निराशेनें ते लेख पुसून टाकीत जाते. आणि नव्या वाचकाची वाट पहात बसते.

आम्ही झारसूगुडा जंक्शनकडे जात आहोंत, अेक लहानसें स्टेशन जवळ येत आहे, अितक्यांत आमच्या रस्त्याखालून वहाणारी अेक सुंदर नदी आम्हीं पाहिली. सगळ्या नद्या सुंदर असतातच, पण या नदींत असाधारण सुंदर नक्षीकाम करण्याची कला दिसून आली. पाण्याच्या प्रवाहांत भोंवरे अुत्पन्न होत असतील. शेवाळ चढून पाण्याला विशेष रूप येत असेल. वरून तें सगळें नक्षीकाम पाहून मला रवीन्द्रनाथांच्या चित्रांचें स्मरण झालें. या नदीचें नक्षीकामसुद्धां कांहीं न बोलतां, कसलाहि बोध देण्याच्या भरीस न पडतां, सरळ हृदयाला जाअून भिडत होतें आणि तेथें आपली कायमची छाप पाडीत होतें. याचें नांव खरी कला !

पण या नदीचें नांव काय ? परिचय व्हावा आणि नांव कळूं नये ही कसली विचित्र अवस्था ! अितक्यांत अीब स्टेशन आलें. आम्हीं लोकांना विचारलें कीं या नदीचें नांव काय ? त्यांनीं सांगितलें ‘ अीब.’ नदीच्या नांवावरूनच स्टेशनाचें नांव पडलें आहे. तर मग त्यांत औचित्य नाहीं असें कोण म्हणेल ? पण मनांत शंका आली खरी. या ठिकाणीं भेडेन नांवाची अेक नदी अीबला येअून मिळते. आणि स्टेशन तर भेडेनच्या कांठीं आहे. अीब जराशी मोठी आहे, म्हणून भेडेनवर अन्याय करून तिचें नांव स्टेशनला ठेवलें नाहीं. भेडेन कांहीं लहानसान नदी नाहीं, चांगली रुंद आहे. दुरून वहात येते. पण कसलाहि गर्व न बाळगतां आपलें पाणी अीबच्या स्वाधीन करते आणि स्वतःच्या नांवाचा

देखील आग्रह ठेवीत नाहीं. मी ओबला म्हणालों ‘ पहा, औदार्यांत ही भेडेन तुझ्यापेक्षां श्रेष्ठ आहे कीं नाहीं ? ’ गालांतल्या गालांत नक्षीदार स्मित करीत ओब म्हणाली, “ तें काय तें तुम्ही माणसेंच पहात बसा. भेडेननें स्वतःचें नांव सोडून आपलें पाणी माझ्या स्वाधीन केलें. आतां तिच्या औदार्याची वाखाणणी करीत बसण्यापेक्षां तिच्या कडून तीच दीक्षा घेऊन तिच्यासारखेंच होऊन जावें हें मला अधिक योग्य वाटतें. मी तिचें आणि माझें पाणी ओकत्र करून महानदीच्या स्वाधीन करण्यासाठीं, ही पहा संबलपुरला निघाल्यें. तेथें मी सुद्धां आपलें नांव सोडून देणार आहें. अशा रीतीनें अुत्तरोत्तर नामरूपाचा त्याग करीत गेल्यानेंच आम्हां सर्वांना महानदीचें: महत्त्व प्राप्त झालें आहे, आणि तें सुद्धां सागराला अर्पण करण्यासाठींच. ”

आणि जातां जातां ओबनें अनुष्टुप छंदांतील ओक श्लोक गाऊन दाखवला :

**सर्वे महत्त्वं अिच्छन्ति कुलं तत् अवसीदति।**
**सर्वे यत्र विनेतारः राष्ट्रं तत् नाशं आप्नुयात् ॥**

* * *

ओबचा हा संदेश घेऊन मी रामगडला गेलों.

मार्च १९४०

# : ४६ : दुर्दैवी शिवनाथ

[ ‘ शिवनाथ आणि ओब ’ या लेखांत जिचा अुल्लेख आहे त्या लोककथेचें सार बेमेतरा—द्रुगहून लिहिलेल्या खालील पत्रांत सांपडेल. ]

काल आणि आज शिवनाथ नदीचें दर्शन घडलें. कलकत्त्याला येतां जातां तशी शिवनाथ ओकदोनदां ओलांडावी लागतेच. येथें अुंच अुंच दरडीमधून वहाणारा शिवनाथचा प्रवाह मोठ्या अुंच पुलावरून पहावयास मिळतो. काल संध्याकाळीं बालोडहून परत आल्यानंतर शिवनाथच्या कांठीं मुद्दाम फिरायला गेलों होतों.

गु पवार
862 991316

## दुर्दैवी शिवनाथ

पावसाळा सुरू झाला आहे खरा पण नदींत अजून पाणी भरलेलें नाहीं. त्यामुळें शिवनाथ अेखाद्या विरहिणी प्रमाणें म्लानवदना दिसली. जी नदी श्रावण–भाद्रपदांत आपले दोन्ही कांठ ओलांडून कित्येक कोस दूर पसरते, तिला आपल्या पात्रांत अजगराप्रमाणें अेका कोपऱ्यांत पडलेली पाहून कुणाच्याहि मनांत विषाद अुत्पन्न झाल्याव्रांचून रहाणार नाहीं.

द्रुगच्या लोकांना मीं शिवनाथविषयीं विचारलें : ही नदी येते कोठून ? हिची लांबी किती आहे ? पुढें तिचें काय होतें ? पण कुणीच मला निश्चित अुत्तर देअूं शकलें नाहीं. या नदीचें माहात्म्य पुराणांत कोठें वर्णिलें आहे का ? तिच्याविषयीं अेखादें लोकगीत, अेखादी दंतकथा अैकिवांत आहे का ? अेकाहि प्रश्नाचें होकारार्थी अुत्तर मिळालें नाहीं. नदीविषयीं जाणण्यासारखें तें काय असतें ! रोज सकाळीं तिच्याकडून सेवा घ्यावी, याहून अधिक तिचा आपला काय संबंध ?

शेवटीं मीं द्रुग तालुक्याचें गॅझेटियर मागवलें. त्यांत वरील सर्वसामान्य प्रश्नांचीं अुत्तरें तर दिलीं आहेतच, पण त्याशिवाय शिवनाथविषयीं अेक दंतकथासुद्धां दिलेली आहे. तीच आज माझ्या शब्दांत देण्याचा विचार आहे.

शिवा नांवाची अेक गोंड मुलगी होती. जंगली गोंड जातीची असूनहि मुलगी संस्कारी आणि रसिक होती. गोंड जातीच्याच अेका मुलाचें तिच्यावर मन बसलें. मुलीचें मन आकर्षून घेअील असा अेकहि गुण त्याच्यांत नव्हता. मनाला येअील तसें वागावें आणि ज्याच्या त्याच्या जवळून धाकदपटशा दाखवून काम करून घ्यावें अितकेंच त्याला ठाअूक होतें. तो शिवाचें चिंतन करीत राही आणि ती मिळवण्याचा मार्ग दिसत नाहीं म्हणून कासावीस होअी. शेवटीं आपल्या जातीच्या रिवाजाप्रमाणें त्यानें संधि साधून शिवाचें अपहरण केलें आणि राक्षस-पद्धतीनें तिच्याशीं विवाह लावला !

विवाहविधि पार पाडणें सोपें होतें, पण शिवाला आपली करून घेणें कसें काय साधायचें !

शिवासारखी संस्कारी आणि भावनाप्रधान मुलगी त्याच्याकडे ढुंकूनहि पाहणें शक्य नव्हतें. आणि त्या जडमूढ माणसाला अनुनय कशाशीं खातात

तें कोठून ठाअूक असणार? त्यानें आपला पतीचा अधिकार गाजवण्याचा प्रयत्न केला. तिनें आपलें अबलेचें सामर्थ्य प्रकट केलें. शिवाचें हरण करून आणणाऱ्या युवकाला तिच्या घट्ट लावून घेतलेल्या हृदयापुढें हार खावी लागली. त्याचा क्रोधाग्नि भडकून अुठला. शरीरालाच समजणारा मनुष्य शरीराच्या बाहेर जाअू शकत नाहीं. त्यानें शेवटीं शिवाला मारून टाकलें आणि तिच्या शरीराचे तुकडे अेका खोल दरींत फेंकून दिले!!

जिथें शिवेचें शव पडलें तेथूनच अेक नदी ताबडतोब वाहूं लागली. तीच आपली ही शिवनाथ, जी पुढें जाअून महानदीला आपलें पाणी अर्पण करते.

आज सकाळीं बेमेतराला जाण्यासाठीं निघालों. रस्त्यांत अेक अपघात झाला. आमच्या धावत्या मोटरीवर अेक बैलगाडी आदळली आणि अेका बैलाचें शिंग सबंधच्या सबंध अुपटून निघालें. आम्ही थांबलों आणि मदतीला धावलों. लोंबणारें शिंग कापून काढण्याचा सल्ला मला द्यावा लागला. आणि जेथून रक्त वहात होतें तेथें पेट्रोलची पट्टी बांधावी लागली. सगळें वातावरण करुण आणि व्यथित झालें होतें. अशा परिस्थितींत शिवनाथ नदीचें दुसऱ्यांदा दर्शन झालें. येथें नदीचें तीर सुंदर आहे. आसपासचे दगड जांभळ्या लाल रंगाचे आहेत. नदीचें पात्रसुद्धां रमणीय आहे. आंत पडलेलें प्रतिबिंब काव्यमय वाटत होतें. पण ती करुण घटना मनांत घोळत होती, त्यामुळें या दर्शनांतहि विषादाचीच छटा होती.

शिवनाथचें नशीबच असें असलें पाहिजे. शेवटीं मनाचें दुःख हलकें करण्यासाठीं हें पत्र लिहून काढलें. आतां हृदय थोडेंसें हलकें झालें आहे.

मे १९४०

# : ४७ : अबरी औब

कलकत्त्याहून वर्ध्याचा प्रवास करीत होतों. गाडींत रात्रीं कांहींच न पांघरतां निजलों होतों. पांघरूण घेण्याची तशी जरूरहि नव्हती. पण तरीसुद्धां अेखादें घेतलें असतें तर कांहीं बिघडलें नसतें. पहाटे पांच वाजतां जागा झालों तेव्हां हवेंत थोडासा गारठा होता. त्यामुळें चादरीची अूब न घेतल्याबद्दल पश्चात्ताप झाला. शेवटीं, 'आतां काय त्याचें ?' म्हणून अुठलों. कवींना जितक्या प्रमाणांत भविष्यकाळ दिसतो, तितकेंच बाहेर दिसूं लागलें होतें. सगळें दृश्य प्रसन्न होतें. पण पुरेसें स्पष्ट नव्हतें.

अितक्यांत अेक नदी आली. पुलाच्या दोन टोकांमधें तिची धारा अनेक रेषांत विभागलेली होती. प्रत्येक नदीचें असेंच असतें, पण या नदीनें कांहीं विशेष सौंदर्य साधलें असावेंसें स्पष्ट दिसत होतें. विरळ अंधारांत पहाटेचें आकाश मनाशीं नक्की करूं शकत नव्हतें कीं पाण्याची चांदी बनवावी ? कीं त्याचा जुन्या जमान्यांतला पोलादाचा चमकता आरसा बनवावा ?

आम्ही पुलाच्या मधोमध येअून पोंचलों. मी प्रवाहाची शोभा न्याहाळूं लागलों. अितक्यांत पाण्यांत कुणी पांढरा रंग छिडकला असावा आणि हळूं हळूं त्याची अबरी* बनली असावी असा भास झाला. ती नक्षी पाहून मीं अगदीं खुश खुश झालों. नुक्ताच दिल्लीमधें जामिया मिलियाच्या लहान लहान मुलांना कागदावर अबरीचें नक्षीकाम करतांना पाहून आलों होतों. मला हे नैसर्गिक आकार विशेष विलोभनीय वाटतात.

या नदीचें नांव काय ? कोण सांगूं शकेल ? मीं मनाशीं ठरवलें कीं दुसरें नांव मिळालें नाहीं तर हिला आपण अबरी नदी म्हणायचें.

---

* पुस्तकाच्या पुठ्ठयावर किंवा आंतल्या बाजून जो रंगीबेरंगी नक्षीचा कागद वापरला जातो आणि ज्याला अिंग्रजींत 'marble paper' म्हणतात, त्याला आपला शब्द आहे 'अबरी'.

नदी गेली आणि त्या नदीचें नांवगांव जाणून घेण्याच्या माझ्या अुत्कंठेंत भर पडली. कारण त्या नदीनंतर धूर सोडणारीं दोन धुराडीं दृष्टीस पडलीं होतीं. आणि जवळच्या वस्तींतून विजेचे दिवे सुद्धां लुकलुकले होते.

रेल्वेचें टाअीम टेबल काढून मीं त्याला विचारलें, 'पांच नुक्तेच वाजले आहेत. आपण कोठें आहोंत?' त्याचें अुत्तर अैकतांक्षणींच मुखावाटे परिचयाच्या आनंदाचे अुद्गार बाहेर पडले, 'ओहो! ही तर आपली औब!' रामगडला जातांना तिनें आपल्याला किती मजेदार नक्षीकाम दाखवलें होतें! मीं तिला कृतज्ञतापूर्वक अंजलीसुद्धां अर्पण केली होती. औबला मी कां ओळखूं शकलों नाहीं? अबरीचा असा कलाविकास काय वाटेल ती नदी दाखवूं शकेल?

तर मग ही औब नदी अबरीचें काम कोणत्या वर्धा-शाळेंत शिकली असेल? किंबहुना हिच्याचकडून साऱ्या जगानें अबरी-कला सर्वांत प्रथम हस्तगत केली असेल.

मे १९४१.

## : ४८ : अृषिकुल्येचें क्षमापन

आज महाशिवरात्रीचा दिवस आहे. रोजचीं सर्व कामें बाजूला ठेवून सरिता, सरित्पिता आणि सरित्पति यांचें ध्यान करावयाचें असें ठरवून बसलों आहें. सरिता या लोकमाता आहेत. त्यांची 'जीवनलीला' अनेक परीनें आठवून पावन झालों आहें. स्नान, पान आणि दान अशा त्रिविध रूपानें नदीचें पूजन करावें असें पूर्वजांनीं सांगितलें आहे. मला वाटलें: स्नान-पान-दानच कां? भक्तिच करावयाची तर ती चतुर्विधा कां असूं नये? असें म्हणून नदीचें गान करावयाचें मीं ठरविलें. 'लोकमाता' आणि प्रस्तुत 'जीवनलीला' या दोन ग्रंथांत तें गान अैकावयास मिळेल.

आतां जेव्हां प्रवास कमी झाला आहे आणि सरित्पति सागराचें आमंत्रणहि कमी अैकूं येअूं लागलें आहे तेव्हां सरित्पिता पहाडाचें थोडें श्राद्ध करावें असें मनानें घेतलें. अितक्यांत अेका लहानशा पवित्र नदीनें कानांत येअून म्हटलें: "मला अगदींच कसे विसरलांत?" मी लाजलों आणि तावडतोब तिला स्मरणांजलि अर्पण करून मगच पहाडाकडे वळण्याचें ठरविलें. ही नदी म्हणजे कलिंग देशांत फक्त सव्वाशें मैलांचा प्रवास करणारी अृषिकुल्या होय.

अृषिकुल्या नदीचें नांवहि मीं अैकलें नव्हतें. मला अशोकाच्या शिलालेखांचें वेड लागलें होतें. जुनागडचे शिलालेख मीं पाहिले होते. मग ओरिसामधील शिलालेख कां नकोत? असा विचार मनांत आला. कलिंग देशांतील हत्तीच्या तोंडाचा धौलीचा शिलालेख पाहिला होता. तेव्हां थोडें दक्षिणेला जाअून जौगढचा प्रख्यात शिलालेख कसा सोडतां येईल, असें अितिहास-दृष्टि विचारूं लागली. तिच्या तृप्तीसाठीं गंजामच्या बाजूला जावें लागलें. तो प्रवास मोठा काव्यमय होता. पण त्याचें वर्णन करूं लागलों तर तें अृषिकुल्येपेक्षां लांब व्हावयाचें.

ही नदी चिलका सरोवराला न मिळतां गंजामपर्यंत कशी गेली आणि समुद्रालाच कां मिळाली, याचें आश्चर्य वाटतें. कदाचित् सागरपत्नीचें सौभाग्य मिळविण्यासाठीं तिनें गंजामपर्यंत मजल गांठली असावी. पण येथील सागरांत अुल्हास असा नाहींच. रेतीशीं खेळत बसणें हेंच त्याचें काम.

अृषिकुल्या नदी लहान असली तरी, नांवामुळें असेल, तिची प्रतिष्ठा मोठी आहे. कारण अेवढ्याशा नदीला करभार देण्यासाठीं पथमा आणि भागुवा ह्या दोन नद्या येतात. आणखीहि दोन-तीन नद्या हिला मिळतात. पण दारिद्र्याचें संमेलन म्हणजे कांहीं समृद्धि नव्हे. अुन्हाळा आला कीं सहाहि नद्या ठणठणपाळ.

अृषिकुल्येच्या कांठीं अस्का हें अेक लहानसें गांव आहे. गांव लहान असलें म्हणजे त्यानें सुंदर असूं नये असा कांहीं नियम नाहीं. नद्यांचा संगम जेथें होतो तेथें सौंदर्याला निराळें निमंत्रण द्यावें लागत नाहीं. आणि येथें तर अृषिकुल्येला भेटायला महानदी आलेली! दोघी जणी मिळून अूस पिकवतात, भात पिकवतात आणि लोकांना गोड जेवण देतात. आणि ज्यांना अुन्मत्तच व्हायचें

असेल त्यांच्यासाठीं येथें दारूचीहि सोय आहे. या 'देवभूमी'त लोकांनीं दारू प्यावी याला अुचित म्हणावें कीं अनुचित? सुरा पिणारे ते सुर म्हणजे देव, आणि न पिणारे ते असुर असें अिराणी लोक म्हणतात.

अृषिकुल्या हें नांव कोणीं दिलें असेल? हिच्या शेजारच्या दोन नद्यांचीं नांवेंदेखील अशींच काव्यमय संस्कृत आहेत. 'वंशधारा', 'लांगुल्या' हीं नांवें कांहीं तेथील आदिवासींनीं दिलेलीं नव्हत.

हा सारा प्रदेश कलिंग, आंध्रमधील वेंगी आणि दक्षिणेकडील चोळ राजांच्या महत्त्वाकांक्षेची युद्धभूमि होता. तेव्हां हीं सर्व नांवें चोळच्या राजेन्द्रानें ठेवलीं कीं कलिंगच्या गजपतींनीं हें कोण सांगूं शकेल?

जौगढचा अितिहासप्रसिद्ध शिलालेख पाहून संध्याकाळीं आम्ही परत येत होतों तेव्हां अृषिकुल्येचें दर्शन घडलें. संस्कृत साहित्यांत दधिकुल्या, घृतकुल्या, मधुकुल्या अशीं नांवें वाचून तोंडाला पाणी सुटत असे. अृषिकुल्येचें नांव अैकून मी भक्तिनम्र झालों आणि तिच्याकांठीं संध्याकाळची प्रार्थना केली.

लहानशी नदी ओलांडायला होडीदेखील लहानशीच असणार. त्या दिवशींचें आमचें नशीबहि असें विचित्र होतें कीं, ही लहानशी होडी अर्धीमुर्धी पाण्यानें भरललेली होती. आंतील पाणी काढून टाकायला जवळ लोटा-कटोरा कांहींच नव्हतें. तेव्हां पायांतले जोडे दोन हातांत घेअून अुघड्या पायांनीं होडींत प्रवेश केला. नदींत पाय भिजूं नयेत अशी अिच्छा होती. पण शेवटीं होडींतील पाण्यानें आमचें पदप्रक्षालन केलेंच. अुभें रहावें तर होडी कलंडावयाची. बसलें तर धोतर भिजायचें. या द्विविध संकटांतून पार पडण्यासाठीं होडीच्या दोन्ही कांठांना धरून कुक्कुटासनाचा आश्रय केला आणि तशाच स्थितींत वेदकालीन आणि पुराणकालीन सर्व अृषींचें स्मरण करीत करीत त्यांची ही कुल्या ओलांडली. तेव्हांपासून या अृषिकुल्या नदीविषयीं प्रगाढ भक्ति दृढ झालेली आहे. कुक्कुटासनाचा आराम जोंवर ध्यानांत राहील तोंवर निशीथकालींचा तो प्रसंग कधींहि विसरणार नाहीं.

तेथील अेका शाळामास्तराकडून अृषिकुल्येची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं अुडिया भाषेंतील अेक दीर्घकाव्य परिश्रमपूर्वक लिहून

काढून मला पाठविलें. अजूनपर्यंत त्या काव्याचा आस्वाद मी घेअू शकलों नाहीं. अृषिकुल्येविषयीं भक्ति दृढ करण्यासाठीं आधुनिक काव्याची जरूरी नाहींच. मला वाटतें, महाशिवरात्रीच्या दिवशीं अृषिकुल्येचें केलेलें हें क्षमापन-स्तोत्र तिला मान्य होअील आणि ती मला अचलांचें अुपस्थान करण्यासाठीं हार्दिक आणि सुदीर्घ आशीर्वाद देअील.

महाशिवरात्र, २७ फेब्रुवारी १९५७.

# : ४९ : तेंदुला आणि सुखा

आज अेक अनपेक्षित आणि असाधारण आनंद अनुभवावयास मिळाला.

वर्ध्याहून द्रुगला आलों आहोंतः—आसपासच्या दोन गांवांत राष्ट्रीय ग्राम-शिक्षण (बेसिक अेज्युकेशन) सुरूं करण्यासाठीं शिक्षक तयार करणाऱ्या अेका संस्थेचें अुद्घाटन करण्यासाठीं चार वाजतां द्रुगला येअून पोंचलों. आंघोळ न्याहारी वगैरे आटपून बालोडला जाण्यासाठीं निघालों.

बालोड द्रुगच्या बरोबर दक्षिणेस ३७ मैलांवर आहे. रस्ता बराचसा जणूं काय ताणलेल्या दोरीनें आंखलेला असावा असा अगदीं सरळ आहे. मैलां-मागून मैल सरळ रेषेंत धावत रहाण्यांत जसा तोचतोचपणा आहे, त्याच प्रमाणें अेक प्रकारचा कैफहि आहे. बालोड जवळ आलों आणि कुणीसें म्हणालें कीं येथून जवळच तेंदुला बंड आणि कॅनाल आहे. लहानशी वस्तु देखील स्थानिक लोकांना विशेष महत्त्वाची वाटत असते. भाअी तामनस्करांनीं जेव्हां म्हटलें कीं व्याख्यान झाल्यानंतर आपण तो बंड पहायला जाअूं तेव्हां कसल्याहि अुत्साहावांचून मीं होकार दिला. त्यांत कांहीं विशेष मजेशीर पहाण्यासारखें असेल असें मी मानलेंच नव्हतें. होय म्हटलें तें स्थानिक लोकांच्या आतिथ्याचा अुत्साहभंग होअूं नये या चांगुलपणाच्या विचारानेंच.

चांगला ३७ मैलांचा जो प्रवास आम्ही केला होता त्यांत रस्त्यामधें अुंच-सखलपणा कुठेंच आढळला नाहीं. सगळीकडे सपाट जमीन. गुजराथप्रमाणें

या जमिनींत कुंपणाची आडकाठी सुद्धां सांपडत नाहीं. अशी सपाट जमीन पाहिल्यानंतर अेखादा नदीनाला पहायला मिळाला, अेखादा बंधारा नजरेवर आदळला तर मनाला तेवढेंच व्यंजन, तेवढाच रुचिपालट मिळेल अशा कल्पनेनें मी कबूल झालों. ज्यानें पुण्याच्या बंडगार्डनपासून तें भाटघरच्या प्रचंड बंधाऱ्यापर्यंत अनेक बंधारे पाहिले आहेत त्याचें कौतूहल असें सहजासहजीं जागृत होणें शक्य नव्हतें.

बेझवाड्यांत कृष्णा नदीवरचा भव्य बांध, गोकाक जवळील घटप्रभेवरचा बाल्यपरिचित बांध, लोणावळ्याचे दोनतीन आकर्षक बांध, म्हैसूरमधें वृन्दावनाला पोसणारा बादशाही कृष्णसागर, दिल्ली जवळील यमुनेवरचा रमणीय 'ओखला'चा बांध आणि नाशकाहून मोटररस्त्यानें ५० मैल दूर जाऊन पाहिलेला 'प्रवरा' नदीचा सुंदरतम आणि रोमांचकारक बांध;—असे अनेकानेक जलाशय ज्यानें पाहिले आहेत तो सिंहगडाच्या पायथ्याशीं असलेल्या 'खडकवासला' सारख्या बंधाऱ्यानें देखील जरी संतुष्ट झाला, तरी त्याचें कुतूहल अगदीं बाल्यावस्थेंत तर असणें शक्यच नाहीं.

भावनगर जवळील बोर तलावाचें वर्णन मीं लिहिलें आहे. बेझवाड्याच्या कृष्णा नदीला श्रद्धांजलि अर्पण केली आहे; दुसऱ्या बांधांविषयीं अजून लिहिलें नाहीं याची मनाला रुखरुख आहे. तरीसुद्धां आज अेखाद्या मजेदार जलसंचयाचें दर्शन होअील अशी अपेक्षाच नव्हती. व्याख्यान, संभाषण आणि भोजन आटपून आम्ही तेंदुला कॅनाल पहाण्यासाठीं वाहनारूढ झालों आणि बांधाचा रस्ता पकडला. बांधावरून मोटर घेअून जाण्याची परवानगी मिळवण्यासाठीं अेक मनुष्य पुढें गेला होता, त्याची वाट पहाण्याअितका धीर आम्हांला नव्हता. परवानगी मिळणारच असें गृहीत धरून आम्ही पुढें निघालों आणि बांधापर्यंत पोंचलों. बांधावर गेलों, आणि—

मी तर अगदीं थक्क झालों !

केवढा लांब आणि रुंद पाण्याचा विस्तार ! आणि पाणीसुद्धां किती स्वच्छ ! जणूं काय आकाशच आनंदातिशयांत विरघळून जाअून खालीं अवतरलें असावें ! आणि पाण्याचे ते रंग ! ! जांभळा, निळा, आकाशी, रजतवर्ण व गुलाबी ! ! आणि ते सुद्धां स्थायी नव्हत ! आकाशांतले

ढग जसजसे धावत, तसतसा या पाण्याचा रंग देखील रूप पालटे. लहान लहान लाटांमुळें पाण्याची तरलता खुलून दिसत होतीच, त्यांत या रंग-परिवर्तनाच्या चंचलतेची भर पडली! मग काय विचारतां? जेथें पहावें तेथें काव्य डोलत होतें, चमत्कार नाचत होता. दोन्ही बाजूचे किनारे आपल्याला कुणामुळें महत्त्व लाभलें आहे तें चांगले ओळखून होते. त्यामुळें मोठ्या अदबीनें ते जलसंचयाची खुशामत करीत होते.

या बांधाची खुबी केवळ त्याच्या विस्तारांतच नाहीं. त्याचें दुसरेंहि अेक वैशिष्ट्य आहे. तेंदुला आणि सुखा या दोघी मैत्रिणी मैत्रिणी. तेंदुला मोठ्या बहिणीसारखी. ती ३०-४० मैल दुरून येते. तिच्या पुढें सुखा म्हणजे केवळ चिमुरडी पोर. तीन मैल धाअूनच ती येथवर येअून पोहोंचते. या दोन नद्या जेथें कांहींश्या जवळ जवळ येतात तेथेंच हा प्रेमळ बांध, 'माझ्या गळ्याची शपथ जर पुढें जाल तर,' असें म्हणून त्या दोघींपुढें आडवा पडला आहे. चांगला तीन मैल लांबीचा हा बांध दोन नद्यांना अडवतो आणि मग आपल्या मर्जीस येअील त्याप्रमाणें थोडें थोडें पाणी सोडून देतो. कच्च्या मातीचा अेवढा मोठा बांध हिंदुस्थानांतच काय, पण साऱ्या जगांत अितरत्र कोठेंहि नसेल! बांधातळींची पंधरा मैलांपर्यन्तची अभिमानी जमीन असें अुपकाराचें पाणी घेण्याचा अिन्कार करते. त्यामुळें तो कालवा त्यानंतरच्या साठसत्तर मैला-पर्यन्तच्या दोन्ही कांठावरील शेतांचीच सेवा करतो. बांधामुळें वरची किती जमीन पाण्याखालीं बुडाली आहे याची कल्पना नुसत्या नजरेनें कोठून येणार? चौकशी करतां कळलें कीं जवळ जवळ तीनशे वीस चौरस मैल जमिनीचें पाणी येथें गोळा झालेलें आहे. पाण्याचा विस्तार १६ चौरस मैल आहे! १९१० मधें हा बांध बांधण्यास सुरुवात झाली आणि पाअूण कोटी रुपये खर्च झाल्यानंतरच तो पुरा झाला. पावसाळ्याच्या दिवसांत या दोन्ही नद्यांचें पाणी अेक होतें. आणि मग सर्वत्र पाणीच पाणी पाहून माणसाला 'सर्वतः संप्लुतोदके'चें स्मरण होतें. आणि जेव्हां मधलें बेट जेमतेम आपलें डोकें वर ठेवण्याचा प्रयास करीत असतें तेव्हां त्याची ती तारांबळ पाहून आपल्याला हसूंच येतें. आज त्या बेटावर कित्येक झाडें 'यद् भावि तद् भवतु' वृत्तीनें महापुराची वाट पहात अुभीं आहेत. त्यांना थोडाच त्या लाल किनारीच्या

होडींत बसून पळ काढतां येणार आहे ? असे वृक्ष टिकतात तोंवर खंबीरपणें टिकतात; आणि अखेरीस मुळें अुघडीं पडलीं कीं पाण्यावर अंग झोंकून देतात.

अुन्हाळयांत जेव्हां दोन नद्यांचीं पात्रें वेगवेगळीं होतात, तेव्हां अून आणि विरह यांच्यामुळें त्या अधिक सुकून जाअूं नयेत म्हणून, मधें अेक कालवा खोदून दोघींचें पाणी अेकमेकींना मिळूं शकेल अशी व्यवस्था केलेली आहे.

जाणते लोक जाणतात कीं नद्यांना हृदय असतें; त्यांच्यांत वात्सल्यभाव असतो, चारित्र्यसुद्धां असतें, अुन्माद असतो आणि पश्चात्तापाची भावनासुद्धां असते. या दोन बहिणी जें कांहीं येथें करतात त्यांत अेकमेकींच्या शोभेबद्दलची थोडीदेखील अीर्ष्या आढळत नाहीं. मत्सर किंवा सापत्न भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसतच नाहीं. बांधरूपी जबरदस्त संयमामुळें आपली शक्ति किती वाढली आहे त्याची त्यांना जाणीव आहे. नुसतें वाहत रहाणें हाच अेक नदीचा धर्म नाहीं. पसरणें आणि आशीर्वादरूप बनणें हे सुद्धां नदीधर्मच आहेत याची जाणीव सगळया नद्यांना करून देण्यासाठींच त्या येथें विस्तरून पडल्या आहेत.

नदीच्या कांठीं झाडें नसलीं तर तेथें अेका तऱ्हेची शोभा असते आणि झाडें जेव्हां तिच्या पात्राला झांकण्याचे वृथा सायास करीत असतात तेव्हां त्या विफलतेतून सुद्धां तीं झाडें सफळ शोभा अुत्पन्न करतात.

आम्ही पैलतीरावरील या झाडीच्या भेटीस गेलों. दुपारची वेळ होती. झोपाळू झाडें नदीच्या कानाशीं गोष्टी करतां करतां झोपेंत बुडून जात होतीं आणि सगळीकडे अुष्ण-शीतल शांति पसरली होती. फक्त तऱ्हेतऱ्हेचे पक्षी मंद मंजुळ किलबिल करीत अेकमेकांना या काव्याचा आस्वाद घेण्यासाठीं अुत्तेजन देत होते.

आणि लाल मुंग्या, ज्यांना 'वाघ मुंग्या' किंवा 'अुंबील' म्हणतात, कसल्यातरी चिकट जाळयाच्या साहाय्यानें झाडाचीं रुंद पानें अेकमेकांना चिकटवून, काव्य भरून ठेवण्याच्या पिशव्या तयार करीत होत्या.

माझे डोळेसुद्धां हृदयाची पिशवी करून त्यांत समोरचें दृश्य भरून ठेवण्यासाठीं सारा प्रदेश नजरेनें शोषून घेत होते.

नदीला त्यांत कसलीच हरकत नव्हती.

मार्च, १९४०.

# : ५२ : सूर्यैचा स्रोत

पावसाळ्याचे दिवस असूनहि आम्ही काशाचें सर्वोदय केंद्र पहायला गेलों. तेथें जाण्यासाठीं हे दिवस चांगले नव्हते, म्हणूनच तर आम्ही हे दिवस पसंत केले. पावसाळ्याच्या दिवसांत लहान लहान 'नद्या' फुगून रस्त्यावरून वहायला लागतात, त्यांचें पाणी वाढल्यामुळें मोटरी देखील तासन्तास खोळंबून रहातात. विचार केला कीं आमचे सर्वोदय-सेवक आमच्या आदिवासी ब्रांधवांत कसें काय काम करीत आहेत तें पहाण्याची वेळ हीच आहे.

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील अेका सुंदर स्थानाशीं माझा घनिष्ठ परिचय आहे. मुंबअीच्या अुत्तरेस कांहीं शंभर मैलांच्या अंतरावर ब्रोर्डी-घोलवड वसलेलें आहे. तेथें मी कित्येक महिने राहिलों होतों आणि रोज तेथल्या समुद्राच्या लाटांशीं खेळत होतों.* समुद्राचें पाणी सुद्धां ओहटीच्या वेळीं चांगलें दीड मैल मागें हटे आणि सारा समुद्रकिनारा ओल्या टेनिस-कोर्टासारखा बनून जाअी. आम्ही पांच दहा जण या ओल्या रेतीच्या मैदानावरून समुद्राच्या लाटा शोधायला जात असूं. जेव्हां भरती येअी तेव्हां लाटा आमचा पाठलाग करूं लागत आणि आम्ही किनाऱ्याकडे धूम ठोकत असूं. लाटांनीं आमचा पाठपुरावा करायचा आणि आम्ही जीव घेअून किनाऱ्याकडे पळत सुटायचें, हा पाठशिवणीचा खेळ मोठा मजेदार होता. पहातां पहातां सगळें मोकळें मैदान अेका मोठ्या सरोवराचें रूप धारण करतें आणि वारा लाटांशीं खेळ खेळूं लागतो. अशा खाऱ्या पाण्यांत, व वाळूंत देखील अेके ठिकाणीं तरवडाचीं झाडें अुगवलीं होतीं. त्यांचीं तुकतुकीत, चिकणीं पानें पाहून मला 'होनहार ब्रिरवानके होत चीकने पात।' (मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात.) ही हिंदी म्हण आठवे व मी म्हणे—हे मोठे तरवड 'होनहार ब्रिरवान' दिसतात.

---

* या स्थानाचें वर्णन मीं आपल्या 'रण कीं सरोवर' या लेखांत विस्तारानें केलें आहे.

या विशाल सरोवर-मैदानांत अुदावरण[1]-प्रजेची फार मोठी सृष्टि वसलेली आहे. तऱ्हेतऱ्हेचे शंख, तऱ्हेतऱ्हेचे खेकडे आणि असलेच अनेक लहान-मोठे प्राणी तेथें रहात होते. त्यांच्या कवच्या व हाडें किनाऱ्यावर आढळत असत.

मी रहायला गेलों तेव्हां बोर्डीला अेकच चांगलें हायस्कूल होतें. आतां तें अेक चांगलें मोठें शिक्षणाचें केन्द्र बनलें आहे. बाल-शिक्षण, प्रौढ-शिक्षण, मूलोद्योग शिक्षण, आदिवासी लोकांचें शिक्षण, अध्यापन-केन्द्र अित्यादि अनेक संस्था तेथें प्रस्थापित झालेल्या आहेत. आतां तर बोर्डी राजकीय जागृतीचें, शिक्षण-प्रसाराचें आणि समाज-सेवेचें अेक प्रमुख केन्द्र बनलें आहे.

बोर्डीच्या दक्षिणेस चिंचणीला सुद्धां मी अेकदां गेलों होतों. तेथील कारागीर सांचे बनविण्याच्या कलेंत साऱ्या हिंदुस्थानांत अद्वितीय गणले जातात. कांचेच्या बांगड्या देखील तेथें चांगल्या बनतात.

यावेळीं चिंचणी व बोर्डी यांच्या दरम्यान असणाऱ्या डहाणूला जाअून आलों. हें स्थानदेखील समुद्राच्या कांठीं आहे. येथलें नैसर्गिक दृश्यदेखील बोर्डीअितकेंच सुंदर आहे.

पन्नास पाअूणशे वर्षांपूर्वी अिराणहून आलेलीं कांहीं अिराणी कुटुंबें येथें स्थायी झालेलीं आहेत. हे लोक घरीं अिराणी भाषा बोलतात. अलीकडे हे लोक अिराणहून प्राचीन काळीं आलेल्या पारशी लोकांत थोडेसे मिसळूं लागले आहेत आणि गुजराथी व मराठी दोन्ही भाषा अुत्तम बोलतात. या अिराण्यांच्या बागा व वाड्या खास पहाण्यासारख्या असतात. शेतीच्या अनुभवजन्य शास्त्रानें व मेहनत-मजूरीनें या लोकांनीं लाखों रुपये कमावले आहेत. आमच्या देशांत वस्ती करून या लोकांनीं या देशाचें अुत्पन्न वाढवलें आहे आणि येथल्या शेतकऱ्यांना अुत्तमांतील अुत्तम अुदाहरण घालून दिलें आहे. या लोकांना धन्यवाद दिले पाहिजेत.

* * *

डहाणूहून सोळा मैलांचें अंतर कापून आम्ही काशाला पोंचलों. माझे अेक जुने विद्यार्थी श्री. मुरलीधर घाटे बारा-पंधरा वर्षांपासून दक्षिण महाराष्ट्रांत

---

१ वातावरण-पृथ्वीच्या गोळ्याभोंवतीचें हवेचें आवरण.
अुदावरण-पृथ्वीच्या जमिनीला घेरणारें पाण्याचें आवरण. अुद्-पाणी.

ग्राम-सेवेचें काम करीत आले आहेत. याच वर्षी त्यांनीं–व त्यांच्या सुयोग्य धर्मपत्नीनें–काशाचें केन्द्र आपल्या हातीं घेतलें आणि पहातां पहातां तेथलें सांस्कृतिक वातावरण समृद्ध बनवलें. आचार्य श्री. शंकरराव भिसे यांच्या प्रेरणेने प्रमाणें येथलें सगळें कार्य चाललें आहे.

डहाणूहून काशाला जातांना समोर अेक चांगलें अुंच पर्वत-शिखर दृष्टीस पडतें. शिखराच्या आकारावरून या पहाडाला अृष्यशृंग म्हटलें पाहिजे. चौकशी करतां कळलें कीं शिखराच्या शृंगाचा दगड मजबूत नाहीं. दगडाला पकडून कुणी वर चढूं म्हटलें तर दगडाचे तुकडे हातांत येतात. मला भीति वाटते कीं हजार दोन हजार वर्षांत हें सारें शृंग हवा, पाणी व अून यांच्या योगानें झिजून जाअील आणि पहाडाची अुंची अेकदम कमी होअील. या पहाडाच्या शिखरावर श्री महालक्ष्मीचें मंदिर आहे. असें म्हणतात कीं कुणी गर्भवती स्त्री महालक्ष्मीच्या दर्शनाला वरपर्यंत गेली व थकून गेली. महालक्ष्मीनें पुजाऱ्याच्या स्वप्नांत येअून सांगितलें कीं आपल्या भक्तांना अशा प्रकारें कष्ट झालेले मला सहन होत नाहींत. मला खालीं घेअून चला. आतां त्याच पहाडाच्या पायथ्याशीं महालक्ष्मीचें दुसरें मंदिर बांधलें गेलें आहे.

काशाच्या जवळून सूर्या नांवाची अेक चांगलीशी नदी वहाते. या नदी-बद्दल अेक मजेदार लोककथा प्रचलित आहे.

तीर्थयात्रा करण्यासाठीं पांडव या रस्त्यानें जात असतांना, भीमाच्या मनांत आलें कीं स्थान-देवता श्री महालक्ष्मीशीं आपण लग्न करावें. त्याप्रमाणें विचारल्यावर महालक्ष्मीनें सांगितलें कीं येथून कांहीं योजनांच्या अंतरावर जी सूर्या नदी वहात आहे तिचा प्रवाह वळवून जर तूं माझ्या या पहाडाच्या पायापाशीं घेअून आलास तर मी तुझ्याशीं विवाह करीन. अट अितकीच कीं हें सगळें काम अेका रात्रींत झालें पाहिजे. जर पहाटेचा कोंबडा आरवला आणि तुझें काम पुरें झालें नाहीं तर आमचा तुझ्याशीं विवाह होणार नाहीं. भीम कबूल झाला. मोठमोठे दगड आणून त्यानें नदीचा प्रवाह अडवला. थोडीशी जागा अुरली होती, तिच्यासाठीं दगड मिळेनात तेव्हां त्यानें आपली पाठच तेथें टेकवली. मग काय विचारतां? नदीचें पाणी वाढूं लागलें आणि

हळूं हळूं महालक्ष्मीच्या पहाडाकडे वळूं लागलें. महालक्ष्मी घाबरली कीं आतां अेका साध्या अडदांड माणसाबरोबर विवाह करावा लागणार. देवांमध्यें फसवेगिरी बरीच चालते. सरळ वागतां हरण्याची वेळ आली कीं ते कांहीं ना कांहीं मार्ग शोधून काढतातच.

अिकडे भीम बांधाच्या दगडांमधें पाठ टेकवून पाणी पहाडापर्यंत केव्हां पोंचतें त्याची वाट पहात बसला होता. अितक्यांत महालक्ष्मीनें कोंबड्याचें रूप धारण केलें आणि पहाट होण्याआधींच 'कुकूच कू' म्हणून आवाज केला. बिचारा भीम वेळेच्या आंत आपला पण पुरा होअूं शकला नाहीं म्हणून निराश झाला व अुठला. तितकी जागा मिळतांच तुंबलेलें पाणी जोरानें वाहू लागलें आणि पाण्याबरोबर भीमाचे मनोरथ देखील वाहून गेले!

अशाच प्रकारें धूर्त देवांचा व बलशाली असुरांचा कलह देखील असंख्य लोककथांमधें व पुराणांत रंगवलेला आढळतो.

अनेक हिरवींगार शेतें ओलांडून आम्ही सूर्येच्या किनाऱ्यावर पोंचलों. पावसाळ्याचे दिवस होते. पाणी खूप वाढलेलें होतें आणि भीम-बांधाच्या डोक्यावरून खालीं अुडी घेत होतें. मोठें मनोहर दृश्य होतें. जेथून पाणी जोरानें वहात होतें, तेथें आम्ही आपल्या कल्पनेतला भीम बसलेला पाहिला. आम्ही त्याला प्रणाम केला. त्यानें विषादानें आपलें डोकें हलवलें आणि पुन्हा ध्यानांत मग्न झाला.

आम्ही परतून काशाला आलों. तेथलें काम पाहिलें. आदिम जीवनाचें दर्शन घडवणारें प्रदर्शन पाहिलें. थोडेसें जेअून घेतलें, लोकांशीं गोष्टी केल्या आणि पुन्हा बसमधें बसून महालक्ष्मीचें मंदिर पहायला गेलों. रस्त्यांत आदिवासी लोकांच्या झोंपड्या आणि त्यांचीं शेतें पाहिलीं. ही जात मागासलेली आहे यांत शंका नाहीं, परंतु ती आपल्या जीवनाच्या आनंदाला मुकलेली नाहीं. महालक्ष्मीचें मंदिर पहाडाच्या खालीं अेका रमणीय स्थानीं आहे. देवीचे भक्त दूरदूरवर पसरलेले आहेत. दरवर्षीं येथें अेक फार मोठी जत्रा भरते. पहातां पहातां अेक लाख लोक जमा होतात. अशा यात्रेकरूंना रहाण्यासाठीं कांहीं लोकांनीं अलीकडे येथें अेक चांगली धर्मशाळा बांधली आहे. ती जाअून पाहिली. संगमरवरी दगडांवर दात्यांचीं नांवें कोरलेलीं होतीं.

नांवें वाचून मी आश्चर्यचकित झालों. सगळींच्या सगळीं नांवें आफ्रिकेंतील दक्षिण ऱ्होडेशियांत वसलेल्या गुजराथी धोब्यांचीं होतीं. कुणी शंभर शिलींग दिले होते. कुणी हजार दिले होते. कुठें दक्षिण ऱ्होडेशिया, कुठें गुजराथ आणि कुठें ठाणें जिल्ह्यांतील मराठी लोकांमधें गुजराथ्यांनीं बनवलेलें हें आरामगृह !

स्वराज्य सरकारच्या मदतीनें आतां या आदिवासी लोकांतील नवयुवक अुत्साहानें नव्या नव्या गोष्टी शिकूं लागले आहेत आणि आपल्या जातीच्या अुद्धाराविषयीं विचार करूं लागले आहेत. मीं त्यांना म्हणालों कीं तुम्ही अितके मागासलेले आहांत कीं आपल्याच जातीच्या अुद्धारासाठीं झटणें तुम्हांला सध्यां योग्य होअील. परंतु मी त्या दिवसाकडे डोळे लावून आहें कीं जेव्हां तुम्ही लोक केवळ आपल्याच जातीच्या नव्हे तर साऱ्या भारताच्या अुद्धाराचा विचार करूं लागाल. केवळ आपल्याच जातीचे नव्हे, तर साऱ्या देशाचे नेते बनाल. जे केवळ आपल्या जातीपुरताच विचार करतात, त्यांचें मागासलेंपण कधींच दूर होत नाहीं. जे सगळ्या जगाचा विचार करतात, साऱ्या जगाची सेवा करतात, तेच स्वतःची व आपल्या लोकांची खरी अुन्नति साधतात.

मीं आपल्या मनाशीं प्रश्न केला कीं जर या लोकांत भीमासारखी शक्ति आली आणि येथल्या आजूबाजूच्या सवर्ण, पांढरपेशा लोकांत स्थानिक देवता महालक्ष्मीसारखी चतुराअी आली तर परिणाम काय होअील ? तर मग केवळ पाण्याचीच सूर्या नदी वहाणार नाहीं !

कलियुगाचें माहात्म्य आहे अशा समजुतीनें नव्हें, परंतु सत्ययुगाच्या स्थापनेसाठीं आम्ही या आदिवासी लोकांना आपल्यांत संपूर्णपणें सामावून घेतलें पाहिजे. चार वर्णांच्या पुनःस्थापनेच्या गोष्टी आणि आदिवासी लोकांच्या ‘ अुद्धारा ’ विषयींची परोपकाराची भाषा आतां आपण सोडून दिली पाहिजे. यांच्यात व आमच्यांत कसलाच भेदभाव अुरता कामा नये. आपण सर्व सूर्येचीच प्रजा आहोंत.

सप्टेंबर, १९५१.

# : ५३ : दोन मद्रासी बहिणी

या दोन बहिणींबद्दल माझ्या मनांत अपार सहानुभूति आहे. मद्रास शहरानें जसें यांचें महत्त्व वाढवलें आहे, तशीच त्यांची अुपेक्षाहि केली आहे.

तसें पाहिलें तर मद्रास शहराचें महत्त्वदेखील कृत्रिमच आहे. त्याच्यापाशीं नाहीं अेखादा सुंदर पर्वत कीं नाहीं महानदीची खाडी. व्यापाराच्या दृष्टीनें किंवा लष्करी दृष्टीनेंदेखील मद्रासचें तसें कांहीं खास महत्त्व नाहीं. परंतु अितिहास-क्रमामुळें अिंग्रजांना हेंच स्थान पसंत करावें लागलें. येथल्या स्थानिक लोकांचें या शहरावर कमी प्रेम होतें असें कुणीच म्हणूं शकणार नाहीं. या शहराच्या भाग्याची आधींपासून कल्पना असल्यामुळेंच का येथल्या भारतीयांनीं किंवा धीवर आदिवासींनीं या शहराचें नामकरण 'चन्नपट्टनम्' म्हणजे सुवर्णनगरी केलें असेल ?

कसेंहि असो, जेव्हांपासून अिंग्रजांनीं येथें आपली कोठी स्थापन केली तेव्हां-पासून या शहराचें भाग्य व वैभव वाढतच गेलें आहे आणि अशा शहराची सेवा करणाऱ्या या दोन बहिणींचें भाग्यदेखील बदलत गेलें आहे. अेकीचें नांव आहे 'कूवम्' आणि दुसरीचें नांव आहे 'अड्यार.' या दोन्ही नद्या पूर्वगामी होअून बंगालच्या अुपसागराला म्हणजे पूर्व समुद्राला जाअून मिळतात.

खुद्द मद्रास शहराची व त्याच्या आजूबाजूची जमीन अेकदम सपाट आहे. येथें लहान-मोठे अनेक तलाव व सरोवरें आहेत. परंतु आतां त्यांची शोभा नामशेष झालेली आहे.

तर्क-बुद्धि म्हणते कीं जमीन जर समतल व असेल पथराळ नसेल तर नदीला आपलें पात्र सरळ खोदीत जाण्यांत कसलीच अडचण वाटतां कामा नये. परंतु नद्यांची रीत वेगळीच असते. कांहीं मर्यादेपर्यंत नदी अेकीकडे झुकेल, मग तेथून कंटाळून वळण घेअील व दुसरीकडे पोंचेल. मग पुढें जातांना पुन्हा दिशा बदलेल आणि अशा प्रकारें नागमोडी गतीनें पुढें जाअील.

बिचाऱ्या पहाडी नद्यांचा नाअिलाज असतो. पर्वत व टेकड्या यांच्यामधून जेथून वाट सांपडेल तेथून जाणें त्यांना भाग असतें. तीस्ता म्हणेल, "मी

-स्वभावतः नागीण नाहीं. वक्रगति माझा स्वभाव नाहीं, माझें भाग्यच तसें आहे." काश्मीरमधें वहाणारी वितस्ता किंवा झेलम आपला असा बचाव करूं शकणार नाहीं. जवळ जवळ चक्राकार वळसे घेत जाणें व तसें करतांना पुढें जाण्याविषयीं यत्किंचितहि अुत्साह न बाळगणें, हा आहे काश्मीर-तल-वाहिनी वितस्तेचा स्वभाव. बिहारमधें वहाणाऱ्या असंख्य नद्यांविषयीं देखील असेंच म्हणतां येअील. अेकदां मला बिहारमधें अनेक ठिकाणीं विमानानें प्रवास करावा लागला होता. कोण जाणे कितीदां बिहारच्या आकाशाला मीं अनेक दिशांनीं विंधलें असेल. विमानाच्या दूरदूरच्या दीर्घ प्रवासांत देखील बऱ्याच अुंचावरून मी बंगाल व बिहारच्या नद्या पाहिल्या आहेत आणि त्यांचें वक्र-मार्ग-नैपुण्य पाहून त्यांचा आदर केला आहे.

भारतभूमीचें अेक मोठें मानचित्र बनवून त्यावर जर केवळ नद्यांचे मार्ग दाखविणाऱ्या रेघा काढल्या तर तो वक्र-रेखांचा महोत्सव मोठा चित्तवेधक होअील. नदीला अुजवीकडे व डावीकडे वळण घेतल्यावांचून संतोषच होत नाहीं. अेकीकडील अुंच किनारा घासत जाणें व दुसरीकडील सखल किनारा दरवर्षीं बुडवून तेथें कांहीं काळ जलप्रलयाचा देखावा निर्माण करणें ही नद्यांची वार्षिक क्रीडा असते.

परंतु जेव्हां नद्या मोठमोठ्या शहरांच्या वस्तींत अडकून पडतात किंवा दयाळू बनून आपल्या दोन्ही कांठावर माणसाला वसूं देतात, तेव्हां त्यांचा हा स्वच्छंद विहार कायमचा बंद होतो आणि तेव्हांपासून त्यांचें जीवन टांगा ओढणाऱ्या घोड्यासारखें बनतें. अशा स्थितींतहि नद्यांनीं आपलें वळण कायम ठेवलें तरी त्यांची शोभा नष्ट झाल्यावांचून रहात नाहीं.

लंडनमधील टेम्स नदी, पॅरिसमधील सीन नदी आणि लिस्बनमधील टेगस नदी या तिघींची बंधन-दुर्दशा पाहून माझ्या हृदयानें कितीदां तरी आक्रोश केला आहे. आणि जेव्हां मानिनी व स्वच्छंद-विहारिणी नील-नदी लाचार होअून निमुटपणें अल्काहेरा ( कायरो ) शहराच्या मधून जाते, तेव्हांतर दुःखाबरोबरच क्रोधहि जागृत होतो. आणि नदीचा अपमान करणाऱ्या मानवजातीला कशी काय अद्दल घडवावी असे विचारहि मनांत येअूं लागतात.

अड्यार व कूवम् या दोघींपैकीं कूवमूला बंधनाचें दुःख अधिक सोसावें लागलें आहे; कारण ती शहरामधून वाट काढीत असते. अड्यार नदी शहराच्या दक्षिण किनाऱ्यावर असल्यामुळें तिला थोडासा अवकाश मिळाला आहे.

परंतु—येथेंहि परंतु आडवें आलें—जेथें मनुष्यानें अपमान केला नाहीं, तेथें या सरितेचा सरित्पतीनें अपमान केला आहे. बिचारी मोठ्या अुत्साहानें समुद्राला भेटायला जाते आणि बेपर्वा समुद्र अुंच अुंच लाटांबरोबर वाळू आणून आणून तिच्या समोर अेक फार मोठा बांध किंवा सेतु अुभा करतो !

देवी वासंतीचा ब्रह्मविद्या आश्रम जेव्हां मी सर्वप्रथम पहायला गेलों होतों, त्यावेळीं सागर-सरिता-संगमाची भव्यता पहाण्यासाठीं म्हणून नदीच्या मुखापर्यंत पोंचलों होतों. आणि पहातों तर काय—खंडिता अड्यार आपलें पाणी आण-आणून मार्ग-प्रतीक्षा करीत आहे आणि समुद्र आपण अुभारलेल्या बांधाच्या पलीकडे लाटांचें विकट हास्य हंसत आहे. समुद्राचा तर मनांत राग आलाच. काय याच्यांत थोडेंदेखील दाक्षिण्य नाहीं ! थोडीशी तरी वाट देता ! परंतु सरिता व सरित्पति यांच्यामध्यें पसरलेल्या सेतूवरून चालतां चालतां मनांत हाच विचार आला कीं अड्यारच्या अपमानांत मी देखील सामील आहे. सेतूवरून पलीकडे गेल्यानंतर परतावें तर लागलेंच. त्यानंतर आजपर्यंत अनेकदां मद्रासला गेलों, भगवती अड्यारचें दर्शनसुद्धां अनेकवार घेतलें, परंतु पुन्हां त्या बांधावरून जाण्याची अिच्छाच झाली नाहीं.

कूवमूच्या पाण्याहून अड्यारचें पाणी अधिक स्वच्छ वाटतें. तेथली हवा स्वच्छ असल्यामुळें पाणी चमकदारहि वाटतें. या नदीच्या मधें अुत्तरेकडे अेका लक्ष्मीपुत्राचा शुभ्र प्रासाद आहे. तो नदीची शोभा बिघडवीत नाहीं. अुलट नदीमुळें तो अधिक अुठावदार दिसतो.

जेव्हां जेव्हां मी अड्यार नदीवर गेलों, तेव्हां तेव्हां तिच्या कांठावरील शहाळ्यांचें गोड पाणी मी प्यालों आहें, आणि त्यालाच या लोकमातेचा प्रसाद मानलें आहे. अड्यारबरोबर कूवमूचें देखील दर्शन होतेंच. सेंट जॉर्ज फोर्टमुळें तिची शोभादेखील कांहीं साधारण कोटीची नाहीं. पण तरीदेखील आजवर नेहमीं तिच्याबद्दल कींवच वाटत आली आहे.

अिंग्रजांनीं अडयारपासून कूवमूपर्यन्त अेक छोटासा कालवा खेळवला आहे,

ज्याला त्यांनीं 'बकिंगहॅम केनाल' नांव दिलें आहे. या कालव्यामुळें काय फायदा झाला आहे मला ठाअूक नाहीं. परंतु याचें नांव मात्र जितक्यांदा अैकलें तितक्यांदा मला खटकलें आहे.

या नद्या मद्रास शहरामधें नसत्या तर कदाचित् मी त्यांना श्रद्धांजलि देअूं शकलों नसतों. परंतु यांचें माहात्म्य व सौंदर्य वाढविण्याचें काम मद्रास शहराच्या हातून झालेलें नाहीं. मद्रासनें यांची सेवा घेतली, पण यांची सेवा केली नाहीं, हा मद्रासविषयींचा विषाद मनांत अुरतोच.

२ जून १९५७.

# : ५४ : नागीण नदी तीस्ता

कांहीं वर्षांपूर्वीं दार्जिलिंग, कालिंगपांगच्या बाजूस गेलों असतांना तीस्ता नदीचें प्रथम दर्शन घडलें होतें. प्रथम दर्शनींच तिच्याबद्दल असाधारण प्रेम वाटूं लागलें. जर तीस्तेविषयीं कांहीं पौराणिक कथा किंवा माहात्म्य मला ठाअूक असतें तर तिच्याबद्दल मनांत भक्ति अुत्पन्न झाली असती. परंतु ही तुफानी नदी हिमालयाच्या पहाडांमधून मार्ग काढीत, खडकांशीं टक्कर देत, प्रवाहांत पडलेल्या लहानमोठ्या दगडांचें मंथन करीत आणि विविध प्रकारच्या गर्जना करीत जेव्हां धांवत येते, तेव्हां तिचा अुत्साह, तिचा दृढ निश्चय आणि अमर्ष पाहून तिच्याबद्दल भक्ति वाटण्याअैवजीं प्रेम व आदरच अुत्पन्न होतात.

जेव्हां तीस्तेचें प्रथम दर्शन झालें, त्यावेळीं मनांत संकल्प अुठला कीं या नदीचें पहाडी जीवन थोडेंतरी पाहिलेंच पाहिजे.

जोरांत वाहणाऱ्या पहाडीनदीवर जे वेताचे किंवा दोरखंडाचे पूल बांधलेले असतात, त्यांवर अुभे राहून प्रवाहाकडे पहातांना अेक विचित्र अनुभव येतो. वाटतें कीं हा पूल नदीच्या प्रवाहाशीं सामना करीत वरच्या दिशेनें जोरांत धावत चालला आहे. जितका अधिक वेळ आपण ध्यानपूर्वक पहावें, तितकी ही प्रतीप-गामी भ्रांति वाढतच जाते.

अेके दिवशीं मीं मनांत म्हटलें कीं याला आपण भ्रांति कां मानावें ? ही अेक प्रकारची दीक्षा आहे. या अनुभवाच्याद्वारा निसर्ग आपणाला सांगतो, ‘ जितक्या बेपर्वाभीनें हें पाणी पहाडांतून येअून मैदानाकडे धांवत आहे आणि सागराचा शोध घेत आहे, तितक्याच बेपर्वाअीनें आणि अदम्य कुतूहलानें या प्रवाहाच्या किनाऱ्या किनाऱ्यानें सगळे धोके पत्करून वरच्या दिशेनें जा व या नदीचें अुगम-स्थान शोधून काढा. ’

जेव्हां अेखादी पहाडी नदी सरोवरांतून अुगम पावते, तेव्हां तिला सर-यू किंवा सरो-जा म्हणतात. जेव्हां पर्वत–शिखरांच्या कुशींत जमा झालेल्या हिमराशींतून तिचा जन्म होतो तेव्हां तिला हैमवती म्हटलें पाहिजे. अेरवीं पर्वतांतून अुगम पावणाऱ्या सर्व नद्यांचें सामान्य नांव पार्वती आहेच. जन्मदात्या हिमालयाच्या या सर्व मुलींचीं नांवें जर अेकत्र केलीं तर त्यांची संख्या हजारांनीं भरेल.

तीस्तेचें मूळ नांव त्रिस्रोता आहे. अुत्तर-पूर्व आफ्रिकेंत नील नदीचे दोन वेगवेगळे अुगम आहेत आणि दोन्ही प्रवाह दूरदूरच्या दोन सरोवरांतूनच निघतात – धवलरंगी नील व नीलरंगी नील. दोघांच्या संगमानें मिश्र देशाची माता नील नदी बनते. त्याचप्रमाणें तीस्ता देखील तीन स्रोतांच्या संगमानें बनली आहे. अेका स्रोताचें नांव आहे ‘ लाचुंग चू ’ ( चू म्हणजे नदी. ). ही नदी ‘ कान् चेन झौंगा ’ (कांचनगंगा) शिखराच्या दक्षिणेकडून अुगम पावते. दुसऱ्या स्रोताचें नांव आहे ‘ लाचेन् चू ’. ही नदी पाव हुन् री शिखराच्या अुत्तरेकडून अुगम पावून, चो ल्हामो व गोरडामा या दोन सरोवरांचें पाणी घेअून मार्ग काढीत काढीत प्रथम पश्चिमेकडे वहाते, व मग हळूं हळूं दक्षिणेकडे वळते. या दोघींचा जेथें संगम होतो तेथें चुंग थांगचें बौद्धमंदिर आहे. लाचून् चू व लाचेन चू या दोन नद्यांच्या संगमानें जी नदी बनते, तिला पंचहिमाकर ( कान् चेन् झौंगा ), सीम् व्हो व खिनो लोचू या तीन गगनभेदी शिखरांच्या कुशींतील हिमराशींचें पाणी घेअून येणारी तालूंग चू येअून मिळते, तेव्हां हे तीन स्रोत मिळून तीस्ता बनते. आणि मग ती सरळ दक्षिणेकडे वाहूं लागते. थोडें पुढें गेल्यावर तिला अुजवी कडून व डावीकडून अनेक लहानमोठ्या नद्या येअून मिळतात. त्यांपैकीं दिक् चू, रोरो चू, रोंगनी चू, रंगपो चू व मोठी रंगीत चू या महत्वाच्या होत.

जेथें जेथें दोन नद्यांचा संगम होतो, तेथें तेथें अेखादें बौद्ध मंदिर आढळायचेंच. अशा मंदिराला येथलें लोक गोम्पा म्हणतात.

तीस्तेच्या आकर्षणानें जेव्हां सर्वप्रथम मीं या पहाडांत प्रवेश केला होता, त्यावेळीं रंगीत नदीचा संगम व रंगपो नदीचा संगम मीं पाहिला होता. संगमाच्या दोन्ही प्रवाहांचे रंग येथें वेगवेगळाले आहेत. या खेपेस हे दोन संगम तर डोळे भरून पाहिलेच, त्याशिवाय सिक्कीमची राजधानी गंगटोकच्या पूर्वेकडील नदी रोरो चू व रोंगनी चू नदीचा संगम सुद्धां मी सिंगटंगमधें पाहिला. संगम म्हणजे जिवंत काव्य !

महान् विजय प्राप्त करण्यासाठीं अनेक राजांच्या सेना जशा अेकत्रित होतात व त्यांची संकल्प-शक्ति वाढते, त्याचप्रमाणें या सर्व नद्यांच्या जल-भारानें तीस्ता नदी जलवती, वेगवती व संकल्पशालिनी बनते आणि पहाडांशीं लढत लढत मैदानांत येअून पोंचते. येथें ती शिलीगुडीला न जाता जलपाय-गुडीच्या रस्त्यानें पाकिस्तानांत प्रवेश करते व रंगपुरचें दर्शन घेअून शेवटीं ब्रह्मपुत्र नदाला जाअून मिळते.

आपल्या पूर्वजांनीं नद्यांचे दोन भाग केले आहेत. जेव्हां अेखादी नदी अनेक नद्यांचें पाणी घेअून पुष्ट बनते, तेव्हां तिला युक्तवेणी म्हणतात. गोरी गंगा, सांवळी यमुना व 'मध्ये गुप्ता' सरस्वती मिळून प्रयागराजपाशीं त्रिवेणी बनते. पंजाबमध्यें सिंधु सात नद्यांच्या प्रवाहांनीं युक्तवेणी बनते. पुढें जेव्हां ती नदी स्वतः अनेक प्रवाहांत विभक्त होते आणि समुद्राला जाअून मिळते, तेव्हां तिला मुक्तवेणी म्हणतात. नद्यांचे आपण अेका वेगळ्या तऱ्हेनें सुद्धां दोन विभाग करूं शकतों. पहाडांतील बद्ध जीवन आणि मैदानांतील मुक्त जीवन. गंगानदीचें पार्वत जीवन हरद्वारपाशीं समाप्त होतें. त्यानंतर जेथें मजबूत जमीन सांपडली तेथें तिचा प्रवाह अेका धारेंत वाहूं लागतो. परंतु जेथें भूमि बंगालसारखी दगड नसलेली व समतल असते, तेथें तिच्या अनेक धारासुद्धां होतात. नदीच्या पार्वत जीवनाला कुमारिकेचें अल्लड जीवन म्हणतां येअील. मैदानांत पोहोंचताच अनेक शेता-मळ्यांना स्तन्यपान करतां करतां ती प्रजांची माता बनते. दार्जिलिंग व कालिंगपोंगच्या पहाडांमधून बाहेर पडल्यावर तीस्तेला फक्त अेकदोन बंधनेंच

सहन करावी लागतात आणि तीं म्हणजे—आसामकडे जाणाऱ्या रेल्वेच्या पुलांचीं. अेक आहे भारतानें नवीनच बांधलेला आसामलिंकचा पूल व दुसरा आहे आम्हीच बांधलेला पण पाकिस्तानच्या हातीं गेलेला रंगपुरजवळील दुसरा पूल.

तीस्ता नदीचें मैदानी जीवन कांहींसें विचित्र आहे. तिबेटांतील बहुपति-प्रथेचें बहुधा तिला स्मरण असावें. अेके काळीं तीस्ता नदी गंगेला मिळत होती. या शंभर-दोनशें वर्षांत तिनें अनेक पराक्रम केले आहेत व तेथल्या लोकांकडून 'पागला' नामाभिधानहि प्राप्त करून घेतलें आहे. आज सुद्धां तिचा अेक प्रवाह छोटी तीस्ता या नांवानें ओळखला जातो, दुसरा प्रवाह आहे बूढी तीस्ता आणि तिसरा आहे मरा तीस्ता. तिनें आपला जलभार करतोया नदीला देअून पाहिला, घाघातलाहि अर्पण केला. मैदानांत ती युक्तवेणीहि बनते व मुक्तवेणीहि. तीस्ताचा चंचल स्वभाव ओळखून तिचा अनुनय करणें माणसाला तितकेसें सोपें नाहीं. ती अितकीं कांहीं स्थलांतरें करते कीं तिच्या अनेक प्रवाहांना स्थायी नांव देणें व तीं सर्व लक्षांत ठेवणें सुद्धां कठीण आहे. 'कालिका पुराणां'त तीस्तेचा अुल्लेख आहे असें म्हणतात. तेथें अशी कथा आहे कीं देवी पार्वती कुणा अेका असुराशीं लढत होती. त्या अुद्दाम असुराचें म्हणणें होते कीं मी शंकराची अुपासना करीन, पार्वतीची करणार नाहीं. पार्वतीचें व त्या असुराचें घोर युद्ध जुंपलें. लढता लढता त्या असुराला फार तहान लागली. त्यानें शंकराची प्रार्थना केली कीं, 'प्रभो, माझी तहान भागवा!" आणि काय आश्चर्य! प्रार्थना शिवाच्या चरणांपाशीं रुजू होतांच पार्वतीच्या स्तनांतून स्तन्यधारा वाहूं लागली. तीच आपली तीस्ता होय. असें सांगतात कीं असुरेश्वराची तृष्णा शमवण्याचें काम या नदीनें केलें म्हणून तिचें नांव पडलें तृष्णा आणि तृष्णेचेंच प्राकृत रूप आहे तीस्ता. नदीला कुणी तृष्णा कसें काय म्हणूं शकेल हें कांहीं आपल्या ध्यानांत येत नाहीं. शिवाय 'तृष्णा'चें 'तण्हा' होअूं शकतें. परंतु णकाराचा अज्ञात लोप होअून जाणें कांहीं योग्य वाटत नाहीं.

कसेंहि असो, तीस्तेचा जीवन-क्रम सुरुवातीपासून शेवटपर्यंत आकर्षक व संस्मरणीय आहे. पहाडांत जेथें या नद्या वहातात तेथें गर्मी बरीच असते.

त्यामुळें मलेरियाचे मच्छरहि पुष्कळ असतात. कदाचित याच कारणामुळें तीस्तेच्या नांवाचें अेकहि लोकगीत सांपडत नसावें.

परंतु आतां आपण विज्ञान-युगांत प्रवेश केला आहे. मलेरियाच्या मच्छरांचा अिलाज होअूं शकतो. जेथें नदी जोरानें वहाते तेथें तिच्यावर यंत्राचें जीन कसून तिच्याकडून भरपूर कामहि करून घेतां येणें शक्य आहे. तीस्तेचा अुगम अंदाजें पांच-सात हजार फूट अुंचीवर असावा. जेव्हां ती डोंगराळ प्रदेश सोडते, तेव्हां तिची अुंची समुद्रसपाटीपासून फक्त सातशे फूट असते. पहातां पहातां जी नदी सहा हजार फुटाची अुंची अुतरून येते, तिच्याकडून हवीं तीं कामें करवून घेणें शक्य आहे. करवतीनें लाकडें कापणें व जात्यावर पीठ दळणें हीं कामें तर या नद्या करीतच असतात. यापुढें यांच्याकडून वीज अुत्पन्न करण्याचें मोठें काम घेतलें जाअील. मग तर साऱ्या सिक्कीम राज्याचा नूरच पार बदलून जाअील.

आपल्या धर्मप्राण पूर्वजांची यंत्रबुद्धि देखील धर्मकार्यांतच चालत असे. अेके ठिकाणीं आम्ही पाहिलें कीं पहाडाच्या प्रवाहासमोर अेक चक्र ठेवून त्याच्या द्वारा ‘ओम् मणिपद्मे हुं’ हा जप ज्याच्यावर कोरला आहे अशी अेक लाकडाची मोठी नळी गोल फिरवली जाते. आणि अशा प्रकारें जो यांत्रिक जप होतो, त्याचें पुण्य यंत्राच्या मालकाला मिळतें.

माझ्या मतें अशा पुण्याचा मोठा वाटा नदीलाच मिळाला पाहिजे.

७-१०-५६

# : ५५ : सहस्रधारा

जुनें देणें अेखादे वेळीं टाळतां येअील पण जुने संकल्प कांहीं केल्या टळत नाहींत. पंचवीस वर्षांपूर्वी जेव्हां मी डेहराडूनला जाअून राहिलों होतों तेव्हां सहस्रधारा पहाण्याचा संकल्प केला होता. तीव्र अुत्कंठा असूनहि त्यावेळीं जाणें झालें नाहीं. थोडे दिवस त्याची रुखरुख मनांत राहिली आणि नंतर

पुसून गेली. कालांतरानें सहस्रधारा म्हणून अेक स्थान या पृथ्वीतलावर कुठेंतरी आहे ही स्मृतिसुद्धां पुसली गेली. पण संकल्प थोडाच टळणार ?

'आमचें कन्यागुरुकुल अेकदां पाहून जा' म्हणून आचार्य रामदेवांनीं मला फार आग्रह केला. विकासाच्या मार्गावर असलेली ती संस्था मला सुद्धां पहावयाची होती. गेल्या वर्षीं जाअूं शकलों नाहीं म्हणून या वर्षीं वचनबद्ध होअून मी तेथें गेलों. आतां निसर्गाच्या मागें वेडें होअून भटकायचें नाहीं, आतां माणसांना भेटायचें आहे, संस्था पहायच्या आहेत, राष्ट्रीय प्रश्नांची चर्चा करायची आहे, चांगलीं चांगलीं माणसें शोधून काढून कामांत गुंतवायचीं आहेत, सेवकांबरोबर विचारांची आणि अनुभवांची देवाण घेवाण करायची आहे—अशा विविध विचार-धारा मनांत घोळत असतांना, सहस्रधाराचें स्मरण होणार तरी कोठून ? मी आपला हिंदी—हिंदुस्तानीच्या चर्चेंत गढून गेलों होतों. अितक्यांत तरुण रणबीर मला भेटायला आला. कुणीतरी त्याचा परिचय करून दिला होता. तो आपण होअूनच म्हणाला कीं डेहराडूनमधें पहाण्यासारखीं स्थानें म्हणजे फॉरेस्ट कॉलेज व लष्करी शाळा आहेत, आणि नैसर्गिक दृश्यांत गुच्छु-पाणी आणि सहस्रधारा. शेवटलें नांव अैकलें मात्र आणि पंचवीस वर्षांच्या विस्मृतीची दगडी कबर फोडून जुनी स्मृति व जुना संकल्प भुताप्रमाणें नजरेसमोर अुभे राहिले. आतां त्या संकल्पाला गति दिल्यावांचून गत्यंतर नाहीं.

तैलवाहन मोटरची व्यवस्था झाली आणि पांच सात मैलांचा अुत्तरेकडील रस्ता पार करून आम्ही राजपुरला पोंचलों. येथूनच वर मसूरीला जातां येतें. आम्ही राजपुरहून अडीच अेक मैल पूर्वेकडे जंगलांतून पायीं चालत गेलों. बरोबर ६५ मिनिटें चालून आम्ही सहस्रधारेला पोंचलों. संध्याकाळची वेळ होती. मागें सूर्य मावळण्याचा विचार करीत होता आणि त्याचीं लांबत जाणारीं किरणें आमच्या समोरील रस्ता अधिकाधिक लांब करीत होतीं. पांच-दहा मिनिटांच्या आंत आम्ही मानवसंस्कृति सोडून जंगलांत प्रवेश केला. पाण्याचे पावसाळी ओहळ वाहून वाहून खोल खळगे बनलेले होते. त्यांतून वाट काढायची होती. आम्ही चौघेजण होतों. गोष्टी करीत, आसपासचें सौंदर्य न्याहाळीत आणि वेळेचा हिशोब काढीत आम्ही चाललों होतों. अमरनाथ, तुंगनाथ, बद्रिविशाल

यासारखीं स्थानें ज्यानें पाहिलीं आहेत त्याला मसूरीचा पहाड म्हणजे 'किस पेडकी पत्ती'. पण बऱ्याच वर्षांनीं पुन्हा हिमालयाच्या पायथ्याशीं जाणें झालें त्यामुळें हें दृश्यदेखील डोळयांना भव्य वाटलें.

मसूरीकडच्या पर्वतांत अनेक वेळां टेकड्या कोसळून पडतात, ज्याला अिंग्रजींत लॅन्ड-स्लिप किंवा लॅन्ड-स्लाअीड म्हणतात. अेखाद्या झुंजार योद्ध्याला जबरदस्त जखम झालेली असावी तसें हें दृश्य दिसतें. मोठमोठे पर्वत लहानमोठ्या वृक्षांनीं झांकलेले आहेत आणि मधेंच मोठ्या पहाडाचा भाग तुटून गेल्यामुळें अेक सबंध बाजू अुघडी पडलेली आहे असें दृश्य पाहून हृदयांत कसेंसेंच होअूं लागतें. अशी प्रमाणाबाहेरचीं प्राकृतिक दृश्यें फार विशाल असतात. आणि या अपघातांवर कसलाच अिलाज नसतो त्यामुळें असले घाव डोळयांना खटकत नाहींत. अुलट आदरास पात्र असें ते पहाडाचें वैभवच वाटतात.

आम्ही खालीं अुतरलों, पुन्हा चढलों, पुन्हा अुतरलों, पुन्हां खूप चढलों आणि तेथून घेरी यावी असा अुतार लागला.

आम्ही राजीखुशीनें चतुष्पाद बनून हळूं हळूं खालीं अुतरलों. रस्त्यांत जेथें म्हणून अुतरलों तेथें प्रत्येक ठिकाणीं अेक दगडांची कोरी नदी ही ठेवलेलीच. पावसाळयांत ती अितका कांहीं कोलाहल करते कीं सगळी दरी सहस्र निनादांनीं दुमदुमून जाते; परंतु आतां जेथें पहावें तेथें भीषण शांति. लहान लहान पक्षी अेकमेकांना आवाज देअून अिशारे करीत नसते, तर येथें अुभें राहिल्यानें सुद्धां छातींत धडकी भरली असती. शेवटच्या अुतार आला आणि जेथें पहावें तेथें स्लेटवाले दगड जीव वाचवण्यासाठीं अेखादी तख्ती पकडायला गेलें तर तिचा चुरा होअून हातीं येतों.

कसेबसे आम्ही खालीं अुतरलों. जवळ जवळ अेक तास होत आला होता. ज्या गृहस्थांच्या मोटारमध्यें बसून आम्ही आलों होतों ते म्हणूं लागले, 'मी आपला येथेंच बसतों, तुम्ही पुढें जा.' मी म्हणालों. 'तुमच्याशीं आम्ही तासाभरांत परत फिरूं असा करार केला होता. पण सहस्रधारेला पोंचतां पोंचतांच तासापेक्षां अधिक वेळ जाअील, म्हणून तुम्ही आतां परतच जा आणि मोटर घेअून वेळेवर डेहराडूनला पोहोंचा. आम्ही भाड्याच्या बसमधें बसून येअूं.' रणबीर म्हणाला, 'आतां तर दहा मिनिटांत आपण

जाअून पोहोंचूं. समोरच्या टेकडीच्या कडेवर ती पांढरी झोंपडी दिसते आहे तिच्या बाजूलाच सहस्रधारा आहे.'

अितक्या दूर आलोंच आहोंत, त्यांत पांच मिनटें अधिक असा विचार करून आम्ही निघालों. मागें वळून पहाण्याचें मनांत आलें. पहातों तों सूर्य आकाशांत लटकत होता आणि पायथ्याच्या दरींतले पहाड दोन हात अुंचावून चेंडू झेलण्याच्या तयारींत असावेत तसे त्याचें स्वागत करीत होते गमतीनें वर अुडवलेलें बालक मातेच्या हातांत पडतांना हसावें आणि मातेनेंहि आनंदित व्हावें तसें तें दृश्य होतें. अशा वेळीं मातेच्या अुमाळ्याचें मनानें सेवन करावें कीं बालकाचें विश्वासपूर्ण हास्य खुलवावें, कोणत्या आनंदाशीं अेकरूप होअून जावें, त्याचा निश्चय न झाल्यामुळें मनाचा गोंधळ अुडतो. अितकें अेकच दृश्य पहाण्यासाठींदेखील येथवर यावें! पण संकल्प तर सहस्र-धाराचा होता, त्यामुळें लांबत चाललेल्या सूर्यकिरणांकडे पाठ फिरवून आम्ही लगबगीनें पुढें निघालों.

तोंच अेकाअेकीं अेक मोठा स्रोत धबधबत असलेला दिसला. अुंचावरून स्वच्छ पाणी मजबूत बनलेल्या मातीच्या नैसर्गिक भिंतीवरून निसटून पडत आहे, आवाज करीत आहे, आणि अलमस्त अेकतानतेनें अवतरत आहे. जवळ कुणी आहे किंवा नाहीं, पहातो कोण? काय होत आहे याची त्याला मुळींच पर्वा नाहीं. धब धब धब आणि धब चालूंच आहे. दगडावरून पाणी पडतें तेव्हां अितकें आश्चर्य वाटत नाहीं. पण येथें तर आपला हट्ट न न सोडणाऱ्या मातीवरून पाणी पडतें आहे. मी पहातच अुभा राहिलों. पाण्याच्या अशा दृश्यांत अितका कैफ असतो असें जर दारुड्या लोकांना कळलें, तर नशापाणी करण्याचें सोडून ते अहर्निश येथेंच येअून बसतील. क्षणभर परत जावयाचें आहे तें मी विसरूनच गेलों. जेव्हां आपण, क्षणभर का होईना, निसर्गाशीं अेकरूप होअून जातों त्यावेळीं तो खरोखर अद्वैतानंद असतो. स्वतःचें भान हरपल्यानंतर आनंदी आनंदच अुरणार.

तर मग काय जिला आपण जडसृष्टि म्हणतों ती जड नसून अद्वैता-नंदाच्या समाधींत अेकतान होअून पडली आहे? या प्रश्नाचें अुत्तर कोण देअूं शकेल?

रणवीर म्हणाला, 'आतां आपण थोडेसे पुढें जाअूं या.' आतां अुशीर करण्याची माझी दानत नव्हती. पण थोडेंसें राहून गेलें अशी रुखरुख मनाला लागून राहूं नये म्हणून मी पुढें निघालों. खालीं पाणी वहात होतें. हळूंच आम्ही खालीं अुतरलों तों तेथें सुराखारचा, बंदुकीच्या दारूचा गंध नाकाला झोंबूं लागला. खालीं अुतरून तें पाणी थोडेंसें प्यालों. असें म्हणतात कीं सगळया प्रकारच्या चर्मरोगासाठीं हें पाणी 'बहोत मुफीद है.' हें पाणी आणि त्याचे गुण यांच्याविषयीं मी विचार करीत होतों, पण हृदय मात्र त्या आतांच पाहिलेल्या धबधब्याच्या धबूकारांशीं ताल धरीत होतें. अितक्यांत वरच्या बाजूला अुंचावर अेका पुढें कललेल्या गुहेच्या छतामधून पाण्याचे थेंब पडतांना दृष्टीस पडले. जणूं काय अत्यंत सौम्य आणि मूक जलतरंग अथवा वृंदगायन.

हीच खरी सहस्रधारा. हजारो थेंब या गुहेवरून आणि आंतून टपटपत असतात. परंतु त्यांचा आवाज अेकवटत नाहीं. शांतपणें थेंब पडतच असतात. अेका बाजूनें आम्ही वर चढलों. तेथें अेक साधारण खोल अशी गुंफा होती. मधें खांबासारखा दगडाचा भाग होता. त्याच्या आसपास आम्ही फिरलों. सगळीकडेच सहस्रधारांचा वर्षाव होत होता. तो सारा पहाड विरघळून चालला आहे असा भास होत होता. आम्ही चांगलेच भिजलों. चांगले तासभर भरभर चालत आल्यामुळें शरीरांत अुष्णता वाढली होती. त्यामुळें अशा रीतीनें भिजून जाण्यांत कांहीं औरच आनंद वाटला. किती सुभग शीतल येथलें हें दृश्य! येथें रहाण्यासाठीं माणसाचा जन्म अुपयोगीं नाहीं. येथें तर वेदमंत्रांचें चातुर्मासांत पठण करणाऱ्या बेडकांचा अवतार घेअूनच राहिलें पाहिजे. जें हृदय थोड्या वेळापूर्वी शक्तिशाली धबधब्याशीं अेकरूप झालें होतें तेंच येथें अेका क्षणांत या झिमझिम झिमझिम सहस्र-धारांच्या बालनृत्याशीं तन्मय होअून गेलें. मीं रणवीरचे अन्तःकरणपूर्वक आभार मानले आणि म्हटलें, 'जर अितका सुंदर भाग पहायचा राहून गेला असता तर खरोखर पश्चात्ताप करण्याची पाळी आली असती.' पावसापासून निवारा देणाऱ्या गुंफा तर मीं असंख्य पाहिल्या आहेत. पण अुन्हाळयांतसुद्धां आपल्या पोटांत पावसाला सांठवून ठेवणारी गुंफा मीं हीच पहिलीवहिली पाहिली. सिलोनच्या मध्यभागीं अेके ठिकाणीं चित्रें रंगविलेली अेक मोठी गुंफा आहे. त्यांतून अेके ठिकाणीं अेक लहानसा झरा टपटपत असतो. परंतु असा

अखंड पाअूस तर मीं सर्वप्रथम येथेंच पाहिला. आम्हांला जशी परतायची घाअी होती, तशी या पावसाला नव्हती. त्याला त्याचें जीवनकार्य मिळून चुकलें होतें. दगडांवरच्या शेवाळामुळें पाय घसरत होते. आणि येथलें सौंदर्य, पावित्र्य आणि शांति यांच्यामुळें पाय येथेंच खिळून रहात होते. अशा अवस्थेंत जितका वेळ येथें गेला तितका लाभ पदरांत पडला असें मनाला वाटत होतें.

शेवटीं तेथून मागें परतावेंच लागलें. आतां तर दुप्पट वेगानें मागें जायचें होतें. रस्त्यांत कितीतरी मजूर आणि गुराखी घाअीघाअीनें चालतांना दिसले. बिचारे गरीब लोक, मोठ्या मुश्किलीनें अशा ठिकाणीं जगत असतात. परंतु आम्हांला आपला सहस्रधारेच्या अमृत-दृष्टीखालीं या लोकांना रहायला मिळते याचाच हेवा वाटला.

अुतरतांना अुतरलों, पण आतां अंधार होअील तेव्हां चढतां कसें येअील हा अेक प्रश्न होता. मनांत आलें कीं हातांत अेखादी काठी असली तर बरें. तेथें अेक खेडवळ दुकान होतें. दुकानदाराला आम्ही विचारलें, ' भैया, अेक अच्छीसी लकडी दोगे ? ' मला अेका कानानें अैकूं येत नाहीं, तर दुकानदार दोन्ही कानांनीं बहिरा; माझें म्हणणें त्याला समजेना आणि मी अगदीं अधीर बनलों होतों. शेवटीं अेका सोबत्यानें अिशाऱ्यानें त्याला सांगितलें. त्यानें लगेच आंतून आपली बांबूची काठी आणून दिली. पैसे देअूं केले तर घेअीना. त्याची काठी घेअून मीच त्याच्यावर अुपकार केले असावेत तशी धन्यता डोळयावाटे दर्शवीत तो म्हणाला, ' ले जाअिअे, आप ले जाअिअे. ' त्यानंतर रणबीरनें त्याच्या कानांत जोरानें ओरडून सांगितलें, ' ये मेहमान तो महात्मा गांधीके आश्रमसे आते हैं. ' मग तर त्याच्या धन्यतेला आणि माझ्या संकोचाला पार अुरला नाहीं. काठी घेअून मीं पळ काढला.

आतां आमचें बोलणें बंद पडलें. पाय धावत होते आणि मी मनांतल्या मनांत प्रार्थना बोलत होतों. आकाशांत गुरु आणि शुक्र जवळच्या चंद्रावर कांहींतरी टीका करीत होते.

ते मोटरवाले गृहस्थ डोंगराच्या माथ्यावर बसून आमच्या परत येण्याची वाट पहात होते. जेव्हां आम्ही अेकत्र झालों तेव्हां ते म्हणतात, ' तुम्ही धावत गेलांत आणि पळत परत आलांत आणि मी अितकावेळ निवांतपणें या

दरीच्या भव्य विस्ताराचा व मावळणाऱ्या प्रकाशाचा, त्याच्या बदलणाऱ्या रंगांचा आनंद चाखीत राहिलों. तर मग सांगा आपल्यापैकीं अधिक आनंद कुणी लुटला ?'

प्रतिध्वनि अुमटावा त्याप्रमाणें मीं मनांत विचारलें, 'खरंच, कुणी लुटला ?'

डिसेंबर १९३६

# : ५६ : गुच्छुपाणी

गुच्छुपाणी निसर्गाचा अेक सुंदर खेळ आहे. दोन वर्षांपूर्वी डेहराडूनला गेलों होतों तेव्हां अेका दिवसाची फुरसत मिळाली होती. कांहीं जण म्हणाले कीं आपण 'गुच्छुपाणी' पहायला जाअूं. दुसऱ्या कांहींचें म्हणणें पडलें कीं 'सहस्रधारा' बघायला चला. गुच्छुपाणी नांव तर मोठें मजेदार वाटलें; परंतु विस्मृतीच्या भाराखालीं दबलेल्या जुन्या संकल्पानें डोकें वर काढून सहस्रधाराच्या बाजूनें आपलें मत दिलें होतें. त्यामुळें गुच्छुपाणी राहूनच गेलें.

यावर्षी कन्या-गुरुकुलाच्या अुत्सवासाठीं पुन्हां डेहराडूनला जावें लागलें. मग आतां गुच्छुपाणी बोलावल्याशिवाय थोडेंच रहाणार ! दोनतीन तासांची फुरसत असेल तर डेहराडूनहून गुच्छुपाणीचा प्रवास सहज करतां येण्यासारखा आहे. मोटरीअैवजीं नुसतें पायींच गेलें तरी देखील तीन साडेतीन तासांपेक्षां अधिक वेळ लागणार नाहीं. सुरुवातीला मोटरींसाठीं बनवलेला दीड अेक मैलाचा अस्फाल्टचा वज्रलेप रस्ता आपल्याला हळू हळू अुंच अुंच झाडांमधून वर वर घेअून जातो; आणि समोरच्या डोंगरावर झळकणाऱ्या मसूरीच्या गंधर्व-नगरीचें दर्शन करवितो. तेथल्या बंगल्यांच्या वांकड्या तिकड्या रांगा जेव्हां संध्याकिरणांत चमकूं लागतात तेव्हां चकमकीच्या दगडांचे चौरस तुकडे अस्ताव्यस्त पडलेले असावेत असा भास होतो.

आम्ही रस्ता सोडून डावीकडल्या शेतांत अुतरलों, तों समोर 'शाल'च्या बाल वृक्षांची झाडी दिसूं लागली. या झाडीमधून अेक पहाडाची मुलगी

दगडाशीं खेळत खेळत दक्षिणेकडे धांवत असलेली दृष्टीस पडली. यावेळीं तिच्या पात्रांत नांवाला देखील पाणी नव्हतें. केवळ ओबडधोबड पण गुळगुळीत दगडच तेथें विखुरलेले होते. पाणी नसलेली नदी सामान्यपणें कुणाला आवडत नाहीं. परंतु जेव्हां दोन्ही बाजूस अुंच अुंच टेकड्या असतात आणि सारा प्रदेश निर्जनरम्य असतो तेव्हां कोरडी नदी देखील भीषणरमणीय रूप धारण करते. पाण्याचा प्रवाह नसेना कां, पण हिरव्यागार जंगलांतून पांढऱ्या शुभ्र दगडांचा अेक पट्टा डोंगरांतून मार्ग काढीत जातांना पाहून सहजच मनांत येतें कीं हे दगड शाळेंतील मुलांप्रमाणें पळण्याची शर्यत खेळतां खेळतां मधेंच कां बरें थबकले असावेत ?

आम्ही पुढें निघालों. पुन्हां चढलों व पुन्हां अुतरलों. मार्ग दरडी मधून जात होता. त्यामुळें दूरवरचा प्रदेश दिसण्याअैवजीं आकाशाकडे पाहूनच संतोष मानावा लागत होता. मधून मधून पिवळ्या पांढऱ्या फुलांची अुधळपट्टी पाहून वाटूं लागे कीं येथें कुणाचा तरी बंगला असावा. पण दुसऱ्याच क्षणीं खात्री होअी कीं अशा प्रकारचीं दृश्यें पाहूनच शहरी बंगलेवाल्यांना आसपास फुलें लावण्याची कल्पना सुचली असावी. बंगल्याच्या चार भिंती निसर्गापासून दुरावलेल्या मानवासाठीं आहेत. येथें तर निसर्गाचा विशाल प्रासाद आहे. चार दिशा याच या प्रासादाच्या चार भिंती आणि आकाशाचा कटाह हा त्याचा घुमट. रात्र होण्यापूर्वींच त्या घुमटांत चंद्रतारकांचा चांदवा नियमित ताणण्यांत येतो. हवा बिघडते तेव्हां हा चांदवा मळूं नये म्हणून कधीं कधीं त्यावर ढगांचा पडदा ओढला जातो.

फुलें प्रसन्नतेनें हसत होतीं. कुणाकडे पाहून हसत होतीं कोण जाणे! आम्ही येणार असल्याची पूर्वसूचना कांहीं आम्ही त्यांना दिली नव्हती. आणि तशी सूचना मिळाली असती तरी आपल्या शिकाऱ्यांचें आगमन त्यांना कितपत रुचलें असतें हाहि अेक प्रश्नच आहे.

मधून मधून लहान लहान झोंपड्या व त्या झोपड्यांचा अपमान होअूं न देणारीं चुन्यामातीचीं घरें लागत होतीं. रस्ते आणि नगरपालिका यांची सोय नसलेलीं हीं घरें वनश्रींत खुलून दिसत होतीं व तेथल्या ग्रामीण जीवनाला शोभवीत होतीं. अिंग्रजांच्या लष्करी नोकरींतून निवृत्त झालेले गुरखे येथें

निसर्गाच्या कुशींत निवृत्तीचा आनंद अुपभोगितात आणि आपल्या जर्जर हाडांना आराम देतात.

आम्ही पुढें निघालों. पुढें म्हणजे अगदीं सरळ नाकासमोर नव्हे. पहाडी पायवाटांच्या चक्रव्यूहांत जसें घुसतां येअील, तसें घुसायचें असतें. डावीकडे जायचें असलें तरी अुजवीकडची वाट पत्करून तिची खुशामत करीत मार्ग कापावा लागतो. चि. चंदन म्हणाली, 'आसपासचें रमणीय दृश्य व आकाशांत क्षणोक्षणीं रूप पालटणारे देखावे आपलें लक्ष वेधून घेतात. पण जर का अेक क्षणभर देखील पायाकडे आपलें दुर्लक्ष झालें तर त्या पहाडी नदींतील दगडांप्रमाणें घसरगुंडी नशिबीं यावयाची.' तिचें म्हणणें खरें होतें. पायाखालीं जितके म्हणून मोठमोठे दगड येतात त्या सर्वांच्या डोक्यावर पाय ठेअून चालण्यांत अेक विशेष सुख असतें. पण हे मोठमोठे दगड सारख्या अंतरावर असले तर ना! त्यामुळें कोण कुठें आहे, आपला भार डोक्यावर येअून पडल्यावरहि डगमगणार नाहींत असे धीरोदात्त कोण आहेत याचा 'सर्वे' करीत करीत जेव्हां पुढें जायचें असतें तेव्हां प्रत्येक पाअूल दृष्टिपूत टाकावें लागतें, अेकाग्र चित्तानें टाकावें लागतें. हातांत पुणी घेअून सूत कांततांना जसें तसूं तसूंत आपलें चित्त कांतलें जातें, त्याचप्रमाणें अशा पहाडी यात्रेंत पावलांपावलांत आपलें चित्त यात्रेंत विणलें जातें आणि त्यामुळेंच यात्रेचा आनंद सघन बनत जातो.

आतां अेक मोठी रुंद नदी खालीं दिसूं लागली. अुजवीकडल्या दरींतून येअून डावीकडे दोन शाखांत ती विभक्त झाली होती. समोरच्या टेकडीवरून तारेच्या खांबांनीं पांच सात तारांची अेक हार आणून या कांठावर बऱ्याच खालीं तिला झेलून घेतलें होतें. जणूं काय अेखादें मूल आपले हात आणि आपले डोळे ताणतां येतील तितके ताणून नदी अितकी अितकी रुंद आहे असें दाखविण्याचा प्रयत्न करीत असावें.

त्या नदीच्या पात्रांतून दोन क्षीण प्रवाह अेखाद्या राजाच्या लोप पावलेल्या वैभवाप्रमाणें हळू हळू वहात होते. त्यांतलें पाणी तर लहान मुलांच्या हसण्या किंवा रुसण्या अितकेंच निर्मळ होतें. वाटलें कीं थोडें पाणी पिअून घ्यावें. पण तेथें धर्मदेवजींची रसिकता आडवी आली. ते म्हणाले, 'तो समोर जो

झरा दिसतो आहे त्याचें पाणी अेकेकाळीं रोज सकाळीं येथें येअून मी पीत असे. तेथेंच जाअूंया.' आम्ही गेलों. तेथें अेका लहानश्या टेकडीच्या कडेला अेक लहानसा कोनाडा होता, त्यांतून या अमृततुल्य निर्झराला बाहेर येण्याचें सुचलें होतें. कुणा परोपकारी माणसाला त्या कोनाड्यासमोर अेक नरसाळें बसविण्याची सद्बुद्धि झाली होती. त्यामुळें आम्हांला त्या जलदानाचा स्वीकार करणें सोपें झालें. पाणी पिण्यापूर्वीं पश्चिमेकडे कलणाऱ्या सूर्याला अेक मनोमय अर्घ्य द्यायला मी विसरलों नाहीं.

आतां ज्या दिशेला सूर्यकिरण पसरत होते तिकडे हळूहळू नदीच्या पात्रांतून आम्ही चढूं लागलों. पुढें काय दृष्टीस पडणार आहे याची कल्पना होत नव्हती. नदीचा अुगम असेल, कीं वरून पाणी ठिबकत असेल, कीं सहस्रधारेप्रमाणें पाण्यांत गंधक असेल—अशा अनेक कल्पना मनांत येत होत्या-त्या झऱ्याच्या नांवाप्रमाणें त्याचें रहस्य देखील आम्हांला गुह्यच होतें. ( गुच्छु शब्द गुह्यवरून आला आहे असें म्हणतात. )

दूर अेक गुहा दिसत होती. तेथें जाअून पोचलों तों सगळेंच कांहीं वेगळें आढळून आलें. येथें आल्यावर गुच्छुपाणी म्हणजे काय तें ध्यानांत आलें.

ज्याप्रमाणें रेल्वे नेण्यासाठीं पहाड खोदून त्यांत बोगदा तयार करण्यांत येतो तसाच अेका आग्रही झऱ्यानें ही सबंध टेकडी आरपार विंधून आपला मार्ग काढला आहे. छे, ही चुकीची अुपमा झाली. ज्याप्रमाणें अेखादी करवत लाकडाला किंवा पोरबंदरी दगडाला कापत कापत खालीं अुतरते त्याप्रमाणें या झऱ्यानें अेक टेकडी वरून खालीं सरळ कापून काढली आहे. यांत कसलीहि युक्ति वापरलेली नाहीं. वज्रकाय पाषाणांना भेदून पाणी जेव्हां निघून जातें तेव्हां आश्चर्यचकित झालेलें मन विचारूं लागतें–समर्थ कोण ? स्थिर पर्वत व त्याची प्राचीन पाषाणांची अभेद्य भिंत कीं अेका क्षणाचाहि विचार न करतां आपलें बलिदान देण्याला तयार असलेलें अस्थिर व तरल पाणी !

त्या विवरांत घुसतांना छातींत थोडी धडधड झाली नाहीं तरच नवल, अितकें विस्मयकारक तें दृश्य होतें. मृत्यूच्या दाढेंत प्रवेश करण्यासारखें तें साहस होतें. मला तर आंत शिरतांना गीतेच्या अकराव्या अध्यायाचे श्लोक

आठवूं लागले. तरीसुद्धां पहाड व पाणी यांच्या द्वारा आपलें सामर्थ्य व्यक्त करणाऱ्या प्रकृतिमातेच्या स्वभावावर विश्वसून आम्ही आंत प्रवेश केला. सिमेन्टमध्यें दगड बसवावेत त्याप्रमाणें काळे, पांढरे आणि लाल वाटोळे गुळगुळीत दगड नैसर्गिक वज्रलेपांत बसविले गेले होते आणि पाण्याचा नम्र प्रवाह पायाखालच्या लहान लहान दगडांवरून आपलें विजयगान गात धावत होता. मान वर करून पाहिलें तों पाण्यानें टेकडी कापून बनवलेल्या चांगल्या वीस तीस फुटांच्या दोन भिंती आपल्या लाखों वर्षांच्या अितिहासाची साक्ष देत होत्या. माझ्या अैवजीं अेखादा भूस्तरशास्त्री येथें आला असता तर त्यानें हे दगड ग्रॅनाअिटचे आहेत कीं सॅण्डस्टोनचे हें पहिल्यांदा पाहिलें असतें. नंतर भिंतीची अुंची किती आहे, पाण्याचा अुतार किती आहे, दर दहा वर्षांत हें पाणी किती खोल अुतरतें या सर्वांचा हिशोब करून ह्या निसर्गनिर्मित विवराचें आयुमान निश्चित केलें असतें आणि सांगितलें असतें कीं या पर्वतीय प्रवाहाची ही क्रीडा पन्नास हजार किंवा दोन लाख वर्षांपासून चालत आली आहे. बाजूच्या भिंतींतले रंगीबेरंगी दगड पाहून त्यानें त्यांना त्यांचें वय विचारलें असतें आणि त्यांना पकडून ठेवणाऱ्या मातीचें वज्रलेप सिमेंट बनण्यास किती वर्षांचा अवधि लागला असेल त्याचें गणित करून टेकडीचें वयहि त्यानें आपल्याला काढून दिलें असतें. आणि जर कुणी त्याला येथें होअून गेलेल्या धरणीकंपांचा अितिहास सांगितला असता तर त्याप्रमाणें आपल्या गणितांत फेरफार करून नवीन निर्णय त्यानें आपल्यापुढें मांडले असते. या वज्रलेप सिमेंटांत चामड्यासारखी किंवा बारीक जाळ्यासारखी नक्षी मधून मधून पडण्याचें कारण काय आणि त्यांतून पाण्याच्या सूक्ष्म धारा कशा काय निघतात तेंहि त्यानें आपल्याला सांगितलें असतें. खरोखर नक्षत्रविद्येअितकीच ही भूस्तरविद्याहि अद्भुतरम्य आहे. मनोविज्ञानापेक्षां याचे शोध कांहीं कमी खटपटीचे नसतात. या तिन्ही विद्या मानवाच्या बुद्धिबलाचा सतत वाढता विलास आहे.

आम्ही त्या विवरांत दूरवर गेलों. अेके ठिकाणीं थोडेसें वरदेखील चढावें लागलें. जवळच पाण्याचा अेक लहानसा धबधबा पडत होता. थोडें पुढें गेलों. तेथें माणसानें बांधलेल्या दगडचुन्याच्या दोन भिंती पाहून मला कांहीं केल्या हसूं आवरेना! मानवाला वाटलें कीं पहाडाचें हृदय भेदून

टाकणाऱ्या या पाण्याला आपण दोन भितांडांनीं अडवूं शकूं! माझा भाव समजतांक्षणींच तो विजयी धबधबाहि मला म्हणूं लागला कीं, 'मी सुद्धा यामुळेंच हंसत आहे.' पर्वताचें दुभंगलेलें हृदय भग्न असूनहि भव्य दिसत होतें. परंतु माणसाची ही खचलेली भिंत त्याच्या मनोरथासारखीच हास्यास्पद व तिरस्करणीय भासत होती. अेखाद्या अुद्दाम माणसाच्या तोंडांत बसली कीं त्याचें बाजूला झालेलें तोंड जसें केविलवाणें दिसतें तशा दिसणाऱ्या या भिंती फार वेळ पहाण्याची अिच्छाहि होत नव्हती. अेखाद्याची फजिती बराच वेळ पहात रहाणें बरेंहि नव्हे.

जितकें आंत गेलों तितकी त्या विवराची शोभा वाढतच गेली. तितक्यांत अेक मोठा दगड दोन भिंतींतून पडतां पडतां मधेंच अडकलेला आढळला. त्यानें वरून अुडी घेतली असावी व जवळच्या मायाळू भिंतींनीं त्याला म्हटलें असावें, 'अरे थांब, पाण्याच्या खेळांत व्यत्यय आणूं नकोस.' काय करणार बिचारा! राहिला आहे अुभा जेथल्या तेथेंच त्रिशंकूप्रमाणें लटकत. पाण्याचा खेळ खालीं डोकें करून नाअिलाजानें पहात बसणेंच त्याच्या नशिबीं लिहिलेलें होतें. त्याची कींव करीत पुढें जावें तों दुसरा अेक दगड त्याच्याच सारखा लटकत आणि आपल्या पाठीवर आपल्याहून तीनपट मोठ्या दगडाचा भार वहन करीत अडकलेला दिसला. त्याच्या खालूनहि आम्ही पार झालों. बाजूच्या भिंती जराश्या (कोसळून) रुंद झाल्या असत्या तर आमच्या हाडांचे तुकडे कसले, अगदीं चूर चूर झाला असता आणि दोनचार क्षणांपुरतें खालचें पाणी लाललाल झालें असतें. मग निसर्ग म्हणाला असता कीं आपल्याला कांहीं ठाअूक नाहीं बुवा. चार माणसें येथें आलीं असतील आणि आपल्या रिकामटेकड्या जिज्ञासेची किंमत त्यांनीं चुकवली असेल. असल्या गोष्टी थोड्याच लक्षांत ठेवायच्या असतात? त्यांच्यासारखींच दुसरीं माणसें पुन्हा येथें येतील आणि दगडांत दबलेले कांहीं अवशेष त्यांना मिळाल्यास त्यांतून खऱ्याखोट्या कल्पना चालवून अेखादें प्रकरण निर्माण करतील; दुसरें काय?

चालून कांहीं आम्ही थकलों नाहीं. परंतु गार पाण्यांत दगडांवरून अनवाणी चालून पाय दुखूं लागले ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. परंतु या विवर-प्रवेशाची अद्‌भुतता अनुभवतां अनुभवतां आम्ही अगदीं

तृप्त झालों. जाऊन जाऊन आंत किती जाणार ? अखेर पुढें जाण्याचा अुत्साह मंदावला. पण मन म्हणूं लागलें, हार खाऊन परत कसें परतावें ? अितके आलोंच आहोंत तर आरपार गेलेंच पाहिजे. दुसरें टोक गांठलें नाहीं तर तें मानवी मन कसलें ?

पुढें गेल्यावर थोडी रुंद जागा आली आणि प्रवाहाची भीषणताही कमी होत गेली. तेव्हां शहाणे होऊन आम्ही मानून घेतलें कीं पुढचें दृश्य मिळमिळीतच असणार. गेलों नाहीं तरी चालेल. आम्ही परत फिरलों. पुन्हां तें न तेंच दृश्य; त्या न त्याच भिंती व ती न तीच भीति ! ती न तीच अुत्कंठा व त्या न त्याच भावना ! ! !

त्या विवरांतून बाहेर पडायला आम्हांला चांगलीं सोळा मिनिटें लागलीं ! ! ! माझ्या संवयीप्रमाणें या यात्रेचें स्मरण म्हणून मी दोन सुंदर गुळगुळीत दगड बरोबर घेतले आणि अंधारांत झपाट्यानें रस्ता कापीत आम्हीं घराकडे परतलों. मनांत अेकच विचार घोळत होता — समर्थ कोण ? हा वज्रकाय प्राचीन पहाड कीं हें नम्र परंतु आग्रही जीवनधर्मी सत्याग्रही नीर ?

डिसेंबर १९३९.

# : ५७ : परशुराम कुंड

भारताच्या जवळ जवळ अुत्तर-पूर्व सीमेपाशी, लोहित-ब्रह्मपुत्राच्या किनाऱ्यावर, ब्रह्मकुंड किंवा परशुराम कुंड नांवाचें अेक तीर्थस्थान आहे. तिबेट, चीन आणि ब्रह्मदेश यांच्या सरहद्दीजवळ, वन्य जातींच्या वस्तीमधें, भारतीय संस्कृतीचें हें प्राचीन शिबिर होतें. पश्चिम समुद्राच्या किनाऱ्यावर सह्याद्रीच्या पायथ्यापाशीं ज्यानें ब्राह्मणांना वसवलें अशा भार्गव परशुरामानें साऱ्या भारताची यात्रा करीत करीत अुत्तर-पूर्व सीमेपर्यंत पोंचून ब्रह्मकुंडापाशीं शांति मिळवली. हेंच या स्थानाचें माहात्म्य होय.

असम प्रान्ताची यात्रा करूं लागलों, तेव्हांपासूनच परशुराम कुंडाला जाअून स्नान-पान-दानाचें सुख मिळविण्याची अिच्छा मनांत घर करून होती. राजकीय, भौगोलिक व सामयिक अडचणींमुळें आजवर तेथें जाअूं शकलों नव्हतों. परंतु जेव्हां कळलें कीं महात्माजींच्या चिताभस्माचें विसर्जन अितर अनेक तीर्थांप्रमाणेंच परशुराम कुंडांतहि करण्यांत आलें आहे, तेव्हां तेथें जाण्याची अुत्कंठा वाढली. या वर्षी कळलें कीं असम प्रान्तांतील कित्येक लोकसेवक १२ फेब्रुवारीच्या सर्वोदय मेळ्याच्या निमित्तानें तेथें जाणार आहेत; तेव्हां तर मनाचा निश्चयच झाला कीं ही संधी दवडता कामा नये. पलाश-बाडीजवळ कित्येक वर्षांपासून चालणाऱ्या मोमान आश्रमाच्या श्री. भुवनचंद्र दासांनीं मोठ्या आनंदानें मला बोलावून घेतलें.

वारंवार भू-भ्रमण करून भूगोलविद्या वाढविणारे आपले जे प्रमुख भूगोलवेत्ते पुराणांत आढळतात, त्यांत नारद, व्यास, दत्तात्रेय, परशुराम व बलराम हीं नांवें सर्वपरिचित आहेत. यांतहि व्यास व परशुराम आपापल्या विशेष विभूतीमुळें चिरंजीव बनले आहेत. भारतीय संस्कृतीच्या संघटनाचें व प्रचाराचें कार्य महर्षि व्यासांनीं जितकें केलें, तितकें अितर कुणीही केलें नसेल. म्हणूनच तर त्यांना वेद-व्यास (organiser) हें अुपनाम प्राप्त झालें. त्यांचें मूळचें नांव होतें कृष्ण द्वैपायन.

परशुराम होते अगस्त्य ऋषींप्रमाणें संस्कृति-विस्तारक (pioneer of culture). प्राचीन काळीं मनुष्य-जातीला जगण्यासाठीं दारुण युद्ध करावें लागत असे जंगलांशीं व जंगलांतील पशूंशीं. जंगलांनीं अनेकदां आक्रमण करून मानव-संस्कृति पचनीं पाडली आहे. याचा पुरावा आज देखील कम्बोडियांत आन्कोर वाट व आन्कोर थॉममधें मिळतो. अुंच अुंच राजप्रासाद आणि मोठमोठ्या मंदिरांच्या कळसांपर्यंत मातीचे ढीग जमा झाले; आणि जंगलांतल्या महावृक्षांनीं आपल्या पताका त्यांच्यावर फडकवल्या. आपल्याकडे देखील असंख्य लहानमोठीं मंदिरें वडापिंपळांच्या मुळांच्या जाळ्यांत सांपडून वाकडींतिकडीं झालेलीं आढळतात.

अशा युगांत परशु (कुऱ्हाड) घेअून मानव-संस्कृतीचें रक्षण व विस्तार करण्याचें काम केलें होतें भगवान परशुरामानें. पुराणांतल्या कथेप्रमाणें जन्मतःच

परशुरामाच्या हातीं परशु होता. श्रीमंत आओबापांच्या पोटीं ज्याचा जन्म झाला त्याच्याविषयीं अिंग्रजींत म्हणतात–'He is born with a silver spoon in his mouth.' चांदीचा चमचा तोंडांत घेअून हें मूल जन्माला आलें आहे. असाच कांहींसा प्रकार परशुरामाचा होता.

परशुराम जातीनें ब्राह्मण होता खरा, पण त्याचे सर्व संस्कार क्षत्रियाचे होते. जंगलांचा नाश करण्यासाठीं कुऱ्हाड चालवतां चालवतां त्यानें सम्राट् सहस्रार्जुनाच्या सहस्र करांवरहि कुऱ्हाड चालवली. आणि क्षत्रियांच्या अेरेरावीनें चिडून त्यांच्याबरोबर २१ वेळां युद्‌ध केलें. क्षात्रपद्‌धतीनें क्षत्रियांचा नाश करण्याचा प्रयत्न या क्षत्रिय–ब्राह्‌मणानें २१ वेळां केला. त्याचाच अनुभव त्याचा अनुगामी ब्राह्‌मण–क्षत्रिय गौतम बुद्‌ध यानें अेका गाथेंत ग्रथित केला आहे.

**नहि वेरेन वेरानि सम्मंतीध कुदाचनं ।**

या परशुरामाच्या क्रोधी पित्यानें आपल्या अन्य पुत्रांना आज्ञा केली कीं, 'तुमची माता कुलटा आहे, तिला मारून टाका.' त्यांनीं नकार दिला. जमदग्नीचा क्रोधाग्नि अधिकच प्रज्वलित झाला. त्यानें परशुरामाकडे वळून म्हटलें, 'मुला, तूं माझें काम कर. या रेणुकेला मारून टाक.' कुऱ्हाड चालवण्याला सरावलेल्या आज्ञाधारक पुत्राला विचार करावा लागला नाहीं. त्यानें मातेचें मस्तक ताबडतोब धडापासून वेगळें केलें. पिता प्रसन्न झाले आणि म्हणाले, 'वाटेल तो वर माग. तूं माझें अिष्ट काम केलें आहेस.' मुलाला आतां संधी मिळाली. पित्याची सारी तपस्या त्यानें चार वर मागून पिळून घेतली. 'माझी माता पुन्हां जिवंत व्हावी. माझ्या भावांना आपण शाप देअून जड पाषाण बनवलें आहे ते सुद्‌धां पुन्हा जिवंत व्हावेत, आपल्या हत्येच्या व शिक्षेच्या गोष्टीचा त्यांना विसर पडावा. मी मातृहत्येच्या पापांतून मुक्त व्हावें आणि चिरंजीव बनावें.' पित्यानें म्हटलें, 'बाबारे, बाकीचें सर्व कांहीं देअूं शकेन. परंतु मातृहत्येचें तुझें पाप धुअून टाकण्याची शक्ति माझ्या तपस्येंतहि नाहीं.' निराश होअून परशुराम तेथून निघाला. पुढें परशुधर रामाचा धनुर्धर रामानें पराभव केला, कारण युद्‌धशास्त्रानें प्रगति केलेली होती. परशूपेक्षां धनुष्यबाणाची शक्ति अधिक होती, आणि दूरवर

पोंचणारी होती. परशुरामानें भारत-भ्रमणांत आपलें सारें आयुष्य व्यतीत केलें. अनेक तीर्थांचें आणि संतांचें दर्शन घेतलें. चित्तवृत्तींत अुपशमाचा अुदय झाला आणि लोहित ब्रह्मपुत्राच्या कांठीं ब्रह्मकुंडांत त्याच्या हातांतली कुऱ्हाड कायमची सुटली. या शस्त्रसंन्यासामुळेंच या स्थानाला माहात्म्य प्राप्त झालें आहे. परशुरामाच्या जीवनकथेंत पश्चिम किनाऱ्यापासून ते थेट अुत्तर-पूर्व टोकापर्यंतचा भारताचा, अेका काळचा, सारा अितिहास येअून जातो. परशुराम कुंडाची यात्रा करून कित्येक साधु-संतांनीं येथल्या वन्य जातींना भारताच्या संस्कृतीचे संस्कार दिले आहेत. या प्रदेशांतील लोकमानसाचा दावा आहे कीं रुक्मिणी आमच्या येथील राजकन्या होती, अर्थात् श्रीकृष्ण आमचे जांवअी आहेत.

ज्याप्रमाणें प्राचीन कालच्या संस्कृतीचे अग्रदूत येथें आले, त्याचप्रमाणें 'अवेर'चा अुपदेश करणारे भगवान बुद्धाचे शिष्य देखील येथें आले असले पाहिजेत. बौद्ध भिक्षु हिमालय ओलांडून तिबेटांत देखील गेले होते आणि जहाजांच्या मार्गानें चीनला देखील पोंचले होते. त्यांनंतर असम प्रांतांत अहिंसा धर्माचा लोंढा आला तो श्री शंकरदेवाच्या काळांत. श्री शंकरदेव मूळचे शाक्त. त्या पथांतील दुराचाराचा अुबग येअून ते वैष्णव बनले आणि त्यांनीं साऱ्या असम प्रान्तांत धर्मोपदेश, नाट्य, संगीत, चित्रकला अित्यादि द्वारा समाज-शुद्धीचें व संस्कृति-विस्ताराचें काम दीर्घ कालपर्यंत चालवलें. अशाच प्रकारें चैतन्य महाप्रभूंच्या वैष्णव धर्माचा प्रचार मणिपुरच्या बाजूला झाला. शंकर-देवाचा प्रभाव असम प्रान्तांतील पर्वतीय लोकांवर अजून पडलेला नाहीं.

अहिंसा धर्माचा अगदीं अलीकडचा व सर्वांत मोठा लोंढा महात्मा गांधींच्या सत्याग्रह-स्वराज्य-आन्दोलनानें असम प्रान्तांत पोंचला. त्याचा सर्वांत अधिक प्रभाव खासी, नागा, मिशमी, अबोर, डफला अित्यादि पहाडी जातींवर पडायला हवा. त्यासाठीं शिलॉंग, कोहीमा, मणिपुर, सदिया आदि प्रधान केन्द्रांच्या आजूबाजूस अनेक आश्रमांची स्थापना होणें आवश्यक आहे.

यापैकीं सदिया अेक असें स्थान आहे कीं ज्याच्या आसपास ब्रह्मपुत्राला येअून मिळणाऱ्या अनेक नद्या व अुपनद्यांचा पंखा बनतो. नोआ डिहिंग, टेंगापानी, लोहित, डिगारू, देवपाणी, कुण्डिल, डिबंग, सेसेरी, डिहिंग, लाली

वगैरे अनेक नद्या आपलें पाणी देऊन ब्रह्मपुत्राला जलपुष्ट करतात. सदियाहून अनेक रस्ते अनेक दिशांना जाऊन अनेक वन्य जातींची सेवा करतात. खुद्द सदियाच्या आसपास जे चुलकाटा मिशमी लोक रहातात ते स्वभावानें सौम्य आहेत. त्याचमुळें कदाचित् त्यांच्यामधें सभ्य समाजाचे कित्येक दुर्गुण आणि रोग पसरले आहेत. मूळ ब्रह्मपुत्राचें अुत्तरेकडील नांव दिहंग आहे. त्याच्याहि वर जेव्हां ती मानस सरोवरांतून निघून हिमालयाला समांतर पूर्वेकडे वहात येते तेव्हां तिला सानपो किंवा मोठी नदी म्हणतात.

या सर्व नद्यांच्या कांठीं रहाणाऱ्या आपल्या पहाडी बांधवांना आपलेसें करणें आपलें परम कर्तव्य आहे. हें काम सरकारद्वारा नीटसें होणार नाहीं. त्यासाठीं परशुराम व बुद्ध यांच्यासारख्या संस्कृतिधुरीण महापुरुषांची आवश्यकता आहे. अर्थात त्यांच्यापाशीं नवी दृष्टी, नवी शक्ति आणि नवे आदर्श असले पाहिजेत.

हें सारें काम कोण करील? भारताच्या नवयुवकांचे व युवतींचें हें काम आहे. ख्रिश्चन मिशनऱ्यांनीं आपआपल्या परी बरेंवाओीट बरेंच कार्य केलेलें आहे. त्यांची दानत नेहमींच चांगली होती असेंहि म्हणतां येणार नाहीं. अशा परिस्थितींत देशाच्या पुढाऱ्यांनीं दीर्घ दृष्टीनें या सर्व स्थानांचें निरीक्षण केलें पाहिजे आणि नवयुवकांना मानवतेच्या नांवानें शुद्ध संस्कृतीची प्रेरणा देण्यासाठीं या प्रदेशांत पाठवलें पाहिजे.

वर्धा, २१–३–५०

# : ५८ : वर्षागान

कालिदासाचा अेक श्लोक मला फार आवडतो. अुर्वशी दिसत नाहीं म्हणून वेडा झालेला राजा विक्रम पावसाळ्याच्या प्रारंभीं आकाशाकडे पहातो आणि त्याला भ्रम होतो. कवीनें त्या भ्रमाचें वर्णन केलें नाहीं, पण आपला भ्रम हा भ्रम आहे हें ओळखल्याबरोबर भ्रमाच्या मुळाशीं वस्तुस्थिति काय

आहे तिचें तो वर्णन करतो. विक्रम म्हणतो " आकाशांत धिप्पाड काळाकुट्ट दिसतो तो कोणी माजलेला राक्षस नसून पावसाच्या पाण्यानें थबथबलेला हा अेक ढगच आहे; आणि हें समोर दिसतें तें त्या राक्षसाचें धनुष्य नसून निसर्गांतील अिंद्रधनुष्यच आहे; आणि या ज्या सरी दिसतात ती बाणांची वर्षा नसून पावसाच्या धाराच आहेत. आणि मधूनमधून ही जी स्वतःच्या तेजानें चमकत आहे ती माझी प्रिया अुर्वशी नसून वरकलाच्या धोंड्यावर सोन्याची रेघ ओढावी अशी ही विद्युल्लताच आहे. "

* * *

कल्पनेच्या भरारीबरोबर आकाशांत अुड्डाण करणें हा कवींचा स्वभावच आहे. पण आकाशांत यथेच्छ भराऱ्या मारल्यानंतर पक्षी जेव्हां खालीं अुतरून आपल्या घरट्यांत येअून स्थिरपणें बसतो तेव्हां त्याच्या त्या अनुभूतीचा गोडवा निराळाच असतो. जगभर हिंडून स्वदेशीं परत आल्यानंतर मनाला जें अेक समाधान वाटतें, स्थैर्य लाभतें, मोकळेपणाचा आनंद मिळतो त्याची गोडी चिरप्रवासीच सांगूं शकतो ढगांतून सरी अुतराव्या त्याप्रमाणें कल्पनेच्या भरारींतून खालीं अुतरल्याचें समाधान व्यक्त करण्यासाठीं कालिदासानें पावसाळा पसंत केला याचेंहि मला समाधान वाटतें.

जेव्हां हल्लींच्या सारखीं प्रवासाचीं साधनें नव्हतीं आणि निसर्गाला पराभूत करण्याचा आनंद मनुष्य मानीत नव्हता, त्या काळचे लोक हिंवाळयाच्या शेवटीं प्रवासाला निघत आणि सर्व तऱ्हेचा पुरुषार्थ साधून देशदेशांतराच्या संस्कृतीचें निरीक्षण करून पावसाळयापूर्वीं घरीं येत. जुन्या काळीं संस्कृति-समन्वयाचें ' मिशन ' स्वतःच्या हृदयावर वहन करणारे रस्ते अनेक खंडांना जोडीत असत. पण त्या काळीं जीवन-प्रवाहाला परास्त करणारे पूल फारसे नव्हते. जे असत ते सेतु असत. सेतूंनीं जीवन-प्रवाहाला अडवून धरावें आणि माणसाला रस्ता करून द्यावा; पण जीवनाला हें असह्य झालें म्हणजे त्यानें सेतु तोडून टाकावा आणि पाण्याला रस्ता मोकळा करून द्यावा असा क्रम जुन्या काळीं चालत असे. आणि म्हणून नदीनाले तुडुंब भरून रस्त्याचे तुकडे होण्यापूर्वीच प्रवासी आपापल्या गांवीं, आपापल्या घरीं पोंचत असत. आणि म्हणूनच पावसाळा हा वर्षाचा महत्त्वाचा भाग मानला जाअी.

वर्ष हें नांवच पावसाळयावरून पडलेलें. मीं पन्नास पावसाळे पाहिले आहेत अशा शब्दांनींच वडीलधारीं माणसें आपल्या अनुभवाची शेखी मिरवीत असत.

* * *

लहानपणापासून मला पावसाचें असाधारण आकर्षण असे. अुन्हाळयाच्या दिवसांत गारगार गारा देणारा पाअूस सर्वांनाच आवडतो, पण ढगांचे ढीग लोटत चालणारे वारे जेव्हां वाहूं लागतात, विजा कडाडूं लागतात आणि आकाश जेव्हां तड पडून खालीं कोसळणार असें वाटूं लागतें तेव्हांची पावसाची मोहीम मला लहानपणापासून आवडत असे. पावसाचा हा आनंद पोटांत तुडुंब भरावा आणि वाणीनें तो व्यक्त करतां येअू नये व व्यक्त करूं गेलों तर सहानुभूतिपूर्वक तिच्याकडे कोणी ध्यान देणार नाहीं या कल्पनेनें मी गुदमरून जात असे.

* * *

आसपासच्या डोंगरावरून हनुमानाप्रमाणें आकाशांत धावणारे ढग पाहून आणि त्यांनीं सगळें आकाश घेरलेलें पाहून माझी छाती दबून जाअी आणि छातीवर पडलेल्या त्या भाराचेंहि सुख वाटे. बघतां बघतां विशाल आकाश संकुचित झालें, दिशादेखील धावत येअून जवळ अुभ्या राहिल्या आणि आसपासची सगळी सृष्टि हें अेक लहानसें घरटें झालें असें वाटूं लागतांच मला आपल्या घरीं पोंचलेल्या पक्षासारखा आनंद होत असे.

पण जेव्हां आम्ही कारवारला गेलों आणि समुद्रकांठचा पावसाळा मीं प्रथम अनुभवला तेव्हांचा आनंद अेखाद्या नव्या सृष्टींत पोंचल्याच्या आनंदासारखा होता.

* * *

पावसाच्या सरी जमिनीला झोडपतांना मीं लहानपणापासून पाहिल्या होत्या. पण त्याच पावसानें समुद्राच्या अंगावर वेताच्या छड्या ओढल्या आणि समुद्रावर त्याचे वळ अुठलेले दिसले म्हणजे अेवढ्या मोठ्या समुद्राविषयीं देखील मला सहानुभूति वाटत असे. ढगांनीं आणि पावसाच्या सरींनीं आकाश कोंदाटून टाकलें तर त्याचें मला फारसें वाटत नसे. कारण लहान-

पणापासून मला त्याचा अनुभव होता. पण पावसाच्या सरींनीं आणि त्यांच्या पाठीराख्या ढगांनीं समुद्र कापून काढायला सुरवात केली म्हणजे मात्र मला कसेसेंच वाटे. रडूं येत नसे पण जें वाटे तें व्यक्त करायला 'ओक्साबोक्शी' ह्याच शब्द मला वापरावासा वाटतो. पावसानें वाटल्यास डोंगरावर चढाअी करावी, शेतांचे तलाव करून टाकावेत आणि रस्त्यांचे ओढे; पण या समुद्राला गाशा गुंडाळावयास लावणें म्हणजे मर्यादेचें अतिक्रमण होय असेंच मला वाटे, आणि हें दृश्य आपण पहात अुभे राहिलों आहों यांतहि कांहीं अनुचित होत आहे असें मनांत येअी.

* * *

ही माझी कालवाकालव भूगोलविज्ञानानें दूर केली. मला समजलें कीं सूर्यनारायण समुद्राकडून करभार घेतो, त्यामुळें तापलेल्या हवेंत पाण्याची वाफ होअून दडून बसते. हीच वाफ वर जाअून थंड झाली म्हणजे तिचे ढग बनतात. आणि सरतेशेवटीं याच ढगांतून कृतज्ञतेच्या धारा वहात येअून समुद्राला पुन्हां मिळतात.

गीतेनें सांगितलें कीं असें हें जीवनचक्र चालू आहे म्हणूनच जीवसृष्टि टिकून आहे. याच जीवन-चक्राला गीतेनें यज्ञ म्हटलें आहे. हें यज्ञचक्र जर जगांत नसतें तर सृष्टीचा भार देवाला देखील असह्य झाला असता. यज्ञचक्र म्हणजेच परस्परावलंबनाचें सामाजिक स्वावलंबन. डोंगरावरून नद्या वहाव्या, त्यांनीं समुद्र भरत रहावे; समुद्रानें हवेची कोरड दूर करावी; हवेनें तृप्त होतांच स्वतःची समृद्धि मेघांच्या रूपानें तरंगत सोडावी आणि त्यांनीं जीवनाचें अवतारकृत्य सुरू करावें. अशी ही रहाट-गाडगी भव्य रचना समजल्यानंतर जें समाधान झालें तें या विशाल पृथ्वीहून यत्किंचितहि कमी नव्हतें.

तेव्हांपासून दरेक पावसाळा म्हणजे जीवनधर्माची पुनर्दीक्षा असेंच मला वाटत आलें आहे.

पावसाळा ज्याप्रमाणें सृष्टीचें रूप बदलून टाकतो त्याप्रमाणें माझ्या हृदयाला देखील नवीन ओप चढवतो. दर पावसाळयाला मी नवा माणूस बनतों. अितर लोकांच्या मनावर वसंतअृतूची जी छाप पडते ती छाप माझ्या मनावर पावसाळयानें अुठते. (हें लिहीत आहें अितक्यांत मला आठवण

होत आहे कीं साबरमतीच्या तुरुंगांत असतांना पावसाळयाच्या शेवटीं कोकिळा गात असलेल्या अैकून ‘ वर्षान्तीं वसंत ’ हा लेख मीं लिहिला होता.)

अुन्हाळा म्हणजे भूमातेची तपस्या होय. हृदय फाटून विहीण होअीतों पृथ्वी अुन्हाचा स्वीकार करते आणि आकाशाजवळ जीवनदानाची प्रार्थना करीत असते. म्हणूनच वैदिक अृषींनीं आकाशाला पिता आणि पृथ्वीला माता म्हटलें आहे. पृथ्वीमातेची तपश्चर्या पाहून आकाश बाप्पाचें हृदय पाझरतें. तो तिला कृतार्थ करतो. पृथ्वीला बालतृणाचे शहारे येतात. आणि लक्षावधि जीवसृष्टि चोहोंकडे बागडूं लागते. या सृष्टीच्या आविर्भावाशीं माझें हृदय अगदीं पहिल्यापासून अेकरूप होत आलें आहे. वाळवीचीं पाखरें झालीं आणि सकाळ होण्यापूर्वीच मरून त्यांचे पंख जमिनीवर पसरले म्हणजे मला कुरुक्षेत्राचें स्मरण होतें. मखमलीचे किडे जमिनींतून निघून आपल्या दुहेरी लाल रंगाची शोभा दाखवून लुप्त झाले म्हणजे मला त्यांच्या जीवन-श्रद्धेचें कौतुक वाटतें. फुलांच्या विविधतेला लाजविणारे फुलपाखरांचे पंख पाहून मी निसर्गाकडून कलेची दीक्षा घेतों. प्रेमळ वेली जमिनीवर चरूं लागल्या, झाडावर चढूं लागल्या आणि विहिरींचा ठाव पाहूं लागल्या म्हणजे माझें मन त्यांच्या अितकेंच कोमल आणि ‘ लागूती ’ होतें. यामुळें पावसाळयांत जशी बाह्य सृष्टींत जीवन-समृद्धि दिसून येते तशाच प्रकारची हृदय-समृद्धि मला आढळून येते आणि पावसाळा संपून आकाश स्वच्छ होअीपर्यंत मला अेकप्रकारची हृदयसिद्धि लाभते. म्हणून पावसाळा हा माझ्यापुरता सर्वोत्कृष्ट अृतु आहे. या चार महिन्यांत आकाशांतील देव खुशाल निजोत, माझें हृदय हे चार महिने अगदीं डोळसपणें जागत असतें आणि या चार महिन्यांतील प्रत्येक क्षण मी माझा केलेला असतो.

कालिदासानें शेवटचा गोड घांस म्हणून वसंतअृतूचें वर्णन करतां यावें अेवढ्यासाठीं अृतुसंहाराचा प्रारंभ अुन्हाळयापासून केला. मी जर ‘अृतुभ्यः’ची दीक्षा घेअून माझी जीवननिष्ठा व्यक्त करूं लागलों तर पावसाळयापासून अेकप्रकारें प्रारंभ करून पुन्हां पावसाळयांत समाप्ति करीन.

# : ५९ : रण कीं सरोवर

अेखादी घटना नियमित घडत असली म्हणून
तिची अद्‌भुतता थोडीच नष्ट होते !!

सहा तासांपूर्वीं कुठेंच पाणी दिसत नव्हतें. अुत्तरेपासून दक्षिणेपर्यन्त समुद्र-किनारा सरळ पसरला आहे. पश्चिमेकडे जेथें आकाश नम्र होअून धरतीला स्पर्श करतें तेथवर–क्षितिजापर्यन्त–पाण्याचें नांव नाहीं, अेकहि लाट दिसत नाहीं. या क्षणीं हें स्थान नव्यानें पहाणाऱ्याला वाटावें कीं हा अेखाद्या वाळवंटाचा भाग असावा; पाअूस पडून ओला झाला आहे अितकेंच. अथवा त्याला वाटेल कीं ही अेखादी मोठी दलदल आहे, त्यांत गवत अुगवलेलें नाहीं अितकेंच. दृष्टीची पोंच जेथवर आहे तेथवर सरळ सपाट जमीन पसरलेली पाहून किती आनंद होतो ! अितकी सपाट भूमि तयार करण्याचें काम अेखाद्या अिंजिनीयर वर सोंपवलें तर त्याला अपार मेहनत करावी लागेल. पण ही आहे निसर्गाची करामत. अुंच अुंच पहाडांत भव्यता असते, तर अशा समतत*. प्रदेशांत विशालता, विस्तीर्णता असते. या विशालतेचें पान करण्यांत गढून गेलों होतों, अितक्यांत दूर क्षितिजावर जहाजासारखें कांहींतरी दिसलें. जमिनीवर आणि जहाज ? हें कसें काय बुवा ? अितक्यांत दक्षिणेकडून अुत्तरेकडे पसरलेली अेक भुऱ्या रंगाची रेषा हळूं हळूं जाड होअूं लागली. तिच्यावर हळूंहळूं पांढऱ्या लहरी दिसूं लागल्या. पाण्याची सेना आली. सेनापतीच्या हुकूमाप्रमाणें अेक–कतार लाटा पुढें सरकूं लागल्या. आलें, आलें, पाणी पुढें आलें. अर्धा तट त्यानें व्यापून टाकला. सूर्य वर चढत होता, अुकाडा वाढत होता आणि लाटांचा अुन्मादहि वाढत चालला होता. या लाटा अीश्वरानें सोंपवलेलें कांहीं असाधारण कार्य सिद्ध करण्यासाठीं अशा पुढें येत आहेत का ? या लाटा यमदूतासारख्या दिसत नाहींत, देवदूतासारख्याच दिसतात. जंगलांत लांडग्यांचा कळप भरधाव दौडत, अुड्या मारीत यावा त्याप्रमाणें लाटा वाढूं लागल्या. जेथें

---

* सम–तत = stretched evenly. अुदाहरणार्थ गंगामुखाजवळील सुंदरबनाचें प्राचीन नांव ‘ समतत ’ होतें.

नीरव, ओलें रण होतें तेथें अुसळणाऱ्या, गरजणाऱ्या लाटांचा समुद्र पसरला. भरती अैन आवेशांत आली. लाटा येताहेत आणि किनाऱ्यावर आदळताहेत. थोडेसें टक लावून तास, अर्धा तास पाण्याकडे सारखे पहात राहिलांत तर लगेच मनाला जाणवल्यावांचून रहाणार नाहीं कीं या लाटा जड नसून सचेतन आहेत. त्यांना सुद्धां स्वभावधर्म आहे. जेथें पहावें तेथें पाणीच पाणी. डाव्या बाजूचीं तरवडाचीं झुडपें पाण्यांत हेलकावे घेअूं लागलीं, जणूं काय आतांच बुडून जातील. मर्यादवेल ब-याच दिवसांनीं भाचा भेटायला आला म्हणून स्नेहार्द्र झाली आहे; आणि लाटांचा मद तर अुतरतच नाहीं. हत्तींप्रमाणें धावतात आणि किनाऱ्यावर वप्रक्रीडेचा आनंद अनुभवतात. किती अद्‌भुत दृश्य ! जमीन सखल असली, तिला अुतरण असली आणि पाणी नदीरूपानें वहात असलें तर त्यांत आश्चर्य नाहीं. अुतार पाहून वहाणें हा पाण्याचा स्वभावधर्म आहे. पण सपाट भूमीवर जेथें पाणी मुळींच नव्हतें, तेथें पावसाशिवाय किंवा महापुराशिवाय पाणी दौडत यावें आणि पाण्याचा अेक जाड थर जमिनीवर पसरत जावा हें केवढें आश्चर्य ? जेथें आतांच आपण धावत, फिरत होतों तेथें पाअूल ठरणार नाहीं अशी जळाकार स्थिति कशी काय झाली असेल ? अितक्या थोड्या वेळांत केवढा मोठा विपर्यास ! जेथें हवेंत हात हलवीत आम्ही फिरत होतों, तेथें अुसळणाऱ्या लाटांमध्यें हाताचीं वल्हीं चालवून पोहण्याचा आनंद लुटत आहोंत. जणूं काय घोड्यावर बसून फेरफटका करायला निघालों आहोंत. या भरतीच्या क्षणीं जर कुणी मनुष्य नव्यानें येअून हें दृश्य पाहील तर त्याला वाटेल कीं खाऱ्या पाण्याचें हें तुडुंब भरलेलें सरोवर हजारों वर्षांपासून येथें असेंच्या असेंच पसरलेलें आहे. पण जर त्यानें थोडे तास अुभे रहाण्याची तसदी घेतली आणि पाहिलें तर कळून येअील कीं अितक्या मोठ्या महायुद्धासारख्या चढाओढीलासुद्धां अंत आहे. आपली लीला जशी पसरवली, तशीच ती आतां मागें खेंचून घेण्याची वेळ आली आहे. अीश्वराचें कार्य जणूं समाप्त झालें. अीश्वरानें जणूं आपली प्राणशक्ति मागें खेचून घेतली. आतां अेक अेक लाट किनाऱ्याकडे दौडत आल्यासारखी वाटली तरी पाणी मागें हटत आहे हें स्पष्ट होअूं लागलें.

निघालें, पाणी हटूं लागलें. समुद्राच्या पलीकडे काय अेवढा मोठा खड्डा पडला असेल कीं तो भरण्यासाठीं हें सगळें पाणी धावत परत चाललें आहे ?

अग्रेसर लाटांना मागें फिरतांना पाहून मागून येणाऱ्या लाटांचा सर्वच विरस होतो आणि धावतां धावतांच त्यांना फेसाळ हसूं कोसळतें. सागराच्या पाण्याचें मोजमाप कोण काढणार? तें मापणार तरी कसें? अितकें पाणी आलें कां आणि चाललें कां? त्याला विचारणारें कुणीच नाहीं का? कीं कुणीतरी विचारणारें आहे म्हणूनच तें अितक्या नियमानें येतें आणि जातें? जसजसा अधिकाधिक विचार करावा तसतशी या सर्व बनावाची अद्भुतता मनावर अधिकाधिक ठसूं लागते. भरती आणि ओहोटी ही काय वस्तु आहे, तिचा अुपयोग काय, ती जर नसती तर समुद्राचें काय झालें असते, समुद्रजीवी प्राण्यांच्या जीवनांत काय काय फेरफार घडले असते, चंद्राचें व सूर्याचें आकर्षण आणि सागराचें पृथ्वीच्या थरापासून वेगळेंपण वगैरे अुपपत्ति योग्यच आहेत; पण या सर्वांमागला अुद्देश काय हें जाणण्याकडेच मनाचा अधिक ओढा असतो. पण ही जिज्ञासा अजून तृप्त झालेली नाहीं.

जितक्यांदा समुद्रांत भरतीओहोटी पहातों तितक्यांदा ती सारख्याच प्रमाणांत अद्भुत वाटते आणि अीश्वराच्या सृष्टींत जिथें तिथें तो ज्ञानमय प्रभुच सनातनपणें विराजत आहे याची प्रतीति येते.

'सर्वम् समाप्नोषि ततोऽसि सर्वः।' असें म्हणून हृदय त्याला प्रणिपात करतें. सृष्टि महान आहे तर मग तिची निर्मिति करणारा तो विभु कसा असेल? त्याला कोण ओळखूं शकेल? त्याला सुद्धां स्वतःला ओळखण्याची पर्वा असेल का?

बोर्डी १ मे, १९२७.

# : ६० : चांदीपुर

मला खात्री होती कीं गेल्या खेपेस चांदीपुरमधें जें दृश्य मीं पाहिलें तें या खेपेस मला पहायला मिळणार नाहीं. त्यामुळें फार आशा न बाळगण्याचें मनाला बजावूनच आम्ही चांदीपुरला जाण्यासाठीं निघालों. पण तरीसुद्धां चांदीपुर तें चांदीपुर. त्याची समान्य शोभासुद्धां असामान्य म्हटली पाहिजे.

कलकत्ता कटक मार्गावर बालासोर अथवा वालेश्वर म्हणून अेक कसबा आहे. त्याच नांवाचें अेक रेल्वे स्टेशनहि आहे. चांदीपुर तेथून आठ मैल पूर्वेस समुद्रकिनाऱ्यावर वसलेलें आहे. लष्करी खात्यानें हें स्थान थोडेंबहुत अुपयोगांत आणलेलें आहे. पण त्यामुळें कांहीं त्याचें महत्त्व वाढलेलें नाहीं. येथून तीन मैलांवर बुढ्ढी बलंग नांवाची नदी ज्या ठिकाणीं समुद्राला मिळते, तेथें अेक चांगलें बंदर होण्यासारखें आहे, पण अजून तसें कांहीं झालेलें नाहीं. चांदीपुरचें आजचें महत्त्व त्याला त्याच्या नैसर्गिक शोभेमुळेंच लाभलेलें आहे. आणि म्हणूनच मीं त्याला ' अुगवतीची बोर्डी ' असें नांव दिलें आहे.

मुंबअीच्या अुत्तरेस घोलवड स्टेशनापासून दीड मैलावर बोर्डी नांवाचें अेक स्थान आहे. तेथला समुद्र जेव्हां ओहोटीमुळें मागें हटतो, त्यावेळीं चांगलें दीड दोन मैलांचें पात्र रिकामें करून टाकतो आणि पाणी हटत हटत जवळ जवळ क्षितिजाला जाअून भिडतें. सगळा समुद्रकिनारा जणूं काय देवांचें किंवा दानवांचें भिजून गेलेलें टेनिस-कोर्ट असावें तसा सरळ सपाट दिसूं लागतो आणि जेव्हां भरतीबरोबर पाणी येअूं लागतें तेव्हां पहातांपहातां तो सगळा किनारा सरोवराप्रमाणें तुडुंब भरून जातो. क्षणांत ओलें वाळवंट तर क्षणांत अुथळ सरोवर, अशी ही निसर्गाची लीला पाहून मला जो विस्मय वाटला होता, त्याविषयीं लिहून काढलें तेव्हां मला स्वप्नांतदेखील कल्पना शिवली नव्हती कीं, हुबेहुब असेंच अेक स्थान अुगवतीस पूर्व किनाऱ्यावर निसर्गानें निर्माण करून ठेवलेलें आहे.

राष्ट्रभाषा-प्रचाराच्या निमित्तानें मी जेव्हां याच्या आधीं कलकत्त्याहून अुत्कलमधें आलों होतों, त्यावेळीं बालासोरचें काम आटपून चांदीपुर पहाण्यासाठीं मुद्दाम गेलों होतों. रस्त्यांत पावलोंपावलीं पाण्यानें भरलेल्या खळग्यांमधें नील कमलें अुगवलेलीं पाहून माझ्या आनंदाला पारावार अुरला नव्हता. कमळ म्हणजे प्रसन्नतेचें प्रतीक. सुंदरता, कोमलता, टवटवी आणि पवित्रता यांचा जेव्हां मिलाफ झाला तेव्हां त्यानें कमळाचें रूप धारण केलें. कमळ पांढरें असतें तेव्हां तपस्विनी महाश्वेतेचें स्मरण करून देतें, तेंच लाल असतें तेव्हां गंधर्व नगरीवर राज्य करणाऱ्या कादंबरीसारखें शोभून दिसतें. पण नील कमल तर प्रत्यक्ष कुंजविहारी श्रीकृष्णच होय असें वाटतें. आपल्या

येथें नील कमळें अधिक प्रमाणांत पहावयाला सांपडत नाहींत, हें सुद्धां तसें वाटण्याचें कारण असेल. पण या रस्त्यानें जातांना नील कमळें पाहून मला अपरंपार आनंद झाला होता अितकें खरें.

बालासोरपासून चांदीपुरची सडक जवळ जवळ सरळ आहे. थेट किनाऱ्यावर डाक बंगल्याच्या दाराशीं जाअीपर्यंत समुद्राचें दर्शनच होत नाहीं, पण अेकदां झालें कीं लगेच आपल्या विशालतेनें चित्ताचें हरण करतें. गेल्या खेपेस आम्ही गेलों होतों तेव्हां भरती हळूंहळूं वाढत होती आणि नाजुक तन्वंगी लाटा क्षितिजाशीं समांतर रेषेंत संथपणें पुढें सरकत होत्या. क्षितिजापासून निघून किनाऱ्यापर्यंत येणाऱ्या लाटा जणूं काय दोन तीन मैल लांबीची अेक दोरी ताणून कुणीतरी पुढें आणीत असावें त्याप्रमाणें सरळ आणि समांतर येत होत्या. माझ्याबरोबर अेखादा विद्यार्थी असता तर मीं त्याला समजावलें असतें कीं वहीमधें पट्टी घेऊन ओळी आंखायच्या असतील तर या लाटांअितक्या नीट समांतर आल्या पाहिजेत. जमीन जेव्हां सगळया प्रकारें सारखीच सपाट असते तेव्हां अिंग्रज लेखक तिला टेनिस-कोर्टची अुपमा देतात. पण कुठें टेनिस-कोर्ट आणि कुठें ही मैलच्या मैल विस्तरलेली लांब रुंद सिकता–स्थली !

तें सगळें दृश्य पोटभर पाहून घेतलें. पोट भरल्यावरहि पाहिलें. समोरून पाहिलें, बाजूनें पाहिलें. आपण किती पुण्यवान आहोंत अशा धन्यतेच्या जाणिवेसहित पाहिलें. आणि मग आतां पुढें काय करायचें असा विचार मनांत आला. याविषयीं लिहावयाचें तर होतेंच. राजाला रत्नें सांपडलीं कीं तो तीं आपल्या खजिन्यांत पोंचवतो. स्त्रियांच्या हातीं फुलें लागलीं कीं त्या तीं आंबाड्यांत माळल्यावांचून रहायच्या नाहींत. निसर्गाची अुपासना करणाऱ्या लेखकाला अेखादें सुंदर दृश्य पहायला मिळालें कीं तें लेखबद्ध किंवा कविताबद्ध केल्याशिवाय तो स्वस्थ बसणार नाहीं. पण तें तर घरीं गेल्यावरच शक्य आहे. आतां येथें काय करायचें ? निसर्गाचा विस्तार रुंद असो किंवा अुत्तुंग असो, त्याचा आस्वाद केवळ डोळयांनींच घ्यायचा नसतो. पायांनासुद्धां त्यांचा वाटा दिलाच पाहिजे.

आम्ही डाकबंगल्याच्या अुंचीवरून निसटणाऱ्या आणि खिदळणाऱ्या वाळू

वरून धावत धावत खालीं अुतरलों. तेथें मोठमोठीं माणकें अिकडे तिकडे धांवतांना आणि पृथ्वीच्या अुदरांत गडप होतांना आम्हांला दिसलीं. काय तो त्यांचा चमकदार तरल लाल रंग! मखमलींत जसा कांहींसा फिक्कट आणि गहिरा असा दुहेरी लालसरपणा असतो, तशीच छटा प्रकाशामुळें माणकांतसुद्धां आढळून येते. तेंच लावण्य आम्हांला या पाय असलेल्या आणि पळणाऱ्या रत्नांत दिसलें. हे खेकडे जितके आकर्षक होते तितकेच भयंकरहि वाटत. येअून डसले तर आपल्या अितकेंच लाल रक्त काढतील अशी भीति वाटे. पण ते जितके भयंकर होते तितकेच भित्रेहि होते. माणसाला पाहून चटकन् आपल्या बिळांत गडप होत. आम्ही त्यांच्या मागून धावलों आणि त्यांची धावपळ बघण्याची मौज लुटली.

धावतां धावतां डब्यांसारखे लहान मोठे शिंपले आम्हीं पाहिले. त्यांच्यावरचें नक्षीकाम पाहून माझी खात्रीच झाली कीं यांचा आकार पाहूनच येथल्या मंदिरांचे कळस घडविले गेले असावेत. सुपारी-घाटापेक्षां हा घाट कलेच्या दृष्टीनें कितीतरी वरचढ आहे.

चि. मदालसेनें अशा कितीतरी डब्या वेंचल्या. त्यांना आरपार छिद्र असल्यामुळें त्यांचा हार बनवण्याची कल्पना सहज सुचण्यासारखी होती.

समुद्राचा विस्तार, त्याच्या लाटा, ते खेकडे आणि हे शिंपले या सर्वांविषयीं बोलत बोलत आम्ही परत फिरलों. कित्येक नील कमलांना सोबत घेतलें आणि आजवरच्या भारतवर्षाच्या विविध दर्शनांत आणखी अेक मूल्यवान भर पडली या समाधानांत आम्ही घरीं पोंचलों.

यावेळीं जेव्हां पुन्हां बालासोरला आलों, तेव्हां तें सारें दृश्य हुबेहुब नजरेसमोर अुभें राहिलें आणि त्याला आपली श्रद्धांजलि अर्पण करण्यासाठीं म्हणून चांदीपुरला जाण्याचा कार्यक्रम आम्ही ठरवला.

आकाश ढगाळलेलें होतें. तरीसुद्धां चांदीपुरला पोंचल्यावर आपल्याला पाण्यामधून बाहेर निघणाऱ्या सूर्याचें दर्शन घडेल अशी आशा आम्ही बाळगली होती. म्हणून साडे तीन वाजतां अुठून आम्ही नित्यविधि अुरकले. चार वाजतां डॉ. भुवनचंद्रांची मोटर मागवली आणि मोटरवेगानें आठ मैलांचें अंतर पार केलें. रस्त्यांत नव्हते ते पूर्वीचे खळगे कीं नव्हतीं श्रीकृष्णाच्या

डोळ्यांशीं स्पर्धा करणारीं नील कमलें. मला खात्री होती कीं त्या पूर्वीच्या लाटा आपल्याला पहायला मिळणार नाहींत. अष्टमीचा चंद्र माथ्यावर मंद चमकत होता. त्यामुळें येथें केवळ तुडुंब भरलेलें शांत सरोवरच आढळेल असें मीं मानलें होतें. आम्ही आमच्या परिचयाच्या डाकबंगल्याच्या अंगणांत आलों आणि मला आढळलें कीं पाणी तर केव्हांच मागें वळलें आहे. दूरचें गढूळ पाणी पाहून रेतीचे ढीग पडले असावेत असा भास होत होता. रेतीचा पट अधिकाधिक अुघडा पडत चालला होता. आम्ही जर चारेक मिनिटें आधीं पोचलों असतों तर सूर्याला पाण्यांत पाय ठेवतांना पाहिलें असतें. आकाशांत ढग असले तरी क्षितिजाकडचें आकाश स्वच्छ रेखीव दिसत होतें. ढगांचे डाग सूर्याच्या त्या शोभेंत भर टाकीत होते. सूर्याला पाहून माझा नेहमींचा श्लोक बोलण्याचें पण मला भान राहिलें नाहीं. मीं फक्त टाळ्यांचें अर्घ्य अर्पण करून दूर समुद्रांतून निघालेल्या सूर्यनारायणाचें अुपस्थान केलें. मी मनांत मनूचा श्लोक बोललों—

**आपो नारा अिति प्रोक्ता आपो वै नर-सूनवः ।**
**तायदस्य अयनं जातम् अिति नारायणः स्मृतः ॥**

अितक्यांत अमृतलालनें गीत ललकारलें—

**प्रथम प्रभात अुदित तव गगने**

खालच्या वाळूच्या मैदानांत पोंचायला आम्हांला वेळ लागला नाहीं. लाजाळू खेकड्यांनीं आपल्या बिळांत घुसूनच आमचें स्वागत केलें.

समुद्राच्या मागें हटणाऱ्या पाण्यानें आम्हांला खुणावून विचारलें, येथवर यायचें आहे ? पाण्याचें आमंत्रण नाकारायचें कसें ?

आम्ही निघालों, मधून मधून दोनचार बोटें पाणी पाहून पाय थबथबवीत निघालों. घटकेंत सूर्याकडे पहाण्याची अिच्छा होअी, तर घटकेंत मागें वळून किनाऱ्याकडे पहाण्याची. थोडींशीं सुरूचीं झाडें, अेक दोन झोंपड्या आणि जकात खात्याचा बावटा चढवण्याचा झेंडा याहून अधिक आकर्षक असें तेथें कांहींच दिसत नव्हतें. त्यापेक्षां पायातळींच्या पाण्यांत ढगांचें प्रतिबिंब पडलें होतें, त्याची शोभाच मनाला अधिक आनंद देत होती. मागें हटणाऱ्या पाण्याच्या मोहिनीनें त्याच्या मागें मागें आम्ही कितीतरी दूर निघून गेलों

असतों. पण आमच्यापुढें दुसरा कार्यक्रम आहे हें आम्ही विसरलों नव्हतों आणि वेळेच्या बजेटपेक्षां अधिक मौज येथें करणें योग्य नव्हतें. किनाऱ्यापासून किती दूर आलों त्याचा हिशोब काढण्यासाठीं पावलें मोजीत मोजीत आम्ही परत आलों. दोन दोन फुटांचीं पावलें टाकीत आम्ही हजार मोजले आणि धावणाऱ्या माणकांच्या रत्नभूमीपर्यन्त पोंचलों. वर चढून पहातों तों करनकरें पाणी हळूं हळूं आमच्या पाठून येत होतें आणि पाण्याला येतांना पाहून कित्येक कोळी रेतीच्या मैदानांत आपलें जाळें खांबांच्या आधारें पसरून अुभे करीत होते.

जुन्या गोष्टी पुऱ्या होत, 'खाल्लें, प्याले, राज्य केलें.' या वाक्यानें. आमचीं वर्णनें मोठ्या प्रमाणांत पुरीं होतात 'प्रार्थना केली आणि मग नास्ता केला.' या निवेदनानें. सोबतच्या अेका गृहस्थानें सांगितलें कीं, आजकाल येथें जेव्हां लष्करवाले तोफा डागतात तेव्हां धरणीकंप व्हावा त्याप्रमाणें सगळें गांव हादरून जातें. तयार झालेला प्राणघातक माल बरोबर अुतरला आहे कीं नाहीं तें तपासण्याचें ठाणें येथें आहे. आवाज कितीहि मोठा असला तरी क्रांतीनंतर ज्याप्रमाणें शांति स्थापन होते, त्याप्रमाणें आकाशाच्या विवरांत तो विलीन होतो आणि शेवटीं नीरवताच मागें अुरते.

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

मे '४१.

# : ६१ : सार्वभौम भरती-ओहटी

प्रत्येक लाट किनाऱ्यापर्यंत येते आणि मागें जाते. ही अेक प्रकारची भरती आणि ओहटीच आहे. ती क्षणजीवी आहे. मोठी भरती-ओहटी बारा बारा तासांनीं येते. ती देखील अेक प्रकारची मोठी लाटच म्हटली पाहिजे. ही बारा तासांनीं येणारी भरती-ओहटी जिची लाट आहे अशी ती भरती-ओहटी कोणती? अक्षयतृतीयेची भरती जर वर्षांतील सर्वांत प्रचंड भरती तर मग सर्वांत सौम्य भरती केव्हां येते?

आपण श्वास आंत घेतों आणि बाहेर सोडतों ही सुद्धां अेक प्रकारची भरतीओहटीच आहे. हृदयाची धडधड चालते आणि त्याबरोबर रक्त साऱ्या शरीरांत खेळत रहातें ही सुद्धां अेक प्रकारची भरती-ओहटीच आहे. बालपण, तारुण्य आणि म्हातारपण या अवस्था सुद्धां तसें पाहूं गेलें तर अेक मोठी भरती-ओहटीच आहे. अशा प्रकारें भरती ओहटीचा हा क्रम विशालांतून विशालतर बनत सारें विश्व व्यापूं शकतो. जिकडे तिकडे भरती-ओहटीच आहे. राष्ट्रांना भरती-ओहटी लागते, संस्कृतींना भरती-ओहटी लागते. धार्मिकतेलासुद्धां भरती-ओहटी लागतच असते. प्रत्येक ओहटीनंतर भरतीची प्रेरणा देणारे तेच आपले रामचंद्र व कृष्णचंद्र यांच्यासारखे अवतारी पुरुष. समुद्राच्या भरती-ओहटीला प्रेरणा देणाऱ्या चंद्रावरूनच राम व कृष्ण यांना चंद्राची अुपमा दिली गेली असेल का ? दोघांचेंहि दर्शन आह्लादकारक होतें त्यावरून त्यांना चंद्राची अुपमा मिळाली होती असें कवि म्हणतात. आणि कवि म्हणतात तें खरेंच असलें पाहिजे. पण असें देखील कशावरून नसेल कीं धर्माची ओहटी थांबवणारे आणि नव्या भरतीला गति देणारे ते दोघेहि धर्मचंद्र होते, त्यावरूनच त्यांना चंद्राची अुपमा दिली असेल ? अशी ही अुपपत्ति आतांपर्यंत जरी कुणी दिली नसली, तरी माझ्यापुरतें तरी धर्मसागराचे चंद्र म्हणूनच त्यांचें नांव रामचंद्र व कृष्णचंद्र पडलें असें मी मानणार.

जलाच्या ठायीं स्थल आणि स्थलाच्या ठायीं जल करूं शकते ती ‘ अघटित-घटना-पटीयसी ’ अशी अीश्वराची माया होय असें म्हणतात. या मायेचें आपल्याला येथें रोज दर्शन घडतें; तरीहि आपण भक्तिविनम्र कां होत नाहीं ? अद्भुत वस्तु रोजची झाली म्हणून काय निःसार बनली ? माझ्या जीवनावर तीन वस्तूंनीं आपल्या गांभीर्यानें सर्वांत अधिक परिणाम केलेला आहे. हिमालयाचे अुत्तुंग पहाड, कृष्णरात्रींचें रत्नजडित गहिरें आकाश आणि विश्वात्म्याचें अखंड स्तोत्र गाणारा महार्णव. तीन हजार वर्षांपूर्वीं किंवा दोन हजार वर्षांपूर्वीं असेल ( हजाराचा येथें हिशोब नाहीं ) भगवान बुद्धाचे भिक्षु तथागताचा संदेश देशदेशांतरी पोंचवून याच समुद्रकिनाऱ्यावर आले असतील. सोपाऱ्यापासून ते कान्हेरी-पर्यंत, तेथून घारापुरीपर्यंत आणि ठाणें जिल्हा व पुणें जिल्हा यांच्या

सरहद्दीवर असलेल्या नाणाघाट, लेण्याद्रि, जुन्नर वगैरे स्थानांपर्यंत, कार्ले व भाजा येथील प्राचीन पहाडापर्यंत आणि या बाजूनें नाशिकच्या पांडवगुंफांपर्यंत शांतीचे सागर असे बुद्धभिक्षु जेव्हां विहार करीत असतील तेव्हांचा भारतीय समाज वेगळा होता. त्या वेळचे प्रश्न वेगळे होते. कार्य-प्रणाली वेगळी होती. पण त्या वेळचा समुद्र मात्र अगदीं हाच होता. अशाच रीतीनें तो गर्जना करीत असेल. असेल काय, होताच. आणि 'सगळें दृश्यजात नश्वर आहे, कर्मच काय तें अेक खरें होय. ज्याचा संयोग होतो, त्याचा वियोग हा होणारच. जे संयोग वियोगाच्या पलीकडे गेले, त्यांनाच शाश्वत निर्वाण सुख मिळतें.' असें आजच्या प्रमाणें त्यावेळीं सुद्धां महासागर बोलत होता. तो जमाना पालटला. महासागराचें नांव देखील बदललें. परंतु त्याचा संदेश बदलला नाहीं. भरती-ओहटीच्या पलीकडे जो जातो त्यालाच शाश्वत शांति मिळते. तोच बुद्ध आहे. तोच सुगत आहे. तो गेला कीं गेला. भरती परत येअील. ओहटी परत येअील. तो परत येणार नाहीं. तथागत खरोखरच सु-गत आहे.

बोर्डी, ७ मे, १९२७.

# : ६२ : कराचीच्या वाटेवर

[ अेका पत्रामधून ]

मुंबअींतल्या जागरणाचें अुट्टें काढण्यासाठीं लवकर झोपीं गेलों होतों, तो सकाळीं चार वाजतां जागा झालों. स्टीमर डुलत डुलत पुढें जात होती. येथें कुठेंच जमीन दृष्टीस पडत नव्हती. वर आकाश नी खालीं पाणी. जमीन दृष्टिआड होअूनहि दिवसरात्र मनुष्य समुद्रावरून जहाज हांकारीत प्रवास करतो, हा माणसाचा पाण्यावरील केवढा मोठा विश्वास! संस्कृतमधें पाण्याला जीवन म्हणतात. तहानेमुळें जें पोटांत अुतरतें तें जीवन, आणि वादळामुळें ज्याच्या पोटांत आपल्याला पोंचावें लागतें तें मरण—असे पाण्यासाठीं दोन वेगळे शब्द आपल्या पूर्वजांनीं कल्पिले नाहींत.

प्रार्थनेसाठीं सोबत्यांना अुठवावें कीं नाहीं याची भवति न भवति थोडा वेळ मनांत चालली. नंतर मनाशीं नक्की केलें कीं जहाजाच्या पाळण्यांत निजलेल्या या बालकांना अुठविण्यापेक्षां आपण अेकट्या अेकट्यानेंच हलकें प्रार्थना करून घेतलेली बरी. पण मग तिला सामुदायिक प्रार्थना कसें म्हणतां येअील ? मनांत आलें कीं चला जवळचा कॅनव्हासचा पडदा वर करून प्रार्थनेंत साथ देण्यासाठीं कांहीं तारे जागताहेत कीं काय तें पहावें. अनुराधा म्हणाली, 'आम्ही आतांच अुठलों आहोंत. कृष्णचंद्र आतां अितक्यांत येतीलच.'

अितक्यांत दोन शिंगें अुंचावून चंद्र म्हणाला, 'येण्याला आणखी शिंगें अुगवण्याचें कांहीं बाकी राहिलेलें नाहीं. हा पहा मी आलोंच आहें.' त्यानें डाव्या हातांत पारिजात धारण केला असल्यामुळें आज तो विशेष देखणा दिसत होता. पहातां पहातां अभिजितानें क्षितिजावरून डोकें वर काढलें आणि मग स्वाति, अभिजित आणि पारिजात या त्रिकोणाचा मोठा पिरॅमिड पूर्व क्षितिजावर अुभा राहिला. त्या सर्वांना बरोबर घेअून मीं माझी प्रार्थना पुरी केली.

अितक्यांत चंद्र कांहींसा वर आला आणि आमच्या जहाजापासून ते चंद्राच्या पायापर्यंत अेक सोनेरी पट्टा पाण्यावर चकाकूं लागला. मला वाटलें कीं चंद्रालोकावर जाण्यासाठीं किती सोपा आणि सरळ मार्ग ! जहाजांतून अुतरून चालायला लागण्याचीच खोटी ! पण पाश्चात्य लोक म्हणतात कीं चंद्रलोकावर वेड्या लोकांचीच वस्ती आहे. तेव्हां पुन्हां मनांत आलें कीं अितकी मेहनत करून शेवटीं तेथें आपले समानधर्मा अथवा जातभाअीच जर भेटणार असतील तर अितका त्रास घ्या कशाला ?

* * *

मला आकाशांतले ढग फार आवडतात. लहान असो किंवा मोठा, पांढरा असो किंवा काळा, सलग असो किंवा चिंध्या चिंध्या झालेला, मला तो आनंदित करतोच. पण रात्रीचे ढग मला मुळींच आवडत नाहींत. त्यांचा आकार आणि रंग दोन्ही आकर्षक असले, तरी ताऱ्यांमधून भुताप्रमाणें किंवा मारेकऱ्याप्रमाणें लपत छपत ते जात असतात तेंच मला आवडत नाहीं.

अुषःकालाआधीं आकाश किती रमणीय दिसत होतें ! चांदण्यांत समुद्राच्या लाटा—लाटा कसल्या ? नाजुक वीचिमाला अथवा सागरबाष्पानें गालांतल्या गालांत केलेल्या मंद स्मितानें त्याच्या चेहऱ्यावर अुमटलेल्या सुरकुत्या—बरोबर मोजून घ्याव्या अितक्या स्पष्ट होत्या. पण या विघ्नसंतोषी ढगांनीं मधें येअून सगळें बिघडवून टाकलें !

आम्ही भरवेगांत पुढें चाललों होतों. अुगवतीच्या म्हणजेच आमच्या अुजव्या बाजूला जमीन दिसते आहे कीं केवळ भास आहे अशा विचारांत मी पडलों होतों, अितक्यांत अेकाअेकीं दिवे दिसूं लागले. माझी खात्री झाली कीं आम्ही श्रीकृष्णाच्या द्वारकेपाशीं, येअून पोहोंचलों आहोंत. थोड्या अंतरावर दिव्यांचा अेक दुसरा पुंजका चमकत होता. त्यांत अेका दीपगृहाचा प्रकाश अेखाद्या वृद्धाच्या स्मृतीप्रमाणें मधून मधून स्पष्ट होत होता. त्यानंतर अेका गिरणीच्या धुराड्यांतून धुराची अेक शांत नदी क्षितिजापाशीं समांतर वाहूं लागली.

आकाशांतले तारे पाहिले आणि तुझें स्मरण झालें. सकाळच्या अुषेबरोबर तुझी काय दोस्ती आहे, कोण जाणे ! आपण भेटलों त्यापूर्वींच बोर्डीमधें मीं पूर्व दिशेला अनसूया हें नांव बहाल केलें आहे. ‘ जीवनांतील आनंद ’ या पुस्तकांतली ‘ अनसूया प्राची ’ ही नोंद पाहून जा.

३०–१२–३७

# : ६३ : दक्षिणेच्या टोंकास

धनुष्यकोटीला मी पहिल्या प्रथम वीस वर्षांपूर्वी आलों होतों. माझ्या आठवणी प्रमाणें श्री. राजाजींनीं माझ्या बरोबर श्री. वरदाचारींना पाठवलें होतें. वरदाचारी रामायणाचे मोठे भक्त. प्रवासांत रामायणाच्याच रसिक गोष्टी चालल्या होत्या. आम्ही धनुष्य कोटीला पोहोंचलों आणि वरदाचारींचा सनातनी आत्मा श्राद्ध करण्यासाठीं व्याकुळ झाला. अेक योग्य ब्राह्मण शोधून

काढून ते श्राद्ध विधींत गढून गेले आणि बाकीचे आम्ही समोर गर्जना करणाऱ्या रत्नाकराची व महोदधीची भव्य शोभा पहाण्यासाठीं मोकळे झालों.

दोन नद्यांचा संगम अथवा प्रयाग अनेक ठिकाणीं पहावयास मिळतो. संगमाचें काव्य आर्यांच्या मेंदूपर्यंत किंवा हृदयापर्यंत पोंचलें कीं त्यांना तेथें यज्ञ-याग करण्याचें सुचयाचेंच. यज्ञ-यागासाठींच्या अशा प्रकृष्ट अथवा प्रशस्त स्थानालाच प्र-याग म्हणतात.

दोन नद्या मिळतात तेव्हां बहुधा अिंग्रजी Y सारखी आकृति होत असते. महाराष्ट्रांत कऱ्हाडपाशीं दोन नद्या समोरासमोर येअून मिळतात आणि मग काटकोनांत अेका बाजूनें वहातात. अिंग्रजी T सारखी पांच कांठांची ती आकृति बनते. दोन नद्या समोरासमोर येअून अेकमेकीला मिठी मारतात म्हणून त्याला प्रीतिसंगम म्हणतात.

गंगेला जेथें यमुना येअून मिळते तेथें देखील जवळ जवळ T सारखाच आकार होतो. मात्र तेथें गंगा सरळ जाते आणि यमुना कसल्याहि आग्रहावांचून, आणि थोड्याशा संभ्रमानें गंगेला मिळते.

यमुना प्रथम प्रथम ‘आत्मनि अप्रत्यय’ दिसते. पण अेकदां का ती गंगेला मिळाली कीं दोघींच्या अुल्लासाला अुन्मादाचें भरतें येतें आणि जर अेकमेकींत चटकन् मिसळून गेलों तर भेटण्याचा आनंद तेथेंच विराम पावेल या भयानें दूरदूरपर्यंत त्या दोघी थोड्या अधिक प्रमाणांत अेकमेकींत मिसळतच रहातात. धर्मकवींनीं या स्थानाला प्रयाग-राज हें गौरवास्पद नांव अुगीच नाहीं दिलें.

पण जेव्हां अेखादी नदी समुद्राला येअून मिळते तेव्हां तो सागर-सरिता-संगमाचा अुन्माद शिव-पार्वतीमीलना अितकाच अद्‌भुत-रम्य असतो. त्याचें वर्णन भक्तवृत्तीनें अथवा अपत्यसदृश भाषेंत होअूंच शकणार नाहीं. माणसाला आपण माणूस आहोंत हें विसरून जाअून आपल्या शक्तीपेक्षांहि अुंच अुड्डाण करून सागर-सरितेच्या या अ-समान संगमाचें वर्णन करावें लागेल.

पण धनुष्कोटीमधें तर हरिहरांच्या मीलनाप्रमाणें दोन समुद्रांचा सागर-संगम आहे. रत्नाकर मानार ( Manar ) च्या बाजूनें येतो. महोदधि पाल्क

( Palk ) च्या सामुद्रधुनीचा प्रतिनिधि आहे. या दोघांना अेकदम, कसें काय भेटूं द्यायचें ? पृथ्वीनें जणूं काय रामधनुष्याची कमानदार 'कोटी' आडवी ठेवून त्या दोघांना अेक कोसपर्यंत भेटूं दिलेलें नाहीं. या बाजूला रत्नाकर अुसळत असतो व त्या बाजूस महोदधि गर्जना करीत असतो आणि वारा सुचवेल त्याप्रमाणें दोघे आपापले प्रवाह दौडवीत असतात.

आणि काय त्या दोघांचा खाजगी संकेत ! महोदधीनें हिरवा रंग धारण केला तर रत्नाकर अगदीं निळाभोर बनतो. आणि जेंव्हां रत्नाकरावर हिरवट रंग चढतो तेंव्हां महोदधि आकाशाला सुद्धां दीक्षा देअूं शकेल अशा गडद निळ्या रंगाची रेलचेल करून टाकतो.

भेटण्याची अिच्छा असूनहि भेटतां येत नाहीं असें जोंपर्यंत वाटतें, तोंपर्यंत दोघे जण बेफाम होतात. क्षणोक्षणीं नव्या नव्या तऱ्हेनें आपला अमर्ष व्यक्त करतात. पण अेकदां का भेटण्याची मोकळीक मिळाली कीं जणूं काय कसलीच अुत्सुकता नव्हती, भेटायचें होतें तें भेटून घेतलें, झालें, अशी शांति आणि सहजता भेटतांना त्यांच्या चेहऱ्यावर आढळून येते. सगळी अस्वस्थता जणूं काय दूर मागें ठेवली असावी त्याप्रमाणें, पाण्याच्या तळापासून पुढें सरलेल्या वाळूच्या बांधामुळें अुसळणाऱ्या लाटांच्या दोन रांगा दूरवर दिसतात. अेक रांग महोदधीच्या बाजूस पसरलेली आहे आणि दुसरी रत्नाकरामधें. परंतु जेथें मधल्या भागांत त्या दोघांचें प्रत्यक्ष मीलन होतें, तेथें तर सरोवरा-अितकी शांतिच पसरलेली असते. आणि त्यांत नवल तें काय ? अद्वैतांत आनंदाची पराकाष्ठा असूं शकते पण तेथें अुन्मादाला कोठून स्थान असणार ?

धनुष्कोटीच्या टोकाला अुभें राहून अेकदां अेक गिरकी घेअून सर्व दिशानीं पाहिलें पाहिजे. जेथून आपण चालून आलों ती जमिनीची जीभ सोडली तर सर्वत्र महासागराच्या विशाल पाण्याचें क्षितिजाशीं बनणारें वलयच पहावयास सांपडतें.

रंगून किंवा कराचीला जातांना भरसमुद्रांत चहुंकडे समुद्रवलय व क्षितिजवलय अेकाकार झालेलें दिसतें त्याचा कैफ कांहीं कमी नसतो. पाण्याच्या या क्षितिज-विस्तारावर आकाशाचें तितकेंच मोठें पण अनंतपटीनें अुंच, खोल असें झांकण ठेवलेलें आहे आणि या डबेश्वरांत अेका लहान

जहाजांत बसलेले 'कोटश्च कीटायते'–असे आपण मोत्यांप्रमाणें सांठवले गेलों आहोंत अशी कल्पना मनांत अुठल्यावांचून रहात नाहीं. पण जसजसा अधिक विचार करावा तसतशी आपली क्षुद्रता मनावर अधिकाधिक ठसूं लागते.

धनुष्कोटीमधें असें होत नाहीं. पृथ्वीशीं आपण निगडित आहोंत, आपल्या पायातळीं मजबूत जमीन आहे, आणि ती जमीन हळूंहळूं विस्तार पावत अेका विशाल देशाकडे व खंडाकडे आपल्याला घेअून जाअूं शकते असा विचार आपल्याला सान्त्वना देतो, अितकेंच नव्हें तर प्रचंड आत्मविश्वासाचे अधिकारी बनवतो. जितक्यांदा म्हणून मी धनुष्कोटीला पोंचलों आहें तितक्यांदा मला माणूस म्हणून स्वतःविषयीं वाटणाऱ्या आत्मगौरवाचें भान विशेषत्वानें झालें आहे. आणि त्यामुळें तेथें मला माझ्या 'भूमिके'वर दृढ राहून सागराची अुपासना करणें शक्य झालें आहे.

जेव्हां जेव्हां मंडपम् सोडून पुलावरून पामबनला पोंचलों, तेव्हां तेव्हां 'रघुवंशा'मधलें कालिदासाचें या प्रदेशाचें वर्णन आठवल्यावांचून राहिलें नाहीं. कालिदासाची वर्णनशक्ति जरी माझ्यापाशीं नसली, तरी मी त्याचा समानधर्मा आहें याविषयीं मनांत मुळींच शंका अुरत नाहीं. मी कुठें 'कवियशःप्रार्थी' आहें कीं कालिदासाशीं आपलें नांव जोडण्यांत मला संकोच वाटावा ? मला हसणाऱ्या टीकाकारांना मी त्यांचेंच अेक वचन अैकवीन—

**पर्वते परमाणौ च पदार्थत्वं प्रतिष्ठितम् ।**

पण जेव्हां मी धनुष्कोटीपाशीं येतों तेव्हां कालिदासाला विसरून जातों आणि लंकेला कसें जातां येअील याच्या खटपटींत गुंतलेल्या हनुमानाच्या नजरेनें दक्षिणेकडे पाहूं लागतों. ज्या ज्या वानर-यूथ-मुख्यांनीं सेतूची कल्पना काढली आणि अमलांत आणली त्यांच्या नजरेनें तलाअीमानारच्या दिशेनें पाहूं लागतों, आणि अशारीतीनें कल्पना–विहार करून थकल्या-वर चार धामांची यात्रा पुरी करून रामेश्वराला येअून पोंचलेल्या वृद्ध यात्रिकरूचें हृदय धारण करून कल्पना करूं लागतों कीं, 'अेक संपूर्ण आयुष्य जवळ जवळ पुरें करून भारतवर्षा अितक्याच विशाल जीवन-

प्रदेशाचें पर्यटन करून आलों. आतां येथून परतून काय करायचें आहे ? अिहलोकींचें काम कसेंबसें पुरें झालें. त्यांत सफलता लाभली असो किंवा विफलता, पण पुन्हां तें न तेंच जीवन गिरवायचें नाहीं. आतां त्या सगळ्या जीवनाकडे पाठ फिरवलेलीच बरी. मागें वळून, सिंहावलोकन करून, त्याच्याकडे पहाण्याचा स्मरण-रस देखील अुरला नाहीं. आतां तर सांपरायाचा, पारलौकिक जीवनाचा पारमार्थिक दृष्टीनें विचार करणेंच श्रेयस्कर आहे.' अशी विचार-परंपरा मनांत अुद्‌भवली. मन अेका रीतीनें अस्वस्थ झालें होतें आणि दुसऱ्या रीतीनें परम शांति अनुभवीत होतें.

या खेपेस ज्यावेळीं धनुष्कोटीला आलों त्यावेळीं परंपरेला अनुसरून महोदधींत स्नान केलें. महासागराचें क्षमापन सुद्धां केलें. पण मनांत विचार अुठला तो अेकच कीं आतां कांहीं पुन्हा या ठिकाणीं यावयाचें नाहीं. सिलोनला अेकदां जावयाचें आहे, पण धनुष्कोटीचें आतां जें दर्शन घेतलें तें अखेरचेंच. असें कां वाटलें तें सांगणें कठीण आहे. पण मन अगदीं तृप्त झाल्याची भावना याच वेळीं मनांत आली खरी.

रामेश्वर,—धनुष्कोटीनंतर येते कन्याकुमारी. अेक स्थान भव्य तर दुसरें भव्यतर. येथें दोन नव्हे तर तीन सागरांचा संगम आहे. या संगमाचें वातावरण अभेदभक्तीच्या आनंदासारखें आहे. हा येथें हिंदी महासागर संपला, येथें मुंबअीचा म्हणजेच पश्चिम समुद्र आणि येथें पूर्व समुद्र सुरू झाला असें सांगतांहि येत नाहीं व मानतांहि येत नाहीं. येथें भारतवर्षाचें दक्षिणेकडील टोंक आहे आणि तिन्ही सागरांनीं त्याला तिन्ही बाजूंनीं वेढलें आहे. संगम आपलें आपण म्हणायचें अेवढेंच. सागराच्या गांवीं संगम नांवाची वस्तुच नाहीं. संगमाची कल्पना आपली आहे. सागरांना विचारलें तर ते म्हणतील कीं जो भेद मुळांत अस्तित्वांतच नाहीं तो नाहींसा झाला असें म्हणावें तरी कसें ? 'संगमा'ची कल्पना अगदींच चुकीची आहे. त्याला नांवच द्यायचें असेल तर 'संभवन' म्हणा. जेथें अेकताच नांदत आहे तेथें वाटेल त्या भागाला तुम्ही वाटेल तें नांव देअू शकता. नाम आणि रूप यांचें द्वैत येथें फिकें पडतें, विरघळून जातें आणि मग केवळ अद्वैतच आपल्या अखंड मस्तींत गर्जना करूं लागतें.

कन्याकुमारीमधें जी भव्यता माझ्या अनुभवास आली, तशी भव्यता अेक हिमालय सोडून व गांधीजींचें जीवन सोडून अन्यत्र कोठेंहि अनुभवास आली नाहीं.

कन्याकुमारीचें महत्त्व मीं सर्वांत प्रथम अैकलें होतें तें गांधीजींच्या तोंडूनच. अेखाद्या दृश्याचें वर्णन करीत बसणें त्यांचा स्वभाव नव्हे. पण कन्याकुमारीहून आश्रमांत परत आल्यानंतर त्यांनीं त्या स्थानाचें मोठ्या अुत्साहानें माझ्यापुढें वर्णन केलें होतें.

जेव्हां २७ सालीं, त्यांच्याबरोबर मी दक्षिण हिंदुस्थानाचा प्रवास केला, तेव्हां नागर–कोविल गांवीं येतांच त्यांनीं आपल्या यजमानाला खास शिफारिस केली कीं, 'काकाला कन्याकुमारीला जायचें आहे. मोटरची व्यवस्था करा.' त्या दिवशीं त्यांनीं दोनदां चौकशी केली कीं कन्याकुमारीला जाण्याची व्यवस्था नीट झाली आहे कीं नाहीं.

पू. बांना अुत्साहित करणें मला मुळींच जड गेलें नाहीं. दुसरेहि दोघेजण बरोबर निघाले.

ज्या दृश्याची प्रशंसा पू. बापूजींच्या तोंडून अैकली होती तें दृश्य पहाण्याची माझी अुत्कंठा अगदीं शिगेला पोंचली होती. येथें आल्यानंतर तर तिचा कैफच चढला. त्यानंतर जितक्यांदा म्हणून येथें आलों तितक्यांदा पुनः पुन्हा तो न तोच कैफ मीं अनुभवला आहे.

आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं या कैफाबरोबरच ब्रह्मचर्याविषयींचे देखील गहन विचार मनांत अुत्पन्न झाल्यावांचून रहात नाहींत. देवी कन्याकुमारीचें हें स्थान आहे या जाणिवेनें असे विचार मनांत अुत्पन्न होतात असें मला वाटत नाहीं; आतांपर्यंत कधीं वाटलें नाहीं. स्वामी विवेकानंदांनीं या स्थानीं येअून असाच कैफ अनुभवला होता या माहितीमुळें देखील कधींकाळीं मनांत येथें येतांक्षणींच ब्रह्मचर्याचे विचार अुद्भवले नाहींत. गांधीजींच्या भव्यतेच्या भव्य साधनेशीं पण तो विचार संलग्न आहे असें नाहीं. स्वयंभूपणें तो विचार मनांत अुत्पन्न होत असतो.

या वेळीं (५–१–१९४७) तिसऱ्यांदा मी येथें आलों आहें. आल्या-

बरोबर सर्वांत आधीं समुद्राच्या लाटा, आकाशांतले ढग, पूर्व पश्चिमेचें क्षितिज आणि पाठीमागचे डोंगर—या सगळ्या मित्रांना पाहून घेतलें.

आज पौष शुक्ल त्रयोदशी आहे. आज चंद्र रोहिणींत किंवा मृग नक्षत्रांत असला पाहिजे. आम्ही मोटरीच्या वेगानें मजल दरमजल करीत कन्याकुमारीकडे धावत होतों तेव्हांच चंद्र आकाशांत अुंच चढून सूर्य मावळला कीं लगेच, वेळ न घालवतां, आकाशाचा ताबा घ्यावा म्हणून टपून बसला होता. संध्येला आपला वर्णविलास पसरवण्याला त्यानें विशेष अवकाश दिला नाहीं. तरीसुद्धां जितका वेळ मिळाला तितक्यांत रंगांचीं अनेक दृश्यें संध्येनें दाखवलींच.

सूर्यास्त पहाण्याची तीव्र अिच्छा होती. पण पश्चिमेकडील ढगांनीं कांहींसें ठपका देत आम्हांला म्हटलें, ‘ कुणाचा अस्त पहाण्यासाठीं का कधीं कोणी असें व्याकुळ होतात ? खरें पाहिलें तर सूर्याचा अस्तच होत नाहीं. तुम्हां लोकांपुरता प्रकाशाचा अस्त होतो. त्याच्यासाठीं सूर्याला पहाण्यापेक्षां अुदय असो कीं अस्त, दोन्ही प्रसंगीं तो जी अेकरूपता धारण करतो तिचा रंगच कां पाहून घेत नाहीं ?’

**अुदये सविता रक्तो रक्तश्चास्तमने तथा।**
**संपत्तौ च विपत्तौ च महताम् अेक-रूपता॥**

हा श्लोक ढगांनीं देखील लहानपणीं पाठ करून ठेवला असावा !

सूर्य जेव्हां क्षितिजाच्या तळाला पोंचला तेव्हां ढगांच्या झरोक्यांतून सूर्यप्रकाशाचे लाल किरण वरपर्यंत पसरले. आणि वर पसरले त्याही पेक्षां दक्षिणेस व अुत्तरेस अधिक पसरले. झरोके अधिक नव्हते, पण जे होते ते मोठे होते. त्यामुळें किरणांचे मयूख जणूं काय लाल रंगाचे पट्टे ओढले असावेत त्याप्रमाणें भासत होते. आणि आकाश तर स्वतःच्या वैभवानें वजनदार, प्रतिष्ठित आणि गर्भश्रीमंत दिसत होतें. ही शोभा अपेक्षेपेक्षां अधिक वेळ टिकली, त्यामुळें सारखें तिलाच पहात बसण्याची अभिलाषा कांहींशी तृप्त झाली.

येथें कुमारीच्या न झालेल्या लग्नाच्या अक्षता विखुरलेल्या आहेत, त्या बाजूच्या खडकावर लाटांचें तांडव पहाण्यासाठीं म्हणून आम्ही जाअून

बसलों. पाहतां पाहतां संध्या पश्चिमेंत विलीन झाली आणि चंद्राचें राज्य सुरू झालें. आकाशाला घेरून टाकण्याचा ढगांचा मनसुबा पुरा झाला नव्हता, तितक्यांत दक्षिणेकडील ढगांतून अेक मोठा तारा चमकूं लागला. तो दुसरा कोण असणार ? ते तर अगस्ति–महाराज स्वतः दक्षिण-पूर्व दिशेवर आरूढ होत होते. सुदैवानें यमुना आणि याममत्स्य देखील तिरप्या रेषेंत आकाशांत दिसले. त्यामुळें दक्षिण दिशेचें ध्यान करण्याचें फळ मिळालें. तृप्त झालेल्या डोळयांनीं आम्ही अुत्तरेकडे नजर वळवली. तेथें आकाशांत देवयानी ( कॅसियोपिया ) चा M चांगला वर चढला होता. त्याच्या खालीं जवळ जवळ क्षितिजापाशीं अेका ताडाच्या झाडाअेवढ्या अुंचीवर त्या ताडाच्या पानांचेंच आसन करून ध्रुवकुमारानें आम्हांला आपलें सुभग दर्शन दिलें. देवयानी व ध्रुव यांना पहातां पहातां नजर पश्चिमेकडे वळली, तेथें हंस म्हणाला कीं श्रवण तर केव्हांच अस्ताला गेला आहे. म्हणून पूर्वेकडे नजर वळवली. तेथें ब्रह्महृदयानें सांगितलें कीं ब्रह्म-मंडळाचा विस्तार अेवढ्यांतच कुठेंतरी असला पाहिजे.

आम्ही दक्षिणेकडे तोंड फिरवलें. अगस्ति अितका कांहीं वर आला नव्हता कीं त्याच्या झोंपडीची नीट कल्पना करता यावी. पण व्याध तर दिसायलाच हवा. परंतु व्याध कितीहि तेजस्वी असला तरी ढगांचा जाड थर कसा विंधू शकणार ? आम्ही आमच्या नजरेनें ढगांचा थर विंधण्याचा प्रयत्न केला, तेव्हां शंका आली कीं ढगांमधें अमुक भाग अुजळ दिसत आहे. त्याच्या मागेंच व्याध असला पाहिजे. ढगांच्या पलीकडे व्याधाचा प्रकाश आणि अलीकडे आमच्या नजरची धडक–या दुहेरी हल्ल्यानें ढग विरळ झाले आणि झिरझिरीत पडद्यामागें नाटकांतलीं पात्रें अस्पष्ट दिसावींत तसा व्याध दिसूं लागला. पहातां पहातां व्याध पूर्णपणें स्पष्ट दिसूं लागला आणि मग व्याध, अगस्ति, यमुना आणि याममत्स्य हे सर्व तेलगु अक्षरांच्या शिरोरेखेप्रमाणें शोभूं लागले.

आतां मृग दिसेल, रोहिणी झळकेल, प्रश्वन डोकावूं लागेल, अशा आशेनें आम्ही आकाशाकडे डोळे लावून बसलों होतों. अितक्यांत रजनीनाथानें स्वतःभोंवती वलय पसरलें आणि त्या सुवर्ण-वलयाबरोबरच

आकाशांत ढगांनीं गर्दी केली. आकाशांत चांदणें पसरलेलें असलें म्हणून काय झालें ? रात्रीचे ढग फारसे आकर्षक वाटत नाहींत. त्यामुळें काळयाभोर समुद्राच्या गंभीर जळावर नाचणाऱ्या फेसाच्या चमकत्या रेखांच्या रांगा पाहूनच आम्ही डोळयांना मेजवानी दिली.

समुद्राच्या पाण्यावरील आणि आकाशांतल्या ढगांवरील विविध रंगांचें नृत्य पोटभर पाहून घेतल्यानंतर ही गंभीरता अितकी तृप्तिदायक वाटत होती कीं या तृप्तीबरोबर स्थितप्रज्ञाचा आदर्श गाण्यांत व संध्येची अुपासना करण्यांत कांहीं अपूर्व आनंद प्रत्ययास आला. हा सागर पूर्ण आहे. त्याच्यावर पसरलेलें हें आकाश पूर्ण आहे. या दोघांच्या दर्शनानें जीवनाच्या सायंकाळीं हृदयांत अुद्भवलेला आमचा अुपशम-प्रधान आनंदसुद्धां पूर्ण आहे. आतां या त्रिविध पूर्णतेमधून कांहींहि काढून घेतलें किंवा भरीस टाकलें तरी पूर्णत्वांत कसलाहि अुणेपणा येणार नाहीं. मिळवलेली पूर्णता संपुष्टांत येअू शकते, कारण ती खरी पूर्णताच नव्हे. आत्मज्ञानांतून विकसित झालेली पूर्णता स्थायी असते, कारण तो वारसा सोबत घेअूनच आपण जन्मलों होतों. तेथवर पोंचायला विलंब लागला हाच अुणेपणा. जें विकसित झालें तें आत्मसात् झालें. आतां तेथून चढणें कसलें नी अुतरणें कसलें !

जें विराट आहे, भूमा आहे, बृहत्तम ब्रह्म आहे त्याच्याशीं अेकरूप झाल्यानंतर स्वाभाविकपणें जें जीवन मनुष्य जगतो तेंच खरें ब्रह्मचर्य होय. वासना दाबून टाकली तर कधींतरी ती पुन्हा वर अुसळणार, वासना मारून टाकली तर ती भुताप्रमाणें मानगुटीवर बसणार. वासनेला तृप्त करण्याचे बेत केले तर व्यसनाप्रमाणें ती अखंड आपला पिच्छा पुरवणार आणि वाढत जाणार. वासनेला डोक्यावर चढूं दिलें तर मस्तकांत तिचें चक्रच भ्रमत रहाणार. वासनेला तर तोंड देअून सवाल केला पाहिजे कीं तूं कोण आहेस ? मित्राचें रूप घेअून शत्रुता करायला आली आहेस कीं जीवनाला समृद्ध करण्याची साधना म्हणून आली आहेस ? वासनेचें स्वरूप जोंवर स्पष्ट आणि अुघडें होत नाहीं तोंवरच ती मोहक वाटते. मोह अस्पष्टतेमुळें, अेकांगी दर्शनामुळें निर्माण होतो. वासनेला वश होण्यांत मुख्य हात आंधळेपणाचाच असतो. वासनेचा आंधळा विरोध देखील तिला बळकटीच आणीत असतो. दोन डोळयांनीं पाहून वासनेला

ओळखतां येत नाहीं. तिला, महादेवाप्रमाणें, तीन डोळयांनीं पाहिलें पाहिजे, मग मात्र तिची शत्रुता आपोआप वितळून जाते.

केवळ तपश्चर्येनें वासनेशीं सामना देतां येत नाहीं, अुलट प्रज्ञा स्थिर झाल्यानंतर वासनेचा विरोधच करावा लागत नाहीं.

जीवनांत जोंवर अपूर्णतेची जाणीव आहे तोंवर ब्रह्मचर्य सिद्ध झालें असें म्हणतां येणार नाहीं. अपूर्णता स्वतः तशी बाधक नाहीं. लहान मुलांत अपूर्णता काय कमी असते ? तें निर्मळ भावनेनें जगत जातें आणि त्याची अपूर्णता स्वाभाविक क्रमानें नष्ट होत जाते. अपूर्णतेची जाणीव अुत्पन्न झाली कीं लगेच मनुष्य पामर बनतो. सागराप्रमाणें पूर्ण झाल्यानंतर लाटा वाटेल तितक्या अुसळोत, पाण्याचा जथा हवा तसा जावो, पण सागराला वहावें लागत नाहीं. तो 'आत्मनि तृप्तः' आहे. त्यामुळेंच त्याला स्वतःची मर्यादा ओलांडावी लागत नाहीं. त्याला मर्यादेचें भानच नसल्यामुळें त्याच्याकडून ती अनायासें, अभावितपणें पाळली जाते. हेंच खरें ब्रह्मचर्य.

प्रार्थना पुरी केली आणि गेल्या चार दिवसांचीं संस्मरणें टिपून ठेवण्याची अूर्मि मनांत जागी झाली. थोडी नोंद केल्यानंतरच झोंप आली.

दुसऱ्या दिवशीं ब्राह्म मुहूर्तावर भुताप्रमाणें समुद्र किनाऱ्यावर जाअून बसलों असतों, पण पावसानें जरा अडवलें. प्रार्थनेच्या वेळीं समुद्र किनाऱ्यावर जातां जातां पुन्हां आकाशाकडे पाहिलें. दक्षिण दिशा अितकी कांहीं स्वच्छ, सुंदर आणि पारदर्शक होती कीं पूर्वेकडे गोळा झालेल्या ढगांची अगदीं चीड आली. त्यांनीं जर दक्षिणेचें अनुकरण केलें असतें तर काय बिघडलें असतें ?

दक्षिणेस त्रिशंकु नीट अुभा होता. जय-विजय त्याच्या द्वारपाळाचें काम करीत होते. कॅरीना अथवा खोटा क्रूस अेका बाजूला जाअून पडला होता. या दोहोंमधें कित्येक असे कांहीं सुंदर तारे चमकत होते कीं जे वर्धामुंबअीच्या लोकांना सबंध जन्मांत पहायला सांपडणार नाहींत.

अुत्तरेकडे सप्तर्षि अगदीं नम्रपणें पसरलेले होते. ध्रुव रात्रीप्रमाणेंच जवळ जवळ जमिनीला टेकायला आला होता. स्वाति आणि चित्रा या चांदण्या माथ्यावर चमकत होत्या. हस्त किंचित् वांकडा झाला होता. पश्चिमेला चंद्र

मावळला होता, पण चांदणें अजून आपलें अस्तित्व जाणवून देत होतें. पुनर्वसूच्या होडक्यांतून फक्त प्रश्वनच ढगांचा वेध करून डोकावत होता. अेकलकोंडा तारा अेकाकी आपल्या स्वभावाप्रमाणें प्रश्वन आणि मघा यांच्याशीं कट्टी करून दूर जाअून अुभा होता. मघाची कोयती फाल्गुनीच्या चौरसाचा सांभाळ करीत होती. पूर्वेकडे विशाखेच्या खालीं गुरु, शुक्र शोभून दिसत होते आणि ते चांगलेच वर आलेले असल्यामुळें बारीक अनुराधा, वाकडी ज्येष्ठा आणि अणकुचीदार मूळ त्यांना आधार देत होते. गुरु, शुक्र जेव्हां पारिजाताच्या जवळ येतात तेव्हां तें त्रिकुट चांगलें शोभून दिसतें आणि मंगळ जवळ नाहीं अशी चुटपुट लागून रहात नाहीं.

हिंदुस्थानाची अेक ज्योतिर्मयी व्याख्या मला सुचली आहे. जर कन्या-कुमारीच्या दक्षिणेस आपण गेलों तर ध्रुव दिसेनासा होतो आणि काश्मीरच्या अुत्तरेस गेलें तर दक्षिणेकडे अगस्ति दिसत नाहीं. यावरून मीं व्याख्या बनवली आहे कीं जेथून ध्रुव आणि अगस्ति दोन्ही दिसू शकतात तोच आपला भारत देश होय.

प्रार्थनेनंतर सर्वच प्राण्यांना करावें लागणारें अुदरभरण नांवाचें यज्ञकर्म पोटभर करून घेतलें आणि स्नानासाठीं तयार केलेल्या कुंडांत अुतरलों. या नव्या धर्तीवर बांधलेल्या कुंडांत समुद्राचें पाणी अखंड येत असतें. अर्धें कुंड चार फूट खोल आहे, बाकीचें अर्धें आठ फूट. कपडे बदलण्यासाठीं दोन खोल्याहि बांधलेल्या आहेत. अशी नीटनेटकी व्यवस्था धार्मिक पुण्य कमी करणारी आहे असें मुळींच मानतां कामा नये. स्नान करून आम्ही कन्या-कुमारीच्या दर्शनाला गेलों. हें मंदिर त्रावणकोरच्या हिंदु राज्यांत असल्यामुळें हरिजनांसाठीं केव्हांचें अुघडें झालेलें आहे. मंदिराच्या दरवाजावर सरकारी जाहिरनामा आहे कीं जे जन्मानें किंवा धर्मानें हिंदु आहेत फक्त त्या सर्वांनाच या मंदिरांत प्रवेश आहे.

मंदिराचें स्थापत्य साधें पण प्रशस्त आहे. दगडाच्या खांबांवर छत म्हणून आडवे दगडच ठेवलेले असल्यामुळें मंदिराचा आंतला भाग अेखाद्या भुयारासारखा वाटतो. देवीची मूर्ति पूर्वाभिमुख आहे, पण त्या बाजूचा

बाहेरचा दरवाजा बंद असल्यामुळें देवीला समुद्राचें दर्शन होत नाहीं, आणि समुद्राला देवीचें दर्शन होत नाहीं. बिचाऱ्या बंगालच्या समुद्रानें स्वतः जन्मानें किंवा धर्मानें हिंदू असल्याचा कधींच दावा केला नाहीं! आणि समुद्र असल्यामुळें त्याला मर्यादाभंग करूनही मंदिरप्रवेश करतां येत नाहीं!!

कन्याकुमारीची कथा करुण आहे. येथल्या किनाऱ्यावर अक्षतांप्रमाणें विखुरलेली शुभ्र जाड वाळू, माणकांच्या चुन्यासारख्या लाल रेतीचा गुलाल आणि शांअीशोषक म्हणून वापरण्यांत येणारी काळी रेती, या सर्व प्राकृतिक वस्तु या करुण कहाणीला अधिक करुण बनविण्यांत मदतरूप होत असतात. जगांतलीं सगळींच महाकाव्यें जर शोकान्त असतात, तर हिंदी महासागराची अधिष्ठात्री देवी कन्याकुमारी हिची कथा देखील शोकान्त असणें सर्वथा सुसंगत आहे. करुणरसांत जी सखोलता असते तिच्या द्वाराच जीवनाची खोल प्रतीति होअूं शकते.

**दुःखं सत्यं सुखं माया; दुःखं जन्तोः परं धनम् ।**
**दुःखं जीवन-हृद्गतम् ॥**

अुथळ जीवनाची समजूत असते कीं सुख हीच काय ती अेक जीवनाची अनुभूति आहे, जीवनाचें सारसर्वस्व आहे. हा भ्रम दूर करण्याचें काम दुःखाकडे सोंपविण्यांत आलें आहे. दुःखानें खचून न जातां जो मनुष्य दुःखाचा जीवनाची साधना म्हणून स्वीकार करतो तोच सुखदुःखाच्या पलीकडे जाअून जीवनसमृद्धीच्या आनंदाचा आस्वाद घेअूं शकतो. हा आनंद सुखदुःखाच्या अतीत असल्यामुळें सागराप्रमाणें गंभीर आणि आकाशाप्रमाणें अनंत असतो.

या आनंदाच्या नशिबीं कुणाशींहि विवाहबद्ध होण्याचें लिहिलेलें नाहीं.

डिसेंबर, १९४७.

# : ६४ : समुद्राच्या पाठीवर

[ कलकत्त्याहून रंगूनला जातांना ]

संध्याकाळचा चार वाजण्याचा सुमार असेल. आमची आगबोट निघाली. अून सौम्य झालें होतें. मंदमंद वारा वाहत होता. पाण्यावर नाचणाऱ्या समुद्राच्या चकाकींत पिवळी झांक मिसळूं लागली होती. लाल लाल 'बोयऱ्यां'ना चुकवून आगबोट पुढें निघाली. दोन्ही किनाऱ्यावर जहाजें दिसत, लहान लहान होड्या दिसत. सेंट विल्यमूसचा किल्ला आम्ही मार्गे टाकला आणि पुढें निघालों. कित्येक गोद्यांमधें लहान मोठीं जहाजें बांधण्याचें काम चालूं होतें. दोन्ही कांठाची जमीन पाण्याच्या सपाटीपेक्षां फारशी अुंच नसल्यामुळें दोन्ही बाजूला दूर दूरवर नजर पोंचत होती. परंतु मन रमावें असें कांहीं तेथलें दृश्य नव्हतें. अशा मोठ्या नद्या जेथें समुद्राला भेटायला जातात तेथले कांठ फार गलिच्छ असतात. भरती ओहटीमुळें ओल्या झालेल्या चिखलांत धावपळ करणाऱ्या खेकड्यांशिवाय तेथें दुसरें कांहींच दिसत नाहीं.

जसजसे आम्ही पुढें गेलों तसतशी नदी रुंद होअूं लागली. दूरच्या कांठावर जेव्हां पांढरी रेती दृष्टीस पडली तेव्हां मला जरा हायसें वाटलें. सुंदरवनाचा प्रदेश पार करून रात्र पडण्यापूर्वीच आम्ही डायमंड हार्बर जवळ येअून पोंचलों. आमचें जहाज आतां लाटांबरोबर डोलूं लागलें. थोडा वेळ डेकवर अुभें राहून हिंदुस्थानचा किनारा दृष्टिआड होतांना आम्ही पाहून घेतला. पण मग सारखी चक्कर येअूं लागली. त्यामुळें रात्रीचें जेवण करून आम्ही झोंपी गेलों. झोंपण्यापूर्वी प्रार्थनेच्या अंतीं चि. गिरिधारीनें 'आगुनेर परशमणि छोंआओ प्राणे' हें रवीन्द्रनाथांचें सुंदर पद गायिलें. तें अैकायला कित्येक लोक गोळा झाले. आणि त्या गायनाच्या प्रतापानें आम्ही आपलीं अंथरूणें अैसपैस पसरलेलीं पाहून कुणी कुरकुर किंवा अीर्ष्या केली नाहीं.

सकाळीं सर्वांच्या आधीं मी जागा झालों. त्या वेळीं अरुणोदयसुद्धां झालेला नव्हता. आकाशांत चंद्रानें प्रवास करावा त्याप्रमाणें जहाज अेकटें पाणी कापीत चाललें होतें. काय ती त्या वेळची शांति! आगबोटीच्या पोटांतील यंत्ररूपी हृदय जर आपली धडधड अैकवीत नसतें तर बाहेरची शांति अितकी अुठावदार झाली नसती. चौफेर लोखंडाचा किंवा शिशाचा थंड रस पसरला असावा त्याप्रमाणें समुद्र दिसत होता. मी डेकच्या कठड्या-पाशीं जाअून अुभा राहिलों. जहाज जसें डोले, तसें पाणी वर चढे किंवा खालीं जाअी. जिकडे पहावें तिकडे लाटाच लाटा. लाटा अेकमेकींवर आपटल्या कीं त्यांतून फेस अुत्पन्न होअी. अंधारांत हा फेस चकाकतो आणि त्या चकाकीच्या वांकड्यातिकड्या रेखा अेकत्र येअून अेक विचित्र नक्षीकाम करून दाखवतात. जहाजाच्या हलण्याचा मेंदूवर परिणाम होतो. त्यांत जर आपण लाटांच्या अखंड आणि सनातन नृत्याची लीला निरखत बसलों तर मग त्याचा कैफच चढतो.

पुढें गेल्यावर लाटांचें फुटणें थांबलें. सागराचें हृदय ठिकठिकाणीं वर चढे व खालीं अुतरे. सामान्यपणें लाटांचें अुसळणें व फुटणें पाहून मौज वाटते, पण त्यांत तितकेंसें गांभीर्य नसतें. ध्वनिकाव्यांतलें रहस्य शब्दांनीं स्पष्ट केल्यानें त्याचें सौंदर्य जसें ओसरल्यागत होतें तसेंच या लाटा फुटल्यानें होतें. पण जेव्हां लाटा आंतल्या आंत अुसळतात आणि मिसळतात तेव्हां त्यांतली सूचकता विविध, अनंत व अस्पष्ट अथवा अव्यक्त रहाते. अंधार असूनहि हवा स्वच्छ असते तेव्हां आकाश व सागर यांचें मीलन-वर्तुळ लक्ष वेधून घेतल्यावांचून रहात नाहीं. क्षितिजाजवळ लाटांचा प्रश्न अुरत नाहीं. समुद्राच्या काळेपणाशीं तुलना करूं जातां अंधारून आलेलें आकाश देखील अुजळ दिसतें. वेदकालीन ॠषींना जीवन-रहस्य जसें दिसलें असेल तसें रात्रीच्या वेळीं क्षितिज दिसतें. ॠषींना, अनंत काल व्यापून रहाणारीं आध्यात्मिक तत्त्वें अनंत आकाशांत चमचमणाऱ्या ताऱ्यांप्रमाणें स्पष्ट दिसतात, अुलट पार्थिव जीवनांतील भविष्यकाळ त्यांच्या आर्ष दृष्टीला सुद्धां समुद्राच्या अथांग जलविस्ताराप्रमाणें अज्ञात, अव्यक्तच अुरतो.

अशाप्रकारें ध्यान व कल्पना यांचा खेळ चालू होता अितक्यांत—

**' आंधारेर गाये गाये परश तव**
**सारा रात फोटाक तारा नव नव '**

ही शोभा ओसरूं लागली आणि अरुणोदयानें पूर्वदिशा कोणती हें निश्चित करून दिलें. रात्र ओसरल्याचें तें काव्य पहाण्यासाठीं मीं जीवतरामना अुठवलें. ते अुठण्याच्या आधींच गिरिधारी अुठला आणि म्हणतो, ' मला दाखवा काय आहे तें, मला दाखवा. ' मी त्याला काय दाखवणार ? तें कांहीं पांखरूं किंवा जहाज थोडेंच होतें कीं अंगुलिनिर्देश करून दाखवतां यावें ? मी त्याला म्हणालों, ' तें समोर लाल आकाश दिसतें आहे तें पहा; थोड्याच वेळांत तेथें सूर्य अुगवेल.'

आतां समुद्रानें आपला रंग पालटला. पूर्वेकडे जणूं काय लाल जांभळ्या रंगाचा धत्रधबा चाल करून पुढें येत होता. आणि आश्चर्य हें कीं पश्चिमेकडे देखील त्याच रंगाचा पडसाद अुमटला होता. मात्र पश्चिमेकडे समुद्रापेक्षां आकाशानेंच तो रंग अधिक फासून घेतला होता. पूर्वेकडील प्रसन्नता वाढूं लागली. लाल रंगांत चमक आली, कुंकवाचा शेंदूर बनला आणि शेंदरांतून सुवर्ण आकारास आलें. मुंबअीकडे रहाणाऱ्या आपल्यासारख्या लोकांना पश्चिम किनाऱ्यावरील समुद्रांत होणाऱ्या सूर्यास्ताची शोभा अनेकदां पहायला सांपडते, पण सागर–मंथनांतून लक्ष्मी बाहेर निघावी त्याप्रमाणें अुदयमान अुषेची वर्धमान शोभा पाहण्याचा आनंद कांहीं औरच असतो. आकाश जसजसें हसूं लागलें तसतशा समुद्राच्या चेहेऱ्यावरील आनंद लज्जेच्या रेखा वाढूं लागल्या. जणूं काय दोन समवयस्क तरुणांत हास्यविनोद चालला आहे.

अेकीकडे या अुमलणाऱ्या पहाटेचें सौंदर्य पहाण्याकडे मन ओढ घेत होतें तर दुसरीकडे जहाजाच्या हेलकाव्यांनीं डोकें गरगरूं लागलें होतें. अेक घटकाभर या लाटा थांबल्या आणि जहाज स्थिर झालें तर किती चांगलें, असें मनांत आलें. पण सागराच्या लाटा आणि माणसाचे मनोरथ कधींकाळीं थांबले आहेत काय ? कंटाळून आरामखुर्चीवर पडण्याचा विचार करीत होतों, अितक्यांत बालसूर्याचा घुमट पाण्यांत आंघोळ करून बाहेर निघाला. अुगवत्या सूर्यबिंबावर अेक विशिष्ट प्रकारची तरलता असते : जणूं

काय सूर्य थंड पाण्यामधून कुडकुडत बाहेर पडतो, आणि पाण्यांत जो प्रकाश मिसळलेला असतो तो जणूं काय सूर्याचा धुअून निघालेला अंगराग होय. सूर्यबिंब संपूर्णपणें बाहेर पडतांक्षणीं मीं सविता नारायणाचा ध्यानमंत्र अुच्चारला : ' ध्येयः सदा सवितृ-मंडल-मध्यवर्ती ' अित्यादि.

जीवतरामना अशी गंभीरता मुळींच सहन होत नाहीं. ते अेकदम अुद्गारले, ' पुरे करा, कसली वानर-भाषा बोलतां आहांत! ' मी त्यांना म्हणालों, ' तुम्ही चुकत आहांत. ही तुमची भाषा नाहीं, संस्कृत आहे संस्कृत. ' विनोदाच्या भरांत भक्तीच्या अुमाळयाचा चक्काचूर झाला, प्रार्थना कशीबशी पुरी झाली आणि आम्ही जहाजांत रोज रोज ज्याच्यामधून पार पडावें लागतें त्या भयंकर दिव्याची चिंता करूं लागलों. शौचाला जाण्यासाठीं डेकवरून खालीं जावें लागतें. खालच्या मजल्याला अेरवीसुद्धां नेहमीं वास मारत असतो; पण सकाळीं तर हा मजला नरकाचा प्रतिस्पर्धी बनलेला असतो. हवा घाणेरडी व खारट. जागजागीं लोकांनीं अुलट्या करून ठेवलेल्या. अेंजिनच्या वाफेंतून येणारा अेक प्रकारचा अुग्र दर्प आणि त्याचवेळीं खलाश्यांच्या स्वयंपाकघरांतून सुरूं झालेली कांदे व मासे यांची दुर्गंधि, या सर्वांच्या मिश्रणांतून पार पडून शौचकूपांत प्रवेश करण्यापेक्षां समुद्रांत अुडी घेणें मला कमी त्रासदायक वाटलें असतें. हातची गोष्ट असती तर आम्ही तीन दिवस शौचाला गेलोंच नसतों. पण—

जाअून आलों खरे, पण आम्हां तिघांचेंहि चेहरे असे कांहीं झाले होते कीं अेकमेकाकडे पहाण्याचेंहि मन होअीना. अेखाद्या टोळीनें भांडण करायला जावें आणि सडकून मार खाअून परत यावें, कीं मग आपल्या सर्व-सामान्य अनुभवाचा अुल्लेख देखील कुणी करीत नाहीं; त्याप्रमाणें आम्ही त्या दिव्याचें नांव देखील काढलें नाहीं.

मीं गिरिधारीला म्हटलें, ' चल, जेवायला बस. ' तो म्हणे, ' मला भूक नाहीं. ' जीवतरामनीं सुद्धां जेवण्यास नकार दिला. मी म्हटलें, ' भल्या माणसांनो, अून वाढलें कीं चक्कर येअूं लागेल. मग जेवण्याची तुम्हांला शक्तिच अुरणार नाहीं. ही थंड वेळ आहे. पोटभर जेअून घ्या. अून तापण्यापूर्वी सगळें पचून जाअील. ' गिरिधारी विचारूं लागला, ' व्यायाम

केल्यावांचून आपोआप पचून जाअील?' मीं अुत्तर दिलें, 'आपल्या सर्वांच्या वतीनें हें जहाजच व्यायाम करीत आहे. तेव्हां त्याची तूं चिंता करू नकोस.' गिरिधारीच्या डोक्यांत कांहीं प्रकाश पडला नाहीं. तो माझ्या तोंडाकडे पहातच राहिला. आम्ही तिघांनीं पोटभर जेअून घेतलें. आमच्या तिघांत जीवतराम पक्के. त्यांनीं फक्त रसाळ फळेंच खाल्लीं. मीं माझ्या आवडी-प्रमाणें खाअून वर अेक सबंध लिंबू चोखलें. केळीं अुत्तम होतीं. बिचाऱ्या गिरिधारीला तीं केळीं फार आवडलीं. त्यानें केळयांवरच सपाटून हात मारला. अेक दोन तासांतच केळीं खाल्लयाबद्दल त्याला असा कांहीं सक्रिय पश्चात्ताप झाला कीं सबंध प्रवासांत त्यानें पुन्हा केळयाचें नांव घेतलें नाहीं.

दुपार झाली. मला माझा कमकुवतपणा ठाअूक होता. मीं अंथरूण पसरून हातपाय लांब केले. हातांत दुसरें लिंबू घेतलें आणि डोळे मिटून पडून राहिलों. मद्रासकडील अेखादें जहाज कलकत्त्याला जात असेल, त्याला दुरून पाहून लोक बोलूं लागले, 'तें पहा जहाज दिसतें आहे, तें पहा जहाज दिसतें आहे.' अितक्यांत दोन्ही आगबोटींनीं भों ओं...करून अेकमेकीला सलाम ठोकला. पण मीं आपलें डोळे मिटून कल्पनेनेंच तें सगळें दृश्य पाहून घेतलें. गिरिधारीला राहवलें नाहीं. तो चटकन् अुठून अुभा राहिला. तो अुभा राहिल्याबरोबर लगेच त्यानें खाल्लेल्या केळयांनीं पोटांत रहाण्याचें नाकारलें. तो घाबराघुबरा झाला. मीं झोपल्या झोपल्याच त्याला पाणी दिलें. झोपल्या झोपल्याच आल्याचा तुकडा दिला. थोडासा शांत झाल्यानंतर तो माझ्या अंथरूणावर येअून निजला. पण अेकदां ढवळलेलें पोट अेकदम शांत थोडेंच होणार?

आम्ही डेकवर निजलों होतों तेथें अेका बाजूला वरच्या केबिनमधें दोन देशी खिस्ती बसले होते. त्यांपैकीं अेकाला अुलटी होअूं लागली. तो जोरजोरानें ओकूं लागे तसतसा दुसरा त्याचा मित्र त्याची थट्टा करी. 'वन हिगिन्स अुलटी करोअिंग' वगैरे वगैरे त्याचे अुद्गार त्या दुसऱ्याच्या अुलट्यापेक्षांहि जोरांत निघूं लागले. गिरिधारी घटकेंत हसूं लागे नि पुन्हां पस्तावे.

अशा प्रकारें संध्याकाळ झाली. संध्याकाळीं माझ्यांत पुन्हां जीव आला. आम्ही पुन्हां थोडेसें खाअून घेतलें, पण तें कुणालाहि अनुकूल पडलें नाहीं. सायंकाळची शोभा मीं बसल्या बसल्याच न्याहाळली. लोक म्हणूं लागले,

'आतां आपण काळ्या पाण्याला आलों आहोंत' आणि खरोखरीच पाण्याचा रंग भय अुत्पन्न व्हावें अितका काळाकुट्ट दिसत होता. लोक म्हणूं लागले, 'आतां अंदमान दिसेल.' कुणी म्हणाले, 'नाहीं, आपलें जहाज फार दूर आहे. तें बेट दिसणार नाहीं.'

संध्येची शोभा कांहीं वेगळीच होती. सकाळचे रंग आणि संध्याकाळचे रंग सारखे नसतात. अुदय आणि अस्त सारखे असतीलच कसे? अुदय हा वर्धमान बाल्यकाळ आहे, तर अस्त हा विजयी वीराच्या निधनाप्रमाणें विषण्ण असतो. अुषेच्या मुखावर मुग्ध हास्य असतें, तर संध्येच्या मुखावर क्षणजीवी अुल्लास व विलास असतात. समुद्राचे रंग पुन्हां बदलूं लागले. सूर्य मावळला आणि हळूं हळूं पहातां पहातां नक्षत्रांचा पारिजात फुलूं लागला.

जहाजावरचे विजेचे सौम्य दिवे तर केव्हांचे चमकूं लागले होते. मला हे दिवे लहानपणापासून अतिशय आवडतात. ते अितके सौम्य असतात कीं त्यांच्यामुळें जवळचें, आसपासचें सगळें कांहीं दिसत असलें तरी ते डोळ्यांना दिपवीत नाहींत. अंधाराला मारून स्वतःचें साम्राज्य स्थापण्याची महत्वाकांक्षा त्यांच्यांत नसते. अंधाराशीं गोड तह करून 'तुम्ही देखील रहा आणि आम्ही देखील रहातों' अशी जीवननीति या दिव्यांनीं अंगीकारलेली असते. शहरांतले विजेचे दिवे नवख्या शिक्षकाप्रमाणें आपला सगळाच प्रकाश पाजळूं पहातात. आगबोटीवरचे दिवे योग्यांप्रमाणें 'आत्मन्येव संतुष्ट' असतात.

अंथरुणावर पडल्या पडल्या आम्ही या जहाजी दिव्यांच्या गोष्टी करीत होतों. अितक्यांत आमच्या आगबोटीनें भों ओं...करून हंबरायला सुरुवात केली. मीं ओळखलें कीं तिला कुठेंतरी दुसऱ्या म्हशीचा सुगावा लागला आहे. अितक्यांत दुरून अुलट हंबरडा अैकूं आला. मी अुठून बसलों. रात्रींचें समुद्रांत जहाज पहाणें मला फार आवडतें. विजेच्या दिव्यांचीं अेक लांबलचक हार आणि अुंच डोलकाठीवरील दोन मोठे लाल दिवे जेव्हां भुताप्रमाणें अंधारांतून धावतांना दिसतात तेव्हां आपण जणूं काय पऱ्यांच्या दुनियेंत प्रवेश केला आहे असाच भास होतो. जहाजाचा रोख जसजसा बदलत जातो तसतसें समोरील दृश्य नवी नवी शोभा प्रकट करूं लागतें; आणि जहाज जेव्हां दूर जातें आणि अदृश्य होण्याच्या बेताला येते तेव्हां तर झोपेमुळें

चालणाऱ्या स्मृति–विस्मृतीमधील लपंडावासारखेंच तें दृश्य दिसतें. आकाशांतले तारे पहात पहात मी झोपीं गेलों.

तिसरे दिवशीं पाऊस पडूं लागला. जहाजाच्या अेका खिस्ती कारकुनानें येअून आम्हां सर्वांना खालीं जाण्यास सांगितलें. याचें कारण लोकांच्या ध्यानांत प्रथम आलें नाहीं. त्यानें सांगितलें, 'अेक मोठें वातचक्र आग्नेयेकडून या बाजूला येत असल्याचें समजलें आहे.' याला सायक्लोन म्हणतात. सायक्लोनमधें जहाज सांपडणें हें अेक मोठें संकटच मानलें जातें. पुष्कळ जहाजें सायक्लोनमुळें बुडून गेलेलीं आहेत. तो कारकून म्हणाला, 'अशा रीतीनें डेकवर बसलांत तर प्रसंगीं वावटळीनें अुडून जाल.' लोक भयानें अेकापाठोपाठ अेक खालच्या मजल्यावर गेले. आम्ही खालीं जाण्याचें साफ नाकारलें. त्यानें आम्हांला समजावण्याचा प्रयत्न केला. आम्ही म्हटलें, 'वावटळ आली तर हे मोठमोठे दोरखंड पकडून आम्ही पडून राहूं.'

'पण पावसानें तुम्ही भिजून जाल.'

'भिजून गेलों तर सुकून देखील जाअूं.'

आमचा हेका पाहून कारकून निघून गेला. पाअूस आला. सडकून आला. वावटळीचा घेर तीनचार मैलांचा असतो. सुदैवानें वावटळ आमच्या जहाजापर्यंत आली नाहीं. वावटळीला धूमकेतूप्रमाणें चारी बाजूस वाऱ्याच्या शेपट्या असतात. अशा अेका शेपटीचा तडाखा आमच्या जहाजाला थोडासा बसला. आम्ही चांगलेच भिजून गेलों; त्यामुळें खालीं जाण्याच्या अैवजीं आम्ही वरच्या केबिनमधें जाअून बसलों.

शेवटीं रंगून आलें. बंदरावर अुतरणाऱ्या लोकांची आणि त्यांना न्यायला आलेल्या अिष्टमित्रांची बेसुमार गर्दी झाली. डॉ. प्राणजीवन महेता आम्हांला नेण्यासाठीं स्वतः बंदरावर आले होते. रंगूनमधें रबरी रस्ते असल्यामुळें गाड्या धावतात तेव्हां फक्त घोड्यांच्या टापांचाच आवाज होतो.

त्या दिवशीं सबंध दिवस आमच्या पायातळींची जमीन डोलते आहे असें आम्हांला वाटत होतें. अेका दिवसाच्या आरामानंतरच तीन दिवसांचा समुद्र डोक्यांतून अुतरला.

मार्च १९२७.

# : ६५ : सरोविहार

आम्हांला रंगूनजवळचें प्रख्यात सरोवर पहावयाचें होतें. युरोपचा आकार जसा वाकडातिकडा आहे तसाच या सरोवराचा देखील आहे. त्यांत कितीतरी आखातें, भूशिरें व संयोगभूमि असतील. कोंकण ज्या अक्षांशावर आहे त्याच अक्षांशावर रंगून असल्यामुळें, शिवाय समुद्र जवळ असल्यामुळें तेथली वनश्रीसुद्धां मला कोंकणाअितकीच रमणीय वाटली. जेथें पहावें तेथें मोठमोठीं झाडें. सृष्टीनें जसें काय आपलें सगळेंच वैभव दाखवण्यासाठीं बाहेर काढलें आहे. वनश्री आणि जलदेवता यांचें जेव्हां मीलन होतें तेव्हां तेथें लक्ष्मी आमंत्रणाशिवाय सुद्धां अुपस्थित होणारच. आम्ही तिसऱ्या प्रहरीं त्या सरोवरापाशीं जाअून पोहोंचलों. कितीतरी वेळ त्या सरोवराच्या कांठा कांठानें सहल केली. प्रत्येक कोपऱ्यांतून सरोवराची शोभा वेगळी दिसून येते. कित्येक रूपगर्वित वृक्ष सारा वेळ सरोवराच्या आरशांत स्वतःचेंच दर्शन घेत बसलेले दिसत होते.

फिरतां फिरतां आम्हांला अधिक धीर धरवेना. सरोवर तर नौकाविहारासाठींच अीश्वरानें निर्माण केलेलें असतें. हबशी जॉनला बोलावून त्याच्या होडींत आम्ही बसलों आणि अनेक दिशांना निरुद्देश प्रवास केला. मधेंच अेक बेट अुभें होतें. त्याची भेट घेतल्यावांचून परत कसे फिरणार? बेटावर अेक सुंदर आरामगृह बांधलेलें होतें. त्याच्या पायऱ्यांच्या दोन भिंतींवर सिमेंटनें बनवलेले दोन भयंकर अजगर आडवे पसरलेले होते. होडी चालवतांना अेक वळण घेतलें कीं अेकाअेकीं श्वेडेगॉन पॅगोडा आपल्या अुंच शिखराचें दर्शन देअी. आग्ऱ्याच्या किल्ल्यांतून ताजमहाल पहाण्यांत जी अेक मौज वाटते तशीच मौज येथें वाटे. वस्तूच्या जवळ गेलें कीं तिचें सगळें सौंदय प्रकट होतें, पण तिचें काव्य मात्र दुरूनच चांगलें खुलून दिसतें. ही खुबी कळल्यामुळेंच चंद्रसूर्य आणि अगणित तारे आपल्यापासून अितक्या दूर दूरवरून संचार करीत असतील का?

संध्याकाळ झाली त्यामुळें आम्हांला नाअिलाजानें परतावें लागलें. सरोवरानें

आम्हांला शकुंतलेप्रमाणें पुन्हां येण्याचें आमंत्रण देअून ठेवलेंच. त्यामुळें दुसऱ्या दिवशीं आंघोळीचा कार्यक्रम ठरवून आमची अेक मोठी टोळी निघाली. तेथें पोंचल्यानंतर आमच्या बरोबरच्या लोकांनीं सांगितलें कीं 'गोऱ्यांच्या बोटींग क्लबमुळें या सरोवरांत स्नान करण्याची बंदी आहे.' दिवस अुगवतांच कुमुदानें आपल्या पाकळ्या मिटून घ्याव्यात त्याप्रमाणें माझ्या सगळ्या अुत्साहाची गत झाली. अितक्या मेहनतीनंतर रसपूर्ण सरोवरांत पोहण्याच्या स्वर्गीय आनंदाला मुकणें कुणाला आवडेल? पण आमच्या बरोबरची मंडळी थोडीच सत्याग्रही होती? कायद्याचा अुघड अुघड विरोध करण्याअैवजीं गुपचुप कायदा तोडणेंच त्यांना अधिक पसंत होतें. जेथें गोऱ्यांच्या होड्या फिरकणार नाहींत किंवा त्यांची दृष्टिदेखील पोंचणार नाहीं असा सरोवराचा अेक अेकान्त कोपरा त्यांनीं केव्हांच हेरून ठेवला होता. त्या स्थानीं पोंचल्यावर मला आढळलें कीं त्याची शोभा अितर स्थानांहून कमी नव्हती. अेकांतांत चोरून आंघोळ करण्याचा लाभ घेण्यांत कांहीं वेगळाच रस सुद्धां होता. गिरिधारीला पोहतां येत नव्हतें, त्याचा श्रीगणेशा देखील येथेंच झाला. पाण्यांत तरंगत रहाण्याचा अनुभव जेव्हां पहिल्याप्रथम येतो त्यावेळीं माणसाला जो आनंद होतो त्याला अुपमा द्यायची असेल तर ती अंडें फोडून बाहेर निघालेल्या पक्ष्याच्या आनंदाचीच द्यावी लागेल. दिवस चांगला वर आला तरी गिरिधारी पाण्यांतून बाहेर पडण्याचें नांव काढीना. अर्धा तास अधिक राहूं देण्याविषयीं तो मला अिंग्रजींतून विनवी; आणि तें मानलें नाहीं कीं बंगालीतून विनंति करी. जणूं काय भाषा बदलण्यामुळें विनवणींत अधिक जोर येत असतो. त्याचा विरस कसा करणार? आम्ही मनसोक्त जलविहार केला.

ययातीला सुद्धां जर शेवटीं जीवनाचा आनंद सोडावा लागला; तर मग आमच्या पोहण्याच्या स्वर्गसुखाचा शेवट झाला यांत आश्चर्य तें कसलें? थकलेल्या पण हलक्या शरीरानें आम्ही परत फिरलों. रस्त्यांत अननसाचे मळे लागले. दूरदूरपर्यंत कांटेरी अननसाचीं कारंजीं जमिनींतून अुडत होतीं. अननसाचा अितका मोठा मळा आम्ही पूर्वीं कधींच पाहिला नव्हता. त्यामुळें पोटांत भूक लागलेली असतांना आणि येथें अननसाच्या

प्राप्तीची थोडीसुद्धां आशा नसतांना देखील, बराच वेळपर्यंत आम्ही तेथें अुभे राहिलों.

मार्च १९२७.

# : ६६ : सुवर्ण देशाची माता अैरावती

अिरावती कीं अैरावती? मला वाटतें कीं नदीचें नांव अिरा नांवाच्या गवतावरून अिरावती पडलें असलें पाहिजे. या नदीच्या कांठावरील पौष्टिक गवत खाअून मदोन्मत्त झालेल्या हत्तींना अैरावत म्हणत असतील. अथवा अिंद्राच्या अैरावताप्रमाणें महाकाय आणि गजगतीनें चालणारी ही नदी पाहून अेखाद्या बौद्ध भिक्षूला वाटलें असेल 'चला, हिलाच आपण अैरावती म्हणूं या.'

परंतु अैतिहासिक कल्पना-तरंग चालवीत बसण्याचें काम घरकोंबड्या लोकांचें आहे. भटक्या प्रवाश्याला तें परवडणार नाहीं.

अैरावती जर हिंदुस्थानांत असती तर संस्कृत कवींनीं तिच्यावर अैरावती अितकाच लांब आणि रुंद काव्यप्रवाह वाहवला असता. ब्रह्मदेशांतल्या कवींनीं त्यांच्या या मातेविषयीं असंख्य काव्यें रचलीं असल्यास आपल्याला कसें कळणार? ब्रह्मी नाहीं आपली जन्मभाषा कीं शास्त्रभाषा अथवा राजभाषा. शेजाऱ्याची भाषा शिकून घेण्याकडे आपली प्रवृत्ति असतेच कुठे? बरींच वर्षें परदेशांत राहिलों तर आपल्याला तेथली भाषा बोलतां येते, परंतु त्या भाषेंतील साहित्याचा आस्वाद घेता येण्याअितकी मेहनत आपण कधींच करीत नाहीं. अेखाद्या अिंग्रजानें बर्मी भाषा शिकून बर्मी कवितेचा अिंग्रजींत अनुवाद करून दिला तरच कदाचित आपण ती वाचूं!

कोणत्याहि देशाला अैरावतीसारख्या नदीबद्दल गर्व व कृतज्ञता वाटावी. ब्रह्मदेशांत अुत्तरेकडे थेट मंडालेपर्यंत आम्ही आगगाडीनें प्रवास केला होता. तेथून जवळच अमरापुरा येथें जाअून आम्ही अैरावतीचें प्रथम दर्शन घेतलें.

आणि नदींत स्नानही केलें. अमरापुराजवळ प्रचंड बुद्ध-मूर्ति आहेत याचा आम्हांला सुगावा लागला असता तर बुद्ध भगवानांच्या दर्शनानेंच अैरावतीच्या विहाराला आम्ही प्रारंभ केला असता.

येथें सुद्धां नदीचें पात्र चांगलें रुंद आहे. नदीचा प्रवाह धीरोदात्त गजगतीनें वहात असतो. अशा नदीच्या पृष्ठभागावरून होडींत अथवा 'वाफर' (स्टीम लॉंच) मध्यें बसून प्रवास करणें ही जीवनांतील अेक सुवर्णसंधिच होय.

अमरापुराहून मंडालेला परत जाअून आम्ही 'वाफर' मधें बसलों. समुद्रावरचा प्रवास वेगळा आणि नदीवरचा प्रवास वेगळा. नदींत लाटा नसतात. दोन बाजूंचे कांठ आपल्याला साथ देत असतात. आणि त्यामुळें आपण 'जीवन' नांव धारण करणाऱ्या पण प्राणघातक अशा महाभूताच्या तावडींत सांपडलेलों आहोंत असें आपल्याला वाटत नाहीं. नदीवरील प्रवास पृथ्वीच्या गोळयाच्या, हवेंतून चाललेल्या सनातन प्रवासाअितकाच शांत आणि आह्लादक असतो. आज या अैरावतीवरील प्रवासाचें स्मरण करतों तेंव्हां द्रौपदी प्रमाणें मानिनी नर्मदेवरील चाणोद-कर्नाळीकडचा प्रवास, सीतेसारख्या तापी वरील सागर-संगमापर्यंतचा प्रवास, काशी-तल-वाहिनी भारतमाता गंगेवरचा प्रवास, मथुरा-वृंदावनचा कृष्णसखी कालिंदीवरील प्रवास, काश्मीरच्या नंदनवनांत केलेला पार्वती-वितस्तेवरील प्रवास, आणि वनश्रीचें माहेरघर असलेल्या गोमांतक प्रदेशांतील अथवा केरळमधील जलप्रवास सगळेंच अेकदम आठवूं लागतें. त्यांतहि अगदीं तृप्त व्हावें अितका लांब प्रवास तर वितस्ता व अैरावतीवरचाच. सिंधु, गंगा, ब्रह्मपुत्र आणि नर्मदा यांच्या तोलाची ही नदी आहे. अैरावतीचें पात्र व प्रवाह पाहिल्याबरोबर अेखाद्या महान साम्राज्यावर राज्य करणारी ही कुणी सम्राज्ञी तर नसेल अशी भावना मनांत अुत्पन्न होते. आराकान व पेगुयोमा तिचें रक्षण करतात खरे, पण तिचा मान राखण्यासाठीं ते अदबीनें दूर अुभे राहिले आहेत.

आमचें जहाज निघालें. कामधेनूचीं वासरें सांज पडतांच आअीकडे धांवत यावींत त्याप्रमाणें आसपासच्या विस्तीर्ण प्रदेशांतील शेतकरी घोळक्या घोळक्यांनीं अैरावतीच्या कांठीं गोळा होतात. आमचें जहाज म्हणजे अेक मोठी चालतीफिरती गुजरीच होती. अेखादें लहान किंवा मोठें बंदर आलें कीं

आमचें जहाज आमंत्रण 'वाजवी', बस. मुंग्यांचें पेंव फुटावें त्याप्रमाणें लोक धावत येत. खाण्याचे पदार्थ, कपडे, वेताचीं भांडीं, कारीगरीच्या वस्तु—तऱ्हतऱ्हेच्या पदार्थांचें जहाजावर प्रदर्शन मांडलें जातें. जहाजांतसुद्धां कित्येक व्यापारी आपला माल घेऊन तयार बसलेलेच असतात. पक्ष्यांच्या किलबिलाटाप्रमाणें देवाणघेवाणाचा घोंगाटा सुरू होअी. आपल्याला भाषा येत नसली तर घोंगाटाचा कंटाळा येतो. येथें लोक भांडले, तंडले किंवा रडले तरी आपल्याला सगळें सारखेंच. जणूं काय अेखादें मोठें नाटकच खेळलें जात आहे. विनिमय पुरा झाला कीं जहाज निघे. व्यायच्या वेताला आलेल्या म्हशीप्रमाणें आमचें जहाज डुलत डुलत चाले. जहाजाच्या अेका हलकट गोऱ्या अमलदाराबरोबर आमचें बिनसल्यामुळें आमच्या प्रवासाची सुरुवात गोड्या पाण्यांतहि खारट बनली होती. परंतु मंद मंद वाऱ्यानें तें सारें अुडवून नेलें आणि आम्ही निसर्गाप्रमाणेंच प्रसन्न झालों.

पुन्हां अेक बंदर आलें. येथें व्यापार कांहीं विशेष चालत असावा. लहान मोठ्या असंख्य होड्यांचा अेक कळप नदीच्या कांठीं चिखलांत लोळणफुगडी घेत होता. ढोराच्या पाठीवर माशा घोंगावतात त्याप्रमाणें खेडवळ पोरें या होड्यांमधें अुड्या मारीत व खेळत होतीं. ब्रह्मी लोकांना गोंदून घेण्याची फार हौस दिसते. त्यांच्या केतकी वर्णाच्या त्वचेवर लाल, हिरव्या रंगाचें गोंदकाम दिसतेंहि चांगलें खुलून. आपल्याकडील खेडेगांवांत अशी समजूत आहे कीं या जन्मीं शरीरावर दागिने गोंदवून घेतले तर पुढच्या जन्मीं सोन्याचे दागिने मिळतात आणि कपाळावर चांदला किंवा चंद्रकोर गोंदवल्यानें अखंड सौभाग्य प्राप्त होतें. येथल्या लोकांमधें देखील अशीच कांहींतरी समजूत प्रचलित असली पाहिजे. कारण बरेचसे स्थानिक खेडवळ लोक कमरेपासून ते गुडघ्यापर्यंत सगळ्या भागावर वेलबुट्टीदार लुंगी गोंदवून घेतात. त्यामुळें नदींत अुघड्या शरीरानें आंघोळीसाठीं अुतरलेलीं कित्येक माणसें कपड्यांवांचून देखील नग्न वाटत नव्हतीं. जहाज अधिक वेळ थांबणार असेल तेव्हां आम्ही किनाऱ्यावर जाअून आसपासच्या गांवांत फिरून येत असूं. ब्रह्मी घरांचा आणि गल्ल्यांचा आमच्या डोळ्यांना सराव झाला होता. त्यांची भाषा आम्हांला येत नव्हती, तरीसुद्धां त्या निर्व्याज गांवकऱ्यांचें जीवन ओळखीचेंसेंच वाटे. मुत्सद्दी व व्यापारी लोकांचे रागद्वेष सोडून दिले आणि धार्मिक अधार्मिक लोकांची कल्पनासृष्टि बाजूला

ठेवली तर मनुष्यजात सगळीकडे सारखीच आहे. माझी समजूत आहे कीं दुनियेभरचीं सगळी गांवें रूपानें आणि स्वभावानें सारखींच असलीं पाहिजेत.

मधून मधून येणारे स्तूप आणि मंदिरें जणूं काय प्रवाहाशीं ताल धरीत असावींत तशीं भासत होतीं. अुंच टेकड्या व शिखरें मनुष्यजातीला नेहमींच प्रिय असतात. त्यांत पुन्हां नाअील नदीप्रमाणें अैरावती जेव्हां चारहि दिशांना आपल्या कृपेचा अुत्पात पसरवते तेव्हां हीं अुंच अुंच स्थानेंच माणसाचें आश्रयस्थान होअून बसतात. त्यांच्याविषयींची कृतज्ञता माणसानें मंदिरें बांधून दाखवली नाहीं, तर अन्य कोणत्या रीतीनें ती व्यक्त व्हावी ? निसर्गानें आपल्याला शिकवलें आहे कीं हिरव्या पानांमधें पिवळीं परिपक्व फळें आपली सगळी खुमारी दाखवूं शकतात. या धड्यावरून बोध घेअून येथल्या लोकांनीं हिरव्या झाडांमधें मंदिरें बांधून त्यांच्यावर आकाशाच्या अनंततेकडे अंगुलि-निर्देश करणारे सोन्याचे कळस अुभारले आहेत. नैसर्गिक शोभेंत मनुष्य सुधारणा किंवा वृद्धि करूं शकत नाहीं असें मानणाऱ्यांनीं हे कळस अेकदां अवश्य पहावेत.

दुपारची वेळ होती. अिंग्रजी जाणणाऱ्या अेका ब्रह्मी कॉलेज विद्यार्थ्याशीं आम्ही गोष्टी करीत होतों. अितक्यांत अेक नीरव साद कानीं पडला. छिंदवीन नदी आपला करभार घेअून अैरावतीला भेटायला आली होती. काय तो दोघींचा प्रेम-संगम ! रामदास आणि तुकाराम अेकमेकांना भेटले असावेत अथवा शतरंज खेळत बसलेल्या कालिदासाला भवभूति आपलें ‘ अुत्तर-राम-चरित ’ अैकवीत असावा तसें तें दृश्य दिसत होतें.

कल्पनेनें तर छिंदवीनच्या अज्ञात प्रदेशांत शान राज्यापर्यंत मी जाअून सुद्धां आलों. हातांत तीरकमठा अथवा कुऱ्हाड घेअून फिरणारे निश्चिंत आणि निर्भय असे कित्येक वनवासी मला तेथें भेटले. संशय आला तर जीव घेणाऱ्या आणि विश्वास बसला तर जिवाला जीव देणाऱ्या त्या निसर्गाच्या लेकरांचें दर्शन सुधारणेचा चिखल धुअून काढणाऱ्या मंगल स्नानाप्रमाणें होतें. जहाजावरील पक्षी कितीहि अुडला तरी अखेरीस जहाजावरच परत येतो, त्याप्रमाणें कल्पनासुद्धां जंगलाचा प्रवास करून परत जहाजावर आली. कारण आम्ही पकोकु बंदरावर येअून पोंचलों होतों.

पकोकु जवळील चिखलानें गढूळ झालेल्या नदींत आंघोळ करून आणि ब्रह्मी पाहुणचाराचा स्वीकार करून आम्ही पुन्हां जहाजावर स्वार झालों आणि रॉकेल तेलाच्या विहिरी पहाण्यासाठीं येननजांवला पोंचलों. येथें अमेरिकन मजुरांचेंच राज्य चालतें असें म्हणतां येअील. आसपास वनश्री अशी जवळ जवळ नाहींच. येथें अेकीकडे हें घासलेटच्या विहिरींचें आधुनिक क्षेत्र आणि दुसरीकडे टेकडीवर वसलेल्या लहानश्या प्राचीन बौद्ध मंदिराचें तीर्थक्षेत्र हीं दोन्ही पाहून मनांत कितीतरी विचार स्फुरले. मंदिराच्या कारागिरींत हत्तीचें तोंड असलेला अेक पक्षी कोरलेला होता. दुसरे देखील अनेक संकर येथें आढळले. जवळच्या मठांत कित्येक बौद्ध साधु हेल काढून संध्याकाळची प्रार्थना किंवा असलाच कांहींतरी विधि करीत होते. अैरावतीला जणूं काय कसल्याच गोष्टीविषयीं पक्षपात नसावा त्याप्रमाणें, घासलेटच्या विहिरींच्या पंपांचा छाती दडपून टाकणारा आवाज देखील ती आपल्या हृदयावर वहन करते आणि ‘ अनिचा व्रत संखारा अुप्पादव्यय-धम्मिणो ’ चा श्रांत अथवा चिरंतन संदेश देखील वहन करते. अमेरिकेचें सामर्थ्य जरी अजोड असलें तरी तें अेक बालक राष्ट्रच नाहीं का? जीवनाचें रहस्य अेवढ्यांत त्याच्या कसें हातीं लागणार? त्याला आपलें नदीच्या कांठीं तीन तीन हजार फूट खोल विहिरी खोदून घासलेट वर काढण्याचेंच सुणारच. जगांतले सर्व सृष्ट पदार्थ अुत्पन्न होतात व नाश पावतात, त्यांतलें सर्वच नश्वर आणि व्यर्थ आहे, असार आहे; सार कशांत असेल तर तें यांतून अंग काढून घेअून निर्वाण प्राप्त करण्यांतच आहे, ही गोष्ट कोणता अमेरिकन मान्य करील? पण अैरावती नदी नव्या विषयींच्या अुत्साहामुळें, ज्ञानाकडे पाठ फिरवीत नाहीं आणि ज्ञानाच्या भारानें अुत्साह हरवून बसत नाहीं. तिला तर महासागरांत विलीन व्हायचें आहे आणि विलीन होअून देखील विलीन झाल्याचा आनंद अखंड जागृत आणि वाहता ठेवायचा आहे!

येननजांवहून आम्ही प्रोमपर्यंत गेलों आणि तेथून आगगाडीनें रंगूनला जाण्यासाठीं अैरावतीचा निरोप घेतला. येथून पुढें जाअून ही महानदी अनेक मुखांनीं समुद्राला मिळते. अैरावती खरोखरच सुवर्णदेशाची समृद्धि-शालिनी माता आहे.

मार्च, १९२७

# : ६७ : समुद्राच्या सहवासांत

( आफ्रिकेला जातांना )

मुंबअीहून मार्मागोव्याला जाअीपर्यंत नजरेला हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याची सोबत होती. आअी दृष्टिआड होत नाहीं तोंवर आपण आअीपाशींच आहोंत असा ज्याप्रमाणें बालकाला विश्वास असतो, त्याप्रमाणेंच किनारा दिसत होता तोंवर आपण हिंदुस्थान सोडलें आहे असें वाटत नव्हतें. मार्मागोवा सोडलें आणि आमच्या 'कंपाला' आगबोटीनें स्वदेशाशीं काटकोन करून सरळ भरसमुद्रांत प्रवेश केला. पहातां पहातां हिंदुस्थानचा किनारा अदृश्य झाला आणि चहुंकडे फक्त पाणीच पाणी पसरलें. रात्र पडली आणि आकाशांतली वस्ती वाढली. त्यामुळें अेकाकीपणाची भावना बरीच कमी झाली. पण जसजसे आम्ही भूमध्य रेषेकडे जाअूं लागलों तसतशी हवेची आणि ढगांची चंचलता वाढली. मोसम चांगला असल्यामुळें समुद्र शांत होता. लाटा मंदमंद स्मित करून नाहींश्या होत होत्या. कित्येक लाटा कच्च्या शिंकेप्रमाणें अुठतां अुठतांच विरून जात होत्या. समुद्राचा रंग कधीं निळया शाअीअितका निळसर होअी, कधीं काळाकुट्ट; आणि जहाज पाणी कापत जात असतांना दोन बाजूंना त्याचा जो पांढरा फेस पसरतो, त्याचें अनेक तऱ्हेचें अबरी नक्षीकाम तयार होअी. निळया रंगाबरोबर त्याची अेके तऱ्हेची शोभा, तर काळयाबरोबर दुसऱ्याच प्रकारची. प्रथम प्रथम समुद्राच्या चेहऱ्यावर लाटांशिवाय आणखी, चामड्यावर असतो तसा सुरकुत्यांचा दाणा दिसत होता. कधीं कधीं त्या सगळया सुरकुत्या नाहींश्या होअून पाणी चकाकणाऱ्या भांड्यांप्रमाणें गुळगुळीत दिसूं लागे. जहाज हळूं हळूं डुलत जात होतें. जहाज आकारानें लहान असतें तेव्हां अधिक डोलतें. मोठीं जहाजें आपली धीरगति सहजासहजीं सोडत नाहींत. लाटा समोरून येअूं लागल्या कीं जहाज नेहमींच्या डोलण्याशिवाय आणखी, घोडेस्वाराप्रमाणें वर खालीं डोलूं लागतें. अशा डोलण्याला अिंग्रजींत 'पिचिंग' म्हणतात. पिचिंग फार वेळ चाललें तर माणसाला तें आवडत नाहीं, सोसतहि

नाहीं. पण तें बंद कसें काय पाडणार ? झोके घेऊन कंटाळा आला तर झोपाळा थांबवून खालीं अुतरतां येतें. पण येथें तर अेकदां जहाजांत बसलें कीं आठ दिवसपर्यंत त्याचें डोलणें आणि हिंदकळणें सहन करण्यावांचून दुसरा मार्गच नसतो. अेखादे वेळीं, या दोन्ही गतींच्या मिश्रणानें चक्कर तर येणार नाहीं, अशी शंका मनांत डोकावे. आणि मग चक्कर येण्याची शंका मनांत आल्यामुळें देखील चक्कर येअू शकेल अशी भीति मनांत घर करून बसे. जेवतांना अगदीं चव घेअून जेवत असलों तरी खाल्लेलें पोटांत टिकेल कीं नाहीं अशी शंका मनांत अुरेच. या शंकेचा नायनाट करणें तितकेसें सोपें नसतें. कसेंहि असो, आम्ही आमचे आठहि दिवस कसल्याहि अपघाताशिवाय अगदीं आनंदांत घालवले. शेवटले चार दिवस जरा जड जातील अशी भीति लोकांनीं घातली होती. परंतु तसलें कांहींच झालें नाहीं. ज्या दिवशीं आम्ही भूमध्य रेषा ओलांडली त्या दिवशीं थोडा वेळ जरा सोसाट्याचा वारा सुटला होता. परंतु त्याचा आमच्यावर तसा कांहींच प्रतिकूल परिणाम झाला नाहीं.

चहुंकडे जेव्हां पाणीच पाणी असतें तेव्हां घटकाभर मनाला गंमत वाटतें. नंतर सबंध वातावरण गंभीर बनत जातें. ही गंभीरता ओसरल्यानंतर डोळे कंटाळल्यागत होतात. आपली सबंध सृष्टि या जहाजापुरतीच मर्यादित. विशाल समुद्रापुढें ती किती लहान आणि तुच्छ ! समुद्राच्या दयेवर जगणारी. आणि बाकीचें सगळें पाणी, पाणी व पाणी. अितक्या या पाण्याचा अर्थ तरी काय ? जमिनीवर कितीहि मोठा भूखंड आपण पहात असलों तरी अेवढी ही जमीन कशासाठीं अुत्पन्न केली असेल असा विचार मनांत येत नाहीं. विशाल आणि अनंत आकाश पाहूनसुद्धां असें वाटत नाहीं कीं अेवढें हें आकाश कशासाठीं निर्मिलें गेलें असेल ? परंतु समुद्राचें पाणी पाहून हा विचार हटकून मनांत येतो. जमिनीला सरावलेले डोळे पाण्याचा विस्तार अखंड पहावा लागल्यामुळें कंटाळून जातात आणि शेवटीं थकून क्षितिजावरील ढगाकडे पाहून विसावा घेतात. परंतु पुष्कळदां हे ढग आकारविहीन व अर्थशून्य असतात. आकाश जेव्हां मेघाच्छादित बनतें तेव्हां तर त्याची खिन्नता अगदीं असह्य होअून जाते. अीश्वराच्या कृपेनें या कंटाळयाचा सुद्धां शेवटीं अंत होतो आणि डोळे अुघडे असूनहि मन अंतर्मुख होअून खोल विचारांत गढून जातें.

रात्रीं आणि विशेषतः भल्या पहाटे ताऱ्यांची शोभा पहाण्यासारखी होती. परंतु 'सगळें आकाश तुम्हांला अेका वेळीं पाहूं देणारच नाहीं.' असें म्हणून ढग लहान मुलांप्रमाणें आकाशाच्या चेहऱ्यावर आपले हात फिरवीत होते. त्यांच्या दयेनें ज्या वेळीं जितका भाग दृष्टीस पडेल तितकाच वाचून घेणें आमच्या हातीं अुरे. गुरुवारची सकाळ असेल. जहाज सरळ चालत होतें. आणि त्याच्या मुख्य डोलकाठीमागें अगदीं मागच्या बाजूला शर्मिष्ठा होती. खांबा-आड भाद्रपदाचा चौकोन कसाबसा बसवला जात होता. अुतरणाऱ्या ध्रुवाच्या शेजारीं देवयानी अुगवत होती. पावणे पांच वाजले आणि त्रिकांड श्रवण माथ्यावरील खस्वतिकाच्या स्थानीं विराजमान झाला. हंस, अभिजित आणि पारिजात मिळून अेक सुंदर चांदवा तयार झाला होता. डाव्या बाजूला गुरु, चंद्र आणि शुक्र अेका रेषेंत आलेले होते. चंद्राचें चांदणें अितकें पुसट होतें कीं त्याला ताकाची अुपमा सुद्धां देता येणार नाहीं. समोर नजर टाकली तों डाव्या बाजूला वृश्चिक आपल्या अनुराधा, ज्येष्ठा व मूळ यांच्यासह लटकत होता, तर अुजव्या बाजूला स्वातीचा तारा मावळण्याच्या बेतात होता. बिचारा ध्रुवमत्स्य तर जवळ जवळ क्षितिजांत मिसळून गेला होता. दुसरें दिवशीं चंद्रानें शुक्राशीं दोस्ती केली. रात्रीं सप्तर्षींचें दर्शन घेअून आम्ही झोंपीं जात असूं. त्यावेळीं पुनर्वसूची होडी आमच्या बरोबर दक्षिणेच्या प्रवासाला निघालेली पाहून खूप आनंद होअी. पुनर्वसूच्या होडींत बसण्याचे चित्रेचे मनोरथ अजून अपूर्णच राहिले आहेत. कदाचित् मघा नक्षत्राचा हेवा तिच्या आड येत असेल! शनिवारीं चंद्र आणि शुक्र यांची शोभिवंत युति पहायला मिळाली. शेवटीं शेवटीं त्या दोघांनींहि निळसर रंग धारण केला होता. भाद्रपदांचें रुंद नरसाळें येथें बरेंच वर चढलेलें दिसत होतें.

कालपासून ध्रुव अदृश्य झाला आहे.

सकाळीं जेव्हां अुषेच्या चेहऱ्यावर स्वागताचें स्मित अुमटतें तेव्हां क्षितिजा-पुढें रुप्यासारखी चकाकणारी अेक किनार तयार होते. नंतर समुद्र प्रसन्नतेनें हसूं लागतो आणि अुषेला प्रकट होण्यासाठीं गुलाबी अवकाश देतो.

शनिवारीं समोरून अेक जहाज येतांना दिसलें. दिव्यांचा प्रकाश मिचकावून त्यानें आमच्या जहाजाला अभिवादन केलें. आमच्या जहाजानेंसुद्धां

अुत्तरादाखल अभिवादन केलें असेलच. हीं जहाजें चांगलीं जवळ आलीं असतीं तर दोघांनींहि हंबरडे फोडले असते. परंतु जेव्हां आवाज पोचण्याची शक्यता नसते तेव्हां प्रकाशाच्या द्वाराच गोष्टी कराव्या लागतात. चार दिवसांच्या अेकान्तवासानंतर आमच्या जहाजासारखीच दुसरी अेक सृष्टि जीवनाच्या पटावर विहरताना पाहून खूपच आनंद झाला. आमच्या जहाजावरील लोक आफ्रिकेचीं स्वप्नें पहात होते. समोरच्या जहाजावरील लोकांना हिंदुस्थानचीं स्वप्नें पडत असतील. प्रत्येक जहाजावरील अुतारूंच्या मनोव्यापारांची माहिती गोळा केली तर काय काय गंमती आढळून येतील!

जहाजावरील अुतारूंच्या तीन जाति असतात. प्रतिष्ठेची अस्पृश्यता भोगणारे ते पहिल्या वर्गाचे अुतारू. त्यांना विशेष सुखसोयीं मिळत असतात त्याचें कांहीं नाहीं, परंतु त्यांच्या राज्यांत दुसऱ्या कुणालाहि प्रवेश नसतो हा त्यांचा मोठेपणा. वरच्या डेकचा बराचसा भाग त्यांच्या आरामासाठीं व खेळांसाठीं राखून ठेवलेला असतो. दुसऱ्या वर्गाच्या अुतारूंसाठींसुद्धां चांगल्या सुखसोयी असतात. तिसऱ्या वर्गाच्या अुतारूंची माणसांत गणनाच होत नसते. त्यांची खिल्लारें वाटेल तिकडे पडलेलीं असतात. आठ दिवसपर्यंत माणसाला पशु-जीवन जगावें लागावें ही कांहीं लहानसान गैरसोय नव्हे.

आणि आतां दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांमधें अिन्टरचा अेक नवा वर्ग काढण्यांत आला आहे. पशु आणि मनुष्य यांच्यामधला तो वानर-वर्ग म्हणता येअील. त्यांत कितीहि गर्दी असली तरी कमींत कमीं माणसासारखें झोपतां तरी येतें.

आम्ही जहाजावर असल्याचें कित्येक लोकांना कळल्यामुळें अनेक लोक आमच्याशीं वार्तालाप करण्यासाठीं येत. त्यांतहि आम्ही सकाळ संध्याकाळ प्रार्थना करतों ही बातमी जेव्हां जहाजाच्या खलाश्यांपर्यंत पोंचली तेव्हां त्यांनीं आम्हांला खालच्या डेकवर सायंकाळच्या प्रार्थनेसाठीं बोलावलें. जवळ जवळ सगळे खलाशी सुरत जिल्ह्याचे होते. मोठे भजन-प्रिय, अनेक भजनें जाणणारे, आणि रागदारींत गाअूं शकणारे. त्यांच्या भजनमंडळीचा थाट जमे, तेव्हां सगळ्या दिवसाचा थकवा आणि जन्मभरच्या चिंता यांचा त्यांना विसर पडे. निळ्या रंगाचा पोषाख परिधान करून संबंध

दिवस यंत्राप्रमाणें काम करणारे लोक ते हेच हें ठाऊक असूनहि त्यावेळीं खरें वाटत नाहीं. त्या लोकांपुढें मीं अनेक प्रवचनें केलीं. त्यांचें जीवन ही देखील अेक साधनाच कशी आहे तें त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मीं असेंहि सांगितलें कीं जमिनीवर जशा भिंती अुभारतां येतात तशा समुद्रावर येत नाहींत. म्हणून खलाश्यांनीं जातीपातीचीं कुंपणें रचूं नयेत. त्यांनीं आपलें हृदय सागराप्रमाणेंच विशाल केलें पाहिजे.

आम्ही लोक अशा प्रकारें भजनांत तल्लीन होअून रहात असतांनाच जहाजावरील अनेक गोवानीज लोकांनीं अेका रात्रीं स्त्री-पुरुषांचा अेक नाच करण्याचें ठरवलें. त्यासाठीं जी वर्गणी गोळा करण्यांत आलीं त्यांतून आम्हांला वगळण्यांत आलें नाहीं. त्यामुळें आम्ही त्या नाचाचे हक्क-पूर्वक प्रेक्षक बनलों !

गोव्याच्या खिस्ती लोकांत युरेशियन जवळजवळ नसल्यासारखेच आहेत. धर्मानें खिस्ती परंतु रक्तानें शुद्ध हिंदी अशा लोकांनीं पश्चिमेचे जे आचार विचार आपलेसे केले आहेत त्यांचा परिणाम पहाण्यासारखा असतो. कित्येक जोड्या संयमपूर्वक नृत्यकलेचा आनंद मिळवीत होत्या. कित्येक जोड्या जणूं काय अेखाद्या सामाजिक विधींतून पार पडत असाव्यात तशा गंभीर, अलिप्त आणि यांत्रिक पद्धतीनें नाचत होत्या. तर कित्येक जोड्या नृत्याचे नियम मान्य करतील अितकें स्वातंत्र्य घेअून नृत्यांत आणि अेकमेकांत लीन होअून जात होत्या. अेक दोन जोड्या वयाच्या आणि अुंचीच्या दृष्टीनें अगदींच विजोड होत्या. त्यांना पाहून अितकी ही विटंबना सहन करण्याची त्यांच्यावर कशी काय पाळी आली असेंच राहून राहून वाटत होतें. अरुंद जागेंत अितक्या सगळ्या लोकांचें नृत्य कसेंबसें पुरें झालें. शेवटपर्यंत जागत बसण्याची आमची तयारी नसल्यामुळें अकरा वाजण्याच्या पूर्वींच आम्ही झोपीं गेलों.

आमचें जहाज पश्चिमेकडे, म्हणजेच पृथ्वीच्या दैनंदिन गतीच्या विरुद्ध दिशेनें जात असल्यामुळें आम्हांला जवळ जवळ दररोज घड्याळाचे कांटे फिरवावे लागत. जहाजाकडून सूचना मिळे कीं 'मध्यरात्रीं अर्धा तास कमी करा' अथवा 'अेक तास कमी करा. सृष्टीचा नियम लक्षांत घेअून आम्ही अितकें नुकसान सोसायला तयार होत असूं. आफ्रिकेला पोंचेपर्यंत आम्ही

अेकंदर अडीच तास गमावून बसलों. (बेल्जियन कांगोला जातांना आणखी अेका तासाचा बळी द्यावा लागला होता.)

भूगोलाचें विशेष ज्ञान नसलेल्या वाचकांसाठीं अितकें सांगणें आवश्यक आहे कीं रेखांशाच्या दर १५ डिग्रीनंतर अेक तास वाढवावा किंवा कमी करावा लागतो. आणि प्रशांत महासागरांत आशिया व अमेरिका यांच्यामधें जहाजें जेव्हां १८० रेखांशावर असतात तेव्हां त्यांना येतांना किंवा जातांना अेक संपूर्ण दिवस वाढवावा किंवा कमी करावा लागतो. या रेखांशाला अिंग्रजींत 'डेट लाअीन' म्हणतात. ज्याप्रमाणें आपल्याकडे अधिक मास येतो, त्याप्रमाणें 'डेट लाअीन' वरून गेल्यानें अेक अधिक वार येतो आणि आल्यानें अेका वाराचा क्षय होतो.

आठ दिवस झाले, नाहीं वर्तमानपत्र, नाहींत पत्रें, नाहींत भेटायला येणारी मंडळी आणि नाहीं अेखादें शहर किंवा गांव. अहो, शपथेला अेखादा डोंगर किंवा बेट सुद्धां नाहीं! अशा स्थितींत तासन् तास अन् दिवसामागून दिवस जेव्हां चुपचाप निघून जात असतात तेव्हां तारखेचें सुद्धां भान रहात नाहीं. आमच्या जहाजाच्या अुंचीवरून हिशोब काढून आमच्या आसपास क्षितिजापर्यंत किती समुद्र पसरलेला आहे त्याची मी जहाजाच्या अधिकाऱ्यांकडे चौकशी केली, तेव्हां कळलें कीं आमचे डोळे २५० चौरस मैलांचा समुद्र अेका फेऱ्यांत पिअूं शकत होते.

किती गहन ती शांति! आणि ती सुद्धां डोलणारी, हिंदकळणारी, वाहणारी आणि तरीहि स्थिर अशी शांति; आकाशाच्या आशीर्वादाखालीं अुचंबळणारी. Swelling and rolling peace, abiding and abounding. कसें कोण जाणें, पण ही शांति अनुभवीत असतांना माझ्या हृदयांत मानवप्रेम अुचंबळून येत होतें आणि अखिल मानव जातीला स्वस्ति, स्वस्ति, स्वस्ति म्हणत होतें. मानव जातीचा अितिहास अजूनहि अेकंदरींत पहातां भूषणास्पद बनलेला नाहीं. याच समुद्रानें कितीतरी अन्याय आणि अत्याचार पाहिले असतील, कितीतरी गुलामांचे कढत निश्वास येथल्या हवेंत मिसळले असतील आणि कितीतरी प्रार्थना सूर्य, चंद्र, ताऱ्यांपर्यंत पोहोंचूनहि विफल झाल्या असतील. आणि अितकें असूनहि जर मनुष्य-रक्तानें समुद्राचें पाणी लाल

झालेलें नाहीं, दुःखी जीवांच्या निश्वासांनीं येथली हवा कलुषित झालेली नाहीं आणि लोकांच्या निराशेमुळें आकाशांतल्या ज्योति मंदावल्या नाहींत, तर मग मनुष्यजातीचा तटपुंजा अितिहास वाचून माझें मानवप्रेम काय म्हणून संकुचित किंवा फिकें व्हावें ? जर माझे असंख्य दोष विसरून जाअून मी माझ्यावर प्रेम करूं शकतों आणि स्वतःविषयीं अनेक आशांचे मनोरे बांधूं शकतों, तर माझींच अनंत प्रतिबिंबें मिळून बनलेल्या मानवजातीला माझें प्रेम कमी काय म्हणून मिळावें !

अशा भावनेनें आफ्रिकेच्या भूमीवर विषम रीतीनें खेळलें जाणारें मनुष्य-जातीच्या त्रिखंड सहकाराचें नाटक पहाण्यासाठीं आम्ही मोम्बासाला पोंचलों.

या आठ दिवसांत भरपूर वाचन होअील, भरपूर लिहून होअील अशी जी आशा मनांत बाळगली होती ती सफळ झाली नाहीं. परंतु हे आठ दिवस जीवनाच्या दर्शनानें, चिंतनानें आणि मननानें परिपूर्ण भरलेले होते.

मे १९५०

# : ६८ : रेखोल्लंघन

भूमध्य-रेषा (equator) पृथ्वीची कटि-मेखला आहे. सिलोनच्या दक्षिणेस अेकदां पोंचलों असतां येथवर येअूनहि भूमध्य-रेषेपर्यन्त पोंचूं शकलों नाहीं या विचारानें मन किती अस्वस्थ झालें होतें ! सिलोनच्या दक्षिणेस गाल, देवेन्द्र व मातारापर्यंत जाअूनहि सहाव्या अक्षांशाहून अधिक दक्षिणेस जाअूं शकलों नाहीं. कन्याकुमारीला गेलों तेव्हां तर जेमतेम आठव्या अंशापर्यंतच पोंचलों होतों. चि. सतीश सिंगापुरला होता तेव्हां अेकदां तेथें जाण्याची अिच्छा झाली होती—त्याला भेटण्यासाठीं खास नव्हे, तर भूमध्य-रेषा ओलांडतां येअील या लोभानें. परंतु जेव्हां नकाशांत पाहिलें कीं सिंगापुर देखील भूमध्यरेषेच्या अलीकडेच आहे तेव्हां तो अुत्साह राहिला नाहीं.

परंतु भूमध्य-रेषेंत असें काय आहे? जमिनीवर किंवा पाण्यावर पांढरी, काळी किंवा पिवळी रेघ देखील ओढलेली नाहीं. तरीसुद्धां भूमध्य-रेषेचा प्रदेश काव्यमय आहे यांत शंका नाहीं.

या प्रदेशाचें स्मरण करतों तेव्हां मला शांतादुर्गा व अर्धनारी नटेश्वर यांचें स्मरण होतें. शांतादुर्गा अेकीकडे शुभंकरी शांता आहे तर दुसरीकडे भयंकरी दुर्गा. महादेवाचेंहि तसेंच आहे. त्यांचें दक्षिण मुख सौम्य शिव आहे आणि वाम मुख अुग्र रुद्र आहे. अर्धनारी नटेश्वर अेकीकडे स्त्रीरूप आहेत तर दुसरीकडे पुरुषरूप. आपल्या समन्वयवादी पूर्वजांनीं हरि–हरेश्वराची कल्पना देखील अशाच प्रकारें केली आहे. शिव आणि विष्णु दोघे मिळून हरि–हरेश्वर बनले आहेत.

भूमध्य–रेषेवर अशाच प्रकारें परस्पर विरोधी ॠतूंचें मीलन आढळतें. अुत्तर गोलार्धांत जेव्हां अुन्हाळा असतो तेव्हां दक्षिण गोलार्धांत हिंवाळा. अेकांत जेव्हां वसंत असतो तेव्हां दुसऱ्यांत शरद. भूमध्य–रेषा अेक असा प्रदेश आहे कीं जेथें अुन्हाळा व हिंवाळा हस्तांदोलन करूं शकतात. आणि प्रौढ शरद् सुद्धां बाल वसंताशीं खेळूं शकतो.

अशा ठिकाणीं जर अखंड शांतिच नांदत राहिली तर तेथलें जीवन अळणी, मिळमिळीत बनून जाअील! खेळकर निसर्गाला हें कसें काय सहन व्हावें? गंगा–यमुनेच्या धवल–श्यामल पाण्याच्या संगमानें सुद्धां अविरत नाचत रहावें, आणि अुत्तर दक्षिणेच्या मीलनानें नृत्य करूं नये, हें कसें काय चालेल?

आज भूमध्य-रेषेवर आलों आहोंत. येथें वाऱ्याचें अखंड नर्तन चालू आहे. चंचलता जर कुठें स्थिर झाली असेल तर ती येथेंच. येथें प्रकृति अेका हातानें अुन्हाळयाला थोपटीत असते तर दुसरा हात हिंवाळयाच्या पाठीवर फिरवीत असते.

भूमध्य-रेषा म्हणजे तराजूंत घालून तोललेला पक्षपात-रहित न्याय. अुत्तर ध्रुव दिसावा आणि दक्षिण ध्रुव दृष्टीस पडूं नये, असें येथें चालणार नाहीं. येथल्या आकाशांत मृग नक्षत्राच्या पोटांत घुसलेला बाण अिकडें किंवा तिकडें ढळूं शकत नाहीं. सरळ पूर्वेकडे अुगवून खस्वस्तिकाला

( zenith ) स्पर्श करून तो पश्चिमेकडे मावळतो. हाच अेक असा धन्य प्रदेश आहे जेथें खस्वस्तिक विषुववृत्तावर विराजमान होअू शकतें. ज्याप्रमाणें जमिनीवर भूमध्य-रेषा असते, त्याचप्रमाणें आकाशांत विषुववृत्त ( celestial euqator ) असतें. अितकें लिहीत आहे अितक्यांत आमचें रंगित अभिनंदन करण्यासाठीं अेक अिन्द्रधनुष्य समोर अुजवीकडे प्रकट झालें आहे. आतां तृप्ति झाली. परंतु सगळया मानव-तृप्तींप्रमाणें ही तृप्तीदेखील अल्पजीवी नसली तर पोट फुटून जावयाचें. आणि पोट फुटलें नाहीं तर डोळे फुटून जायचे. हें कसें काय परवडणार ? आतां दक्षिण गोलार्धांत काय काय पहायला-जाणायला मिळणार, काय काय नवीन अनुभव मिळणार त्याचीच अुत्कंठा जागूं लागली आहे. भूमध्य-रेषा पहिल्यांदा ओलांडूं शकलों त्याची धन्यता नेहमींच वाटत राहील.

मे १९५०

# : ६९ : नीलोत्री

अुत्तर-पूर्व आफ्रिकेची माता असलेल्या अुत्तरवाहिनी नील नदीच्या अुगम-स्थानाचें, नीलोत्रीचें दर्शन घ्यावें हा आफ्रिकेची यात्रा करण्यांत अेक अुद्देश होता. गंगोत्री आणि जमनोत्रीची यात्रा केल्यानंतर नीलोत्रीची यात्रा देखील केलीच पाहिजे असें अलीअलीकडे सारखें वाटूं लागले होतें तो दिवस आतां जवळ येअून ठेपला. जुलैची पहिली तारीख अुगवली आणि आम्ही कंपाला सोडून जिंजाला जाण्यासाठीं प्रस्थान केलें. कांहीं जरूरी कामानिमित्त श्री. आप्पासाहेब आज नैरोबीला परत गेले आणि आम्ही मोटर घेअून आमच्या रस्त्याला लागलों.

कंपालापासून जिंजापर्यंतचा मार्ग मोठा रमणीय आहे. अनेक लहान लहान व रुंद टेकड्या चढत अुतरत आमची मोटर आमच्या व नीलोत्रीच्या मधलें अंतर कापीत होती आणि आमची अुत्कंठा वाढवीत होती. केवढी

सुदैवाची गोष्ट कीं खुद जिंजाला पोंचण्यापूर्वींच आमचा संकल्प सिद्धीस गेला आणि आम्हांला नीलोत्रीचें दर्शन घडलें! अुजव्या बाजूला व्हिक्टोरिया अथवा अमरसर सरोवर दूरवर पसरलेलें आहे आणि त्यांतून अगदीं लीलया अुडी मारून नील नदी प्रगट होत आहे! नदीवरच्या पुलावर आम्ही पोंचलों, मोटरींतून खालीं अुतरलों आणि अुजव्या बाजूला रिपन फॉल्स या नावानें ओळखल्या जाणाऱ्या धबधब्यात नील नदीचें दर्शन घेतलें.

धबधब्याच्या तुषारांनीं पावलें झांकलीं गेलीं आहेत, मस्तकावर मुकुट चमकत आहे. त्याच्या मागें अेक हिरवेगार झाड मुकुटाला अुठावदार बनवीत आहे देवीच्या दोन्ही हातांत धान्यांच्या लोंब्या आहेत आणि चेहऱ्यावर प्रसन्न वात्सल्य पसरलेलें आहे—अशी मूर्ति कल्पनेच्या दृष्टीस पडली. मूर्तीचा रंग निळा नव्हता, तर श्यामवर्णाकडे किंचित् झुकणारा गोरवणच होता. साऱ्या शरीरावरून पाण्याचे रेळे आघळत होते आणि त्यामुळें देवीच्या मुखावरील हास्य अधिक सुंदर दिसत होतें.

पोटभर पाहून घेतल्यानंतर आम्ही डावीकडे दृष्टि वळवली. अुजव्या बाजूनें पाणी मुसंडी मारून आमच्याकडे येत होतें. डाव्या बाजूनें पाणी आमच्यापासून दूर दूर पळून जात होतें. दोघांचा मनावर होणार परिणाम अगदींच वेगळा. आम्हांला ठाअूक होतें कीं ज्याप्रमाणे आमच्या अुजव्या बाजूला रिपन धबधबा आहे त्याप्रमाणें डाव्या बाजूला, कांहींसा दूर. ओवेन धबधबा आहे. आपल्या देशांत त्याला कुणी धबधबा म्हणणारच नाहीं. पाण्याच्या सपाटींत थोड्या फुटाचें अंतर अुत्पन्न झालें म्हणून काय त्यामुळें धबधबा बनत असतो? पाणी धबधब आवाज करीत कोसळत आहे, जितकें कोसळत आहे तितकेंच वर अुफाळत आहे आणि फेस व तुषार यांचे लोंढ्या लोट आसपास नाचत आहेत—अशा दृश्यालाच धबधबा म्हणतां येअील.

यात्रेच्या शेवटीं लगेच मंदिरांत जाअून देवदर्शन करतात त्याला यात्रेकरूंच्या परिभाषेंत 'धूळभेट' म्हणतात. पायीं यात्रा केलेली असावी, सगळे अंग धुळीनें माखलेलें असावें आणि भेटीची अुत्कंठा अनावर होअून अशा या अवतारांतच आपण धावत जाअून अिष्टदेवतेच्या चरणीं लोटांगण घ्यावें किंवा पायाला कडकडून मिठी मारावी—अशा भेटीला धूळभेट

म्हणतात. आम्ही तर मोटर वेगानें आलों होतों. सकाळीं थोडासा पाअूस पडला असल्यामुळें रस्त्यावर धूळ देखील नव्हती. तेव्हां या प्रथम भेटीला आर्द्र-भेटच म्हणतां येअील. तिला भावार्द्र म्हटलें तरच तिचें अधिक यथार्थ वर्णन केल्यासारखें होअील. मूर्ति आर्द्र, जमीन आर्द्र, आणि अनेक मिश्र भावनांनीं चिंब झालेलें हृदयहि आर्द्र. 'अद्य मे सफलं जन्म. अद्य मे सफलाः क्रियाः' ही ओळ ज्यानें प्रथम गायली तो माझ्या सारख्या असंख्य यात्रेकरूंचा प्रतिनिधिच होता.

नील मातेचें हें प्रथम दर्शन हृदयांत सांठवून घेअून आम्ही जिंजांत प्रवेश केला. गुजराथ विद्यापीठाचे अेका काळचे विद्यार्थी ॲडवोकेट श्री. चंदुभाअी पटल यांच्या घरींच आम्ही अुतरणार होतों. जुन्या विद्यार्थ्यांच्या घरीं पाहुणा बनून रहाणें जितकें आनंददायक असतें, तितकेंच विकटही असतें. घरांतल्या चांगल्यातल्या चांगल्या सुखसोअी आपल्याला अुपलब्ध करून देअून स्वतःची अडचण करून घेण्यांत त्याला आनंद वाटत असला, तरी आपल्याला संकोच वाटल्यावांचून कसा राहील ?

मुक्कामावर स्थिर झाल्यानंतर आम्ही नीलोत्रीचें विधियुक्त दर्शन घेण्या-साठीं निघालों. जेथें अमरसरचें पाणी खडकांच्या किनारीवरून खालीं अुतरतें आणि नील नदीला जन्म देतें तेथें आम्ही पोंचलों. लगबगीनें पाण्यापाशीं जाअून आधीं पाय थंड केले. आचमन करून मन थंड केलें आणि अेकक्षण त्या स्थानाचें ध्यान केलें. माझ्या संवयीप्रमाणें अीशोपनिषद, माण्डुक्य अुपनिषद किंवा अघमर्षण सूक्त मुखावाटे बाहेर पडायला हवें होतें. पण अेकाअेकीं श्लोक बाहेर पडलाः—

> ध्येयः सदा सवितृ-मंडल-मध्यवर्ती
> नारायणः सरसिजासन-सन्निविष्टः ।
> केयूरवान् मकर-कुंडलवान् किरीटी
> हारी हिरण्मय-वपुर् धृत-शंख-चक्रः ॥

नील नदीच्या किनाऱ्यावर, वेगवेगळ्या वेळीं, वेगवेगळ्या ठिकाणीं नीलाम्बेचें ध्यान केलें आणि दर खेपेस मुखावाटे नेमका हाच श्लोक बाहेर पडला. आतां मला मिश्र देशाच्या संस्कृतीचें दर्शन घडविणाऱ्या पुराणांत

शोध केला पाहिजे कीं नील नदीचा भगवान सूर्य-नारायणाशीं कांहीं विशेष संबंध आहे कीं काय ?

मी जर संस्कृत कवि असतों तर या नदीच्या पाण्यांत रहाणारे तऱ्हतऱ्हेचे मासे, त्या पाण्यावर अुडणारे बोलघेवडे पक्षी आणि नदीच्या किनाऱ्यावर लोळणारे किबोका (हिपोपोटेमस) या सर्वांच्या भाग्याचीं स्तोत्रें गायलीं असतीं. नील नदीच्या किनाऱ्यावरील वॉटरवर्क्सची व्यवस्था पहाण्यासाठीं नेमलेल्या अेका गुजराथी अिसमाजवळ, त्यांच्याच भाषेंत त्यांच्या विषयींचा हेवा व्यक्त करून मीं संतोष मानून घेतला, 'तुमचें जीवन किती धन्य आहे कीं तुम्हांला नीलोत्रीचें अहोरात्र दर्शन घडत असतें आणि येथून न हलण्याबद्दल वर तुम्हांला पगार देण्यांत येतो!' त्या गृहस्थांना अशी कांहीं धन्यता वाटत होती कीं नाहीं तें पहाण्यासाठीं किंवा विचारण्यासाठीं मी तेथें थांबलों नाहीं.

माझ्या दृष्टीनें नद्या दोन प्रकारच्या असतात. अेक पहाडांतून निघणारी व दुसरी सरोवरांतून निघणारी. पहिलीला मी शैलजा अथवा पार्वती म्हणेन; आणि दुसरीला सरोजा. (दुनियेभरचीं कमळें मला क्षमा करतील अशी मी आशा करतों.) शैलजा नद्यांचा अुगम अेक अतिशय लहान, बारीक, जवळ जवळ तुच्छ प्रवाह असतो. त्यामुळें त्याच्याविषयीं आदर अुत्पन्न करण्यासाठीं मोठमोठीं माहात्म्यें लिहून काढावीं लागतात. गंगोत्रीपाशीं अेखादे वेळेस गंगेचा प्रवाह अितका कांहीं लहान असतो कीं सामान्य माणूस देखील अेका कांठावर अेक पाय नि दुसऱ्या कांठावर दुसरा पाय ठेवून अुभा राहूं शकतो. सरोजा नद्यांचें असें नसतें विशाल व स्वच्छ वारि-राशींतून मनाला येआल तितका जथ्था खेंचून त्या प्रकट होतात. त्यामुळें त्यांच्या चालण्याबोलण्यात गर्भश्रीमंतीचें आत्म-भान असतें.

नीलोत्रीच्या यात्रेला येण्यांत दुसरेंहि अेक अदम्य आकर्षण होतें महात्मा गांधींच्या पार्थिव देहाला दिल्लींत राजघाटावर अग्निसात् केल्यानंतर त्यांच्या अस्थि व चिताभस्म यांचें विसर्जन हिंदुस्थानांतील आणि जगांतील अनेकानेक पुण्य स्थळीं करण्यात आलें होतें. त्यातलच नीलोत्री हें अेक स्थान आहे.

आम्ही जिंजा नगरीचे सार्वजनिक पाहुणे असल्यामुळें येथल्या लोकांनीं आमच्या अुपस्थितीचा फायदा घेण्याचें ठरवलें आणि ज्या ठिकाणीं चिता-भस्माचें विसर्जन करण्यांत आलें होतें त्याच्या बाजूलाच जो अेक कीर्तिस्तंभ अुभारण्याचें नक्की झालें होतें त्याची पायाभरणी माझ्या हस्तें करण्याचा कार्यक्रम ठेवला.

सन १९५० च्या जुलै महिन्याच्या दोन तारखेला अधिक आषाढ कृष्ण तृतीयेच्या दिवशीं सकाळीं शेकडों लोकांच्या अुपस्थितींत मीं तो विधि पुरा केला. त्या अुत्सवासाठीं गांधीजींचें अेक मोठें चित्र समोर ठेवण्यांत आलें होतें. त्याची नजर माझ्यावर पडतांच मी अस्वस्थ झालों. वैदिक विधि पुरा झाल्यानंतर मीं गांधीजींच्या जीवनाविषयीं आणि आफ्रिका हीच त्यांची पहिली तपोभूमि कशी आहे याविषयीं थोडेंसें प्रवचन केलें. फोटो वगैरेंच्या आधुनिक विधींतून मुक्त होतांच किनाऱ्यावरील अेका दगडावर बसून मी नीलमातेच्या सुभग जलप्रवाहावर दृष्टि स्थिर केली आणि अंतर्मुख होअून ध्यान केलें. त्यावेळीं मनांत विचार आला कीं युरोप, आफ्रिका आणि आशिया या तिन्ही खंडांचे, किंबहुना अमेरिकेचे देखील–महान आणि सामान्य आबालवृद्ध स्त्रीपुरुष या ठिकाणीं येतील; सर्वोदयाचे अृषि महात्मा गांधी यांच्या जीवनाचें, जीवन कार्याचें व अंतिम बलिदानाचें मनन चिंतन करतील आणि मनुष्यामनुष्यांतील भेदभाव विसरून जाअून विश्व-कुटुंब स्थापनेचें व्रत घेतील. भविष्यांतल्या त्या सर्व भावी प्रवाश्यांना मी येथून प्रणाम केला.

नील नदीच्या दोन शाखा आहेत; श्वेत आणि नील. जिंजामध्यें जिचा अुगम आहे ती श्वेत शाखा होय. नील शाखा देखील सरोजाच आहे. अिथियोपिया देशांत, ज्याला आपले लोक हबसाण (अबिसीनिया) म्हणत, त्या देशांत ताना नांवाचें अेक सरोवर आहे. त्या सरोवरांतून नील शाखेचा अुगम होतो. या शाखा लाखो वर्षांपासून वाहात आल्या आहेत आणि आपल्या कांठीं रहाणाऱ्या पशुपक्ष्यांना व माणसांना जलदान करीत आहेत. परंतु युरोपियन लोकांना जिचा सुगावा लागला नाहीं ती वस्तु अज्ञातच म्हटली पाहिजे! अेका तऱ्हेनें त्यांचें हें कथन खरेंहि आहे. दुसरे लोक नदीच्या कांठीं रहात असले

तरी ती नदी मुळांत आली कोठून आणि पुढें कुठवर गेली आहे याचा शोध ते करीत नाहींत तोंवर साऱ्या नदीचें ज्ञान त्या लोकांना आहे असें म्हणतां येणार नाहीं. अुदाहरणार्थ तिबेटच्या लोकांना मानस सरोवरांतून निघणारी सांनपो ( विशाल प्रवाह ) नदी ठाअूक होती. ही नदी पूर्वेकडे वाहत वाहत जंगलांत गडप होतें, अितकेंच फार फार तर ते जाणत होते. आपले लोक या बाजूनें ब्रह्मपुत्र या नदाचा अुगम शोधत शोधत त्याच जंगलांच्या या बाजूच्या टोंकापर्यन्त जाअून पोंचले. त्यापुढचें त्यांना कांहीं ठाअूक नव्हतें पुढें जेव्हां अनेक अिंग्रज, प्रतिकूल परिस्थितीला तोंड देअून, जंगलें पार करून गेले, तेव्हांच त्यांना सिद्ध करतां आलें कीं तिबेटची सांनपो नदीच या बाजूला आलेली आहे, आणि दुसऱ्या अनेक लहानमोठ्या नद्यांचें पाणी आपल्यांत सामावून घेअून ब्रह्मपुत्र बनला आहे.

नील नदीचा अुगम शोधणाऱ्यांपैकीं मि. स्पिक हा शेवटीं यशस्वी झाला आणि त्यानें सिद्ध केलें कीं जिंजामधें सरोवरांतून जी नदी प्रकट होते तीच अिजिप्त-माता नील होय.

हा स्पिक साहेब हिंदुस्थान–सरकारच्या पदरी नोकरीं करीत होता. त्याला बातमी मिळालीं कीं प्राचीन हिंदू लोकांना मिसर म्हणजेच आजच्या अिजिप्त देशाविषयीं चांगलीच माहिती होती. चौकशीअंतीं त्याला कळलें कीं संस्कृत पुराणांत म्हटलें आह कीं नील नदीचा अुगम गोड्या पाण्याच्या अमरसर सरोवरांतून होतो; त्याच प्रदेशांत चंद्रगिरि आहे; थेट दक्षिणेला गेलें कीं मेरु पर्वत लागतो वगैरे. त्यानें पुराणांतल्या कित्येक संस्कृत श्लोकांचा अनुवाद करवून घेतला आणि त्याच्या आधारावर नील नदीच्या अुगमाचा शोध करण्याचा मनसुबा केला.

प्रथम तो झांझीबारला गेला आणि तेथून सगळी तयारी करून केनिया प्रदेश ओलांडून युगान्डामधें गेला. तेथें त्याला अमरसर हें अच्छोद सरोवर सांपडलें. ( अच्छ–सुअच्छ = स्वच्छ अुद–अुदक = पाणी. गोड्या पाण्याच्या सरोवराला अच्छोद म्हणतां येअील. ) आणि तेथून निघणारी नील नदी देखील सांपडली. सुदान व अिजिप्त या प्रदेशांतून हीच वहात असते हें त्यानें सिद्ध केलें. या गोष्टीला होअून शंभर वर्षे देखील पूर्ण झालेलीं नाहींत.

आफ्रिका खंड खरोखर तेथें वसणाऱ्या अनेक आफ्रिकन जातींचा प्रदेश आहे. या प्रदेशाविषयीं युरोपियन लोकांना पुरेशी माहिती नव्हती हा कांहीं तेथल्या लोकांचा दोष नव्हे. युरोपमधील व विशेषतः अरबस्तानांतील लोक आफ्रिकेच्या किनाऱ्यावर जाऊन तेथल्या लोकांना पकडत आणि आपापल्या देशांत आणून गुलाम म्हणून विकत. पकडलेल्या लोकांत स्त्रिया आणि मुलें सुद्धां असत. परंतु लुटारू त्याची माणसांत थोडीच गणना करीत होते ?

कित्येक मिशनऱ्यांना वाटलें कीं अशा जंगली लोकांच्या आत्म्याचा अुद्धार होण्यासाठीं त्यांना ख्रिस्ती बनवले पाहिजे. लोभी व्यापारी सुद्धां ज्या गहन प्रदेशांत जाण्याची हिंमत करीत नसत तेथें अुत्साही धर्म प्रचारक पोंचत आणि तेथली भाषा शिकून घेअून येशू ख्रिस्ताचें 'शुभ वर्तमान' त्याना अैकवीत.

पुढें युरोपच्या राजांनीं आफ्रिका खंड आपआपसांत वाटून घेतला. त्यांत नियम असा होता कीं ज्या देशाच्या मिशनऱ्यांनीं जितका प्रदेश शोधून काढला (!) तितका प्रदेश त्या देशाच्या राजाच्या मालकीचा मानला जावा! या बाबतींत अेकदां असें घडलें कीं स्टॅन्ले नांवाच्या अेका मिशनऱ्यानें अिंग्लंडच्या राजापाशीं कॉंगो नदीच्या विस्तारांतील प्रदेश 'शोधण्या'साठीं मदत मागितली. अिंग्लंडच्या राजानें, म्हणजे पार्लमेंटनें, मदत दिली नाहीं. म्हणून तो गेला बेल्जियमच्या राजापाशीं. राजा लियोपोल्ड लोभी व अुत्साही होता. त्यानें स्टॅन्लेला सर्व प्रकारची मदत दिली. परिणामीं जेव्हां मूळ रहिवाशांना न विचारतांच आफ्रिका खंडाची वाटणी झाली तेव्हां कॉंगो नदीच्या विस्ताराचा प्रदेश बेल्जियमच्या वाट्याला गेला! हा बेल्जियम कॉंगोचा प्रदेश जवळ जवळ हिन्दुस्तानाअितका मोठा आहे. तेथून रबर मिळवण्यासाठीं गोऱ्या लोकांनीं तेथल्या प्रजेवर जे अत्याचार केले आहेत त्यांचीं वर्णनें वाचताना अंगावर कांटा अुभा रहातो असें म्हणणें सुद्धां अल्पोक्ति होअील. भावनाप्रधान माणसाचें तर तीं वर्णनें वाचून रक्त गोठून जाअील. अितकें असूनहि गोऱ्या लोकांनीं येथल्या प्रजेला हळू हळू 'सुधारलें' यांत शंका नाहीं. आतां ते लोक कपडे वापरतात. वेगवेगळ्या तऱ्हेनें केशरचना करतात आणि दारू देखील पितात. अशा रीतीनें बहुतेक लोक ख्रिस्ती झाले आहेत !

आपल्या लोकांनीं युगान्डांत जाऊन कापसाची शेती वाढवली, राज्य-कर्त्यांच्या मदतीनें तेथें मोठमोठ्या अिस्टेटी केल्या आणि करोडो रुपये कमावले. आपण देखील तेथल्या लोकांना सुधारलें आहे. दर्जीकाम, सुतारकाम, गवंडीकाम, आचाऱ्याचें काम वगैरे धंद्यात त्यांची मदत घेतल्यामुळें हळूं हळूं ते लोक तरबेज बनले. हिंदुस्थानातलें कापड व विलायतेंतून येणाऱ्या दारू वगैरे तऱ्हतऱ्हेच्या वस्तु विकण्याचीं दुकानें अुघडून आपण त्या लोकांना जीवनाचा आनंद लुटायला शिकवलें!

गोऱ्या व गहूवर्णी लोकांच्या अशा पुरुषार्थाची साक्षी बनलेली नील नदी येथें चुपचाप वहात आहे आणि आपला परोपकार आपल्या दोन्ही कांठावर दूरपर्यन्त पसरवीत आहे.

आपल्या देशांत गंगा नदीचें जें महत्त्व आहे तेंच महत्त्व अधिक अुत्कट रीतीनें अुत्तर-पूर्व आफ्रिकेंत नील नदीचें आहे. जगांतल्या सर्वांत महत्त्वाच्या सहाअेक प्राचीन संस्कृतींमधें अिजिप्तच्या मिश्र अथवा मिसर संस्कृतीचा अंतर्भाव होतो तिचा प्रभाव केवळ युरोपच्या अितिहासावरच नव्हे तर त्याच्या धर्मावर देखील पडला आहे. आपल्याकडे ज्या चातुर्वर्ण्यावर आधारित संस्कृतीचा विकास झाला, तशीच संस्कृति प्राचीन मिसर देशांत-देखील आढळून येते आणि तिचा पडसाद ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटोच्या 'समाज-रचनें'त अुमटलेला दिसून येतो. चातुर्वर्ण्याची संस्कृति त्या काळाला कितीहि अनुकूल असली आणि भव्य मानली गेली असली तरी बंडखोर युरोप खंडाला ती पचली नाहीं. युरोपमधें जो खिस्ती धर्म पसरलेला आहे त्याचें पालनपोषण अिजिप्तमधें कांहीं कमी झालेलें नाहीं. परंतु तेथल्या भूमींत रुजलेलें वैराग्य, तपस्या आणि देहदंडन यांचा चांगला अनुभव घेअून शेवटीं युरोपनें त्यांचा त्याग केला. असें असलें तरी देखील युरोपच्या संस्कृतीचीं पाळेंमुळें शोधूं जातां अिजिप्तचा अितिहास धुंडाळावाच लागतो, आणि त्या अितिहासाच्या घडणीला बऱ्याच अंशीं नील नदीच कारणीभूत झालेली आहे.

ज्याप्रमाणें नदीचें पाणी पुढें पुढेंच वहातें, मागें जाअूं शकत नाहीं, त्याप्रमाणें अिजिप्तची संस्कृति नील नदीच्या अुगमाकडे, युगान्डा प्रदेशांत पोंचूं शकली नाहीं ही गोष्ट आपलें लक्ष वेधल्यावाचून रहात नाहीं. जर

अिजिप्तचे लोक अमरसरच्या आसपास येअून वसले असते तर आफ्रिकेचाच नव्हे तर साऱ्या जगाचा अितिहास वेगळया रीतीनें लिहावा लागला असता.

आपल्या कडल्या सर्वच नद्यांचे अुगम जंगलांत किंवा दुर्गम प्रदेशांत असतात. आणि ते अुगम असतात देखील लहान. नील नदीचा अुगम रुंद आहे त्यांचें कांहीं नाहीं; परंतु येथें जें अेक शहर वसलेलें आहे तीच त्या अुगमाच्या काव्यांत अुणेपणा आणणारी वस्तु आहे. आपल्याकडे कृष्णा आणि तिच्या चार मैत्रिणी सह्याद्रीच्या ज्या प्रदेशांतून अुगम पावतात तो प्रदेश दुर्गम आणि पवित्र होता. संतांनीं तेथें शिवशंकर महाबळेश्वराची स्थापना केली. परंतु अिंग्रजांनीं त्या तपोभूमीचें विहारभूमींत किंवा विलासभूमींत रूपांतर केलें, या गोष्टीचें स्मरण जिंवात झाल्यावांचून रहात नाहीं.

आणि आतां तर तेथें ओवेन फॉल्सपुढें अेक मोठा बांध बांधून वीज अुत्पन्न करण्यांत येणार आहे. जगांतील तो अेक अत्यंत अद्‌भुत बांध होअील. त्यामुळें अुत्पन्न होणारी विजेची शक्ति युगान्डालाच नव्हे तर सुदान व अीजिप्त यांच्यापर्यंत पोंचणार आहे. त्यामुळें अन्नोत्पादन वाढेल, दुष्काळ दूर होअील, असंख्य अश्वत्थाम्यां (हॉर्स पावर्स) अितकी शक्ति माणसाच्या सेवेला अुपलब्ध होअील. अर्थात् अशा प्रवृत्तीला आशीर्वाद देण्यावांचून गत्यतरच नाहीं. तरीदेखील हृदय आंतून सांगत असतें कीं मनुष्यजात या मार्गानें असें कांहीं गमावून बसणार आहे कीं ज्याची भरपाअी मोठ्यांतली मोठी भरभराट देखील करूं शकणार नाहीं.

नील नदी माता होती, देवी होती. आतां ती आधुनिक कालांतील लोकधात्री दाअी होणार आहे!

नव्हेंबर १९५०

# : ७० : अर्णवाचें आमंत्रण

समुद्र अथवा सागर या सारखा परिचित शब्द सोडून अर्णव शब्द मी निवडला तो केवळ आमंत्रण शब्दांशीं जुळणाऱ्या अनुप्रासाच्या लोभानें नव्हे. अर्णव शब्दामधून अुंच अुंच लाटांच्या अखंड तांडवाचें सूचन होतें. वादळ, अस्वस्थता, अशांति, वेग, प्रवाह आणि कोणत्याहि प्रकारच्या बंधनाविषयींची चीड हे सर्व भाव अर्णव शब्दांतून व्यक्त होतात. अर्णव शब्दाचा धात्वर्थ आणि त्याचें अुच्चारण या दोन्ही गोष्टी वरील भावाभिव्यक्तीला पोषक अशाच आहेत आणि म्हणूनच पुष्कळदां वेदामधें अर्णव शब्द समुद्राचें विशेषण म्हणून वापरण्यांत येतो. विशेषतः वेदांतील विख्यात अघमर्षण सूत्रांत जो अर्णव-समुद्राचा अुल्लेख आहे तो त्याच्या भव्यतेचा सूचक आहे.

अशा अर्णवाचा संदेश आजच्या आपल्या जगापुढें सादर करण्याची शक्ति मला प्राप्त व्हावी म्हणून प्रारंभींच वैदिक देवता-सागर-सम्राट वरुणाला-मी नमन करतों.

वरुण हा, जेथें मार्ग नाहीं, तेथें मार्ग करून देणारा देव आहे. प्रभंजनाच्या तांडवानें जेव्हा वाळवंटांत वाळूच्या लाटा अुसळूं लागतात, तेव्हां तेथेंहि प्रवाश्यांना दिशा-दर्शन करून देण्याचें काम वरुणाचेंच; आणि अनंत आकाशांत आपल्या पंखांची शक्ति अजमावणाऱ्या त्रिखंड-यात्री पक्ष्यांना व्योममार्ग दाखवून देणारा देखील वरुणच होय. आणि वेदकाळांतील भुज्युपासून ते कालच ज्याला मिसरूड फुटली आहे अशा खलाश्यापर्यंत प्रत्येकाला समुद्रावर मार्गदर्शन करण्याचें काम जसें वरुणाचें, त्याचप्रमाणें नव्या नव्या क्षेत्रांत प्रवेश करून, नवे नवे रस्ते तयार करून देणारा यमराज असो, किंवा अगस्ति असो, त्यांना हिंमत व प्रेरणा देणारा दीक्षागुरु वरुणच होय.

वरुण जसा यात्रेकरूंचा वाटाड्या आहे तसाच मनुष्य-जातीचा तो न्याय आणि व्यवस्था देणारा देव आहे. ‘ अृतम् ’ आणि ‘ सत्यम् ’ यांचा साक्षात्कार त्याला पूर्णपणें झालेला असल्यामुळें तो प्रत्येक आत्म्याला सत्याच्या मार्गानें

जाण्याची प्रेरणा देतो. न्यायाप्रमाणें वागण्यांत जें सौंदर्य आहे, जें समाधान आहे आणि जें अंतिम साफल्य आहे, त्याची वरुणाकडून दीक्षा घ्यावी आणि जर कुणा लोभी, अदूरदर्शी मनुष्यानें वरुणाच्या या न्यायनिष्ठेचा अनादर केला, तर वरुण त्याला जलोदरानें पीडित करतो, ज्यायोगें मानवाला कळावें कीं लोभाच्या वृक्षाला कधींहि मधुर फळें लागत नाहींत.

ज्याप्रमाणें परम-मंगल, कल्याणकारी, सदाशिव आपली किंमत कमी होअूं नये, आपण अगदीं स्वस्त बनूं नये म्हणून अधून मधून रुद्ररूप धारण करतात, त्याचप्रमाणें रत्नाकर समुद्र देखील अट्टहास्य करणाऱ्या लाटांच्या जोरावर भित्र्या माणसाला दूर ठेवतो. नाजुक मुलायम वनस्पति व घर-कोंबडीं माणसें यांनीं आपल्या किनाऱ्यावर स्थिर होअूं नये म्हणून भरती ओहोटी चालवून तो सर्वांना बजावीत असतो कीं माझ्याशीं वागतांना योग्य अंतर ठेअूनच तुम्हीं वागले पाहिजे.

समुद्राच्या कांठावर अुभें राहून लाटा अुसळतांना आणि ओसरतांना पाहिल्या, अमावास्येला व पौर्णिमेला भरती येत असलेल्या व ओसरत असलेल्या पाहिल्या. हें सारें पाहून देखील जेव्हां बुद्धीला याचें रहस्य अुमजेना तेव्हां हृदय अुद्गारलें—अितकें देखील समजत नाहीं! आपण श्वासोच्छ्वास करतांना आपली छाती नाहीं का वरखालीं होत? हा विराट सागर देखील तसाच श्वास घेत आहे त्याची ही धडधड आहे; त्याला येणारा हा अुमाळा आहे. जमिनीवर माणसानें जें पापाचरण आणि अत्याचार माजविले आहेत ते पोटांत घालण्याची क्षमावृत्ति धारण करण्याची शक्ति यावी म्हणून महासागराला अितका हृदयाचा व्यायाम करावा लागतो!

ज्या लाटा हृदय-दुर्बळ लोकांना दरडावून दूर ठेवतात, त्याच लाटा वीर पराक्रमी लोकांना प्रेमळ, अूर्मिल आणि फेसाळ आमंत्रण देतात कीं, " चला! या स्थिर जमिनीवर काय अुभे राहिला आहांत? अुभ्या अुभ्या गंजून जाल! घ्या अेक जहाज, व्हा त्यावर स्वार, अुभारा शिड आणि चला जेथें वाऱ्याचा प्राण नेअील तेथें. आम्ही सर्व जरी सागराचीं लेकरें असलों, तरी आमचा दीक्षागुरु आहे वारा. तो जसा नाचवील, तसे आम्ही नाचत

असतो. तुम्ही सुद्धां हेंच व्रत घ्या आणि चला आमच्याबरोबर." अुमद्या हृदयाला असलें आमंत्रण नाकारणें कधींच शक्य होणार नाहीं.

लहानपणीं सिंदबादची गोष्ट तुम्ही वाचली नाहीं कां? सिंदबादजवळ विपुल धन होतें, जमीनजुमला सारें कांहीं होतें. आपल्या मायेनें त्याच्या जीवनांत कसलीहि अुणीव अुरूं न देणारे नातेवाअीकहि त्याच्या आसपास अनेक होते. अितकें सारें असलें तरी समुद्राची गाज कानीं पडली कीं त्याला घरांत बसवत नसे. लाटांचा पाळणा सोडून जो घरीं पलंगावर निजतो तो खरोखर दुर्दैवी होय हृदय म्हणे : 'चल, नीघ!' सिंदबाद समुद्रपर्यटनाला गेला, तेथें अनेक प्रकारें हैराण झाला. मधुर अनुभवापेक्षां कटु अनुभवच त्याला अधिक आले. म्हणून त्यानें अेकदां शपथ घेतली कीं 'पुन्हां म्हणून समुद्रयात्रेचें नांव घ्यायचें नाहीं.'

परंतु किती झालें तरी शेवटीं तो अेक मानवी आणि अकर्मण्य संकल्प होता. त्या संकल्पाला सम्राट वरुणाचा आशीर्वाद थोडाच मिळाला होता? थोडे दिवस गेले आणि गृह-स्थ जीवन त्याला अळणी अळणी वाटूं लागलें. रात्रीं तो झोपीं जाअी, पण झोंप येत नसे. सारख्या लाटा त्याच्याशीं गोष्टी करीत. अुत्तर रात्रीं किंचित् डोळा लागला तर स्वप्नांतदेखील लाटा अुमळूं लागत आणि आपलीं लवचीक बोटें हलवून हलवून त्याला बोलावूं लागत. कुठवर तो आपला हेका चालूं ठेवणार? अन्यमनस्क होअून तो सहज फिरायला म्हणून बाहेर पडला तर त्याचे पाय बागेचा रस्ता सोडून समुद्राच्या पांढऱ्या शुभ्र व चकाकणाऱ्या वाळूकडेच त्याला घेअून जात. शेवटीं त्यानें चांगलीं चांगलीं जहाजें विकत घेतलीं, खंबीर मनाचे खलाशी नोकरीवर ठेवले, तऱ्हतऱ्हेचा माल सोबत घेतला आणि 'जय दरिया पीर' असें म्हणून जहाजें हांकारलीं.

ही तर झाली काल्पनिक सिंदबादची गोष्ट. परंतु आपल्याकडील सिंहपुत्र विजय तर अेक अैतिहासिक पुरुष होता. बाप त्याला कुठेंहि जाअूं देअीना. त्यानें पुष्कळ मनधरणी केली, परंतु त्यांत तो यशस्वी झाला नाहीं. शेवटीं त्यानें कंटाळून जाअून असा कांहीं धुमाकूळ घालायला सुरुवात केली कीं प्रजा अगदीं कातावून गेली आणि राजापाशीं येअून म्हणू लागली कीं,

'राजा, अेक तर तूं आपल्या मुलाला देशाबाहेर हाकलून लाव, नाहींतर आम्ही तरी तुझा देश सोडून निघून जातों'. पित्यानें मोठमोठीं जहाजें आणलीं. त्यांत आपल्या मुलाला व त्याच्या दंगेखोर साथीदारांना बसविलें आणि सांगितलें, 'आतां जिथें जायचें असेल तेथें जा. परत आपलें तोंड दाखवूं नका.' ते निघाले. सौराष्ट्राचा किनारा त्यांनीं मागें टाकला, भृगुकच्छ सोडलें; सोपारा सोडलें; दाभोळ सोडलें; थेट मंगलापुरीला ते पोंचले. तेथेंहि राहूं न शकल्यामुळें हिंमतपूर्वक पुढें प्रवास करून ते ताम्रद्वीपांत जाअून वसले आणि तेथले राजा बनले. विजयच्या पित्यानें आपल्या मुलाला परत येण्याची मनाअी केली होती, परंतु त्याच्या मागोमाग कुणी जाअूं नये असें फर्मान काढलें नव्हतें. त्यामुळें अनेक दर्यावर्दी लोक विजयच्या मार्गानें जाअून नवे नवे विजय मिळवूं लागले. जातां जातां ते महा बलिष्ठ लोक जावा आणि बालिद्वीपापर्यंत पोंचले. तेथली समृद्धि, तेथलें हवापाणी आणि तेथलें सृष्टि सौंदर्य पाहिल्यानंतर तेथून परतण्याची अिच्छाच कुणाला होणार ! त्यानंतर तर आजच्या भावनगर जवळील घोघा बंदराच्या वरानें सगळा पश्चिम किनारा ओलांडून, लंकेच्या नवरीशीं लग्न करावें हा जवळ जवळ नियमच होअून बसला होता.

या बाजूस बंगालचे नदीपुत्र नदी-मुखेन समुद्रांत प्रवेश करूं लागले. ज्या बंदरांतून निघून ताम्रद्वीपाला जातां येत असें, त्या बंदराचें नांव त्यांनीं ताम्रलिप्ति ( आजचें तामलुक ) असें ठेवलें. अशा रीतीनें ताम्रद्वीप-लंकेंत अंग-वंगाचे बंगाली, ओरिसाचे कलिंग आणि पश्चिमेकडील गुजराथी गोळा झाले. मद्रासमधील द्रविड तर तेथें केव्हांच जाअून पोंचले होते. अशा रीतीनें पूर्व, पश्चिम व दक्षिण भारत आपापल्या अर्णवांच्या आमंत्रणावरून लंकेमध्यें अेकत्र झाले.

बुद्धभगवानांनीं निर्वाण प्राप्त करून घेण्याचा मार्ग शोधून काढला आणि आपल्या शिष्यांना आदेश दिला कीं 'या अष्टांगिक धर्मतत्त्वाचा दश-दिशांना प्रसार करा !' त्यांनीं स्वतः अुत्तर भारतांत चाळीस वर्षें प्रचाराचें कार्य केलें. आसेतुहिमाचल आपलें साम्राज्य पसरविण्यासाठीं निघालेल्या सम्राट अशोकाला दिग्विजय सोडून धर्मविजय करण्याची अिच्छा झाली.

68862

धर्मविजय म्हणजे आजच्या प्रमाणें धर्माच्या नांवाखालीं देशदेशांतरींच्या प्रजेला लुटून, गुलाम करून बाटवण्याचा धंदा नव्हे; तर लोकांना कल्याणाचा, आपलें जीवन कृतार्थ करून घेण्याचा अष्टांगिक मार्ग दाखवणें. बुद्ध भगवान असे स्वतः गेंड्याप्रमाणें अकुतोभय होअून रानावनांतून फिरत, त्याचप्रमाणें त्यांच साहसी शिष्य अर्णवाचें आमंत्रण अैकून देशदेशातराला जाअूं लागले. काहीं पूर्वेकडे गेल, कांहीं पश्चिमेकडे. आजदेखील पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर या साधूंचीं ठाणीं पहाडात कोरलेलीं सांपडतात. सोपारा, कान्हेरी, घारापुरी वगैरे स्थळें बौद्ध मिशनऱ्यांच्या परदेश यात्रेचीं सूचक आहेत. ओरिसामधील खंड-गिरि आणि अुदय-गिरि येथील लेणीं देखील याच गोष्टीचीं साक्ष देतात.

याच बौद्धधर्मप्रचारकांपासून प्रेरणा घेअून प्राचीनकाळचे ख्रिस्तीदेखील समुद्रावाटे निघाले आणि त्यानीं अनेक देशांत भगवद्भक्त ब्रह्मचारी येशू ख्रिस्ताच्या संदेशाचा प्रसार केला.

जे स्वार्थवश होअून समुद्रयात्रा करतात त्यांना सुद्धां समुद्र मदत करतो खरा. पण वरुण म्हणतो ‘ स्वार्थी लोकाना माझी आडकाठी आहे. त्यांचा मी निषेध करतों. परंतु जे धर्मप्रचारासाठीं निघतील त्याना माझा आशीर्वादच आहे. मग ते महिन्द व संघमित्ता असोत किंवा विवेकानन्द असोत. सेन्ट फ्रान्सिस झेवयर असो किंवा त्याचा गुरु अिग्नेशियस लॉयला असो.’

आतां अर्णवांची मदत घेणाऱ्या स्वार्थी लोकांचा अितिहास पाहूं. मकराणी लोक बलुचिस्तानच्या दक्षिणेस राहून पश्चिम सागराचा किनारा पालथा घालीत. त्यामुळें हिंदुस्थानचा व्यापार त्यांच्याच हातांत होता, हिरीरीनें त्यांनीं तो आपल्याच हातांत ठेवला होता. त्यामुळें अेका वरुणपुत्राला वाटलें कीं आपण दुसरा सागरी मार्ग शोधून काढला पाहिजे. वरुणानें त्याला सांगितलें कीं अमुक महिन्यांत अरबस्तानहून तुझें जहाज तूं भरसमुद्रांत हांकारलेंस तर सरळ कालीकटकडे येअून पोंचशील. अेक दोन महिने हिंदुस्थानांत व्यापार करून तूं परत स्वदेशीं जायला निघालास कीं त्या सुमारास मी माझ्या वाऱ्याची दिशा अुलट करून, तुला आलल्या रस्त्यानेंच परत स्वदेशी पोंचवीन. ही गोष्ट अी. स. ५० पूर्वींची आहे.

दूरदूर पश्चिमेला वायकिंग म्हणून यांचे लोक रहात असत. वरुणाचे ते आवडते होते. ग्रीनलंड, आअीसलंड, ब्रिटन आणि स्कँडीनेव्हिया यांच्यामधील थंड आणि वादळी समुद्रांतून ते प्रवास करीत. आजचे अिंग्रज हे त्यांचेच वंशज होत. नॉर्वे ब्रिटन, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल या समुद्र किनाऱ्यावर वसलेल्या राष्ट्रांनीं आळीपाळीनें समुद्र पालथा घातला. त्या सर्वांना हिंदुस्थानला यावयाचें होतें. मधें पूर्वेकडे मुसलमानी राज्यें होतीं. त्यांना वळसा घालून किंवा टाळून हिंदुस्थानचा रस्ता शोधून काढायचा होता. सर्वांनीं वरुणाची अुपासना करायला सुरुवात केली आणि समुद्राचा मार्ग धरला. कांहीं गेले अुत्तरेकडे, काहीं गेले अमेरिकेकडे. कित्येकांनीं आफ्रिकेची अुलटी प्रदक्षिणा केली आणि शेवटीं अेकदांचे सगळे हिंदुस्थानला येअून पोंचले. समुद्र म्हणजे लक्ष्मीचा पिता. त्याच्यावरून प्रवास करणारे सर्व लक्ष्मीच्या कृपेचे पात्र बनावेत हें स्वाभाविक होतें. त्या सर्वांनीं नवेनवे देश जिंकले, धनदौलत गोळा केली; परंतु वरुणाच्या न्यायासनाचा त्यांना विसर पडला. वरुण हा न्यायाचा देव आहे. त्याच्यांत जशी धीर धरण्याची वृत्ति आहे, तसाच पुण्यप्रकोप देखील आहे. 'आपण या लोकांना समुद्राचें राज्य दिलें, परंतु त्यांनीं राजाला शोभेल असा न्याय-धर्म पाळला नाहीं' असें जेव्हां वरुणराजाला दिसून आलें, तेव्हां त्यानें आपला आशीर्वाद मागें खेंचून घेतला आणि सर्वांना जलोदराची शिक्षा फर्मावली. आतां या राष्ट्रांनीं हिंदुस्थान आणि आफ्रिका दोन्ही खंडांतून जो कांहीं संपत्ति मिळवून आणली होती ती ते आपआपसांत लढण्यासाठीं वापरूं लागले आहेत आणि आपल्या प्राणांबरोबर ती सगळी संपत्ति आकाशांत लढवून जलाच्या अुदरांत बुडवूं लागले आहेत. समुद्रयान असो कीं आकाशयान, शेवटीं पोंचायचें समुद्र-जलाच्या अुदरांतच. आतां वरुणराज कोपला आहे. सागराची सेवा घेणाऱ्या लोकांत जर सात्त्विकता नसेल तर ते जगांत अुत्पात माजवणार आहेत याची त्याला खात्री झाली आहे. आतांपर्यंत त्यानें विज्ञान-शास्त्र्यांना तसेंच ज्योतिष-शास्त्र्यांना, विद्यार्थ्यांना तसेंच लोकसेवकांना समुद्र-पर्यटनाची प्रेरणा दिली. आतां तो हिंदुस्थानाला अेक नवीनच प्रेरणा देअूं पहात आहे, हिंदुस्थानापुढें अेक नवीन मिशन ठेवूं पहात आहे. तें अैकण्याची आपली तयारी आहे का?

आपण पश्चिम समुद्राच्या किनाऱ्यावर रहातों. दिवस रात्र पश्चिम सागराचें* आमंत्रण आपल्या कानीं पडत असतें. आतांपर्यंत आपण बहिरे होतों. हा संदेश आपल्या कानावर पडूनहि आंत अुतरत नव्हता. आंतां ही स्थिति राहिली नाहीं. युरोपच्या महा प्रजांनीं आपल्यावर राज्य स्थापित करून आपल्याला मोहिनींत टाकलें होतें. आतां ती मोहिनी अुतरली आहे आपले कान अुघडले आहेत. जगाच्या नकाशाकडे आपण नव्या दृष्टीनें पाहूं लागलों आहोंत. महासागर भूमिखंडांना अेकमेकापासून तोडत नाहींत, तर जोडतात हें आपण आतां समजूं लागलों आहोंत, आफ्रिकेचा सगळा पूर्व किनारा आणि कलकत्त्यापासून ते सिंगापूर आल्बनी ( आस्ट्रेलिया ) पर्यन्तचा पूर्वेकडील पश्चिम किनारा आपल्याला आमंत्रण देत आहे कीं, अीश्वरानें तुम्हांला जें कांहीं ज्ञान, चारित्र्य व वैभव दिलें असेल, त्याचा फायदा येथल्या जमातींना करून द्या. अेका बाजूला आफ्रिका आहे; दुसऱ्या बाजूला जावा आहे, बाली आहे, ऑस्ट्रेलिया आहे, टास्मानिया आहे आणि प्रशान्त महासागरांतील असंख्य बेटें आहेत. तीं सर्व अर्णवाच्या वाणीनें आपल्याला बोलावीत आहेत या सर्व ठिकाणीं सागराच्या प्रेरणेनें अनेक मिशनरी गेले होते, परंतु सवत्र ते आपल्याबरोबर दारू घेअून गेले, वंशावंशांतील अुच्चनीच भाव घेअून गेले, येशू ख्रिस्ताला विसरून फक्त त्याचे बायबल घेअून गेले. आणि त्या बायबलाच्या मदतीनें त्यांनीं आपापल्या देशाचा व्यापार मात्र वाढवला. अर्णव त्यांना घेअून गेला खरा, पण वरुण त्यांच्यावर नाराज झाला आहे. आपण भारतवासी प्राचीन काळांत चीनला गेलों, यवनांच्या देशीं ग्रीसला गलों, जावा आणि बालीला गेलों. आपण 'सर्वे सन्तु निरामयाः।' या संस्कृतीचा विस्तार केला. परंतु कधींहि त्या त्या ठिकाणीं आपलीं साम्राज्यें स्थापन करण्याची दुर्बुद्धि आपण मनांत आणली नाहीं. दुसऱ्या लोकाच्या मानानें आपले हात स्वच्छ आहेत, त्यामुळें

---

* आपल्या या शेजाऱ्याला आपण अरबी समुद्र या नांवानें संबोधणें हें अगदीं विचित्र आहे! विलायतेहून येणारे गोरे लोक त्याला खुशाल 'अरबी समुद्र' म्हणोत. आपल्या दृष्टीनें तो मुंबअी समुद्र अथवा पश्चिम सागर आहे. याच नांवाचा आपण वापर केला पाहिजे.

वरुणाचा आदेश आहे— अर्णव आपल्याला आवाहन करीत आहे आणि सांगत आहे, "दुसरे लोक विजय-पताका घेऊन गेले; तुम्ही अहिंसा धर्माची तिरंगी अभय-पताका घेऊन निघा आणि जेथें जाल तेथें सेवेचा सुगंध पसरवा. शोषणासाठीं नव्हे, तर मागासलेल्या लोकांच्या पोषणासाठीं आणि शिक्षणासाठीं बाहेर पडा. आफ्रिकेचे शालिग्राम-वर्णाचे तुमचे बांधव तुम्हांला बोलावीत आहेत. पूर्वेकडील केतकी सुवर्ण वर्णाचे तुमचे बांधव तुमची वाट पहात बसले आहेत. त्या सर्वांच्या सेवेसाठीं बाहेर पडा आणि सर्वांना सांगा कीं अहिंसा हाच परम धर्म आहे. अुच्चनीच भाव, अभिमान, अहंकार अशा हीन वृत्तींना या धर्मात थारा नाहीं. भोग आणि अैश्वर्य म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून जीवनावर सांचणारें शेवाळ आहे. संयम आणि सेवा, त्याग आणि बलिदान, यांतच जीवनाची कृतार्थता आहे. या धर्माचें ज्यांना आकलन झालें आहे, त्या सर्वांनीं निघावें! पूर्वसागर व पश्चिम सागर यांच्या मधें दक्षिणेकडे घुसणारा हजारों मैलांचा किनारा तयार करून हिंदुस्थानाला हिंदी महासागरांत जें स्थान दिलें गेलें आहे तें कांहीं समुद्र-विमुख होण्यासाठीं नव्हे. समुद्र-यात्रा करून अहिंसेच्या विश्वधर्माचा परिचय साऱ्या विश्वाला करून देण्यासाठीं तें दिलें गेलें आहे."

युरोपमधल्या महायुद्धाचा अंत झाल्यावर जगाचें रूप जसें पालटणार असेल तसें पालटो परंतु असंख्य भारतीय जन यापुढें अर्णवाचें आमंत्रण अैकून वरुणाकडून दीक्षा घेऊन हळूं हळूं देशदेशान्तरांत पसरूं लागतील याविषयीं मला शंका नाहीं. सागराच्या पृष्ठभागावर आपलीं जहाजें डोलतांना मी पहातों, त्यांच्या अभय–पताका आकाशांत फडफडतांना मला दिसतात, आणि माझें हृदय अुचंबळून येतें. अर्णवाचें हें आमंत्रण आतां मला स्वतःला स्वीकारणें फारसें शक्य नसलें तरी तरुण हृदयापर्यंत तें आमंत्रण मी पोंचवूं शकतों याचीच मला धन्यता वाटते. वरुणराजाला आमचें वंदन असो! जय वरुणराजकी जय!!

ऑक्टोबर, १९४०

---

# अनुबन्ध

सामाजिक जीवनाला अत्यंत अुपयोगी असे अुद्योगधंदे शिकतांना किंवा चालवतांना पावलोंपावलीं ज्या ज्ञानाची किंवा माहितीची आवश्यकता भासते, तितकें सर्व ज्ञान त्या त्या वेळीं शोधणें आणि आपलेंसें करणें हा जीवन समृद्ध करण्याचा स्वाभाविक अुपाय होय. जगण्यासाठीं जी कांहीं प्रवृत्ति करावी लागते, तिच्याशीं निगडित अिकड–तिकडची सर्व माहिती मिळवल्यानें मनाला मोठा संतोष होतो आणि अशा प्रकारें प्रसंगानुसार प्राप्त केलेली माहिती सहजतया पचते व जीवनांत मिसळून जाते.

हें सर्व लक्षांत घेअून शिक्षणशास्त्र्यांनीं शिक्षणाची अेक नवी पद्धति सुरू केली आहे. ती ही कीं जीवन जगतांना तसेंच अुपजीविकेसाठीं आवश्यक असा अुद्योग शिकतांना आणि चालवतांना जें कांहीं आवश्यक ज्ञान द्यावें किंवा घ्यावें लागेल, त्यालाच शिक्षणाचें माध्यम बनविण्यांत यावें. या पद्धतीला अनुबंध किंवा ' को-रिलेशन ' म्हणतात.

संस्कृत ग्रंथांचे प्राचीन टीकाकार या शैलीचा अवलम्ब करून कोणत्याहि ग्रंथाचा अर्थ समजावतांना त्याच्या अनुषंगानें अनेक विषयांची माहिती देतात. आणि मूळ लेखक जर अनेक–विद्या–विशारद असला आणि त्याच्या ग्रंथांत त्या विद्यांच्या तत्त्वांचा अुल्लेख आलेला असला, तर टीकाकार त्या सर्व विद्यांचें आवश्यक ज्ञान आपल्या टीकेंत भरल्यावांचून रहात नाहींत.

आजकाल पाठ्य-पुस्तकांबरोबर नोट्स किंवा टीपा दिल्या जातात. पुस्तकें अिंग्रजींत आणि टीपाहि अिंग्रजींत. अशा रीतीनें परभाषेद्वारा शिकण्याच्या कृत्रिम स्थितीमुळें विद्यार्थीवर्ग नोट्स घोकूं लागला आणि ही घोकंपट्टी परीक्षेंत लिहून परीक्षा पास होअूं लागला. त्यामुळें नोट्स देण्याची प्रथा चांगलीच बदनाम झाली आहे आणि चांगले चांगले शिक्षणशास्त्री पाठ्य-पुस्तकांवर नोट्स लिहिणें आपल्या प्रतिष्ठेच्या विरुद्ध मानतात. आणि कधीं कधीं अशा नोट्स निन्देला पात्र असतात सुद्धां.

परंतु जर अनुबंधाच्या दृष्टीनें टीपा लिहिल्या गेल्या आणि संधि पाहून आवश्यक विविध ज्ञान देण्याचा प्रयत्न केला गेला, तर ही पद्धति सर्वथा अिष्ट आणि लाभदायकच आहे.

माझ्या कित्येक अध्यापक-मित्रांनीं माझीं कांहीं पुस्तकें अशाप्रकारें आपल्या टीपांनीं भूषविलीं आहेत. या कामांत मीं त्यांना आपला सहयोग दिला आहे. जेथें विद्यार्थ्यांसाठीं आणि अध्यापकांसाठीं मोठ्या पुस्तकालयाची सोय अुपलब्ध नसते, तेथें अशा टीपांच्या मदतीनेंच अध्ययन संतोषकारक होअू शकतें. पुस्तकांवर स्वभाषेत लिहिलेल्या टीपा दिल्यानें अनुबन्धाचें पुष्कळसें कार्य साध्य होतें. त्यामुळें शिक्षण-कलेंत प्रवीण अशा अध्यापकांकडून दिल्या जाणाऱ्या टीपा माझ्या दृष्टीनें 'अनुबंधा'चाच प्रकार आहे. मला आशा आहे कीं जर कुणा अध्यापकाला हें पुस्तक शिकण्याचा प्रसंग आला, तर ते या टीपांचा अनुबंधाच्या दृष्टीनेंच अुपयोग करतील. अध्यापकाच्या मदती-वांचून जे नवयुवक हें पुस्तक टीपांसहित वाचतील, त्यांना यांवरून अनुबन्धाची थोडीशी कल्पना येअील. —का. का.

## मुखपृष्ठावरील श्लोक

**विश्वस्य मातरः**—हे राजन्, अशाप्रकारें आठवत गेल्या तसतशा, अितक्या नद्या मीं सांगितल्या. या सर्व विश्वाच्या माता आहेत आणि सर्वच शक्तिशाली व महान् फल देणाऱ्या आहेत.

धृतराष्ट्राच्या प्रश्नाला अुत्तर म्हणून संजयानें भारतवर्षाचें वर्णन करतांना जी नद्यांची नामावली दिली तिच्या अुपसंहारार्थ हें वाक्य म्हटलें आहे. महाभारतांतील भीष्मपर्वाच्या नवव्या अध्यायाच्या ३७ व्या व ३८ व्या श्लोकांचे पहिले दोन दोन चरण घेअून हा श्लोक बनविला आहे.

**यथास्मृति०**—'नद्या अनेक आहेत. मीं फक्त आठवल्या तेवढ्या सांगितल्या,' असा भाव आहे. ३७ व्या श्लोकाच्या शेवटच्या दोन चरणांत हें स्पष्ट आहे.

'तथा नद्यस्त्वप्रकाशाः शतशोऽथ सहस्रशः ॥'

तसेंच विशेष प्रसिद्ध नसलेल्या अशा तर शेंकडों आणि हजारों नद्या आहेत.

[ यांत संजयाची ( आणि लेखकाचीहि ? ) स्वतःच्या देशाबद्दलची अुत्कट देशभक्ति दिसून येते. 'सुजला-सुफला' मातेची विपुलता कोणी कमी लेखील अशी अतिस्नेहांतून अुद्भवलेली पापशंकासुद्धां यांत असेल काय ? ]

## जीवनलीला

पृ० (७) **ग्राम्य-आरण्य**—ग्राम्य व आरण्य हे दोन्ही शब्द या अर्थानें ऋग्वेदाच्या खालील ऋचेंत आलेले आहेत—

पशूंस्तांश्चक्रे वायव्यान्, आरण्यान्, ग्राम्यांश्च ये।

**लोकान्त**—अेकान्ताच्या विरुद्ध लोकान्त. हा शब्द तुकारामाचा आहे. 'अेकान्तीं लोकान्तीं करूं गदारोळ। लेश तोहि मळ नाहीं येथें ॥'

पृ० (९) **'डळयोः सावर्ण्यम्'**—ड आणि ळ समान वर्ण आहेत. 'डळयोरभेदः' सुद्धां म्हणतात.

पृ० (११) **लिम्पतीव**—मृच्छकटिक अंक १ श्लोक ३४. 'अंधार जणूं काय अवयव माखून टाकीत आहे व आभाळ जणूं काय काजळाचा वर्षाव करीत आहे.'

## सरिता-संस्कृति

पृ० (१५) **क्षेमेन्द्र**—अकराव्या शतकांतील अेक काश्मिरी पंडित कवि. यानें चाळिसाहून अधिक ग्रंथांची रचना केली आहे असें सांगतात, ज्यांत 'भारत-मंजरी', 'बृहत्कथामंजरी', 'नृपावली', 'सुवृत्त-तिलक', 'औचित्यविचारचर्चा', 'कवि-कंठाभरण' आदि ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

पृ० (१६) **मीनळदेवी**—कर्नाटकांतील चंद्रावती नगरीची राजकन्या, कर्णदेव सोळंकीची पत्नी, सिद्धराज जयसिंहाची माता. धोलक्याचा प्रसिद्ध 'मलाव' तलाव तसेंच वीरमगामचा 'मुनसर' तलाव हिनेंच बांधले होते. सोमनाथच्या दर्शनासाठीं जाणाऱ्या प्रत्येक यात्रेकरूकडून वसूल करण्यांत येणारा कर हिनें काढून टाकला होता. मोठी प्रजावत्सल राणी होती.

**अुर्वशी**—'अुर्' देशाची अुर्वशी.

## नदी-मुखेनैव समुद्रम् आविशेत्

पृ. (१८) **कूल-मर्यादा**—कूल=कांठ. कांठाचें बंधन. 'कुल-मर्यादा' शब्दावरून हा शब्द बनवला आहे. माहेर सोडून सासरीं जाणाऱ्या सुशील कन्यकांना 'कुल-मर्यादा' सांभाळून वागावें लागतें. आपल्या पर्वतपित्याचें घर सोडून पतिगृहीं सागराकडे जाणाऱ्या नदीला 'कूल-मर्यादा' सांभाळावी लागते.

**नामरूपाचा त्याग करून—**

यथा नद्यः स्यन्दमानाः समुद्रे
अस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय ।
(मुण्डकोपनिषद् २–८)

[ ज्याप्रमाणें वहाणाऱ्या नद्या नामरूपाचा त्याग करून समुद्रांत विलीन होअून जातात. ]

## अुपस्थान

पृ. (१९) **अुपस्थान**—पूजा, वंदन, अुपासना. अुदा० सूर्याचें अुपस्थान; संध्येचें अुपस्थान अि०

**पूर्वजांची नदीभक्ति**—लेखक सरस्वती-पुत्र सारस्वत आहे या गोष्टीचें येथें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं.

**भक्तीचे अुद्गार श्रवण करून**—श्रवण-भक्ति करून. त्यांतहि पुण्य सांठवलेलें आहे असें म्हणतात.

**संस्कृति-पुष्ट**—जगांतील जवळ जवळ सर्वच संस्कृती नदीकांठींच विकास पावल्या आहेत. अुदा० अीजिप्तची नाअीलच्या कांठीं, खाल्डियाची युफ्रेटिस व टायग्रिसच्या कांठीं, चीनची यांग्सेक्यांग व होआंगहोच्या कांठीं, मध्य अेशियाची अमुदरिया व सरदरिया यांच्या कांठीं. आणि हिंदुस्थानची पंचसिंधु, गंगा–यमुना, तापी–नर्मदा व कृष्णा–गोदेच्या कांठीं.

पृ० (२०) **भगवान सूर्यनारायणाच्या प्रेमाविषयीं**—तापी अथवा तपती सूर्याची मुलगी मानली जाते. ती संवरण राजाची पत्नी आणि कुरूची माता होती अशी कथा आहे.

**अितिहासाच्या 'अुषा-काला' पासून**—सामान्यपणें 'अुषःकाल' शब्द वापरला जातो. येथें हेतुपुरःसर 'अुषा-काल' शब्दाचा प्रयोग केलेला आहे. ब्रह्मपुत्रेच्या किनाऱ्यावर तेजपुरपाशीं बाणासुर आणि अुषा रहात होते असा स्थानिक अितिहासांत अुल्लेख आहे.

अुषा–अनिरुद्धाची कथा भागवताच्या दहाव्या स्कंधांत ६२–६३ व्या अध्यायांत येते. बलिपुत्र बाणासुराची कन्या अुषेचा अेकदां स्वप्नांत अेका सुंदर

तरुणाशीं समागम घडला. स्वप्नभंग झाल्यानंतर ती त्याच्या वियोगानें बरळूं लागली, तें तिची मैत्रीण चित्रलेखेनें अैकलें. चौकशी करतां अुषेनें स्वप्नांतला वृत्तांत सांगितला आणि या पुरुषाशीं विवाह केल्यावांचून आपण जगूं शकणार नाहीं असें आपलें मनोगत प्रकट केलें. चित्रलेखेनें आपली सिद्धि वापरून अेकामागोमाग अेक प्रसिद्ध पुरुषांचीं चित्रें काढून दाखवलीं. शेवटीं कृष्णाचा नातू अनिरुद्धाचें चित्र पहातांच अुषेनें म्हटलें कीं हाच तो मीं स्वप्नांत पाहिलेला पुरुष.

त्यानंतर चित्रलेखा योगबलानें द्वारकेला जाते. तेथून झोंपलेल्या अनिरुद्धाला पलंगासकट अुचलून घेअून येते. अुषा-अनिरुद्ध गांधर्व पद्धतीनें विवाह करतात आणि चार महिने अेकत्र रहातात. अुषेच्या पित्याला जेव्हां याचा सुगावा लागतो तेव्हां क्रुद्ध होअून तो अनिरुद्धावर तुटून पडतो. दोघांमध्यें युद्ध जुंपतें. त्यांत बाणासुर अनिरुद्धाला नागपाशानें बद्ध करून कैद करतो.

अिकडे द्वारकेंत अनिरुद्धाची शोधाशोध सुरू होते. नारद येअून बातमी देतो कीं अनिरुद्धाला शोणितपुरांत (वर्तमान तेजपुरांत) बाणासुरानें कैद करून ठेवलें आहे. हें अैकून संतापलेले यादव शोणितपुरावर चढाअी करतात आणि बाणाचा पराजय करून अुषा-अनिरुद्धासह मोठ्या थाटामाटानें द्वारकेला परततात.

पृ० (२१) **संभूय-समुत्थानाचा सिद्धान्त**—अेकत्र होअून अुन्नति करण्याचा सिद्धान्त. Joint Stock चा सिद्धान्त. स्मृतीमध्यें हा शब्द सांपडतो.

पृ० (२२) **समुद्रापर्यंत न पोंचतां......अडकून पडणारी**—दक्षिण गुजराथेंत बलसाडजवळील ‘वांकी’ नदीसुद्धां आपल्या नांवाप्रमाणेच वांकडीतिकडी वहात अगदीं समुद्राजवळ येअून अशी कांहीं वांकडी होते कीं दोन तीन मैल अुत्तरेकडे वाहून औरंगाला जाअून मिळते. आणि तिच्यासहच समुद्राला जाअून मिळते.

## १. सखी मार्कंडी

पृ० १. **मार्कंडी** : बेळगांवपासून नअू मैलांवर असलेल्या लेखकाच्या बेळगुंदी गांवाजवळून वहाणारी अेक चिमुकली नदी.

**वैजनाथ :** ( सं. वैद्यनाथ ) बेळगांवजवळील अेक डोंगर. यांत अनेक अमूल्य औषधी वनस्पति सांपडतात असें वैद्य लोक म्हणतात.

**आमच्या तालुक्याचा :** कर्नाटकाच्या बेळगांव तालुक्याचा.

पृ० २. **साधु सुंदर० :** मध्य काळांतील अेका कवीनें रचलेल्या मार्कण्डेय अुपाख्यानांतील या ओळी आहेत.

**मृत्युंजय :** महादेवाचें अेक नांव. ज्यांत विभक्तीच्या प्रत्ययाचा लोप होत नाहीं त्याला अलुक् समास म्हणतात. जसें धनंजय, गणंजय ( Dictator ), समितिंजय अि.

**आयुष्य–धारा :** मार्कण्डेय 'सप्तकल्पान्त जीविन्' म्हणजे सात कल्पें आयुष्य मिळालेला झाला असें आख्यानांत आहे. त्यावरून अेखाद्यास दीर्घायुषी हो असा आशीर्वाद देतांना 'मार्कंडेयायुर्भव' असा आशीर्वाद देण्याची देखील चाल आहे. आयुष्यधारा मार्कंडीच्या रूपानें वहात आहे ही लेखकाची कल्पना.

**भाअूबीज :** कार्तिक शुद्ध द्वितीयेच्या दिवशीं यमुनेनें स्वतःच्या भावाला म्हणजे यमाला घरीं बोलावून पूजा करून जेवूं घातलें होतें म्हणून या दिवसाला यम द्वितीया देखील म्हणतात. त्या दिवशीं बहीण स्वतःच्या भावाची पूजा करून भोजनापूर्वी खालील श्लोक म्हणून संकल्प सोडते :—

भ्रातस्तवानुजाताऽहं भुंक्ष्व भुक्तम् अिदं शुभम् ।
प्रीतये यमराजस्य यमुनाया विशेषतः ॥

( मोठी बहीण असल्यास ती 'भ्रातस्तवाग्रजाताऽहम्' असें म्हणते. )

**मृगनक्षत्र :** भाअूबीजेच्या दिवसांत–हिंवाळ्यांत–मृगनक्षत्र रात्रभर आकाशांत असतें. ( मृगनीता रात्रयः )

पृ० ३ **लावण्य :** ( सं. लवण + य ) गोडी–यौवनकांति. याचें लक्षण :

मुक्ताफलेषु छायायाः तरलत्वं अिवान्तरा ।
प्रतिभाति यदंगेषु तल्लावण्यम् अिहोच्यते ॥

## २. कृष्णेचीं संस्मरणें

पृ० ३ **सातारा :** लेखकाचें जन्मस्थान.

पृ० ४ **वेण्णा :** साताऱ्याची अेक लहानशी नदी.

**स्वर्गांत सुद्धां :** शिखांचे गुरु नानकशा स्वर्गांत देखील खिन्न रहात असलेले पाहून भगवंतांनीं अेकदां याचें कारण विचारलें. नानकशा म्हणाले, "या तुमच्या स्वर्गांत सर्व कांहीं आहे पण मक्याचीं कणसें आणि 'सरसू'ची भाजी मात्र नाहीं; यामुळें सारखी पृथ्वीची आठवण होते."!!

लोकमानसच असल्या कथा रचूं जाणे!

**अेकश्रुति :** नावीन्य नसलेला (Monotonous). हा वैदिक शब्द आहे. वेदांत तीन प्रकारचे अुच्चार आहेत : अुदात्त, अनुदात्त व स्वरित. या तिन्हीपैकीं अेकच अुच्चार फरक न करतां चालविणें याला अेकश्रुति म्हणतात.

पृ. ५ **तुंगभद्रा**—तुंगा आणि भद्रा या दोन नद्या मिळून तुंगभद्रा बनते. 'मुळामुठेचा संगम' (पृष्ठ ८) पहा. तुंगभद्रेच्या किनाऱ्यावर हंपीजवळ कर्णाटकी साम्राज्याची राजधानी विजयनगर वसलें होतें.

**तेलंगण**—त्रिलिंगाचा प्रदेश. 'कृष्णेचा अेक तरी बिन्दू... महाराष्ट्रीपण कधींहि विसरणार नाहीं.' आणि 'कृष्णेला प्रांतीयता ठाअूक नाहीं.' हीं दोन विधानें परस्पर विरोधी आहेत काय? लेखकाचें म्हणणें आहे कीं महाराष्ट्राच्या सद्गुणांबद्दल मनांत आदरभाव हा राहाणारच; परंतु तिन्ही प्रान्तांबद्दल आत्मीयता वाटूं लागल्यानंतर मनांत संकुचित भाव येअूंच शकत नाहींत.

पृष्ठ ६ **जीवनलीला**—जीवन म्हणजे आयुष्य व पाणी या दोन्ही अर्थीं.

**अनंतबुवा मर्ढेकर**—लेखकाचे प्रिय सुहृद. यांच्याच पवित्र स्मृतीला लेखकानें 'हिमालयांतील प्रवास' अर्पण केला आहे.

समर्थ रामदासांच्या मर्ढे मठांतील गृहस्थाश्रमी मठपतींच्या वंशांत यांचा जन्म झाला. वडील पुराणिक व हरदास होते. अनंतबुवा प्रथम मराठी ट्रेनिंग कॉलेजांत शिक्षक होते. नंतर ते लेखकाच्या पूर्वीच बडोद्याच्या 'गंगनाथ विद्यालयां'त सामील झाले. या विद्यालयाला निधि मिळवून देण्यासाठीं ते बडोदा राज्यांत सर्वत्र फिरत असत. त्यांचा मासिक खर्च कधींच दहा रुपयांच्या वर जात नसे. संस्थेच्या नियमानुसार त्यांना जे मासिक पांच रुपये हातखर्चाला म्हणून मिळत ते देखील ते विद्यार्थ्यांकरितां खर्चून टाकीत; किंवा हिशोबांत कुठें चूक आढळल्यास त्याची तोंडमिळवणी करण्यांत

त्यांचा अुपयोग करीत. रहाणी–करणींत यांची तुलना गुजराथचे प्रसिद्ध रचनात्मक कार्यकर्ते श्री रविशंकर महाराज यांच्याशीं करता येअील. त्यांचें पवित्र जीवन पाहून पुष्कळ लोक त्यांच्याकडून गुरुमंत्र मागत. पण स्वतःची अितकी लायकी नाहीं असें नम्रपणें सांगून ते असल्या विनंतीचा अस्वीकार करीत.

**गंगोत्री :** हिमालयांतील अेक तीर्थस्थान. गंगेचा अुगम येथून मानला जातो. वास्तविक गंगेचा अुगम गंगोत्रीहून चौदा मैल दूर 'गोमुख' या स्थानीं होतो. (लेखकाच्या 'हिमालयांतील प्रवास' या पुस्तकांतील 'गंगोत्री' हें प्रकरण पहावें.)

**अमरनाथ :** हें तीर्थस्थान काश्मीरमधें आहे. येथें अेका गुहेंत बर्फाचें स्वयंभू शिवलिंग आहे.

**गंगेचें :** कृष्णेला वाअीकर प्रेमभक्तीनें गंगा म्हणतात.

**शिरःस्नान :** कृष्णेच्या पुरांत वाअीचीं कितीतरी मंदिरें कळसासहित बुडून जातात.

पृ० ७ **स्वराज्य-महर्षि**—स्वराज्याचें **ध्यान** करणारे, स्वराज्यासाठीं **तपश्चर्या** करणारे व स्वराज्याचा **मंत्र** देणारे.

**पट-वर्धन :** द्रौपदीच्या पटा (वस्त्रा)चें वर्धन करणारे भगवान श्रीकृष्ण. द्रौपदीसारखी दयनीय स्थिति असलेल्या अर्ध-नग्न भारतभूमीची या चरख्यांनीं लाज राखली याचें सूचन आहे.

**चरखेसुद्धां तितक्या संख्येनें :** वीस लाख चरखे चालू करण्याचा विचार होता.

**बेझवाडा :** आंध्र प्रान्तांतील अेक मुख्य शहर. हें देखील कृष्णेच्या तीरावरच आहे.

**श्री. अब्बाससाहेब :** (१८५४–१९३६) चिर-तरुण देशभक्त श्री. अब्बास तैयबजी. कॉंग्रेसच्या तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. बद्रुद्दिन तैयबजी यांचे हे पुतणे. नंतर त्यांचे जामात झाले. पूर्वजीवनांत बडोद्याच्या हायकोर्टाचे न्यायमूर्ति होते. अुत्तरजीवनांत महात्माजींच्या प्रभावळींत येअून

त्यांनीं जाहीर जीवनांत महत्त्वाचें कार्य केलें होतें. पंजाब हत्याकांडाच्या चौकशी समितींत ते होते. असहकाराच्या आन्दोलनांत, टिळक-स्मारक फंड गोळा करण्याच्या कामांत, खादीप्रचाराच्या कामांत, सरकारी शाळा व कोर्टें यांच्यावर निरोधन करण्याच्या कामांत, खादीप्रचाराच्या कामांत, हिंदू-मुस्लिम अैक्याच्या कामांत, गुजराथ प्रलयसंकटाच्या वेळीं मदत देण्याच्या कामांत, बारडोलीच्या लढ्यांत व धरासणाच्या मिठागरावर हल्ला नेणाऱ्या महात्माजींच्या तुकडीचे नेते म्हणून त्यांनीं महत्त्वाची कामगिरी केली होती.

**श्री. पुणतांबेकर :** मुंबअीच्या राष्ट्रीय महाविद्यालयाचे त्यावेळचे आचार्य. बॅरिस्टर होते. खादीवर निबंध लिहिल्याबद्दल श्री. वरदाचारीबरोबर विभागलें गेलेलें पारितोषिक यांना मिळालें होतें. नंतर बनारस हिंदू युनिव्हर्सिटींत अितिहास विभागाचे मुख्य प्राध्यापक व नागपुर विश्वविद्यालयांत राजकारण विभागाचे मुख्य व 'राघवेन्द्रराव प्रोफेसर' म्हणून यांनीं काम केलें आहे.

**श्री गिद्वाणीजी :** स्व. श्री. असुदमल टेकचंद गिदवाणी हे गुजराथ विद्यापीठाचे पहिले कुलनायक (व्हाअीस चॅन्सेलर) आणि गुजराथ महाविद्यालयाचे पहिले आचार्य होत. गुजराथमध्यें येण्यापूर्वी हे दिल्लीच्या रामजस कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते.

**राष्ट्रीय हिंदी**—शुद्ध हिंदी म्हणजे प्रान्तीय हिंदी. प्रान्तीय भाषांच्या प्रभावानें जिचें नवें रूप घडत आहे ती 'राष्ट्रीय' हिन्दी होय.

## ३. मुळामुठेचा संगम

पृ. ८ **कलंकावांचून :** तुलना—'मलिनम् अपि हिमांशोर् लक्ष्म लक्ष्मीं तनोति ।'

**अपवादावांचून :** Exception proves the rule. अुत्सर्गाः सापवादाः ।

**मिसिसिपी–मिसोरी :** या नदीची लांबी ५४३१ मैल आहे! जेथें या दोन नद्यांचा संगम होतो तेथें पात्राची रुंदी पांच हजार फूट आहे!

**द्वंद्व-समास :** या समासांत दोन्ही पदें समान कक्षेचीं असतात.

**सीताहरणाच्या प्रसंगापासून...अि. :** रावण जेव्हां सीतेला पळवून

नेअूं लागला तेव्हां सीतेच्या साडीचा पदर हंपीजवळील अेका खडकावर अडकून ओढला गेला, त्यामुळें त्या खडकावर अेक रेषा अुमटली. आज देखील ती कायम आहे! तसेंच विजयनगरच्या साम्राज्याचा कारभार देखील तुंगभद्रेच्या किनाऱ्यावरूनच चालत असे. अि० १३४६ मधें या साम्राज्याची स्थापना झाली. साम्राज्याचा विस्तार कृष्णेपासून तो थेट कन्याकुमारीपर्यंत होता. सवादोनशे वर्षे मुसलमानांच्या आक्रमणाला टक्कर देअून अि० १५६५ सालीं हें साम्राज्य अस्तंगत झालें. विजयनगरचा विस्तृत अितिहास 'अे फॉरगॉटन अेम्पायर' (अेक विस्मृत साम्राज्य) या अिंग्रजी पुस्तकांत व 'विजयनगर के साम्राज्य का अितिहास' नामक हिंदी पुस्तकांत सांपडेल.

**खडकवासला :** पुणें-सिंहगड मार्गावरील सुदीर्घ जलागार (वाटर वर्क्स). येथूनच पुण्याला पाण्याचा पुरवठा होतो.

**चिंतातुर :** मनुष्य चिंता करूं लागला म्हणजे त्याच्या डोळ्यांची विशेष अुघडझांप होते. स्वतःच्या 'डोळ्यांची' ची अुघडझांप करणारे तारे जणूं काय चिंता करीत होते.

**बांग :** नमाजाची वेळ झाली, नमाजाकरिता चला, असें स्मरण देण्याच्या हेतूनें मशिदीच्या मनोऱ्यावरून देण्यांत येणारी आरोळी. (अरबी भाषेंत हिला 'अझान' म्हणतात.) प्रार्थनेचें स्मरण करविणाऱ्या बांगेप्रमाणें हे चरक रस-पानाचें स्मरण करून देत होते.

पृ. ९ **कॅप्टन मॅलेट :** पेशवाअी बुडवण्याचीं कारस्थानें करणारा ब्रिटीश वकील.

**गुजराथचे अेक लक्ष्मीपुत्र :** कर्वे विश्वविद्यालयाला ज्यांचें नांव देण्यांत आलें आहे ते सर विठ्ठलदास दामोदरदास ठाकरसी.

**अुत्तुंगशिरस्क पण नम्रनामधेय :** श्री. ठाकरसींचा बंगला अेका लहानशा टेकडीवर आहे म्हणून अुत्तुंगशिरस्क. चांगला भव्य वाडा असून पर्णकुटी (झोंपडी) हें विनम्र नांव देण्यांत आलें आहे म्हणून नम्रनामधेय 'नांव सोनूबाअी हातीं कथलाचा वाळा' याच्या अुलट प्रकार येथें आहे.

**येरवडा :** महात्माजींच्या वास्तव्यानें जग-प्रसिद्ध झालेलें पुण्याजवळील कारागार. हरिजनांच्या मताधिकारांसंबंधी प्रसिद्ध करार येथेंच झाला होता. महात्माजी याला 'यरवडा-मंदिर' म्हणत.

**निसर्गोपचार-भवन :** गांधीजी निसर्गोपचाराचे मोठे भोक्ते होते. सन १९४४ मधें कैदेंतून सुटल्यानंतर गांधीजींनीं निसर्गोपचाराचा प्रचार केला होता. त्याच दरम्यान ते या निसर्गोपचार-भवनांत राहिले होते. पुण्याजवळ अुरळी कांचनमधें सुद्धां त्यांनीं अेक नवें निसर्गोपचार केन्द्र अुघडलें होतें, जें अजून चालू आहे.

**सिंहगडचा निवास :** लेखकाला क्षयरोग झाला असतांना ते कांहीं काळ सिंहगडाला जाअून राहिले होते. त्याचा येथें अुल्लेख आहे.

## ४. सागरसरितेचा संगम

पृ० ११. **सुरूचें बन :** लेखकाच्या 'स्मरण–यात्रा' या पुस्तकांतील 'सुरूचें बन' हें प्रकरण पहा.

पृ० १३. **अुगमाचा शोध :** आपल्या 'हिमालयांतील प्रवास' या पुस्तकांत लेखक म्हणतो, "गंगोत्री, जम्नोत्री, बद्री, केदार, अमरनाथ, खोजरनाथ, राकसताल, परशुरामकुंड, अमरकंटक, महाबळेश्वर, त्र्यंबक अि. सर्व तीर्थस्थानें नदीचा अुगम शोधून काढणाऱ्या, मनुष्याच्या नैसर्गिक जिज्ञासेचा परिणाम आहेत असें मला वाटतें. अुत्तर ध्रुवावर राहाणारी आर्य प्रजा ज्याप्रमाणें अुष्णता देणारा हा सूर्य अुगवतो तरी कोठून आणि मावळतो तरी कुठें हें शोधून काढण्याच्या जिज्ञासेनें बाहेर पडून सर्व खंडांत पसरली, त्याचप्रमाणें भारताचे वीर पुत्र स्वतःच्या गुरांढोरांना घेअून किंवा अेकटेच नदीचा अुगम शोधीत हिंडत राहिले असल्यास नवल नाहीं."

अजिंठ्याच्या गुंफांजवळ सुद्धां लहानशा नदीचा अुगम आहे.

**शंकरराव गुलवाडी :** कारवारकडचे अेक सर्वोदय कार्यकर्ते.

## ५. गंगामाअी

पृ० १३ **देवव्रत :** भीष्माचें मूळचें नांव देवव्रत होते. परंतु पित्याला–शंतनूला–सत्यवती नांवाच्या अेका धीवर–कन्यकेबरोबर विवाह करता यावा व वारशाचा झगडा पुढेंमागें होणार नाहीं अशी खात्री सत्यवतीच्या बापाला मिळावी म्हणून देवव्रतानें आजन्म ब्रह्मचर्यपालनाची भीष्म (भीषण) प्रतिज्ञा केली म्हणून त्याला भीष्म असें नांव मिळालें. भीषण प्रतिज्ञेला भीष्म–प्रतिज्ञा अेवढ्याकरितांच म्हणतात.

पृ० १४ **आर्यांचीं मोठमोठीं साम्राज्यें** : हर्षाचें, मौर्यांचें अि०

**कुरुपांचाल** : दिल्लीच्या आसपासच्या भागाला कुरु व गंगा–यमुनेच्या मधल्या भागाला पांचाल म्हणत.

**अंगवंगादि** : गंगेच्या अुजव्या किनाऱ्यावर असलेलें प्रख्यात राज्य तें अंग. याची राजधानी चंपा होती. ही नगरी म्हणजे सध्यांचें भागलपूर असावें किंवा जवळपासचें कुठलेंतरी शहर असावें असें समजतात. पूर्व–बंगाल म्हणजे वंग. यांत समुद्रकिनाराहि येअून जाअी. अुत्तर बंगालला गौड किंवा पुंड्र म्हणत.

**सर्वांचेंच स्मरण होतें** : गंगेच्या कांठी शेती आणि व्यापारच नव्हे, तर काव्य, धर्म, शौर्य आणि भक्ति–थोडक्यांत म्हणजे सबंध संस्कृतीचाच विकास झाला आहे. पं. जवाहरलाल नेहरू आपल्या 'डिस्कव्हरी ऑफ अिंडिया' या ग्रंथांत म्हणतात—

"...आणि गंगा तर भारताची विशेष नदी होय. अितिहासाच्या अुषःकालापासून ती भारताच्या हृदयावर सत्ता गाजवीत आली आहे आणि आतांपर्यंत लाखों माणसांना तिनें आपल्या किनाऱ्याकडे आकर्षित केलें आहे. अुगमापासून ते मुखापर्यन्तची, प्राचीन काळापासून ते अर्वाचीन काळा-पर्यन्तची गंगेची कथा म्हणजे भारताच्या संस्कृति–सुधारणेची कथा होय. साम्राज्यांच्या अुदय-अस्तांची, विशाल, गर्वोन्नत नगरांची, माणसाच्या साहसाची व भारतीय तत्त्वचिंतकांच्या हृदयाची सतत पकड घेणाऱ्या तत्त्वांच्या अन्वेषणाची, जीवनाच्या समृद्धीची व साफल्याची तसेंच निवृत्तीची व संन्यासाची, पतनाची अभ्युदयाची, वृद्धि-क्षयाची जीवनमरणाची कथा होय."

**अुत्तरकाशी** : गंगोत्रीहून अुगम पावल्यानंतर गंगा जेथें प्रथमच अुत्तर-वाहिनी बनते तें स्थान. पहा 'हिमालयांतील प्रवास' या पुस्तकांतील वर्णन.

**देवप्रयाग** : जेथें भागीरथी व अलकनंदा यांचा संगम होतो तें स्थान. 'हि० प्र०' पहा.

**लक्ष्मणझूला** : हृषीकेशजवळ गंगा नदीवर हें स्थान आहे. येथें पूर्वी शिंक्याचा पूल होता. आतां तेथें लोखंडाच्या दोरखंडांनीं व सांखळ्यांनीं बांधलेला झुलता पूल आहे. येथें जवळच लक्ष्मणाचें मंदिर आहे. 'हि० प्र०' पहा.

**त्रिवेणीसंगम :** गंगा, यमुना व ( गुप्त रूपानें ) सरस्वती यांचा प्रयाग-जवळ होणारा संगम.

पृ. १५ **शर्मिष्ठा-देवयानी :** दैत्यराज वृषपर्व्याची कन्या शर्मिष्ठेबरोबर दैत्यगुरु शुक्राचार्यांची कन्या देवयानीची गाढ मैत्री होती. अेके दिवशीं दोघी जलक्रीडा करण्यास गेल्या. देवयानी पाण्यांतून प्रथम बाहेर पडली आणि चुकून तिनें राजकन्या शर्मिष्ठेचीं वस्त्रें अंगावर चढविलीं. यांतून भांडण अुत्पन्न होअून ते विकोपास गेलें व शर्मिष्ठेनें कोरड्या पडलेल्या अेका विहिरींत देवयानीस ढकलून दिलें. थोड्या वेळानें शिकार करून करून दमून भागलेला ययाति राजा तृषार्त होअून तेथें आला असतां त्यानें देवयानीस हात देअून बाहेर काढलें. घरीं जाअून देवयानीनें पित्याकडे तक्रार केली. क्रुद्ध झालेले शुक्राचार्य राज्य सोडून जाण्यास तयार झाले. वृषपर्व्यानें शेवटीं शर्मिष्ठेला देवयानीची दासी म्हणून ठेवण्याचें कबूल केलें, तेव्हां कुठें शुक्राचार्य परतले. पुढें संकटप्रसंगीं हात देणाऱ्या ययातीचेंच पाणिग्रहण करून जेव्हां देवयानी सासरीं गेली तेव्हां तिनें शर्मिष्ठेला दासी म्हणून बरोबर नेलें. तेथें तिच्या रूपगुणांवर मोहित होअून ययातीनें शर्मिष्ठेशीं गुप्तपणें लग्न केलें, आणि शेवटीं तिचाच सर्वांत धाकटा मुलगा ययातीचा वारसदार झाला !

म्हणूनच येथें देवयानीची कथा अैकतांना 'मोठ्या कष्टानें मिसळणारे' प्रवाह आठवतात असें म्हटलें आहे.

**प्रयागराज :** [ प्र (चांगल्या तऱ्हेनें) + यज् ( पूजा करणें ) + अ ( अधिकरण ) = जेथें अुत्तम तऱ्हेनें पूजा झाली आहे असें ठिकाण. ] अलाहाबाद. जेथें दोन नद्यांचा संगम होतो तें काव्यमय स्थान यज्ञासाठीं पसंत केलें जात असे.

**शरयू :** सरयू. कैलास पर्वतावरील मानस सरोवरांतून अुगम पावून अयोध्येला लागून वाहणारी नदी. हिलाच घोग्रा देखील म्हणतात. सरांतून ( सरोवरांतून ) निघाली म्हणून हिला सरयू नांव प्राप्त झालें. मराठींत शरयू नांव रूढ आहे.

**चंबल, रंतिदेव :** पृष्ठ १७४ पहा.

**शोणभद्र, गजग्राह :** पृष्ठ १७० पहा.

**पाटलीपुत्र :** बिहार राज्याचें आजचें पटणा. यालाच कुसुमपुर देखील म्हणत असत. चंद्रगुप्त मौर्य, अशोक आदि सम्राटांचें हें राजधानीचें शहर होतें. गुरु गोविन्द सिंहाच्या जन्मस्थानचा गुरुद्वारा येथेंच आहे.

**मगधसाम्राज्य :** समुद्रगुप्ताच्या काळीं याचा विस्तार सिन्धूपासून कावेरीपर्यन्त होता.

पृ० १६ **दाक्षिण्य :** संस्कृतांत दक्षिण शब्दाचे ' विनयी स्वभाव ' आणि ' दक्षिण दिशा ' असे दोन अर्थ होतात. याचा फायदा घेऊन लेखकानें मानापमानाच्या प्रश्नावर भांडूं पहाणाऱ्या नद्यांनीं सलोखा करून दाक्षिण्य ( विनयीपण, नम्रत्व ) धारण केलें व येथून त्या दक्षिणवाहिनी झाल्या असे दोन अर्थ अभिप्रेत केले आहेत.

विनय या अर्थानें दाक्षिण्याचें लक्षण खालीलप्रमाणें दिलें आहे

दाक्षिण्यं चेष्टया वाचा परचित्तानुवर्तनम् ।

( वाणी व वर्तनानें दुसऱ्याच्या वृत्तीला अनुकूल होऊन आनंद देणें म्हणजे दाक्षिण्य. )

**सगरपुत्र :** सूर्यवंशांतील बाहु नांवाचा राजा युद्धांत पराजित होऊन, राज्य सोडून, हिमालयांतील जंगलांत पळून गेला. तेथेंच त्याचा अंत झाला. त्यावेळीं त्याची अेक राणी सगर्भा होती. तिच्या सवतीनें त्या गर्भाचा नाश व्हावा या हेतूनें तिला विष घातलें. पण अितकें करूनहि तो गर्भ स्थिर राहिला. अशा तऱ्हेनें ' गर ' म्हणजे विषासहित तो जन्माला आला म्हणून त्याला ' सगर ' म्हणण्यांत आलें. वयांत आल्यावर सगरानें बापाचें राज्य परत मिळवलें. त्याच्या शैब्या नांवाच्या राणीनें असमंजस नांवाच्या पुत्राला व अेका कन्येला जन्म दिला. त्याच्या वैदर्भी नांवाच्या दुसऱ्या राणीला प्रसूतिकाळीं अेक मांसाचा गोळा अुत्पन्न झाला ! पण त्या मांसपिंडांतून साठ हजार पुत्र निघाले ! पुढें सगरानें ९९ यज्ञ पूर्ण करून १०० व्या यज्ञाला आरंभ केला. शंभर यज्ञ पूर्ण झाले तर स्वतःचें अिन्द्रपद सगराकडे जाअील या भीतीनें अिन्द्रानें यज्ञाचा मोकळा सोडण्यांत आलेला घोडा चोरून पाताळांत कपिल मुनि तपश्चर्या करीत होते तेथें नेअून बांधला. सगराच्या साठ हजार पुत्रांनीं घोड्याकरतां सर्व पृथ्वी धुंडाळली. पृथ्वीवर कोठेंहि घोडा नाहीं अशी

खात्री झाल्यानंतर पाताळांत जाण्याकरतां त्यांनीं पृथ्वी बरीचशी खणून काढली. ( सगराच्या साठ हजार पुत्रांनीं खोदलेल्या या अफाट खड्ड्यांत पुढें जेव्हां पाणी भरलें तेव्हां त्याला सागर हें नांव मिळालें. ) शेवटीं अेकदांचे ते घोड्यापाशीं येअून पोहोंचले. ध्यान करीत बसलेल्या कपिल मुनींना ढोंगी चोर समजून त्यांचा सगरपुत्रांनीं अपमान केला. क्रोधित मुनींनीं स्वतःच्या तपोबळानें त्यांना अेका क्षणांत जाळून भस्म करून टाकलें. पुढें चुलत्यांच्या व घोड्याच्या शोधार्थ निघालेला असमंजसचा पुत्र अंशुमान् फिरत फिरत तेथें येअून पोहोंचला. मुनींना प्रसन्न करून त्यानें घोडा तर परत आणला व अशा रीतीनें यज्ञ अेकदांचा पुरा केला. पण स्वतःच्या साठ हजार चुलत्यांना सद्गति कशी मिळेल याचीहि माहिती त्यानें कपिल मुनीकडून आणली. स्वर्गांत वाहणाऱ्या गंगेला पृथ्वीवर आणून गंगाजलाचा स्पर्श जर त्या भस्म झालेल्या सगर पुत्रांना कुणी करविला तर त्यांचा अुद्धार होअील असें कपिल मुनींनीं सांगितलें. अंशुमानानें स्वतःचें सर्व आयुष्य त्याकरितां तपश्चर्या ( Surveying ? ) करण्यांत घालवलें. त्याचा पुत्र दिलीप यानेंहि ही तपश्चर्या पुढें चालू ठेवली. आणि शेवटीं दिलीपचा मुलगा भगीरथ यानें ती तपश्चर्या पूर्ण करून गंगेला पृथ्वीवर आणलें. तिचा प्रवाह जेव्हां साठ हजार सगर-पुत्रांच्या भस्मीभूत देहांवरून गेला तेव्हां त्यांचा अुद्धार झाला. भगीरथानें गंगेला स्वर्गांतून पृथ्वीवर अुतरवली म्हणून तिला भागीरथी नांव मिळालें.

[ भगीरथ हा कालवा बांधण्याच्या ( Irrigation ) विद्येंत प्रवीण असावा. यावरून 'अिरिगेशन'साठीं 'भगीरथविद्या' हा सुन्दर शब्द लेखकानें भारतीय पारिभाषिक शब्दभांडारासाठीं अुत्पन्न केला आहे. ]

## ६. यमुनाराणी

पृ० १७ **भव्यतेची भव्यता कमी करणें** : भव्यतेचे ढिगावर ढीग रचून अतिपरिचयाद् अवज्ञा या म्हणीप्रमाणें त्याचें महत्त्व कमी करणें.

**असित ऋषि** : व्यासांचे अेक शिष्य.

पृ० १८ **अेक कवि-हृदय ऋषि** : लेखकानें त्याला नांव दिलें आहे 'यामुन ऋषि' ( हि० प्र० पहा )

**अंतर्वेदी :** पूर्वी गंगायमुनेमधील प्रदेशाला हें नांव होतें. त्यावरून आतां आपण कोणत्याहि दोन नद्यांच्या मधल्या प्रदेशाला अंतर्वेदी ( दोआब ) म्हणूं लागलों आहोंत.

**ब्रह्मावर्त :** कुरुक्षेत्राजवळचा दृषद्वती व सरस्वती या नद्यांमधील प्रदेश. हल्लीं याला ' बिठूर ' म्हणतात.

पृ० १९ **रोमहर्षण :** अंगावर शहारे ( आश्चर्याचे व आनंदाचे ) अुभे करणारा. ' संवादम् अिमम् अश्रौषं अद्भुतं रोमहर्षणम् । ' गीता (१८-७४)

**यमराजाच्या भगिनीचें बंधुत्व :** यम, यमुना ( अुर्फ यमी ) व अश्विनीकुमार हीं सूर्य व त्याची पत्नी संज्ञा यांचीं मुलें. अेकदां संज्ञेला स्वतःच्या माहेरीं ( विश्वकर्मा हा तिचा पिता ) जाण्याची अिच्छा झाली. पण सूर्य परवानगी देअीना. तेव्हां मायेच्या बलानें स्वतःची हुबेहूब प्रतिकृति अशा छाया नांवाच्या अेका स्त्रीस अुत्पन्न करून तिला सूर्याजवळ ठेअून संज्ञा माहेरीं निघून गेली. सूर्याला मुळींच कळलें नाहीं कीं ही स्त्री संज्ञा नव्हे. यमाला देखील तीच मोठा करूं लागली. पण पुढें तिच्या मनांत सापत्न भाव प्रकट झाला व ती यमाची अुपेक्षा करूं लागली. त्यामुळें रागावलेल्या यमानें अेकदां तिच्यावर लाथ अुगारली. म्हणून छायेनें त्याला शाप दिला. त्यामुळें यमाच्या पायावर व्रण पडले व कालान्तरानें त्यांत किडे वळवळूं लागले. जिकिरीस आलेल्या यमानें सर्व हकीकत सूर्याला सांगितली. अुपाय म्हणून सूर्यानें यमाला अेक कुत्रा दिला. तो त्याच्या व्रणांतून निघणारा पू व किडे खाअून टाकून यमाचा पाय स्वच्छ ठेअूं लागला.

कथेंत म्हटलें आहे कीं पुढें यमानें दक्ष प्रजापतीच्या तेरा मुलींशीं लग्न केलें. त्यांपासून पुढील प्रमाणें संतति झाली. श्रद्धेपासून सत्य, मैत्रीपासून प्रसाद, दयेपासून अभय, शांतीपासून शम, तुष्टीपासून हर्ष, पुष्टीपासून गर्व, क्रियेपासून योग, अुन्नतीपासून दर्प, बुद्धीपासून अर्थ, मेधेपासून स्मृति, तितिक्षेपासून मंगल, लज्जेपासून विनय, आणि मूर्तीपासून नर आणि नारायण.

प्रत्येक जीवाच्या पाप-पुण्याचा हिशोब पाहून यम न्याय देतो. या कामीं त्याचा मंत्री चित्रगुप्त त्याला मदत करतो. यमाचें वाहन रेडा व हत्यार दण्ड आहे.

अशा अखिल सृष्टीवर शासन चालविणाऱ्या भावाची बहीण देखील तशीच प्रतापी असावयाची. तेव्हां तिचा भाऊ होऊं पाहणारा मनुष्य असामान्यच असला पाहिजे. वाटेल त्याला तें जुळणार नाहीं, असें येथें सूचन आहे.

**ताजबीबी :** मुमताजमहल हें नांव फार मोठें वाटतें, म्हणून त्या ऐवजीं हें नाजुक नांव वापरलें आहे. आग्र्यामधें ताजमहाल 'ताजबीबीका रोजा' या नांवानेंच प्रसिद्ध आहे.

**थिजलेले अश्रु :** शुभ्रमूर्ति ताजमहाल. लेखकानें आपल्या ताजमहालाच्या वर्णनांत लिहिलें आहे, 'ही समाधि नाहीं, एका प्रेमरसिक सम्राटाचें दुःख येथें थिजलें आहे.' (पहा 'जीवनांतील आनंद'.) गुरुदेव रवीन्द्रनाथांनीं आपल्या 'शा-जाहान' या कवितेंत ताजमहालाला 'कालाच्या कपोलावरील अश्रुबिंदु' (एकबिन्दु नयनेर जल, कालेर कपोलतले शुभ्र समुज्ज्वल, ए ताजमहल ॥) म्हटलें आहे.

**चर्मण्वती :** प्रकरण ४४ पहा.

**सिन्धु :** माळव्यांतून वाहणारी या नांवाची एक लहानशी नदी. 'मेघदूतां'त २९ व्या श्लोकांत हिचा उल्लेख येतो.

वेणीभूत–प्रतनु–सलिलासावतीतस्य सिन्धुः
पाण्डुच्छाया तटरुहतरुभ्रंशिभिर् जीर्णपर्णैः।

भवभूतीच्या 'मालती माधवां'त चौथ्या अंकाच्या शेवटल्या विभागांत मकरंद माधवला म्हणतो, ''चल ऊठ, पारा आणि सिन्धु नदीच्या संगमांत स्नान करून आपण नगरांतच प्रवेश करूं या.'-(तदुत्तिष्ठ पारासिंधुसंभेदम् अवगाह्य नगरीमेव प्रविशावः।)

कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' या नाटकांतहि पांचव्या अंकांत या नदीचा उल्लेख आला आहे.

**तोंडांत साखर टाकून :** काल्पीला खडीसाखरेचे कारखाने आहेत त्यांचें येथें सूचन आहे.

**अक्षयवट :** प्रयाग, भुवनेश्वर, गया इ. ठिकाणीं रोवण्यांत आलेले वडाचे ठोंब. या वडाची पूजा केल्यानें अक्षय पुण्याची प्राप्ति होते म्हणून याला अक्षयवट म्हणतात. (हिमालयाचा प्रवास प्र० २ पहा.)

**वृद्ध अकबर :** अकबरानें येथें अेक किल्ला बांधलेला आहे.

पृ० २० **अशोकाचा शिलास्तंभ :** याच्यावर अशोकाचा धर्मलेख कोरलेला आहे.

**सरस्वती :** वाणी प्रयागांत गुप्तस्रोतानें वाहणाऱ्या सरस्वतीचेंहि सूचन आहे.

**कादंब :** कलहंस.

**धवलशीला :** शुभ्र ( स्वच्छ ) शील ( चारित्र्य ) असलेली. मेघ-श्यामाच्या जोडीला म्हणून योजलेल्या या विशेषणांत विशेष गोडी आहे.

**अिंदीवरश्यामा :** अिंदीवर म्हणजे नीलकमल, त्याच्याप्रमाणें श्याम. अिंदीवरश्याम आणि गौर वर्णांच्या संगमापासून अन्योन्य शोभेनें सौंदर्य अुत्पन्न होतें ही संस्कृत कवींची कल्पना जुनी आहे. तुलना :

अिन्दीवरश्यामतनुर् नृपोऽसौ त्वं रोचना-गौर-शरीरयष्टिः ।
अनोन्यशोभापरिवृद्धये वां योगस् तडित्तोयदयोर् अिवास्तु ॥

—रघुवंश ६-६५

**सुधाजला :** सुधा = अमृत. अमृतासारखें पाणी असलेली. शिवाय अमृत पांढरें मानलेलें आहे. तेव्हां शुभ्रजल असलेली. सुधेचा अर्थ चुना असाहि होतो. धवलजला नदी जणूं काय चुन्याच्या निवळीसारखी असावी अशी दिसते.

**जाह्नवी :** गंगा. सगरपुत्रांच्या अुद्धारार्थ भगीरथ गंगेला घेअून चालला असतां वाटेंत जह्नु नांवाच्या अेका राजर्षीची यज्ञसामग्री तिच्या प्रवाहांत वाहून गेली. तेव्हां रागावलेल्या जह्नूनें स्वतःच्या तपोबळानें सर्व गंगा पिअून टाकली ! पण भगीरथानें त्याची हात जोडून प्रार्थना केल्यावर त्यांनीं गंगेला स्वतःच्या कानांतून ( कांहींच्या मतें मांडींतून ) सोडून दिलें. जह्नु ॠषीच्या कानांतून बाहेर पडली म्हणून यापुढें गंगेला जाह्नवी असें नवीन नांव प्राप्त झालें.

## ७ मूळ त्रिवेणी

पृ. २१ **ब्रह्मकपाल :** हिमालयांत बदरीनारायण या तीर्थांत या नांवाची अेक शिला आहे. हिच्यावर बसून श्राद्ध केल्यानें माणसाच्या सर्व पूर्वजांना

मुक्ति मिळते व पुन्हां कधींच श्राद्ध करावें लागत नाहीं असा समज आहे. ( पहा ' हिमालयाची यात्रा ' प्र. ४२ )

पृ. २२ **हरिचरणाला स्पर्श :** हरद्वार येथील ' हरिकी पायरी ' या जागेचें सूचन. पुढलें प्रकरण पहा.

# ८ जीवनतीर्थ हरद्वार

पृ. २२ **त्रिपथगा :** तीन मार्गांनीं वहाणारी. स्वर्गगामिनी मंदाकिनी मर्त्यवाहिनी गंगा आणि पातालगामिनी भोगवती.

पृ. २३ **प्रशम-कारी :** शांतिदायक. प्रशमचा अर्थ निर्वाण आणि वैराग्य असाहि होतो.

पृ. २४ **महोल्ला :** शिख गुरूंच्या भजनांच्या अंतीं नानकाचेंच नांव येतें. त्यामुळें कोणतें भजन कोणत्या गुरूनें लिहिलें हें कळायला मार्ग नसतो. 'ग्रंथसाहेब'चा जेव्हां संग्रह केला गेला तेव्हां हीं सर्व भजनें गुरूंच्या क्रमाप्रमाणें वेगवेगळीं केलीं गेलीं आणि प्रत्येक गुरूच्या भजनांचा ' महोल्ला ' वेगळा करण्यांत आला. त्यामुळें आतां कोणतें भजन कोणत्या गुरूचें आहे हें कळूं शकतें.

**आसा-दि-वार :** असावरी राग.

**मुक्तिसेना :** साल्वेशन आर्मी नांवाची फौजी पद्धतीनें संघटित खिस्ती लोकांची अेक संस्था. या संस्थेचे लोक भगवीं वस्त्रें परिधान करतात.

पृ. २५ **दीपदानाचें :** अशाच प्रकारचें काव्यमय वर्णन लेखकानें ' हिमालयाची यात्रा ' पुस्तकांत ' गंगाद्वार ' या प्रकरणांत केलेलें आहे, तें पहावें.

**वाजिनीवती अुषा :** अृग्वेदांतील अुषेसंबंधींच्या सूक्तांत तिला वाजिनी-वती म्हटलें गेलें आहे. तेथें त्याचा अर्थ ' बलवती ' किंवा 'समृद्धिशालिनी' असा होतो.

अुषस् तत् चित्रतमा भर अस्मभ्यं वाजिनीवती ।
येन तोकं च तनयं च धामहे ॥

[ हे बलवती व समृद्धिशालिनी अुषे, आम्हांला सुंदर ( बल किंवा संपत्ति ) दे, जेणें करून आम्ही पुत्र आणि प्रपौत्र धारण करूं शकूं. ] मंडल १, सूक्त ९२—१३.

'वाज' शब्दाचा अर्थ आहे बल, वीर्य, वेग. यावरून 'वाजिन्' म्हणतात बलवानाला, वीर्यवानाला, वेगवानाला. नंतर या अर्थ होअूं लागला, ज्यांत हे सर्व गुण आहेत असा युद्धाच्या रथाचा घोडा. याचेंच स्त्रीलिंगी रूप आहे, 'वाजिनी' = घोडी. यावरून 'वाजिनीवत्' म्हणतात वेगवान घोडी हांकणाऱ्याला किंवा तिच्या मालकाला. याचेंच स्त्रीलिंग रूप आहे, 'वाजिनी-वती'. जेव्हां हें विशेषण सिन्धु किंवा सरस्वतीला लावलें जातें तेव्हां त्याचा अर्थ होतो—बलवान, वेगवान घोड्यांनीं समृद्ध.

बल आणि वीर्य समृद्धीचें मूळ आहे. म्हणूनच समृद्धीचा अर्थहि यांत येअून जातो. आणि धान्य सुद्धां अेक प्रकारची समृद्धि आहे. त्यामुळें या शब्दांत ह्या अर्थाचा सुद्धां समावेश होतो. कधीं कधीं 'वाजिनीवती' चा अर्थ 'अन्नवाली' असा सुद्धां होतो.

> स्वश्वा सिन्धुः सुरथा सुवासा हिरण्मयी सुकृता वाजिनीवती ।
> अूर्णावती युवतिः सीलमावत्युताधि वस्ते सुभगा मधुवृधम् ॥
>
> मं. १०, सू. ८२–८

[ अुत्तम घोडे असलेली, चांगले रथ असलेली, सुन्दर वस्त्रें असलेली, हिरण्यमयी, सुघटित, अन्नवती, लोकर असलेली, सण असलेली, युवती आणि सुभगा सिन्धु मधुवृक्ष ( मध वाढणारीं ) झुडपें धारण करते. ]

कठोपनिषदांत 'वाजस्रवस्' चा अुल्लेख आहे. तेथें 'वाज' चा अर्थ आहे अन्न. त्याच्या दान आदिमुळें ज्याला 'स्रवस्' = यश मिळालें आहे तो 'वाजस्रवस्.'

'वाजीकर' औषध म्हणजे शक्तिवर्धक औषध. 'वाजीकरण' प्रयोग म्हणजे शक्ति वाढवण्याचा प्रयोग. हे शब्दसुद्धां याच्याशीं संबंधित आहेत.

## ९ दक्षिणगंगा गोदावरी

पृ. २७ **वाल्मीकीच्या अेका कारुण्यभावनेंतून :** क्रौंचमिथुनापैकीं अेका पक्ष्याचा वध झालेला पाहून, कारुण्यानें हृदय भरून येअून वाल्मीकीच्या

मुखांतून अेका नव्याच–अनुष्टुप् छंदांतून शापवाणीचा अुच्चार झाला. याच छंदांत त्यांनीं पुढें सारें रामायण रचलें.

**सहनवीर रामचंद्र :** दुःख–संवेदनायैव रामे चैतन्यम् आहितम् ।'– अुत्तररामचरित.

पृ. २८ **कल्पांतिक :** कल्प = ब्रह्मदेवाचा अेक दिवस = १००० युगें = ४३२० लक्ष मानवी वर्षें. सृष्टि अेक कल्प टिकतें असें समजतात. सृष्टीच्या अंतापर्यंत टिकेल असें. ( कल्प + अंत + अिक )

**जनस्थान :** गोदावरीच्या तीरीं जेथें रामचन्द्र राहिले होते तो दंडकारण्याचा भाग. या ठिकाणीं राक्षसांचा अुपद्रव कमी होता व त्यामुळें लोक ( जन ) तेथें वसती करून राहूं शकत. यावरून त्या जागेला ' जनस्थान ' हें नांव मिळालें.

**जटायु :** अेक पक्षीराज. अरुणाचा पुत्र, संपातीचा लहान भाअू, दशरथ राजाचा परम मित्र. रावण सीतेला बलात्कारानें घेअून जात असतांना सीतेच्या तोंडून ' राम, राम ' अशा हांका अैकून जटायूनें रावणाशीं युद्ध करून सीतेला सोडवण्याचा प्राणपणानें प्रयत्न केला. परंतु त्याला यश मिळालें नाहीं. त्याला मरणासन्न स्थितींत सोडून रावण सीतेला घेअून निघून गेला. अिकडे राम जेव्हां सीतेचा शोध करीत तेथें पोंचले, तेव्हां जटायूनें त्यांना रावण सीतेला घेअून गेल्याचें सर्व वर्तमान सांगितलें व मगच प्राण सोडले.

**हनुमानाला असें कांहींच :** कारण तो आजीवन बालब्रह्मचारी होता.

**किष्किंधा :** या नगरींत हनुमानाचा जन्म झाला. तुंगभद्रेच्या कांठीं हंपीजवळ आज या नांवाचें अेक खेडें आहे.

पृ. २९ **दशग्रंथी :** ऋक्, यजुर्, साम आणि अथर्व हे चार वेद; व शिक्षा ( स्वरोच्चाराबद्दलचें शिक्षण ), छंद, व्याकरण, निरुक्त ( व्युत्पत्ति व अर्थासंबंधीं ), ज्योतिष आणि कल्प अशीं सहा वेदांगें; अशा दहा ग्रंथांचें पठण करून पारंगत झालेला ब्राह्मण.

**व्यवस्थापत्रें :** निर्णयपत्रें, निकाल.

**शंकराचार्यांचा जो छळ झाला :** शंकराचार्यांची आअी त्यांना संन्यास घेण्याची परवानगी देत नव्हती. अेकदां स्नान करीत असतांना मगरीनें त्यांचा पाय पकडला. शंकराचार्यांनीं हांक मारून आअीला म्हटलें, ' आतांतरी मला

संन्यास घेण्याची परवानगी दे.' आओीनें परवानगी देतांच शंकराचार्य मगराच्या जबड्यांतून मुक्त झाले. ते पूर्ण मातृभक्त होते. परंतु संन्यास धर्मानुसार ते आओीबरोबर राहूं शकत नव्हते, आओीचें दर्शन देखील घेअूं शकत नव्हते. असें असूनहि त्यांनीं घर सोडतांना मातेला आश्वासन दिलें कीं, 'संकटसमयीं तूं बोलावतांच मी हजर होओीन.' कांहीं कालानंतर त्यांची आओी आजारी पडली. तिला मुलाला भेटण्याची इच्छा झाली. वचन दिल्याप्रमाणें शंकराचार्य आले आणि मातेच्या अंतापर्यंत त्यांनीं तिची सेवा केली. मातेनें सुखानें प्राण सोडले.

परंतु खरीं संकटें यापुढेंच सुरू झालीं. शव स्मशानांत घेअून जावयास गांवचे ब्राह्मण तयार होओीनात. आपल्या स्मशानांत शवाला अग्नि देण्याची परवानगीहि त्यांनीं नाकारली. लाकडें सुद्धां कुणी दिलीं नाहींत. ब्राह्मणांनीं ठरवलें कीं जो संन्यास घेतल्यानंतर आपल्या पूर्वाश्रमीच्या आओीला भेटायला येतो त्याचें हें करणें शास्त्राविरुद्ध आहे; त्याचा बहिष्कारच केला पाहिजे. शंकराचार्यांनीं आपल्या आओीच्या शवाचे चार तुकडे केले, केळी तोडून आणल्या, त्यांवर हे तुकडे ठेअून त्यांनीं आपल्या मातेच्या अंगणांतच योगाग्नि पेटवला आणि आपल्या तपस्तेजानें तिला सद्‌गति दिली.

शंकराचार्यांचा गांव ज्या राज्यांत होता त्या राज्याचा राजा त्यांचा शिष्य होता. आपल्या पूज्य गुरूवर झालेल्या या जुलमाची बातमी कळतांच त्यानें आपल्या राज्यांतील नांबुद्री ब्राह्मणांना शिक्षा केली कीं त्यांना आपल्या घरच्या लोकांचीं शवें स्मशानांत घेअून जाता येणार नाहींत. घरच्या अंगणांतच त्याचे चार तुकडे करून त्यांनीं जाळावे. राजानें या शिक्षेची कडक अमलबजावणी करण्याचें ठरवलें. ब्राह्मण घाबरले. त्यांनीं माफी मागितली. तेव्हां राजानें शवाचे चार तुकडे करण्याअैवजीं शवावर चार रेषा काढून नंतर शव स्मशानांत घेअून जाण्याची परवानगी दिली.

**अष्टवक्रा :** आठहि अंगांनीं वांकडी; अनेक वळणें घेअून वाहणारी.

पृ. ३० **यानान :** समुद्रकांठीं गोदावरीच्या मुखाजवळील अेके काळचें फ्रेंच संस्थान. सन् १७५० मधें फ्रेंच कंपनीनें याचा कब्जा घेतला आणि दोन वर्षांनंतर तें फ्रेंच सरकारच्या ताब्यांत दिलें. आतां तें स्वतंत्र भारतांत विलीन झालें आहे.

पृ. ३१ **भवभूतीचें स्मरण :** भवभूतीनें 'अुत्तररामचरितां'त गोदेच्या विविध सौंदर्यांचें वर्णन केलें आहे म्हणून. [ १–२५, २-१४, २–२०, २–२३, २–२४, २–२५, २–२९, २–३०, ३–८ पहा. ]

**वैदिक प्रभातकाल :** वेदकाळीं आर्य जेथें रहात असत तेथें प्रभात धुक्यानें भरलेली असे म्हणून येथें अंधुक प्रभाताला वैदिक म्हटलें आहे.

पृ. ३२ **कवीच्या प्रतिभेप्रमाणें :** 'प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मता।' अशी प्रतिभेची व्याख्या आहे. (नवनवीन स्फुरण दाखवणारी ती प्रतिभा.)

**चरित्र :** [ चर् (चालणें) + अित्र (साधन) = चालण्याचें साधन = पाय. ] चाल; आचरण. वेदांत चरित्र शब्द पाय या अर्थीं आलेला आहे.

## १० वेदांची धात्री तुंगभद्रा

पृ. ३६ **द्वन्द्वः समासिकस्य च ।**—समासांत मी द्वन्द्व आहें. (गीता १०–३३) या समासांत दोन्ही पदांचें महत्त्व सारखेंच असतें या गोष्टीवर भर आहे.

## ११ नेल्लूरची पिनाकिनी

पृ. ३७ **नेल्लूर :** (नेल्ल = भात + अूरु = गांव) भाताचें गांव.

## १२ जोगचा धबधबा

पृ. ३९ **होन्नावर**—अुत्तर कर्णाटकांत पश्चिम समुद्र तटावरील अेक शहर.

पृ. ४० **कारकळ**—दक्षिण कर्णाटकांत मंगळूर आणि अुडपी यांच्या दरम्यान येणारें अेक शहर. येथें हैदरानें बांधलेलें हनुमानाचें मंदिर आहे. जवळच्या टेकडीवर बाहुबलीची अेक भव्य मूर्ति अुभी आहे.

**मनसा चिन्तितं०**—आपण मनांत आणतों अेक आणि दैव करतें दुसरेंच.

**गुजरातचा महापूर**—सन् १९२७ त गुजरातमधें अतिवृष्टीमुळें हजारो घरें कोसळलीं होतीं. लोक अन्न, वस्त्र व आश्रयविहीन बनले होते. त्यावेळीं सरदार वल्लभभाअींनीं आपल्या अद्भुत व्यवस्था–शक्तीनें आणि धनिकांच्या मदतीनें लोकांना मदत करण्याचें भगीरथ कार्य सफलतापूर्वक पार पाडलें होतें.

पृ. ४१ **गंगाधरराव**—श्री. गंगाधरराव देशपांडे. टिळकांचे कट्टर अनुयायी. टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीजींचें कार्य करूं लागले.

**स्थितधीः०**—स्थितप्रज्ञ कसा बोलतो, कसा बसतो, कसा चालतो? (गीता २–५४).

**कुलशिखरिणः०**—पुरा श्लोक असा आहे—

विरम विरमायासाद् अस्माद् दुरध्यवसायतो
विपदि महतां धैर्य-ध्वसं यद् ओक्षितुम् ओहसे।
अयि जडमते! कल्पापाये व्यपेत-निजक्रमाः
कुल-शिखरिणः क्षुद्रा नैते न वा जलराशयः॥

[अरे बुद्धिहीना, विपत्तीच्या वेळीं महात्म्यांचा धैर्यनाश झालेला पहाण्याची तुझी अिच्छा असेल तर तो व्यर्थ प्रयत्न सोडून दे. असले महात्मे तुमच्या क्षुद्र कुलपर्वतांप्रमाणें किंवा पामर सागराप्रमाणें प्रलयकाल आला तरी स्वधर्मकर्माचा नियम अुल्लंघीत नाहींत. (स्वतःची मर्यादा न ओलांडणारा सागर आणि स्वतःचें स्थैर्य न सोडणारे कुलपर्वत प्रलयकाल आला म्हणजे स्वधर्म विसरतात. पण महात्मे कधींच विचलित होत नाहींत.)]

आदर्श अुपमानाला तुच्छ मानून अुपमेय वस्तु अुपमानाहूनहि श्रेष्ठ आहे असें दाखवण्याच्या पद्धतीला संस्कृतमधें प्रतीप अलंकार म्हणतात. यांत अतिशयोक्ति तर असतेच.

पृ. ४५ **नमः पुरस्तात्०**—"हे सर्वा! तुला पुढून, मागून, सर्व बाजूंनीं नमस्कार असो. तुझें वीर्य अनंत आहे. तुझी शक्ति अपार आहे. सर्व तूंच धारण करतोस. म्हणूनच तूं सर्व आहेस." (गीता ११–४०)

**सुदुर्दर्शम् अिदम्०**—'जें माझें रूप तूं पाहिलेंस त्याचें दर्शन दुर्लभ आहे. देव देखील हें रूप पहाण्यास अुत्सुक असतात.' (गीता ११–५२)

**तें स्वप्न होतें०**—'स्वप्नो नु माया नु मतिभ्रमो नु?' शाकुन्तल ६–१०

**व्यपेतभीः०**—भीति सोडून प्रसन्न-चित्त हो आणि तेंच माझें रूप पुन्हा पहा.' (गीता ११–४९)

पृष्ठ ४६ **देवदास**—स्व. देवदास गांधी.

**मणिबेन**—सरदार पटेलांची मुलगी.

**लक्ष्मी**—राजगोपालाचार्यांची मुलगी–श्री. देवदास गांधींची पत्नी.

‘**अण्णा**’—म्हणजे राजाजी.

**पत्रं नैव यदा०**—वसंत ऋतूंत जेव्हां सर्व वृक्षांना नवी पालवी फुटते, तेव्हां अेकट्या करीर वृक्षावरच जर पानें नसतील तर त्यांत वसंताचा काय दोष? घुबड जर दिवसा पहात नसेल तर तो सूर्याचा दोष म्हणतां येअील का?

पृष्ठ ४७ **अुच्छिष्ट** : [ अुत् + शिष्ट ] अुष्टें नव्हें, तर शेतकऱ्यांनीं कापणी करून घेतल्यावर अुरलेलें असा अर्थ आहे.

**परिग्रहो भयायैव** : परिग्रहांत–संग्रह करून ठेवण्यांत—अेकंदरींत भयच आहे.

‘**निस्**’ **जातीचे दगड** : (Gneiss) पापुद्रे असलेले दगड ज्यांत अभ्रक, चकमक आदींचा समावेश होतो.

पृ. ४८. **भगिनी निवेदितांची प्रख्यात तुलना**—The web of Indian Life पृ. २४१ पहा.

पृ. ४९. **भैरव झेंप**—“जेथें पहाडावर सर्वांत अुंच शिखर आणि खालीं अेकदम तुटलेला कडा असेल अशा जागेला ‘भैरव घाटी’ म्हणतात. पूर्वींच्या काळीं आणि आज सुद्धां भैरव संप्रदायी लोक अशा ठिकाणीं कित्येक वेळां भैरवाचा जप करीत करीत वरून खालीं झेंप टाकतात. अशा प्रकारें आत्महत्या करण्यांत पाप नाहीं, अुलट मोक्ष आहे असें ते मानतात. असें मानणें हल्लींच्या कायद्याप्रमाणें चुकीचें असेल कदाचित्, पण मानसशास्त्रज्ञांना याच्यामागें असलेलें तत्त्व सहज समजण्याजोगें आहे. संसारांत सर्व बाजूंनीं निराशा झाल्या-कारणानें भ्याड बनून माणूस आत्महत्या करतो ती, आणि निसर्गाचें विशाल, अुच्च, अुदात्त व रौद्र सौंदर्य पाहून तदाकार होअून निसर्गांत लीन होअून जावें अशी अिच्छा होअून, निसर्गाशीं कोणत्याहि प्रकारचा दुजाभाव सहन न होअून, माणूस या क्षुद्र देहाचें बंधन विसरून जातो आणि अनंतत्वांत विलीन होण्यासाठीं अुडी घेतो ती, या दोन वस्तु अगदीं भिन्न आहेत. मग दोहोंचा परिणाम अेकच असेना का! प्रत्येक प्रकारच्या विनाशाला ‘मरण’ या अेकच नांवानें आपण संबोधतों. पण ती वस्तु अेकच नसते. कित्येक वेळां

मरण हा जीवनरूपी नाटकाचा विष्कंभक असतो, तर कित्येक वेळां तें नाटकाचें भरत-वाक्य–जीवनाचें साफल्य–असतें. ” ( हि. प्र. प्रकरण १६ )

पृ. ५० अुपवन—‘ न्यू फॉरेस्ट ’ नांवाचा प्रदेश.

**नीरो**—रोमचा अेक बादशहा ( सन् ५४–६८ ). आअीच्या अुत्तेजनामुळें पित्याचा खून झाल्यानंतर रोमच्या गादीचा वारस ब्रिटेनिकसला दूर सारून स्वतः गादीवर बसला. पांच वर्षें चांगल्या प्रकारें राज्य केल्यानंतर तो हुकूमशहा बनला. त्यानें ब्रिटेनिकसची, आपल्या आअीची आणि पत्नीची हत्या केली. रोम जाळल्याच्या खोट्या आरोपाच्या आधारें त्यानें खिस्ती लोकांवर नाना प्रकारचे अत्याचार केले. आपला गुरु व मंत्री सेनेका आणि आपली दुसरी पत्नी यांचीहि हत्या केली. त्यानंतर रोममधें बंड झालें, ज्यामुळें त्याला पळून जावें लागलें व त्यानें आत्महत्या केली. अशी दंतकथा आहे कीं त्यानें अेकदां रोमला आग लावली व स्वतः जळतें रोम पहात फिडल वाजवीत बसला. परंतु अितिहासांत याला कुठेंहि दुजोरा नाहीं. परंतु तो अत्यंत निर्दय होता याबद्दल कसलीच शंका नाहीं.

**आर्तिनाशन**—तुलना करा :

न त्वहं कामये राज्यं, न स्वर्गं नापुनर्भवम् ।
कामये दुःख–तप्तानां प्राणिनां आर्ति–नाशनम् ॥

[ स्वतःसाठीं मला राज्य नको, स्वर्ग नको, मोक्ष नको. दुःखानें गांजलेल्या प्राण्यांच्या दुःखांचा, संकटांचा नाश व्हावा अितकीच माझी अिच्छा आहे.]

पृ. ५१ **वीरभद्र**—दक्ष प्रजापतीच्या यज्ञाचा संहार करणारे शिवगण.

पृ. ५२ **प्रायः कंदुकपातेन**—आर्य मनुष्य पडतो तो साधारणपणें चेंडूप्रमाणें पडतो. म्हणजे पडून पुन्हां वर चढतो. ( अनार्य पडतो तो मातीच्या ढेकळाप्रमाणें पडतो असा या श्लोकांतील पुढील चरणाचा अर्थ आहे. ) भर्तृहरीचा पुरा श्लोक असा आहेः—

प्रायः कन्दुक-पातेन पतत्यार्यः पतन्नपि ।
तथा त्वनार्यः पतति मृत्पिण्ड-पतनं यथा ॥

**न हि कल्याणकृत्**—कल्याण करणारा कधीं दुर्गतीप्रत जात नाहीं. ( गीता ६-४० )

पृ. ५५ **देवेन्द्र**—सिलोनचा दक्षिण भाग. यालाच अिंग्रज लोकांच्या जड जिभेनें Dundra Head असें नांव दिलें आहे.

**नारायण सरोवर**—सिंध आणि कच्छच्या मधें असलेलें अेक सरोवर.

पृ. ५७ **पुनरागमनाय च** : धार्मिक प्रसंगीं पूजेच्या शेवटीं देवाचें विसर्जन करतांना 'पुनरागमनाय च' या वचनाचा प्रयोग करतात. याचा अर्थ आहे. 'फिरून येण्यासाठीं.' 'आतां आपण जो निरोप घेत आहोंत तो कायमचा नसून पुन्हां आपली भेट होणारच आहे,' असा भावार्थ आहे.

लेखकाच्या या वासनेची किंवा संकल्पाची पूर्ति कांहीं वर्षांत कशी झाली याचें वर्णन पुढील लेखांत आहे.

## १३ जोगचें पुनर्दर्शन

पृ. ५८ **अेतावान् अस्य०** : हा सर्व (हें जें विश्व दिसतें तें) त्याचा केवळ महिमा झाला. तो पुरुष तर ह्यापेक्षां कितीतरी मोठा आहे. (ॠग्वेदपुरुषसूक्त)

पृ. ५९ **प्रतीप** : अुलट, विरुद्ध [प्रति (अुलट) + अप् (पाणी)]

**अनुदरी** : बारीक कमरेची, सडपातळ. (शब्दशः पोट नसलेली.) मंदोदरी, कृशोदरी प्रमाणें.

पृ. ६० **विश्वजित् यज्ञ** : 'सर्ववेदस्', ज्या यज्ञांत जीवनांतली सारी कमाअी द्यावी लागते असा यज्ञ. (रवीन्द्र–मनन ४७ पहा.) तुलना करा :

स्थाने भवान् अेक-नराधिपः सन्
अकिंचनत्वं मखजं व्यनक्ति। (रघुवंश ५–१६)

[आपण चक्रवर्ती राजा असूनहि विश्वजित् यज्ञामुळें अुत्पन्न झालेलें अकिंचनत्व व्यक्त करतां, धारण करतां, तें आपल्याला शोभूनच दिसतें.]

विश्वजित् यज्ञाच्या अंतीं (मखज), अकिंचन बनतो (अकिंचनत्व) आणि व्यक्त करतो (व्यनक्ति) हे तिन्ही शब्द वरील चरणांतून आल्यासारखे वाटतात.

पृ. ६१ **अलकेश्वर** : कुबेर–यक्षनगरी अलकापुरीचा राजा.

**अिन्द्रधनुष्यांची शोभा...अीर्ष्या अुत्पन्न व्हावी** : अलका नगरींतील शोभा अिन्द्रधनुष्यांच्या शोभेअितकीच सुंदर होती असें 'मेघदूतां'त यक्षानें

वर्णन केलें आहे. पहा : 'विद्युत्वन्तं ललितवनिताः सेन्द्रचापं सचित्राः।' 'दूराल्लक्ष्यं सुरपतिधनुश्चारुणा तोरणेन।'

**मयासुराचा महाल :** राजसूय यज्ञांत मयासुरानें बांधलेला महाल अनेक चमत्कृतिपूर्ण वस्तूंनीं नटविलेला होता.

**प्रतिधनुष्य :** आकाशांत अिन्द्रधनुष्याच्या थोडेंसें वर दुसरें अेक धनुष्य नेहमीं दिसतें. या प्रतिधनुष्यांतील सात रंगांचा क्रम मूळ अिन्द्रधनुष्यांतील रंगांच्या क्रमाच्या बरोबर अुलटा असतो.

**सुरधनु आणि सुरधुनी :** आकाश-धनु आणि आकाशगंगा. प्रपाताला स्वर्गीय नदी म्हणून लेखकानें शब्दजालांतून गोडी अुत्पन्न केली आहे.

**प्रतिक्षणीं आपलें...पुण्य क्षीण होत आहे :** पुण्यक्षय झाला म्हणजे स्वर्ग सोडून मृत्युलोकांत परत यावें लागतें. (क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति-गीता ९-२१).

पृ. ६३ **जले तेले मिश खाय ना**-पाणी आणि तेल अेकमेकांत मिसळत नाहींत. 'भिन्न प्रकृतिस्वभाव असलेल्यांचें जुळत नाहीं,' असा भावार्थ आहे.

पृ. ६४ **रोमें रोलां :** (१८६६-१९४४) फ्रान्सचे विश्वविख्यात मानवतावादी साहित्यकार आणि कलाविवेचक. 'जां क्रिस्तॉफ' ही त्यांची कादंबरी त्यांची सर्वोत्कृष्ट कृति मानली जाते. सन् १९१६ त त्यांना याबद्दल नोबल पारितोषिक मिळालें होतें. त्यांनीं गांधीजी, रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांचीं चरित्रें लिहून भारतीय विचार पद्धतीचा पश्चिमी जगताला सहानुभूतीपूर्वक परिचय करून दिला होता. गोलमेज परिषदेंत भाग घेअून परततांना गांधीजी खास त्यांच्या भेटीसाठीं फ्रान्सला गेले होते. त्यांची भारतासंबंधीची डायरी फ्रेंच भाषेंत प्रसिद्ध झालेली आहे. त्यांतहि गांधीजी, रवीन्द्रनाथ, श्री अरविंद आदींसंबंधीं पुष्कळ मजकूर आहे. ते युद्धाचे विरोधक होते व कला सर्व-लोक-गम्य असली पाहिजे अशी त्यांची मान्यता होती.

**मानवी कलाकृति :** सृष्टींत जें सौंदर्य असतें त्याला कला म्हणता येत नाहीं. कला ही मानवीच असते. प्रकृतींत फक्त सौंदर्यच असतें. प्राकृतिक सौंदर्य कलेच्या अुत्पत्तीला प्रेरणा देणारें कारण आहे; तें स्वतः कलाकृति नव्हे.

पृ. ६५ **अल्पस्य हेतोः०** : क्षुल्लक गोष्टीसाठीं मोठ्या गोष्टीवर, लाभावर पाणी सोडण्यास तयार होणारे. ‘ रघुवंशां ’त ( २–४७ ) हें वचन आलें आहे. जेव्हां दिलीप राजा कामधेनूची मुलगी नन्दिनी हिच्या अैवजीं आपलें शरीर सिंहाला भक्ष्य म्हणून अर्पण करावयाला तयार होतो तेव्हां त्याला समजावतांना सिंह म्हणतो :

अेकातपत्रं जगतः प्रभुत्वं, नवं वयः, कान्तम् अिदं वपुश्च ।
अल्पस्य हेतोर् बहु हातुम् अिच्छन् विचारमूढः प्रतिभासि मे त्वम् ॥

[ पृथ्वीचें अेकछत्री राज्य, तारुण्य आणि असलें सुंदर शरीर; अेका क्षुल्लक गोष्टीसाठीं तूं अितका मोठा त्याग करायला तयार झाला आहेस ! मला तर तूं विचारमूढ–सारासार-विचारशून्य–वाटतोस. ]

## १४ जोगचा कोरडा धबधबा

पृ. ६५ **राक्षसी दुष्टता** : तुलना करा—

बुभुक्षितः किं न करोति पापं
क्षीणा नरा निष्करुणा भवन्ति ।

पृ. ६६ **रावणाप्रमाणें** : रावणानें जन्मतांक्षणींच महारव केला म्हणून त्याच्या पित्यानें त्याचें नांव रावण ठेवलें होतें.

पृ. ६७ **नदीमुखेनैव समुद्रम् आविशेत्** : नदीच्या मुखानें समुद्रांत प्रवेश करावा. महाकवि कालिदासानें ‘ रघुवंशां ’त रघूच्या विद्याभ्यासाचें वर्णन करतांना लिहिलें आहे :

लिपेर् यथावद् ग्रहणेन वाङ्मयं
नदी–मुखेनैव समुद्रम् आविशत् ॥ रघु० ३–२८

[ ज्या प्रमाणें नदीच्या मुखानें समुद्रांत प्रवेश करतात, त्या प्रमाणें पद्धतशीर लिपी शिकून त्यानें साहित्यांत प्रवेश केला. ]

यावरून गुजरात विद्यापीठाच्या वतीनें चालणाऱ्या गुजरात महाविद्यालयाच्या ‘ साबरमती ’ या द्वैमासिकासाठीं जेव्हां ध्यानमंत्राची आवश्यकता भासली, तेव्हां श्री. काकासाहेबांनीं ‘ नदीमुखेनैव समुद्रम् आविशेत् ’ हें वचन दिलें. तेव्हांपासून त्यांच्या मनांत ही कल्पना घर करून राहिली

असावी कीं हेंच वचन कालिदासाचें मूळ वचन आहे. मुळांत आहे 'आविशत्' = त्यानें प्रवेश केला. त्यावरून काकासाहेबांनीं तयार केलें : आविशेत् = प्रवेश करावा.

पृ. ६८ **काळपुरुष :** 'कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धः' सांगणारा गीतेचा विराट्-पुरुष.

**'तत्र का परिदेवना'** : त्यांत शोक तो कसला करावयाचा! (गीता २-२८)

पृ. ७० **अुंचळळी**–प्रकरण २१ पहा.

**अुष्मपा :** अुष्णता पिअून जगणारे पितर किंवा देव. सूक्ष्म देहधारी असल्याकारणानें ज्यांना अन्न ग्रहण करण्याची आवश्यकता नसते. गीतेंत हा शब्द आला आहे. अ. ११-१२

## १५ गुर्जरमाता साबरमती

पृ. ७२ **वनस्पति-अुपासक श्री. शिवशंकर**—प्रसिद्ध गुजराथी लेखक व अनुवादक स्व. श्री. चंद्रशंकर शुक्लांचे छोटे बंधु. यांनीं वनस्पतिशास्त्राचा बराच अभ्यास केलेला आहे. हरिपुरा कॉंग्रेसच्या वेळीं यांच्याच अुत्साहामुळें व परिश्रमामुळें अेक वनस्पति-प्रदर्शन भरवलें गेलें होतें. यांनीं 'गुजरातनी लोकमाताओ' नांवाचें पुस्तक गुजराथींत लिहिलेलें आहे.

पृ. ७३ **ब्राह्मणांनीं तप केलें आहे :** शौनक, वसिष्ठ, वामदेव, गौतम, गालव, गांगेय, भरद्वाज, अुद्दालक, जमदग्नि, कश्यप, जडभरत, भृगु, जाबालि आदि ८८ हजार ॠषींनीं साबरमतीच्या कांठीं तपश्चर्या केली होती असें सांगतात.

पृ. ७४ **वौठ्याचा मेळा :** दरवर्षीं कार्तिक पौर्णिमेला गुजराथमध्यें धोलका गांवापाशीं वौठ्यांत हा मेळा भरतो, ज्यांत जवळ जवळ लाख, दीड लाख लोक गोळा होतात. येथें मेश्वो, माझम, वात्रक आणि शेढी यांनीं बनलेल्या वात्रक नदीचा खारी, हाथमती आणि साबर यांनीं बनलेल्या साबरमतीशीं संगम होतो.

**साबरमतीचीं जुनीं नांवें :** भिन्न भिन्न युगांत साबरमती भिन्न भिन्न नांवांनीं ओळखली जात होती. सत्ययुगांत तिला कृतवती, त्रेतांत मणिकर्णिका

आणि द्वापरांत विधुवती किंवा चंदना वा चंदनावती म्हणत असत. कलियुगांत तिला साभ्रमती म्हणतात.

**कश्यपगंगा :** अेक कथा अशी आहे—

अेकदां लागोपाठ सात वेळां दुष्काळ पडला, तेव्हां ॠषींनीं कश्यपाची प्रार्थना केली आणि त्यानें शंकराची आराधना केली. शंकर साभ्रमती गंगेला घेअून अर्बुदारण्यांत आले, जेथून तिच्या धारा अरण्यामधून गुजराथच्या दिशेनें वाहूं लागल्या. तेव्हां समुद्रानें प्रकट होअून कश्यपाची प्रार्थना केली कीं, ‘ महाराज, कसेंहि करून या नदीचें पाणी माझ्या पाण्यांत मिसळूं द्या. अगस्त्य ॠषींनीं माझें सारें पाणी पिअून लघुशंकेच्या रूपानें मला परत दिलें असल्यामुळें, तें अपवित्र बनलें आहे. या नदीच्या स्पर्शानें तें पावन होअील. ’

साबरमती दुसऱ्या नद्यांसह समुद्राला जाअून मिळाली आणि समुद्र पावन झाला !

दुसरी कथा अशी आहे कीं पार्वतीच्या भयानें गंगा अिकडे तिकडे भटकत होती—‘ सा भ्रमति । ’ तिला कश्यप आपल्या जटांत घालून अर्बुदारण्यांत घेअून आले. येथें आल्यानंतर त्यांनीं आपल्या जटा झाडल्या, तेव्हां त्या गंगेंतून सहा प्रवाह वाहूं लागले. तिच्या मुख्य प्रवाहाला साबरमती नांव पडलें आणि बाकीच्या सहा प्रवाहांतून वौठ्याला येअून मिळणाऱ्या सहा नद्या बनल्या.

कश्यप तिला घेअून आले, म्हणून तिला कश्यपगंगा म्हणूं लागले.

पृ. ७५ **दधीचीनें तप केलें :** वृत्रासुर यज्ञकुंडांतून अुत्पन्न झाला आणि पहातां पहातां अितका वाढला कीं थोड्याच अवधींत त्यानें सर्व विश्व झांकून टाकलें. त्याचें भय वाटून देवांनीं त्याच्याविरुद्ध आपलीं सर्व दिव्य शस्त्रास्त्रें वापरून पाहिलीं. परंतु सारें व्यर्थ. तेव्हां अिंद्रासहित सर्व देव आदिपुरुष अंतर्यामीला शरण गेले. अंतर्यामीनें सांगितलें, ‘ महर्षि दधीचीकडे तुम्ही जा आणि विद्या, व्रत व तप यांनीं बलवान बनलेल्या त्यांच्या शरीराची मागणी करा. ते नकार देणार नाहींत. मग त्या शरीराच्या अस्थींतून विश्वकर्मा तुम्हांला अेक अुत्तम आयुध बनवून देअील. त्यानेंच या वृत्रासुराचा नाश होअूं शकेल. ’

साबरमती व चंद्रभागा नद्यांच्या संगमावर दधीचि ॠषि तप करीत बसले होते. तेथें जाअून देवांनीं त्यांच्याकडे त्यांच्या शरीराची मागणी केली. तेव्हां त्यांनीं अुत्तर दिलें,

'हे देवांनो, जो पुरुष कधीं ना कधीं ज्याचा अवश्य नाश होणार आहे अशा आपल्या शरीरानें प्राण्यांवर दया करून धर्म व यश प्राप्त करूं अिच्छित नाहीं, असा पुरुष स्थावर प्राण्यांनीं सुद्धां शोक करावा अशा योग्यतेचा आहे. दुसऱ्या प्राण्यांच्या दुःखानें दुःखी होणें आणि दुसऱ्या प्राण्यांच्या आनंदानें आनंदून जाणें हाच अविनाशी धर्म होय.... म्हणून मी आपल्या क्षणभंगुर व कावळ्या-कुत्र्यांचें भक्ष्य अशा शरीराचा त्याग करतों. आपण त्याचा स्वीकार करावा.'

असा निश्चय करून अृषीनें परब्रह्माशीं आपला आत्मा अेकाग्र करून शरीराचा त्याग केला.

त्यानंतर देवांनीं कामधेनूला बोलावलें. ती अृषीच्या शरीराला चाटूं लागली. चाटतां चाटतां फक्त हाडें बाकी राहिलीं. या हाडांचें वज्र बनवून विश्वकर्म्यानें अिन्द्राला दिलें. त्या वज्रानें अिन्द्रानें वृत्रासुराचा नाश केला.

दधीचि अृषीनें जेथें देह अर्पण केला होता, तेथें कामधेनूचें दूध पडलें होतें. म्हणून तेथें दूधेश्वर महादेवाची स्थापना झाली.

**खादीची प्रवृत्ति :** गांधीजींनीं स्वदेशीचा व खादीचा प्रचार सुरूं केला, त्यामुळें आश्रमांत खादी-अुत्पादनाचें कामहि सुरूं झालें. आजसुद्धां ही प्रवृत्ति तेथें चालू आहे.

**शेती आणि गोशाळा :** शेतीची आणि गार्यींच्या जातींत सुधारणा घडवून आणण्याची प्रवृत्ति आश्रमांत सुरूं झाली होती. आजसुद्धां विविध प्रयोगांच्या दृष्टीनें गोशाळा व शेतीची प्रवृत्ति तेथें चालू आहे.

**राष्ट्रीय शाळा :** आश्रमाची शाळा. या शाळेंत श्री काकासाहेब, नरहरि परीख, किशोरलाल मशरूवाला, विनोबा आदि मंडळीनें शिक्षणाचे प्रयोग केले. या प्रयोगांच्या आधारावरच मागाहून गुजरात विद्यापीठाची स्थापना झाली.

आज 'मूलोद्योग पद्धति' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या गांधीजींच्या शिक्षण-पद्धतीचा ही प्रवृत्ति पाया म्हणतां येअील.

**राष्ट्रीय अुत्सव :** लेखकाचें 'जिवंत व्रतोत्सव' हें पुस्तक पहावें.

**लोक संगीत आणि शास्त्रीय संगीत :** आश्रमवासी पंडित नारायण मोरेश्वर खरे संगीतशास्त्री होते. त्यांनीं कांहीं गुजराती लोकगीतांची स्वरलिपि तयार करून 'लोक–संगीत' नांवाचें पुस्तक लिहिलें होतें. शास्त्रीय संगीताच्या प्रचारासाठीं त्यांनीं 'राष्ट्रीय संगीत मंडळा'ची सुद्धां स्थापना केली होती. अहमदाबाद काँग्रेसच्या वेळीं 'अखिल भारत संगीत परिषदे'चें अधिवेशन देखील येथें झालें होतें. त्यामागें गांधीजींची प्रेरणा व पं. खरेंचे प्रयत्न मुख्य होते.

**'नवजीवन' आणि 'यंग अिंडिया' :** सन् १९१९ मधें जेव्हां गांधीजींनीं रॉलेट बिलाविरुद्ध चळवळ सुरू केली, तेव्हां त्यांना आपल्या विचारांच्या प्रचारासाठीं मुखपत्राची आवश्यकता भासूं लागली. श्री. अिन्दुलाल याज्ञिक व त्यांचे मित्र गुजरातीमधें 'नवजीवन अने सत्य' नांवाचें मासिक चालवीत होते. आणि त्याच्या द्वारा 'होमरूल'चा प्रचार करीत होते. हेंच मासिक गांधीजींनीं आपल्या हातीं घेतलें आणि त्याचें साप्ताहिक बनवून 'नवजीवन' या नांवानें चालवूं लागले. हें साप्ताहिक गुजरातींत चालत असे.

नंतर साऱ्या देशांत प्रचार करण्यासाठीं अेका अिंग्रजी पत्राची गरज भासूं लागली. श्री. शंकरलाल बँकर, जमनादास द्वारकादास आदि मंडळी 'यंग अिंडिया' नांवाचें अेक पत्र चालवीत होती. गांधीजींनीं या पत्राचासुद्धां कब्जा घेतला.

दोन्ही साप्ताहिकें सन १९३३ पर्यंत चाललीं. पुढें हरिजन-प्रवृत्ति चालवण्यासाठीं गांधीजींनीं तुरुंगांतून पत्रिका सुरू केल्या, त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें : 'हरिजन' (अिंग्रजी), 'हरिजनबन्धु' (गुजराती), आणि 'हरिजनसेवक', (हिन्दुस्तानी). सन् ४२ ते ४५ पर्यंतचा काळ सोडला तर या पत्रिका गांधीजींच्या मृत्यूपर्यंत त्यांच्या विचारांच्या वाहक राहिल्या.

गांधीजींच्या मृत्यूनंतर हीं साप्ताहिकें स्व. श्री. किशोरलालभाअी मशरूवाला यांनीं चालवलीं. त्यांच्या मृत्यूनंतर श्री. मगनभाअी देसाअी त्यांचे संपादक झाले. १९५६ च्या मार्च महिन्यांत तीं कायमचीं बंद करण्यांत आलीं.

**सत्याग्रह :** चंपारण, खेडा, नागपुर, बोरसद, बारडोली अित्यादि.

**गिरणी मालकांशीं मजुरांचा संघर्ष :** हा संघर्ष सन १९२८ मधें अहमदाबादचे गिरणी मालक व मजूर यांच्यामधें अुत्पन्न झाला होता. मजुरांचा पक्ष न्याय्य होता म्हणून गांधीजींनीं त्यांची बाजू घेतली होती. विशेष माहितीसाठीं पहा—श्री. महादेवभाअी देसाअी लिखित हिंदी पुस्तक ' अेक धर्मयुद्ध. '

**दांडीकूच :** लाहोर कॉंग्रेसमधें ' पूर्ण स्वराज्या 'चा ठराव पास झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यासाठीं गांधीजींनीं मिठाचा कायदा तोडण्याचें ठरवलें. भारताच्या स्वातंत्र्य-संग्रामाच्या अितिहासांतील हें अेक अुज्ज्वल प्रकरण आहे.

कूच करण्यासाठीं आपल्या ७९ सहकाऱ्यांसह जेव्हां गांधीजी सत्याग्रहाश्रम साबरमतीहून निघाले, तेव्हां त्यांनीं प्रतिज्ञा केली होती कीं ' जोंपर्यंत स्वराज्य मिळणार नाहीं, तोंपर्यंत मी आश्रमांत परतणार नाहीं. ' या यात्रेनें साऱ्या देशांत विद्युत्-वेगानें नवजीवनाचा व नव्या शक्तीचा संचार केला होता.

गांधीजी वर्धा आणि सेवाग्रामला जाण्याचें हेंहि अेक कारण होतें.

**जालियानवाला बाग :** रॉलेट ॲक्टचा विरुद्ध गांधीजींनीं जेव्हां चळवळ सुरू केली, तेव्हां त्यांनीं ६ अेप्रिल १९१९ या दिवशीं साऱ्या देशाला हरताळ पाळण्याचा व अुपास करण्याचा आदेश दिला होता. साऱ्या देशानें अपूर्व अुत्साहानें त्याचें पालनहि केलें होतें. परंतु तीन दिवसांनीं, १० अेप्रिलला, अमृतसरच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें तेथले कॉंग्रेस पुढारी डॉ. किचलू व सत्यपालजी यांना अटक करून अेका अज्ञात जागीं पाठवून दिलें. त्यामुळें शहरांत दंगल माजली आणि शहर फौजेच्या स्वाधीन केलें गेलें. पंजाबांत अन्यत्र सुद्धां अशा घटना घडल्या ज्यांत जीवहानि आणि मालहानि बरीच झाली. या शिवाय गांधीजींना अटक केल्यामुळें देशाच्या अन्य भागांतहि दंगली माजल्या होत्या, ज्या कालांतरानें शांत झाल्या. १३ अेप्रिलला हिन्दूंचा वर्षारंभ दिवस होता. त्या दिवशीं अमृतसरच्या जालियानवाला बागेंत अेक सभा जाहीर करण्यांत आली होती. या जागीं चारहि बाजूंस घरेंच घरें होतीं आणि बागेंत जाण्यासाठीं केवळ अेकच अरुंद रस्ता होता. तेथें संध्याकाळीं वीस हजार स्त्री–

पुरुष–मुलें यांचा जमाव गोळा झाला होता. अितक्यांत जनरल डायर १०० देशी व ५० विदेशी लष्करी शिपायांना घेअून आला आणि दोन तीन मिनटांच्या आंतच त्यानें गोळीबाराचा हुकूम सोडला. खुद्द डायरच्या कथनानुसार १६०० गोळया सोडल्या गेल्या आणि सर्व गोळया संपल्या तेंव्हांच गोळीबार थांबवला गेला. जवळ जवळ ४०० लोक मारले गेले होते व दोन हजार जखमी झाले होते.

**गुजराथ विद्यापीठ :** १९२०त जेंव्हां असहकाराची चळवळ सुरू झाली, तेंव्हां गांधीजींनीं देशांतील विद्यार्थ्यांना सरकारी शाळा-कॉलेजें सोडण्याचा आदेश दिला होता. या आदेशानुसार ज्या विद्यार्थ्यांनीं सरकारी शिक्षण–संस्थांचा बहिष्कार केला, त्यांच्यापैकीं कांहीं रचनात्मक कार्याला लागले. परन्तु बाकीच्या विद्यार्थ्यांसाठीं शिक्षणाची व्यवस्था करणें आवश्यक होतें. त्यासाठीं देशभर राष्ट्रीय संस्थाची स्थापना झाली. अुदा० बिहारमधें बिहार विद्यापीठ, काशीमधें काशी विद्यापीठ, पुण्याचें टिळक विद्यापीठ वगैरे. गुजराथच्या गुजराथ विद्यापीठाचा यांतच समावेश होतो. १९२० मधें याची स्थापना झाली होती. या विद्यापीठाच्या शिक्षकांनीं आणि विद्यार्थ्यांनीं गुजराथच्या सार्वजनिक जीवनांत आणि साहित्यिक व सांस्कृतिक प्रवृत्तींत मोठें महत्त्वाचें कार्य केलें आहे. आजदेखील या संस्थेचें शिक्षणाचें व साहित्य प्रकाशनाचें कार्य चालू आहे.

पृ. ७६ **आहाराचे प्रयोग :** " केवळ वनस्पति आहार करण्याच्या दृष्टीनें आम्ही पुष्कळांनीं मीठ सोडलें. त्याचप्रमाणें दूध आणि दुधापासून बनणारे अितर पदार्थहि सोडून पाहिले. आहार सात्त्विक असावा या अुद्देशानें मिरची, मिरी, दालचिनी वगैरे मसाल्यांचा त्याग केला. भात जर अुत्तम न शिजवला तर सुट्या भातामुळें पोट सुटतें अशा कल्पनेनें भात शिजवून त्याचा जवळ जवळ खवा केला, धान्य सोडून केवळ फळांवर राहिलों. अेकावेळीं अेकच पदार्थ खावयाचा, कोणतेहि दोन पदार्थ न मिसळतां ते अलग अलग खावयाचे आणि तेहि अेकावेळीं अेकच; भाज्या कच्च्या खावयाच्या, कारलीं आणि बटाटे सुद्धां कच्चेच; असे कितीतरी प्रयोग आम्ही लोकांनीं केले आणि शरीरावर होणारे त्याचे परिणाम तपासले."

—का. का.

# १६ अुभयान्वयी नर्मदा

पृ. ७६ **अुभयान्वयी :** भारताच्या दक्षिण व अुत्तर दोन्ही विभागांना जोडणारी.

पृ. ७७ **अमरकंटक तलाव :** विलासपुर जवळील मेखल, मेकल किंवा माअिकाल पर्वताचा अेक हिस्सा अमरकंटक या नांवानें प्रसिद्ध आहे. त्याच्या पायथ्याशीं जो तलाव आहे त्यालाहि अमरकंटकच म्हणतात. येथूनच नर्मदा व शोण यांचा अुगम झाला आहे. यावरूनच नर्मदेला मेकलकन्या सुद्धां म्हणतात. अमरकंटक श्राद्धासाठीं अुत्तम स्थान मानलें जातें.

**विन्ध्य :** प्रसिद्ध पर्वतश्रेणी. अगस्ति अृषि हा पर्वत ओलांडूनच दक्षिणेकडे येअून वसले होते. अुंचच अुंच वाढणारा हा पर्वत त्यांच्याच आज्ञेवरून आडवा निजला अशीहि कथा आहे. या पर्वतावर विन्दुवासिनीचें प्रख्यात मंदिर आहे. त्याच्या थोडें पुढें अष्टभुजा योगमायेचें मंदिर आहे, जें मोठें शक्तिपीठ मानलें जातें.

**सातपुडा :** नर्मदा व तापी यांच्यामधील सात सुरकुत्यांची ( folds ) पर्वतश्रेणी. तापीचा येथूनच अुगम होतो.

**भृगुकच्छ :** आजकालचें भडोच. कच्छ = नदी किंवा समुद्राचा किनारा.

**आपल्या कवि पूर्वजांनीं......' रेवा ' :** कालिदासाचा यक्ष विंध्याचलाच्या खडकाळ पायथ्यावरून वहाणाऱ्या आणि जागोजागीं अुड्या मारणाऱ्या या रेवेचा परिचय देतांना म्हणतो :—

रेवां द्रक्ष्यस्युपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णां ।
भक्तिच्छैदैर् अिव विरचितां भूतिमंगे गजस्य ॥

( मेघदूत १९ )

[ विंध्याचलाच्या खडकाळ पायथ्यावरून अनेक धारांत विभक्त होअून वहाणारी रेवा, हत्तीच्या अंगावर ओढलेल्या भस्माच्या पट्ट्यांप्रमाणें तुला दिसेल. ]

नर्मदेच्या सुवासित व हलक्या पाण्याची स्तुति करतांना पुढें कालिदास म्हणतो कीं तिचें पाणी 'तिक्तैः वनगजमदैः वासितम्' आहे आणि 'जंबूकुंज-प्रतिहत-रयम्' ही आहे.

पृ. ७८. **सगळा भक्तिभाव जरी गंगेच्या चरणीं :** गंगेची आणि नर्मदेची बरोबरी करणारे श्लोकहि सांपडतात. अुदाः—

यथा गंगा तथा रेवा तथा देवी सरस्वती ।
समं पुण्यफलं प्रोक्तं स्नानात् दर्शनचिन्तनैः ॥

**आदिवासी :** या प्रदेशांतील मूळ रहिवाशी भिल्ल वगैरे लोक, जे आज देखील गरिबींत व अज्ञानांत बुडलेले आहेत.

पृ. ८० **सबिंदुसिंधु :** या नर्मदाष्टकांतील ओळी आहेत. आद्य शंकराचार्यांनीं हें रचलें आहे असें मानतात. त्याचा आरंभ असा आहे—

सबिन्दु–सिन्धु–सुस्खलत्–तरंग–भंग–रंजितम्
द्विषत्सु पापजातजातकारिवारि–संयुतम् ।
कृतान्त दूत–काल–भूत–भीतिहारि–वर्मदे
त्वदीय-पाद-पंकजं नमामि देवि नर्मदे ॥

**गतं तदैव :** पुरा श्लोक असा आहे :

गतं तदैव मे भयं त्वदम्बु वीक्षितं यदा
मृकुण्डसूनुशौनकासुरारिसेवि सर्वदा ।
पुनर्भवाब्धिजन्मजं भवाब्धिदुःखवर्मदे
त्वदीय-पाद-पंकजं नमामि देवि नर्मदे ॥ ४ ॥

पृ. ८१ **पंचगौड :** सरस्वतीच्या किनाऱ्याचा प्रदेश, कनोज, अुत्कल, मिथिला आणि गौड—म्हणजे बंगालपासून ते भुवनेश्वरपर्यंतचा प्रदेश. विंध्य पर्वताच्या अुत्तरेकडील या पांच प्रदेशांत रहाणारे ब्राह्मण. त्या त्या प्रदेशाप्रमाणें त्यांना अनुक्रमें सारस्वत, कान्यकुब्ज, अुत्कल, मैथिल आणि गौड अशीं नांवें पडलीं.

**पंच द्रविड :** विंध्याचलाच्या दक्षिणेस रहाणारे पांच जातींचे ब्राह्मण : महाराष्ट्र, तैलंग, कर्णाट, गुर्जर आणि द्रविड.

**विक्रम संवत् :** विक्रमादित्याच्या नांवानें चालणारा संवत्. हा अीसवी सनाच्या पूर्वी सुरू झाला होता.

**शालिवाहन शक :** शालि = सिंह. सिंह ज्याचें वाहन आहे असा. दंतकथा अशी आहे कीं या नांवाचा अेक विख्यात राजा लहानपणीं सिंहाच्या आकाराच्या अेका यक्षाला वाहन बनवून सगळीकडे फिरत असे त्यावरून त्याला शालिवाहन असें नांव पडलें. त्याच्या नांवानें चालणाऱ्या वर्षगणनेला 'शक' म्हणतात. या शकाप्रमाणें वर्षाचा प्रारंभ चैत्र महिन्यापासून होतो. विक्रम संवताहून हा १३४-३५ वर्षे आणि अीसवी सनाहून ७८ वर्षे मागें आहे, म्हणजे मागाहून सुरू झाला. भारत सरकारनें आतां याचा स्वीकार केला आहे.

**भेडाघाट :** प्रकरण ४६ पहा.

पृ. ८२ **धुंवाधार :** प्रकरण ४७ पहा.

पृ. ८३ **कबीरवड :** भडोचच्या पूर्वेला, शुक्लतीर्थापाशीं नर्मदेच्या प्रवाहांत मध्यभागीं अेक बेट आहे. तेथें हा प्रसिद्ध वड आहे. असें सांगतात कीं कबिरानें दातण करून जो तुकडा फेंकला होता त्यांतूनच हा वटवृक्ष तयार झाला.

**या सर्वांची माता...कल्याण करो :** आपले अृषि याही पुढें जाअून सर्व चराचर सृष्टीचा अन्तर्भाव करून प्रार्थना करतात :

नर्मदा सरितां श्रेष्ठा रुद्रदेहात् विनिःसृता ।
तारयेत् सर्वभूतानि स्थावराणि चराणि च ॥

## १७ संध्यारस

पृ. ८५ **रसवती पृथ्वी आणि निःशब्द आकाश :** येथें जाणूनबुजून न्यायशास्त्राची व्याख्या मोडली गेली आहे. मूळ व्याख्या आहे : 'गंधवती पृथ्वी' आणि 'शब्दगुणम् आकाशम् ।'

**वनेचर :** संस्कृतमधें 'वनचर' म्हणतात जंगलांत राहणाऱ्या-फिरणाऱ्या जंगली पशूंना आणि 'वनेचर' म्हणतात जंगलांत राहणाऱ्या-फिरणाऱ्या मनुष्यांना.

**सुर-असुरांचे गुरु :** बृहस्पति आणि शुक्राचार्य. येथें आकाशांतील गुरु आणि शुक्र नांवाचे ग्रह.

**दुर्विनीत :** अविनयी, अुद्धट, दुष्ट. कालिदासाच्या शाकुन्तलमधें अेक भुंगा जेव्हां शकुन्तलेला सारखा त्रास देअूं लागतो तेव्हां त्याला अुद्देशून तिनें हा शब्द वापरला आहे त्याचें स्मरण होतें.—'इला परित्रायेथां माम् अनेन दुर्विनीतेन मधुकरेण अभिभूयमानाम् ।'

## १८ लावण्यफला लूनी

पृ. ८७ **लावण्यफला :** लवण = मीठ. लवण-प्रधान, लवणसमृद्ध असल्यामुळें हें नांव या नदीला दिलें आहे.

**अुभयविभ्रष्ट स्थिति :** हेंहि नाहीं आणि तेंहि अशी स्थिति. गीतेंत हा शब्द आला आहे. (अ. ६-३८)

**सांभर सरोवर**—या सरोवराविषयीं काकासाहेबांनीं खालीलप्रमाणें लिहिलें आहे :

हिंदुस्थानांतील सरोवरांत चार मुख्य आहेत. काश्मिरांतील वूलर, सिंध-मधील मंचर, राजस्थानमधील सांभर आणि ओरिसाच्या पूर्वकिनाऱ्यावरील चिल्का. या यादींत मणिपुर आसामकडील लबतक सरोवरहि घातलें पाहिजे.

सांभर सरोवर राजस्थानमधें जोधपुर जयपुरच्या मधें आहे. पावसाळयांत या सरोवराचा विस्तार जवळ जवळ ९० वर्गमैल होतो. अुन्हाळयांत सरोवराचें पाणी आटलें म्हणजे या सरोवराचें पात्र बर्फासारखें किंवा चांदी-सारखें चमकूं लागतें. देवी शाकंभरीच्या नांवावरून या सरोवराचें नांव सांभर पडलें असें सांगतात. या सरोवराविषयीं आश्चर्य हें आहे कीं येथें पूर्वी समुद्र होता असें मानायला कांहीं पुरावा नाहीं आणि आसपास मिठाचे डोंगरहि नाहींत. दंतकथा सांगते कीं येथील लोकांच्या सेवेनें संतुष्ट होअून शाकंभरी देवीनें हा सर्व प्रदेश चांदीचा केला. तेव्हां लोकांनीं घाबरून देवीला म्हटलें, अितकी चांदी आम्हांस कशी पचणार? द्रव्यलोभी राजे येथें येअून लढतील आणि आमची बिचाऱ्यांची लांडगेतोड होअील. देवीला हें पटलें आणि तिनें त्या चांदीचें शुद्ध चकचकीत मीठ बनवलें.

आज या प्रदेशांतील गरीब लोक सरकारी मीठ खात्यांत मेहनत मजुरी करून अुत्तम रीतीनें पोट भरूं शकतात.

## १९ अंबा-अंबिका

पृ. ८९ **अंबा-अंबिका :** महाभारतांतली कथा अशी आहे. भीष्म अेकदां काशीराजाच्या कन्यकांच्या स्वयंवरांतून त्याच्या तीन्ही मुली—अंबा, अंबिका व अंबालिका यांचें अपहरण करून घेअून आले. त्यासाठीं जें युद्ध झालें त्यांत त्यांनीं शाल्वराजाचा पराजय केला. परंतु जेव्हां त्या मुलींचें लग्न राजा विचित्रवीर्याशीं लावण्याची गोष्ट निघाली, तेव्हां या मुलींपैकीं फक्त अेका मुलीनें–मोठी मुलगी अंबा हिनें—सांगितलें कीं, 'मीं तर मनानें शाल्वराजाला वरलें आहे.' म्हणून तिला शाल्वराजाकडे पाठवून देण्यांत आलें. परंतु शाल्वानें तिचा स्वीकार केला नाहीं, म्हणून ती भीष्माचे गुरु परशुराम यांना शरण गेली. परंतु गुरूच्या सांगण्यावरून देखील भीष्म अंबेचा स्वीकार करायला तयार होअीनात. त्यामुळें गुरु-शिष्यामधें दारुण युद्ध जुंपलें, ज्यांत गुरूचा पराभव झाला. तेव्हां अंबेनें वनांत जाअून भीष्मवधाच्या संकल्पानें तपस्या करून अग्नि-प्रवेश केला व शरीर सोडलें. तिनेंच नंतर द्रुपद राजाच्या पोटीं शिखंडीच्या रूपानें जन्म घेतला आणि भीष्मवधाचा आपला संकल्प पुरा केला.

येथें लेखकानें पौराणिक कथेंत हवा तसा बदल केला आहे.

**राजा कर्णाचीं दोन आसवें :** गुजराथच्या वाघेला वंशाचा शेवटचा रजपूत राजा कर्णदेव अत्यंत क्रोधी व विलासी होता. त्यानें आपल्या प्रधानाचा, माधवचा, भाअू केशव याचा खून करवून त्याच्या पत्नीला आपल्या अंतःपुरांत आणून ठेवलें होतें. अपमानानें, अत्याचारानें क्रुद्ध होअून माधवनें दिल्लीला जाअून अल्लाअुद्दीनाला गुजराथवर चढाअी करण्यासाठीं प्रेरित केलें. त्यानें आपल्या दोन सरदारांना गुजराथवर चढाअी करण्यासाठीं पाठवलें. त्यांनीं गुजराथ जिंकलें, राजधानी पाटण लुटलें आणि राजा कर्णाच्या राण्यांना व मुलाबाळांना पकडून दिल्लीला पाठवून दिलें. कर्ण देवगडच्या राजाच्या आश्रयाला गेला. असें सांगतात कीं त्यानें आपले अंतिम दिवस

अज्ञातवासांत, अबूच्या जंगलांत, या नद्यांच्या आसपासच्या प्रदेशांत, भटकत शोकविह्वल दशेंत घालवले होते. त्याचें येथें सूचन आहे.

गुजराथी भाषेंतील पहिली कादंबरी सन् १८६७ त याच वृत्तांताच्या आधारावर लिहिली गेली होती.

## रेणुकेचा शाप

पृ. ९० **गयेची नदी** : गयेची फल्गु नदी. प्रकरण ४१ पहा.

**अंतःस्रोता** : [अन्तः (आंत) + स्रोता (वहाणारी)] जमिनींतून वहाणारी.

**राणकदेवीचा शाप** : अेक लोककथा आहे कीं गुजराथच्या राजा सिद्धराज जयसिंहानें सोरठवर चढाअी केली आणि जुनागडला वेढा दिला. तेथल्या राणा रा' खेंगारचा भाचाच फितूर झाला. परिणामस्वरूप जुनागडचा पाडाव झाला, खेंगारचा पराजय झाला व तो मारला गेला. सिद्धराजनें त्याची राणी राणकदेवी हिला आपल्या ताब्यांत घेतलें. राणीला घेअून तो पाटणला जात होता. वाटेंत वढवाण जवळ राणी सती गेली. अितिहासांत या गोष्टीला समर्थन नाहीं. सिद्धराजनें खेंगारचा पराजय करून त्याला कैद केलें होतें अितकें निश्चित. संभव आहे कीं नंतर त्यानें सिद्धराजची सत्ता मान्य केली असेल, म्हणून सिद्धराजनें त्याला सोडून दिलें असेल. नंतर सोरठला जातांना वढवाणजवळ त्याला कांहीं कारणामुळें मृत्यु आला असेल आणि तेथें त्याची राणी सती गेली असेल.

येथें 'राणक'चा अर्थ रेणुका असा नाहीं. 'गयेची फल्गु' या प्रकरणांतील 'सीतेचा शाप' आणि 'सिकतेचा शाप 'शीं याची तुलना करा.

**योमा** : ब्रह्मी भाषेंत पर्वताला 'योमा' म्हणतात; जसें आराकान योमा, पेगु योमा.

**अलसलुलित** : [अलस (आलस्ययुक्त) + लुलित (थकलेलें, खिळखिळे झालेलें). जेव्हां 'ललित' असा पाठ असेल तेव्हां 'सुन्दर'.] धीरगतीनें आळसावल्यागत व थकल्यागत चालणाऱ्या. हा शब्द 'अुत्तररामचरिता'च्या पहिल्या अंकांत २४ व्या श्लोकांत आला आहे :

अलसलुलितमुग्धानि अध्वसंजातखेदात्
अशिथिलपरिरंभैर् दत्तसंवाहनानि ।
परिमृदित–मृणाली–दुर्बलानि अंगकानि
त्वम् अुरसि मम कृत्वा यत्र निद्राम् अवाप्ता ॥

**अंत्यजांचा तळतळाट** : त्यांना पाण्याची सोय नाकारून.

पृ. ९१ **खंडिता** : काव्यशास्त्रांत सांगितलेल्या अष्टनायिकांपैकीं अेक 'अीर्ष्या कषायिता'—अीर्ष्येनें भरलेली स्त्री. पतीचें अखंड प्रेम नसल्यामुळें रागावलेली स्त्री.

येथें खंडिताचा दुसराहि अर्थ होतो—जिचा प्रवाह खंडित झालेला आहे अशी.

## २१ अुंचळीचा धबधबा

पृ. ९३ **अथाऽतो प्रपातजिज्ञासा** : ब्रह्मसूत्राची सुरुवात 'अथाऽतो ब्रह्मजिज्ञासा' या सूत्रानें होतें. त्या धर्तीवर लेखकानें हें नवें सूत्र तयार केलें आहे.

पृ. ९६ **पदक्रम** : तुलना करा :

भयो त्रिविक्रम, कियो पदक्रम
अेक महीपर बीजे को अंबर, बैजुके प्रभु
त्रीजे को सिर पर ।

**जीवनावतार** : पाण्याचें खालीं अुतरणें.

पृ. ९७ **कटक** : संस्कृतमधें 'कटक'चा अर्थ आहे कंकण किंवा हस्त-भूषण. त्यावरून आभूषण, दागिने असा अर्थ करून श्लेष केला आहे.

**सोन्याच्या झांकणानें** :

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
अीशावास्य, १५

**हें सारें जगत्...झांकलेंच पाहिजे** : मूळ मंत्र असा आहे :

अीसावास्यम् अिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् ।

पृ. ९८ **युयोधि अस्मत्** : हा अीशावास्य अुपनिषदाचा अंतिम मंत्र आहे.

## २३ गोकर्णाची यात्रा

पृ. १०४ **कपिला-षष्ठी :** भाद्रपद वद्य षष्ठी, हस्तनक्षत्र, व्यतिपात आणि मंगळवार—अितक्या योगांचा दिवस. दर ६० वर्षांनंतर येणारा हा अेक दुर्लभ दिवस आहे.

पृ. १०९ **मा भैः :** भिअूं नकोस.

पृ. १११ **जरासंध :** पुरुकुलोत्पन्न बृहद्रथ राजाचा पुत्र. याचा जन्म दोन मातांपासून दोन शकलांनीं होअून तीं शकलें जरानामक राक्षसीनें सांधलीं म्हणून यास हें नांव पडलें. याचें भीमाशीं तेरा अहोरात्र युद्ध झालें. शेवटीं कृष्णाच्या सल्ल्यावरून भीमानें दोन तंगड्या पकडून याला चिरलें व ते दोन तुकडे दोन विरुद्ध दिशांना फेंकून दिले, तेव्हां त्याचा अंत झाला.

## २४. भरताच्या डोळ्यांनीं

पृ. ११२ **अद्य मे सफला :** ‘आज माझी यात्रा सफळ झाली. पाण्याच्या प्रसादानें मी धन्य झालों.’ मुळांत ‘त्वत् प्रसादतः’ असें आहे, ते ‘अप् प्रसादतः’ पाण्याच्या प्रसादानें असें केलें आहे.

पृ. ११४. **श्रीरामचंद्राचा कारभारी :** रामाच्या अैवजीं त्याच्या वतीनें भरतानें अयोध्येचें राज्य सांभाळलें म्हणून. ‘भरणात् भरतः।’

## २५ छप्पन वर्षांची भूक

पृ. ११८ **सुरूचीं झाडें :** कारवारमधें सुरूच्या झाडांचें अेक सुंदर वन आहे. ‘स्मरण-यात्रे’तील ‘सुरू पार्क’ हें प्रकरण पहा.

पृ. ११९ **मंचर सरोवर :** प्रकरण ३४ पहा.

पृ. १२२ **अनेक राजधान्यांचें स्मशान**—“माझ्या कल्पना-चक्षूंनीं मी जेव्हां जेव्हां कुतुबवरून दिल्लीकडे पाहतों तेव्हां तेव्हां स्मशानभूमींत अुगवलेल्या अेकाद्या सुंदर, सुबक फुलासारखी मला ती भासते. नाश, विनाश, संहार, मृत्यु, विस्मृति, विषाद, परिताप हे सर्व दूरपर्यंत पसरलेले असावेत आणि त्यांतून केवळ वैराग्याचीच धारा फुटत असावी असें तें दिल्लीच्या आसपासचें दृश्य आहे. येथें जे कोणी आले तें सर्व गेले. लहानसान जमीनदारहि नष्ट झाले आणि मोठमोठे सम्राटहि विलयाला गेले. आपली कीर्ति अजरामर करण्यासाठीं

लोकांनीं कठिण पाषाण रचरचून भव्य आणि अुत्तुंग कीर्तिस्तंभ अुभविले आणि त्या सगळयांचीं आतां खिंडारें होअून पडलीं आहेत......

"पानिपतला महान् सेनांची स्मशानभूमि म्हटलें तर दिल्लीच्या आसपासचा प्रदेश साम्राज्यांच्या स्मारकांची स्मशानभूमि म्हटला पाहिजे." ('लाटांचें तांडव' पृ. २१)

## २६ वेळगंगा आणि सीतानहाणी

पृ. १२४ **वेरूळचें हिरवें कुंड :** अिंग्रजींत वेरूळला 'अेलोरा' म्हणतात. त्यामुळें याच नांवानें तें अधिक प्रसिद्ध आहे. हें शिवाजीच्या पूर्वजांचें गांव होय. येथें अेक सुन्दर कुंड आहे. या कुंडाबद्दल अेक दंतकथा प्रचलित आहे, ती अशी कीं अिलिचपुरच्या येलु नांवाच्या राजाच्या साऱ्या शरीरांत अेका रोगामुळें किडे पडले होते. नाना अुपाय केले, पण सारे व्यर्थ. रोग तसाच राहिला. शेवटीं त्याला या कुंडाबद्दल आकाशवाणी अैकूं आली : 'तूं जाअून त्या तीर्थांत स्नान कर. तुझें शरीर बरें होअील.'

राजानें स्नान केलें आणि तो रोगमुक्त झाला.

असें सांगतात की याच राजानें नंतर वेरूळच्या गुंफा खोदण्याचें काम सुरूं केलें. हिंवाळयांत हिरव्या शेवाळामुळें कुंडाचें पाणी देखील हिरवें वाटूं लागतें. कुंडाच्या चारहि बाजूंस सुन्दर पायऱ्या बांधलेल्या आहेत.

**सीतेचा प्रकृतिसौंदर्याविषयींचा पक्षपात :** सीतेला राजमहालांत ठेवून वनवासाला जाण्याची गोष्ट रामानें काढली, तेव्हां तें अमान्य करून सीतेनें वनांत जाण्याची व तेथले कष्ट सहन करण्याची तयारी दर्शवली. ती म्हणाली :

फलमूलाशना नित्यं भविष्यामि न संशयः ।
न ते दुःखं करिष्यामि निवसन्ती त्वया सह ॥ १६ ॥
अग्रतस्ते गमिष्यामि भोक्ष्ये भुक्तवति त्वयि ।
अिच्छामि परतः शैलान् पल्वलानि सरांसि च ॥ १७ ॥
द्रष्टुं सर्वत्र निर्भीता त्वया नाथेन धीमता ।
हंसकारण्डवाकीर्णाः पद्मिनीः साधुपुष्पिताः ॥ १८ ॥

अिच्छेयं सुखिनी द्रष्टुं त्वया वीरेण संगता ।
अभिषेकं करिष्यामि तासु नित्यम् अनुव्रता ॥ १९ ॥
सह त्वया विशालाक्ष रंस्ये परमनंदिनी ।
अेवं वर्षसहस्राणि शतं वापि त्वया सह ॥ २० ॥

अयोध्याकांड—२७ : १६–२०

[ मी नेहमीं फळेंमुळें खाअूनच राहीन. आपल्या बरोबर राहून मी आपल्याला कसलाच त्रास देणार नाहीं. मी आपल्या पुढें पुढें चालेन (मागें रेंगाळणार नाहीं ) आणि आपण जेवल्यानंतरच जेवीन. आपल्याबरोबर निर्भय होअून सर्वत्र भटकत पर्वत, तळीं आणि सरोवरें पहाण्याची माझी अुत्कट अिच्छा आहे. आपल्या बरोबर राहून हंस आणि कारंडवांनीं भरलेलीं, सुंदर पुष्पांनीं युक्त अशीं सरोवरें पाहून आनंद लुटण्याचीं माझी अिच्छा आहे. त्या कमळांच्या सरोवरांत मी स्नान करेन आणि आपल्याबरोबर रोज त्यांत खेळेन. अशा प्रकारें शेकडोंच काय, पण हजारों वर्षें देखील मला क्षणाप्रमाणें भासतील. ]

अुत्तररामचरितांत चित्र–दर्शनानंतर सीता आपले डोहाळे सांगते : ' मनांत येतें कीं प्रसन्न आणि घनदाट वनराजींमधें विहार करावा. आणि जिचें पाणी पावनकारी, आनंददायक व शीतल आहे अशा भगवती भागीरथींत स्नान करावें.'

दुसऱ्या अंकांत राम जनस्थान वगैरे प्रदेश पाहून म्हणतो, ' खरोखर वैदेहीला वनें फार प्रिय होतीं. हींच तीं अरण्यें होत ! याहून अधिक भयानक दुसरें काय असणार ?'

तिसऱ्या अंकांत सीतेनें पाळलेल्या हत्ती, मोर, कदंब व हरणांचें वर्णन येतें. पहाः श्लोक क्र. ६, १८, १९, २०, २१, २५.

पृ. १२७ **रामरक्षा–स्तोत्र** : बुध कौशिक अृषींनीं रचलेलें अत्यंत मनोहर व लोकप्रिय स्तोत्र.

**शिरो** मे राघवः पातु, **भालं** दशरथात्मजः ॥ ४ ॥
कौसल्येयो **दृशौ** पातु, विश्वामित्रप्रियः **श्रुती** ।
**घ्राणं** पातु मखत्राता, **मुखं** सौमित्रिवत्सलः ॥ ५ ॥

**जिह्वा** विद्यानिधिः पातु, **कंठं** भरतवन्दितः ।
**स्कन्धौ** दिव्यायुधः पातु, **भुजौ** भग्नेशकार्मुकः ॥ ६ ॥
**करौ** सीतापतिः पातु, **हृदयं** जामदग्न्यजित् ।
**मध्यं** पातु खरध्वंसी, **नाभिं** जाम्बवदाश्रयः ॥ ७ ॥
सुग्रीवेशः **कटिं** पातु, **सक्थिनी** हनुमत्प्रभुः ।
**ऊरू** रघूत्तमः पातु रक्षःकुल-विनाशकृत् ॥ ८ ॥
**जानुनी** सेतुकृत् पातु, **जङ्घे** दशमुखान्तकः ।
**पादौ** बिभीषणश्रीदः, पातु रामोऽ**खिलं वपुः** ॥ ९ ॥

## २७ शेतकरी नदी घटप्रभा

पृ. १२८ **आमच्याकडली**—दक्षिण महाराष्ट्राला लागून असलेल्या.

**मुलांचें**—शेतकऱ्यांचें.

## २८ काश्मीरची दूधगंगा

पृ. १२९ **सरोवर तोडून**—" आज जेथें रमणीय काश्मीर आहे तेथें पुराणकालीं सती–सर नांवाचें अेक सुदीर्घ सरोवर होतें. हरमुख पर्वत आणि पीरपुंजालच्या मधें हें सरोवर पसरलें होतें. खुद्द पार्वती या सरोवरांत विहार करीत असे. पण पुढें पुष्कळ राक्षस या सरोवरांत घुसून आश्रय करून राहिले तेव्हां देवांनीं सतीसराचा नाश करावयाचें नक्की केलें. त्याकरितां भगवान कश्यपांनीं वराहाची अुपासना केली व वराहानें संतुष्ट होअून स्वतःच्या सुळयांनीं पर्वताला खिंड पाडली आणि सतीसरचे पाणी ' वराहमूलम् ' च्या खिंडींतून वितस्ता नदीच्या रूपानें वाहूं लागलें. वितस्ता हीच हल्लींची झेलम आणि वराहमूलम् हेंच आजचें ' बारामुल्ला ' ".

( पहा लेखकाचें ' जीवनांतील आनंद ' हें पुस्तक. )

**अुपत्यका**—खोरें, खिंड. तसेंच अधित्यका म्हणजे पठार (table-land)

**बुवा**—अनंतबुवा मरढेकर.

**सतीकन्या**—सतीच्या प्रदेशांत जन्मलेली.

## २९ स्वर्धुनी वितस्ता

पृ. १३० **पृथ्वीवर जर कोठें**—मूळ फारशी ओळी खालीलप्रमाणें आहेत :

अगर फिरदौस बरूअे जमीनस्त,
हमीनस्तो, हमीनस्तो, हमीनस्त ।

पृ. १३१ **तिच्याकांठीं अेक मोठी वैभवशाली संस्कृति…झाली**—अनंतपुरच्या जवळ अेका पहाडाखालीं अेका प्राचीन शहराचे अवशेष गाडले गेलेले होते. अगदीं अलीकडेच त्यांचें अुत्खनन झालें आहे.

**चिनार**—हे वृक्ष फक्त काश्मीरमधेंच असतात.

**बुत्‌शिकन**—( बुत् = मूर्ति, शिकन = भंगणारा ) मूर्तिभंजक. ( बुत्-परस्त = मूर्तिपूजक. )

**गाजी**—धर्माकरितां युद्धास जाणारा मुसलमान. असल्या युद्धांत मरण पावेल तो शहीद. ( म्हण : जीते तो गाजी और मरे तो शहीद. )

पृ. १३२ **सर्वतः संप्लुतोदके**—( गीता २-४६ ) पुरामुळें सर्वत्र पाणीच पांणी होतें अशा वेळीं.

**रानडुकराच्या सुळ्यासारखा** : वराहमूलम् वरून ही अुपमा लेखकाला सुचली असेल काय ?

पृ. १३३ **हातापेक्षां लांब बाह्या असलेले**—"काश्मीरची हवा फार थंड असते. त्याकरितां तेथील लोकांनीं मोठे मजेदार अुपाय काढले आहेत. पट्टूचे पायघोळ डगले तर ते घालतातच, पण या डगल्यांच्या बाह्या हाताच्या बोटाबाहेर देखील वीत दीड वीत लांब ठेवलेल्या असतात. शाळकरी मुलगा हातांत अेकदोन पुस्तकें घेअून जात असला तर तीं सुद्धां बाहींत येअून जातात. मुलाला कांहीं खावेंसें वाटलें तरी तो होतां होअील तों हात बाहेर काढीत नाहीं. बाहीनेंच खाद्य पदार्थ पकडून तो खातो." ( पहा लेखकाचें 'जीवनांतील आनन्द' हें पुस्तक. )

पृ. १३४ **स्वर्धुनी**—[ स्वर् ( स्वर्ग ) + धुनी ( नदी ) ] स्वर्गनदी.

## ३० सेवाव्रता रावी

पृ. १३५ **स्वामी रामतीर्थ**—आधुनिक भारताच्या निर्मितींत स्वामी रामतीर्थांचा बराच मोठा हातं आहे. श्री. काकासाहेबांनीं मराठींत स्वामीजींचें

जीवन चरित्र लिहिलें होतें व त्यांच्या कांहीं लेखांचा अनुवाद करून मराठींत अेक संग्रह प्रसिद्ध केला होता. ही त्यांची पहिली साहित्य-कृति होय. या कृतीनेंच काकासाहेबांच्या लेखक-जीवनास आजपासून चाळीस वर्षांपूर्वी प्रारंभ झाला होता.

**अर्जुनदेव**—( १५६३–१६०६ ) शिखांचे पांचवे गुरु. आदि-ग्रंथाची रचना यांनींच केली. त्यांत पूर्वी होअून गेलेल्या गुरूंचीं आणि अन्य संतांचीं वचनें संग्रहित केलेलीं आहेत. त्यांच्या शत्रूंनीं बादशहापाशीं तक्रार केली कीं या ग्रंथांत हिंदू आणि अिस्लाम धर्माची निंदा करण्यांत आली आहे. परंतु अकबरानें त्या ग्रंथांचे कित्येक भाग पाहून त्यांची सुटका केली आणि त्यांचा मोठा सन्मान केला. जहांगीरच्या अमदानींत त्यांच्या शत्रूंनीं पुन्हां अेकदां त्यांच्याविरुद्ध तक्रार केली. जहांगीर आपला मुलगा खुसरो याला अटक करूं पहात असतांना पळून जाअून अर्जुनदेवांच्या आश्रयाला आला आणि त्यांनीं त्याला ठेअून घेतलें. हा राजद्रोह झाला, असा आरोप त्यांच्यावर करण्यांत येअून गुरूंच्या शत्रूंनीं बादशहाकडून त्यांना दोन लाख रुपये दंड करविला. अर्जुनदेवांनीं स्वतः तर दंड भरला नाहींच पण दुसऱ्यांनाहि भरूं दिला नाहीं. म्हणून बादशहानें तुरुंगांत त्यांच्यावर नाना अत्याचार केले आणि शेवटीं त्यांना ठार मारलें. तलवारीशिवाय आपला पंथ टिकणें शक्य नाहीं हें ओळखून त्यांनीं आपल्या मुलाला सशस्त्र बनून गादीवर बसण्याचा आणि पुरेशी फौज ठेवण्याचा आदेश पाठवला होता. शिखांच्या अितिहासाला या आदेशामुळें पुढें नवीनच वळण मिळालें.

**रणजितसिंह** ( १७८०–१८३९ ) शिखांचा राजा. अहमदशाह अब्दाली-नंतर पंजाब प्रांत परत शिखांच्या हातीं आला. पण त्यांत लहान लहान राज्यें अुत्पन्न होअून तीं आपसांत लढूं लागलीं. वयाच्या तेराव्या वर्षी गादीवर येणाऱ्या रणजितसिंहानें वयाच्या अेकोणिसाव्या वर्षी शिख राज्याचें आधिपत्य स्वतःकडे घेतलें. अिंग्रजदेखील त्याला वचकून असत. चाळीस वर्षें सतत प्रयत्न करून शिखांत त्यानें लष्करी ताकत पैदा केली. असें सांगतात कीं रणजितसिंह जेव्हां अटक नदी ओलांडून पलीकडे जाअूं लागला तेव्हां त्याच्या गुरूंनीं सांगितलें कीं हिंदूंना अटक न ओलांडण्याची शास्त्रांत आज्ञा आहे. यावर तो म्हणाला,

सबै भूमि गोपालकी, तामें अटक कहाँ ?
जाकें मनमें अटक है वो ही अटक रहा ।

आणि धडाडीनें पुढें जाऊन सबंध अफगाणिस्तान त्यानें काबीज केलें !

पृ. १३७ **अप्सरा**—[ अप् = पाणी + सृ = पुढें जाणें = पाण्यांत तरंगणारी, विहार करणारी ] गंधर्वांची पत्नी. अप्सरांना पाण्यांत खेळणें फार आवडतें म्हणून त्यांना हें नांव देण्यांत आलें आहे. रामायणांत त्यांची अुत्पत्ति याप्रमाणें देण्यांत आली आहे.

अप्सु निर्मथनाद् अेव रसात् तस्माद् वरस्त्रियः ।
अुत्पेतुर् मनुजश्रेष्ठ ! तस्माद् अप्सरसोऽभवन् ॥

## ३१ स्तन्यदायिनी चिनाब

पृ. १३९ **माझ्या जीवनाच्या स्मृतीला प्रारंभ होतो**—१८९१-९२

## ३२ जम्मूची तवी

पृ. १३९ **विग्रह**—युद्ध; वेगळें पाडणें.

**संधि**—तहाकरितां अेकत्र करणें. नदी सर्वांना अेकत्र आणते.

राजनीतींत कार्यसिद्धीचे सहा मार्ग सांगितले आहेत : १ संधि, २ विग्रह, ३ यान ( चढाओी ), ४ स्थान अथवा आसन ( मुक्काम करणें ), ५ संश्रय ( आश्रय घेणें ) आणि द्वैध अथवा द्वैधीभाव ( दुटप्पीपणा ).

पृ० १४० **आत्मरति, आत्मक्रीडा०**—श्रेष्ठ ब्रह्मज्ञाचें वर्णन करतांना मुंडकोपनिषदांत सांगितलें आहे:—

आत्मक्रीड आत्मरतिः, क्रियावान् अेष ब्रह्मविदां वरिष्ठः ॥
मुण्डक ३-१-४.

आत्म्यांतच रममाण होणारा, आत्म्यांतच आनंद मानणारा क्रियावान पुरुष ब्रह्मज्ञांत श्रेष्ठ आहे.

**आत्मन्येव०**—पहा गीता ३–१७.

यस्त्वात्मरतिरेव स्याद् आत्मतृप्तश्च मानवः ।
आत्मन्येव च संतुष्टः तस्य कार्यं न विद्यते ॥

[ जो मनुष्य आत्म्यांतच आनंद मानणारा असतो, आत्म्यांतच तृप्त असतो व आत्म्यांतच संतोष मानतो त्याला कांहींहि करण्याचें बाकी अुरत नाहीं. ]

## ३३. सिंधूचा विषाद

पृ० १४० **मानदंड** : मापण्याचा दंड, गज. महाकवि कालिदासाच्या 'कुमारसंभव' या महाकाव्यांतील पहिल्या श्लोकांत हिमालयाकरितां हा शब्द वापरलेला आहे.

अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः ।
पूर्वापरौ तोयनिधी विगाह्य स्थितः पृथिव्या अिव मानदण्डः ॥

( ज्यांत देवांचा वास आहे असा हिमालय नांवाचा नगाधिराज पृथ्वीला मापणाऱ्या गजाप्रमाणें पूर्व आणि पश्चिम समुद्रांत स्नान करीत अुत्तरेकडे अुभा आहे. )

पृ० १४१. **पंजाबच्या पांच नद्या**—झेलम, चिनाब, रावी, बियास, आणि सतलज.

**संयुक्त प्रांतांतील पांच नद्या**—गंगा, यमुना, सरयू, चंबल आणि गोमती.

**अतिभारतीय**—केवळ हिन्दुस्थानांतूनच नव्हे तर त्याच्या सीमेचें अतिक्रमण करून बाहेरून देखील वाहणाऱ्या नद्या.

**वैदिक सप्तसिंधु**—वेदांत ज्यांचा अुल्लेख आहे अशा सात नद्या—वितस्ता ( झेलम ), असिक्नी ( चिनाब ), परुष्णी अथवा अिरावती ( रावी ), शतद्रु ( सतलज ), विपाशा ( व्यास, बियास ), सिंधु आणि सरस्वती.

**प्राचीन आर्य.....ओढवून घेतली**—हिंदुस्थानावर झालेलीं जवळ जवळ सर्वच आक्रमणें वायव्य दिशेकडून झालीं आहेत.

**परोपनिसदी**—अफगाणिस्तानला ग्रीक भाषेंत हें नांव दिलेलें आढळतें.

पृ. १४२ **यवन**—Ionian Greek. या शब्दरचनेंतील प्रथम शब्दावरून 'यवन' हा शब्द बनला आहे.

**बाल्हीक**—बल्ख, बॅक्ट्रिया. बाल्हीक शब्द वेदांत आलेला आहे.

**राणी सेमीरामिस**—[ अि. स. पूर्वीं ८०० च्या आसपास ] ॲसीरियाची सुप्रसिद्ध राणी. बॅबिलोनची स्थापना हिनें केली होती असें म्हणतात.

निनेवेहचा संस्थापक तिचा पति नीनस याच्यापेक्षांहि ती जास्त पराक्रमी होती. अगदीं अर्भक असतांनाच तिच्या आअीनें तिला सोडून दिलें होतें. प्रथम तिचें लग्न नीनसच्या अेका सरदाराबरोबर झालें होतें. पुढें नीनसचें मन तिच्यावर बसलेलें पाहून तिच्या पतीनें आत्महत्या केली व तिनें नीनसशीं विवाह केला. त्याच्यामागें तीच राज्यारूढ झाली व अुतारवयांत तिनें स्वखुशीनें स्वतःच्या पुत्राला गादीवर बसविलें.

**सुवर्ण करभार**—अि. स. पूर्वी सहाव्या शतकांत अिराणचा बादशहा दरायस यानें सिंध प्रान्त जिंकून त्याच्यावर वार्षिक १८५ हंडरवेट ( = ५१५॥ मण ) सोन्याची खंडणी बसविली होती, त्याचा येथें अुल्लेख आहे.

**युअेची :** अि. स. पूर्वी पहिल्या शतकाच्या सुमारास शकांना अुत्तर हिंदुस्थानांतून दक्षिणेंत हाकलून लावून अुत्तर भारतांत साम्राज्य स्थापणारे मध्य आशियांतील कुशान लोक. त्यांच्यापैकीं बहुतेकांनीं बौद्ध व कांहींनीं हिंदुधर्म स्वीकारला होता. प्रख्यात बौद्ध सम्राट् कनिष्क स्वतः कुशान होता. कुशान साम्राज्याच्या भरभराटीच्या काळीं त्याचा विस्तार अेवढा मोठा होता कीं त्यांत पश्चिम आशियांतील बोखारा व अफगाणिस्तान, मध्य आशियांतील काशगर, यारकंद आणि खोतान, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील काश्मीर आणि पंजाब व पूर्वेस बनारस, आणि दक्षिणेस विंध्यापर्यंतचा सर्व प्रदेश येअून जात असे.

**हूण**—अि. स. पांचव्या–सहाव्या शतकांत अेकामागून अेक हल्ले करून माळवा, सिंध आणि सरहद्द प्रान्तांत राज्य स्थापन करणारे श्वेत हूण. युरोपांत देखील अॅटिल्लाच्या सेनापतित्वाखालीं या लोकांनीं जुलमाची पराकाष्ठा केली होती. हिंदुस्थानांत त्यांच्या असह्य जुलमाला कंटाळून शेवटीं आर्यावर्तांतील सर्व राजांनीं अेकत्र जमून बालादित्य व यशोधर्माच्या नेतृत्वाखालीं हूण राजा मिहिरगुल याचा पराभव करून त्याला कैद केलें. त्यानंतर कांहीं वर्षांनीं हूणांचे हल्ले बंद झाले हूण राज्य जवळ जवळ अर्धे शतक हिंदुस्थानांत अस्तित्वांत होतें.

**गिरगिट**—श्रीनगरच्या वायव्येस १२५ मैलांवर, जवळ-जवळ ५००० फूट अुंचीवर असलेलें त्या नांवाच्या जिल्ह्यांतील अेक शहर. आसपास बौद्ध अवशेष आहेत.

**चित्राल**—वायव्य सरहद्द प्रान्तांतील त्या नांवाच्या राज्याचें मुख्य शहर.

**स्वात**—पंजकोरेस मिळणारी छोटी नदी.

**सफेद कोह**—( कोह = पर्वत ) अेका पर्वताचें नांव. ( तुलना : कोह-अि-नूर = तेजाचा पर्वत. )

**कर्नल यंगहजबंड**—सर फ्रांसिस अेडवर्ड यंगहजबंड यांचा जन्म १८६३ त पंजाबमधें झाला. जातीनें ते अॅंग्लोअिंडियन होते. १८८२ त फौजेंत भरती झाले. १८९० मधें पोलिटिकल डिपार्टमेंटमधें बदली झाली. १८८६ त मांचूरियामधें संशोधन केलें. १८८७ त चिनी तुर्कस्तानच्या रस्त्यानें पेकिंगपासून भारतापर्यंतची यात्रा केली. १८९३-९४ त चित्रालमधें पोलिटिकल अेजंटचें काम केलें. १८९५ त चित्रालच्या स्वारीच्या वेळेस 'टाअिम्स'च्या बातमीदाराचें काम केलें. १९०३-४ साली ब्रिटिश-मंडळाबरोबर ल्हासाला जाअून आले. पूर्वेकडील देशांवर यांनीं अनेक पुस्तकें लिहिलेलीं आहेत. १९१९ सालीं रॉयल जॉग्रफिकल सोसायटीचे प्रमुख झाले. विस्तृत चरित्रासाठीं पहा : 'फ्रांसिस यंगहजबंड-अेक्स्प्लोअरर अॅंड मिस्टिक'—लेखक जॉर्ज स्वीवर.

**अमीर अमानुल्ला**—भारतांत रॉलेट बिलाविरुद्ध प्रचंड आंदोलन सुरू झालें असतानांच १९१९ च्या अेप्रिलमधें अफगाणिस्तानच्या अमीरानें भारतावर आक्रमण केलें होतें. दहा दिवसांच्या आंतच अफगाणांचा पराभव झाला होता. दीर्घ वाटाघाटीनंतर ८ ऑगस्टला तहनाम्यावर सह्या केल्या गेल्या.

**अुन्हाळयांतलें वेड** : त्यावेळीं अुन्हाळयाचे दिवस होते व कृत्य अविचाराचें होतें म्हणून. अमीराला वाटलें अुन्हाळयाच्या दिवसांत आक्रमण केल्यानें अिंग्रजांचा पराभव होअील. परंतु ती कल्पना चुकीची होती. अिंग्रजांनीं या साहसाला 'मिड-समर-मॅडनेस' नांव दिलें होतें.

**कोहाटची क्रूरता**—१९२४ च्या ९ आणि १० सप्टेंबर रोजीं घडलेल्या घटनेचा येथें अुल्लेख आहे. धर्मान्तर व अपहरण यामुळें वातावरण आधींच तंग होतें. अितक्यांत कोहाटच्या सनातनी धर्मसभेच्या मंत्र्यांनीं अेक पुस्तिका प्रसिद्ध केली. मुसलमानांना त्यामुळें त्वेष चढला. हिंदूंनीं झालेल्या प्रकाराबद्दल जाहीर माफी मागून पुस्तिकेच्या अुरलेल्या प्रति जाहीर रीत्या जाळल्या तरीहि मुसलमानांना संतोष झाला नाहीं. कडक अुपाय योजण्याबद्दल त्यांनीं

सरकारवर दडपण आणलें. त्याचा अुपयोग झाला नाहीं म्हणून मशिदींत अेकत्र जमून जेहाद करण्याच्या त्यांनीं शपथा वाहिल्या. ठरल्याप्रमाणें ९ तारखेला दंगा सुरू झाला. सुरुवात कशी झाली याबद्दल मतभेद आहेत; पण सुरू झाल्यानंतर अेकमेकांवर गोळीबार करण्यापर्यंत मजल गेली. साऱ्या हिंदू लत्त्याला आग लावून देण्यांत आली. पोलीस व लष्कर यांनीं देखील गोळीबार केला. अेकंदरींत मालमत्ता व प्राणांची बरीच हानि झाली. सर्व हिंदूंना लष्करी रक्षणाखालीं कँटॉनमेंटमधें व तेथून त्यांच्या विनंतीप्रमाणें रावळपिंडीस नेअून ठेवण्यांत आलें. बेळगांव येथें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत या बाबतींत पास करण्यांत आलेल्या ठरावांत, कोहाटच्या मुसलमानांनीं सन्मानपूर्वक परत बोलावल्याखेरीज व त्यांच्या मालमत्तेबद्दल व जीविताबद्दल हमी दिल्याखेरीज हिंदूंनीं तेथें परत जाअू नये असा सल्ला त्यांना देण्यांत आला होता.

**कुरम**—सुलेमान पर्वतांतून निघून सिंधूला मिळणारी अेक नदी. वैदिक नांव क्रुमु.

पृ. १४३ **डेरा अिस्माअिलखान**—लाहोरच्या पश्चिमेस १२५ मैल अंतरावर वसलेलें सीमाप्रान्तांतील अेक शहर. येथून गोमलघाट द्वारा अफगाणिस्तानाशीं व्यापार चालतो. सूती कापड व वेलबुटीच्या कामासाठीं हें स्थान प्रसिद्ध आहे.

**डेरा गाझीखान**—भावलपुरच्या वायव्येस ७० मैल दूर पंजाबमधील अेक शहर. सिंधूच्या पुरामुळें याचें बरेंच नुकसान होत असे. म्हणून १८९१ त येथें दगडाचा मोठा बांध बांधला गेला होता. येथल्या कांहीं मशिदी प्रसिद्ध आहेत.

**लाहोरचें वैभव**—अकबराच्या आणि त्याच्या वंशजांच्या काळांत लाहोर खूपच भरभराटीस आलें होतें. वजीरखानची मशीद, जामा मशीद, शीशमहल, रणजितसिंहाचा महाल आणि शहराच्या बाहेर शहादऱ्यामधील बादशहा जहांगीराची कबर आणि शालीमार बाग आजदेखील त्याच्या वैभवाची साक्ष देत आहेत.

**व्यास**—बियास नदी. वेदकालीं हिला विपाशा म्हणत. स्वतःच्या शंभर पुत्रांना राक्षसानें खाल्लेलें पाहून शोक-विह्वल झालेल्या वसिष्ठ ऋषींनीं स्वतःस

बांधून घेऊन या नदींत उडी घेतली असतां नदीनें त्यांना पाशमुक्त म्हणजे विपाश केलें म्हणून या नदीला हें नांव मिळालें, अशी कथा आहे.

**त्यागाय संभृतार्थानाम**—रघुवंशाच्या सुरुवातीसच या वंशाच्या राजांचें वर्णन करतांना कालिदासानें त्यांच्या अनेक गुणांमधें त्यागा ( दाना ) करितां अर्थ ( धन ) संग्रह करण्याच्या गुणाचा उल्लेख केला आहे.

पृ. १४४ **जयद्रथाचा काळ**—महाभारत काळ. महाभारत काळांत जयद्रथ हा सिंधु देशाचा राजा होता.

**दाहिर**—( ६४५–७१२ )–सिंधचा एक ब्राह्मण राजा. हा जच्च ( चच ) राजाचा मुलगा. सिंधला लागून असलेल्या खिलाफत प्रान्ताच्या हज्जाज नांवाच्या सुभेदाराला त्यानें अनेक वेळां हरवलें होतें. शेवटीं महंमद बिन कासम नांवाच्या केवळ सतरा वर्षें वय असलेल्या सेनापतीला त्याच्यावर स्वारी करण्यास धाडण्यांत आलें. या युद्धांत दाहिराचा हत्ती उधळल्यामुळें त्याचा प्राणान्त झाला व त्याचें लष्कर पळून गेलें. तेव्हांपासूनच मुसलमानांचा हिंदुस्थानांत प्रवेश झाला. दाहिराची राणी लाडी हिच्या बरोबर महंमदानें स्वतः लग्न केलें, व तिच्या दोन कुमारी मुली खलीफाला नजर म्हणून पाठवल्या.

**जच्च** ( ५९७–६३७ )—वर सांगितलेल्या दाहिराचा हा पिता. त्याच्या वंशाचा इतिहास फारसींत लिहिलेल्या 'चचनामा' या ग्रंथांत पहावयास मिळतो. हा राजा फार शूर होता. स्वतःच्या राज्याची हद्द त्यानें थेट काश्मीर-पर्यंत नेली होती. हा मूळचा सिंधमधील आरोर गांवच्या शैलज नांवाच्या अग्निहोत्री ब्राह्मणाचा मुलगा. राजाच्या मंत्र्याचा कारकून म्हणून सुरुवात करून चढत चढत तो स्वतःच राजा होऊन बसला व पूर्वीच्या राजाच्या राणीशीं त्यानें लग्न केलें.

**ब्राह्मण राजांचे अनाचार**—सिंधमधील एका ब्राह्मण राजाला एका ज्योतिषानें सांगितलें कीं तुझ्या बहिणीचा मुलगाच तुझें राज्य लाटणार. तेव्हां त्याला उपाय म्हणून त्या राजानें स्वतःच्या बहिणीशींच लग्न लावून टाकलें ! दुसऱ्या एका राजानें एका सतीवरच अत्याचार केले. लोक असे कांहीं त्रासले होते कीं महम्मद बिन कासिम जेव्हां सिंधवर स्वारी घेऊन आला तेव्हां तेथील जाट व मेड लोकांनीं त्याला खूप मदत केली.

**महंमद बिन कासिम**—वर अुल्लेख आलेल्या या सेनापतीचा अंत मोठ्या विचित्र रीतीनें झाला. त्यानें खलिफाला नजर केलेल्या दाहिरच्या दोन कन्यांनीं खलीफाला सांगितलें कीं महंमदानें आम्हांला आधींच भ्रष्ट केलें असल्यामुळें खलीफाबरोबर लग्न करण्याच्या मानास आम्ही अपात्र आहोंत. क्रुद्ध खलीफानें महंमदाला हुकूम पाठविला कीं पत्र पोहोंचतांच स्वतःस गाअीच्या कातड्यांत शिवून घेअून माझ्यापुढें हजर हो. महंमदानें ही आज्ञा अक्षरशः पाळली. कातड्यांत शिवला गेल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं तो मरण पावला. या स्थितींत त्याचें प्रेत जेव्हां खलीफापुढें रुजू झालें तेव्हां मुलींनीं खलीफाला सांगितलें कीं आमच्या घराण्यातर्फे सूड अुगविण्याकरितां आम्ही खोटेंच सांगितलें होतें! खलीफानें नंतर त्यांचा देखील शिरच्छेद करविला, आणि मुलींनीं अशा तऱ्हेनें स्वतःचें शील वांचविलें.

**सर चार्लस नेपियर** ( १७८२-१८५३ )—१८०८ मध्यें स्पेनमध्यें मूर लोकांच्या विरुद्ध त्यानें लढाअीमधें भाग घेतला. आणि कोरूनामधें पकडला गेला. १८१५ मधें नेपोलियनच्या विरुद्ध लढाअी केली. हा कवि बायरनचा मित्र होता. १८४१ त भारतांत आला. १८४२ त सिन्धच्या फौजेचें नेतृत्व केलें आणि त्याच वर्षी अिमामगढचा किल्ला जिंकून घेतला. १८४४ तल्या मियाणीच्या युद्धांत विजयी झाला. मीरपुरच्या शेर मुहम्मदाचा पराजय करून त्याला हांकलून दिलें. १८४४–४५ त सिन्धमधील पहाडी जातींना जिंकून घेतलें. डलहौसीशीं मतभेद झाल्यामुळें राजिनामा देअून घरीं परतला. १८५३ त मृत्यु. अन्यायानें सिन्धवर अधिकार जमवल्यानंतर त्यानें रिपोर्ट दिला : "I have sinned ( sind )"

पृ. १४५. **सती सुहिणी**—सिंध प्रांतांत सती सुहिणीची प्रेमकथा प्रसिद्ध आहे सुहिणीच्या पित्यानें तिच्या प्रियकराला गांवांतून हाकून लावलें होतें. पण तो रात्रीचा नदी ओलांडून गुप्तपणें येत असे. पुढें कांहीं कारणानें त्याचें येणें अशक्य झालें तेव्हां सुहिणी अेक मोठें मडकें पोटाखालीं घालून रात्रीची नदी पार करूं लागली! तिच्या नणंदेच्या हें लक्षांत आलें तेव्हां तिनें भाजलेल्या मडक्याच्या जागीं अेक कच्चें मडकें ठेअून दिलें. सुहिणी नित्याप्रमाणें तें घेअून नदी ओलांडूं लागली. अर्धी नदी ओलांडली आणि मडकें भिजून

पाण्यांत विरघळलें. बुडता बुडता तिनें मेहारच्या नांवानें आरोळी ठोकली. ती अैकतांच मेहारनेंहि पुरांत अुडी टाकली. दुसरे दिवशीं दोघांचीं आलिंगनबद्ध प्रेतें कोळी लोकांनीं बाहेर काढून त्यांची अेकत्र अंत्यक्रिया केली.

## ३४ मंचरची जीवनविभूति

पृ. १४६ **दिशो न जाने०**—मला दिशांचेंहि भान अुरत नाहीं आणि शांतिहि लाभत नाहीं. (गीता, ११-२५)

**अिदानीम्०**—आतां मी प्रसन्न झालों आहें आणि भानावर आलों आहें. (गीता ११-५१)

पृ. १४७ **आर्दिंचि साखर०**—ज्ञानेश्वरी ४·२१६. मूळ गुजराथी म्हणीचा अर्थ 'आधींच (पदार्थ) आवडत होता आणि वैद्यानें (पथ्यासाठीं किंवा औषधासाठीं) तो सांगितला' असा आहे. त्याला समर्पक अशी ज्ञानेश्वरींतील वरील ओवी आहे.

पृ. १४८ **रैहाना बहन**—श्री. अब्बास तैयबजींच्या सुपुत्री. भक्त-हृदय आणि सुकण्ठ गायिका. यांचें 'Heart of a Gopi' नांवाचें पुस्तक प्रसिद्ध आहे. या पुस्तकाचे फ्रेंच व पोलिश भाषांतूनहि अनुवाद झालेले आहेत. हिन्दींत 'गोपी-हृदय' या नांवानें याचा अनुवाद प्रसिद्ध झालेला आहे. यांचीं कांहीं हिन्दी पुस्तकेंहि प्रसिद्ध झालेलीं आहेत—'सुनिये काकासाहब!', 'नाश्तेसे पहले' 'कृपा-किरन' वगैरे. यांची हिन्दी किंवा हिन्दुस्तानी लिहिण्याची अेक स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण शैली आहे.

पृ. १५० **पाय बांधून ठेवलेले बगळे**—मासे पकडण्याचा अेक विशिष्ट प्रकार. बगळ्याला पाण्याजवळ पाय बांधून ठेवतात. नंतर त्यानें चोंचींत पकडलेले मासे मनुष्य आपल्या ताब्यांत घेतो.

**मंघा**—हा सिन्धी शब्द आहे.

पृ. १५१ **ढंढ**—हाहि सिन्धी शब्द आहे.

## ३५ लाटांचा तांडवयोग

पृ. १५३ **वप्रक्रीडा**—शिंगें अथवा सुळे यांनीं जमीन अुकरण्याचा खेळ. 'मेघदूतां'त या शब्दाचा प्रयोग आलेला आहे :

तस्मिन्नद्रौ कतिचिद् अबला–विप्रयुक्तः स कामी
नीत्वा मासान् कनक–वलय–भ्रंश–रिक्त–प्रकोष्ठः ।
आषाढस्य प्रथमदिवसे मेघम् आश्लिष्टसानुं
वप्रक्रीडापरिणतगज-प्रेक्षणीयं ददर्श ॥

**अमर्ष**—तिरस्कार किंवा अपमानामुळें अुत्पन्न झालेला स्थिर क्रोध. काव्यशास्त्रांत त्याची व्याख्या येणेप्रमाणें केली गेली आहे : ‘ अधिक्षेपापमानादेर् अमर्षोऽभिनिविष्टता। ’ भारवि कवीच्या ‘ किताराुर्जुनीय ’ काव्यांत दुर्योधनाच्या राजनीतीची प्रशंसा अैकून द्रौपदीला राग येतो व ती युधिष्ठिराला म्हणते : ‘ अमर्षशून्येन जनस्य जन्तुना न जातहार्देन न विद्विषादरः॥ १,३३ ( ज्याच्यांत अमर्ष नाहीं अशा माणसाचा स्नेहीजनहि आदर नाहींत व शत्रुहि आदर करीत नाहींत. )

**शिवतांडव–स्तोत्र**—कवि रावणानें लिहिलेलें प्रसिद्ध स्तोत्र. ‘ जोगचा धबधबा ’ या प्रकरणावरील टीपा पहा.

**प्रमाणिका आणि पंचचामर** : हे दोन संस्कृतमधील लोकप्रिय आणि अत्यंत सरळ छंद आहेत. प्रमाणिकेचीं दोन पदें मिळून अेक पंचचामर बनतें. त्याला नाराच असेंहि नांव आहे.

प्रमाणिकापदद्वयम् वदेत पंचचामरम् ।

**पुष्पदंत** : अेक गंधर्व आणि शिवगण. शिवमहिम्न–स्तोत्राचा रचनाकर्ता. वायव्य दिशेच्या दिग्गजाचें नांवहि पुष्पदंत आहे. पुष्पदंताची कथा ‘ कथा-सरित्सागरां ’त आहे.

पृ. १५४ **गोमूत्रिक–बंध** : नागमोडी ( Zigzag ) वळण.

**श्रावण–भाद्रपदी धबधबे** : राजवाड्यांत जेव्हां पाण्याचा प्रवाह वाहता सोडतात आणि मधें लहानशा दगडावरून वाहणारा धबधबा बनवला जातो, तेव्हां या धबधब्याला श्रावण–भाद्रपदी धबधबा म्हणतात.

## ३६ सिंधूनंतर गंगा

पृ. १५७. **सौवीर देश** : सिन्ध आणि मारवाडच्या सीमेवरील प्रदेश.

पृ. १५८ **सदाकत आश्रम** : [ सदाकत = सत्य + आश्रम ] बिहारचे

प्रसिद्ध देशभक्त श्री. मजहरुल हक यांनीं याची स्थापना १९२०-२१ च्या सुमारास केली होती.

पृ. १६१ **'रसो वै सः'** : खरोखरच तो रस आहे. तैत्तिरीयोपनिषदांत ब्रह्माचें वर्णन करतांना हें वचन आलेलें आहे. पहा तैत्तिरीय० २-७.

पृ. १६२ **कैंकर्य** : [ किंकर ( = नोकर ) + य ] नोकरपणा, नोकरी.

पृ. १६३ **ॐ पूर्णम् अदः** : तें पूर्ण आहे, हें पूर्ण आहे. पूर्णापासून पूर्ण निष्पन्न होतें. पूर्णांतून पूर्ण काढून घेतलें तरी पूर्णच शेष राहतें.

अीशोपनिषदाच्या प्रारंभीं व अंतीं हा शांतिमंत्र आहे.

## ३७ नदीवर कालवा

पृ. १६३ **कलौ आद्न्तयोः स्थितिः**—कलियुगांत ब्राह्मण व शूद्र असे दोन वर्ण राहिले आहेत. संस्कारलोपामुळें क्षत्रिय आणि वैश्य शूद्रासारखे झाले आहेत असा प्रवाद दक्षिणेंत पसरविण्यांत आला आहे.

पृ. १६४ **द्विजत्व**—ज्यांना जानवें घेअून याच जन्मीं दुसरा जन्म घेण्याचा अधिकार आहे त्या ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांना द्विज म्हणतात.

जन्मना जायते शूद्रः संस्कारात् द्विज अुच्यते।

**भगीरथ**—Irrigation Engineer.

**परतंत्र पुत्री**—परक्यांच्या तंत्रांत सांपडलेली; स्वतःचा नैसर्गिक क्रम सोडून कालवा बांधणाऱ्याच्या 'तंत्रां'त सांपडेली. सुनेशीं तिचें साम्य दाखविण्यासाठीं मुद्दामच या विशेषणाची योजना केली आहे.

पृ. १६५ **निम्नगा**—खालीं जाणारी नदी. येथें खालून वहाणारी असाहि अर्थ आणण्यासाठीं हा शब्द वापरला आहे.

**परीवाह**—अधिक अुरलेलें पाणी वाहून जाण्यासाठीं ठेवलेला मार्ग. Overflow.

## ३८ नेपाळची वाघमती

पृ. १६६ **अतिमानुषी**—अलौकिक; मनुष्याच्या पलीकडील. ( अिं. Superhuman )

पृ. १६७ **भगिनी निवेदिता**—स्वामी विवेकानंदांच्या आंग्ल शिष्या. मूळचें नांव मार्गरेट नोबल. हिन्दू झाल्यावर त्यांचें भगिनी निवेदिता असें नांव ठेवण्यांत आलें. त्यांनीं लिहिलेल्या अनेक महत्त्वाच्या पुस्तकांत The Web of Indian Life या नांवाचें अेक सुन्दर पुस्तक खास पहाण्याजोगें आहे. अि. स. १८९८ सालीं त्या हिन्दुस्थानांत आल्या व १९११ सालीं वारल्या.

पृ. १६८ **गोरक्षनाथ**—अयोध्येजवळ जयश्री म्हणून अेक नगर होतें. तेथें सद्बोध नांवाचा अेक ब्राह्मण व सद्वृत्ति नांवाची त्याची बायको रहात असत. त्यांना मुलबाळ कांहींच नव्हतें. अेकदां मत्स्येन्द्रनाथ भिक्षेच्या निमित्तानें तेथें आले. सिद्ध साधु पुरुष जाणून दुःखी सद्वृत्तीनें स्वतःस संतति नसल्याचें मत्स्येन्द्रनाथांना सांगितलें. त्यांनीं प्रसाद म्हणून तिला भभूति ( अंगारा ) दिली. पण प्रसादाचें सेवन करण्याअैवजीं विश्वास न बसलेल्या सद्वृत्तीनें तो अंगारा अुकिरड्यावर फेकून दिला. बारा वर्षांनीं मत्स्येन्द्रनाथ परत आले व मुलगा कोठें आहे म्हणून विचारूं लागले. सद्वृत्तीनें त्यांना खरी हकीकत सांगितली. तेव्हां अुकिरड्याजवळ जाअून मत्स्येन्द्रनाथांनीं ‘अलख’ म्हणून हांक मारली. ती अैकतांच ‘आदेश’ असें प्रत्युत्तर करणारी गोरक्षनाथाची बालमूर्ति बाहेर आली. ( म्हणूनच गोरखनाथाला ‘अयोनिज’ म्हटलें आहे. ) गुरूजवळ राहून गोरखनाथ सर्व विद्या शिकले. मत्स्येन्द्रनाथ योगी होते तसेच भोगीहि होते. पण गोरखनाथांचें वैराग्य अग्नीप्रमाणें प्रखर होतें. सिंहलद्वीपाच्या प्रमिला राणीच्या मोहपाशांतून गोरखनाथानेंच पुढें मत्स्येन्द्रनाथांना सोडविलें योगी, शिवोपासक, अद्वैतवादी आणि किमियागार म्हणून गोरखनाथांची प्रसिद्धि आहे. त्यांचे मठ बंगाल, पंजाब, नेपाळ, काठेवाड, महाराष्ट्र, लंका अि. ठिकाणीं आढळतात.

मत्स्येन्द्रनाथ व गोरखनाथ हे गुरख्यांचे देव आहेत. गोरखनाथांच्या नांवावरूनच नेपाळी लोकांना गुरखा हें नांव पडलें.

नेपाळांत बौद्धांचा महायान पंथ चालत असे. त्याचा गोरखनाथानें यशस्वी प्रतिकार करून त्यांच्यांत शिवाची अुपासना प्रचलित केली होती. ( गोरखनाथाच्या कालाचा निर्णय अजून होअूं शकला नाहीं. )

## ३९ बिहारची गंडकी

पृ. १६८ **गंडकी**—बिहारांत दोन नद्यांचें नांव गंडकी आहे. लेखकानें मुजफ्फरपुरकडे पाहिलेली गंडकी वृद्ध किंवा छोटी गंडकी होय. दुसरी गंडकी मोठी आहे.

**दोन सीमा**—नर्मदा आणि गंडकी यांच्यामध्यें बौद्ध जग पसरलें होतें.

**मांडलिक नद्या**—पाणीरूपी कर भरणाऱ्या नद्या; येऊन मिळणाऱ्या नद्या.

पृ. १६९ **अष्टांगिक मार्ग**—भगवान बुद्धानें अुपदेशिलेल्या आर्य अष्टांगिक मार्गाचीं पुढीलप्रमाणें आठ अंगें सांगितलीं आहेत. (१) सम्यक् दृष्टि, (२) सम्यक् संकल्प, (३) सम्यक् वाचा, (४) सम्यक् कर्मान्त, (५) सम्यक् आजीव, (६) सम्यक् व्यायाम, (७) सम्यक् स्मृति आणि (८) सम्यक् समाधि.

**मार**—मनुष्याच्या सद्वासनांचा नाश करणारा राक्षस, सैतान. बौद्ध धर्मांत कल्पिलेली आसुरी अधिष्ठात्री देवता.

## ४० गयेची फल्गु

पृ. १६९ **सीतेचा शाप**—अेकदां राम, सीता आणि लक्ष्मण फिरतां फिरतां फल्गूच्या तीरावर आलीं असतां तेथें रामाला आठवण झाली कीं आज पितृश्राद्धाचा दिवस आहे. तेव्हां त्यानें लक्ष्मणाला सामुग्री आणण्याकरितां शहरांत पाठविलें. त्याला येण्यास वेळ झालासें पाहून राम स्वतः शहरांत गेला. परंतु तेवढ्यांत श्राद्धाचा मुहूर्त निघून जाअूं लागला. तेव्हां सीतेनें स्नानादि करून जी काय सामुग्री होती ती घेअून रामाच्या अैवजीं स्वतःच पितरांना पिंडदान केलें. सर्व पितर अत्यंत संतुष्ट होअून नदीप्रवाहांतून हात लांब करून पिंड घेअून गेले. ते जाअूं लागले तेव्हां सीतेनें त्यांना म्हटलें, 'तुम्ही प्रत्यक्ष येअून पिंड घेअून गेलांत ही गोष्ट माझ्या पतीला कशी खरी वाटणार?' याला अुत्तर म्हणून आकाशवाणी झाली कीं तूं कुणाला तरी साक्षी ठेव. तेव्हां सीतेनें फल्गु नदी, गाय, अग्नि आणि केवडा यांना साक्षी ठेवलें.

राम–लक्ष्मण सामुग्री घेअून परत आले आणि त्यांनीं सीतेला पिंडाकरितां भात तयार करण्यास सांगितला. सीता कांहींच बोलली नाहीं व तिनें भातहि

केला नाहीं. रामानें कारण विचारलें असतां सीतेनें अित्थंभूत हकीकत सांगितली. पण राम-लक्ष्मणाला हें खरें वाटेना. तेंव्हां सीतेनें साक्षी पुढें केले. पण त्या चौघांनींहि अुलटून आम्हांला कांहींअेक माहीत नाहीं असें सांगितलें! तेंव्हां निरुपाय होअून सीतेनें पिंडाचा भात तयार केला, आणि रामानें पितरांना पिंडदानाकरितां आवाहन केलें. त्यावेळेस आकाशवाणी झाली कीं जानकीनें आम्हांला तृप्त केलें आहे. पण रामाचा विश्वास बसेना. तेंव्हां दुसऱ्यांदा आकाशवाणी झाली. तरीहि रामाचा विश्वास बसेना. शेवटीं प्रत्यक्ष सूर्यानें येअून साक्षी दिली, तेंव्हां रामाची खात्री झाली.

आयत्या वेळीं घात करणाऱ्या त्या चार साक्षीदारांना सीतेनें शाप दिला. फल्गु, तूं पाताळांत राहशील. (म्हणूनच ती वाळवंटाखालून वाहते.); केवड्या, तूं शंकराला अग्राह्य होशील. (म्हणूनच शंकराला केवडा वाहत नाहींत.); गाअी, तुझें मुख अपवित्र पण शेपटी पवित्र समजण्यांत येअील. (म्हणूनच गाय घाण खाते); आणि अग्नि, तूं सर्वभक्षक होशील.' (शिवपुराण अ. ३०).

पृ. १७०. **बोधिगया**—जेथें बुद्धाला आत्मज्ञान झालें ती जागा. (पहा हि. प्र.)

## ४१ गरजणारा शोणभद्र

पृ. १७० **अयं शोण०**—"स्वच्छ पाण्यानें भरलेला, अगाध आणि पुलिन-मण्डित असा हा शोण, हे ब्राह्मणा, आपण कोणत्या मार्गानें पार करणार आहोंत?" रामचंद्राच्या या प्रश्नाला विश्वामित्रानें अुत्तर दिलें, "ज्या मार्गानें महर्षि जातात, तो मीं दाखवलेला मार्ग हा आहे."

**क्षत्रिय गुरु-शिष्य**—क्षत्रियांचे गुरु ब्राह्मणच असत. पण गुरु विश्वामित्र स्वतः देखील क्षत्रिय होते.

पृ. १७१ **पीवरकाय**—भरलेल्या शरीराचा, पुष्ट.

**गजेन्द्र-नक्राची लढाअी**—गजेन्द्र-मोक्षाची सर्वांच्या माहितीची कथा पंचरत्न गीतेंत दिली आहे. (अनेक वर्षांपूर्वी Tug-of-war च्या खेळाकरितां 'गजग्राह' हा पारिभाषिक शब्द लेखकानेंच 'अहिनकुलम्'च्या धर्तीवर अुत्पन्न केला होता.)

**ब्रह्मपुत्र**—ब्रह्मपुत्रेचें, प्राचीन अृषींनीं दिलेलें खरें नांव ब्रह्मपुत्र आहे. आधुनिक काळीं अिंग्रजीच्या रोमन लिपीमुळें 'ब्रह्मपुत्र' शब्दाचें 'ब्रह्मपुत्रा' झालें असावें.

**आतां कुठें जाअूं?**—कालिदासानें शोणाचा हा भाव अेका अुपमेंत सुन्दर दाखविला आहे. अिन्दुमतीचें स्वयंवर झाल्यावर निराश झालेले राजे जेव्हां अजाच्या आडवे आले तेव्हां अजानें त्यांच्या सेनेवर धाअून जाअून जें आक्रमण केलें त्याची तुलना कालिदासानें गंगेवर धावून जाणाऱ्या अुसळत्या तरंगाच्या शोणाशीं केली आहे.

> तस्याः स रक्षार्थम् अनल्पबोधं आदिश्य पित्र्यं सचिवं कुमारः ।
> प्रत्यग्रहीत् पार्थिव-वाहिनीं तां भागीरथीं शोण अिवोत्तरंगः ॥
>
> —रघुवंश ७-३६

**नाल्पे सुखम् अस्ति**—थोड्यांत, क्षुद्रतेंत सुख नाहीं. जें भूमा आहे—साऱ्या विश्वाला स्वतांत सामावून घेअूं शकेल अितकें विशाल आहे तेंच खरें सुख होय. ( छांदोग्य ७-२३ )

## ४३ चर्मण्वती चंबल

पृ. १७५ **रंतिदेव**—भरताच्या सहाव्या पिढींत जन्माला आलेला सूर्यवंशी राजा. महाभारतांत याची गोष्ट दोनदां आली आहे. मेघदूतांतहि त्याचा अुल्लेख आहे.

**हॅकॅटॉम**—[ शत + अुक्ष + यज्ञ ] ग्रीक लोकांचा अेक यज्ञ, ज्यांत शंभर बैलांचा बळी देण्यांत येअी.

## ४४ नदीचें सरोवर

पृ. १७७ **बेलाताल**—ताल = तलाव. जसें नैनीताल, भीमताल.

**हिमालयाची क्षमा मागून** : हिमालयांत केदारनाथपाशीं मंदाकिनी नांवाची अेक नदी आहे, म्हणून.

पृ. १७८ **महाराज पुलकेशी**—वातापी वंशाचा राजा. सहाव्या शतकाच्या मध्यावर त्यानें महाराष्ट्रांतील छोटीं छोटीं सर्व राज्यें अेकत्रित करून अेका साम्राज्याची स्थापना केली होती आणि अश्वमेध यज्ञहि केला होता.

त्याचा मुलगा कीर्तिवर्मा यानें पित्याच्या साम्राज्याचा विस्तार केला आणि त्यांत अंग-वंग व मगध यांचाहि समावेश करून घेतला. सन् ६०९ त जेव्हां दुसरा पुलकेशी गादीवर आला तेव्हां हें साम्राज्य विन्ध्य पर्वतापासून ते दक्षिणेंत पल्लव साम्राज्यापर्यंत पसरलेलें होतें. त्यानें मालव, गुर्जर आणि कलिंग यांना सुद्धां आपल्या अधीन करून घेतलें होतें. त्याचा सर्वांत मोठा पराक्रम म्हणजे महाराज हर्षानें जेव्हां दक्षिणेवर स्वारी केली, तेव्हां पुलकेशीनें त्याला अडवलें व त्याचा पराभव केला. (अी० स० ६३६) पुलकेशी = पुलिकेशी. दक्षिणेकडील भाषेंत पुलि = हुलि = वाघ. ज्याचे केस वाघाच्या केसांसारखे असतात, तो पुलकेशी.

**अनाविला :** चिखल नसलेली, स्वच्छ.

पृ. १७९ **दशार्ण :** विन्ध्याचलाच्या दक्षिण-पूर्वेकडील प्रदेश. दश + अृण (दुर्ग) ज्यांत आहेत तो. नदीचें नांव आहे 'दशार्णा'. 'मेघदूतां'त तिचा अुल्लेख आला आहे :

पाण्डुच्छायोपवनवृतयः केतकैः सूचिभिन्नैर्-
नीडारम्भैर् गृहबलिभुजाम् आकुलग्रामचैत्याः ।
त्वय्यासन्ने परिणतफलश्याम-जम्बूवनान्तः
संपत्स्यन्ते कतिपयदिनस्थायिहंसा दशार्णाः ॥ २३ ॥

**वेत्रवती :** माळव्यांतली अेक नदी, बेतवा. 'मेघदूतां'त हिचाहि अुल्लेख आहे.

तेषां दिक्षु प्रथित-विदिशा-लक्षणां राजधानीं
गत्वा सद्यः फलम् अविकलम् कामुकत्वस्य लब्ध्वा ।
तीरोपान्त-स्तनित-सुभगं पास्यसि स्वादु यस्मात्
सभ्रूभंगं मुखम् अिव पयो वेत्रवत्याश् चलोर्मि ॥ २४ ॥

## ४५ निशीथ-यात्रा

पृ. १८० **सबिन्दु-सिन्धु**—श्री शंकराचार्य विरचित 'नर्मदास्तोत्रां'तील ही ओळ आहे. या स्तोत्रांतील खालील श्लोकांत नर्मदेला 'शर्मदा' म्हणण्यांत आलें आहे.

त्वदम्बुलीनदीनमीन-दिव्य-संप्रदायकं
कलौ मलौघभारहारि सर्वतीर्थनायकम् ।
सुमत्स्य–कच्छ–नक्रचक्र–चक्रवाक–शर्मदे
त्वदीयपादपंकजं नमामि देवि नर्मदे ॥

पृ. १८९ **नान्तःप्रज्ञं०**—मांडुक्योपनिषदांत तुरीय रूपाच्या वर्णनांत हे शब्द येतात. त्यांचा अर्थ—'तें अंतःप्रज्ञ नाहीं, बहिःप्रज्ञ नाहीं. तें उभयतः-प्रज्ञ नाहीं, प्रज्ञानघन नाहीं. तें प्रज्ञ नाहीं कीं अप्रज्ञ नाहीं.'

## ४६ धुवांधार

पृ. १९६ **पूषन्नेकर्षे आणि ॐ क्रतो स्मर**—हे ईशोपनिषदांतील श्लोक आहेत. संपूर्ण श्लोक येणेंप्रमाणें—

पूषन्नेकर्षे यम सूर्य प्राजापत्य ! व्यूह रश्मीन्, समूह ।
तेजो, यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते पश्यामि
योऽसावसौ पुरुषः सोऽहमस्मि ॥ १६ ॥
वायुर् अनिलम् अमृतम् अथेदं भस्मान्तᳬशरीरम् ।
ॐ क्रतो स्मर कृतᳬस्मर; क्रतो स्मर कृतᳬस्मर ॥ १७ ॥

[ हे जगत्पोषका सूर्या, हे एकाकी गमन करणाऱ्या, हे यमा ( संसाराचें नियमन करणाऱ्या ), हे सूर्या ( प्राण आणि रसाचें शोषण करणाऱ्या ), हे प्रजापतिनंदना, तूं आपलीं किरणें आवरून घे. तेज एकवटून घे. तुझें जें अत्यन्त कल्याणमय रूप आहे, तें मी पहात आहें. सूर्यमंडलांत वास करणारा तो जो परात्पर पुरुष आहे, तो मीच आहें.

आतां माझे प्राण सर्वात्मक वायुरूप सूत्रात्म्याला प्राप्त होवोत आणि हें शरीर भस्मीभूत होऊन जावो. हे माझ्या संकल्पात्मक मना, आतां तूं स्मरण कर, आपल्या केलेल्या कर्माचें स्मरण कर; आतां तूं स्मरण कर, आपल्या केलेल्या कर्माचें स्मरण कर. ]

पृ. १९७. **चन्द्रगुप्त आणि समुद्रगुप्त**—चन्द्रगुप्ताची मुलगी प्रभावती हिचा विवाह वाकाटक वंशांत झाला होता. तिनें कित्येक वर्षें शासन-तंत्र सांभाळलें होतें. चंद्रगुप्तानें त्यावेळीं खास लोक तेथें पाठवले होते, त्या

गोष्टीचा येथें अुल्लेख आहे. समुद्रगुप्ताच्या विजययात्रेंत या प्रदेशाचाहि समावेश झाला होता.

**कलचुरी**—वाकाटक साम्राज्याच्या पतनानंतर अनेक लहान लहान स्वतंत्र राज्यें अुत्पन्न झालीं होतीं. त्यांत अुत्तर महाराष्ट्रांतील कलचुरी लोकांचेंहि अेक राज्य होतें. त्यांची राजधानी त्रिपुरी होती, जेथें सन १९३९ त कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें होतें.

**वाकाटक**—वाकाटकांचें साम्राज्य वऱ्हाड प्रांतांत सुमारें अी. स. २२५ ते ५४० पर्यंत अस्तित्वांत होतें. सहाव्या शतकाचीं पहिलीं दहा वर्षे या साम्राज्याचा भरभराटीचा काळ होता. त्यावेळीं जवळ जवळ सारें हैद्राबादचें राज्य, मुंबअीचें महाराष्ट्र, वऱ्हाड आणि मध्य हिंदुस्थानाचा पुष्कळसा भाग त्यांत समाविष्ट होत असे. शिवाय अुत्तर कोंकण, गुजरात, माळवा, छत्तीसगड व आंध्र या प्रदेशांवरहि त्याचें वर्चस्व होतें. त्यावेळीं हिंदुस्थानांत याच्या तोडीचें दुसरें अेकहि साम्राज्य नव्हतें.

## ४७ शिवनाथ आणि अीब

पृ. १९७ **मलिक कफूर**—अल्लाअुद्दीन खिलजीचा आवडता खोजा. यानें दक्षिणेचें राज्य जिंकून तेथील प्रजेवर बरेच अत्याचार केले होते.

**काला पहाड**—बंगालचा नबाब सुलेमान किराणी व नंतर त्याचा मुलगा दाअूद यांचा सेनापति. आसाम, काशी आणि ओरिसा येथें जितकीं म्हणून हिंदू देवळें होतीं, त्यांतील अेकहि याच्या तावडींतून सुटलें नाहीं. कांहीं देवळें यानें तोडलीं, कांहीं अुध्वस्त केलीं, तर कांहीं जमीनदोस्त करून टाकलीं. जगन्नाथाच्या मूर्तीला त्यानें जाळून समुद्रांत फेकून दिलें होतें. हिंदूंवर त्यानें पुष्कळ अत्याचार केले. कांहीं लोक म्हणतात कीं तो प्रथम ब्राह्मण होता, परंतु अेका नबाबाच्या मुलीच्या प्रेमांत पडून तो मुसलमान बनला. मुसलमानांच्या अितिहासांत तो पठाण जातीचा होता असा अुल्लेख आहे. १५६५ त त्यानें ओरिसा जिंकलें होतें. १५८० त त्याचा मृत्यु झाला.

पृ. २०० **सर्वे महत्त्वम् अिच्छन्ति**—ज्या कुळांत प्रत्येक जण मोठेपणाची हांव बाळगतो त्या कुळाचा नाश होतो. त्याच प्रमाणें ज्या राष्ट्रांत सर्वच लोक नेते बनतात त्या राष्ट्राचाहि नाश ठरलेला असतो.

## ४८ दुर्दैवी शिवनाथ

पृ. २०१ **राक्षस-पद्धतीचा विवाहः**—विवाहाचे आठ प्रकार सांगितलेले आहेतः (१) ब्राह्म, (२) दैव, (३) आर्ष, (४) प्राजापत्य, (५) गांधर्व, (६) आसुर, (७) राक्षस आणि (८) पिशाच. यांपैकीं ज्या विवाहांत मुलीच्या नातेवाअीकांना मारून किंवा पराभूत करून बळजबरीनें मुलीशीं विवाह केला जातो, त्याला राक्षस-पद्धतीचा विवाह म्हणतात.

## ५० अृषिकुल्येचें क्षमापन

पृ. २०४ **सरित्पिता**—पर्वत.

**सरित्पति**—समुद्र.

पृ. २०७ **अचलांचे अुपस्थान....देअील**—श्री. काकासाहेबांनीं आतां वेगवेगळया पर्वतांचें वर्णन लिहायला प्रारंभ केला आहे, त्याचा येथें अुल्लेख आहे.

## ५१ तेंदुला आणि सुखा

पृ. २०८ **व्यंजन**—भाजी, चटणी.

पृ. २०९ **यद्भावि तद्भवतु**—जें होणार असेल तें होवो.

## ५२ सूर्येचा स्रोत

पृ. २११ **कासा**—मुंबअी राज्यांतील ठाणें जिल्ह्यांतील अेक गांव. आचार्य शंकरराव भिसे यांच्या मार्गदर्शनाखालीं येथें अेक सर्वोदय केन्द्र चालतें, जेथील कार्यकर्ते येथील आदिवासी वारली लोकांत फार चांगलें काम करीत असतात.

## ५३ दोन मद्रासी बहिणी

पृ. २१७ **मानचित्र**—नकाशा.

प. २१८ **देवी वासंती**—श्रीमती ॲनी बेझंट.

## ५५ सहस्रधारा

पृ. २२४—**आचार्य रामदेव**—स्वामी श्रद्धानंदजींचे मदतनीस. हरिद्वार गुरुकुलाचे आचार्य.

पृ. २२७ **मुफीद**—लाभदायक, गुणकारी.

## ५६ गुच्छुपाणी

पृ. २३१ **चि. चंदन**—श्री. काकासाहेबांची मोठी सून सौ. चंदन कालेलकर.

**धर्मदेवजी**—श्री. धर्मदेव शास्त्री. यांनीं हिमाचल प्रदेशांत कालसी येथें आश्रम चालवून पहाडी लोकांची चांगली सेवा केली आहे. सध्यां ‘आदिम जाति सेवक संघा’ चे सेक्रेटरी म्हणून आदिवासींची सेवा करीत आहेत.

पृ. २३५ **माझ्या संवयीप्रमाणें**—श्री. काकासाहेबांना वेगवेगळ्या आकारांचे चित्रविचित्र दगड गोळा करण्याचा नाद आहे.

## ५७ परशुराम कुंड

पृ. २३७ **नहि वेरेन वेरानि**—धम्मपदांतील संपूर्ण श्लोक असा आहे :

नहि वेरेन वेरानि सम्मन्तीध कुदाचनं ।
अवेरेन च सम्मन्ति अेस धम्मो सनन्तनो ॥ ५ ॥

[ वैर वैरानें कधींच शान्त होत नसतें, अवैरानेंच वैर शांत होतें–हाच जगांतला सनातन नियम ( धर्म ) आहे. ]

## ५८ वर्षागान

पृ. २३९ **कालिदासाचा अेक श्लोक**—मूळ श्लोक असा आहे—

नवजलधरः संनद्धोऽयं न हप्तनिशाचरः ।
सुरधनुर् अिदं दूराकृष्टं न नाम शरासनम् ॥
अयम् अपि पटुर् धारासारो न बाण–परंपरा ।
कनक–निकष–स्निग्धा विद्युत् प्रिया न ममोर्वशी ॥
—विक्रमोर्वशीयम् अंक ४ श्लोक ७

हे निश्चय अलंकाराचें अुदाहरण आहे. श्लोकाचा अर्थ लेखांत दिलेलाच आहे.

पृ. २४० **चिरप्रवासी**—आपले लोक चिरप्रवासाला मरणतुल्य समजत असत. ‘रोगी, चिर-प्रवासी......यज्जीवति तन्मरणम् ।’

**जीवन-प्रवाहाला परास्त करणारे पूल**—जीवन-प्रवाह=पाण्याचा प्रवाह. पाण्याचा प्रवाह मनुष्याला पुढें, पलीकडे जाअूं देत नाहीं. नदीवर पूल बांधल्यानें पाण्याच्या या अडवण्याच्या शक्तीचा पराभव होतो.

**सेतु**—बांध.

पृ. २४१ **अेक लहानसें घरटें झालें**—ही अुपमा अुपनिषदांतल्या अेका वचनावरून सुचली आहे—

यत्र भवति विश्वं अेकनीडम्

जेथें सारें विश्व अेक लहानसें घरटें बनतें. स्वतः भगवानच अशा घरट्यांत रहाणाऱ्या जीवांना अूब देणारा पक्षी आहे.

पृ. २४२ **जीवनचक्र**—गीतेंत तिसऱ्या अध्यायांत १६ व्या श्लोकांत या प्रवर्तित जीवनचक्राचा अुल्लेख आलेला आहे. लेखकाचा 'जीवन-चक्र' नांवाचा निबंध या दृष्टीनें वाचण्यासारखा आहे.

**परस्परावलंबनाचें सामाजिक स्वावलंबन**—वैयक्तिक जीवनासाठीं स्वाश्रय चांगला आहे. सामाजिक जीवन मुख्यतः परस्परावलंबनावरच आधारित असतें. अशा परस्परावलंबनांत देवाण-घेवाण जेव्हां समसमान किंवा तुल्यबल असतें, तेव्हां जीवनाचें ओझें कुणावरहि अधिक न पडल्यामुळें त्याला स्वाश्रयाची निष्पापता प्राप्त होते.

**यज्ञ-चक्र**—जीवनचक्रालाच गीतेनें यज्ञ-चक्र म्हटलें आहे. पहा, 'सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा' अि. गीता–अध्याय ३ श्लोक १० ते १६.

**अवतार-कृत्य**—अवतार शब्दाचा अर्थ खालीं अुतरणें. पावसाचें पाणी वरून खालीं अुतरतें. अीश्वर सुद्धां खालीं अुतरून मनुष्यरूप धारण करतो तेव्हां त्याला अवतार म्हणतात.

पृ. २४३ **कुरुक्षेत्र**—भारतीय युद्धाची रणभूमि.

**मखमलीचे किडे**—यांना अिन्द्रगोप म्हणतात.

**दुहेरी शोभा**—मखमलीच्या कापडांत जी शोभा असते तशी. अेकीकडून पाहतां गडद रंग दिसतो, दुसरीकडून पाहतां तोच रंग फिकट किंवा दुसऱ्याच प्रकारचा दिसतो. अिंग्रजींत याला 'Shot' म्हणतात.

**आकाशांतील देव**—तारे.

**शेवटचा गोड घास**—संस्कृत–' मधुरेण समापयेत् । '

**ॠतु–संहार**—कालिदासाचें अेक नितांत सुंदर काव्य, ज्यांत सहाहि ॠतूंचें वर्णन आहे.

' **ॠतुभ्यः** '—विवाहाच्या वेळीं सप्तपदीद्वारा गृहस्थाश्रमासाठीं जी जीवनदीक्षा घेतली जाते, त्यांतील सहावी प्रतिज्ञा आहे ' ॠतुभ्यः '. ' जीवनांत आम्ही दोघे ॠतुपरिवर्तनाप्रमाणें जीवन–परिवर्तनहि करीत राहूं. ' असा आहे या प्रतिज्ञेचा भावार्थ.

## ५९ रण कीं सरोवर

पृ. २४७ **मर्यादवेल :** समुद्राच्या मोठ्यांतल्या मोठ्या भरतीच्या वेळीं पाणी जिथवर पोहोंचूं शकतें तेथेंच अेक वेल अुगवत असते. म्हणून तिला ' मर्याद-वेल ' म्हणतात. समुद्र कितीहि तुफानी झाला तरीहि ही मर्यादा तो ओलांडायचा नाहीं. खारवे खलाशी या वेलीला समुद्राची मावशी म्हणतात. अर्थातच समुद्राला तिचा भाचा म्हटलें पाहिजे. (' जीवनांतील आनंद ' पुस्तकांतील ' समुद्राची मावशी ' हें प्रकरण पहावें. )

## ६० चांदीपुर

पृ. २४७ **महाश्वेता :** बाणाची विख्यात संस्कृत कादम्बरी ' कादम्बरी ' मधील नायिका कादम्बरी हिची मैत्रीण.

**कादम्बरी :** बाणाच्या कादंबरीची नायिका. कादम्बरीचा मूळ अर्थ आहे—मद्य, सुरा.

पृ. २४९ **चि. मदालसा :** स्व. श्री. जमनालाल बजाजांची मुलगी. श्री. श्रीमन् नारायणांची पत्नी.

पृ. २५० **आपो नारा :** पाण्याला ' नारा ' म्हटलें आहे. आणि तें नर म्हणजे परमात्म्यापासून अुत्पन्न झालेलें आहे. हें पाणी प्रथम त्याचें ( परमात्म्याचें ) अयन ( निवासस्थान ) होतें. म्हणूनच परमात्म्याला नारायण ( पाण्यांत ज्याचें निवासस्थान आहे असा ) म्हटलें आहे. (मनुस्मृति १–१०)

**प्रथम प्रभात :** रवीन्द्रनाथांचें प्रसिद्ध राष्ट्रगीत 'अयि भुवन-मनो-मोहिनी' तून या ओळी घेतलेल्या आहेत. संपूर्ण गीत खालीलप्रमाणें आहे—

अयि भुवन-मनो-मोहिनी
अयि निर्मल-सूर्य-करोज्ज्वल-धरणि
जनक-जननी-जननी—अयि०

नील-सिंधु-जल-धौत-चरणतल
अनिल-विकंपित-शामल-अंचल
अंबर-चुंबित-भाल-हिमाचल
शुभ्र-तुषार-किरीटिनि—अयि०

प्रथम प्रभात अुदय तव गगने
प्रथम साम-रव तव तपोवने
प्रथम प्रचारित तव वन-भवने
ज्ञान धर्म कत काव्य काहिनी—अयि०

चिर कल्याणमयी तुमि धन्य,
देशविदेशे वितरिछ अन्न,
जाह्नवी-जमुना-विगलित-करुणा
पुण्य-पीयूष-स्तन्य-वाहिनि—अयि०

## ६१. सार्वभौम भरती-ओहटी

पृ. २५३. **सु-गत**—भगवान बुद्धाचें अेक नांव. अेक खास 'मिशन' घेअून जो आला तो तथागत. सर्व संकल्प आणि संस्कारांचा नाश करून जो निर्वाणापर्यंत पोंचला तो सु-गत.

## ६२. कराचिच्या वाटेवर

पृ. २५४. **अनुराधा, कृष्णचंद्र**—अनुराधा नक्षत्र. कृष्णचंद्र=कृष्ण पक्षांतील चंद्र. राधा आणि कृष्ण या दोन शब्दांचा लेखकानें चांगला अुपयोग करून घेतला आहे.

## ६३ दक्षिणेच्या टोंकास

पृ. २५५ **धनुष्कोटी :** धनुष्यांत जी दोरी असते तिला म्हणतात ज्या, आणि बांबूची जी कमान असते तिला म्हणतात कोटी. धनुष्कोटीमधें दोन समुद्रांमधें जमिनीचा जो हिस्सा पसरलेला आहे तो लांब जिभेसारखा किंवा धनुष्याच्या कोटीसारखा वांकडा किंवा कमानदार आहे. म्हणून या स्थानाचें नांव धनुष्कोटी पडलें आहे.

पृ. २५६ **रत्नाकर आणि महोदधि**—दोघांचा अर्थ तर अेकच आहे—समुद्र.

**प्रशस्त**—मूळ अर्थ आहे कल्याणमय, शुभ, कुशल. प्रशंसापात्र असा देखील अर्थ होतो. येथें दोन्ही अर्थानें याचा प्रयोग केला आहे. बंगलींत व मराठींत या शब्दाचा आणखीहि अेक अर्थ आहे—अैसपैस, विशाल. येथें हा अर्थ देखील लागू पडतो.

**आत्मनि अप्रत्यय**—ज्याचा स्वतःवर विश्वास नाहीं असा. ‘ बलवदपि शिक्षितांना आत्मनि अप्रत्ययं चेतः । ’—शाकुंतल.

पृ. २५८ **भूमिकेवर दृढ राहून**—भूमिका शब्दावर श्लेष आहे.

**‘ रघुवंशा ’ मधलें कालिदासाचें वर्णन**—१३ व्या सर्गांत रावण-वधानंतर सीतेला घेअून राम पुष्पक विमानांत बसून अयोध्येला परतात. त्यावेळीं लंकेहून निघून सागर पार करतांना कांहीं श्लोकांत सागराचें वर्णन करतात. त्याचा भावार्थ खालील प्रमाणें आहे :

हे सीते! सुंदर चांदण्या स्पष्ट दिसत असलेलें शरद् ॠतूंतील स्वच्छ आकाश आकाशगंगेनें ज्याप्रमाणें विभागलें गेलें आहे, त्याप्रमाणें माझ्या सेतूनें मलय पर्वतापर्यंत विभागलेला फेसयुक्त असलेला असा हा महासागर पहा.—२

ह्याच्यापासूनच सूर्याचे किरण गर्भ धारण करतात, ह्यांतच रत्नें वृद्धि पावतात, ह्याच पाणी हेंच सरपण असणारा अग्नि धारण करतो, व ह्यानेंच आह्लादकारक तेजाला जन्म दिला.—४

विष्णूप्रमाणें निरनिराळीं अनेक रूपें धारण करणारें, व मोठेपणामुळें दाही दिशांना व्यापून राहिलेलें ह्या सागराचें स्वरूप प्रकाराच्या दृष्टीनें किंवा परिमाणाच्या दृष्टीनें अनिर्वचनीय आहे.—५

हे देवमासे आपल्या अुघड्या तोंडांत नदीमुखाजवळील पाणी आंतील प्राण्यासह आंत घेअून व मग तोंडें मिटून रन्ध्रयुक्त असलेल्या आपल्या डोक्यांनीं जलप्रवाहांना वर अुडवीत असतात.—१०

अेकदम वर अुसळी मारणाऱ्या मातंगनक्रांनीं दुखंड केलेला हा समुद्राचा फेस पहा. तो त्यांच्या गालांवरून खालीं ओघळतांना त्यांच्या गालांजवळ क्षणभर चवरीसारखा दिसतो नाहीं !—११

समुद्रकांठची हवा खाण्याकरितां पसरलेले, मोठ्या लाटांच्या अुसळण्यापेक्षां भिन्न न दिसणारे हे भुजंग सूर्यकिरणांच्या संपर्कामुळें कांति वाढलेल्या, फण्यांतील मण्यांनीं ( मण्यांमुळें ) ओळखतां येतात.—१२

लाटेच्या वेगानें तुझ्या अधरोष्ठाशीं स्पर्धा करणाऱ्या पोंवळ्यांच्या खडकावर अेकदम पसरलेला व प्रवाळांच्यावर आलेल्या अंकुरांत तोंडें अडकलेला शंखांचा समूह मोठ्या कष्टानें दूर जात आहे. ( परत जात आहे. )—१३

पाणी पिण्यास प्रवृत्त होतांच भोंवऱ्याच्या वेगानें गरगर फिरणाऱ्या मेघानें हा सागर पुन्हा मन्दर पर्वतानें मंथन केला जात असल्याप्रमाणें बराचसा दिसतो आहे.—१४

लोखंडाच्या चाकाप्रमाणें असलेल्या सागराचा फार अंतरामुळें लहान दिसणारा आणि तमाल व तालवृक्षाच्या राअीमुळें निळसर दिसणारा किनारा चक्रावर केलेल्या कलंक रेषेप्रमाणें दिसत आहे.—१५

हे दीर्घनयने ! हा सागरावरील वायु केतकीच्या रजांनीं तुझें मुख सुशोभित करीत आहे. कारण बिम्बफलाप्रमाणें असलेल्या तुझ्या अधराची तहान लागलेल्या मला ते ( अधर ) विभूषित करण्यांत होणारी कालहानि सहन होणार नाहीं हें जणूं काय त्याच्या लक्षांत आलें आहे.—१६

हे पाहा, आपण वाळूंत शिंपा फुटून चोहोंकडे मोत्यें विखुरलेल्या व फळांनीं वाकलेलीं सुपारीचीं झाडें असलेल्या सागराच्या किनाऱ्यावर विमानाच्या वेगामुळें अेका क्षणांत येअून पोंचलों.—१७

पृ. २५८ **पर्वते परमाणौ च०**—याचें पूर्वपद असें आहे—' कवयः कालिदासाद्याः कवयो वयमप्यमी ।' संपूर्ण श्लोकाचा अर्थ असा आहे—

" कालिदास आदि सुद्धां कवि आहेत, आम्ही सुद्धां कवि आहोंत. पर्वतांत आणि परमाणूंत पदार्थत्व समान आहे. "

**वानर-यूथ-मुख्य**—रामरक्षा-स्तोत्रांत हनुमानाच्या स्तुतीचा श्लोक याप्रमाणें आहे—

मनोजवं मारुत-तुल्य-वेगं
जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठं ।
वातात्मजं वानर-यूथ-मुख्यं
श्रीराम-दूतं मनसा स्मरामि ॥

पृ. २५९ **सांपराय**—मृत्यूच्या नंतरची स्थिति. कठोपनिषदांत नचिकेतानें यमराजाला सांपरायाविषयीं विचारलें होतें.

पृ. २६१ **अुदये सविता०**—अुदयाच्या वेळेस सूर्य लाल असतो. त्याचप्रमाणें अस्ताच्या वेळींहि लाल असतो. मोठे लोक संपत्ति ( भरभराट ) आणि विपत्तीच्या वेळीं अेकच रूप कायम ठेवतात.

पृ. २६३ **आतां या त्रिविध पूर्णतेमधून........अुणेपणा येणार नाहीं**—अीशावास्यांतील शांतिपाठ पहा :

पूर्णम् अदः पूर्णम् अिदं पूर्णात् पूर्णम् अुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णम् आदाय पूर्णम् अेवावशिष्यते ॥

पृ. २६४ **ब्राह्म-मुहूर्त**—पहांटे सुमारे साडेतीन वाजण्याची वेळ. आत्मचिन्तनासाठीं ही वेळ चांगली मानली गेली आहे. ' ब्राह्मे मुहूर्ते चोत्थाय चिन्तयेत् हितम् आत्मनः । '

पृ. २६५ **अुदरभरण नांवाचें यज्ञकर्म**—तुलना करा :

वदनिं कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचें
सहज हवन होतें नाम घेतां फुकाचें ।
जिवन करि जिवित्वा अन्न हें पूर्णब्रह्म
अुदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ॥

पृ. २६६ **कन्याकुमारीची कथा :** बंडासुर नांवाच्या अेका दानवानें शंकराची आराधना केली आणि हिरण्यकशिपूप्रमाणें 'मी यानें मारला जाअूं नये,

त्यानें मारला जाऊं नये' वगैरे वर मागून घेतले. परंतु या लांबलचक यादींत कुमारी कन्येचें नांव घालण्याचें त्याला सुचलें नाहीं. वरदानानें निर्भय झालेला हा दानव जगावर भयंकर अत्याचार करूं लागला. सारें जग त्रस्त झालें. म्हणून शिवानें पार्वतीला कुमारी कन्येचें रूप घेऊन पृथ्वीवर जाण्यास सांगितलें. पार्वतीनें ललिता देवीचा अवतार घेतला व राक्षसाला ठार मारलें. नंतर हातांत कुंकू आणि अक्षता घेऊन विवाहासाठीं ती शंकराची वाट पाहूं लागली, कारण आधींच तसें ठरलें होतें. शिव निघाला खरा, परंतु वाटेंत शीघ्रकोपी दुर्वास भेटले. त्यांच्या आगत-स्वागतांत बराच वेळ मोडला. तेवढ्यांत कलियुग सुरू झालें! आणि कलियुगांत विवाह होणें शक्य नव्हतें.

म्हणून पार्वतीनें कुंकुम-अक्षता फेंकून दिल्या आणि कलियुग संपण्याची वाट पहात ती तेथेंच उभी राहिली.

पार्वतीनें फेकलेल्या अक्षता आज सुद्धां समुद्रकिनाऱ्यावर रेतीच्या रूपांत आढळतात. श्रद्धाळू लोक मानतात कीं हे तांदूळ तोंडांत घातल्यानें प्रसूतीची वेदना कमी होते. कुंकवासारख्या लाल रेतीला तर तेथें तोटाच नाहीं.

## ६४ समुद्राच्या पाठीवर

पृ. २६७ **गिरिधारी**—आचार्य कृपालानींचा पुतण्या. त्यावेळीं लेखकाबरोबर शांतिनिकेतनमधें रहात असे.

**आगुनेर परशमणि छोंआओ प्राणे**—संपूर्ण गीत असें आहे—

आगुनेर परशमणि छोंआओ प्राणे
ऐ जीवन पुण्य करो दहन-दाने।
आमार ऐइ देहखानि तुले धरो,
तोमार ऐ देवालयेर प्रदीप करो,
निशिदिन आलोक-शिखा ज्वलुक गाने।
आंधारेर गाये गाये परश तव
सारा रात फोटाक तारा नव नव
नयनेर दृष्टि हते घुचबे कालो

जेखाने पडबे सेथाय देखबे आलो
व्यथा मोर, अुठबे ज्वले अूर्ध्व पाने ।

[ अग्नीच्या स्पर्शमण्याचा प्राणाला स्पर्श कर. दहन–दानानें हें जीवन पावन कर. माझा हा देह तूं अुचल आणि त्याला तुझ्या त्या देवालयाचा नंदादीप बनव. रात्रंदिवस गानरूपी आलोकशिखा ( ज्योत ) जळत राहो. अंधाराच्या अंगांगावर तुझा स्पर्श सारी रात्र नवे नवे तारे फुलवो. डोळ्यांच्या दृष्टींतून काळिमा दूर होअील आणि जेथें जेथें ती दृष्टि पडेल तेथें तेथें प्रकाशच दिसेल. आणि माझी व्यथा अूर्ध्व दिशेनें पेट घेअील. ]

पृ. २६८ **आकाशांत चंद्रानें प्रवास करावा**—रवीन्द्रनाथांच्या अेका गीतांत अशाच प्रकारचें चित्र आहे.

आजि शुक्ला अेकादशी, हेरो निद्राहारा शशी
अै-स्वप्न पारावारेर खेया अेकला चालाय बसि ।

[ आज शुक्ल अेकादशी आहे. निद्राहीन शशी पहा, जणूं स्वप्न-सागराची नाव अेकटा बसून चालवीत आहे. ]

पृ. २७०. '**ध्येयः सदा सवितृ-मंडल-मध्यवर्ती**'—सूर्य मंडलामधें स्थित, कमलासनावर विराजमान आणि केयूर, मकर कुंडल, किरीट व हार धारण करणाऱ्या, सुवर्णमय शरीराच्या, शंख चक्रधारी नारायणाचें नेहमीं ध्यान केलें पाहिजे.

**जीवतराम**—आचार्य कृपालानी.

## ६५. सरोविहार

पृ. २७४. **तिचें काव्य मात्र दुरूनच**—''Tis distance lends enchantment to the view.'

पृ. २७५ **शकुंतलेप्रमाणें**—शाकुंतलाच्या तिसऱ्या अंकाच्या शेवटीं शकुंतला दुष्यन्ताशीं विश्रंभालाप करीत असते, अितक्यांत तेथें आर्या गौतमी येअून ठेपते. म्हणून शकुंतला राजाला वेलींच्या मागें जावयाला सांगते व जातांना वेलींना म्हणते:—

लतावलय, संतापहारक, आमंत्रये त्वां भूयोऽपि
परिभोगाय ।'

आणि अशा रीतीनें लतामंडपाच्या निमित्तानें राजाचा निरोप घेऊन पुन्हां भेटण्याचें आमंत्रण देऊन जाते.

**ययातीला सुद्धां जर शेवटीं**—चंद्र वंशाचा चौथा राजा नहुषाचा पुत्र. त्याला दोन बायका होत्या. देवयानी आणि शर्मिष्ठा. त्यांच्यापासून त्याला अनुक्रमें यदु आणि पुरु नांवाचे दोन मुलगे झाले, जे नंतर यादव आणि पौरव वंशांचे संस्थापक बनले. त्याच्या दुसऱ्या तीन मुलांचें नांव द्रुह्यु, तुर्वसु व अनु.

शुक्राचार्यांच्या शापामुळें त्याला अकालीं वृद्धत्व आलें. त्याच्या विनंतीवरून शुक्राचार्यांनीं अुःशाप दिला कीं तुझ्या अेखाद्या मुलानें तुझें म्हातारपण स्वीकारून आपलें यौवन तुला दिलें तर तूं तरुण होशील. फक्त पुरु आपलें यौवन द्यावयाला तयार झाला. त्याचें यौवन घेऊन ययाति भोगविलासांत बुडून गेला. परंतु नंतर त्याला विरक्ति अुत्पन्न झाली. त्याला कळलें कीं—

न जातु कामः कामानाम् अुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव पुनरेवाभिवर्धते ॥

[भोगांच्या अुपभोगानें कामना शांत होत नाहींत. अुलट आहुतीमुळें अधिक पेट घेणाऱ्या अग्नीप्रमाणें त्या वाढतच जातात.]

त्यानें पुरूचें यौवन परत केलें आणि वनांत जाऊन तपश्चर्येद्वारा देहत्याग केला.

**अननसाचीं कारंजीं**—कारंजाच्या अुडणाऱ्या धारांप्रमाणें अननसाचीं पानें असतात.

## ६६ सुवर्ण देशाची माता अैरावती

पृ. २७९ **कृपेचा अुत्पात**—कृपेला वर अुसळविणें, कृपेची पराकाष्ठा करणें. येथें महापुराचा अुल्लेख आहे. नाअील नदींत पूर आल्यानें जो सुपीक चिखल चहूंकडे पसरतो त्याला अिजिप्शियन भाषेंत 'नाअीलची कृपा' म्हणतात. तशीच अैरावतीची कृपा. महापूर आला असतां या कृपेचा अुत्पात होतो, पराकाष्ठा होते.

**शतरंज खेळत बसलेल्या कालिदासाला**—कालिदास व भवभूति हे समकालीन नव्हेत. कालिदास भवभूतीच्या पुष्कळच पूर्वी होऊन गेला. पण काव्य प्रदेशांत काळाची काय किंमत ? लोककथेंत भवभूति खुशाल कविकुल-गुरूला भेटूं शकतो !

अेकदां भवभूति आपलें ‘ अुत्तररामचरित ’ खाकोटीस मारून कालिदासाच्या भेटीस गेला. कालिदासाची स्वारी त्यावेळीं शतरंज खेळण्यांत मग्न होती. भवभूतीनें ‘ नाटक अैकावें ’ अशी त्या राजकवीला विनंति केली. कालिदास म्हणाला, ‘ ठीक. ’ भवभूतीनें आपलें नाटक अथपासून अितीपर्यंत वाचून दाखविलें; आणि अिकडे कालिदास राजाला सर्व बाजूंनीं अडकवून प्याद्याचा शह देण्याच्या खटपटींत होता. कालिदासानें नाटकाकडे दुर्लक्ष केलें असें वाटून भवभूति मनांत खट्टू झाला. अितक्यांत कालिदासानें मान वर करून म्हटलें, “ आपलें नाटक फारच अुत्तम वठलें आहे. पण त्यांत फक्त अेक अनुस्वारच अधिक पडला आहे असें मला वाटतें. ”

राम आणि सीता यांच्या गप्पागोष्टींचें वर्णन करतांना भवभूतीनें लिहिलें होतें—

अविदित-गत-यामा रात्रिरेवं व्यरंसीत् ॥

[ अशा प्रकारें ( अेवं ) ( अिकडच्या तिकडच्या गोष्टी करतां करतां ) प्रहर कसे निघून गेले हें कळलेंच नाहीं आणि सारी रात्र निघून गेली. ]

कालिदासानें अनुस्वार काढावयाला सांगितलें आणि सारा अर्थच बदलून गेला.

अविदित–गत–यामा रात्रिरेव व्यरंसीत् ॥

[ ( अिकडच्या तिकडच्या गोष्टी करतां करतां ) प्रहर कसे निघून गेले याचा पत्ता न लागतां सारी रात्रच संपून गेली. ( आपल्या गप्पा मात्र संपल्या नाहींत. ) ]

**शान–राज्य**—ब्रह्मदेशाचीं चीनकडील सीमे जवळील अर्धीं स्वतंत्र राज्यें. शान लोक ब्रह्मदेश, आसाम, सयाम, आणि दक्षिण चीनमधें रहातात. वर्णानें गौर आणि धर्मानें बौद्ध. मोठे कष्टाळू. त्यांच्यांत बहुपत्नी प्रथा चालते.

**जहाजावरील पक्षी**—'जैसे अुडि जहाजको पंछी, फिरि जहाज पै आवे।'–सूरदास.

पृ. २८० **अनिच्चा बत०**—'अनित्या बत संस्कारा अुत्पत्ति-व्यय धर्मिणः।' [अुत्पत्ति आणि नाश हाच ज्यांचा स्वभाव आहे असे संस्कार (सृष्ट पदार्थ) खरोखर अनित्यच होत.]

**सुवर्णदेश**—ब्रह्मदेशाचें बौद्धकालीन नांव.

## ६७ समुद्राच्या सहवासांत

पृ. २८३ **त्रिकांड**—तीन कांड म्हणजे तीन भागवाला. श्रवण नक्षत्रांत तीन तारे असतात. मृग नक्षत्राच्या पोटांतील तीन ताऱ्यांचा अिषु त्रिकांड नक्षत्र गणला जातो. त्याच्या सारखाच श्रवण असतो म्हणून त्याला त्रिकांड म्हटलें आहे.

**खस्वस्तिक**—आपण जेथें म्हणून अुभे असूं तेथला नेमका डोक्यावरचा आकाशाचा भाग किंवा बिन्दु. अिंग्रजींत याला 'झेनिथ' म्हणतात.

**प्रकाश मिचकावून**: ज्याप्रमाणें तार-विभागांत 'कट्ट' आणि 'कड' या दोन ध्वनींतून सारी लिपि तयार केली गेली आहे त्याचप्रमाणें रात्रीं प्रकाश मिचकावून दूरवर संदेश पाठवले जातात. दिवसा सूर्यप्रकाशानें सुद्धां असे संदेश पाठवले जातात. त्याला 'हेलियोग्राफ' म्हणतात. हेली म्हणजे सूर्य.

पृ. २८७ **त्रिखंड सहकार**: आफ्रिकेंत मूळच्या काळया रहिवाश्यांशिवाय (जे गुलाम किंवा मजूर असतात), राज्य करणारे गोरे लोक देखील आहेत आणि व्यापारासाठीं पूर्वेकडून आलेले गव्हाळ रंगाचे किंवा पिवळया रंगाचे अरब, हिन्दुस्तानी आणि चिनी लोकहि आहेत. तिन्ही खंडांच्या या लोकांमधें जो सहकार चालला आहे, त्याला त्रिखंड सहकार म्हटलें आहे. अर्थात् हा सहकार विषम आहे.

## ६८ रेखोल्लंघन

पृ. २८७ **रेखोल्लंघन**—भूमध्य-रेषेचें अुल्लंघन.

**चि. सतीश**—काकासाहेबांचा मोठा मुलगा.

# ६९ नीलोत्री

पृ. २८९ **श्री. आप्पासाहेब**—औंधच्या अंतिम राजाचे दुसरे चिरंजीव श्री. आप्पासाहेब पंत. हे आफ्रिकेंत भारतसरकारचे कमिशनर होते, त्यावेळीं तेथल्या लोकांवर त्यांचा चांगला प्रभाव पडला होता. सध्या सिक्कीममधें भारताचे प्रतिनिधि आहेत.

पृ. २९१ **ओशोपनिषद्**—अठरा मंत्रांचें अेक छोटेसें अुपनिषद. आचार्य विनोबांनीं याला वेदांचें सार आणि गीतेचें बीज म्हटलें आहे. गांधीजी म्हणत असत कीं या अुपनिषदांत हिंदूधर्माचें सगळें सार आलेलें आहे. याचा पहिला मंत्र त्यांना विशेष प्रिय होता आणि त्यावर त्यांनीं अनेकदां विवेचन केलें होतें. तो पहिला मंत्र असा—

> ओशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्।
> तेन त्यक्तेन भुंजीथा मा गृधः कस्यस्विद् धनम्॥

या अुपनिषदाला ओशावास्योपनिषद् देखील म्हणतात.

**मांडुक्य अुपनिषद्**—ओशोपनिषदाहूनहि लहान आहे. यांत फक्त बारा मंत्र आहेत. यांत ॐ काराद्वारा साऱ्या अद्वैत सिद्धान्ताचें विवेचन केलें गेलें आहे. गौडपादाचार्यांनीं यावर लिहिलेली कारिका अद्वैत सिद्धान्तावरचा पहिला निबंध मानला जातो. याच्याच आधारें श्री. शंकराचार्यांनीं आपलें मत प्रस्थापित केलें आहे.

**अघमर्षण सूक्त**—अृग्वेदाच्या १० व्या मंडलांतील १९० वें सूक्त. तें रचणाऱ्या अृषीचें नांव देखील अघमर्षणच आहे. संध्यावंदनाच्या वेळीं सकाळ संध्याकाळ हें सूक्त बोललें जातें. या सूक्ताविषयीं काकासाहेब लिहितात: "अघमर्षणाचा अर्थ आहे पाप धुअून टाकणें. परंतु या सूक्तांत पापाचा अुल्लेखसुद्धां नाहीं. त्यांत अृषि म्हणतो : बाह्य विश्वाची विशालता अनुभवा, हृदयाच्या सखोलतेचा ठाव घ्या. ही सारी अंतर्बाह्य सृष्टि कुणाच्या आधारावर टिकून आहे तें पहा. काळ आणि सृष्टि यांच्या अनंततेचा विचार करा. त्यानें तुमचें मन आपोआप विशाल होअील. विशाल मनांत पापाला स्थानच अुरत नाहीं.

“या अनादि विश्वांत ‘ऋतम्’ आणि ‘सत्यम्’च स्थायी आहेत. ‘ऋतम्’चा अर्थ आहे विश्वाचा सार्वभौम नियम, चराचर सृष्टीचा सनातन धर्म. याच्याच आधारावर अनादि अनंत सृष्टि चालत असते. (ऋ = चालणें.) या ऋताच्या आंत जें शाश्वत आणि अविनाशी परमतत्त्व आहे, त्याला सत्य म्हणतात. हें सत्य सर्वव्यापी आहे म्हणून त्याला विष्णु (सर्वगामी, सर्वव्यापी) सुद्धां म्हणतात. ‘सत्यम्’ व ‘ऋतम्’च्या द्वाराच हें विश्व अुत्पन्न होतें, विलीन होतें आणि पुन्हा अुत्पन्न होतें. विश्वचक्र तपावर चालतें. हें विश्व तर परमात्म्याचा केवळ महिमा आहे. परमात्मा याहूनहि मोठा आहे. तो सुखाचें धाम आहे. आनंदाचें निधान आहे. त्याची जाणीव जसजशी हृदयांत पसरत जाअील, तसतसें हृदय स्वच्छ होत जाअील. जसजसे तुम्ही हृदयानें मोठे होत जाल, तसतसा पापाचा तुम्हांला तिटकारा वाटूं लागेल. पापाला कांहीं स्थानच अुरणार नाहीं. ‘यो वै भूमा तत् सुखम् । नाल्पे सुखम् अस्ति ।’ येवढें ध्यानांत घ्या. हाच पापनाशक मंत्र आहे.”

**ध्येयः सदा०**—पृ. ३८० वरील टीप पहा.

पृ. २९२ **मी जर संस्कृत कवि असतों**—संस्कृत कवि वाल्मीकीनें गंगाष्टकांत म्हटलें आहे :

त्वत्तीरे तरुकोटरान्तरगतो गंगे! विहंगो वरं
त्वन्नीरे नरकान्तकारिणि! वरं मत्स्योऽथवा कच्छपः ।
नैवान्यत्र मदान्ध-सिंधुर-घटा-संघट्ट-घंटा-रणत्-
कार-त्रस्त-समस्त-वैरि-वनिता-लब्ध-स्तुतिर् भूपतिः ॥

[हे गंगे, तुझ्या कांठावरील वृक्षांतील ढोलीमधें राहणारा पक्षी होणें चांगलें. हे नरकनाशिनी! तुझ्या पाण्यांतील मासा किंवा कासव होणें बरें, पण त्याच्या अुलट ज्याच्या मदमत्त हत्तींच्या घंटांच्या आवाजानें सर्व शत्रूंच्या भयभीत झालेल्या स्त्रिया ज्याची स्तुति करतात असा राजा होणें नको.]

पृ. २९४. **मि. स्पिक**—(Speke) जॉन हेन्निंग. (१८२७-१८६४) नील नदीचा अुगम शोधून काढणारा. हिन्दुस्तानी फौजेंत भरती झाला होता. पंजाबच्या लढाअींत प्रसिद्धीस आला. त्याला सुटींत हिमालय, तिबेट वगैरे प्रदेशांत भटकण्याची आवड होती. आफ्रिकेच्या भूगोलाबद्दल आवड अुत्पन्न

होतांच १८५४ त बर्टन बरोबर तो आफ्रिकेला गेला. सोमालीलँडमधें भटकला. त्याचें वर्णन त्यानें आपल्या ' What led to the discovery of the source of the Nile. ' ( १८५४ ) नांवाच्या पुस्तकांत लिहिलें आहे. त्यानंतर तो आफ्रिकेच्या मध्यभागीं असलेल्या सरोवरांच्या शोधासाठीं निघाला. त्याचा समज होता कीं यांपैकीं अुत्तरेकडील व्हिक्टोरिया न्यांजा सरोवरांतच नील नदीचा अुगम आहे. त्यानें आपलें हें मत सप्रमाण ' The journal of the discovery of the source of the Nile. ' नांवाच्या पुस्तकांत सिद्ध केलें. बर्टननें त्याचा विरोध केला. बर्टनच्या म्हणण्याप्रमाणें टांगानिका सरोवरांतच नीलचा अुगम होता. दोघांमध्यें सार्वजनिक चर्चा ठेवण्यांत आली. चर्चेच्या पहिल्याच दिवशीं स्पिक शिकारीसाठीं गेला असतां, आपल्याच बंदुकीच्या गोळीला बळी पडला.

**चंद्रगिरि**—रामायणाप्रमाणें सिन्धु आणि सागर यांच्या संगम-स्थानीं असलेला शतशृंग पर्वत. येथें ' रुवेन झोरी ' पर्वत.

**मेरु पर्वत**—भागवताप्रमाणें जंबुद्वीपांत अिलावृत्ताच्या मध्यभागीं असलेला सोन्याचा पर्वत. येथें मध्य आफ्रिकेंतील त्याच नांवाचा अेक पर्वत, किलीमांजारोचा शेजारी.

**अच्छोद सरोवर**—बाणभट्टाच्या कादंबरींतून हें नांव घेतलेलें आहे.

पृ. २९५ **शुभ वर्तमान**—चांगली बातमी. अिंग्रजी ' गॉस्पेल '.

**स्टॅन्ले**—सर हेनरी स्टॅन्ले ( १८४०-१९०४ ) अेका सामान्य शेतकऱ्याचा मुलगा. मूळ नांव जॉन रोलांड. लहानपण मोठ्या कष्टांत गेलें. शाळेंत शिक्षकाला मारून पळून गेला होता. सुअीदोरा विकणाऱ्याकडे काम केलें. कसायाकडेहि कांहीं दिवस काम केलें. नंतर न्यू ऑर्लियन्स( अमेरिका )ला जाणाऱ्या अेका जहाजांत केबिन बॉय म्हणून काम केलें. न्यू ऑर्लियन्सच्या स्टॅन्ले नांवाच्या अेका व्यापाऱ्यानें त्याला मदत केली. नंतर त्याला दत्तक घेतलें. तेव्हांपासून तो स्टॅन्ले या नांवानें संबोधला जाअूं लागला. पालक पित्याच्या निधनानंतर फौजेंत भरती झाला. युद्धामधें गिरफ्तार झाला. सुटका होअून जेव्हां घरीं परत आला तेव्हां आअीनें त्याला घरीं ठेवण्याचें नाकारलें. त्यामुळें त्याच्या मनाला मोठा धक्का बसला. पोटासाठीं त्यानें खलाशाचें जीवन

पत्करलें. अमेरिकेच्या नौकादलांत भरती झाला. पुढें वर्तमानपत्रांत लेख लिहूं लागला. त्याची वर्णन-शक्ति चांगली होती. कित्येक युद्धांत बातमीदार म्हणून काम केलें. १८६९ त 'न्यूयॉर्क हेरल्ड'च्या संचालकानें तार करून त्याला पॅरीसला बोलावून घेतलें आणि आफ्रिकेचा शोध लावण्यासाठीं गेलेल्या लिविंग्स्टनचा शोध लावण्यास सांगितलें. सुमारें अेका वर्षाच्या त्रासदायक धावपळीनंतर १० नव्हेंबर १८७१ त अुजीजीमधें लिविंग्स्टनशीं त्याची भेट झाली. या प्रवासाचें वर्णन त्यानें 'How I found Livingstone' ( १८७२ ) नांवाच्या पुस्तकांत केलें आहे. सुरवाती सुरवातीस त्याच्या सांगण्यावर लोकांचा विश्वास बसला नाहीं. पण त्यानें लिविंग्स्टनच्या डायऱ्या दाखवल्या, तेव्हां कुठें लोकांचा विश्वास बसला. व्हिक्टोरिया राणीनें त्याला तपकिरीची रत्नजडित डबी भेट दिली. परंतु या बाबतींत लोकांनीं दाखविलेल्या अविश्वासानें व दिलेल्या शिव्यांनीं त्याच्या मनांत कायमची कटुता अुत्पन्न झाली.

सन् १८७४ त लिविंग्स्टनच्या मृत्यूनंतर त्याचें अपूर्ण कार्य पुरें करण्यासाठीं 'डेली टेलिग्राफ'च्या मालकानें वर्गणी गोळा करून स्टॅन्लेला पैसे दिले आणि त्याच्या नेतृत्वाखालीं अेक तुकडी आफ्रिकेंत पाठवली. तीन वर्षं प्रवास केल्यानंतर त्यानें सिद्ध केलें कीं लिविंग्स्टननें जिला 'लुआबाबा' म्हटलें होतें ती आणि कांगोनदी या अेकच होत. आणि त्या नदीचा पुरा जलमार्ग त्यानें निश्चित केला. या कामीं त्यानें घेतलेल्या कष्टांचा हिशोब लावतां येणार नाहीं. त्यानें व्हिक्टोरिया न्यांजाचें क्षेत्रफळहि नक्की केलें. टांगानिकाची लांबी आणि क्षेत्रफळ नक्की केलें. डवेरु नांवाच्या नव्या सरोवराचा शोध लावला. या यात्रेचें वर्णन त्यानें 'Through the Dark Continent.' नांवाच्या आपल्या पुस्तकांत केलें आहे. त्याच्या या यात्रेमुळेंच नील नदीच्या अुगमाच्या आसपासचा सारा प्रदेश अिंग्रजांच्या ताब्यांत आला.

कांगो नदी आफ्रिकेच्या मध्यप्रदेशाला भेदून जाणारा जलमार्ग आहे हा त्याचा महत्त्वाचा शोध होता. त्याचें महत्त्व बेल्जियमचा राजा दुसर लियोपोल्ड याला चांगलें समजलें होतें. त्यानें आपल्या कांहीं लोकांना आफ्रिकेहून परतणाऱ्या स्टॅन्लेची भेट घेण्यासाठीं मार्सेलसला पाठवलें.

त्यांनीं राजाच्या वतीनें स्टॅन्लेला परत कांगोला जाण्याची सूचना केली. परंतु त्यावेळीं स्टॅन्ले आराम करूं अिच्छित होता. म्हणून त्यानें ही सूचना स्वीकारली नाहीं. १८७९ त लियोपोल्डनें त्याला पुन्हा जाण्याची सूचना केली. स्टॅन्लेनें तोंपर्यंत अिंग्रज व्यापाऱ्यांत कांगोविषयीं आस्था अुत्पन्न करण्याचा बराच प्रयत्न करून पाहिला. परंतु त्याला यश आलें नाहीं. म्हणून ब्रुसेल्सला जाअून लियोपोल्डची सूचना आणि योजना त्यानें मान्य केली. तो पुन्हा कांगोला गेला. पांच वर्षांच्या मेहनतीनंतर त्यानें लियोपोल्डच्या आधिपत्या-खालीं कांगोच्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्याचें वर्णन त्यानें आपल्या 'The Congo and the Founding of its Free State.' ( १८८५ ) नांवाच्या पुस्तकांत केलें आहे.

१८८४ मधें तो पुन्हा युरोपांत परतला. त्याच्या भाषणांमुळें जर्मनींत आफ्रिकेबद्दल रुचि अुत्पन्न झाली. युरोपांतील राष्ट्रांत आफ्रिकेला ताब्यांत घेण्यासाठीं स्पर्धा सुरू झाली. स्टॅन्ले अिंग्लंडमधें राहिला, तरी बेल्जियमच्या राजाबद्दलची त्याची निष्ठाहि त्याला खेचत होती. दोघांचें हित साधण्यासाठीं तो पुन्हा आफ्रिकेला गेला. भूमध्य-रेषेच्या आसपासच्या प्रदेशांत भटकतांना त्याचे दोन-तृतीयांश सहकारी मेले, कांहीं सहकारी मारले गेले. परंतु तरी देखील त्यानें धीर खचूं न देतां आपलें काम पुढें चालवलें आणि अिंग्रजांसाठीं तेथल्या अमीनाकडून बऱ्याच सवलती मिळविल्या. या भयानक यात्रेचें वर्णन त्यानें 'In Darkest Africa' ( १८९० ) नांवाच्या ग्रंथांत केलें आहे.

या यात्रेनंतर जेव्हां तो अिग्लंडला परतला, तेव्हां त्याच्यावर विविध सन्मानांचा वर्षाव झाला. ऑक्सफर्ड आणि केम्ब्रिज विश्वविद्यालयांनीं त्याला ऑनररी पदव्या बहाल केल्या. त्यानें अेका कलाकार बाअीशीं लग्न केलें. तिच्या आग्रहा-मुळें तो पार्लमेंटांत निवडून आला. परंतु त्यांत त्याला कांहीं गोडी वाटली नाहीं. आपल्या तारुण्य-कालीन यात्रांचीं वर्णनें 'My Early Travels and Adventures.' नांवांच्या ग्रंथांत त्यानें दिलीं आहेत. सन् १८९७ त तो आफ्रिकेला गेला ती त्याची शेवटची वेळ. त्या यात्रेचें वर्णन त्यानें 'Through South Africa' नांवाच्या ग्रंथांत केलें आहे. ( १८९८ ).

सन् १८९९ त अिंग्लंडच्या राजानें त्याला 'नाअिट' केलें. आयुष्यांतले शेवटचे दिवस निवृत्तीमधें घालवून सन् १९०४ मधें तो मरण पावला.

पृ. २९६ **मिसर संस्कृति**—मिसर देशांत पुरोहित, राज्यकर्ता वर्ग, शेतकरी आणि कारागीर, मजूर किंवा गुलाम अशा चार वर्गांची समाज-व्यवस्था प्रचलित होती.

**प्लेटोची 'समाजरचना'**—प्लेटोनें 'रिपब्लिक' नांवाच्या आपल्या ग्रंथांत आदर्श नगर-राज्याचें चित्र चितारलें आहे, ज्यांत त्यानें लोकांची चार वर्णांत विभागणी केली आहे: (१) राज्यकर्ता तत्त्वज्ञ, (२) लढणारे, (३) शेतकरी, कारागीर व व्यापारी आणि (४) गुलाम.

पृ. २९७ **अश्वत्थामा**—अश्व+स्थामन्. स्थामन् = बल. येथें 'स्थामन्' च्या 'स्'चा लोप होतो.

## ७० अर्णवाचें आमंत्रण

पृ. २९९ **अर्णव**—अर्णव शब्दांत 'ऋ' धातु आहे. त्याचा अर्थ आहे खवळणें, फेस फेस होअून जाणें. त्यावरून जें खवळतें, फेस फेस होतें, अशान्त आहे तें अर्णः = पाणी. आणि ज्याच्यांत असें पाणी आहे तो अर्णव.

ऋणोत्यर्णः। अर्णांसि अुदकानि अत्र सन्ति अिति अर्णवः।

**अघमर्षण सूक्त**—पृ. ३८४ वरील टीप पहा.

**वरुण**—वेदांत वरुणाला पश्चिम दिशेचा आणि सागराचा अधिपति म्हटलें गेलें आहे. वृ (घेरणें) + अुन (कृतार्थे). ज्यानें पृथ्वीला घेरलें आहे तो.

**भुज्यु**—ऋग्वेदांत याची कथा आहे. असें सांगतात कीं भुज्यु आपला मुलगा तुग्र याच्यावर अेकदां फार रागावला. म्हणून त्यानें तुग्राला दुसऱ्या बेटावर वसलेल्या शत्रूंशीं लढण्यासाठीं पाठवून दिलें. वाटेंत त्याच्या जहाजाला भोंक पडलें आणि तो मोठ्या संकटांत सांपडला. परंतु अश्विनीकुमारांनीं शंभर वल्ह्यांच्या नौकेंतून येअून त्याला सुरक्षित किनाऱ्यावर पोंचवलें.

**'ऋतम्' आणि 'सत्यम्'**—अघमर्षण सूक्तावरील टीप पहा. पृ. ३८४

पृ. २९९ **जलोदर**—अेक रोग, ज्यायोगें पोटांत पाणी होतें. येथें लेखकानें या शब्दाचा प्रयोग जलरूपी अुदर या अर्थी केलेला आहे.

पृ. ३०० **सिंदबाद**—'अरेबियन नाअिट्स' मधें याच्या सात यात्रांचें मजेदार वर्णन आहे.

**सिंहपुत्र विजय**—सिलोनच्या प्राचीनतम परंपरेप्रमाणें अि. स. पूर्वी सहाव्या शतकाच्या मध्यावर सौराष्ट्राच्या सिंहपुरचा राजकुमार विजय साहसपूर्ण यात्रा करून सिलोनला पोंचला होता. विद्वानांच्या म्हणण्याप्रमाणें ही पौराणिक व्यक्ति नसून, अैतिहासिक व्यक्ति आहे. पहा–'भारतीय आर्यभाषा आणि हिन्दी'–लेखक श्री. सुनीतिकुमार चट्टोपाध्याय.

पृ. ३०१ **सोपारा**—प्राचीन शूर्पारक.

**मंगलापुरी**—मंगळूर.

**ताम्रद्वीप**—सिलोन, लंका.

**जावा आणि बालिद्वीप**—सिंगापुरच्या दक्षिणेस हीं दोन बेटें आहेत. तेथला धर्म अिस्लाम असला, तरी हिन्दु संस्कृतीचा प्रभाव तेथें आज देखील स्पष्ट दिसून येतो.

**घोघा बंदराच्या वरानें**—'घोघानो वर अने लंकानी लाडी,' ही गुजराथींत म्हणच होअून बसली आहे. गुजराथचे व्यापारी जेव्हां लंकेला जाअून तेथें लग्नें करूं लागले तेव्हांची ही म्हण आहे.

**दशदिशांना**—महावंशांत लिहिलेलें आहे कीं "बौद्ध धर्माचा प्रचार करणाऱ्या मोग्गलीपुत्र ( तिस्स ) स्थविरानें संगीतीचें काम पूर्ण होतांच भविष्याचा विचार करून आणि मध्य देशाच्या बाहेर बौद्ध धर्माची स्थापना होणार आहे हें ध्यानांत घेअून कार्तिक महिन्यांत कांहीं स्थविरांना वेगवेगळया ठिकाणीं रवाना केलें : काश्मीर आणि गांधारमधें मज्झंतिकाला, महिष मंडलांत महादेव स्थविराला, वनवासीमधें रक्खिताला, महाराष्ट्रांत महाधम्म रक्खिताला आणि योन ( यवन ) लोकांच्या देशांत महारक्खित स्थविराला पाठविलें.

"मज्झिम स्थविराला हिमवंत ( हिमालय ) प्रदेशांत तसेंच सोण व अुत्तर या दोन स्थविरांना सुवर्णभूमि ( ब्रह्मदेश ) ला पाठवलें. महिन्द, अिट्ठिय, अुत्तिय, संबल आणि भद्दसाल या पांच स्थविर शिष्यांना 'तुम्ही सुंदर

लंकाद्वीपांत जाऊन मनोरम बुद्ध धर्माची स्थापना करा' असें सांगून त्या द्वीपाला पाठवून दिलें." १–८

**धर्म-विजय**—कलिंगाच्या विजयानंतर मनांत अुत्पन्न झालेल्या पश्चात्तापाचें वर्णन करणारा जो शिलालेख अशोकानें लिहवला, त्यांत त्यानें म्हटलें आहे कीं, 'महाराजांच्या मतानुसार धर्माद्वारा प्राप्त झालेला विजयच श्रेष्ठ विजय होय.'

पृ. ३०२. **गेंड्याप्रमाणें अकुतोभय**—मूळ बौद्ध ग्रंथांत गेंड्याची नव्हे, तर गेंड्याच्या अेकाकी शिंगाची अुपमा आहे. सर्व प्राण्यांना दोन शिंगें असतात. परंतु गेंड्याच्या नाकावर फक्त अेकच शिंग असतें.

धम्मपदांत याच संदर्भात अेकाकी हत्तीची अुपमा दिली गेली आहे.

> नो चे लभेथ निपकं सहायं सद्धिंचरं साधुविहारि धीरं ।
> राजा व रट्ठं विजितं पहाय अेको चरे मातंगरञ्ञे व नागो ॥

[जर निपुण, बरोबर चालणारा, साधुविहारी, धीर पुरुष मित्र म्हणून लाभला नाहीं, तर जसा पराभूत राज्य सोडून राजा अेकटा निघून जातो, किंवा मातंग अरण्यांत हत्ती अेकटा भटकतो, त्याप्रमाणें अेकटेंच फिरलें पाहिजे.]

> अेकस्स चरितं सेय्यो नत्थि बाले सहायता ।
> अेको चरे न च पापानि कयिरा अप्पोस्सुक्को मातंगरञ्ञे व नागो ॥

[अेकाकी चर्या श्रेयस्कर आहे, बालका (अज्ञान्या) कडून कांहीं मदत मिळत नाहीं. मातंग अरण्यांतील अेकाकी हत्तीप्रमाणें अल्पोत्सुक होअून अेकाकी चर्या केली पाहिजे; पाप करता कामा नये.]

**सोपारा, कान्हेरी, घारापुरी**—मुंबअीच्या आसपास असलेलीं बौद्ध लेणीं.

**खंड-गिरि, अुदय-गिरि**—ओरिसामधील दोन पहाड. येथें बौद्ध लेणीं आहेत. सम्राट् खारवेलचा प्रख्यात शिलालेखहि येथेंच आहे.

**महिन्द आणि संघमित्ता**—अशोकानें आपला मुलगा महेन्द्र आणि मुलगी संघमित्रा यांना बौद्ध धर्माच्या प्रचारासाठीं लंकेला पाठविलें होतें.

पृ. ३०३ **वायकिंग**—युरोपच्या अुत्तर समुद्रांत ८ व्या ते १० व्या शतकापर्यंत चांचेगिरी करणारे या नांवाचे चांचे.

**लक्ष्मीचा पिता**—लक्ष्मी समुद्रांतून अुत्पन्न झाली, म्हणून पुराणांत समुद्राला लक्ष्मीचा पिता म्हटलें गेलें आहे. येथें लेखकानें या गोष्टीचा लाभ घेअून समुद्रांत यात्रा करण्यामुळें प्राप्त होणाऱ्या लक्ष्मीच्या अर्थानें या शब्दांचा प्रयोग केला आहे.

पृ. ३०४ **सर्वे सन्तु निरामयाः**—संपूर्ण श्लोक असा आहे :

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखम् आप्नुयात् ॥

[ या जगांत सर्व सुखी असोत. सर्व निरामय ( निरोगी ) असोत. सर्वांचें कल्याण होवो. कुणाच्या वाट्याला दुःख येअू नये. ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ............
... शाखा (...)

# सूची

[ प्रस्तावनेचे पृष्ठ-क्रमांक स्वतंत्र असल्यामुळें ते दर्शविण्यासाठीं कंसांत ( प्रस्ता. ) असें घातलेलें आहे. त्याशिवाय ज्या ज्या विषयांवर 'अनुबन्धां'त टीप आलेली आहे, ती कोणत्या पानावर आहे तें दर्शविण्यासाठीं तो पृष्ठ-क्रमांक कंसांत दिलेला आहे. अुदा. अंगवंग १४ ( ३१७ ), म्हणजे अंगवंग हा शब्द १४ व्या पृष्ठावर आलेला आहे व त्यावरील टीप ३१७ पानावर सांपडेल. ]


अ

अंकलेश्वर ८३
अंकोला ९२, ९३, १०३
अंगवंग १४ ( ३१७ )
अंतर्वेदी १८ (प्रस्ता.), १८ ( ३२१ ), ३०
अंदमान २७२
अंबा–अंबिका ८९ ( ३४५ )
अंबा–भवानी १०७
अंबिका २४ ( प्रस्ता. )
अकबर १९ ( ३२३ ), १३४
अक्षय–तृतीया २५१
अक्षयवट १९ ( ३२२ )
अगस्ति १६०, १६३, १९०, २६२, २६५, २९८
अगस्त्य २३६
अगुंबा ४०
अघनाशिनी ७०, ९२, ९३, ९६, ९७, ९८
अघमर्षण सूक्त २९१ ( ३८४ ), २९८
अच्युत देशपांडे १२४
अजमेर ८७
अजिंठा १८०
अजिंठ्याचे डोंगर २९
अटक १४२, १४३
अड्यार २६ (प्रस्ता.), २१६, २१८
अनंतनाग १३१
अनंतपुर १३२
अनंतबुवा मर्ढेकर ६ ( ३१२ ), १२९
अनुराधा २५४, २६५, २८३
अनुराधापुर १८९
अबटाबाद १३४
अबूबकर १४७
अबोर २३८
अब्बाससाहेब ७ ( ३१३ )
अभिजित २५४, २८३
अमरकंटक ७७ ( ३४१ ), ७८, ८१, १७१
अमरनाथ ६ ( ३१३ )
अमरसर ( व्हिक्टोरिया ) २९०, २९१, २९४, २९७

अमरापुरा २७६, २७७
अमानुल्ला १४२ ( ३५७ )
अमृतलाल ( नाणावटी ) २५०
अमेरिका ७, ३९, ४०, १५०, २८०, २८६, ३०३
अयोध्या १५, २०, १२४
अरबस्तान १२३, २९५, ३०२
अरवली ७३, ८७
अरुंधती ( तारा ) १३०
अर्जुन १८७
अर्जुनदेव १३५ ( ३५३ )
अलकनंदा १४, २५
अलकापुरी १२७
अलकेश्वर ६१ ( ३३२ )
अल्काहेरा २१७
अल्हणादेवी १९७
अवती ३५
अशोक १४, १५, २० ( ३२३ ), ४०, १५७, १५९, २०५, ३०१
अष्टबंध १०४
असित ॠषि १७ ( ३२० )
अस्का २०५
अहमदाबाद ७१, ७५
अहल्या १८४
अहल्याबाओी १०४

आ

आंकोर थॉम २३६
आंकोर वाट २३६
आंध्र ५, ७, २६, २७, २०६
आअिसलँड ३०३
आओी १०४, १०६, १०८, १११
आगाखान महल १०
आग्रा १५, १८, १५४, २७४
आजी (नदी) २४ (प्रस्ता.), ९०, ९१
आप्पासाहेब (पंत) २८९ ( ३८४ )
आफ्रिका १४ (प्रस्ता.), १७२, २२०, २८४, २८५, २८७, २९३, २९५, २९७, ३०३, ३०४
आबू ८८, ८९
आरबेल घाट ९२
आराकान २७७
आरावली ( आडावली ) ८८
आर्य १९ ( प्रस्ता. ), १३, १४, २२, ७४, १३९, १४१; १५६, १८१, १९८, २५६
आर्यजाति १४
आल्बनी ३०४
आशिया २८६, २९३
आसाम २४, २८ ( प्रस्ता. ), १६, १५७, २२२, २३६, २३८
ऑस्ट्रेलिया ३०४
आळंदी ५

अि

अिग्लंड २९५
अिंद्रदेव ४४, १०२, १४१, २७६
अिंद्रसभा ( वेरूळ ) १२४
अिंद्राचें वज्र १६७
अिंद्रावती २९

अिफाल ( नदी ) २५ ( प्रस्ता. )
अिग्नेशियस लॉयला ३०२
अिचंगू नारायण १६६
अिजिप्त २९४, २९६, २९७
अिटारसी ८२, १७९
अिथियोपिया २९३
अिराण २१२
अिरावती ७२,१३५,१७४,२७६

अी

अीब्र १९९, २००, २०४
अीशावास्य ९७, २९१ ( ३८४ )

अु

अुंचळ्ळी ७०, ९२–९७
अुज्जयनी २६ ( प्रस्ता. )
अुडिया २०६
अुत्कल २५, २७ ( प्रस्ता. ), १०७, २४७
अुत्तर अमेरिका ८
अुत्तरकाशी १४ ( ३१७ ), १८
अुत्तररामचरित २७९
अुदयगिरि ३०२ ( ३९१ )
अुर्वशी २० ( प्रस्ता. ) ( ३०८ ), २३९, २४०

अृ

अृतु-संहार २४३ ( ३७४ )
अृषिकुल्या २५ ( प्रस्ता. ), २०५, २०६, २०७

अे

अेलिफंटा १२४

अै

अैरावती २५ ( प्रस्ता. ), ३१, ७३, १३५, १७९, २७६, २७७, २७९, २८०

ओ

ओंकारेश्वर ८
ओखला २०८
ओखा मंडळ ७६
ओरछा १७८
ओरिसा ९७, २०५, ३०१, ३०२
ओवेन ( धबधबा ) २९०, २९७

औ

औरंगजेब ६७

क

कंदहार १४३
कंपाला २८९
कंबोडिया २३६
कंस १९
कच्छ २७ ( प्रस्ता. ), ८८, ८९
कटक २५ ( प्रस्ता. ), ९७ ( ३४७ ), २४७
कनकम्मा ३७
कनोज १८
कन्याकुमारी २७ ( प्रस्ता. ), ५५, ७६, १८९, २५९, २६०, २६५, २६६ ( ३७८ ), २८७
कन्या गुरुकुल २२४, २२९
कबीर १४
कबीरवड ८३ ( ३४३ )

करतार ( खिरतर ) १४१, १४९
करतोया २२२
कराची २७ ( प्रस्ता. ), १४४, १४७, १५१, २५३, २५७
कॅरीना २६४
कर्झन २७ ( प्रस्ता. ), ४१, ५७
कर्झन सीट ५८
कर्ण ( राजा ) ८९ ( ३४५ )
कर्नाटक ५, ४०
कर्नाळी २७७
कलकत्ता १५७, १५८, १७४, १९७, १९८, २००, २०३, २४७, २६७, २७१, ३०४
कलचुरी १९७ ( ३७० )
कलिंग २०५, २०६, ३०१
कश्यपगंगा ७४ ( ३३६ )
कॅसल रॉक ९८
कस्तूरबा १०, २६०
कऱ्हाड २५६
कांगो २९५
काकपेया २५ ( प्रस्ता. )
काटजुडी २५ ( प्रस्ता. )
काठमांडू ( काष्ठमंडप ) १६६, १६७
काठियावाड २६, २७ ( प्रस्ता. ), ९०, ९१
कादंबरी २४७ ( ३७४ )
कादवा २९
कान-चेन-झौंगा २२०
कानडा ४७, ५६
कानपुर १४, १८, १९
कानो १५ ( प्रस्ता. )
कान्हेरी २५२, ३०२ ( ३९१ )
काबुल ( नदी ) १४२
कामत ( पद्मनाथ ) ११८
कामरूप २० ( प्रस्ता. )
कायरो २१७
कारकळ ४० ( ३२८ )
कारवार २५, २७ ( प्रस्ता.) ११, ३९, ५७, ६९, ७०, ९२, ९३, ९८, १०३, १११, ११३, ११५, ११६, ११७, ११८, १२३
काराकोरम १४२
कार्ला २५३
काला पहाड १९७ ( ३७० )
कालिंगपोंग २५ ( प्रस्ता. ), २१९, २२१
कालिंदी २० ( प्रस्ता. ), १४, १९, २०, २६, २७७
कालिकत २७ ( प्रस्ता. ), ३०२
कालिकापुरण २२२
कालिदास १९, २६ ( प्रस्ता. ), १०, २०, २३९ ( ३७२ ), २४३, २५८, २७९ ( ३८२ )
कालियामर्दन १९
काल्पी १९
कावी २४ ( प्रस्ता. )
कावेरी १८ ( प्रस्ता. ), ३९, ७२, ७८
काशी २८ ( प्रस्ता. ), २९, २७७

काशीविश्वेश्वर १०३
काश्मीर ५५, १२९ १३०, १३१, १३२, १३३, १३८, १४०, १५४, १५७, १६५, २१८, २६५, २७७
कासा २११ ( ३७१ ), २१२, २१३ २१४
काळी (नदी) (कारवार) २५ (प्रस्ता.) ७०, ९२, ९३
काळी नदी ( गोवा ) २५ ( प्रस्ता. )
किबोका ( हिपोपोटेमस ) २९२
किष्किंधा २८ ( ३२६ )
कीआमारी १५१
कीम २४ ( प्रस्ता. )
कुडची ६, १७२
कुण्डिल २३८
कुतुबमिनार १२२
कुबेर १२७
कुमुद्वती ३५
कुरम १४२ ( ३५८ ), १४३
कुरुक्षेत्र १८, १९, ४४, ६७, २४३ ( ३७३ )
कुरुपांचाल १४ ( ३१७ )
कुर्ग ३९
कुर्नूल ३५, ३७
कुशावती १७४
कुळकर्णी ११९
कूडली ३५
कूर्मगड ११३
कूवम २१६, २१८
कृत्तिका १६३
कृष्ण १९, २३८, २५२, २७७
कृष्णचंद्र ८०, २५२
कृष्ण द्वैपायन २३६
कृष्णराय ३५
कृष्णसागर ४८, २०८
कृष्णा १९ ( प्रस्ता. ), ३–७, ९, ११, २६, २७, ३१, ३५, ३७, ८१, १७२, २०८, २९७
कृष्णांबिका ७
केकय २० ( प्रस्ता. )
केटी ( बंदर ) १४४, १५७
केदारनाथ २१
केनिया २९४
केरळ २६ ( प्रस्ता. ), २७७
केशू ९९
कैकेयी २० ( प्रस्ता. )
कैलास १४ ( प्रस्ता. ), ५५, ७७, १४०, १४१
कैलास गुंफा १२४
कोंकण २७४
कोंडाणा १०
कोटरी १४७, १५६, १५७
कोटितीर्थ १०४
कोणार्क २७ ( प्रस्ता. )
कोलंबस १५०
कोलक २४ ( प्रस्ता. )
कोहाट १४२ ( ३५७ )

कोहीमा २३८
कौसल्या २२ ( प्रस्ता. )
क्रुमु १४२
क्षीरभवानी ५५
क्षेमेन्द्र १९ ( प्रस्ता. ) ( ३०८ )

**ख**

खंडगिरि ३०२ ( ३९१ )
खंडाळा घाट ४२
खंभात २४ ( प्रस्ता. )
खडकवासला ८ (३१५), १०, २०८
खडकी ८
खनबल १३१
खरस्रोता २५ ( प्रस्ता. )
खस्वस्तिक २८३ (३८३), २८८, २८९
खारची ( मारवाड जंक्शन ) ८७
खासी ( गिरिजन ) २३८
खासी ( पर्वत ) ९०
खिरथर १४१, १४४, १४९
खेडा सत्याग्रह ७५
खैबर घाट १४२

**ग**

गंगटोक २२१
गंगा १७, १८, २४ ( प्रस्ता. ); ५, १३–१७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २६, ३१, ३६, ३९, ४४, ४८, ५७, ७७, ७८ ( ३४२ ), १४१, १४३, १४४, १५६, १५७, १५८, १६१, १६२, १६३, १६४, १६८, १६९, १७१, १७९, १९७, २२१, २५६, २७७, २९६
गंगाधरराव देशपांडे ४१ (३२९), ११२
गंगामूल ३४
गंगावळी ७०, ९२
गंगासागर २२
गंगोत्री ६ ( ३१३ ), १३, १४, २१, २२, १६३, १८०, २८९, २९२
गंजाम २०५
गंडकी १९ ( प्रस्ता. ), १५, १६८ ( ३६५ ), १६९
गजेन्द्र–ग्राह १५, १७१ ( ३६६ )
गणपति १०२, १०३, १०४
गणेश १०७
गया ९०, १६२, १६९, १७०
गांधार २० ( प्रस्ता. )
गांधारी २० ( प्रस्ता. )
गांधीजी १४ ( प्रस्ता. ), ९, १०, ३५, ४०, ४१, ७५, १७६, १९८, २२८, २३८, २६०, २९३
गांधीयुग ७१
गांधी–सेवा–संघ १५७
गाल २८७
गिदवाणीजी ७ ( ३१४ )
गिरगिटचा किल्ला १४२ ( ३५६ )
गिरनार २७, ५५, ९०
गिरसप्पा ३९, ४०, ४१, ४७, ४८, ४९, ५७, ६३, ६५, ९२

गिरिधारी २६७ (३७९), २६९, २७०, २७१, २७५

गीता ७६, १८९, २३२, २४२ (३७३)

गीतावाणी १९

गुल्लुपाणी २२४, २२९, २३२

गुजराथ २३, २४, (प्रस्ता.); ४० (३२८), ६७, ७१, ७२, ७३, ७५, ७६, ८९, १७१, २०७, २१५

गुजराथ विद्यापीठ ७१, ७२, ७५ (३४०)

गुरु ८६ (३४४), १६०, २६५, २८३

गुह्येश्वरी १६७

गूहक १६१

गोंड १९८, २०१

गोंड् ९९, १००

गोआलंदो १६, १५७

गोकर्ण २७ (प्रस्ता.), ९३, १०४, १०५, ११२, ११३

गोकर्ण-महाबळेश्वर १०३, १०४, १११

गोकाक १२८, २०८

गोकुळ १७८

गोदावरी १८, १९ (प्रस्ता.); ४, २६-३३, ७३, ७७, ७८, ८१, १२५

गोधरा २४ (प्रस्ता.)

गोधूमलजी १४७, १४८, १४९

गोपालपुर २७ (प्रस्ता.)

गोपाळकृष्ण २६, १७८

गोपाळ माडगांवकर ९३

गोमती (मुरादाबाद) १९, २६ (प्रस्ता.); ७३, ७८, १७४, १७९

गोमती (द्वारका) २६ (प्रस्ता.)

गोमुख २२

गोरक्षनाथ १६८ (३६४)

गोवा २५ (प्रस्ता.), ११८, २८५

गोवानीज २८५

गोविंदगड ८८

गौतमी गोदावरी ३०

गौरीकुंड २१

गौरीशंकर १६६

गौरीशंकर तलाव ८३, ८४

गौहाटी २४ (प्रस्ता.)

ग्रीक १४२, १७५, २९६

ग्रीनलंड ३०३

ग्रीस ३०४

### घ

घटप्रभा १२८, २०८

घाघात २२२

घाटे मुरलीधर २१२

घारापुरी १२४, २५२, ३०२

घोग्रा २६ (प्रस्ता.), १४१

घोघा २० (प्रस्ता.), ३०१ (३९०)

घोरपडे ५
घोलवड २११, २४७

### च

चंगुनारायण १६६
चंदन २३१ ( ३७२ )
चंदना ७४
चंदुभाओी पटेल २९१
चंद्रगिरि २९४ ( ३८६ )
चंद्रगुप्त १४४, १९७ ( ३६९ )
चंद्रभागा ५, ७५
चंद्रभागा ( चिनाब ) १३८, १३९
चंद्रशंकर ४६
चंपानगरी ५५
चंपारण १६२
चंबल १५, १६८, १७४, १७५, १७९
चन्नपट्टनम् २१६
चर्मण्वती १९ (प्रस्ता. ), १९, १७४, १७५, १७९, १९७
चांदीपुर २७ (प्रस्ता. ), २४६, २४७, २४८, २४९
चाणोद २७७
चारुशीलाशरण १७८
चार्ल्स नेपियर १४४ ( ३६० )
चिंचली ५
चित्रांगदा २० ( प्रस्ता. )
चित्रा १६०, २६४, २८३
चित्राल १४२ ( ३५७ )
चित्रावती ३८
चिनाब १३४, १३८–१३९, १४३
चिलका २७ ( प्रस्ता. ), ५७, २०५
चीन ३६, ७७, १३३, २३५, २३८, ३०४
चुंग थांग २२०
चुलकाटा मिशमी २३९
चैतन्य महाप्रभु २३८
चोटीला ९०
चोरवाड २६ (प्रस्ता. ), ९१
चोल २०६
चौसष्ट योगिनींचें मंदिर ८२, १९६, १९७
चौपाटी २३

### छ

छत्तीसगड १९८
छपरा १६२
छेंदवीन २५ ( प्रस्ता. ), २७९

### ज

जगत्पति ८०
जगदंबा ८०
जगन्नाथ ( कवि ) १९ ( प्रस्ता० )
जच्च १४४ ( ३९९ )
जटायु २८ ( ३२६ ), ३३
जनक १५, ५०, १६९
जनस्थान २८ ( ३२६ ), १२४
जपानी २४ ( प्रस्ता० ), १६
जबलपुर ८१, १८०, १८३, १८५, १९०, १९२
जमखंडी १७२,
जमदग्नि २३७

अनुक्रम ७४५६३ दि० ...
४६२ ... ११।३।७७

जमनोत्री १३, १७, २८९
जम्मू १३८, १४०, १४३
जयद्रथ १४४ ( ३५९ )
जयमंगली ३८
जरासंघ १११ ( ३४८ )
जलपायगुडी २२१
जलियानवाला बाग ७५ ( ३३९ )
जसवंत सागर ८८
जसवंत सिंह ८८
जहांगीर १३०, १३८
जह्नु १५६
जानकी २०
जामिया मिलिया २०३
जावा १६, ३०१, ३०४
जाह्नवी २० ( ३२३ )
जिंजा २८९, २९१, २९३, २९४, २९७
जीवतराम (कृपालानी) २७०, २७१
जुनागढ ५५, २०५
जुन्नर २५३
जुहू २६ ( प्रस्ता. )
जेतपुर ९१
जैन पुराण १६ ( प्रस्ता. )
जैन तीर्थंकर १२४
जोग २६ ( प्रस्ता. ), ४०, ४४, ५२, ५६, ५७, ५८, ६४, ६५, ६६, ६७, ६९, ७०, ९२, ९६
जोधपूर ८७, ८८
जौगढ़ २५ ( प्रस्ता. ), २०५, २०६
ज्ञानेश्वर २९
ज्येष्ठा २६५, २८३

झ

झांझीबार २९४
झांशी १७६, १७८
झारसूगुडा १९९
झेलम १२९, १३०, १३१, १३३, १३४, १४३, २१७

ट

टास्मानिया ३०४
टेंगापानी २३८
टेगस २१७
टेम्स ९१, २१७
टेहरी १८
ट्रिपोली १५ ( प्रस्ता० )

ठ

ठाणें २१५, २५२

ड

डहाणू २१२, २१३
डायमंड हार्बर २६७
डिगारू २३८
डिबंग २३८
डिब्रुगढ २४ ( प्रस्ता० )
डिहंग २३८
डेक्कन कॉलेज ९
डेरा अिस्माओीलखान १४३ ( ३५८ )
डेरा गाझीखान १४३ ( ३५८ )
डेहराडून १८, २२३, २२४, २२५, २२९
डोगरा १४१

ढ

ढुब्री २४ ( प्रस्ता० )

त

तथागत १६७, २५२ (३७५)
तदडी बंदर ९३, १०३, १०४, १०५, १०९, १११
तपती २३ (प्रस्ता.)
तमसा २० (प्रस्ता.)
तलाअी मानार २५८
तवी १४०
ताजवीवी १९ (३२२)
ताना (सरोवर) २९३
तानाजी मालुसरे १०
तापी २३, २४ (प्रस्ता.) २७, ७३, २७७
तामनस्कर २०७
तामिळ भाषा ७०
ताम्रद्वीप ३०१ (३९०)
ताम्रलिप्ति (तामलुक) ३०१
तालूंग चू २२०
तिनअी घाट ९८
तिबेट ७७, १३३, २२२, २३५, २३८, २९४
तिबेट (पश्चिम) १४२
तीर्थ १८ (प्रस्ता.), ७४–७५
तीर्थहळ्ळी (तीर्थळ्ळी) ३४
तीस्ता २५ (प्रस्ता.), २१६, २१९–२२३
तुंगनाथ २२४
तुंगभद्रा ५ (३१२), ७, ८, २६, २८. ३५, ३६, ३७, ३८
तुंगा ५, ८, ३४, ३५ ३६, ४१
तुकाराम २७९
तुलसीदास १४
तेंदुला २०७, २०८, २०९
तेजपुर २४ (प्रस्ता०)
तेरदाळ १५ (प्रस्ता०), १७२, १७३
तेलंगण ५ (३१२)
तेलगू २६२
त्रावणकोर २६५
त्रिपथगा १९ (प्रस्ता.), २२ (३२४)
त्रिवेणी १४ (३१८), २२१
त्रिशंकु २६४
त्रिस्रोता २२०
त्र्यंबक १३, २७, २८

द

दंडाल पर्वत १८
दक्ष ६७
दक्षिण कानडा ६३
दत्तात्रेय २१, १०७, १७९, २३३
दधीचि ७५ (३३६), १३७
दमणगंगा २४ (प्रस्ता.)
दशार्ण १७९ (३६८)
दांडीकूच ७५ (३३९), १७४
दादू १४७
दानव २४७
दाभोळ २७ (प्रस्ता.), ३०१
दार्जिलिंग २१९, २२१
दाहिर १४४ (३५९)
दिक्चू २२०
दिनशा मेहता ९
दिल्ली २८ (प्रस्ता.) (३४८), १५, १८, १५४, २०३, २०८

दिहंग २३९
दीघा घाट बंदर १६०
दूधसागर २५, २६ (प्रस्ता.), ९८, १००
दूधगंगा १२९–१३०, १६५
दूधेश्वर महादेव ७५
दृषद्वती ७३, १७४, १७९
देलवाड़ा १८५
देव ७० (३३५), २१४, २४७, २९९
देवकी २२ (प्रस्ता.)
देवगड ११२, ११५, ११६, ११७, ११८, १२०, १२१, १२३
देवदास (गांधी) ४६
देवदूत २४४
देवपाणी २३८
देवप्रयाग १४ (३१७)
देवयानी १५ (३१८)
देवयानी (नक्षत्र) २६२, २८३
देवव्रत (भीष्म) १३ (३१६)
देवी वासंती २१८ (३७१)
देवेन्द्र ५५ (३३२)
देहू ५
द्रविड ८१, ३०१
द्रुग १९८, २०१, २०७
द्रौपदी १५, १८, २७७
द्वारका २६ (प्रस्ता.) १९, २५५

**ध**

धनुष्कोटी २५५ (३७६), २५६, २५७, २५८, २५९
धर्मदेवजी २३१ (३७२)
धवली २५ (प्रस्ता.)
धवलेश्वर ३०, ३३
धसान २६ (प्रस्ता.), १७७, १७८, १७९
धारणा २९
धारवाड ६९
धुवांधार ८२, १८४, १८८, १८९, १९०, १९२–१९७
धूमकेतु २७३
धौली २०५
ध्रुव १३०, २६२, २६४, २६५, २८३
ध्रुव (अुत्तर) ३०३
ध्रुव-मत्स्य २८३

**न**

नंद १९
नंदी १८४
नंदीदुर्ग ३८
नरक २७०
नरसोबाची वाडी ४
नरहरिभाअी (परीख) ७१
नर्मदा १८, १९, २३ (प्रस्ता.); २६, २७, ५७, ७३, ७७–८३, १६८, १७१, १८०, १८३, १९१, १९२, १९६, २७७
नर्मदा परिक्रमा ७८-७९, ८१
नवजीवन ७५ (३३८)
नवागढ ९१
नवानगर ९१
नवी बंदर ९१
नांम्बुद्री ब्राह्मण २९ (३२६)

नाअील २७, २७९ (३८१) ('नील' पहा)
नागरकोविल २६०
नागा २३८
नागा (पर्वत) ९०
नाणाघाट २५३
नाथाभाअी पटेल ७५
नाना फडणवीस ५, ७
नायगरा ३९, ४१, ४८
नारद १७९, २३६
नारायणदास मलकानी ११९, १४६, १४७
नारायण सरोवर ५५ (३३२)
नारायणाश्रम १२९
नॉर्वे २७ (प्रस्ता.), ३०३
नाशिक २७, २८, २०८, २५३
निलगिरि ९०
निवेदिता ४८ (३३०), १६७ (३६४)
नीरो ५० (३३१), ६३
नील १४ (प्रस्ता.), २१७, २८९–२९४, २९६, २९७
नीलकुंद ९३
नीलगंगा २१
नीलाम्बा २९१
नीलोत्री २८९, २९०, २९१, २९२
नेपाळ १५८, १६५, १६६, १६८
नेल्लूर ३७ (३२८)
नैरोबी २८९
नोआ डिहंग २३८

## प

पंचगौड ८१ (३४२)
पंचचामर (वृत्त) ८०, १५३ (३६२)
पंच द्रविड ८१ (३४२)
पंचवटी २८
पंचस्नानी १४ (प्रस्ता.)
पंचहिमाकर २२०
पंजाब १८ (प्रस्ता.), ७५, १३९ १४१ (३५५), १४२, १४४ १४७, १५७
पंढरपुर ५, १०७
पटवर्धन (परशुरामभाअू) ५
पट्टन (ललित) १६६
पथमा २०५
पद्मा २४ (प्रस्ता.), १६
परब्रह्म २२ (प्रस्ता.)
परशुराम १७९, २३५–२३९
परशुराम कुंड २३५, २३६, २३८
परोपनिसदी (अफगाण) १४१ (३५५), १४२
पर्णकुटी ९ (३१५)
पर्वती ५५
पलाशवाडी २३६
पल्लीपाडु ३७
पशुपतिनाथ १६७
पश्चिम आफ्रिका १५ (प्रस्ता.)
पांडव १८, २१३
पांडव गुंफा १५३
पांडिचरी २७ (प्रस्ता.)
पाकिस्तान ८८, २२१, २२२
पाटणा १५७, १५८, १५९, १७१

पाटली पुत्र १५ ( ३१९ ), १५६, १५७, १८९
पानीपत १८
पापघ्नी ३८
पारशी २१२
पारिजात २५४, २६५, २८३
पार्वती २८, ६१, ६८, ८२, २२०, २२२, २५६, २७१, २९२
पार्वती ( धबधबा ) ४६, ५१, ५२, ५९, ६६, ६७, ६८
पाल्क २५७
पावनी २२
पाव–हुन्–री २२०
पावागढ ५५
पिटर्सबर्ग ( लेनिनग्राड ) १४४
पिनाकिनी ३७–३८, ७२
पीरपुंजाल १३८
पुणतांबेकर ७ ( ३१४ )
पुणें ५, ८, ९, ११, ५५, १८९, १९८, २०८, २५२
पुनर्वसु १६३, २६५, २८३
पुराण २३६, २९४
पुरी–जगन्नाथ २७ ( प्रस्ता. ), ५५
पुलकेशी १७८ ( ३६७ )
पुष्कर ८८
पुष्पक विमान २०, १२४
पुष्पदंत १५३ ( ३६२ )
पेगुयामा २७७
पेन्नेरे ३८
पॅरिस १६८, २१७
पेशवाओ ९
पैठण २७, २९
पोरबंदर ९१
पोर्तुगाल ३०३
प्रतिष्ठान नगरी २९
प्रमाणिका ( वृत्त ) १५३ ( ३६२ )
प्रयाग १४, २० (प्रस्ता.); १४, १५, २२, ५५, २५६
प्रयागराज १५ ( ३१८ ), १९, २२, २२१, २५६
प्रवरा २९, २०८
प्रस्रवन २६२, २६५
प्राणजीवन मेहता ७१, २७३
प्राणहिता २९
प्रोम २८०
प्लेटो ( समाजरचना ) २९६ (३८९)

फ

फरपिंग–नारायण १६६
फल्गु ९० ( ३४६ ), १६९–१७०
फॉरेस्ट कॉलेज ( डेहराडून ) २२४
फैजपुर ( काँग्रेस ) १८०, १८३, १८४
फ्रांस ३०३
फ्रेंच ३०

ब

बंगलोर ४०
बंगाल २४ ( प्रस्ता. ), २१७, २२१, ३०१
बंगालचा अुपसागर २१६
बंगाली ३०१
बंड गार्डन ९, २०८
बॅक वॉटर २६ ( प्रस्ता. )

बकिंगहॅम कॅनॉल २१९
बॅक्ट्रिया १४२
बगदाद ३६, १४४
बदरीनारायण २१, २२४
बनारस २३, १७१
बनास ८८, ८९
बन्नू १४२
बरडा ९०
बर्‍हाणपुर २४ ( प्रस्ता. )
बराक ( नदी ) २५ ( प्रस्ता. )
बरी-कटक २५ ( प्रस्ता. )
बलराम १७९, २३६
बलुचिस्तान १४९, ३०२
बाजीराव ( पहिला ) ५
बाजीराव ( दुसरा ) २४ ( प्रस्ता. ),
बापूजी १७६
बाबर १८, १४२
बायबल ३०४
बारगंगा ४२, ५८
बारडोलीचा लढा ७५
बारामुल्ला १३२, १३३
बालनदी ५८, ९२
बालासोर २४७, २४८, २४९
बालिद्वीप ३०१ ( ३९० ), ३०४
बालोतरा ८८
बाल्हीक १४२ ( ३५५ )
बिलाडा ८८
बिशंगु नारायण १६६
बिहार १६९, २१७
बिहार विद्यापीठ १५८
बुंदेलखंड १७९
बुखारा १३३, १४४
बुड्ढी बलंग २४७
बुद्ध १४, १५, ४९, १६७, १६९, १७०, २३७, २३८, २३९, २५३, २७७, ३०१, ३०२ ( ३९१ )
बूबक १४७, १४९, १५०
बेंकिपुर ३५
बेझवाडा ७ ( ३१३ ), ९, ३०, ३१, ३७, २०८
बेतवा १७७, १७८, १७९
बेमेतरा २००, २०२
बेलाताल १७७ ( ३६७ )
बेल्जियम कांगो २९५
बेल्जियम २९५
बैतुल २४ ( प्रस्ता. )
बोधिगया १७० ( ३६६ )
बोर तलाव ८३, २०८
बोरकर ( कवि ) १३, ११८, ११९
बोर्डी २११, २१२, २४७, २५५
बोलनघाट १४३
बौद्धधर्मी ३०२
बौद्धभिक्षु २३८, २५२, २७६
बौद्ध मंदिर २२० २२१, २८०
बौद्धसाधु २८०
ब्रह्मविद्या आश्रम २१८
ब्रह्मकपाल २१ ( ३२३ )
ब्रह्मकुंड २३५, २३८
ब्रह्मगंगा २१
ब्रह्मगिरि २७
ब्रह्मदेव २८ ( प्रस्ता. ), २१, २७, १०२, १०४

ब्रह्मदेश २७ ( प्रस्ता. ), १३५, २३५, २७६
ब्रह्मपुत्र ५७, १७१ ( ३६७ ), २२१, २३५, २३८, २३९, २७७, २९४
ब्रह्मपुत्रा २४ ( प्रस्ता. ), १६, २७, ३९, ७२, १४१, १५७
ब्रह्महृदय १६३, २६२
ब्रह्मावर्त १८ ( ३२१ )
ब्रह्मी २७६, २७८, २७९, २८०
ब्रह्मी योमा ९०
ब्रिटन ३०३

भ

भगवद्गीता १२३
भगीरथ २२, १५६, १६४, ( ३६३ )
भद्रा ८, ३४, ३५, ३६
भद्राचलम् २९, ३०
भद्रावती ४८
भद्रावती ( नदी ) ९१
भरत ११३, ११४
भरुच ७७, ८३
भर्तृहरि २८ ( प्रस्ता. )
भवभूति १९ ( प्रस्ता. ), १२४, २७९, ( ३८२ )
भांडारकर ९
भागीरथी २१
भागुवा २०५
भाजा २५३
भादर ९०, ९१
भाद्रपदी ९१
भामा २६
भारंगी ४२, ४३, ५८, ६०, ६८
भारत ११, १२, १७, २३, (प्रस्ता ); ७, १८, १२५, १७८, २१७, २३५, २३८, २३९, २६५, २७७, ३०१
भारतमाता ७, १५५
भारतवर्ष १८, २३ ( प्रस्ता. ); ७, १९, ५८, ९०, १४१, १६५, १६७, १७०, १७१, २५८, २५९
भारतवासी १८ ( प्रस्ता. ), ७, १४१
भारतीय भाषा १७, १९ ( प्रस्ता. )
भारतीय संस्कृति २० ( प्रस्ता. ), ८१, १६५, २३५. २३६
भार्गव २३५
भावनगर ८३, २०८
भीम २१३, २१४, २१५
भीमा १९ ( प्रस्ता. ), ५, ७, २६, ८१
भीष्म १३ ( ३१६ ), ८९, १२५
भुज्यु २९९ ( ३८९ )
भुवनचंद्र ( डॉक्टर ) २४९
भुवनचंद्र दास २३६
भुसावळ २४ ( प्रस्ता. ), १८२
भूमध्य-रेषा २८७-२८९
भृगुकच्छ ७७ ( ३४१ ), ३०१
भेडाघाट ८१, १८०, १८३, १८४, १९०
भैरवघाटी ५६
भैरव झँप ४९ ( ३३० )
भोगवती १७९
भोगावो २४ ( प्रस्ता. ) ९०
भोज १०

म

मंगळापुरी ३०१ ( ३९० )
मंगळ २६५
मंचर २७ (प्रस्ता.), ५७, १४४, १४५–१५१
मंडाले २७६
मंदाकिनी २१, १७७
मअुरानीपूर १७७
मकराणी ३०२
मगध साम्राज्य १५
मघा २६५
मच्छु ९०, ९१
मच्छलीपट्टन २७ (प्रस्ता.), ९
मणिपुर २५ (प्रस्ता.), २३८
मणिबेन ४६ ( ३२९ ), ५१
मथुराबाबू १६२
मथुरा-वृंदावन १५, १८, १९, २७७
मॅथ्यू आर्नोल्ड २१ ( प्रस्ता. )
मदालसा २४९ ( ३७४ )
मद्रास २६, २७ (प्रस्ता.). ३०, ३७, २१६, २१८, २१९, २७१, ३०१
मधलिंग–गड ११५
मध्यप्रांत २४, २६ ( प्रस्ता. )
मध्यभारत २९
मनु ४९, २५०
मयासुर ६१
मर्व १४३
मलप्रभा १२८
मलिक कफूर १९७ ( ३७० )
मॅलेट ९ ( ३१५ )
मसुरी २२४, २२५, २२९
महम्मद–बिन–कासिम १४२, १४४ ( ३६० )
महात्माजी १४, २४ ( प्रस्ता. ), ७१, ७२, २३६, २३८, २९२, २९३ ( गांधीजी पहा )
महादेव १९ (प्रस्ता.), २, २२, ४४, ५४, ७६, १००, १०१, १०२, १६८, १८४, २८८
महादेव देसाअी १०, ४१
महादेवाचा डोंगर ७७
महानदी २४, २५ ( प्रस्ता. ), २२, १७१, २००, २०२, २०५, २१७
महाबळेश्वर ४, ९, १३, २९७
महाभारत १३ ( प्रस्ता. ), ६७, १७५, १७९
महाभारतकार ११ ( प्रस्ता. )
महाराष्ट्र ५, १९, २४ ( प्रस्ता. ), ४, ५, ६, ९, १०, २६, २७, २८, ५३, १६४, १८९, २५६
महारुद्र ४४
महालक्ष्मी २१३, २१४, २१५
महावीर १४, १५, १६९
महाश्वेता २० (प्रस्ता.), २४७(३७४)
महिन्द ३०२
मही ( नदी ) २४ ( प्रस्ता. ), ७३
महेन्द्र १८९
महेन्द्र पर्वत १८९
महेश २१
महोदधि २५६, २५७, २५९
मांडुक्य अुपनिषद २९१ ( ३८४ )
माअिकाल ७७
मागोड ७०, ९२

माणिकपुर १७६
मातंग पर्वत ३५, ३६
मातारा १२३, २८७
मानस सरोवर १४, २४ (प्रस्ता.), १०१, १४१, २३९, २९४
मानार २५६
मार्कंडी १ (३१०), २, ९
मार्कण्डेय २ (३११)
मार्मागोवा ९९, ११५, २८१
मालीकांदा १५७
मॉस्को १४४
माहिष्मती १७९
माहुली ३, ४, ६, ७, ११
मिट्टनकोट १४३, १५७
मिथिला ५०
मिशमी २३८
मिश्र २७, २२०, २९१, २९६
मिसर २९४, २९६
मिसिसिपी ४०
मिसिसिपी–मिसोरी ८
मिसोरी ४०
मीनळदेवी २० (प्रस्ता.) (३०८)
मीनाक्षी २० (प्रस्ता.)
मुंगेर १६२
मुंबई २७ (प्रस्ता.), २३, ४२, ५२, ६७, ६८, ६९, १२४, २४७, २५३, २५९, २६४, २६९, २८१, ३०४
मुक्तवेणी १५७, २२१, २२२
मुजफ्फरपुर १५७, १६९
मुठा ८, ११, ३६
मुरगांव ९८, ९९, १००
मुलतान १३४
मुसलमान १५, १३१, १८४, १८५, ३०३
मुळा ८, ११, २९, ३६
मुळामुठा ८, ९, १०, ३६
मूळ (नक्षत्र) २६५, ३८३
मृकुंड २
मृगनक्षत्र २ (३११), २६१, २६२
मेगळ २६ (प्रस्ता.), ९०, ९१
मेघना १६
मेरु २९४ (३८६)
मैथिलीशरण (गुप्त) १७८, १७९
मोमान २३६
मोम्बासा २८७
मोरबी ९१
मोरादाबाद २६ (प्रस्ता.)
मोहन-जो-दडो १४६
म्हैसूर २७, ४०, ४४, ४७, ४८, ५०, ५२, ५३, ५७, ५८, ६३, ६८, ६९, १५४, २०८

### य

यंग इंडिया ७५ (३३८)
यंगहजबंड १४२ (३५७)
यमनोत्री १७
यमराज २० (प्रस्ता.), २, १७, १९ (३२१), २९८
यमुना १८, २०, २४ (प्रस्ता.); १५, १७–२०, २२, ७८, १४१, १७७, १७९, २०८, २२१, २५६
यमुना (नक्षत्र) २६२

यवन १४२ (३५५)
यशोदामाता १९, १७८
यानान ३० (३२७)
याममत्स्य २६२
यामुन ऋषि १८ (३२०)
युअेची १४२ (३५६)
युक्तवेणी १५७, २२१, २२२
युगांडा २९४, २९६
यरेशियन २८५
युरोप, ७, ६४, २७४, २९३, २९५, २९६, ३०४, ३०५
येननजांव २८०
येरवडा (कारागृह) ९ (३१५)
येशू खिस्त २९५, ३०२
योगिनी १८४, १९३

र

रंगपुर २२१, २२२
रंगपो चू २२०, २२१
रंगमती ९०, ९१
रंगीत चू २२०, २२१
रंगून २७ (प्रस्ता.), २५७, २६७ २७३, २७४
रंतिदेव १५, १७५, (३६७)
रघुवंश २५८ (३७६)
रणजितसिंह १३५ (३५३), १३९
रणवीर २२४, २२५, २२७, २२८
रत्नाकर २५६, २५७
रमानंद ११८, ११९, १२३
रवीन्द्रनाथ १९९, २६७ (३७९)
रॉकेट (धबधबा) ५१, ५९
राजकोट ९१
राजगोपालाचारी ४१, ४३, ४६, ५०, ५३, ५४, ५८, २५५
राजघाट २९२
राजपुताना (राजस्थान) ८९, १४१, १५६
राजपुर २२४
राजमहेन्द्री २७, ३०, ३१, ३३
राजा (धबधबा) ४५, ४६, ४७, ५१, ५३, ५४, ५५, ५९, ६०, ६५, ६६, ६७, ६८, ९६
राजेन्द्रबाबू १५८
राणकदेवी २४ (प्रस्ता.), ९० (३४६)
रामगंगा २६ (प्रस्ता.)
रामगड १९८, २००, २०४
रामचंद्र १८ (प्रस्ता.), १५, २०, २६, २७, २८, २९, ३३, ८०, ११४, १२४, १२५, १६१, १७०, १७१, १८४, १९७, २३७, २५२
रामजीसेठ तेली १६६
रामतीर्थ ११९, १३५ (३५२)
रामतीर्थांचा झरा ११३, ११४
रामतीर्थांचा डोंगर ११३
रामदास २७९ (समर्थ पहा.)
रामदेवजी (आचार्य) २२४ (३७१)
रामधनुष्य २५७
रामबन १३८
रामरक्षा १२७ (३५०)
रामशास्त्री प्रभुणे ५, ७
रामायण १२४ (३४९)

रामेश्वर ५, ६, २७ (प्रस्ता.), २५८, २५९
रामेश्वर (गोकर्ण) ११३, ११४
रॉलेट ॲक्ट ७५
रावण ३४, ३६, ६६ (३३४), १०१, १०२, १०३, १०४, १२४
रावी १३४–१३७, १४३
राष्ट्रध्वज १६७
राष्ट्रभाषा ७ (३१४), २४७
राष्ट्रीय रक्षण विद्यालय १०
रिपन फॉल्स २९०
रुक्मिणी २३८
रुद्र २२८
रुद्र (धबधबा) ४६, ५१, ५४, ५९, ६०, ६५, ६६
रेणुका २३७
रेवा १८ (प्रस्ता), ७७ (३४१), ८१
रैहाना बहन १४८ (३६१)
रोंगनी चू २२०, २२१
रोअरर (धबधबा) ५१, ५९
रोम ५०, ६३
रोमें रोला २१ (प्रस्ता.), ६४ (३३३)
रोरो चू २२०, २२१
रोहरी १४३, १५६, १५७
रोहिणी २६१, २६२
ऱ्होडेशिया २१५

ल

लंका २०, २६ (प्रस्ता.) १६, १०२, १२३, १२४, १२५, २५८, ३०१
लंडन २१७
लक्ष्मण २८, ३३, १२५
लक्ष्मणझूला १४ (३१७)
लक्ष्मी १०२, २६१, २७४, ३०३ (३९२)
लक्ष्मी (गांधी) ४६ (३३०)
लशिंग्टन ९२
लष्करी शाळा (डेहराडून) २२४
लांगुल्या २०६
लाचेन चू २२०
लारकाना १४७
लाहोर १३५, १३७, १४३ (३५८), १८५
लिओपोल्ड २९५
लिस्बन २१७
लूनी ८७, ८८
लेडी ठाकरसी ९
लेडी (धबधबा) ५१, ५९
लेण्याद्रि २५३
लोंढा ९८
लोकमाता ५, ११, १२, १३, २३ (प्रस्ता.)
लोकमान्य टिळक ७
लोणावळा २०८
लोहित (ब्रह्मपुत्र) २३५, २३८
ल्हामो (चो) २२०

व

वंशधारा २०६
वजिरीस्तान १४२
वडील ५, ९८, १०४, १०६, १०८, ११०, १११, ११५, ११६, ११७, १७२

वढवाण २४ (प्रस्ता.), ९०
वन्यजाति २३५, २३८, २३९
वरदा ३५
वरदाचारी २५५
वराह पर्वत ३४
वराहमूलम् १३२
वरुणदेव ४४, १५४, १५५, २९८ (३८९), २९९, ३००, ३०२, ३०३, ३०५
वर्धा २०३, २०७, २६४
वर्धा (नदी) २९
वसिष्ठ १९७
वसिष्ठ गोदावरी ३०
वसिष्ठ (तारा) १३०
वाभ्री २७
वाकाटक १९७ (३७०)
वाघमती १९ (प्रस्ता.), ७३, १६५, १६७, १७४, १७९
वाबाबुदान ३४
वायकिंग ३०३ (३९२)
वारणा ७
वालेश्वर २४७
वाल्मीकि १९ (प्रस्ता.), १४, २२, २७ (३२५), १२४, १७०, १७
विंध्य १८ (प्रस्ता.), ७७ (३४१), ९०
विंध्य–सातपुडा २७
विक्रम २८ (प्रस्ता.), २३९, २४०
विक्रम संवत् ८१ (३४३)
विचित्रवीर्य ८९
विजयनगर ८ (३१५), ३५, ३६
विझगापट्टन २७ (प्रस्ता.)
विठोबा १०७
वितस्ता १३०, १३१, १३४, २१७, २७७
विरूपाक्ष ३५
विलायत २९६
विवेकानंद १६८, २६०, ३०२
विशाखा २६५
विश्वामित्र २० (प्रस्ता.), १७०, १७१, १७९, १९७
विश्वामित्री २४ (प्रस्ता.)
विषुववृत्त २८९
विष्णु २१, ८०, १०२, १६८
विष्णुमती १६७
विष्णुशर्मा १४८
वीरभद्र १५३
वीरभद्र (घब्रधब्रा) ४६, ५१, ५४, ५५, ५९, ६०, ६६, ६७, ६८
वुलर ५७, १३३
वृन्दावन १५, १८, १९, २७७
वृन्दावन (म्हैसूर) १५४
वृश्चिक २८३
वेगमती १७९
वेणीप्रसाद १६३, १६४
वेण्या ४ (३११), ७, ११, २६
वेत्रवती २६ (प्रस्ता.), १७४, १७९ (३६८)
वेद ३६, १३५, २९८
वेद (नदी) ३५
वेदकाल १९ (प्रस्ता.), १३०, १३९, २६८, २९८
वेदावती ३५
वेरूळ १२४ (३४९)

वेळगंगा १२४, १२५
वैजनाथ १ ( ३११ )
वैतरणी १९ ( प्रस्ता. )
वैदिक संस्कृति ३६
वैनगंगा २९
वैष्णव १९ ( प्रस्ता. ), २३८
वौंठा ७४ ( ३३५ )
व्याघ २६२
व्यास १९, २३ ( प्रस्ता. ), ५९ १७९, २३६
व्यास ( बीआस नदी ) १३४, १४३ ( ३५८ )
व्योहार राजेन्द्रसिंह १९३

श

शंकर ५९, ६१, २२२
शंकरदेव २३८
शंकरराव गुलवाडो १३ ( ३१६ ), ९२
शंकरराव भिसे २१३
शंकराचार्य २९ ( ३२६ ), ३४, १९७
शंभु १०२
शकुन्तला १५, १८, २७५, (३८०)
शनि १६०
शबरी २९
शरयू १५ ( ३१८ ), २६
शरावती २६ ( प्रस्ता. ), ४२, ४३, ५२, ५८, ५९, ६०, ६३, ६७, ६८, ६९, ७०, ९२, १७९
शर्मिष्ठा १५ ( ३१८ )
शहाजहान १९
शहापुर १७२
शांडिल्य महाराज ११३
शांतादुर्गा २८८
शातवाहन ८१
शालिवाहन ८१
शालिवाहन शक ८१ ( ३४३ )
शाळिग्राम १९ (प्रस्ता.), १६८, १७३
शाहू ३, ५
शिंगु भगवान १६७
शिप्रा ( क्षिप्रा ) २६ ( प्रस्ता. )
शिमोगा ३५, ४०, ४१, ६७
शिरसी ६७, ९२, ९३
शिलाँग १५७, २३८
शिलिगुडी २२१
शिव २, २२, ७७, ८०, ८२, २२२, २५६, २८८, २९७
शिव-तांडवस्तोत्र १५३ ( ३६२ )
शिवनेरी १८९
शिवशंकर ( शुक्ल ) ७२ ( ३३५ )
शिवा ( गोंड मुलगी ) २०१–२०२
शिवाजी ५ ( प्रस्ता. ), ५, १०, १८९
शुक १९ ( प्रस्ता. )
शुक्र ८६ ( ३४४ ), २२८, २६५, २८३
शुतुद्री १३४
शेत्रुंजा ९०
शेत्रुंजी ९०
शेवण १४४
शोणपुर १७१
शोणभद्र १५, ३१, १६८, १७०–१७१, १९७

शौनक १७८
श्रद्धानंद १८
श्रवण २८३ ( ३८३ )
श्रीकृष्ण ७ ( ३१३ ), १५, १९, १८७, २४७, २४९, २५५
श्रीनगर ( काश्मीर ) १२९, १३३, १३८
श्रीनगर ( गढवाल ) १८, १८०
श्वेडेगॉन पॅगोडा २७४

## स

संघमित्ता ३०२ ( ३९१ )
संबलपुर २००
संभाजी ६७
संस्कृत १३, १५, ( प्रस्ता. ); ९, ७२, ८५, १२५, २५३, २७६, २९२ ( ३८५ ), २९४
सक्कर १४३, १४४, १५६, १५७
सगरपुत्र १६ ( ३१९ )
सतलज १३४, १३५, १४१, १४३
सती १३० ( ३५१ )
सतीश ५ ( प्रस्ता. ), २८७, (३८३)
सतीसर १२९ ( ३५१ )
सती सुहिणी १४५ ( ३६० )
सत्याग्रह १४ (प्रस्ता.), ७५ (३३८)
सदाकत आश्रम १५८ ( ३६२ )
सदाशिव २९९
सदाशिवगड ११८
सदिया २४ ( प्रस्ता. ), २३८
सप्तर्षि १३०, २६४, ३८३
सप्तसिंधु १८ ( प्रस्ता. ), १३९, १४१ ( ३५५ )
सफेद कोह १४२ ( ३५७ )
समरकंद १३३, १४४
समर्थ रामदास ५, ६, २८, १८९
समुद्रगुप्त १४, १९७ ( ३६९ )
सरदार–पुल ७५
सरयू २६ ( प्रस्ता. ),
सरस्वती १८, १९, २७ ( प्रस्ता. ), ५५, ७३, ७८, ८८, ८९, १७९, २२१
सरस्वती ( देवी ) १०२
सरोजा २९२, २९३
सरोजिनी ( नाणावटी ) ९५, ११९, १९६
सर्वोदय २९३
सहस्रधारा २२३–२२८, २२९, २३२
सहस्रार्जुन २३७
सहारा १५ ( प्रस्ता. ), १७२
सह्याद्रि ४, २७, २९, ४२, ५७, ८१, ९०, ९३, १५८, २३५, २९७
सांगली ४
सांभर सरोवर ८७ ( ३४४ )
सागर ४०, ४१, ६७
सागरमती ८८
सातपुडा १८ (प्रस्ता.), ७७(३४१), ९०
सातारा ३ (३११), ४, ११, २७, ९८
साधुबेला १४४
सानपो २३९, २९४
साबरमती १९, २३ ( प्रस्ता. ), ७१–७६, १७४, १७९
साबरमती आश्रम ७५, ७६

साभ्रमति ७३–७४
सायणाचार्य ३६
सारस्वत १८ ( प्रस्ता. )
सारस्वती १७४
साहित्य ॲकॅडमी ६, ११, १२ (प्रस्ता.)
सिंगापुर २८७, ३०४
सिंदबाद ३००
सिंध २६, २७ ( प्रस्ता. ), १४२, १४६, १४९, १५७
सिंध हैदराबाद ७१, ८७
सिंधु १८, १९, २६ ( प्रस्ता. ); २२, २७, ३१, ३६, ३९, ५७, ७१, ७२, ८१, १३४, १३५, १४१–१४५, १५६, १५७, १७१, २२१, २७७
सिंधु ( म. प्र. ) २६ ( प्रस्ता. ), १९ ( ३२२ )
सिंहगड ८ (३१६), ९, १०, २०८
सिंहपुत्र विजय ३०० (३९०), ३०१
सिकंदर १४२, १४४
सिक्कीम २२१
सिद्धापुर ६७, ९३, ९४
सिद्धिविनायक १०३
सिनो लो चू २२०
सिमला १३८
सियारामशरण ( गुप्त ) १७८, १७९
सिलोन ६, २७ ( प्रस्ता. ), ११५, १८९, २२७, २८७ ( लंका पहा )
सीता १८ ( प्रस्ता. ), २० २७, २८, ३३, ३६, १२४ ( ३४९ ), १२५ १२७, १६९ (३६५), १७०, २७७
सीता ( नदी ) २२
सीतानहाणी १२४, १२७
सीतावाका २६ ( प्रस्ता. ), १२५
सीताहरण ८ (३१४)
सीन २१७
सीम व्हो २२०
सुंदरवन १६, १५७, २६७
सुखा २०९
सुचक्षु २२
सुदान २९४, २९७
सुरत २४ ( प्रस्ता. ), २८४
सुर्माघाटी २५ ( प्रस्ता. ), १५७
सुलेमान ( पर्वत ) १४९
सुवर्णदेश २८० ( ३८३ )
सूत १७९
सूपा ९२
सूर्यवंश ११४
सूर्या २४ ( प्रस्ता. ), २१३, २१४, २१५
सेंट जॉर्ज फोर्ट २१८
सेंट फ्रांसिस झेवियर ३०२
सेंट विल्यम्स फोर्ट २६७
सेतुबंध महादेव ५५
सेमीरामीस १४२ ( ३५५ )
सेसेरी ( नदी ) २३८
सोपारा, २५२, ३०१ (३९०), ३०२
सौराष्ट्र २० ( प्रस्ता. ), ७६, ८३, ९०, ९१, ३०१
सौवीर देश १५७ ( ३६२ )
स्कार्डु १४२
स्कँडिनेव्हिया ३०३
स्टॅन्ले २९५ ( ३८६ )

१०१८८

स्पिक २९४ (३८५)
स्पेन ३०३
स्मरण-यात्रा १५ (प्रस्ता.)
स्वात १४२
स्वाति १६०, २५४, २६४, २८३
स्वीडन २७ (प्रस्ता.)

ह

हंस (नक्षत्र) २६२, २८३,
हॅर्कटॉम १७१ (३६७)
हजीरा २४ (प्रस्ता.)
हणमंतराव ३७
हनुमान २८ (३२६), ११४, २५८
हबसाण (ॲबिसीनिया) २९३
हरद्वार १४, १८, २२, २३, २२१
हरपालपुर १७६, १७७
हरिकी पायरी २२, २३, २४
हरिजन २६५
हरिद्रा ३५
हरियाणा १९
हरिश्चंद्र २८ (प्रस्ता.), १०४
हरिहर ३५, २५६
हरिहरेश्वर २८८
हर्ष १४
हस्त २६४
हस्तिनापुर १९
हळगा ९३
हाथमती १९ (प्रस्ता.), ७३, १७४, १७९
हाला पर्वत १४९
हिंमतपुर १७७
हिंदी महासागर १२३, २५९, २६६, ३०५
हिंदी ७ (३१४)
हिन्दुस्थान १८, १९, २३, ७२ (प्रस्ता.), १४, १५, १६, १९, ३९, ४०, ४८, ६३, ७१, ७६, ७७, ८०, १२२ (३४८), १२४, १३३, १३४, १४०, १४१, १४२, १५०, १६५, १९६, २०९, २६०, २६५, २६७, २७६, २८१, २८४, २९२, २९४, २९६, ३०२, ३०३, ३०५
हिन्दु २४–२५, २६५, २९४
हिन्दुकुश ९०, १४१
हिमालय ५, १४, १७, २४, २६, (प्रस्ता.); ६, १६, १७, १८, २१, २२, २३, २७, २८, ३९, ५३, ५५, ५६, ५७, ७६, ८५ ९०, १०१, १३५, १३७, १४०, १४१, १५८, १६६, १७७, १८०, २१९, २२०, २३८, २३९, २५२, २६०,
हिरात १४३
हीराबंदर २७ (प्रस्ता.), १६३
हुबळी ९२
हूण १४२ (३५६)
हैद्राबाद २७, ६९
होन्नावर ३९ (३२८), ४०, ५६, ६९, ९२
होन्नेकोंब ९३
होशंगाबाद ८२, १८३
होसतोट ९३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

REFBK-0010188

REFBK-0010188